# पंडित शिवनाथशास्त्री

## यांचे आत्मचरित्र

अनुवादक

**प. स. देसाई**

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृति मंडळ

# पंडित शिवनाथ शास्त्री
# यांचे आत्मचरित्र

पं. शिवनाथ शास्त्री यांच्या
" आत्मजीवनी "
या बंगाली पुस्तकाचा मराठी अनुवाद

अ नु वा द क
परशुराम सदाशिव देसाई

आवृत्ती : १९७३, शके १८९४

प्रकाशक :
सचीव, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृति मंडळ
सचिवालय, मुंबई ३२.

© प्रकाशक

मुद्रक
य. गो. जोशी
आनंद मुद्रणालय,
१५२३ सदाशिव, पुणे ३०

**मूल्य ११ रुपये**

# पुरस्कार

मराठी भाषेला व साहित्याला ज्ञानविज्ञानाच्या क्षेत्रात पश्चिमी भाषांचा दर्जा प्राप्त व्हावा; इंग्रजी, फ्रेंच, जर्मन, रशियन इत्यादी भाषांना जसे विद्यापीठीय स्तरावर स्वयंपूर्ण महत्त्व प्राप्त झाले आहे तसे मराठी भाषेला व साहित्याला प्राप्त व्हावे; इंग्रजी भाषेला व साहित्याला आज भारतीय विद्यापीठांमध्ये जसे मुख्य स्थान आहे तसे स्थान, महाराष्ट्रामधील विद्यापीठांत मराठी भाषेला व साहित्याला प्राप्त व्हावे या उद्देशाने साहित्य आणि संस्कृति मंडळाने वाङ्मय-निर्मितीचा विविध कार्यक्रम हाती घेतला आहे. विश्वकोश, मराठी महाकोश, वाङ्मयकोश; विज्ञानमाला, आंतरभारती, भाषांतरमाला इत्यादी योजना या कार्यक्रमात अंतर्भूत आहेत.

संस्कृत व बंगाली, गुजराती, कानडी, तमीळ इत्यादी भारतीय भाषा, आणि त्याचप्रमाणे इंग्रजी, फ्रेंच, जर्मन, इटालियन, रशियन, ग्रीक, लॅटीन इत्यादी पश्चिमी भाषांतील व उच्च साहित्यामधील विशेष निवडक पुस्तकांचे भाषांतर किंवा सारांश-अनुवाद अथवा विशिष्ट विस्तृत ग्रंथांचा परिचय करून देणे हा भाषांतर-मालेचा उद्देश आहे.

भाषांतर-योजनेतील पहिला कार्यक्रम मंडळाने आखून, ज्यांना अग्रक्रम दिला पाहिजे अशी पाश्चात्य व भारतीय भाषांतील सुमारे २०० पुस्तके निवडली आहेत. होमर, व्हर्जिल, एस्किलस, ॲरिस्टोफेनीस, युरिपिडिस, प्लेटो, ॲरिस्टॉटल, थॉमस ॲक्वाइनस, न्यूटन, डार्विन, रुसो, कांट हेगेल, जॉन स्टुअर्ट मिल, ग्योथे, शेक्सपीअर, तल्स्तोय दस्तएवस्की स्तानिस्लावस्की, बर्ट्रांड रसेल, रुथ बेनेडिक्ट रायशेनबाख व्हाइटहेड, क्रोचे, मॅलिनाव्स्की, कॅसिरेर, गॉर्डन व्ही. चाइल्ड इत्यादिकांच्या ग्रंथाचा या भाषांतरमालेत समावेश केला आहे. संस्कृतमधील वेद, उपनिषदे, महाभारत, रामायण, भरताचे ‘नाट्यशास्त्र’, ‘संगीतरत्नाकर’, ‘ध्वन्यालोक’, प्राकृतातील ‘गाथासप्तशती’, त्रिपीटकातील निवडक भाग इत्यादिकांचाही या भाषांतरमालेत समावेश केला आहे.

१९ व्या शतकात भारतातील इतर प्रदेशांप्रमाणे बंगालमध्येही समाज-सुधारणेच्या चळवळीला बळ प्राप्त झाले होते. बंगालमध्ये समाजसुधारणेचा पाया ब्राह्म समाजाने घातला. विधवा विवाह, मिश्रविवाह, सहभोजन, जातिभेद निर्मूलन, स्त्रीशिक्षण इत्यादी कार्यक्रमांचे बीजारोपण या चळवळीने केले. इ. स. १८६९

मध्ये शिवनाथशास्त्रींनी ब्राह्म समाजात प्रवेश केला व नंतर त्याचे आचार्यपदही भूषविले. १९ व्या शतकातील वैचारिक निबंधकारांमध्ये त्यांचे स्थान वरच्या दर्जाचे आहे. ज्या काळात पंडित ईश्वरचंद्र विद्यासागर, देवेंद्रनाथ ठाकूर, केशवचंद्र सेन, शिवनाथशास्त्री इत्यादींनी त्याग व साधनेच्या जोरावर नवीन मूल्यांची स्थापना केली त्या काळच्या संक्षिप्त सांस्कृतिक इतिहासाचे दर्शन प्रस्तुत आत्मचरित्रात घडते. तसेच समाजसुधारणेच्या विविध कार्यक्रमांमुळे त्या काळात नव्या विचारसरणीचा उदय कसा झाला याचे अनुभवजन्य चित्रणही या पुस्तकात आढळते.

पंडित शिवनाथशास्त्री यांनी लिहिलेल्या " आत्मजीवनी " या मूळ बंगाली पुस्तकाचा मराठी अनुवाद श्री. प. स. देसाई, कोल्हापूर यांनी केला असून तो मंडळाच्या वतीने प्रकाशित करण्यास मंडळास आनंद होत आहे.

**लक्ष्मणशास्त्री जोशी,**
अध्यक्ष,
महाराष्ट्र राज्य साहित्य-संस्कृति मंडळ

वाई : १३-१२-१९७२

# निवेदन

पंडित शिवनाथशास्त्री यांच्या बंगाली आत्मचरित्राचा हा अनुवाद सादर करताना वयाच्या ८० व्या वर्षी मराठी साहित्याची सेवा घडल्याबद्दल मला मनापासून समाधान वाटत आहे. पंडित शिवनाथशास्त्री हे बंगालमध्ये जुन्या जमान्यात होऊन गेलेले एक विद्वान समाजसुधारक आहेत. त्यांनी या आत्मचरित्रात आपल्या जीवनाचा जन्मादारम्य वृत्तांत मोकळेपणाने आणि निस्पृहतेने दिला आहे. त्यांचे कार्य विविध होते. ब्राह्मसमाजाचे ते कडवे पुरस्कर्ते होते. पुनर्विवाह, बालविवाहप्रतिबंध, जातपात एकीकरण यांचा त्यांनी हिरीरीने पुरस्कार केला. त्यामुळे या आत्मचरित्रात त्यांच्या जमान्यातील चालरीती, रूढी, ज्ञातीबंधने, पूजा-अर्चा, संस्कारसंस्कृति, सुधारक–दुर्धारक, धर्मसुधारक आणि कर्मठ या सर्वासंबंधीचे विवेचन आणि त्यांच्यातील संघर्षही स्वाभाविकपणाणेच आले आहेत.

पंडित शिवनाथशास्त्री हे ध्येयनिष्ठ होते. स्वतःची चूक असेल तर ती मान्य करणे, सत्यासाठी झगडत रहाणे, अयाचित वृत्तीने जगणे, वडीलधाऱ्या माणसांचा योग्य आदर करणे, कष्टाळू आणि बहिष्कृत जीवन जगण्यात सहनशीलता धारण करणे हे त्यांच्या जीवनक्रमाचे विशेष आहेत. युयुत्सु वृत्ति असूनही द्वेष, सूड, मत्सर यांना त्यांच्या अंतःकरणात स्थान नव्हते. आपल्या मताला आणि ध्येयाला पूर्णतः चिकटून राहूनही त्यांनी लोकसंग्रह केला हे त्यांच्या जीवनाचे वैशिष्ट्य होते. संघर्षातही सचोटी आणि सत्यनिष्ठा त्यानी कशी राखली हे या आत्मचरित्रावरून पदोपदी प्रत्ययास येते. आपल्या बालविवाहित द्वितीय पत्नीचा पुन्हा विवाह करून देण्याचा त्यांनी जो चिकाटीने प्रयत्न केला तो पत्नीने साधू दिला नसला तरी त्यावरून त्यांच्या थोर अंतःकरणाची साक्ष पटते.

त्यांच्याकाळी १८७२ चा विवाहविषयक तिसरा कायदा पास झाला होता. पुढे चवथा कायदा झाला; तो सरकारला करणेच भाग पडले. त्याची पार्श्वभूमी या आत्मचरित्रकाराच्या समाजसुधारणाविषयक धोरणात दिसून येते. आदिब्राह्म-समाज, साधारण ब्राह्मसमाज आणि नवविधान ब्राह्मसमाज यातील झगडा त्यात प्रतिबिंबित झाला आहे. ब्राह्मसमाजाच्या धर्तीवर मुंबईत प्रार्थना समाज स्थापन झाला. तो काळ आणि आजचा काळ यात जमीनअस्मानांचे अंतर पडले आहे. पण या आत्मचरित्रामुळे त्यावेळच्या घटनांना पुन्हा उजाळा मिळाला आहे. हे आत्मचरित्र एखाद्या नवलकथेप्रमाणे वाटते ते त्याकाळच्या कट्टर आणि सुधारणा-वादी चळवळीमुळेच होय. या आत्मचरित्रकाराचा अखिल भारताचा व इंग्लंडचा

प्रवास वाचला तर तत्कालीन समाजरचनेचे त्यांचे निरीक्षण किती सूक्ष्म होते याची कल्पना येते. ४०० पृष्ठांचा हा ग्रंथ समग्र वाचल्यावाचून खाली ठेववत नाही इतका तो रसाळ वठला आहे.

पंडित शिवनाथशास्त्री यांचे कर्तृत्व बहुविध होते. अनेक नियतकालिकांचे ते संपादक होते. त्यांनी अनेक प्रबंध लिहिले; उत्स्फूर्त प्रतिभेने रसात्मक काव्येही त्यांनी रचली. "मेजबऊ", "नयनतारा" या त्यांच्या कादंबऱ्या त्याकाळी फार गाजल्या होत्या. समाजसुधारणेबरोबर शिक्षणसुधारणा व ग्रामसुधारणा हीं कार्येही त्यांनी मोठ्या तळमळीने केली. पैशाचे फारसे पाठबळ नसताही अनाथ मुलामुलींना त्यांनी आश्रय दिला होता. अशा या लोकोत्तर आणि तत्वनिष्ठ पुरुषाच्या आत्मचरित्राचा अनुवाद करण्याची संधि मला साहित्य आणि संस्कृति मंडळाने दिल्याबद्दल मी मंडळाचा ऋणी आहे. हा अनुवाद माझ्याकडून पुरा करून घेऊन तो शक्य तितक्या लवकर प्रकाशित करण्याच्या कामी साहित्य आणि संस्कृति मंडळाच्या भाषांतर विभागाचे मानसेवी संपादक श्री. बा. रं. सुंठणकर यानी जे सहाय्य केले त्याबद्दल मी त्यांचा फार आभारी आहे. तसेच या अनुवादाचे समीक्षक श्री. स. ग. सुखठणकर यानी अनुवाद वाचून सुधारणा सुचविल्या त्याबद्दल त्यांचे आभार मानणे माझे कर्तव्य आहे.

११४५ बी, यादव वाडा,
कोल्हापूर – २.
दिनांक १३–१२–७२.

प. स. देसाई

# प्रकाशकाचे निवेदन

पंडित शिवनाथशास्त्री महाशयांच्या 'आत्मजीवनी' ची द्वितीय आणि तृतीय आवृत्ती श्री. सतीशचंद्र चक्रवर्ती महाशय यांनी संपादित केली. ग्रंथकारांनी स्वतः लिहिलेली प्रत व पहिल्या आवृत्तीचे हस्तलिखित यांची तुलना करून द्वितीय आवृत्तींत त्यांनी थोडीफार सुधारणा केली होती. संपादकीय निवेदनांत त्यांनी लिहिले होते, 'मी केवळ पुनरुक्ती वगळून, वर्णनात न जुळणारे दोष टाळून फक्त सुसूत्रता आणण्याचा प्रयत्न केला आहे.' मूळ हस्तलिखितातून ग्रंथातील परिशिष्टाचा भाग द्वितीयावृत्तीतच प्रथम छापण्यात आला. परिशिष्टांतील 'प्रसन्नमयी' देवीचा प्रसंग हा शास्त्रीमहाशयांनी या ग्रंथासाठी लिहिला नव्हता. पण तो प्रसंग परिशिष्टातील इतर प्रसंगांप्रमाणेच आहे असे वाटल्यावरून शास्त्रीमहाशयांचे सुपुत्र प्रियनाथ भट्टाचार्य महाशयांच्या परवानगीने द्वितीय आवृत्तीला जोडण्यात आला. ग्रंथातील प्रकरणांचा जसा त्यांनी अनुक्रम ठेवला होता, तसाच तो या आवृत्तीतही ठेविला गेला आहे. फक्त प्रत्येक प्रकरणाच्या प्रारंभी असलेला त्यातील विषयाचा थोडक्यात दिलेला गोषवारा तेवढा आम्ही वर्ज्य केला आहे. शिवाय परिच्छेदाच्या प्रारंभी दिलेल्या विषयाच्या नावातही या आवृत्तीत जागोजागी बदल केला आहे.

या "आत्मजीवनी"त ज्या विदेशी विद्वान् व्यक्तींचा उल्लेख आहे, त्यांचा थोडक्यात परिचय ग्रंथाच्या शेवटी जोडला आहे.

सिग्नेट प्रेस, १०।२ एल्गिन रोड
कलकत्ता–२०

**दिलीपकुमार गुप्त**
प्रकाशक

# अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| १ | कुलवृत्तान्त | १ |
| २ | माघ प्रतिपदेला जन्म | १३ |
| ३ | कलकत्त्यातील विद्यार्थीजीवन | ४५ |
| ४ | धार्मिक जींवनाचा उगम | ६५ |
| ५ | विद्यार्थी दशेतील समाज सुधारणा | ९२ |
| ६ | ब्राह्मसमाजात प्रवेश | ११८ |
| ७ | केशवचंद्रांच्या भारत आश्रमात | १३८ |
| ८ | ग्रामसुधारणेला स्वतःला वाहून घेतले | १५५ |
| ९ | कलकत्त्यात अध्यापन | १६३ |
| १० | भारत सभेची स्थापना | १७५ |
| ११ | केशवचंद्र सेन यांच्याशी वेगळीक | १८८ |
| १२ | साधारण ब्राह्मसमाजाची स्थापना | २०१ |
| १३ | भारतभ्रमण | २१५ |
| १४ | साधारण ब्राह्मसमाजाचे मंदिर उभारले | २३७ |
| १५ | दक्षिण भारताचे नवदर्शन | २४५ |
| १६ | कृतिशील जीवन | २६३ |
| १७ | इंग्लंडचा प्रवास | २७९ |
| १८ | इंग्लंडात नवीन जाणीव | २९९ |
| १९ | इंग्लंडचे स्त्रीजीवन | ३१२ |
| २० | इंग्रजांच्या चारित्र्यातील शक्तीचा उगम कोठे आहे ? | ३२३ |
| २१ | इंलंडहून स्वदेशात पुनरागमन | ३३१ |
| २२ | पुनः दक्षिण भारतात | ३३७ |
| २३ | आयुष्याची अखेर | ३४९ |
| २४ | परिशिष्ट- १ | ३५६ |
| | परिशिष्ट २ | ३९१ |
| | वर्णानुक्रम नामसूचि | ३९७ |



शिवनाथ शास्त्री : जन्म १८४७ मृत्यू १९१९ ई.

. १ .

# कुलवृत्तान्त

## मजिलपूर गाव

कलकत्त्यापासून सुमारे वीस मैलांवर आग्नेय दिशेला सुंदरबनाच्या उत्तर भागात मजिलपूर नावाचा एक गाव असून तो गाव सुप्रसिद्ध जयनगर गावाच्या पूर्वेला आहे. यात ब्राह्मण–कायस्थांचीच वस्ती जास्त. लोकवस्तीपासून दूर गावच्या टोकाला लोहार, कुंभार, धोबी, न्हावी, हाडी,[१] मोची वगैरे लोकांची वस्ती आहे. जरी हे संख्येने कमी असले तरी गावातील ब्राह्मण–कायस्थ यांच्या कामधंद्याला यांचा पुरेसा उपयोग होतो.

गावचा इतिहास माहीत नाही; पण अनुमानाने असे वाटते की एके काळी गंगा नदीचा प्रवाह या बाजूने जात असावा.[२] त्यामुळे गावची वस्ती उंचवट्यावर वसलो असावी. पोर्तुगीज लोक जेव्हा या देशात आले तेव्हा त्यांच्या येण्याचा मार्ग हाच, असे जरी निश्चित आधाराने सांगता येत नसले, तरी प्राचीन बंगाली काव्यातून व पोर्तुगीजांच्या प्रवासवृत्तावरून या भागात ' मयदा ' या नावाच्या एका गावाचा उल्लेख आढळतो आणि मजिलपूरच्या ईशान्येस काही कोसांवर ' मयदा ' नावाचा गाव आजही आहे. यावरून असे अनुमान निघते की, पोर्तुगीज लोक याच मार्गाने आले असावेत. गावाजवळ माती खोदीत असता फुटलेल्या

१. डोंब, भंगी यांसारखी हिंदुसमाजातील खालची जात.

२. अजूनही मजिलपूर आणि जयनगर या दोन गावांच्या मधोमधच्या जमिनीला ' गंगारबादा ' असे म्हणतात आणि आजही आमच्या गावच्या पुष्करणीचे पाणी पवित्र ' गंगाजल ' .असे मानण्यात येते.
—आत्मचरित्रकार



पं – १–२

जहाजांचे अवशेष व बोटींच्या अस्तित्वाचे अवशेष मिळतात. यावरून असे अनुमान निघते की, एके काळी या प्रदेशातून जलमार्गाने व्यापारी नौकांचे दळणवळण असावे. अर्थात हा गाव फारसा प्राचीन नव्हे असे म्हणायला हरकत नाही.

## पूर्वज– श्रीकृष्ण उद्गाता

जहांगीर बादशहाच्या काळी जेव्हा राजा मानसिंगाने जशोर नगरावर आक्रमण केले, त्यावेळी चंद्रकेतु दत्त नावाचे एक सन्मान्य कायस्थ सद्‌गृहस्थ जशोर भागातून पलायन करून सुंदरबनातील टेकडीवर वसलेल्या या मजिलपुरात सहपरिवार येऊन राहिले.[3] त्यांच्याच बरोबर त्यांच्या घरात यजन–याजन करणारे पुरोहित व कुलगुरू श्रीकृष्ण उद्गाता नावाचे एक ब्राह्मण कुटुंबही आले आणि यजमानांनी दिलेल्या लहानशा जमिनीत स्वतःला राहण्यासाठी त्यानी एक घर बांधले अशी वदंता आहे. हेच आमचे पूर्वज. श्रीकृष्ण उद्गाता कोण व मूळ कुठचे राहणारे याबद्दलची सविस्तर माहिती मिळालेली नाही. जशोरहून आले होते एवढ्यावरून वाटते की, ते पूर्वेकडच्या प्रदेशातील असावेत. पण ते बरोबर नाही. कारण आम्ही दक्षिणी वैदिक ब्राह्मण म्हणून प्रसिद्ध आहो. वेदापासून वैदिक नावाची उत्पत्ती. शिवाय उद्गाता ही पदवीही वैदिकसंबंधाची साक्ष देत आहे. वैदिक ऋत्विज मंडळींत होता, ब्रह्मा, अध्वर्यू आणि उद्गाता अशा चौघांचा उल्लेख असतो. दक्षिणेत तैलंगण आणि द्रवीड देशांत वैदिक हा शब्द एका विशिष्ट ब्राह्मण जातीला उद्देशून योजण्यात येत असलेला आजही आढळतो. धार्मिक गृह-कृत्यांत जे यजन–याजन यातच फक्त भाग घेतात ते ‘ वैदिक ’ आणि इतर पुरोहितगिरी करणारे ते ‘ लौकिक ’ असे संबोधण्यात येते. याशिवाय अजूनही त्या सगळ्या देशात अनेक ठिकाणी वैदिक पद्धतीने होम–हवनादि कर्मे करण्याची पद्धत चालू असल्याचे दिसून येते. खेरीज जे केवळ वेदपाठी, वेदगायक आणि होम–हवनादि वैदिकक्रियेचे अनुष्ठानादि प्रधानकार्य करून राहणारे असेही पुष्कळ ब्राह्मण तेथे आहेत.

चैतन्यचरितामृत ग्रंथांत चैतन्यदेव हे यात्रेच्या निमित्ताने दक्षिणेकडे फिरत असता गोदातटाकी वैदिक ब्राह्मणांचा उल्लेख आढळतो.

“ वैदिक ब्राह्मण सब करेन बिचार–
ऐइ सन्यासीर तेज देखि ब्रह्मसम शूद्रे आलिंगिया केन करेन क्रंदन ! ”

( भावार्थ– तेथील सर्व वैदिक ब्राह्मण असा विचार करू लागले की,

---

३. चंद्रकेतू यांच्या परिवारातील मंडळी आजही आहेत. ते सर्व मजिल-पूरचे दत्त म्हणून प्रसिद्ध आहेत– [ आत्मचरित्रकाराचा हस्तलिखित कुलवृत्तान्त. ]

या संन्याशाचे तेज तर ब्राह्मणासारखे; मग हा असा शूद्रांना मिठ्या मारून रडतो का ? )

यावरून असे वाटते की, खुद्द श्रीकृष्ण उद्गाता असो वा त्यांचे पूर्वज असोत त्यांपैकी कोणीतरी दक्षिणेकडून बंगदेशात आले असावेत. आमच्या वंशात अशी एक लोकोक्ती आहे की, ' यांचे पूर्वज ओरिसातील जाजपूर येथून आले होते ' ओरिसात आजही ' ओता ' नावाची एक ब्राह्मण शाखा आढळते. हा ' ओता ' शब्द ' होता ' अगर ' उद्गाता ' याचा अपभ्रंश असावा की काय हे सांगता येत नाही. श्रीकृष्ण उद्गाता यांपासून आम्ही नवव्या पिढीनंतरचे.

## सरकारी नोकरी

या वंशातील ब्राह्मणांनी मजिलपूर गावचा मध्यभाग व्यापला आहे. हे वात्सगोत्री ब्राह्मण. आतापर्यंत केवळ यजन–याजन व अध्ययन–अध्यापन या कार्यात गढून व दारिद्र्यात गौरव मानून राहात आले आहेत. मला असे स्मरते की, अशा या वंशात निर्माण होऊनही माझे वडील हरानंद भट्टाचार्य विद्यासागर महाशय यांनीच प्रथम, इंग्रज सरकारच्या नोकरीत अध्यापकाचे काम पत्करले आणि यामुळे त्यांना सर्व ब्राह्मणवर्गात अप्रिय व्हावे लागले. त्यापूर्वी आमच्या ज्ञातिबांधवांत कोणीही सरकारी नोकरी पत्करलेली नव्हती.

## माझे पणजोबा

गेल्या शतकाच्या पहिल्या भागात व त्यापूर्वीच्या शतकाच्या शेवटच्या भागात, आमच्या वंशातील ज्ञातिबांधवांच्या एकेका गावात १०–१२ वेद पाठशाळा असत. या शाळांमध्ये माझे पणजोबा रामजय न्यायालंकार यांचीही वेदशाळा होती. यांना १०३ वर्षे आयुष्य लाभले. मी दहाबारा वर्षांचा होईपर्यंत यांना पाहिले होते. माझ्या बाळपणाच्या आठवणी लिहिताना यांच्याबद्दलची बरीच माहिती मला लिहावी लागेल.

## आजी लक्ष्मीदेवी—

गावातीलच एका काण्वायन गोत्री ब्राह्मणाच्या मुलीशी, माझ्या आजोबांनी विवाह केला होता. हे काण्वायनवंशी ब्राह्मण अतिशय गर्विष्ठ आणि साहसी लोक होते. माझी आजी लक्ष्मीदेवी ही याच मानधन वंशातील कुलकन्या. अर्थात तीही अतिशय धीट आणि तेजस्वी वृत्तीची होती. हिच्याबद्दल आमच्या घरात अशी एक आख्यायिका सांगण्यात येते की हिच्या खोलीत एकदा एक चोर शिरला आणि ही झोपेत असताना हिच्या कंठाभरणाला त्याने हात घातला. तोच तिला जाग आली आणि अशा काही विलक्षण अवसानाने हिने त्याचे मनगट पकडून ठेविले

की तो दागिना तर राहोच पण स्वतःचा हात सोडवून घेणेही त्याला मुष्किलीचे वाटू लागले. शेवटी पुष्कळ हिसकाहिसकी झाल्यावर चोराची कशीबशी सुटका झाली आणि मग तो चोर जीव घेऊन पळून गेला.

हिची दुसरी एक गोष्ट, याहूनही धिटाईची व समयसूचकतेची घडली. त्यावेळी हिवाळ्याच्या दिवसांत आमच्या गावी मधून मधून वाघाची फेरी असायचीच. गाव साधारणतः सुंदरबनाच्या मध्यभागीच होता. आसमंतात कित्येक कोसपर्यंत अफाट जंगल पसरलेले होते. गावच्या चारही बाजू जंगलाने व्यापलेल्या होत्या म्हटले तरी चालेल. अर्थात वाघाचे होणारे आगमन हे काही नवलाचे नव्हते. त्यामुळे असा एक नियमच ठरून गेला होता की, एकाच शाखेतील चार-पाच कुटुंबे अगदी घराला घर लागून असायची आणि या वाडीच्या सभोवार भिंतीचा कोट असायचा. आत येण्यासाठी समोर एकच वेशीवजा दरवाजा असायचा आणि परस्पर-व्यवहाराला दिंडीदरवाजासारख्या खिडक्या असायच्या. या दिंडीदरवाजाने चालचलावू काम भागे. आमच्याही ज्ञातिपरिवाराची अशीच एका भिंतीने घेरलेली वाडी होती.

थंडीच्या दिवसांत एके दिवशी अगदी तिन्हीसांजचे वेळी माझे आजोबा सायंसंध्या आटोपून पायातील खडावानिशी अंगणात शतपावली करीत होते. आजी सैपाकघरात सैंपाकाच्या कामात गढून गेलेली होती. इतक्यात शेजारच्या घरातून 'वाघ वाघ' अशी ओरड झालेली त्यांनी ऐकली. आजोबांनी कुतूहलाने म्हणून त्या बाजूला डोकावले. तो समोरून वाघोबाच त्यांच्याकडे पाहात असलेले त्यांना दिसले. ते लागलीच आपल्या वडलांना उद्देशून ओरडून म्हणाले, 'बाबा, खरेच वाघ आला. मला नेलेच बघा !' पणजोबांनी ओरडून म्हटले, 'उभा राहा. मागे वळू नको.' इतके होत आहे तो, जो ज्या ठिकाणी कामात गुंतला होता, तेथून तो ते काम तसेच टाकून धावत पळत माझ्या आजोबांच्या मागे येऊन उभा राहिला. आजोबा वाघाकडे समोर पाहात होते आणि त्यांच्या मागे सर्व मंडळी उभी होती. तितक्यात माझी साहसी स्वभावाची आजी समयसूचकतेने चुलीतील पेटते लाकूड घेऊन धिटाईने वाघासमोर धावली. पेटत्या मशालीसारखे असलेले ते ज्वालामय लाकूड आपल्याकडे वेगाने येत आहे असे पाहून वाघ घाबरला आणि ज्या उघड्या दिंडी दरवाजाने तो आत आला होता त्याच दरवाज्यातून अति-वेगाने बाहेर निघून गेला. नंतर समजले की, शेजारच्या घरच्या 'कोणा नववधूने दिंडी दरवाजा बंद न करताच तसाच उघडा राहू दिल्यामुळे त्याच उघड्या दिंडी दरवाजातून वाघाने वाडीत प्रवेश केला होता.

माझ्या आजीचे सर्वच आयुष्य या साहसी व समयसूचक वृत्तीला साजेसेच होते. गावातच तिचे माहेर. त्यात तिच्या वडलांकडेच सर्वांचे नेतृत्व. त्यांचा तो स्वाभिमानी व साहसी स्वभाव. त्यामुळे गावातील सर्वच लहानथोर माणसे त्यांना

वचकून असत. माझे वडील श्रीयुत हरानंद विद्यासागर हे अशा त्या थोर व धीट माउलीचे सुपुत्र. त्यामुळे मातेचे व्यक्तिमत्त्व आणि प्रखर तेजस्विता त्यांच्यात पूर्णपणे उतरली होती.

## माझे आजोबा रामकुमार भट्टाचार्य

हे व्यक्तित्वाने आणि स्वभावाने आजीच्या अगदी उलट होते. ती गोरीपान तर हे सावळ्या रंगाचे. ती साहसी तर हे सहिष्णू. तिला अन्यायाची भयंकर चीड. तसा काही प्रकार पाहिला की ती खवळून उठायची; तर हे केवढाही अन्याय घडला तरी शांतपणाने सहन करायचे. माझ्या आजीचा अपमान करणाऱ्याला तिच्या तोंडचे दहशतीचे कटू वाग्बाण सहन करावे लागले नाहीत अशा व्यक्ती विरळा. पण माझे आजोबा, कोणी काही म्हटले तरी मुकाट्याने ऐकून घ्यायचे. अपमानाची शंका आली तर त्या बाजूला ते जायचेच नाहीत. माझी आजी घरची सुखसमृद्धी प्रथम पाहायची. तिची त्याकडे तीक्ष्ण दृष्टी असायची. त्यामुळे बाहेरील माणसांच्या सुखदुःखाकडे तिचे जावे तितके लक्ष जायचे नाही; पण आजोबांचे अन्तःकरण मात्र इतरांसाठी दयार्द्र असायचे. ते नेहमीच परहिततत्पर असायचे. खरोखर त्यांचा दयाळूपणा लोकविलक्षण होता.

थोरल्या आत्याच्या तोंडून त्यांच्या संबंधीची मी जी गोष्ट ऐकली ती अशी : एके दिवशी थोरली आत्या झोपाळ्यावर बसली आहे अशा वेळी आजोबा स्नान करून आले आणि लागलीच झोपण्याच्या खोलीत गेले. आत्याने पाहिले तो ते फक्त पंचाच नेसलेले तिला दिसले. धोतर नव्हते. अर्थात तिने विचारले, ‘बाबा, तुम्ही आपले नेसते धोतर कुठे टाकून आला ?’ त्यावर त्यांनी तिला जवळ बोलावून हळूच सांगितले ‘बाळ, ओरडू नको. एका गरिबाला मी माझे नेसते धोतर देऊन टाकले आहे. तुझ्या आईला कळू देऊ नको’ या एकाच गोष्टीवरून, आजोबा आजीला किती भीत असत हे कळून येईल. जो काय दानधर्म करायचा तो तिला लपवून न कळेल अशा रीतीने करीत. माझ्या वडलांनी मात्र आईची तेजस्वी निर्भयवृत्ती आणि वडिलांची सहृदयता, कनवाळूपणा हे गुण जन्मतःच संपादन केले होते.

## बंगालच्या उपसागरातील चक्रीवादळ

इ. स. १८३३ साली कलकत्त्याच्या दक्षिणेस असलेल्या बंगालच्या उपसागरात चक्रीवादळ होऊन त्याने सागरतीरावरील प्रदेशाचे फारच नुकसान केले. या वादळाने उफाळलेल्या समुद्राच्या उसळलेल्या लाटांनी आमच्या गावचा दक्षिण भाग व्यापून टाकला. त्यात हजारो लोकांचा संहार झाला. नंतर तेथे पहिलीच महामारीची साथ आली. तिने तर सगळ्या बंगालला पछाडले. हजारो माणसे

त्यात मेली. याच साथीत अवघ्या दहा दिवसांच्या अवधीत माझी पणजी, आजी व आजोबा ही घरची मंडळी निधन पावली.

माझे आजोबा जेव्हा वारले तेव्हा त्यांचे दोन मुलगे व दोन मुली मागे होत्या. माझी वडील आत्या नुकतीच वयात आली होती. तिचे वय १६।१७ वर्षांचे असले तरी तिला एक अपत्यही झाले होते. अर्थात घरच्या कर्त्या स्त्रीचा मान तिलाच मिळाला. तिचा नवरा त्यावेळेपासूनच घरजावई बनून व मोठ्या आत्याच्या (पत्नीच्या) आधिपत्याखाली राहून आमच्या घरप्रपंचाची व्यवस्था पाहू लागल्यामुळे कर्त्या पुरुषाचे अधिकार त्याला मिळाले व गृहव्यवस्थेची जबाबदारी तोच सांभाळू लागला. पैशाअडक्याचे सर्व व्यवहार त्याच्या हाती आले. माझ्या वडिलांचे वय त्यावेळी ६।७ वर्षांचे होते. अशा प्रकारे वृद्ध पणजोबा मोठ्या आत्याचा नवरा, मोठी आत्या, धाकटी आत्या, काका, मोठ्या आत्याची दोन मुले, माझे वडील एवढ्या मंडळींचे घरकुटुंब बनले. संसाराचा गाडा चालू झाला.[४]

माझे पणजोबा रामजय न्यायालंकार हे अध्यापकाचे काम करीत होते व त्यांच्या मिळकतीवरच घरचा प्रपंच चाले. ते केव्हा केव्हा बरेच दिवस कलकत्त्यातही घालवीत. ब्राह्मण पंडित म्हणून वृत्तिरूपाने मिळणारी त्यांची प्राप्तिही बरीच असे. पटलडांग्याचे प्रसिद्ध रमानाथ मल्लिक यांचे कुलपुरोहित म्हणून त्यांच्याकडे ते राहात. गावातील घरची व्यवस्था, मोठी आत्या व तिचा नवरा पाहात असे.

## ‘कुलसंबंध’ व कुलीन विवाहप्रथा

हळूहळू माझे वडील दहा अकरा वर्षांचे होताच ते विवाहाला योग्य झाल्याचे बोलण्यात येऊ लागले. दाक्षिणात्य वैदिक कुलीन घराण्यात त्यावेळी कुलसंबंध (वाङ्‌निश्चय) ठरविण्याची पद्धत होती. आता हळूहळू ती ओसरत चालली आहे. ‘कुलसंबंध’ याचा स्पष्टार्थ असा की, कुलीन वैदिकाच्या घरी मुलीचा जन्म होताच एकदोन महिन्यांत समानवर्गाच्या कोणा लहानग्या मुलाशी तिचा वाग्दानविधी होई. नंतर ती मुलगी आठनऊ वर्षांची होताच त्या

४. आजोबा व आजी मरण पावल्यावर वृद्ध पणजोबा, माझी वडील आत्या आनन्दमयी (बिन्दी), धाकटी आत्या गणेशजननी, माझे वडील आणि माझे चुलते रामतारण ही सर्व मंडळी एकत्र कुटुंबात राहात. मोठ्या आत्याचा विवाह कै. गोपालचंद्र चक्रवर्ती यांच्याशी झाला होता. ते दत्तांच्या घरी पुजारी म्हणून होते. पुढे काही वर्षांतच माझे चुलते रामतारण भट्टाचार्य हेही निधन पावले. [ लेखकाच्या हस्तलिखित कुलवृत्तांतावरून. ]

ठरविलेल्या वराशी तिचा विवाह होई. जर विवाहापूर्वी तिचा वाग्दत्त वर निधन पावला तर त्या मुलीला 'अन्यपूर्वा' म्हणत असत. त्यानंतर तिचा कुलीन वराशी विवाह होणे शक्य नसल्याने मौलिक[५] वराशी तिचा विवाह करण्यात येई. माझ्या दोन आत्या अशा रीतीने 'अन्यपूर्वा' होऊन 'मौलिक' वराशी विवाहबद्ध झाल्या होत्या. या कुलसंबंध पद्धतीप्रमाणे माझ्या वडलांचा, ते सहा किंवा सात महिन्यांचे असताना, कलकत्त्यापासून सहासात कोसांवर आग्नेय दिशेला असलेल्या चांगडीपोता गावच्या हरचंद्रन्यायरत्न महाशयांच्या एक महिना वय असलेल्या प्रथमापत्य कन्येशी कुलसंबंध निश्चित करण्यात आला होता. अर्थात तत्कालीन पद्धतीनुसार त्या मुलीशी माझ्या वडलांचा, वयाचे दहाव्या किंवा अकराव्या वर्षी विवाह झाला.

## माझे आजोबा ( आईचे वडील ) हरचंद्र न्यायरत्न-महाशय

हे एक सुविद्य संस्कृत पंडित असून अध्यापक होते. कलकत्त्यात कासारीपाडा येथे त्यांची वेदपाठशाळा होती. त्यांचे वडील सुपुत्र, हे सुविख्यात 'सोमप्रकाश'चे संपादक द्वारकानाथ विद्याभूषण या नावाने सर्वपरिचित असून बंगसाहित्यात त्यांनी अमरकीर्ती मिळविली होती. ईश्वरचंद्र गुप्त यांनी सुरू केलेल्या 'प्रभाकर' पत्रिकेच्या संपादनकार्यात माझे न्यायरत्न आजोबा सहाय्यक होते. त्यांनी आपल्या उत्तरायुष्यात, महात्मा डेव्हिड हेयर यांनी स्थापन केलेल्या बंगाली पाठशाळेत संस्कृत अध्यापकाचे काम पत्करले होते. नंतर माझ्या मोठ्या मामांनी संस्कृत कॉलेजची परीक्षा पास झाल्यावर त्याच कॉलेजात अध्यापकाची जागा पत्करली. स्वतःच्या काटकसरी स्वभावामुळे केलेल्या अर्थसंचयातून त्यांनी स्वतःच्या गावी दुमजली घर बांधले. ब्राह्मणपंडित या दृष्टीने असे हवेलीवजा माडीचे घर बांधणे त्या काळच्या ब्राह्मणवर्गात कमीपणाचे किंवा लांछनास्पद मानले जाई. त्यामुळे हे आजोबांचे घर म्हणजे ज्ञातिबांधवांना एक डोकेदुखीच होऊन बसली होती. आणि या कारणाने माझ्या मातृवर्गीय मंडळींना बराच त्रास सहन करावा लागला. ही सगळी हकीगत मी पुढे दुसऱ्या प्रकरणात देणारच आहे.

आजोबांची ( आईच्या वडलांची ) मला चांगली आठवण आहे. माझ्या वयाच्या नववे किंवा दहावे वर्षी ते दारुण अशा उरुस्तंभ (मांडीला झालेला व्रण) रोगाने निधन पावले. त्यांचा तकतकीत सावळा वर्ण, प्रसन्न चेहेरा आणि पुऱ्या उंचीची देहयष्टी मला अजूनही आठवते. मला ते 'शिवराम' म्हणून हाका

५. 'मौलिक' म्हणजे बंगाली ब्राह्मण किंवा कायस्थांतील उच्चवर्णीयांपेक्षा खालची किंवा कमी दर्जाची जात.

मारीत. त्यांचा गृहस्थी बाणा आणि व्यवहारचातुर्य वाखाणण्यासारखे होते. माझ्या मामांच्या घरी वर्षाला लागणारी तांदूळ-डाळ वगैरे सामुग्री आणि आवश्यक अशा पुरवठ्याच्या वस्तू यांचा असा साठा केलेला असे की, अकस्मात् एखादे वेळी १०।१५ पाहुणे आले तरी त्यांच्या सुग्रास भोजनाची संपूर्ण व्यवस्था, दोन तासांत करण्याला माझ्या आजीला केव्हाच पंचाईत पडत नसे. आजोबांच्या घरप्रपंचातील दूरदृष्टीचे व हात राखून खर्च करण्याच्या चातुर्याचे मी येथे एक उदाहरण देतो. माझे मोठे मामा द्वारकानाथ विद्याभूषण महाशयांचा पहिला मुलगा उपेन्द्रनाथ याला लहानपणी गुडगुडी व चिलीम हातात घेऊन इकडे तिकडे फिरण्याचा फार नाद होता. गुडगुडी व चिलीम वेळी न मिळाल्यास तो रडून ओरडून सगळे घर दणाणून सोडी. रात्री त्याच्या बिछान्याजवळ गुडगुडी व चिलीम ठेवावीच लागे. मध्यरात्री त्याला जाग आली की हुक्काहुक्का ( गुडगुडी-गुडगुडी ) म्हणून तो रडू लागे. अर्थात या दोन्ही वस्तू त्याला चटकन हाताशी मिळतील अशा ठेवाव्या लागत. गुडगुडी ही काही तो फारशी फोडीत तोडीत नसे. पण चिलम्या मात्र तो दिवसापोटी दोनतीन तरी फोडीत असे. माझे आजोबा दर शनिवारी कलकत्त्याहून घरी येत असत आणि आले म्हणजे घरगुती बारीकसारीक वस्तूंचा संचय करून ठेवीत. एकदा ते असेच शनिवारी आले असता, रविवारी कित्येक तास मेहनत करून त्यांनी एक टोपलीभर मातीच्या चिलम्या बनविल्या आणि गवताच्या आगटीत चांगल्या भाजून काढून ठेवून दिल्या. हेतू हा की, ' उपेन् ( नादू ) आता किती चिलम्या फोडतो त्या फोडू दे. ' त्याकाळी एका पैशाला आठ तरी चिलम्या मिळत असत. पण तेवढाही खर्च विनाकारण होऊ नये ही त्यांची काटकसरीची नजर.

## घोडागाडी

कलकत्त्याच्या आग्नेयेस सहा कोसांवर चांगडीपोता गाव असल्याचे पूर्वी सांगितलेच आहे. त्या काळी तेथून कलकत्त्याला जाण्यायेण्यासाठी आठदहा उतारू बसतील अशी एक वरून चांगले आच्छादन असलेली घोड्यांची छकडागाडी असे. ती चांगडीपोता गावाजवळील राजपूर ठिकाणाहून कलकत्त्याला ये-जा करी. या गाडीतून हवेलीवाले बाबूलोक व प्रतिष्ठित अधिकारी दर सोमवारी कलकत्त्याला येत आणि दर शनिवारी कलकत्त्यातील धर्मतलाहून निघणाऱ्या याच गाडीतून गावी परत जात. माझ्या आजोबांची तशी काही गरिबी होती असे नाही; पण ते काही या छकडा गाडीत बसलेले कुणाला कधी आढळत नसत. नेहेमी दर शनिवारी चालतच गावाला घरी जात आणि सोमवारी सकाळी तेथून निघून पायचालीनेच कलकत्त्याला येत. थोरले मामाही तसेच करीत. मी आठ वर्षांचा असताना कलकत्त्याला त्यांच्याकडे आल्यावर मलाही त्यांच्याबरोबर पायी पायीच गावाला जावे यावे लागे.

या सर्व कारणांनी सर्व लोक, कृपण किंवा कंजूष अशी माझ्या आजोबांची निंदा करीत. पण मी कलकत्त्याला त्यांच्याकडे राहायला आल्यावर पाहिले ते वेगळेच. त्यांचे तीन जावई तर तेथे त्यांच्याकडे असतच; पण आतांतील असे वेगवेगळे ८।९ तरुण यांच्याकडेच राहायला-जेवायला असत. ते काही असले तरी माझे हे आजोबा अत्यंत हिशेबी आणि काटकसरीने वागणारे होते, यात संशय नाही. माझी आई गोलोकमणीदेवी हिला आपल्या वडिलांच्या घरप्रपंचातील सुव्यवस्थेचा व काटकसरीचा वारसा मिळाला होता.

**माझी आजी** ( आईची आई )

ही आजोबांहून शरीराने व स्वभावाने अगदीच वेगळी होती. आजोबा, घरात वर्षाला लागणाऱ्या सामानाची बेगमी करून ठेवीत; तर आजी त्यांना नकळत गरीब बायांना बोलवून आणून त्यांच्या पदरात दोन्ही हातांचे पसे भरून डाळ-तांदूळ देई. तसेच पैसा-अडकाही देण्यात ती कमतरता करीत नसे. हा तिचा उदार स्वभाव ध्यानात आल्यामुळे नवरा आणि मुलगे तिच्या हाती रोख पैसा कधी देतच नसत. स्वतःजवळ ठेवीत. तरीपण आजीला स्वतःच्या खर्चा-साठी, देव ब्राह्मण वगैरे नित्यनैमित्तिकासाठी म्हणून काही रक्कम द्यावीच लागे. आणि मग आपल्या स्वभावानुरूप त्यातूनच ती दानधर्म करी.

या ठिकाणी आता माझ्या या आजीच्या सद्हेतुसंबंधी काही दाखले देतो. मला वडिलांनी कलकत्त्याला आजोबांकडे ठेविले आणि ते गावी निघून गेले. तेथे असताना मला वेळोवेळी पैशाची फारच नड पडे. त्यामुळे नाइलाजाने मी मामांच्या घरी जाई; पण मामींना माझी दुरवस्था सांगण्याचे धाडस मला होत नसे. आजीची माझ्यावर इतकी माया होती की, मी तेथे जाताच रात्री मला ती आपल्या कुशीत झोपायला घेई. माझे असे लाड करणे तिला फार आवडे. कित्येक वर्षेपर्यंत अशा प्रकारे तिच्या प्रेमळ पंखाखाली माझे बालपण संपले. ती किती अगत्याने आणि कळकळीने आपल्या दोन्ही हातांनी मला जवळ घेई, ते आठवले की अजूनही माझे डोळे अश्रूंनी भरून येतात. असो.

ज्यासाठी मी या विषयाचा उल्लेख केला तेच आता सांगतो. मला अशा प्रकारे कुशीत घेऊन ती बिछान्यावर झोपली की मी तिच्या कानात हळूहळू, ‘ मला शहरांत पैशाची अडचण कशी पडत असते ’ ते सांगत असे. तीही मग मी जायला निघालो की स्वतःच्या शिलकीतले दोनचार रुपये माझ्या गाठीला बांधी आणि सांगे, ‘ हे कुणाला सांगू नको. पैशांची नड पडली की माझ्याकडे येत जा. ’ आता ही आठवण आली की, माझ्या या आप्स्वार्थीपणाची मला लाज वाटते.

माझी आजी अतिशय धर्मभीरू होती. थट्टेतही ती जर कुणाला काही देते म्हणाली, तर ते वचन पूर्ण केल्याशिवाय तिला हायसे वाटत नसे. याचे एकदोन

दृष्टान्त येथे देतो. एकदा सैपाकघरात ठेवण्यासाठी एक मोठा हंडा विकत घेण्यात आला होता. तो एवढा मोठा होता की पाण्याने भरलेल्या स्थितीत तो हालविणे झाल्यास बायकांना फार श्रम पडत. दोन हातांनी उचलणेही अवघड होई. एकदा तो भरलेला हंडा उचलताना ती सहज म्हणाली, ' बापरे, या घड्यातील सर्व पाणी जर कोणी एका दमात पिऊन दाखविले तर मी त्याला एक रुपया देईन. ' तितक्यात आप्तांपैकी एक तरुण मुलगा धावत धावत आला आणि तो हंडा उचलून त्यातील पाणी पिऊ लागला. तेव्हा आजी घाबरली आणि त्याचा हात धरून म्हणाली, ' अरे, तू इतके पाणी पिऊ नको मी रुपया देईन म्हटले ना, देईनच तुला. ' आणि मग एक रुपया आणून त्याच्या हाती दिला. आणखी एकदा असे झाले, उन्हाळ्यातील कडक उन्हाने मधला ओटा तापून अगदी तवा तापतो तसा झाला होता. आजीला त्याच वेळी पलीकडच्या कोठीतून काही जिन्नस आणावयाचा होता. ती त्या ओट्यावर पाय ठेवताच ओरडली, ' अरे बापरे ! पेटती आग आहे नुसती. यावर जर कोणी दोन घटका बसून दाखवील तर मी त्याला दोन रुपये देईन. ' लागलीच एक तरुण मुलगा बसण्याला तयार झाला. आणि त्या ओट्यावर जाऊन बसलासुद्धा. आजीला चैन पडेना. ती कासावीस होऊन म्हणाली, ' अरे तू ऊठ, ये बरे इकडे; मी तुला दोन रुपये देते. ' आणि मग त्याच वेळी तिने त्याला दोन रुपये दिलेही.

खरे सांगायचे म्हणजे तिच्यासारखी कोमल हृदयाची, मायाळू, अपत्यवत्सल, उदार स्वभावाची आणि सत्यपरायण स्त्री मला क्वचितच आढळली. माझे थोरले मामा द्वारकानाथ विद्याभूषण हे धर्मभीरुतेबद्दल प्रसिद्धच होते. हा गुण त्यांनी आपल्या आईची देणगी म्हणूनच मिळविला होता.

आजीच्या वृद्धावस्थेत माझ्या दोघी मामींनी घरप्रपंच संभाळण्याचा भार आपल्या शिरावर घेतला आणि संसाराच्या बारीकसारीक कटकटींतून तिला मोकळे केले. तेव्हा धर्मचिंतन, गरिबांची सेवा आणि घरची मुले सांभाळणे हे तिचे मुख्य काम होऊन बसले. ती रोज पहाटे उठून सुमारे अर्ध्या कोसावर असलेल्या गंगानदीवर स्नानाला जाई आणि स्नान करून येताना रस्त्याच्या दोहो बाजूंना असलेल्या गरीब बायाबापड्यांचा आस्थेने कुशल समाचार घेऊन घरात येई. एकप्रकारे तिचे हे नित्यव्रतच होऊन बसले होते. त्यासाठी ती स्वतःच्या ठेवणीतील पैशांतून बरीच आण्या-पैशांची परचूरण बरोबर घेई आणि गरजेप्रमाणे घरोघर त्याचा दानधर्म करी. स्वतःच्या शिलकेतून हे नाहीच जमले तर मुलांना सांगून त्यांच्याकडून त्या गरिबांची गरज भागवी.

तिच्या कनवाळूपणाची आणखी एक गोष्ट आठवते. एकदा मी पायचालीने माझ्या राहत्या गावाहून कलकत्त्याला येत होतो. वाटेत मामांच्या घरी एक मुक्काम करून पुढे जावे असा बेत केला. पण पूर्वी तसे मामांना कळविले नव्हते.

गावाहून अगदी पहाटेसच बाहेर पडलो. तरी पण मामाचे घर गाठीपर्यंत दुपार टळून जाणार असे वाटले. त्यातच येता येता वाटेत एक हलक्या जातीचा मनुष्य माझ्या सोबतीने बरोबर निघाला. तो प्रथमच कलकत्त्यास येत होता. मी कलकत्त्याला जाणार असे समजताच ' मला तुमच्या बरोबर न्या ' असे मोठ्या काकुळतीला येऊन तो म्हणाला. मला मोठी पंचाईत पडली. एक तर आधी न कळविता मी मामाकडे मुक्कामाला जाणार होतो. त्यात भरदुपारी गेल्यामुळे मामींना पुनः सैंपाक करावा लागणार. तशात हा आगांतुक सोबती ! म्हणून मी त्याला बरोबर नेण्याचे टाळीत होतो. पण त्याला वाटत असलेली एकटेपणाची काळजी पाहून लोकलाजेसाठी तरी निदान मला नाही म्हणवेना. आणि मग आम्ही दोघेही दोन प्रहरी मामांच्या घरी येऊन दाखल झालो. दोघी मामी जेवायला बसल्या होत्या आणि आजी जेवण्याच्या तयारीत होती; जेवू लागली नव्हती इतकेच. माझी हाक ऐकताच ती बाहेर आली. ' एक अन्य जातीचा मनुष्य माझ्याबरोबर आहे ' असे हळूच सांगून मी तिला म्हटले, ' तो कधीच कलकत्त्याला गेला नसल्यामुळे माझ्या सोबतीने आला. ' यावर ती म्हणाली, ' बरे आहे. तू लवकर स्नान करून ये आणि मामींच्या पंक्तीला बैस. माझे वाढून घेतलेले जेवण मी या मनुष्याला वाढते. माझ्यासाठी मग मी दुसरा भात ठेवीन. ' पण मला हे योग्य न वाटल्यामुळे मी म्हटले, ' तसे कशाला ! तू तुझे जेवून घे. नवीन भात ठेवशील तो त्याला वाढ. ' यावर आजी कळवळून म्हणाली, ' तो बिचारा चालण्याचे श्रमाने आधीच दमून गेला आहे. त्याला तसाच उपाशी ठेवून मी जेवू होय ! असे कधी झाले आहे ! जा. तू आंघोळ करून लवकर ये.'

तिची ती घाई पाहून विचार करण्यात वेळ न घालविता मी स्नान करून आलो आणि मामींच्या पंक्तीला बसलो. आजीने त्या माणसाच्या हातावर तेल घातले आणि ' जा. तूही स्नान करून ये. येताना बागेतून केळीचे एक पान कापून आणायला विसरू नको. ' असे सांगितल्याचे मी ऐकले.

नंतर मधल्या सोप्यात भात सडण्याच्या पडवीशेजारी केरसुणीने जागा साफ करून आजीने त्या माझ्या सोबत्याचे पान मांडले. आणि स्वतःसाठी वाढून घेतलेले जेव्हा ती त्याला वाढायला नेऊ लागली तेव्हा मामींनी पुष्कळ हरकत घेतली. पण आजीने मला जे सांगितले तेच त्यांनाही सांगून त्याच्या पानावर भात वाढला. जेवून झाल्यावर मी आचमन करून आलो तो माझ्या सोबतीचा मनुष्य जेवीत असल्याचे व आजी आग्रहाने ' हे घे. हे खा. ' असे मोठ्या ममताळूपणाने त्याला सांगत असल्याचे दृश्य मला दिसले. तोही फार समाधानाने जेवीत असल्याचे पाहून मला जणू काही त्याच्या प्रत्येक घासाबरोबर तिला आनंद होत आहे असे वाटले. जेवण झाल्यावर त्याने अत्यंत आदराने व नम्रतेने आजीला नमस्कार करून

म्हटले, 'आई, मी अनेक बामणांच्या बायका पाहिल्या आहेत; पण तुमच्यासारखी अगत्याने वागणारी माउली मला एकही आढळली नाही.'

गोष्ट अगदी खरी. माझ्या आजीसारखी ब्राह्मणकन्या विरळाच. काय सांगू! तिची जेव्हा मला आठवण होते तेव्हा माझे अंतःकरण पुनीत आणि उदात्त झाले आहे असे मला वाटते. इतकेच नव्हे तर माझ्यात जे काही चांगले आहे त्यातील बराचसा भाग तिचे अनुकरण करूनच मी संपादन केला आहे असे मुक्तकंठाने मी सांगतो.

* * *

.२.

# माघ प्रतिपदेला जन्म

याच आजीच्या प्रेमळ कृपाछत्राखाली मामाच्या घरी ता. ३१ जानेवारी १८४७ इ. स. रोजी ([1]वंगाब्द १९ माघ १२५३) रविवारी माझा जन्म झाला. माझ्या जन्माच्या वेळेच्या बाबतीत मी ऐकले ते लिहीत आहे. सायंकाळी जेव्हा मी जन्माला आलो तेव्हा नुकतीच पौर्णिमा संपून प्रतिपदेला सुरवात झाली होती. त्या दिवशी माझे आजोबा घरातच होते. मुलीला मुलगा झाला हे ऐकताच ते आपल्या एका ज्योतिषी जातभाईकडे धावत सुटले. घरातील बायकामंडळींनी केलेल्या शंखाच्या पुकाराने सगळे घर दणाणून गेले. न्यायरत्नांना नातू झाल्याची बातमी गावभर पसरली. मामाच्या घरात पुत्रजन्माचा हा पहिलाच सोहळा. आई, तिची आई, दोघी मामी, दोघी मावशा (आणखी एक मावशी अगदी लहान) आणि घरातच आश्रित म्हणून असलेल्या एकदोन विधवा; या सर्वांना लाड-प्यार करण्याला वात्सल्याचा एक ठेवाच सापडला असे वाटले.

दुसऱ्या दिवशी उजाडते न उजाडते तोच वाजंत्रीवाले टोळ्याटोळ्यांनी येऊन घरावर मंगलवाद्यांचे हल्लेच चढवू लागले. त्या दिवशी आजोबा नेहमी-प्रमाणे कलकत्त्याला गेले. शनिवारी ते परत येईपर्यंत सात दिवस या वाजंत्री-वाल्यांनी आपल्या साथीदारांसह येऊन वाद्यगजराने सगळे घर अगदी दणाणून सोडले होते म्हटले तरी चालेल.

---

१. बंगाली कॅलेंडरात तारीख व तिथी या वेगळ्या असतात. बंगाली नवे वर्ष वैशाखाच्या १ तारखेने (सुमारे १४ एप्रिलच्या आसपास) सुरू होते. त्यावेळी तिथी कोणतीही असू शकेल. या ठिकाणी वंगाब्द १२५३ च्या माघ महिन्याची तिथी प्रतिपदा आहे. परंतु तारीख १९ आहे.

शनिवारी आजोबा आणि मोठे मामा कलकत्त्याहून आले. बाबा त्यावेळी कलकत्त्याला संस्कृत कॉलेजचे विद्यार्थी होते. ते (बहुधा संकोचानेच) त्यांच्या बरोबर आले नाहीत. काही दिवसांनी आले. मोठ्या मामांनी रविवारी सकाळीच सूतिकागृहाच्या दाराशी येऊन व मोहरेचा नजराणा देऊन भाच्याचे मुखदर्शन केले. त्यांनी माझे डोके आणि कपाळ पाहून ' माझा हा भाचा मोठा माणूस होणार ' असे भाकीत केल्याचे, मी आईच्या तोंडून ऐकले आहे. हळूहळू सूतिकागृहातून बाहेर पडून आजी, मामी आणि मावशा यांच्या कडेवर बसून मी वाढू लागलो. विशेषतः मावशी मला आपल्या कडेवरून खाली उतरवीत नसे; पण माझ्या जन्मानंतर मामांच्या घरात भयंकर अशांतता निर्माण झाली. आजोबांनी काटकसरीने साठविलेल्या द्रव्यातुन (जुने घरठाण सोडून दुसरीकडे) माडीचे घर बांधले, हे ज्ञातिबांधवांना सहन झाले नाही, याचा उल्लेख यापूर्वी मी केलाच आहे. चांगडीपोताचे हे माडीचे घर म्हणजे शेजारच्या जातभाईची एक डोकेदुखीच होऊन बसली. पडीक जमिनीचा एक तुकडा विकत घेऊन त्या जमिनीवर हे घर बांधण्यात आले होते. परंतु ही जमीन बराच काळ पडीक असल्यामुळे या जमिनीतूनच सर्वांनी आपला जाण्यायेण्याचा रस्ता बनविला होता. पुष्कळ वर्षांपासून लोक या रस्त्याने ये-जा करीत होते. या जमिनीतूनच सर्वांनी आपली पायवाट बनविलेली असल्यामुळे व या हवेलीने त्या वाटेला अडथळा झाल्यामुळे ' चालू वहिवाटीवर अन्यायाने आक्रमण ' हा कायदा त्या वहिवाटदारांना सुचला.

वास्तविक ही पडीक जमीन माझ्या आजोबांनी खरेदी करून व सभोवार दगडी भिंत बांधून आत इमारत बांधण्याला सुरवात केली तेव्हापासूनच भाऊबंदकीच्या भांडणाला आरंभ झाला. दावे-मुकदमे, फिर्यादीआर्यादीपर्यंत मजल गेली. इतकेच नव्हे तर एवढ्याने यांचा उठाव होणार नाही असे वाटून या भाऊबंदांनी माझ्या आजोबांना व मामांना असा काही उपद्रव व त्रास द्यायला सुरवात केली की, माझ्या आजोळच्या कुटुंबीय मंडळींना ' नको हे घर ' असे होऊन गेले. कटकटी आणि त्रास यांना सीमाच उरली नाही. तेव्हा ते घर व तो गाव सोडून आजोबांना आपल्या सामानसुमानासह व कुटुंबियांसह कलकत्त्याला येणे भाग पडले.

आणि या त्यांच्या स्थलांतरामुळे माझी आई, मी केवळ सहा महिन्यांचा असतानाच मला घेऊन सासरी मजिलपुरात येऊन राहू लागली.

माझे या घरचे पणजोबा (बाबांचे आजोबा) यावेळी सर्व व्यवहारातुन निवृत्त होऊन घरी येऊन बसले होते. त्यांना आता डोळ्यांनी चांगलेसे दिसत नव्हते आणि कानांनी ऐकूही येत नव्हते. मी आलेला पाहाताच त्यांनी ' माझा वंशधर आला ' असे आनंदोद्गार काढले. ' बाबा, बाबा, ' म्हणून मला आंजारूगोंजारू लागले.

## बालपणातील अस्वस्थता

घरात होत असलेले माझे हे आगत-स्वागत आणि लाड माझ्या मोठ्या आत्याला सहन होईनात. कित्येक वर्षांपूर्वी माझे काका मरण पावल्यावर आणि धाकटी आत्या सासरी गेल्यावर ही मोठी आत्या आपल्या मुलांबाळांसह घरची मालकीण म्हणूनच नवरा-मुले यांसह येऊन राहिली होती. पुढे मागे हे घर सोडून केव्हा कुठे तरी जावे लागेल असे स्वप्नातही तिला वाटले नव्हते.

अशा स्थितीत ' माझ्या वंशाचा आधार आला ' असे म्हणून माझे केलेले वात्सल्ययुक्त आगत-स्वागत आत्याला व तिच्या नवऱ्याला कसे सहन व्हावे ! त्याला मोठी काळजी उत्पन्न झाली. तो मनात म्हणाला, ' घरात राहूनही मी घराबाहेरचाच ठरलो ! '

आणि यानंतर त्या दोघांनी माझ्या आईशी चांगलेच विरोधी वर्तन सुरू केले. नणंदा-भावजयांची शब्दाशब्दी घटकोघटकी होऊ लागली. एकसारख्या होणाऱ्या या घरच्या कटकटीमुळे, आई माझ्याकडे लक्षच देत नसे. ती रागारागाने सकाळपासून दुपारपर्यंत उपाशीपोटीच सैपाकघरातील कामात गुंतलेली असे. रडून रडून कासावीस झालो तरी माझ्याकडे ती पाहातच नसे. शेवटी मी जास्तच आक्रोश करू लागलो तर माझ्या आतेबहिणी मला उचलून सैपाकघरात पेटत्या चुलीजवळ नेऊन ठेवीत आणि तिथे आईने मला दूध पाजले की बाहेर आणीत. आई एकसारखी जळफळत असायची आणि त्यातच माझे स्तनपान चालायचे. त्यामुळे ते अंगावरचे दूध मला पचेना आणि पोटात ठरेना. दुधाच्या वान्त्या होऊ लागल्या. थोड्याच दिवसांत रागाने व उपासाने आईच्या स्तनातील दूध आटले. त्यावेळी माझ्या जीविताचाच प्रश्न उपस्थित झाला. रक्ती हगवण व रक्ताच्या वांत्या सुरू झाल्या. मग मात्र आई घाबरली. सारा दिवस तिला घर-कामात गढून जावे लागत असे. मग रात्रभर ती मला मांडीवर घेऊन बसून रड रड रडे. मधूनमधून मला पाणी पाजीत असे.

असे दिवसांमागून दिवस चालले असता एके दिवशी आत्या घरात नाहीशी पाहून आईने मला नेऊन पणजोबांच्या मांडीवर निजविले आणि कानाशी तोंड नेऊन मोठ्या आवाजात सांगितले, ' माझ्या अंगावरचे दूध सुकले आहे. आता हा तुमचा बाबा—वंशाचा आधार—न खातापिता मरून जाणार ! ' हे ऐकताच पणजोबा संतापले आणि दोन्ही हातांनी आपल्या तोंडात फाडफाड मारून घेऊ लागले. माझ्या मोठ्या आत्याला व तिच्या नवऱ्याला जोरजोराने शिव्या देऊ लागले. नंतर जावई ( आत्याचा नवरा ) बाहेरून येताच त्याला हुकमी आवाजात सांगितले की, ' माझ्या बाबाला ( मला ) रोज जितके दूध लागेल तितक्या दुधाचा रतीब सुरू करा. ' लागलीच माझ्यासाठी दुधाचा रतीब सुरू झाला. आणि त्या

दिवसापासून पणजोबा घरातील सर्व हालचालींकडे कान लावून राहू लागले. माझे रडे ऐकू आले की ' माझा बाबा का रडतो ? ' असे मोठ्याने ओरडून विचारीत. त्यांच्या या ओरड्याने आत्याचा जळफळाट होई.

माझ्यासाठी दुधाचा रतीब सुरू झाला खरा पण माझ्या पोटातच विकृती उत्पन्न झाल्यामुळे मुलगा वाचणे कठीण असेच सर्वांना वाटू लागले. माझे शरीर म्हणजे हाडांचा नुसता सापळा उरला होता. हे सर्व सांगत बसण्यापेक्षा मी इतकेच सांगतो की मी ढुंगण पसरून बसू शकेन असे ढुंगणच मला नव्हते; जेव्हा मी बसायला लागलो तेव्हा पुढे पाय पसरून जवळ जवळ पाठीच्या कण्यावर बसत असे. मला ढुंगण टेकून दोन पायांवर भर देऊन बसताच येत नसे. तेव्हापासून माझे हातपाय जे दुबळे झाले ते कायमचेच.

आधीच माझे पोट बिघडलेले. पचनशक्ती कमी झालेली; त्यातच मला आणखी धनुर्वाताचे झटके येऊ लागले. मधून मधून तापाने अंग फणफणणे आणि हातपाय आखडून बेशुद्ध होणे चाललेच होते. या स्थितीत आई मला छातीशी धरी आणि ' मुलगा गेला ग बाई ' असे म्हणून मोठ्याने टाहो फोडी. आईच्या तोंडून हेही ऐकले आहे की, हा माझा आजार मी सात आठ वर्षांचा होईपर्यंत तसाच होता. शेवटी पाण्यात बुडी मारून स्नान करायला लागल्यानंतर गेला. माझ्या शरीराची स्थिती त्यावेळी अशी काही झाली होती की, मला संभाळणे आणि माझी सेवाशुश्रूषा करणे एकट्या आईवाचून दुसऱ्या कुणालाच शक्य होत नव्हते. असो.

पणजोबांची वारंवार रागावण्याची तऱ्हा पाहून आत्याची खात्री झाली कीं, ' या घरात काही आपले वास्तव्य आता होणार नाही, आणि मग तिच्या नवऱ्यानें आमच्या घरासमोरच थोडीशी जमीन घेऊन त्यावर स्वतःचे घर उभारले आणि मोठी आत्या आपल्या मुलांसह त्या घरात राहायला गेली. माझे वय त्यावेळी दोन किंवा अडीच वर्षांचे असावे.

मोठी आत्या अशाप्रकारे निघून गेल्यावर घरात स्वस्थता झाली खरी; पण आईला दुसराच एक उपद्रव जाणवू लागला. तिच्या घरकामात तिला एकट्या मोलकरणीची काय ती मदत होती. तिच्या साहाय्यानेच वृद्ध आजेसासऱ्याचे व लहान मुलाचे ( माझे ) संगोपन आणि शुश्रूषा तिला करावी लागे. त्यातून तिला दुसरीकडे पाहायलाही वेळ मिळत नसे. एवढ्या घरात एकटीच बाईमाणूस राहात असल्यामुळे चोरांचे चांगलेच फावले. वारंवार भिंतीला भोके पडू लागली. एका रात्री तर पाच ठिकाणी भिंत फोडल्याचे दिसून आले.

## माझी आई

अशा तऱ्हेने एकीकडे चोरांचा उपद्रव तर दुसरीकडे दुष्ट लोकांचा उपसर्ग बाबा त्यावेळी कलकत्त्याला माझ्या आजोळी राहून संस्कृत कॉलेजात शिकत हो

माझ्या आईला वषातील पुष्कळसा काळ साशंकतेत व एकाकीपणातच राहावे लागे. आणि स्वसंरक्षणाच्या बाबतीत अनेक वेळी उग्ररूप घेण्याचा प्रसंग येई. त्यामुळे तेव्हापासून तिचा स्वाभिमान इतका जागृत झाला होता की, तिच्या समोर कोणी तिची अमर्यादा केली तर ते ती मुळीच सहन करून घेत नसे. तसे करणाऱ्याला ती जाणवून देई की, या स्त्रीत ममताळूपणाच्या ओलाव्याप्रमाणेच ज्वालामुखीचा अग्नीही धगधगत आहे.

माझ्या आईच्या या स्वाभिमानविषयक अशा घडलेल्या एकदोन गोष्टींचा मी येथे उल्लेख करतो. एक माझ्या अगदी लहानपणची आणि एक त्यानंतर काही वर्षांची. पहिली गोष्ट अशी : मी पाच वर्षांचा होताच आईने मला तेथीलच एका गावठी शाळेत दाखल केले. बसूवाडीतील बसूंच्या घरी एका वर्धमानी गुरुजींनी ही शाळा काढली होती. त्यात मी जात असे. मी ताडपत्रावर मुळाक्षरे लिहीत असलो तरी, दिवसेंदिवस बरोबरीच्या मुलांपेक्षा जास्त हुषार असल्याचे गुरुजींच्या नजरेला आले. कारण माझी आई तत्कालीन स्त्रियांच्या मानाने जास्त शिकलेली होती. माझे बाबा कलकत्त्याच्या संस्कृत कॉलेजचे विद्यार्थी असून विद्यासागर महाशय-मदनमोहन तर्कालंकार महाशय – यांचे आवडते शिष्य होते. त्यांची मते उदार व पुरोगामी होती. त्यामुळे माझ्या आईला त्यांनी चांगलेच लिहायला वाचायला शिकविले होते. ती बहुतेक दुपारच्या वेळी रामायण वाचीत असे. त्यावेळी ती मलाही लिहायला-वाचायला शिकवी. आणि त्यामुळेच बरोबरीच्या इतर मुलांपेक्षा माझे लिहिणे-वाचणे चांगले असे. गुरुजींना याचे नवल वाटे. एकदा त्यांनी मला विचारले, 'तुला घरी कोण शिकविते रे ?' मी उत्तर दिले, 'माझी आई !' गुरुजींना आश्चर्य वाटून त्यांनी पुनः विचारले, 'तुझ्या आईला लिहिता-वाचता येते. ?' मी लागलीच सांगितले, 'हो तिला उत्तम वाचता येते' नंतर गुरुजींनी तपास करून माहिती मिळविली की, 'माझी आई घरी एकटीच असते आणि बाबा कलकत्त्याला.'

यानंतर एके दिवशी, गुरुजींनी माझ्या लिहिण्याच्या ताडपत्रावर काही लिहून ते माझ्या हाती देत म्हटले, 'तुझ्या आईला दे. दुसऱ्या कोणाला दाखवू नको.' मला वाटले, सगळ्या मुलांत मीच भाग्यवान. गुरुजींनी माझ्याच आईला पत्र दिले. पुढे मी घरी आल्यावर हसत हसतच आईला म्हटले, 'अग आई, गुरुजींनी तुला काय लिहिले आहे पाहा.' आईने लागलीच ते ताडपत्र माझ्या हातून घेतले आणि थोडेफार वाचून होते न होते तोच तिचा चेहरा गंभीर झाला आणि तिने त्या लिखित ताडपत्राचे तुकडे तुकडे करून फेकून दिले. मी ते पत्र आणले म्हणून मला मारले आणि दुसऱ्या दिवसापासून मला त्या शाळेत पाठविण्याचे बंद केले. तिथेच माझे शाळेत जाणे संपले. त्यानंतर गावात नवीन स्थापन झालेल्या हार्डींज स्कूल-मध्ये तिने माझी भरती केली.

आणखी एक तिच्या स्वाभिमानाचा प्रकार घडला तो याहून वेगळा. तो

माझ्या मनात त्यावेळी चांगलाच ठसला गेल्यामुळे त्याची मला चांगलीच आठवण राहिली आहे. एकदा माझ्या मामांच्या घरी कित्येक नवीन पाहुणे जेवायला बसले होते. आईचा माहेरचा एक आप्त–चुलतभाऊ–अभयाचरण चक्रवर्ती हाही त्यांच्या त्या पंक्तीत होता. हा अभयमामा कलकत्त्याला सेंट झेवियर्स कॉलेजात की बिशप्स कॉलेजात संस्कृत प्राध्यापक होता. तसेच गावातील तो एक प्रतिष्ठित गृहस्थ मानला जाई. पण माझी आई आणि त्या वाडीतील इतर आप्त जुन्या बायका अभयमामाला लहानपणापासून 'घेनो घेनो' या नावाने हाक मारीत. त्याचे अभय हे नाव बहिणींच्या, काकींच्या किंवा मोठ्या काकींच्या तोंडून कधीच ऐकू येत नसे. सगळ्याच 'घेनो घेनो' या नावाने त्याला बोलवीत. त्या दिवशी जेवणाच्या पंक्तीत माझी आई वाढीत होती. मासे वाढताना अभयमामाला तिने विचारले, 'घेनो, तुला माशाचं एक टकलं वाढू का?' कारण अभयमामा जेवणाच्या बाबतीत जास्त चिकित्सक होता. आणि आईला ते माहीत होते. इतक्या परकी पाहुण्यांसमोर 'घेनो' हे आपणाला केलेले संबोधन ऐकून त्याने माझ्या आईकडे डोळे वटारून एकदा पाहिले आणि अवज्ञासूचक अशी एकदोन वाक्ये तो बोललाही. माझी आई त्यावेळी काही बोलली नाही. त्यानंतर आचमन करून जेव्हा विडा खाण्यासाठी तो आत आला तेव्हा माझी आई एखाद्या खवळलेल्या सिंहिणीप्रमाणे, किंवा पदाघातामुळे डिवचलेल्या नागिणीप्रमाणे फुस्कारून म्हणाली, 'लिहायला वाचायला शिकून तू इतका शहाणा झालास होय? मी तुला घेनो म्हटलेले आवडले नाही? अभयबाबू म्हटले पाहिजे होते नाही का? तुझी मी वडील बहीण आहे, हे तुझ्या मित्रांना माहीत नाही वाटते! तू बाहेर अभयबाबू असशील पण माझ्याकडे तू घेनोच आहेस. माझ्या या 'घेनो' संबोधनाने तुझे मित्र खूष झाले की नाखूष, हे तू त्यांना विचारून पाहा. मी तुला घेनो म्हटले हे चुकीचे ठरले असेल; पण इतक्या परक्या प्रतिष्ठित लोकांसमोर, तुझ्या दीदीचा तू अपमान केलास हे तुला शोभले का? तुझ्या सुशिक्षितपणाचे हेच लक्षण वाटते? तर मग तुझ्या शिक्षणाला, प्रोफेसरीला आणि मानमान्यतेला धिक्कार असो. नशीब त्या काकांचे! तुझ्या शिक्षणासाठी त्यांनी इतका पैसा उगाच खर्च केला!'

भडकलेल्या ज्वालामुखीतून उफाळणाऱ्या अग्निस्फुल्लिंगाप्रमाणे जेव्हा आईच्या तोंडून असा वाग्बाणांचा वर्षाव होऊ लागला तेव्हा अभयमामाला ते सहन करवेना. तो आईच्या पायांवर डोकी ठेवून म्हणाला, 'दिदी, मला क्षमा कर. माझ्या हातून अपराध घडला.'

अभयमामाला मी विद्वान आणि गुणवान् समजून मनातल्या मनात त्याला फार थोर माणूस समजत होतो; पण तो जेव्हा माझ्या आईच्या पाया पडला तेव्हा माझ्या डोळ्यांतून ओघळणारे अश्रू मला आवरेनात. तो निघून गेल्यावर मी आईला रागावून म्हटले, 'आई, तू मला ज्याप्रमाणे रागावून बोलतेस तसेच या

थोर प्रतिष्ठित माणसाला बोललीस ! ' त्यावर आई म्हणाली, ' जाऊ दे तुझा तो थोर माणूस ! असल्या बड्यांची जळ्ळी तोंडं !' त्या दिवसाच्या त्या घटनेची मला जन्मभर आठवण राहिली.

माझी तेजस्विनी माता घरात एकटी राहात असली तरी मानमर्यादेच्या गुणांनी स्वत्वाचे संरक्षण करून वागत होती. बाबा उन्हाळ्याच्या व पूजेच्या (आश्विन महिन्यातील नवरात्र महोत्सवात देवीपूजेचे महत्त्व बंगालमध्ये फार असल्यामुळे त्याला ' पूजा ' या नावाने संबोधले जाते. ) सुटीत घरी येत असत. मी त्यांना यमासारखा मानून भीत असे. कारण अगदी लहानसान कारणावरूनही ते मला खूप मारत असत.

माझी आई माझ्याकडून काही अन्यायाचे वर्तन घडले तर माझ्यावर रागवत असे आणि शिक्षाही करी. पण माझ्यावर तिची किती ममता होती, केवढे वात्सल्य होते, ते वर्णन करून सांगता येणार नाही. एकदाचा एक प्रकार मला आठवतो. त्यावेळी माझे वय चार पाच वर्षांपेक्षा जास्त नव्हते. त्यावेळी मी एका दुर्धर रोगाने आजारी होतो. त्या आजाराच्या वेळी आईने आपल्या इष्टदेवाच्या चरणी नम्र होऊन नवस केला की, ' तुझ्या कृपाशीर्वादाने या माझ्या लेकराला जर गुण आला तर मी माझ्या हाता-माथ्यावर धूप जाळीन आणि स्वतःच्या हृदयातील रक्ताने तुझे स्तवन लिहीन.'

इष्टदेवतेला तिने केलेल्या या नवसानंतर लवकरच मी त्या आजारातून बरा झालो. नंतर जेव्हा नवसफेडीचे व्रतोद्यापन करण्याचा दिवस ठरला, त्या दिवशी एका मुलीने मला कडेवर घेऊन ते व्रतोद्यापन पाहण्यासाठी देवघरात नेले. मी पाहिले तो, आई स्नान करून येऊन योगासन घालून बसली असून तिने आपले दोन उलथे हात गुडघ्यांवर ठेविले आहेत. पुजारी ब्राह्मणाने तिच्या दोन्ही तळहातांवर व डोकीवर चिखलाचा लेप देऊन त्यावर पेटते-धगधगते निखारे असलेली मातीची बशी ठेवलेली आहे आणि मंत्र म्हणता म्हणता तो ब्राह्मण त्या निखाऱ्यावर धूप टाकीत आहे. विस्तवाच्या ज्वाळा निघत आहेत ! तो सर्व प्रकार पाहून मी भ्यालोच. वाटले, माझ्या आईला जाळले जात आहे ! जिच्या कडेवर मी बसलो होतो, तिच्या खांद्यावर भीतीने तोंड लपविले. नंतर एका धारदार सुरीच्या की चाकूच्या टोकाने आईने आपल्या छातीला चिरा पाडल्या आणि एका शिंपल्यात त्यातील रक्त साठवून ती भूर्जपत्रावर दुर्गास्तवन लिहू लागली. मग मात्र मला त्या खोलीत राहावेना. त्या मुलीच्या खांद्यावर तोंड लपवून मी मोठ्याने रडू लागलो. तेव्हा मला घेऊन ती देवघराबाहेर आली. थोड्या वेळाने आईने बाहेर येऊन मला घेतले आणि माझे रडे थांबविण्याचा प्रयत्न चालविला. मी चारपाच वर्षांपेक्षा यावेळी मोठा नव्हतो आणि तिच्या एकोणिसावे वर्षी मी तिला झालो. यावरून आईचे वय या व्रतोद्यापनाच्या वेळी चोवीस-पंचवीस वर्षांपेक्षा जास्त नसावे.

चौवीस वर्षांच्या मुलीने (आईने) केलेल्या या नवसफेडीची जेव्हा मला आठवण होते तेव्हा विस्मयचकित होऊन मी मनात म्हणतो, 'ही धर्मनिष्ठा माझ्यात कुठे आहे!'

## लहानपणी नैवेद्याबद्दल नावड

याच वेळची ही एक विलक्षण गोष्ट आहे. मी चार वर्षे वयाचा असेन त्यावेळी. देवाचा नैवेद्य खाणे मला मुळीच आवडत नसे. ब्राह्मणाच्या घरात असा प्रकार असणे म्हणजे विलक्षणच, नव्हे भयंकरच. माझ्या डोक्यात हे वेड कुणी भरविले ते सांगता येत नाही. पण प्रत्येक दिवशी माझ्या जेवणाच्या वेळी हा एक गोंधळच उडे. माझ्या घरात शाळिग्राम, शिवपंचायतन वगैरे अनेक देवता देव्हाऱ्यात असत. पणजोबांची हकीगत सांगताना याबद्दलची विशेष माहिती देण्यात येईल. प्रत्येक दिवशी भात-भाज्या, चटणी-लोणचे वगैरे सर्वांचा देवाला नैवेद्य दाखविल्यावाचून कोणालाही जेवणाला बसण्याचा अधिकार नव्हता. माझीही अतिशय कठोर प्रतिज्ञा होती की, देवाला नैवेद्य दाखविलेले अन्न मी खाणार नाही. या बाबतीत आई व बाबा यांच्याकडून मला पुष्कळ मारही सहन करावा लागे. पण स्वतःचा हट्ट मी केव्हाही माघारी घेत नसे. शेवटी निरुपायाने असा नेम करण्यात आला होता की, माझे जेवणाचे पदार्थ वेगळे काढून नंतर नैवेद्य दाखवावयाचा. तरी पण आईवडलांवरही मी संपूर्ण विश्वास ठेवीत नसल्यामुळे, मी पुष्कळदा देवाला नैवेद्य दाखविण्यापूर्वी दाराबाहेर जेवणाला बसत असे. वडील केव्हा केव्हा कुतुहलाने सैपाकघरातच देवाला नैवेद्य दाखवून (मी काय करतो हे पाहण्यासाठी) देवघरात जाता जाता, दारातच मी एका बाजूला जेवीत आहे असे पाहून पंचपात्रीतील नैवेद्याचे तीर्थ माझ्या पानावर शिंपडीत. लागलीच जेवण बंद करून 'मी आता नाही जेवणार' असे म्हणून व हात वर करून मी जमिनीस दोन्ही पाय घाशीत मोठ्याने रडू लागे. आई स्वतः येऊन मला समजावण्याचा पुष्कळ प्रयत्न करी. पण ते तीर्थ शिंपडलेले अन्न मी पुनः तोंडात घालीत नसे. शेवटी थोरल्या आत्याच्या घरातून जेवणाचे दुसरे ताट वाढून आणावे लागे. कारण तिच्या घरात देवबीव काही नव्हते.

## आईचे स्वप्न

माझ्या असल्या या वागणुकीमुळे वाडीतील शेजारपाजारच्या बायकांकडून आईला बरीच मानहानीची बोलणी सहन करावी लागत. त्या म्हणत, 'तुझ्या पोटीं असला कसला हा कालापहाड[२] जन्माला आला!' यावर माझी आई आपणाला

२. मुसलमानी अमदानीतील ऐतिहासिक हिंदू ब्राह्मण. त्याने मुसलमान धर्माचा स्वीकार करून बंगाल, आसाम व ओरिसा येथील हिंदूंची पुष्कळ मंदिरे फोडली.

पडलेल्या स्वप्नाची हकीगत सांगून म्हणे, 'मला माहीत आहे. या मुलाला सटवीने पछाडले आहे.' ते स्वप्न असे : आमच्या आसमंतातील बायका मंडळीत अशी एक रूढी प्रचलित आहे की, सूतिकागृहात सहाव्या रात्री नवजात बालकाला जमिनीवर निजवावयाचे नाही. बाळंतिणीने त्याला मांडीवर घेऊनच रात्रभर बसले पाहिजे. बालकाला जमिनीवर निजविले तर सटवी त्याला हरण करून नेते. या रूढीप्रमाणे, मी जेव्हा सहा दिवसांचे अर्भक होतो तेव्हा माझ्या आईने दाईशी असा संकेत केला होता की, 'अर्धी रात्र होईपर्यंत तिने मुलाला घेऊन बसावे आणि अर्धी रात्र आपण स्वतः मला मांडीवर घेऊन बसावे.' याप्रमाणे अर्धी रात्र होईपर्यंत दाई मला घेऊन राहिली. नंतर आईची पाळी आली. आई मला थोडा वेळ घेऊन बसल्यावर तिला झोप येऊ लागली. तेव्हा तिच्या मनात आले, मुलाला पोटावर घेऊन झोपावे. जमिनीचा स्पर्श झाला नाही म्हणजे झाले. आणि मग तशी ती झोपली. झोपेत तिला स्वप्न पडले. एक रूपलावण्यसंपन्न अशी स्त्री सूतिकागृहात आली आणि हसत हसत ती मुलाला घेऊन निघाली. आई घाबरून तिला म्हणाली, 'कोण तू ! माझ्या मुलाला कुठे नेतेस ?' त्या स्त्रीने हसून म्हटले, 'वाः हा तर माझाच मुलगा.' आई म्हणाली, 'नाही. तो माझा मुलगा आहे.' त्या स्त्रीने सांगितले, 'नाही. माझा आहे.' या भांडणात आईला जाग आली. पहाते तो 'मी तिच्या पोटावरून खाली सरकून पडलो आहे !' स्वप्नाची ही हकीगत आईच्या स्मरणात कायमची राहून गेली. आणि मग तिची खात्री झाली की, मुलगा सटवीने हरण करून नेल्यामुळे आपला कुलधर्म सोडून 'ब्राह्म' झाला. आईच्या तोंडून जसे ऐकले तसेच मी हे लिहिले आहे.

मी सहा वर्षांचा असताना माझी बहीण जन्माला आली. ती दिसण्यात अतिशय सुंदर असल्यामुळे बाबांनी कवित्वसूचक असे तिचे नाव 'उन्मादिनी' ठेविले होते. ती जेव्हा पाच सहा महिन्यांची झाली तेव्हा आईने एके दिवशी तिला माझ्या पणजोबांसमोर ठेवून त्यांचा हात उन्मादिनीच्या अंगावर ठेविला आणि मोठ्याने म्हणाली, 'ही मुलगी झाली आहे. बघा आणि पायधूळ लावून आशीर्वाद द्या.' पणजोबांनी दीर्घ सुस्कारा सोडून म्हटले, 'दयामयी मा, न विसरता तू पुनः आलीस होय !' पणजोबांच्या दोन मुली, दयामयी व करुणामयी नावाच्या होत्या त्या बालपणीच वारल्या. त्यांना वाटले, तीच दयामयी पुन्हा जन्माला आली आहे. आणि मग तेव्हापासून ते उन्मादिनीला दयामयी म्हणूनच हाक मारीत असत.

उन्मादिनी बसू लागताच ती मला खेळगडी झाली. आम्ही दोघे बहीण-भाऊ बसून खेळत असू. वाडीतील इतर मुलांत मी मिसळणे हे आईला पसंत नसे. त्या काली त्या वाडीतील मुले किती वाईटसाईट बोलत व कसकशी वाईट-साईट कृत्ये करीत, त्याची नुसती आठवण झाली की मला आताही संकोच

वाटतो. शिव्यागाळीशिवाय त्यांच्या तोंडून दुसरा शब्दच निघत नसे. त्यांपैकी बरीचशी मुले रागावली की आपल्या आईला ' पाँटी '[3] म्हणत. माझ्या शेजारीच राहात असलेल्या एका ज्ञातिगृहस्थांचे मुलगे मुली आपल्या आईला ' पांटी पांटी ' म्हणण्यात इतके सरावले होते की, त्यांची एक लहानगी बहीण[4]—आईला आई म्हणण्याऐवजी ' पांटी पांटी ' असेच शब्दोच्चार करू लागली. आई कुठे दिसला नाही की ती ' पांटी पांटी ' म्हणूनच रडू लागे. तसल्या त्या मुलांच्या संगतीपासून आई मला कसा व किती वाचविण्याचा प्रयत्न करीत असावी हे आत्ता मनात आले म्हणजे आश्चर्यचकित होतो मी ! एकदा वाडीतील एका मुलाच्या तोंडून त्याच्या आईला बापावरून शिव्या देताना ऐकून आलो आणि मीही माझ्या आईला तीच शिवी दिली. मग काय विचारता ! आईने माझे दोन्ही हात धरले आणि मातीच्या नळ्याचे दोन तुकडे चिमट्याप्रमाणे एकत्र करून माझ्या गालांचे मांस सोलून काढले. रक्ताने सगळे तोंड माखून गेले. त्यानंतर कित्येक दिवस मला जेवताच येईना. तांदळांची गाळलेली पेज दूध मिसळून आई मला पाजीत होती. त्यानंतर आईला मी शिवीगाळ केलेली कोणीच कधी ऐकली नाही.

### भाऊ–बहीण

उन्मादिनीवर मी जिवापाड प्रेम करीत असे. नेहमी खांद्यावर घेऊन तिला फिरवीत असे. कुठे काही चांगले फळ किंवा फूल मिळाले तर अगत्याने तिच्यासाठी म्हणून आणण्याचा माझा रिवाजच बनून गेला होता. सायंकाळपूर्वी आम्हा दोघा भावाबहिणींना आईने जेवायला घातल्यानंतर आम्ही दोघे झोपायला जात असू.[4] लहानपणापासूनच माझी कल्पनाशक्ती फार दांडगी ! किती आणि कसल्या कसल्या गोष्टी रचून मी उन्मादिनीला सांगे, त्याची आता आठवण झाली की, माझे मलाच हसू येते. गोष्टी ऐकता ऐकता माझ्या अंगावर हात ठेवून ती झोपी जाई. मलाही झोप लागे.

### चिन्तादासी

१८३३ साली झालेल्या चक्रीवादळाने समुद्राच्या ज्या लाटा उसळल्या त्यांनी सुंदरबनातील सगळा प्रदेश जलमय करून टाकला. त्या जलप्रलयाने गरिबांच्या झोपड्या पार वाहून गेल्या. हजारो स्त्रीपुरुष पाण्यात वाहून गेले, बुडून

---

३ बकरी या अर्थाचा ग्राम्य शब्द.

४ ती बरोबर नसली तर मी खायला जेवायला बसत नसे आणि तिच्याशिवाय मला एकट्याला झोप येत नसे.

मरण पावले. कोणी कोणी घराच्या छपरावर चढून जीव बचावण्याचा प्रयत्न केला, ते उत्तरेकडे वाहात आले. अशा प्रकारे वाहात आलेल्या अनेक स्त्रीपुरुषांनी आमच्या गावचा आश्रय घेतला. नंतर कॉलऱ्याचा आजार झाला. त्यात पुष्कळसे मेले. या मोठ्या आजारातच माझी पणजी, आजोबा आणि आजी वारली हे पूर्वी सांगितलेच आहे.

जे सगळे लोक जलप्रलयात वाहून आले होते, त्यांतील चिंता नावाची एक खालच्या वर्गातील स्त्री आमच्या घरी आश्रयार्थी म्हणून आली. माझ्या आजोबांनी दयापरवश होऊन तिला घरात जागा दिली. त्यानंतर ते कॉलऱ्याने वारले. चिंता मात्र आमच्या घरी राहिली ती राहिलीच. माझ्या मोठ्या आतेकडे ती घरकाम करीत असे. माझ्या वडील आत्याची मुले जन्मापासून तिनेच सांभाळली व तिच्याच अंगावर पाळली पोसली गेली. मीही मामांच्या घरून आल्यावर तिच्याच परिचर्येवर वाढलो. समजू लागल्यावर मला चांगलेच जाणवले की चिंताच आमचा खरा आधार आहे. आम्ही तिला दासी म्हणून न वागविता चिंतादिदी म्हणत असू. ती सर्व कामकाजात निपुण होती. रानातून लाकडे तोडून आणणे, जाळे वगैरे घेऊन गावापासून दूर असलेल्या तळ्यातून मासे धरून आणणे, गाईचे दूध काढणे, बाजारहाट करणे तिच्याच हाती असे. धान्याची मळणी करण्याचे काम तीच करी. आमच्या बाबतींत कुणी काही केले अगर आम्हाला कुणी बोलले मारले तर वाघिणीप्रमाणे ती त्याच्या अंगावर धावून जाई. त्यामुळे वाडीतील लोक तिच्या भीतीने नेहमी साशंक असत. ती इतकी निरोगी आणि सशक्त होती की, सकाळीच उठून १८।१९ मैल अंतरावर असलेल्या माझ्या मामाच्या घरी निरोप अगर भेट पोचवून येण्यास तिला मुळीच श्रम वाटत नसत.

त्याच लहान वयात चिंतादासीने आम्हांला सांगितले असावे की, आमच्या घरासमोरचे नारळीचे झाड रात्रीच्या वेळी देशोदेशी फिरायला जाते. एक डाकीण त्याच्यावर बसून फिरत असते. या तिच्या सांगण्याने आम्हा मुलांत एक मोठी भीती निर्माण झाली होती की, आमचे नारळीचे झाड वाट चुकून कुठे तरी हरवून जाईल. ती डाकीण झाड कुठे तरी टाकून आली तर ! या बाबतीत चिंतादासीने असे सांगितले होते की, झाडाला जर लोखंड ठोकून ठेविले तर डाकिणीला त्या झाडावर बसता येणार नाही. ते घेणारच नाही तिला. हे ऐकून आम्ही काही मुलांनी सायंकाळच्या पूर्वी त्या नारळीच्या झाडाला खिळा ठोकून ठेविल्याचे मला आजही चांगले आठवते.

### बंगाली शाळेचा विद्यार्थी

गव्हर्नर जनरल लॉर्ड हार्डिंज याच्या कारकीर्दीत देशात कित्येक आदर्श बंगाली शाळा स्थापन झाल्या. त्यांपैकी एक आमच्या गावातही होती. कांचडापाडा

येथील राहाणारे श्यामचरण गुप्त या नावाचे एक सद्गृहस्थ या शाळेवर पहिले मास्तर म्हणून आले. गावठी शाळेच्या गुरुजींचा आईला अत्यंत तिटकारा आल्या-मुळे मला त्या शाळेतून काढून तिने या नवीन शाळेत दाखल केले. तिथे जाऊ लागल्यावर मी स्कूलबुक सोसायटीने प्रसिद्ध केलेल्या वर्णमाला व मदनमोहन तर्कालंकार यांचे नवप्रकाशित पुस्तक शिशुशिक्षा याचा अभ्यास करू लागलो. मदन मोहन तर्कालंकार यांच्या शिशुशिक्षेतील पुष्कळ धडे मित्राक्षर ( यमकयुक्त छंद ) व कवितायुक्त असे होते. मला ते फार आवडत. एकदोन वेळ वाचल्याने तोंडपाठ-ही ह त. वर्णपरिचयात अडथळा होई खरा; पण मी शब्दाला शब्द जोडून बोलता बोलतां कविता करीत असे.

## गावातील इंग्रजी स्कूल

हार्डिंज बंगाली स्कूल स्थापन झाल्यानंतरच आमच्या गावात एक इंग्रजी स्कूल स्थापन झाले होते. हरिदास दत्त नावाच्या जमीनदारांच्या वाड्यातील एका तरुणाने देशात शिक्षण प्रसाराच्या बाबतीत त्या वेळी फार उत्साह दाखविला होता. तो परलोकवासी होऊन थोडेच दिवस झाले. मुख्यतः त्यांच्या व यांच्या समवयस्क मित्रांच्या खटपटीने आणि जमीनदारांच्या मदतीने हे इंग्रजी विद्यालय स्थापन झाले असावे असे माझे अनुमान आहे. तसेच मला हेही आठवते की, या इंग्रजी स्कूलवर एका इंग्रजी हेडमास्तरलाही नेमून घेण्यात आले होते. गावातील मंडळीच्या दृष्टीने हा एक नवीनच उपक्रम होता. साहेबाबरोबर एक कुत्राही शाळेत येई आणि हेडमास्तर साहेबांच्या टेबलाखाली झोपून असे. आम्ही त्याला पाहून फार भीत असू. हा साहेबमास्तर जमीनदारबाबूंच्या एका बंगल्यात राहात असे. त्याने पाळलेल्या कोंबड्या व निरनिराळे पक्षी पाहण्यासाठी आम्ही बागेच्या बाहेरून डोकावत असू. साहेबाला रस्त्यात पाहाताच आम्ही दूर निघून जात असू. यावरून आमच्या गावी नवीन सुधारणेचा प्रकाश माझ्या बाल्यावस्थेतच दिसू लागला होता, असे म्हणायला हरकत नाही. केवळ इतकेच नव्हे तर हरिदास दत्त प्रभृति कित्येक तरुणांच्या सहाय्याने ' मजिलपूर पत्रिका ' नावाचे एक वर्तमानपत्रही प्रकाशित होऊ लागले होते. पण ते पुढे अल्पकालातच बंद पडले. याखेरीज व्रजनाथ दत्त नावाचे आमच्या गावातील एक मध्यमवर्गीय सद्गृहस्थ ज्ञानचर्चा करण्यात मोठा उत्साह दाखवीत असत. ते, ब्राह्मण शिक्षक व विद्वान गृहस्थ यांना जमवून नेहमी ज्ञानालोचन करण्यात कालक्षेप करीत. बौद्धिक चर्चा कर-ण्याची त्यांना फार आवड असे. असेही मी ऐकले होते की, ब्राह्मसमाजाची ' तत्त्वबोधिनी पत्रिका ' ते घेत असत. यांचा वडील मुलगा शिवकृष्ण दत्त ह्याचा ' मजिलपूर ' पत्रिकेशी बराच संबंध असे, असेही मी ऐकले होते. शिवाय गावची सुधारणा करण्याकडेही तो विशेष लक्ष देई. गावात ब्राह्मधर्माचा

प्रवेश त्याच्यामुळेच झाला असेही लोक बोलत. मला भक्तिभूषण वाटणारे व गुरुस्थानी असणारे, गावातीलच उमेशचंद्र दत्त यांनाही त्याने ब्राह्मधर्माकडे वळविले होते. याच शिवकृष्ण दत्ताने यानंतर काही दिवसांनी 'लुक्रिसीयन उपाख्यान' बंगाली पद्यात अनुवादित केले व आम्हांला काव्यविषयात मार्गदर्शक होण्याचेही श्रेय मिळविले. पुढे हा गृहस्थ उन्माद रोगाने पछाडला होता. नंतर याच अवस्थेत काही कालाने तो परलोकवासी झाला. याच्या या उन्मादरोगासंबंधाने एक स्मरणीय गोष्ट आहे. याचा बाप व्रजनाथ दत्त हा ज्ञानानुरागी व गुणीजनांना उत्साहित करणारा असला तरी अतिशय गांजा पीत असे. लोक ज्याप्रमाणे घराच्या भिंतीला शेणगोळे थापून ठेवीत, त्याप्रमाणे हा आपल्या बैठकीच्या खोलींतील भिंतींना गांजाच्या लहान लहान गोळ्या चिकटवून ठेवी. मधून मधून त्यांतील एकेक गोळी आपण खावी आणि मित्रांनाही द्यावी, असा त्याचा रिवाज असे. आणि आश्चर्य असे की, याची काही मुले पुढे वेडी झाली. गांजा अतिशय पिणे व ओढणे याचाच हा परिणाम असावा. ते काही असले तरी माझ्या बालवयात आणि पुढे मी मजिलपूर सोडून गेलो तेव्हा मजिलपूर हे गाव, शिक्षणादि विषयात चौवीसपरगणा जिल्ह्यातील दक्षिण भागात नावाजलेले व पुढारलेले गाव म्हणून ओळखले जाई. या गावातील ब्राह्मधर्म व बालिका विद्यालय यांच्या चळवळीचा परिचय चौथ्या प्रकरणात विशेष देण्यात येईल.

### 'आढ' शब्दाचा अर्थ

याच कालातील आणखी काही गोष्टी आठवतात. आई स्वतः माझ्या जेवणखाणाकडे विशेष लक्ष देत असल्यामुळे अगर ती मला आग्रहाने खाऊ घालीत असल्यामुळे माझे पोट बरेच मोठे दिसत असे. हातपाय रोगिष्ट मुलाप्रमाणे बारीक; पण पोट मात्र मोठे व गोलाकार त्यामुळे श्यामाचरण गुरुजी मला 'अफूखोर बामण' म्हणत असत. आणि मी जवळ सापडलो की दोन्ही बोटांनी माझे पोट दाबून पाहात. मी माझ्या या घेरदार फुगीर पोटामुळे अनेक शिक्षकांकडून पोट दाबून घेण्याच्या वेदना सहन केल्या आहेत. एकेक दिवशी तर मी शाळेत जाताच, मास्तरसाहेब माझे नेसते धोतर सोडून माझ्या कपाळाला गुंडाळीत आणि पोट दाबतादाबता म्हणत, 'अफीमबाज बामणा, तुझी आई तुला किती अफू खायला घालते ?' तरीपण शामाचरण गुरुजी, माझ्या अभ्यासातील हुषारीबद्दल माझ्यावर फार लोभ करीत. मी पहिला किंवा दुसरा नंबर कधी सोडलाच नाही. याचे कारण मात्र माझी आई. अभ्यासाकरिता मी आईकडे जात असे; परंतु शिकण्याकडे माझे लक्ष होते हा माझ्या बाबतीत प्रशंसेचा विषय होता.

आई सकाळी उठताच घरकामात गुंतून जाई. मी पुस्तक हातात घेऊन तिच्या मागून फिरता फिरता 'आई, हे काय ?' 'याचा अर्थ काय ?' असे

एकसारखा विचारीत असे. यावेळची एक गोष्ट सांगतो. ' शिशुशिक्षा ' पुस्तकात ' आ ' आणि ' ढ ' या अक्षराला ' य ' हे अक्षर जोडल्याने काय होते, याचे उदाहरण म्हणून ' आढ्य मनुष्य सदा सुखी ' असे दिले आहे. मी आईला विचारताच तिने, ' आढ्य हे जोडाक्षर आहे ते शिकविण्यासाठी ही वाक्य-योजना केली आहे ' असे सांगितले; पण तेवढ्याने माझे समाधान होईना. मी तिला पुन: प्रश्न केला, 'आढ्य कुणाला म्हणतात आई ? ' तिने उत्तर दिले. ' आढ्य म्हणजे फार मोठा माणूस. जसे–गोपालबाबू. ' ( हे गावातील एक जमीनदार होते. ) पुढे शाळेत गेल्यावर गुरुजींनी विचारले, ' आढ्य शब्द कसा तयार झाला व त्याचा अर्थ काय ते सांगा. ' मी लागलीच उत्तर दिले, ' आ आणि ढ याला ' य ' जोडल्याने ' आढ्य ' शब्द होतो. आढ्य याचा अर्थ थोर माणूस. जसे गोपालबाबू. ' माझे हे उत्तर ऐकताच गुरुजी हसू लागले आणि हसता हसता त्यांनी मला विचारले, ' वा वा ! हे कुणी सांगितले. रे तुला ? ' मी लागलीच उत्तर दिले. ' का ? माझ्या आईने असेच सांगितले. ' अशा प्रकारे आईच्या गृहपाठामुळे शाळेत कोणताच मुलगा मला मागे टाकू शकत नव्हता. आणि याचे पर्यवसान असे झाले की, जो तो मुलगा आपापल्या घरी जाताच स्वतःच्या आई-कडे हट्ट धरून बसे, ' शिबूची आई, त्याला अभ्यास सांगते. तु तसा मला का नाही सांगत ? का नाही शिकवत ? ' त्यांची आई उत्तर देई ' अरे बाबा, मला काय लिहिता वाचता येते ? शिबूच्या आईने चांगलीच आग लावून दिली आहे !' अशा प्रकारे माझी आई शिकलेली असल्यामुळे शेजारच्या आयाबायांत तिने चांगलाच गोंधळ उडवून दिला होता.

## पहिली मास्तरकी

आमच्या घराशेजारी एका ज्ञातिबंधूच्या वाड्यात एक गौरवर्णी विधवा राहात असे. नात्याने ती माझ्या वडलांची चुलती होती. माझ्या आईला अन्नदा-मंगल, रामायण, महाभारत, रोमिओ-ज्युलियेट वगैरे वाचताना पाहून तिला लिहिणे--वाचणे शिकण्याची फार इच्छा झाली होती. तेव्हा तिने मला आपल्या घरी बोलावून व खाण्यासाठी थोडी मिठाई हातावर ठेवून माझी बरीच खुशामत केली आणि वर्णपरिचय शिकायला बसली. माझी करमणूक करण्याच्या हेतूने हातटाळीचा ताल धरून मला नाचविण्यासाठी ती म्हणत असे, ' शिव नाचि नाचि जाय, शिव डम्बुरु बाजाय, डिमि डिमि डिमि डम्बुरु बाजाय ' तिच्या गाण्याच्या व हातटाळीच्या तालावर मी नाचत असे. यानंतर माझ्या ममताळू आज्या, चुलत्या, मोठ्या आक्का मला पाहताच ' शिव नाचि नाचि जाय ' असे म्हणून माझे आदरातिथ्य करीत.

## खेळगडीण लंगडी मुलगी

माझी कुणी प्रशंसा केलेली मला फार आवडत असे. ही दुर्बलता लहानपणापासूनच मला जडली असावी असे वाटते. आमच्या शेजारीच असलेल्या एका घरात माझ्या आप्तांपैकी काकांची एक लंगडी मुलगी होती. ती माझ्याहून दोन तीन वर्षांनी मोठी असावी. ती रोज सकाळी माझी खुशामत करून माझ्या खाण्यातील पुष्कळसा भाग स्वतःच मटकावी. आईने दिलेला खाऊ हातात घेऊन मी बाहेर येताच मला ती गोड शब्दांनी 'आगाशदादा, इथे ये ना.' असे म्हणून मला बोलवी. तिला स्वतःच्या दाराबाहेर येता येत नसल्यामुळे, तिच्या त्या लाघवी बोलावण्याने माझे तिच्याकडे लक्ष जात असे. ती मला 'आगाशदादा' का म्हणत असे ते मला ठाऊक नाही. मी जसजसा तिच्या रोखाने पाऊल टाकी तसतशी ती आपल्या बोलण्यातील गोडवा वाढवून 'किती सुलक्षणी सुंदर मुलगा आहे!' असे वारंवार म्हणे. आणि मग मीही अतिशय आनंदाने तिच्याजवळ जाऊन बसे. मग ती म्हणे, 'ये ना भाई, दोघेही एकमेकांचा खाऊ मिसळून खाऊ.' बोलता बोलता ती आपल्या वाटीतील खाऊ माझ्या मोठ्या वाटक्यात घाली आणि मुठी भरभरून भराभर खाऊ लागे. मलाही फार आनंद वाटे. आणि हास्यकारक कथा अशी की, खाऊ संपताच मग तिच्या बोलण्यातील गोडवाही संपून जाई आणि ती सगळी ममता-मायाही लोपून नाहीशी होई. इतकेच नव्हे तर मनाविरुद्ध थोडेसे काही होताच ती नखांनी ओरबाडून शिव्या देऊन मला उंबऱ्याबाहेर ढकलून देई. नंतर रडत रडत मी घरात आलो की आई म्हणे, 'उत्तम झालं. चांगलं झालं. हजारदा तुला सांगितलं असेल की त्या लंगडीजवळ तू जाऊ नको. तरी आपला मरायला तिच्या जवळ जातोसच.' आईने असे कितीदा तरी सांगितले तरी मी आपला पुनः पुनः त्या लंगडीजवळ जात असेच. बहुधा तिच्या त्या लाघवी व खुशामतीच्या गोड बोलण्याचा लोभ मला आवरत नसावा. इंग्रज कवी काऊपर स्वतःसंबंधी म्हणतो, 'ड्यूप ऑफ् टुमॉरो ईव्हन् फ्रॉम ए चाईल्ड.' त्याप्रमाणेच मीही माझ्यासंबंधाने म्हणेन, 'ड्यूपड् बाय् प्रेज इव्हन् फ्रॉम ए चाइल्ड.'

## सुंदर खेळगडीण

त्याकाळची आणखी एक गोष्ट मला आठवते. एक अतिशय सुंदर व गोरीपान, उमललेल्या फुलाप्रमाणे टवटवीत दिसणारी मुलगी आमच्या शेजारच्याच घरी आपल्या मावशीकडे म्हणून येई. ती माझ्याच वयाची होती. ती आली की माझे खेळणेसवरणे, लिहिणेवाचणे चट्सारे बंद होई आणि तिच्या पावलावर पाऊल ठेवून मी भटकत असे. आम्ही आळीतील मुलगे-मुली एकत्र होऊन 'चांद चांद केन भाई कांद' वगैरे अनेक खेळ खेळत असू. या खेळांत ती माझी जोडीदारीण

बने. खेळण्याच्या निवडणुकीत मला जर तिच्या जोडीला जाता आले नाही तर मला अतिशय वाईट वाटे. मी तिचा हात धरून त्या बाजूच्या खेळगड्यांना म्हणे, ' मी हिच्या जोडीला राहणार. तुम्ही माझ्या बदली या पक्षातून त्या पक्षात कुणा दुसऱ्याला पाठवा. ' माझे हे म्हणणे मुले मानीत नसत. जोरजबरदस्तीने मारून-ढकलून मला त्या दुसऱ्या पक्षांच्या टोळीत घालवीत. या मुलीचे घर माझ्या शाळेच्या वाटेतच होते. मी शाळेतून येताना तिला भेटून एखादा खेळ खेळून येई. नंतर मी जेव्हा कलकत्त्याला आलो आणि तेथील अभ्यासात वगैरे गढून गेलो तेव्हा गावी तिचे लग्न होऊन ती दूरवर असलेल्या आपल्या सासरी निघूनही गेली होती. पुष्कळ वर्षे तिची माझी गाठभेट झालीच नाही. पुढे मी मोठा होऊन ब्राह्म-समाजात प्रविष्ट झाल्यावर गावी गेलो तेव्हा तिला पाहिले. पहाताच मी चमकलो. तिचा पूर्वीचा सुंदर टवटवीतपणा आता पार नाहीसा होऊन ती मुलाबाळांच्या जंजाळाने व संसारातील कष्टकामाने भारावून अगदी मलूल होऊन गेली होती. तिला त्या स्थितीत पाहून मला कसेसेच वाटले. त्या भावावेशात तिला उद्देशून ' तूच माझी ती लहानपणची खेळगडीण काय ? ' अशी मी एक कविताही रचिली होती. माझी त्यावेळची ही आठवण बरोबर असेल तर ती मी रचलेली कविता, द्वारका-नाथ गंगोपाध्याय या माझ्या एका मित्राने, माझ्याकडून जोरजुलमाने काढून घेऊन ती ' अबला बांधव ' मध्ये छापली होती. ' तुमि कि आमार सेइ खेलार संगिनी' ही माझी कविता मिळविण्यासाठी मी पुष्कळ झटलो पण ' अबला बांधव 'चा जुना वार्षिक संग्रह मला मिळविता आला नाही तो नाहीच.

माझ्या शालेय जीवनातील आठवणींचा गोडवा अन्तःकरणात कायम राहिला आहे. उन्हाळ्यातील काही महिने सकाळची शाळा असल्यामुळे आळीतील मुलांना घेऊन मी अगदी पहाटेसच उठून फुले आणायला जात असे. तेथून फुले तोडायची आणि पिशवीत भरून शाळेत आणायची. जमीनदारबाबूंच्या समोर चाफ्याचे एक झाड होते. त्या झाडावर चढून फुले काढावी लागत. झाडावर चढण्यात मी तितकासा पटाईत नव्हतो. आडदांडपणा तर मी कधी केलाच नाही. तरीपण माझ्याबरोबरची आडदांड मुले मला झाडावर चढविण्यात चुकवाचुकव करीत नसत. चढायला मी घाबरू लागलो तर तीं मला भित्रा म्हणून माझा उपहास करीत. त्यांचा तो उपहास माझ्या मनाला सहन होत नसे.

### गायन संघ

त्यावेळच्या आणखीही काही गोष्टी मला आठवतात. एके दिवशी आळीत रामायणगायन झाले. ते पाहून आळीतील मुलांनी एक ' रामायण गायन-संघ ' काढला. मला गाता येत नसल्यामुळे मी मुख्य गायक झालो नाही, तरी पण माझ्या प्रोत्साहक पुढारीपणामुळे गायनसंघ स्थापन झालाच. एका मुलाच्या गळ्यात

एक ढोलकी आणि दुसऱ्या मुलाच्या हातात करताल देऊन मुख्य गायक आपल्या हातात चवरी घेई. आम्ही सर्व पायांत घुंगूर बांधून त्याला साथ देत असू. अशा तऱ्हेने आमचा हा गायन संघ संध्याकाळी आळीतील घरोघरी गाणी गात फिरत असे. त्या गाण्याला आगापिछा, भाव, अर्थ वगैरे काहीही नव्हते. आळीतील एका हौशी मनुष्याने हास्यकारक अशी काही गीते रचून ती आम्हांला शिकविली. तीच आम्ही घरोघरच्या बायकामंडळींना ऐकवायची. बायका–मुली, ती गाणी ऐकून होहो करून हसताहसता लोटपोट होऊन जात. तेवढ्यानेच आम्हांला आनंद होऊन आमच्या श्रमाचे सार्थक झाले असे वाटे.

**मुंग्या काय बोलतात ?**

मला त्यावेळी पशु-पक्षी पाळण्याचा फार नाद लागला होता. मी पाळला नाही असा जीवजन्तू राहिला नाही. लहान पक्षी, बुलबुल, सुतारपक्षी, चिमण्या, पारवे, पोपट असे सर्व पक्षी तर माझ्या संग्रहालयात असतच; पण फुलपाखरे, पतंग आणि जाड्या मुंग्याही पाळण्याचे मी सोडले नाही. तो एक नादच लागला होता मला. मुंग्यांना तर मी अगदी जपून डबीत ठेवीत असे. पतंगांना अगदी कोवळ्या दुर्वांचा चारा घालायचा. मुंग्यांना साखर इत्यादि खाऊ चारायचा. मुंग्यांच्या हालचाली पाहण्यात मला फार कौतुक वाटे. ६।७ वर्षांचा मी असताना मुंगी बनून हातापायांवर चालत त्यांच्या बरोबर फिरायचा. माशा मारून झाडूच्या काडीचे टोक मोडून त्याने ती माशी ओट्यावरच्या मातीत पुरायचा आणि त्यांना खाण्या-साठी मुंग्या येऊन कशी ओढाताण करतात हे पाहण्यासाठी वाट पाहात राहायचा. कदाचित् अर्धा एक तासाने एखादी मुंगी तेथे यायची. ती येऊन प्रथम त्या माशीचे पाय धरून ओढायला आरंभ करायची. पण आपल्या एकटीला काही ही नेता यायची नाही असे कळून येताच ती तिच्या सभोवार फिरून परीक्षा करू लागायची. माशी पुरलेल्या ठिकाणी मी एक काडी पुरून ठेवलेली असे त्या काडीवर भराभर चढउतार करायची. नंतर ती निघून जायची. ती कुठे जाते हे पाहण्यासाठी मी हातापायावर उड्या मारीत तिच्याबरोबर जायचा. जाता जाता ती एका लहानशा बिळात अदृश्य व्हायची. पुढे काय होते हे पाहण्यासाठी मी तेथेच थांबायचा. नंतर सुमारे अर्ध्या एक तासाने अनेक मुंग्यांचे सैन्यपथक घेऊन ती बाहेर यायची. मुंग्यांच्या रांगेत बऱ्याच मोठ्या व दीर्घाकृती अशा दोन मुंग्या होत्या. मला वाटले या सेनापती असाव्यात. पुढे ते फार मोठे सेनापथक हळूहळू रांगेने त्या माशीजळ आले. आणि मग जोराची ओढाताण सुरू झाली. शेवटी काडीचा दाब मी काढून घेतला. लागलीच ते सैन्य मृत माशीच्या खळग्यात शिरले. पुढच्या मागे आल्या की, मागच्या पुढे जायच्या. वाटेत एकमेकींच्या तोंडाला तोंड लावून त्यांनी काही संकेत केला. लागलीच जाणाऱ्या मागे फिरल्या. मला वाटले यांना खात्रीने बोलता येत असावे. मग मी त्या खळग्याला कान

लावून राहिलो. काही शब्द ऐकता येतात का पाहावे हा हेतू. बरोबरचे माझे सवंगडी काही बोलू लागले की, 'गप्प. गप्प मुंग्या काय बोलतात ते मी ऐकतो.' असे दरडावून सांगत असे. माझा हा नसता उपद्व्याप आणि भलतीच सावधगिरी पाहून सगळे हसत. माझा हा असला खेळ नेहमीच चाले.

## पक्षी पकडणे

त्यानंतर पक्ष्यांना पकडण्याच्या व त्यांना पाळण्याच्या बाबतीत मला विशेष उत्साह होता. पक्षी पकडताना, पक्ष्यांच्या घरट्यांतून त्यांची पिले चोरून आणीत असे. मात्र नंतर त्यांना पाळण्यापोसण्याचे काम करण्यात आईप्रमाणे दक्षता घेई. त्या जातीचे पक्षी काय खातात, त्यांची आई त्यांना कशी खाऊ घालते ही सगळी माहिती आळीतील आडदांड मुलांकडून मी मिळविली असल्यामुळे दिवसातून १० वेळ त्यांना खायला घालण्याचे काम मी करी. गाडग्याला छिद्रे पाडून व त्यांत गवतकाड्यांचे घरटे बांधून आत ती पिले ठेवायची आणि त्यावर मातीचे झाकण घालून ते गाडगे घराच्या आढ्याला लोंबते ठेवायचे. कारण नजर चुकून सापाने ती पिले खाऊ नये म्हणून. नंतर खजुरीच्या झाडाचे झाप तोडून त्याचा पुढचा भाग चावून खातात त्याप्रमाणे करायचा. त्याला छाटलेला म्हणतात. ते तसले छाटलेले झाप हातात घेऊन फुलपाखरे पकडण्यासाठी माळावर जायचे. गवतावरून ते झाप फिरविताच पतंग उडून जात. लागलीच त्या झापाने उडत्या पतंगांना अर्धमेले करून त्यांना बांबूच्या नळीत भरून ठेवावयाचे. हा माझा पतंग पकडण्याचा उद्योग तासन् तास चालायचा. नंतर ते पतंग घरी आणून पिलांना खायला घालायचे. पक्ष्याची पिले पाळण्याचे हे माझे काम वैशाख-ज्येष्ठ महिन्यात चाले. बाबा त्यावेळी उन्हाळ्याच्या सुटीत घरीच असत. माझे हे पक्षी पाळण्याचे कृत्य त्यांना आवडत नसे. कारण त्यामुळे अभ्यासात व्यत्यय येई, तो त्यांना सहन होत नसे. मी पिलांना खाऊ घालीत आहे असे पाहून ते मला मारीत. अर्थात् त्यांच्या गैरहजेरीतच मला हे पिलांच्या आईचे काम करावे लागे. वडलांच्या हातचा इतका मार खाऊनही पिले पाळण्याचे हे काम मी कसे करीत असे, हा विचार मनात आला की आता त्याचे मला नवल वाटते.

पक्षी पाळण्याच्या माझ्या या छंदाला आईचा फारसा विरोध नव्हता. मुलगा घरात राहतो, बाहेर कुठे भटकत नाही आणि आपल्या या कामातच रमलेला असतो ह्याचाच तिला आनंद वाटत असावा. शिवाय तिलाही पक्षी बाळगणे आवडत असे. पुढे मी कलकत्त्याला आल्यावरही ती पक्ष्यांचे पालनपोषण करण्यात हयगय करीत नसे.

मी पक्ष्यांची पिलेच पाळीत असे, असे नाही तर मोठे पक्षीही पाळीत असे. हे पक्षी पकडण्याचे तीन प्रकार असत. एक वेताची टोपली आमच्या अंगणांत उभी

ठेवून तिच्या समोर दाणे पसरायचे. वेताच्या टोपलीच्या पाठीमागच्या बाजूला बांबूची एक पट्टी ( बांबू उभा कापल्यावर त्याची निघणारी पट्टी ) लावावयाची व त्या पट्टीचा दुसरा भाग ओट्यावर ठेवायचा आणि आपण वाट पाहात बसायचे. पेटीवर झाडाचे डहाळे ठेवायचे आणि आपण एकीकडे बसून राहायचे. थोड्या वेळाने एखादा पारवा, कबुतर वा साळुंकी तन्मयतेने दाणे टिपूं लागली की लगेच त्या बांबूच्या पट्टीने तेथे टोपलीला धक्का द्यायचा. लगेच तो पक्षी आत कोंडला जायचा. आणखी एक प्रकार असा : झाडाच्या फांदीवर बसलेले पक्षी जेव्हा आपसात भांडतात, मारामारी करतात तेव्हा त्या फांदीखाली कापडाचे जाळे पसरायचे. मारामारी करताना रागाने ते इतके बेभान होत की, लढता लढता दोघेही पिकलेल्या फळाप्रमाणे झाडाखाली पडत. कधी कधी अशा रीतीने ते पडताना मी खाली पसरलेल्या जाळ्यात पडत. आणखी तिसरा एक प्रकार असा : चिमण्या कवड्यांसारखे वा साळुंकी मैनेसारखे पक्षी उगाच फांदीवर बसून असत. तेव्हा अकस्मात त्यांच्या पायांजवळ असलेल्या फांदीवर जोराने दगड मारायचा. त्यामुळे काय झाले हे न कळून ते घाबरून खाली पडत. लागलीच त्यांना पकडायचे.

दगड आणि मातीचे ढेकूळ मारण्यात मी निष्णात होतो. पक्ष्याला बचावून फांदीवर मी दगड मारू शकत असे. पण अनेकदा फांदीला दगड न लागता तो पक्ष्याच्या डोक्याला लागे व पक्षी मरून पडे; हे सांगण्याची काही विशेष आवश्यकता नाही. फार काय, तळ्यात बेडूक पोहत आहे अगर फांदीवर पक्षी बसला आहे असे पाहताच दगड मारण्याची मला एकदम लहर येई. हे ऐकून अनेक लोक मला हसतील; पण या वृद्ध वयातही तशी संधी अल्यास सहसा दगड .मारण्याची माझी वृत्ती बळावते. पण स्वतःशीच हसून ती वृत्ती मी आवरतो.

या माझ्या अचूक नेमबाजीच्या हस्तलाघवासंबंधी दोन घटना मला चांगल्याच आठवतात. एकदा मी माझ्या वडलांबरोबर कुठेसा जात होतो. त्यावेळी माझे वय तेराचौदा वर्षांचे असावे. वडील पुढे आणि मी मागे. जाता जाता मी पाहिले तो, माझ्या वडलांसमोर असलेल्या एका वृक्षाच्या डहाळीवर एक साळुंकी विमनस्क स्थितीत बसलेली मला दिसली. लागलीच अचूक नेमबाजी करण्याची माझी वृत्ती बळावली. ज्या वडिलांना मी यमाप्रमाणे भीत होतो तेच समोर आहेत याचेही मला भान राहिले नाही. सों करून माझ्या हातून एक दगड मारला गेला. साळुंकीला तो कसा कुठे लागला ते मात्र मला कळले नाही. पण ती साळुंकी एकादे पक्व फळ खाली पडावे तशी वडलांच्या समोर पडली. मी मागून दगड मारला असावा हे वडलांच्या ध्यानीही आले नाही. त्यांना वाटले अन्य काही कारणाने पक्षी खाली पडला असावा. त्यांनी त्या पक्ष्याला हळूच उचलले आणि समोरच असलेल्या तलावाजवळ नेऊन बोटाच्या पुढच्या भागाने थोडथोडे पाणी ते त्याला पाजू लागले. आनंदाची गोष्ट म्हणजे तो पक्षी मेला नव्हता. पुढे जाता

जाता वडलांनी तो पक्षी एका माणसाला देऊन टाकला आणि ते पुढे निघाले. मीही हळू हळू त्यांच्या मागून जाऊ लागलो.

एकदा मी रस्त्याने चाललो असता माझ्यापुढे कोणी एक मनुष्य जात होता. तितक्यात मला दूरवर समोर रस्त्याच्या कडेला एक बोकड बांधलेला दिसला. लागलीच त्याच्यावर दगड मारण्याची मला दुर्दम्य इच्छा झाली. सांगायला मला लाज वाटते, पण मी लागलीच सों करून एक दगड त्याच्यावर भिरकावला. बांधलेल्या जागी तो बिचारा निरपराध प्राणी चरत होता. माझा तो दगड त्याच्या डोक्यालाच लागला असावा. कारण पाहाता पाहाता त्याने एकदा बँए केले आणि मातीला तोंड घाशीत तो जमिनीवर पडला. लागलीच मी मागच्या मागे सूंबाल्या केले. आणि दुसऱ्या वाटेने सगळ्या वस्तीला फेरा घालून थोडया वेळाने जाऊन पहातो तो त्या जमिनीवर पडलेल्या बोकडासभोवार बरेच लोक जमून त्याच्या अंगावर पाणी शिंपडीत असलेले मला दिसले. आणि मग वाटले, बोकड काही आता मरत नाही.

त्यावेळी मी जसा मुंग्यांच्या हालचालींचे सूक्ष्म निरीक्षण करीत असे तसाच पक्ष्यांच्या हालचाली, त्यांच्या उडण्या फिरण्याच्या पद्धती पाहण्याचाही मला नाद होता. अंगणात एखादा पक्षी आला की आई, आजी, चुलती या सर्वांच्या तोंडावर हात ठेवून ' गप्प राहा. बोलू नका. पक्षी येत आहे. ' असे मी घाईघाईने सांगत असे. पक्षी पाहण्याच्या नादात असताना एकदा हत्तीच्या पायाखाली तुडविला जाण्याचा माझ्यावर प्रसंग आला होता. त्यावेळी आमच्या गावी पूल बांधणाऱ्या इंजिनियर साहेबांचा हत्ती जात-येत असे. कारण रेल्वे किंवा गाडीरस्ता झालेला नव्हता. एकदा मी शाळेत जाण्यासाठी बाहेर निघालेला होतो. बगलेत दप्तराची पिशवी होती. चालता चालता अकस्मात्, पूर्वी कधी न पाहिलेला अशा प्रकारचा एक नवीनच पक्षी मला दिसला. शेपटी उंचावून तो चमत्कारिक प्रकारची शीळ घालीत असे. मी एखाद्या पुतळ्याप्रमाणे तटस्थ होऊन पाहातच राहिलो त्याच्याकडे. ' हा कसल्या जातीचा पक्षी ! ' असे मनात म्हणत त्याची प्रत्येक हालचाल पाहण्यात दंग होऊन गेलो. इकडे पूल बांधणाऱ्या साहेबांचा हत्ती त्याच वाटेने येऊ लागला. माहूत ओरओरडून सावधीत होता. आळीतील लोक, ' ए अमक्याच्या मुला, मेलास. मेलास. पळ पळ. ' असे आक्रोशून सांगत होते. पण माझे तिकडे लक्षच नव्हते. मला त्या पक्ष्याखेरीज दुसरे काही दिसत नव्हते की ऐकू येत नव्हते. कानावर कसलातरी आवाज येई; पण त्याचा अर्थबोध होण्याइतका मी भानावर नव्हतो. इतक्यात पाहिले तो, हत्ती आपल्या सोंडेने मला पकडू पाहात आहे, आणि माहूत पुनःपुनः दूर सरण्याचा इशारा मला देत आहे असे वाटले. हत्तीची ती वळणारी सोंड पाहताच मी भ्यालो आणि ओरडत पळत सुटलो.

नवीन असे काही पाहण्याच मी इतका बेभान होत असे त्याचे कारण कदाचित हे असावे की, लहानपणापासूनच कोणत्याही गोष्टीची कार्यकारणमीमांसा शोधून काढण्याचे मला भयंकर वेड ! आईच्या तोंडून ऐकले आहे की, मी चालताबोलता झाल्यापासूनच कशाहीबद्दल का आणि कसे असे विचारून विचारून तिला हैराण करून सोडीत असे. एकदा आईच्या कडेवर बसून दुसऱ्या आळी-तील कोणा एकाच्या घरी निमंत्रण असल्यामुळे जेवायला जात होतो. अकस्मात् वाटेत एक नवीन जनावर पाहिले. लागलीच प्रश्नांची सरबत्ती सुरू झाली. ' हे कुणाचे जनावर ? ' उत्तर मिळाले, ' पुंटेच्या घरचे. ' ' येथे कशाला ठेविले आहे ? ' ' चरायला ' ' का चरते ? ' ' भूक लागली म्हणून. ' ' का भूक लागली ? ' ' सगळ्या रात्रभर काही खायला मिळाले नाही म्हणून. ' ' का नाही खायला मिळाले ? ' ' ते लोक रात्री चारा घालीत नाहीत. ' ' रात्री का नाही चारा घालीत ? ' ' ते गरीब आहेत म्हणून ' ' गरीब कुणाला म्हणतात ? ' वगैरे. एखादे वेळी या ' का ' चा इतका अतिरेक होई की, त्याबद्दल उत्तराऐवजी मला चापट्या खाव्या लागत. या कारणानुसंधानाच्या प्रवृत्तीमुळेच मला वाटते, मुंग्या आणि पक्षी यांच्या सूक्ष्म हालचाली मी लक्षपूर्वक निरीक्षित असावा.

## रूपी मांजर

मी केवळ पक्ष्यांवरच प्रेम करीत होतो असे नाही. इतरही काही प्राणी मी पाळीत असे. मांजराची पिले आणून उन्मादिनीला देत असे. ती त्यांना सांभाळी. केव्हा केव्हा आमच्या अतिरेकी प्रेमामुळे ती पिल्ले आपले प्राणही गमावून बसत. या मांजरीशिशूंपैकी रूपी मांजराची हकीगत मला आठवते. रूपी हे एक फार चांगले मांजर होते. अशा प्रकारची मांजरे फारच थोडी आढळतात. पांढऱ्या रंगावर पोटाच्या दोन्ही बाजूंना व मस्तकावर काळ्या रंगाचे ठिपके होते. अंगावरली लव जाडीभरडी होती. डोळे हळदीसारखे. आणि शेपटी जाडसर गुब-गुबीत. आता मला वाटते, रूपी मांजर हे मिश्र जातीचे उसावे. कुणी हे दिले होते आठवत नाही; पण मी आणि उन्मादिनी दोघेही त्याचा सांभाळ करीत होतो. ते इतके लाडावले होते की, उबदार गोधडीत झोपणे त्याला अपमानकारक वाटे व गादीवर निजणे त्याला पसंत पडे. बिछान्यावर घेतल्याशिवाय त्याला झोप येत नसे. उन्मादिनी आणि मी जेव्हा सायंकाळच्या वेळी बिछान्यात झोपायला येत असू तेव्हा आई—वडलांच्या पानाबाहेर पडलेल्या माशांच्या काट्याचा लोभ सोडून ते आमच्यात मध्ये येऊन झोपे. केव्हा केव्हा तर आम्ही तिघे गळ्यात गळा घालून झोपत असू. आई झोपायला आली म्हणजे त्याला मच्छरदाणीच्या बाहेर फेकून देई. पहाटे केव्हा आम्हाला जाग आली आणि आम्ही बाहेर पाहिले तर गरीब दुःखी रूपी मांजर बाहेर दीनवाणे तोंड करून पडलेले दिसे. त्याच्या त्या अनास्थे-

मुळे मला फार वाईट वाटे आणि मी पुन्हा त्याला मच्छरदाणीत घेई आणि त्यामुळे आम्हा मायलेकात चांगलाच वाद माजे.

## आणखी एक खेळगडी

माझा त्या कालातील आणखी एक खेळगडी होता, त्याचीही मला चांगली आठवण आहे. याचे नाव 'शेयालखाकी' शेयालखाकी ही एक कुत्री होती. या माझ्या सोबतिणीची हकीगत अशी : एक कोल्हा एका कुत्र्याच्या पिल्लाला उचलून नेत असलेला एके दिवशी माझ्या बाबांनी पाहिला. पाहताच त्या पिल्ला-बद्दल त्यांच्या अन्तःकरणात करुणा उत्पन्न झाली. त्यांनी हड हड करून त्या कोल्ह्यावर दगड–ढेकळे फेकण्याला आरंभ केल्याबरोबर कोल्हा त्या पिल्लाला तेथेच टाकून पळाला. बाबांनी त्याला उचलून आणले. ते अगदी लहानच होते. त्याच्या पाठीला कोल्ह्याच्या दातांची जी जखम झाली होती ती बरी होण्याला अनेक दिवस लागले. ते पुढे मोठे झाले. कोल्ह्याने त्याला खाण्यासाठी उचलल्यामुळे त्याचे नाव 'शेयालखाकी[५]' असे ठेवण्यात आले. शेयालखाकी पुढे आमच्या घरीच पाळली पोसली जाऊ लागली. तेच तिचे घर बनले. त्यामुळे मुलामुलींचे ती एक चांगले हालते फिरते खेळणेच बनली. मला तर ती एक आमच्यांतीलच वाटू लागली आणि आज त्या भावाचे मला नवल वाटत आहे. सगळ्याच खेळण्या–बागडण्यात ती आमच्याच बरोबर राही. आम्ही वाडीतील सर्व मुले कधी कधी वनभोजनाला जात असू. तेथेच चूल मांडली जाई. मुली स्वयंपाक करीत, मुलगे होत निमंत्रित ब्राह्मण. आणि आया व वडील स्त्रिया होत पाहुणे. वनभोजनाची जागा वाडी-जवळच असलेल्या जंगलातील निवडली जाई. तेथील साफसफाई केली जाई. प्रत्येक जण आपल्या घरातून लाकडे, गवत, डाळ, तांदूळ वगैरे सामान घेऊन येई. लाकडे तेथीलही जमविली जात. सर्वांना ते वनभोजन फार आनंदाचे व सुखाचे वाटे. शेयालखाकी आमच्याबरोबर सबंध दिवसभर तेथेच असे. भोजनानंतर आम्ही जेव्हा रानात लपंडावाचा खेळ खेळत असू तेव्हा, शेयालखाकीही लपून राहण्याची तत्परता दाखवी. आम्ही तिला शोधून काढीत असू. त्यामुळे ती आमचा एक खेळगडीच आहे असे आम्हा सर्वांना वाटे.

या शेयालखाकीच्या प्रशंसनीय अशा दोन गोष्टी मला आठवतात. एकदा आम्ही काही मुले जमून शेजारच्या पडक्या घरातील पारवे पकडण्याचा बेत केला. त्या पडक्या घराच्या दालनात खूपच पारवे होते. आम्ही मधून मधून घरात शिरून दारे खिडक्या बंद करून पारव्यांना हुसकून लावीत असू आणि पकडूनही नेत असू. पण दारे खिडक्या मोडून त्यात इतकी मोठी भोके पडली होती की, ती बंद

५. बंगालीत कोल्ह्याला शेयाल म्हणतात. शृगालचा अपभ्रंश.

करण्याकरिता साधारणपणे पाच सहा मुलांना घरात शिरावे लागे. दारे व खिडक्या यातील भोंकावर पाठ लावून एकेक मुलगा उभा राही आणि एकजण पारव्यांना हुसकावून लावून पकडी. एके दिवशी आम्हा पाचजणांपैकी चौघे आले, पाचवा आला नाही. मी एका मुलाला शोधू लागलो. इतक्यात शेयालखाकी येताना दिसली. तिला पाहाताच आम्हांला आनंद झाला. वाटले, आता इतर मुले नकोतच. एकटी शेयालखाकीच पुष्कळ काम करील. तिला मी म्हटले, 'शेयाल-खाकी ये ये. आपण पारवे पकडायला जाऊ या' तीही तयार झाली आणि आमच्याबरोबर निघाली. घरात शिरून एकेक मुलगा एकेका भोकाला पाठ लावून उभा राहिला. दरवाजाखाली चौकटीवर एक बीळ होते. मी शेयालखाकीला सांगितले, 'तू या बिळात आपली शेपटी घालून बसून राहा. ही जागा सोडून तू उठायचे नाही.' त्यावेळी तितकेसे आश्चर्य वाटले नाही पण आता तो प्रकार मनात येताच नवल वाटते. ती कुत्री माझे बोलणे कसे समजली देव जाणे! ती आपली शेपटी त्या बिळात घालून स्वतःच्या पाठीने ते बीळ झाकून बसून राहिली. नंतर जेव्हा पारव्यांना हुसकावण्याला आम्ही आरंभ केला, तेव्हा ते तिच्या तोंडा समोरून उडून जाऊ लागले. शेयालखाकीला त्या पारव्यांना पकडण्याचा अगर त्यांच्यामागून धावण्याचा मोह झाला नसेल असे नाही. पण आम्ही जसे भोकांना पाठ लावून स्थिर राहिलो होतो तशीच ती बसल्या जागची हालली नाही. तेथेच हटून राहिली.

आणखी एक तिच्या चातुर्याचा प्रकार घडला तो असा. आमची बुधी नावाची एक गाय होती. तिला राखून आणणारा राखणाही होता. शेयालखाकी पुष्कळदा राखण्याबरोबर गायीच्या पाठून माळावर जात असे आणि सगळा दिवसभर माळावर राहून सायंकाळी गाईबरोबर घरी येई. एकदा बाबा कशावरूनसे राखण्यावर रागावले आणि त्याला दोन चपराका लगावून घालवून दिले. अर्थात् बुधी दाव्यावरच बांधली राहिली. तिला चरायला कोण नेणार! असे एक दोन दिवस गेले. नंतर मी म्हटले, 'बाबा, शेयालखाकीला गायीबरोबर माळावर पाठविले तर ती गायीला माळावरून चरवून आणील.' माझे हे सांगणे ऐकून बाबा हसून म्हणाले, 'काय रे, कुत्री कधी गायीला चारून आणते होय?' शेयाल-खाकीला आई चांगली जाणत होती. तेव्हा माझ्या म्हणण्याला तिने दुजोरा दिला. आणि मग शेयालखाकीबरोबर गायीला माळावर चरण्यासाठी पाठविले. गायीला कसे चरवून आणायचे हे शेयालखाकीला समजावून दिले आणि ती गायीला घेऊन निघाली. पुढे एके दिवशी सायंकाळ होऊन गेली तरी बुधी गाय माळावरून आली नाही. आई आणि बाबा काळजी करू लागले. शेवटी काळोख पडता पडता शेयालखाकी एकटीच ओरडत भुंकत येताना दिसली. बरोबर गाय नव्हती. आल्याबरोबर ती कुत्री आमच्या तोंडाकडे पाहून भुंके, ओरडे आणि

धावत धावत जाऊन दूर उभी राही. असे दोन चारदा झाल्यावर शेवटी बाबांना वाटले, ती आम्हाला आपल्याबरोबर बोलवीत असावी. बाबांनी मला ' आणखी दोन मुलांना बरोबर घेऊन हिच्या मागून जा ' असे सांगितले. लागलीच संवगड्यांना घेऊन तिच्या मागून मी जाऊ लागलो. तेथे पाहिले तो एका इसमाने आमच्या गायीला बांधून ठेविलेले होते. शेयालखाकीला पाहाताच तो म्हणाला, ' अरे, कुत्री पुनः आलेली दिसते. स्वतः मार खाऊन घरच्या लोकांना बोलवून आणले वाटते ! ' या शेयालखाकीप्रमाणे आणखीही अनेकदा अनेक कुत्रे मी पाळले होते.

**माझे पणजोबा**

आता शेवटी सांगावयाचे म्हणजे, माझ्या पणजोबांना मी बालपणी जसे पाहिले होते तसे त्यांचे वर्णन करून या प्रकरणाचा मी उपसंहार करीत आहे. माझी स्मृतिशक्ती ज्या दूरच्या अतीत कालापर्यंत पोचू शकत आहे तेथपासून मी त्यांना अंध, बधिर आणि घराच्या बाहेर जाण्याला असमर्थ असेच पाहात आलो. त्यावेळी त्यांचे वय मला वाटते ९५ वर्षांचे असावे. ते ठेंगू आणि कृश होते त्यामुळे ते एखाद्या लहान मुलाप्रमाणे दिसत. माझी आई तर त्यांचा धार्मिक भाव व साधननिष्ठा पाहून इतकी मुग्ध झाली की, कुलगुरूकडून मंत्रदीक्षा घेण्याचा केलेला संकल्प रद्द करून तिने त्यांच्याकडूनच दीक्षा घेतली. नंतर अंगावरच्या लहान मुलाप्रमाणे त्यांना हाताला धरून त्यांचे पालन पोषण करण्याचे तिचे मुख्य कर्तव्यच होऊन बसले होते. सकाळी उठताच ती गलवस्त्र[६] होऊन त्यांच्या चरणावर आपले मस्तक ठेवी, नंतर लहान मुलाप्रमाणे त्यांच्या अंगावरचे कपडे काढून त्यांना धुतलेले कपडे घाली आणि पूजादि आन्हिकासाठी आसन घालून जवळच तांब्या-ताम्हण, पळीपंचपात्री ठेवी. नंतर तेथे नेऊन त्यांना बसवी. इतके नित्यकर्म आटोपताच तिच्या गृहकृत्यांना आरंभ होत असे. त्यांचे पूजादि आन्हिक आटोपताच मी त्यांचा हात धरून त्यांना नेहेमीच्या बसण्याच्या जागी आसनावर आणून बसवी.

आमच्या घराच्या नैऋत्येला एक लहानशी खोली होती. त्याच्या एका बाजूला ते राहात आणि दुसऱ्या बाजूला देवघर होते म्हणून या सर्व खोलीला देवघर म्हणण्यात येई. त्यात शंकराची एक दगडी मोठी मूर्ती, एक लाकडी पंचानन, स्फटिकाचे एक शिवलिंग, एक शाळिग्राम असे चार देव असत. मला वाटते पणजोबांच्या उद्यापण करण्याच्या वेळी शिळेची शिवमूर्ती स्थापन केली. माझ्या वडलांच्या उद्यापणीच्या वेळी लाकडी पंचाननाच्या मूर्तीची प्रतिष्ठापना झाली आणि दुसरे

६. प्रार्थनेच्या वेळी व आदर व्यक्त करतांना बायका साडीचा पदर आपल्या गळ्यासभोवार ओढून घेतात त्याला गलवस्त्र म्हणतात.

दोन देव कुलपरंपरेने आलेले असावेत. पणजोबांच्या अंगात जोपर्यंत शक्ती होती तोपर्यंत देवघरात जाऊन ते स्वतः देवाची पूजा करीत, पण माझ्या पाहण्यात काही ते देवघरात कधी गेलेले मला दिसले नाहीत. आत्याचा नवरा किंवा दुसरे कोणी पूजा करीत.

माझ्या पणजोबांना स्नानाची फार भीती वाटे. त्यामुळे महिन्यातून फक्त दोनचार वेळच त्यांना स्नान घालण्यात येई. स्नानाची त्यांना इतकी का भीती वाटे ते काही सांगता येत नाही. मस्तकावर किंवा अंगावर पाणी घातले तर 'बापरे, आई ग' असे ओरडून ते आळीतील सगळ्या लोकांना जमवीत. त्यामुळे प्रत्येक दिवशी सकाळीच कपडे बदलून त्यांना संध्यादि आन्हिकाला बसविण्यात येई.

मी चालू-बोलू लागल्यावर त्यांना हाताला धरून खोलीच्या बाहेर नेणे, शौचाला पोचविणे-आणणे, तोंड धुण्यासाठी पाणी देणे, कपडे आणून हातात देणे वगैरे साध्या सोप्या कामाचा भार माझ्यावर सोपविण्यात आला होता. माझ्यावर त्यांचा फार लोभ असल्याचे मागे सांगितलेच आहे. मी त्यांना बारीक कोवळ्या आवाजात 'पो' अशी हाक मारली की त्यांना आनंद वाटे. सर्वांग पुलकित होई. कोणत्या एखाद्या कामासाठी मला हाक मारताना ते 'बाबा बाबा' असे म्हणत. प्रत्येक बाबतीत माझे भलतेच लाड करण्यात त्यांना आनंद वाटे. आईने मला मारले तर मी रडत असे. माझ्या रडण्याचा आवाज जर त्यांना ऐकू आला तर 'बाबा रडतो का ?' असे म्हणत व रागाने त्यांचा तडफडाट होई. आणि याचसाठी आईने मला मारताच मी आपल्या भो करण्याने आकाश-पाताळ एक करून 'पो'च्या सन्निध जाई आणि मग खूप रडत असे.

'पो' अध्यापक होते. घरात बसल्या बसल्या निरोप देण्याघेण्यात आशीर्वादाची देणगी म्हणून त्यांना जे मिळे त्यात सुखाने संसार चालत असे. कधी कधी गावात प्रतिष्ठित गृहस्थाश्रमी लोकांच्या घरी नैमित्तिक असे अनुष्ठानादि काही झाल्यास 'पो'कडे देणगीची डाली येत असे. एका ताटात थोडीफार साखर आणि दहा-बारा संदेश ( मिठाई ) त्याबरोबर एक कळशी किंवा लहान गडवा आणि काही नाणी या सर्वांना 'डाली' असे म्हटले जाते. मी बाहेर खेळता खेळता, डाली आमच्याकडेच आली आहे असे पाहाताच मी त्यांच्या बरोबरच आत जात असे. पणजोबा बाहेरच एका पडवीत बसून जप करण्यात मग्न असत. डाली आणणारे लोक त्यांच्या समोर ती ठेवीत आणि हात धरून प्रत्येक वस्तूला स्पर्श करून दाखवीत. मग त्यांना डाली आली आहे असे समजे. 'कुणाच्या घरातून' असे ते आलेल्या मनुष्याला विचारीत. तो मनुष्य मोठ्या आवाजात त्या पाठविणाऱ्या गृहस्थाचे नाव सांगे. तेव्हा पो मला हाक मारून बोलवीत. मी माझ्या लहानग्या सुकुमार बोटांनी त्यांच्या अंगाला स्पर्श करी. मी मोठ्याने

बोललो तर आई ऐकेल असे मला वाटे. माझ्या तेवढ्या स्पर्शाने बाबा आपल्या-जवळ आहे हे, पो जाणत. रुपये वगैरे आपल्याजवळ ठेवून मला म्हणत, ' हे ताट आणि संदेश आईला नेऊन दे. ' बाबाचा आनंद काय विचारावा ! मी ताट घेऊन एकांतात उभा राही. आणि पुष्कळसे संदेश पोटात गेल्यावर ते ताट घेऊन सैपाकघराच्या दारात जाई आणि म्हणे, ' मित्रांच्या घरून डाली आली आहे. हे त्यातील ताट. ' बोलता बोलता ताट दारातून पुढे सरकवून मागच्या मागे मी दौड देई. आई मग रागारागाने पोजवळ येई आणि खूप बडबडे. म्हणे, मला नाही हाक मारली ती ? तुम्हाला ' बाबा ' मोठा. त्यालाच देता सर्व. सगळे संदेश त्यानेच मटकावले. पणजोबा हे सर्व ऐकून मोठ्याने हो हो करून हसत आणि म्हणत, ' वा. वा. चांगले केले. अग, त्याच्यासाठीच तर सगळे. ' एखाद्या वेळी मी नसलो आणि ते ताट आईच्या हातीच द्यावे लागले तर त्यातील संदेश चाचपून पाहून ते किती आहेत हे ठरविण्याची पोकडून कधी चूक होत नसे. पुढे त्या संदेशांपैकी बरेचसे संदेश आईकडून पोलाच दिले जात. तेव्हा ते रागाने तडफडून म्हणत, ' मला तर सगळेच दिलेस. मग बाबाने काय खाल्ले ? ' खरोखर हे सर्व लिहीत असता आजही माझे डोळे अश्रूंनी भरून येतात ! हाय ! त्यांचा माझ्यावर किती लोभ होता, किती प्रेम होते हे त्यावेळी मला जाणता आले नाही !

आमच्या घरात बहुतेक २।३ मांजरें असत. त्यावेळी त्यात एक अगदी विद्रूप मांजर होते. ते तसे होते म्हणून आई त्याला हनुमान म्हणून हाक मारी. मीही त्याच नावाने त्याला बोलवीत असे. हनू फार चोरटे होते. पोच्या पानातील मासे चोरून खात असे. त्यांना तर दिसतच नव्हते. त्यासाठी प्रथम प्रथम त्यांना जेवायला बसविताना आई त्यांच्या डाव्या हातात एक छडी देऊन जाई आणि सांगे, ' मधून मधून छडीचा आपटून आवाज करा. मांजर येईल. ' पो मधून मधून मांजराला म्हणून छडीचा एक तडाखा देत. तो कुठे बसे ते त्यांना दिसत नसे. एके दिवशी असे दिसून आले की, हनुमान मांजर आपले तोंड लांबवून पोच्या पानातून मासे चोरून खात आहे. आणि पो त्याला उद्देशून छडी मारीत आहेत. हनूच्या पाठीत चपाचप त्या छडीचे आघात बसत आहेत. पण हनूचे तिकडे लक्षच नाही. हे आईने पाहिल्यावर ती मला पोच्या पानाजवळ हातात छडी घेऊन मांजराला हाकविण्यासाठी बसवू लागली. मग मात्र मांजर त्यांच्या पानाजवळ येईनासे झाले. पण पुढे एके दिवशीं असा प्रकार झाला की तो सांगायला जितका हास्यास्पद वाटतो तितकाच लज्जास्पदही ठरतो. त्या दिवशी पोंचे जेवण चालले होते. मी नेहमीप्रमाणे त्यांच्याजवळ बसून होतो. भात, वरण, माशांची आमटी असे एकामागून एक त्यांचे खाऊन झाले. मी ते बसून पाहात होतो. काही विपरीत असा प्रकार घडला नाही. मांजरही आले नाही. पण जेव्हा दही, केळे, संदेश वगैरे मधुर पदार्थांसह त्यांनी

शेवटचा भात कालविला तेव्हा माझे पोटभरू मन काही स्थिर राहू शकले नाही. नकळत स्वतःच्या लहान हाताने मी त्यातील एकेक घास स्वतःच खाऊ लागलो. माझ्या पणजोबांचा नियम होता की, जेवायला बसल्यावर बोलायचे नाही. मौन पाळायचे. हा त्यांचा नियम ते आठ वर्षे वयाचे असल्यापासून १०३ वर्षांचे होई-पर्यंत अव्याहत चालला होता. दुसरा एक नियम असा होता की, जेवताना कुणाचा स्पर्श होता कामा नये. तसा स्पर्श झाल्यास ते पुढे जेवीत नसत. मी माझ्या तोंडात घास घालताना माझा लहानसा हात, बालसुलभ चांचल्याने तोंडाकडे नेताना व पुनः पानातील भात उचलताना दुर्लक्षतेमुळे त्यांच्या हाताला लागला. लागलीच पोंचे सर्वांग शहारले आणि संकेत सूचक ' उं ऊं ' असा त्यांनी मोठ्याने उच्चार केला. याचा अर्थ, ' मला कुणाचा तरी स्पर्श झाला पाहा, ' हाच होता. आईने येऊन पाहिले तो आपल्या अधाशी मुलाचे तोंड व हात दहीभाताने माखलेले! मी लपविणार तरी कसे ? शेवटी आईने पोंच्या कानाजवळ तोंड नेऊन म्हटले, ' आता हू करून काय उपयोग ! हे तुमच्या बाबाचेच काम बरं. त्याला फार लाडा-वून ठेवला आहे ना ! ' आईचे हे शब्द ऐकताच पणजोबा मोठमोठ्याने हसू लागले आणि म्हणाले, ' आहाः छान केलं. आता हे सर्वच खाऊ दे ' आणि मग ते जेवण थांबवून उठले. पण हे आईला सहन झाले नाही. तिने मला माझा गळा दाबून थोबाडीत मारले आणि उचलून नेता नेता म्हटले, ' मांजर हाकवायला बसवले आणि तूच स्वतः मांजर बनलास होय ? '

पणजोबांच्या बाबतीत विशेष सांगायचे म्हणजे अधर्माचरणाबद्दल त्यांना जो तिटकारा वाटे तो मला विसरता येणे शक्य नाही. कुटुंबामध्ये माझी आई वा वडील यांच्या हातून नैतिक व धार्मिक आचरणात विसंगती दिसली अगर त्यांच्या कानापर्यंत पोंचली तर ते स्वतःच्या हाताने आपले थोबाड फोडीत अगर कपाळ बडवून घेत. तो राग त्यांना काही केल्या आवरत नसे. माझी कोणतीही गैर वर्तणूक त्यांच्या कानापर्यंत पोचली तर माझ्या आईला बोलवून मला शासन करायला सांगत. पुढे मागे आळीतील वाईट चालीच्या मुलांत मिसळून आपला पणतू दुर्वर्तनी निघेल अशी त्यांना भीती वाटे. कारण मी असे पाहिले की, कुत्रा अगर वासरू त्यांच्या खोलीसमोरच्या ओट्यावरून गेले तर अस्पष्टसे काही दिसल्या-मुळे ' तो पाहा बाबा बाहेर गेला ' असे ते म्हणत आणि आईला बोलावून मोठा गोंधळ माजवीत. यासाठी पाय वाजू न देता अगर त्यांच्या मागच्या बाजूने अनेकदा मी पळून जाई.

## पणजोबांचे शास्त्रज्ञान आणि संस्कृताबद्दलची आवड

माझे पणजोबा एक उत्तम संस्कृतज्ञ व संस्कृतानुरागी होते. गावातील मोठमोठे पंडित मधून मधून गहन अगर कूट प्रश्नावर शास्त्राधार विचारण्याला

त्यांच्याकडे येत, असे मला आठवते. त्यावेळी मोठ्या आवाजात त्यांना तो प्रश्न समजावून देणे व तशी व्यवस्था करणे हे मोठे अवघड होऊन जाई. वयाच्या मानाने त्यांची स्मृतिशक्ती अजून तीक्ष्ण होती. ती त्यांना सोडून गेली नव्हती. ते प्रश्नाच्या उत्तरात शास्त्रीय वचन स्पष्टपणे सांगून मीमांसा करीत व निकाल देत.

तेवढ्या त्या वृद्ध वयातही ज्ञानालोचनात त्यांना फार आनंद वाटे. त्यांच्या संस्कृत ज्ञानाविषयी दोन उल्लेखनीय गोष्टी मला आठवतात. पहिली अशी :— १८५१ की १८५२ साली आमच्या गावातील शाळेमध्ये संस्कृत शिक्षणाचा वर्ग उघडण्यात आला. आमच्या आसपासचे ज्ञातिबंधूंचे पुष्कळ मुलगे त्यात दाखल झाले आणि आईचा चुलतभाऊ, चांगडीपोता ग्रामनिवासी कैलासचंद्र चक्रवर्ती महाशय यांना त्या स्कूलमध्ये संस्कृत शिक्षक म्हणून नियोजित करण्यात आले. शिक्षकी पत्करल्यावर ते आमचे येथेच राहून शिक्षकाचे काम करू लागले. त्यामुळे संस्कृतकाव्याचा वगैरे विचारविनिमय आणि चर्चा करण्यात माझ्या पणजोबांना त्यांचे सहाय्य होऊ लागले व योग्य संगतीचा लाभही मिळाला. सकाळच्या वेळी गावातील कित्येक ब्राह्मण तरुण त्यांच्याकडे अध्ययनासाठी येत. ते काय शिकत आहेत हे त्यांच्या तोंडून ऐकल्यावर माझ्या पणजोबांना अतिशय आनंद वाटे. मी कलकत्त्याहून गावातील घरी येताच मला आढळे की, माझे पणजोबा कैलासमामाला कोणत्या तरी एका संस्कृत श्लोकाचे तीन चरण सांगून चौथा चरण कोणता असे विचारीत असायचे आणि कैलासमामा अतिशय आश्चर्याने माझ्या आईला म्हणायचे, ' दिदी, हे सगळे श्लोक अजून यांना मुखोद्गत आहेत हे पाहून मला नवल वाटते. यांच्या स्मरणशक्तीचे कौतुक करावे तितके थोडेच.'

दुसरी घटना थोडीशी हास्यजनक आहे.

### ' राम ' या शब्दाला ' टा[७] ' प्रत्यय लावल्याने काय होते ?

मी जेव्हा १८५६ साली कलकत्त्याला येऊन संस्कृत कॉलेजात दाखल झालो, तेव्हा विद्यासागर महाशय तेथील मुख्य होते. तेच सर्वाधिकारी. त्यांनी त्यापूर्वी मुग्धबोध व्याकरण शिकविण्याचे बंद करून खालच्या वर्गात स्वतः लिहिलेले ' उपक्रमणिका ' नावाचे पुस्तक सुरू केले होते. आम्ही उपक्रमणिका पुस्तकाप्रमाणे संस्कृत शिकण्याला आरंभ केला. त्यानंतर उन्हाळ्याच्या सुटीत घरी आलो असता, मी संस्कृत कॉलेजात शिकू लागल्याचे ऐकून माझ्या पणजोबांना अतिशय आनंद झाला. एके दिवशी संध्याकाळच्या वेळी मला जवळ

७. बंगालीत ' टा ' हा निर्देशक प्रत्यय आहे. १ संख्या किंवा परिमाण दर्शक, २ व्यक्ति विषय किंवा वस्तुदर्शक, ३ अपमान, तिरस्कार व्यक्त करणारा असा हा प्रत्यय आहे.

बसवून त्यांनी विचारले,' बाबा, राम शब्दाला टा प्रत्यय लावल्याने काय होते ? ' मी बालसुलभ आवाजात मोठ्याने सांगितले ' राम ' शब्दाला आणखी ' टा ' जोडल्याने ' रामटा ' असा उच्चार होतो. ' तेव्हा ते रागावून म्हणाले, ' भिकेची लक्षणं दिसताहेत ! ' राम शब्दाचे तृतीयेचे एकवचन काय होते असे विचारले असते तर मी ' रामेण ' असे सांगितले असते. पण मी तर मुग्धबोध व्याकरण शिकत नव्हतो. अर्थात् राम शब्दाला टा जोडल्याने काय होते हा प्रश्नच मला समजला नाही. यासंबंधाने बाबांचे आणि पणजोबांचे बोलणे झाले. तेव्हा बाबांनी सगळा प्रकार समजावून दिला. पण संस्कृत व्याकरण मी शिकत नाही हे ऐकून त्यांना फार खेद वाटला.

बाबांच्या तोंडून मी ऐकत होतो की, पणजोबांच्या वेळी कलाप व्याकरण शिकण्याची पद्धत होती आणि त्याप्रमाणे त्यांनी आपल्या तारुण्यात कलाप व्याकरणातून अभ्यास केला होता. पण माझ्या वडलांच्या अभ्यासकालात मुग्धबोध व्याकरण शिकविण्याची पद्धत सुरू झाली होती. त्यानुसार पणजोबांना मी मुग्धबोध व्याकरणाचा अभ्यास करीत आहे असे वाटले असावे. आणि म्हणून त्यांनी मला ' राम ' शब्दाला ' टा ' जोडल्याने काय होते ? असा प्रश्न विचारला असावा.

पणजोबा महाशय माझ्या आईचे मंत्रदीक्षा देणारे गुरू होते. त्यामुळे वेळोवेळी आईला बोलावून कोणत्या ठिकाणी काय करावे, त्यासंबंधाने आपले कर्तव्य काय, याविषयी ते तिला उपदेश करीत. हा सगळा त्यांनी केलेला उपदेश माझ्या आईच्या अन्तःकरणात इतका दृढ ठसून गेला होता की, तिने आपले सगळे आयुष्य या गुरूपदेशाप्रमाणे वागण्यात घालविले. एक रेसभरही ती इकडे किंवा तिकडे सरकली नाही, असे म्हटले तर ती अतिशयोक्ती होणार नाही. त्यांनी माझ्या आईला, विवाहित हिंदू स्त्रीने कसे वागावे, या बाबतीत जे मार्गदर्शन केले होते, त्याप्रमाणे ती अगदी तंतोतंत अखेरपर्यंत वागली.

माझ्या लहानपणी माझ्या आईचे व पणजोबांचे जे धर्माचरण मी पाहिले होते व धार्मिक भावना जाणल्या होत्या त्या विसरण्यासारख्या नव्हत्या. मी रोगमुक्त व्हावे म्हणून आईने आपल्या इष्ट देवतेला केलेल्या नवसाबद्दल, तो बिनचूक फेडल्याबद्दल मी पूर्वी सांगितलेच आहे; पण तेवढेच नव्हे तर धर्मसाधन हे तिचे नित्याचे मुख्य कर्तव्य होऊन बसले होते. ती दररोज पार्थिव लिंगार्चन करी. पार्थिव शिवलिंग करून ते पुजायचे व विसर्जन करायचे हा तिचा नित्यनियम होता. त्या पूजेत ती बराच वेळ घालवी. देवाला नैवेद्य दाखविल्यावाचून ती कुणालाच जेवायला वाढीत नसे. नित्यनियमित धार्मिकतेखेरीज नैमित्तिक व्रतोपवासादि ती करीतच असे. प्रत्येक दिवशी देवपूजा झाल्यावर देवावरचे फूल आणून माझ्या मस्तकावर ठेवी आणि स्वतःची पायधूळ माझ्या मस्तकाला लावून मला आशीर्वाद देई.

माझ्या पणजोबांची धार्मिक वृत्ती चिरस्मरणीय होऊन राहिली आहे. ते एक श्रद्धाळू भक्त आणि शक्तिसाधक होते. ते आपल्या इष्टदेवतेला नेहमी ' दयामयी मा ' म्हणून स्मरण करीत असत. त्यांनी आपल्या तरुणपणी जन्मलेल्या दोन मुलींची नावे दयामयी व करुणामयी अशी ठेविली होती. या मुली बालपणीच वारल्या. या दोन मुलींची त्यांना फारच आठवण येई. आणि आठवणीचे प्रमाण हेच की, दयामयी व करुणामयीच्या मृत्यूनंतर सुमारे साठ वर्षांनी माझी पहिली बहीण उन्मादिनी जन्माला आली, तेव्हा दयामयीच पुन्हा जन्माला आली असे त्यांना वाटले आणि मग तेच नाव तिला ठेवले. ते तिला त्याच नावाने हाक मारीत.

जपतप पूजादि उपासना कृत्यात ते रोज सकाळी दीड एक तास घालवीत. पहिला एक तास देव-देवीपूजनात व जप करण्यात जाई. त्यानंतर सुमारे अर्धा तास पितरांच्या तर्पणात जात असे. पुढे आणखी अर्धा तास जमिनीवर कपाळ ठेवून इष्टदेवतांच्या उद्देशाने प्रार्थना व प्रणाम करण्यात जात असे. अशा प्रकारे नित्य जमिनीवर कपाळ टेकीत गेल्यामुळे त्यांच्या भालप्रदेशावर आवाळूप्रमाणे मांसाची एक गोळी उत्पन्न झाली होती. कपाळ आपटून जेव्हा ते प्रार्थना करीत तेव्हा माझी आई कधी कधी कान लावून ऐके. एके दिवशी तिने ऐकले की, ते तोंडा-तल्या तोंडात बंगाली भाषेत कलकत्त्याला असलेल्या माझ्या वडलांसंबंधी प्रार्थना म्हणत आहेत. ते शब्द असे, ' मा दयामयी, तो परमुलखात राहात आहे. त्याचे रक्षण कर. तो कुणाचे काही ऐकत नाही. त्याला सुबुद्धी दे '. इत्यादि. शेवटी उभे राहून टाळ्या वाजवीत ते नाचत असत. नाचताना मला हाक मारली जाई. ' बाबा ! ' मी त्यावेळी नागडा-उघडा बालक. खेळण्यात गुंतलेला असायचा. आई मला तेथून उचलून आणी आणि पणजोबांच्या हातात माझा हात देऊन नाचायला सांगे. अशा प्रकारे आम्ही दोघे एकमेकांचे हात धरून नाचत असू. ते नाचताना तीनशे पासष्ट दिवस एकच गाणे म्हणत. त्यातील दोन चरण मला आठवतात–

' दुर्गा दुर्गा बल भाई
दुर्गा बई आर गति नाई '

( दुर्गा दुर्गा म्हणा भाई, दुर्गेशिवाय गती नाही. )

माझ्या धर्मशिक्षणाकडे लक्ष ठेवण्यासंबंधाने आईने यांना विनंती केली होती. त्यामुळे सकाळीच मला घेऊन ते नाचत आणि रोज संध्याकाळी सायंसंध्या झाल्यावर स्वतःच्या बिछान्यावर उपरणे पांघरून बसत. नंतर मला ते त्या पांघरुणात घेत आणि धर्मासंबंधाने उपदेश करीत. देवतांची स्तुतिस्तोत्रे शिकवीत

तसेच प्रश्नोत्तररूपाने आवश्यक अशा सर्व गोष्टींची माहिती देत. जसे 'पणजोबांचे नाव काय,' असे विचारून उत्तर देताना म्हणत, 'बोल. श्रीराम जय न्यायालंकार.' मी आपल्या कोमल आवाजात म्हणे, 'श्रीरामजय न्याया-लंकार.' वगैरे. नंतर स्तोत्रे स्वतः म्हणत आणि माझ्याकडून म्हणवून देत. ती सर्वच मला आता आठवत नाहीत. एक आठवते ते असे—

सर्वमंगलमांगल्ये, शिवे सर्वार्थसाधिके।
शरण्ये त्र्यंबके गौरी नारायणि नमोऽस्तु ते।

त्यावेळचा आणखी एक श्लोक माझ्या स्मरणात आहे. त्याची आठवण झाली म्हणजे क्षोभमिश्रित विस्मय वाटतो. मनात येते, आमच्या घरात अगदी थोड्या कालात केवढे मोठे परिवर्तन घडून आले! माझे पणजोबा इतर काही प्रश्नांबरोबरच एक प्रश्न विचारीत, 'बाबा, तुमची जात कोणती?' नंतर तेच म्हणत, 'बोल, आम्ही ब्राह्मण.' दुसरा प्रश्न, 'कोणत्या शाखेचे ब्राह्मण?' तेच सांगत, 'दाक्षिणात्य वैदिक शाखेचे ब्राह्मण.' पुन्हा प्रश्न, 'तुम्ही किती दिवस ब्राह्मण राहाल?' उत्तर—

यावन्मेरौ स्थिता देवा, यावद् गंगा महीतले।
चन्द्रार्कौ गगने यावत् तावद्विप्रकुले वयम्॥

म्हणजे, जोपर्यंत देवगण मेरूपर्वतावर आहेत, गंगा जोपर्यंत पृथ्वीवर आहे, चंद्र-सूर्य जोपर्यंत आकाशात आहेत तोपर्यंत आम्ही विप्रकुळात आहो. त्यांनी काय विचार केला होता आणि माझी मजल कुठपर्यंत गेली आहे, असा विचार आता माझ्या मनात येतो.

मी तापाने आजारी पडलो अगर दुसऱ्या कसल्या आजाराने रुग्णायित झालो तर माझी आई मला सायंकाळच्या वेळी त्यांच्या मांडीवर नेऊन बसवी आणि आजाराबद्दल सांगे. त्यानंतर ते माझ्या अंगावरून हात फिरवून झाडायला[८] सुरवात करीत. सर्वांगावर फुंकर घालीत. आणि तोंडातल्या तोंडात इष्ट देवतेचे वारंवार स्तवन करीत. यात सांगायचे आश्चर्य म्हणजे या त्यांच्या झाडण्याने अनेकदा माझा आजार निघून जाई. यामुळे तापाने माझी तगमग होऊ लागली की, मी 'मला पोंजवळ घेऊन जा' असे म्हणून रडत असे.

या सिद्ध-साधुपुरुषाची स्मृती आमच्या परिवारात जिवंत राहिली आहे. त्यांच्या वापरण्यातील ज्या काही वस्तू होत्या त्या त्यांचे स्मृतिचिन्ह म्हणून जपून ठेवण्यात आल्या आहेत. ते सर्वांकडेच पवित्र नजरेने पाहात. विशेष सांगायचे म्हणजे असे, मी पुढे ब्राह्मसमाजिष्ट झाल्यावर यज्ञोपवीताचा त्याग केला. त्यानंतर

८. मंत्र इत्यादीच्या जोरावर भुताला पळवून लावणे, याला झाडणे म्हणतात.

मला एकदा, क्षयरोग झाल्याचे जाणवले. त्यावेळी माझ्या सेवाशुश्रुषेसाठी काही महिने कलकत्याला माझी आई येऊन राहिली होती. तिने येताना माझ्या परमपूज्य 'पों'ची– पणजोबांची-काठी, योगपट्ट ( आसन ) आणि जपाची माळ आणून ती माझ्या बिछान्यावर ठेविली होती. या पवित्र वस्तूंच्या स्पर्शाने व सान्निध्याने माझा मुलगा निरोगी होईल अशी तिची श्रद्धा होती. या वस्तु तीन महिनेपर्यंत माझ्या बिछान्यावरून तिने हालवू दिल्या नाहीत. पुढे इहलोक सोडताना तिने 'पों'ची जपाची माळ माझ्या बहिणीला आणि त्यांचा जेवणाचा वाडगा मला दिला. मी रोज तो वापरतो.

मी आणखी जास्त काय सांगू! पुष्कळ वर्षे होऊन गेली त्या गोष्टींना. पुष्कळ माणसे पाहिली, स्वतः अनेक चुका केल्या, हातून प्रमादही घडले; पण ज्या ज्या वेळी त्या साधुपुरुषाची व त्याच्या त्या धर्मनिष्ठेची मला आठवण होते त्या त्या वेळी स्वतःचे दौर्बल्य, मानसिक दुबळेपणा जाणवला म्हणजे लाजेने मी ओशाळून जातो. पुष्कळ वर्षांनंतर आई जेव्हा रडत रडत मला म्हणे, 'हाय रे दैवा, अशा त्या साधुपुरुषाचे ते सगळे आशीर्वाद काय व्यर्थच गेले!' हे तिचे उद्गार ऐकताच माझ्याही डोळ्यांतून अश्रू वाहू लागत. मनात म्हणत असे, 'हाय, ते आपल्या इष्ट देवतेला जसे 'मा' म्हणून करुणस्वराने हाक मारीत, तसे मी ईश्वराला का बरे आळवू शकत नाही!'

हळूहळू मी नऊ वर्षांचा झालो. त्या वर्षी माझे उपनयन झाले. उपनयन झाल्यावर मला संध्या, आन्हिक वगैरे शिकविण्याला 'पों'नी आरंभ केला आणि स्वतःजवळ बसवून रोज माझ्याकडून संध्या करून घेऊ लागले.

### मी कलकत्त्याला निघालो

यानंतर थोड्याच दिवसांत बाबांनी मला कलकत्त्याला आणले. त्या दिवसाचा तो प्रसंग मला विसरता येणार नाही. मी विसरणे शक्य नाही. मी आईचा एकुलता एक मुलगा! वासरू घेऊन गेल्यावर गाय जशी करुणवाणी हंबरते तशी त्या दिवशी माझी आई हुंदके देऊन रडू लागली. बाबांबरोबर मी निघालो. वाटेत तिला रडे कोसळले. ते आक्रन्दन मी कधीच विसरणार नाही. उन्मादिनी चिंतादासीबरोबर शालती घाटापर्यंत मला पोचविण्यासाठी आली होती. शेवटी जेव्हा ती माझ्या गळ्याला मिठी मारून 'पागूगा दादा, ( पागला दादा ) माझ्यासाठी बाहुली आण वरं!' असं म्हणाली तेव्हा तर माझे रडे मला काही केल्या आवरेना.' ती निघून गेल्यावर मला वाटले, माझ्या छातीचे हाडच काढून घेऊन गेली ती! आणि मग पुढचा प्रवास रडत रडतच सुरू झाला. वडील बरोबर होतेच.

* * *

. ३.

# कलकत्त्यातील विद्यार्थीजीवन

## विद्यासागरांचे संस्कृत कॉलेज

१८५६ च्या आषाढ महिन्यात बाबांनी मला कलकत्त्याला आणले. त्यांची इच्छा होती की, मला डेव्हिड हेअरच्या स्कूलमध्ये दाखल करून इंग्रजी शिकवावे. कारण स्वतः इतके दिवस संस्कृत शिकून आणि कॉलेजांतून प्रशंसनीय पदवी घेऊन बाहेर पडले तरी त्यांना २५ रुपयांपेक्षा काही जास्त वेतन मिळू शकले नाही. अर्थात् त्यांची खात्री झाली, की इंग्रजी भाषा शिकल्याशिवाय चांगल्या मोठ्या पगाराचे कामकाज काही मिळणार नाही. पण आर्थिक परिस्थितीमुळे ते मला इंग्रजीस्कूलमध्ये दाखल करू शकले नाहीत. ते त्यावेळी वर्धमान जिल्ह्यात आमदपूर येथे पंडित होऊन कलकत्ता बंगाली पाठशाळेत २५ रुपये पगारावर काम करीत. अर्थात् मुलाला उत्तम प्रकारे इंग्रजी शिकविण्याची त्यांची इच्छा सोडून देणे त्यांना भाग पडले.

केवळ इतकेच नव्हे तर हेअरस्कूलमध्ये मला दाखल करता न येण्याचे आणखीही एक कारण घडले. ईश्वरचंद्र विद्यासागर महाशय हे त्यावेळी संस्कृत कॉलेजचे अध्यक्ष होते. याच कॉलेजात माझे मामा द्वारकानाथ विद्याभूषण हे अध्यापक होते. विद्यासागर महाशय हे माझ्या मामांचे सहाध्यायी मित्र. त्यामुळे आठवड्यातून तीनचारदा ते आमच्या घरीही ( आजोळी ) येत आणि मी जवळ दिसताच माझे पोट आपल्या दोन बोटांच्या चिमटीने दाबीत. अर्थात् विद्यासागर आल्याचे कळताच मी त्यांच्या दृष्टीबाहेर पळून जात असे. असो. मी कलकत्त्याला शिकण्यासाठी गेलो तेव्हा विद्यासागर महाशयांनी त्या कॉलेजात इंग्रजी शिक्षण देण्याला आरंभ केला होता. त्यामुळे मला हेअरस्कूलमध्ये न घालता या आपल्या कॉलेजात पाठवा असे ते बाबांना म्हणाले. त्यामुळे मला संस्कृत कॉलेजात भरती व्हावे लागले.

माझ्या आईंचे वडील हरचंद्र न्यायरत्न महाशय हे त्यावेळी आजारीपणामुळे आपल्या गावी घरी राहात होते. मी कलकत्त्याला आल्यावर चांपातलातील सिद्धेश्वरचंद्र लेनच्या जवळ ' महाप्रभु वाडा ' नावाने प्रसिद्ध असलेल्या एका घरात मामांच्या बिऱ्हाडी राहात असे. या वाड्याच्या बाहेर खालच्या मजल्यावर चैतन्य आणि नित्यानंद या दोघांच्या ( वैष्णवसांप्रदायी सत्पुरुषांच्या ) भव्य लाकडी मूर्ती होत्या. हरेकृष्ण बाबाजी नावाचे एक बावाजी या वाडीचे मालक आणि या दोन मूर्तींची सेवा करणारे होते. त्या वाड्यांतील एका खोलीत एक चित्रकार राहात असे. तो प्रतिष्ठित अशा बऱ्या लोकांची चित्रे रंगवीत असे. त्याच्या खोलीत पुष्कळच सुंदर सुरेख चित्रे टांगलेली असत. मी शाळेमधून आल्यावर त्याच्या त्या खोलीत बराच वेळ राहात असे आणि लक्षपूर्वक पण मुग्ध होऊन त्या चित्रांचे निरीक्षण करीत असे. त्यावेळेपासून मला लागलेला हा चित्रे पाहण्याचा नाद अजून काही बंद झाला नाही. उत्तमोत्तम चित्रांच्या संग्रहालयात मला राहू दिल्यास भूकतहान विसरून मी तासच्या तास राहू शकेन.

आम्ही त्या घरात वरच्या मजल्यावर राहात होतो. तेथे एका बाजूला माझ्या मामाच्या गावची काही प्रतिष्ठित मंडळीही राहात असत. ते माझ्यावर फार प्रेम करीत. त्या मंडळींच्या आसमंतात कधीच एखाद्याही स्त्रीचे तोंड दिसत नसे. आप्त, नातेवाईक व आपल्या गावचे अशा अनेक तरुणांची राहण्याजेवण्याची व्यवस्था मामाच करी. एकेक मनुष्य असा भव्य भयंकर दिसे की मला त्याची भीतीच वाटे. त्यांतील कोणी दीड मापट्याचा तर कोणी दोन मापट्यांचा भात खाऊन उठे. कोणी कामकाज करी तर एखाददुसरा रिकामपणातच सारा वेळ घालवी. माझ्या बाबांनी दशकुमार चरित्रातून काही नावे निवडून काढून ती या मंडळींतील काहींना ओळखण्यासाठी म्हणून दिली होती. कुणाचे नाव ' दर्पसार ' तर कुणाचे ' दर्पनारायण ' तर कुणाचे ' चंडवर्मा ' आणि या नवीन नावांनीच ते त्यांना हाक मारीत. इतकेच काय पण प्रत्येकाच्या भोजनपात्राच्या ( ते दगडी असे ) मागील बाजूस, कोण किती माप भात खातो हे पण बाबांनी, न्हाव्याच्या नखे काढण्याच्या शस्त्रानें कोरून ठेविले होते. तांब्या, ताट, वाटी मधून मधून चोरीला जात, यासाठी माझ्या आजोबांनी ( आईचे वडील ) दगडी भांडीच त्यांना घेऊन दिली होती. जास्त माणसे आली तर शालवृक्षांची मोठीं पाने त्यांच्यासाठी विकत आणली जात. मी आल्यावर मलाही एक कोरीव दगडी पात्र देण्यात आले. प्रत्येकाला आपापले भांडे घासून पुसून स्वच्छ ठेवावे लागे.

## खोलीत वास्तव्य करणारी मंडळी

पुरुष पुरुषाबरोबर एकत्रित राहू लागले म्हणजे त्यांची जी एकमेकात दिलखुलास भाषणे व गप्पाटप्पा होतात त्यात संकोच मर्यादा वगैरे काही असत

नाही. केवळ मनःपूत मौजमजा चालते. मी तेथे असताही त्यांच्या त्या गप्पा अगदी स्वैरपणाने चालत. माझे बाबा तेथे असले म्हणजे या अनर्गल बडबडण्याबद्दल त्यांच्यावर रागावत. केव्हा केव्हा मला तेथून घालवून देत. प्रौढ मंडळीत नेहमी माझे वास्तव्य होत असल्यामुळे व त्यांची ती न ऐकण्यासारखी अश्लील ग्रामीण चर्चा ऐकल्यामुळे माझ्या मनावर किती अनिष्ट परिणाम झाला याची मला त्यावेळी कल्पनाच आली नाही. पण आता मला तो जाणवतो. त्या चर्चेमुळे माझ्यात अकाली प्रौढत्व आले होते. गावच्या लोकांनी माझे ' शिबेजेठा ' असे नाव ठेविले होते. मी अल्पवयी असूनही माझ्याहून मोठ्या वयाच्या मंडळीशी कसा फाजिलपणा करीत असे ते आता आठवले की माझी मलाच लाज वाटते. शिवाय या वयोज्येष्ठ माणसांनी मला भलभलत्या वाईट गोष्टी शिकविल्या होत्या. त्यांची अनिष्टता मला भावी जीवनात चांगलीच जाणवली. भोगावी लागली. या असल्या प्रौढ मडळींत राहणे व अभद्र भाषण चर्चा करण्यात आनंद मानणे यामुळे माझ्यावर दुसरा असा एक अनिष्ट परिणाम झाला की, माझी चालचालणूक, बोलणेचालणे यात जो प्रतिष्ठितपणा आणि सौजन्य यायला पाहिजे होते त्याचा अभाव भासू लागला. मित्र मंडळी मला आत्यंतिक स्नेहाच्या नजरेने पाहात असल्यामुळे माझे ते असौजन्य ते सांभाळून घेत, रागवत नसत इतकेच. पण मला वेळोवेळी जणवत असे की, माझे बोलणे व आचारविचार, सभ्यतेची मर्यादा उल्लंघन करून होत आहेत. फार काय, ज्या स्त्रियांबद्दल मला अतिशय आपुलकी व श्रद्धा वाटे, पूज्यभाव असे त्यांच्याशी बोलण्यातही माझे यथोचित सौजन्य व्यक्त होत नसे. एक प्रकारचे अमर्याद वर्तन होई. मला हे सर्व मागाहून कळे पण त्याचा उपयोग काय !

या हरेकृष्ण बाबाजीच्या घरातील स्मरणीय विषयात आणखी एका गोष्टीची भर घालता येईल. त्यावेळी कलकत्त्यात राहायला आलेल्याला प्रथम बरेचसे आजारीपण सहन करावे लागे. कारण तेथील परिस्थितीच तशी होती. मीही प्रथम आलो तो जबर तापाच्या आजाराने दोन एक महिने पछाडला गेलो. गावी आईला ही हकीगत मी कळविली नाही. या तापाच्या आजाराच्या बाबतीत मला इतकेच आठवते की, मला एका मोडक्या रथाच्या अगदी वरच्या जागी बसवून उकळत्या पाण्याचा वाफारा देण्यात आला होता. त्या काळी वाफारा देऊन ताप उतरविणे आणि डोकेदुखी सुरू झाल्यास जळवा लावण्याची वैद्यकीय पद्धती होती.

## मी बहिरा नव्हतो

याच वेळची आणखी एक घटना मला आठवते. बहुधा यावेळीच ती घडली असावी. माझे बाबा त्यावेळी मला ' बहिऱ्या ' अशी हाक मारीत असत. त्याचे कारण असे, मी एखाद्या कामात गढून गेलेला असताना मला 'हा' करून तोंड उघडे ठेवण्याची सवय असे. त्यामुळे मागाहून कुणी हाक मारली तर मला

ऐकू येत नसे. बाबा अशा वेळी मला अनेकदा हाक मारीत आणि मी ओ म्हटली नाही की रागावून येऊन मला मारीत. त्यांची अशी खात्री होत चालली होती की, मी बहिरा होत आहे. शिवाय अशी त्यांची समजूत व्हायला कारणही होते. मी लहान असताना मधून मधून माझा कान वाहात असे. ते काही असले तरी बाबांनी मला बहिरा आहे असे समजून त्याची परीक्षा करण्यासाठी कलकत्त्याच्या मेडिकल कॉलेजात आऊट-डोअर पेशन्ट म्हणून नेले. त्यावेळी डॉ. गुडीव्ह चक्रवर्ती हे आऊटडोअरचे डॉक्टर म्हणून बसत. त्यांनी माझी परीक्षा करण्याच्या उद्देशाने मला म्हटले, ' मुला, तू माझ्याकडे पाठ करून उभा राहा बरे! ' लागलीच मी त्यांच्याकडे पाठ करून उभा राहिलो. नंतर एक चावीचा गुच्छ माझ्या मागे जमिनीवर टाकून मला विचारले, ' तुला काही ऐकू आले का! ' मी उत्तर दिले, चावीचा गुच्छ खाली पडला. तेव्हा बाबांकडे पाहून ते हसून म्हणाले, ' हा मुलगा काही बहिरा नाही. ' पण बाबांची काही तेवढ्याने खात्री झाली नाही. त्यांनी मला घरी आणून कोणत्याशा डॉक्टरांच्या सल्ल्याने माझा कान पिचकारी मारून तर धुतलाच आणि न्हाव्याला बोलवून कान स्वच्छ करून घेण्याला सुरवात केली. मला त्यामुळे फार त्रास होऊ लागला. महिन्या महिन्याला न्हाव्याला बोलवून माझा कान धुण्यात येई व मळ काढला जाई. हे असले कान-मैला साफ करणारे न्हावी, हवेलीवाल्या बऱ्या लोकांप्रमाणे अंगात बनियन व डोक्याला फेटा बाधून रस्तोरस्ती फिरत. न्हावी आला की, एखादा कारकूनच आलासा वाटे. असल्या न्हाव्यांमुळे मन एकाच विषयात मग्न होऊन जाणाऱ्या मला, पुष्कळच त्रास सोसावा लागला.

## शिपायांचे बंड

हरेकृष्ण बाबाजीच्या वाड्यातील माझे वास्तव्य थोड्याच दिवसांत संपले. मामासाहेब, सिद्धेश्वरचंद्र लेनमधील एका घरात राहायला गेले आणि बाबा मला घेऊन बहुबाजारातील जेलियावाडीतील गल्लीत एक जागा घेऊन राहू लागले. या ठिकाणी राहणारी सर्व पुरुषमंडळी होती. ही मंडळी कामावरून आली की पान-तंबाकू खाण्यासाठी बसून विश्रांती घेत. खूप गप्पागोष्टी करीत आणि मग हळूहळू आपापल्या सैंपाकाच्या कामाला लागत. मी एक लहान मुलगा आहे, याला लवकर जेवण मिळाले पाहिजे हे कुणाच्या ध्यानातच येत नसे. या सर्वांचा सैपाक होईपर्यंत रात्रीचे नऊ साडेनऊ होत. तेथपर्यंत मला जागे राहता येत नसे. हातात अभ्यासासाठी घेतलेल्या पुस्तकासह मी झोपी जात असे. जेवणाच्या वेळी सगळी मला ओढाताण करून उठविण्याचा प्रयत्न करीत; पण मला काही जाग येत नसे. शेवटी बाबा मला मारीत तेव्हा मी जागा होई आणि रडत रडत जेवी. त्याच जागेत हरिनाभी येथील रामगती चक्रवर्ति नावाचे एक वृद्ध ब्राह्मण राहात असत. नात्याने ते माझ्या आईचे चुलते लागत आणि त्या निमित्ताने मी त्यांना दादामहाशय म्हणत असे. ते माझ्यावर फार माया

करीत. माझ्या बाबांनी मला मारायला हात उगारला तर ते मला आपल्याजवळ ओढून घेत आणि माझा बचाव करीत. इतकेच नव्हे तर त्या बाबतीत ते बाबांना बोलतही. या सर्व कारणांनी मी त्यांना ते माझे राखणदार आहेत असे मानीत असे.

जेलियापाड्यातील घरात असताना १८५७ सालचे शिपायांचे बंड झाले. आणि आमचे कॉलेज पटलडांग्याहून स्थलांतरित होऊन बहुबाजार रोडवरील तीन खोल्यांत आले. बंड थांबले तरी याच तीन खोल्यांत कॉलेज काही काळ राहिले. नंतर ते स्वतःच्या जागेत गेले.

## कलकत्त्यातील पहिला विधवाविवाह

याच संधीला अधिकारी पक्षाशी मतभेद होऊन विद्यासागर महाशय यांनी कॉलेजच्या अध्यक्षपदाचा राजीनामा दिला. माझ्या पोटाला ते चिमटे घेत असत; त्यामुळे त्या भीतीने त्यांच्यापासून मी दूरदूरच राहात असे; तरीपण त्यांच्यावर निष्कपटतेने माझी श्रद्धाभक्ती होतीच. त्यावेळचे ते आमचे एक आदर्शपुरुष होते. १८५६ सालअखेर पहिला विधवाविवाह करण्यात आला. त्यावेळी बिन्हाडातील मंडळींसह तो विवाह पाहण्याला मी गेलो होतो. किती गर्दी होती ती! सुकिया स्ट्रीटवरील राजकृष्ण बंदोपाध्याय यांच्या घरी हा विवाह झाला. विधवाविवाह कायदेशीर होतो की नाही या बाबतीत आमच्या बिन्हाडी नेहमी चर्चा होई. बिन्हाडी असलेले बहुतेक या संस्काराचे पक्षपातीच होते. अर्थात मला समजू लागल्यापासून मीही त्याच पक्षाचा अभिमानी बनलो हे सांगावयास नकोच. विद्यासागर महाशय जेव्हा कॉलेज सोडून निघून गेले तेव्हा आम्ही विद्यार्थीही फार दुःखित झालो.

पुढे त्या कॉलेजात त्यांच्या जागी ई. बी. कौएल साहेब आले. ते साधुत्वाची मूर्तीच होते. सर्वांच्या तोंडून त्यांची प्रशंसाच मी ऐकत असे. त्यांची आम्हा सर्व विद्यार्थ्यांवर फार ममता असे. आम्हांला निरनिराळे खेळ खेळताना पाहून त्यांना फार आनंद वाटे.

## कौएल साहेबांची आठवण

त्यांच्या विषयीची त्यावेळची एक घटना आठवते. एके दिवशी आमच्या वर्गातील मुलांनी एका लहानशा लाकडी शिडीसाठी दुसऱ्या एका वर्गातील मुलाशी एकच्या सुटीत भयंकर भांडण केले. मी त्यावेळी खेळात गुंतलो होतो. क्लासातील मुलांनी मारामारीसाठी मला धरून नेले. शिडीची ओढाताण करणाऱ्या मुलांपैकी त्यांच्या बाजूचा मी एक होतो. त्यामुळे ठोसे मारण्याऐवजी ठोसे खाणेच माझ्या नशिबी आले होते. मधल्या सुटीनंतर सर्व मुले क्लासात येताच या मारामारीची चौकशी सुरू झाली. कौएल साहेब मोठ्या बंगल्यातून तपास करण्यासाठी म्हणून

आले. ते क्लासात उभे राहून जेव्हा धीरगंभीर स्वराने म्हणाले, ' या मारामारीत कोण कोण होते, ते उठून उभे राहा. ' तेव्हा मी कांकू करू लागलो. शेवटी साहेब म्हणाले. 'तर मग मी असे समजू काय की तुमच्यापैकी कोणीच मारामारीला गेला नव्हता? जे कोणी गेले असतील त्यांनी उठून उभे राहावे. ' मला मग उभे राहिल्या-वाचून चैन पडेना, मी उठून उभा राहिलो. साहेबांनी मला विचारले, ' तू एकटाच त्या दंग्यात गेला होतास ? ' मी उत्तर दिले, ' क्लासातील सगळेच गेले होते. ' नंतर साहेबांनी क्लासातील सर्वच मुलांना दोन दोन रुपये दंड केला आणि मला आपल्या गाडीत बसवून बंगल्यावर नेले आणि म्हटले, ' तू खरे बोललास म्हणून तुला क्षमा केली आहे. पण तू दंग्यात सामील झालास हे बरे केले नाहीस. ' आणखीही बराचसा मला त्यांनी चांगला उपदेश केला. शेवटी त्यांनी माझ्या मस्तकावर हात ठेवून मला म्हटले, ' तू फार चांगला मुलगा आहेस. तुझी वागणूक पाहून मला फार समाधान वाटले. ' त्यांचे ते बोलणे ऐकून ' चांगला मुलगा ' होण्याची मला इतकी प्रबल इच्छा झाली की ते मला बोलून दाखविता येईना.

सांगावयाचे म्हणजे, मी त्यावेळी खोटे बोलूच शकत नसे. फारच झाले तर मौन स्वीकारीत असे; पण खोटे बोलत नसे. थोड्या दिवसांनंतरची आणखी गोष्ट आठवते. तिचा याच वेळी उल्लेख करतो. त्यावेळी मी सिद्धेश्वरचंद्रलेनमधील मामांकडे राहात असे. बिऱ्हाडातील इतर मोठमोठ्या मुलांनी मला तंबाकू ओढायला शिकविले होते. ते स्वतः तंबाकू ओढून माझ्या हाती गुडगुडी देत आणि म्हणत, ' ओढ ' प्रथम प्रथम ओढताना डोके गरगरू लागे पण षौक म्हणून ओढीत असे. एके दिवशी अशा तऱ्हेने तंबाकू ओढून बाजारात जायचे म्हणून मोठ्या मामांकडे पैसे आणण्यासाठी गेलो. तेव्हा तंबाकूचा वास आल्यामुळे मला त्यांनी विचारले, ' तू तंबाकू ओढतोस ? ' मी मानेने होकार देऊन, म्हटले, ' होय, ' आणि मग त्यांच्या प्रश्नांना उत्तर देतादेता, तंबाकू ओढायला कसा शिकलो, कितीदा ओढतो वगैरे सर्व सांगितले. माझे वय तेव्हा तेरा वर्षांपेक्षा जास्त नव्हते. माझे हे निवेदन ऐकून बिऱ्हाडातील रहिवाशांवर मामा फारच रागावले आणि ' पुन्हा तंबाकू ओढणार नाही. ' अशी माझ्याकडून शपथ घेवविली. मीही त्या दिवसापासून तंबाकू ओढला नाही. तरीपण एकदा मी खोटे बोलून मामांना फसविले होते ती हकीगत यथायोग्य स्थानी सांगेन.

## कवित्वाचा श्रीगणेशा

जेलियापाड्यात असतानाची एक कुतूहलजनक घटना मला आठवते. आमच्या क्लासात गंगाधर नावाचा एक धनिक पुत्र शिकत होता. तो बराच लठ्ठ असल्यामुळे क्लासातील मुले त्याला ' गंगाधर हत्ती ' असे म्हणत. हा मुलगा अभ्यासात तितकासा हुषार नव्हता. त्यामुळे परिक्षेच्या वेळी त्याचा नंबर वर येत नसे. दैव-

योगाने एक दिवस तो फर्स्ट आला. त्यावेळची आमच्याकडे पाहण्याची त्याची तुच्छतापूर्ण नजर अगदी पाहण्यासारखी होती. मला ती सहन झाली नाही. दुसरे दिवशी मी त्याच्यावर एक कविता रचून ती क्लासात घेऊन आलो. एकच्या सुटीत क्लासातील सगळ्या विद्यार्थ्यांना व त्यांत गंगाधरला उभा करून ती कविता वाचली. सगळीच कविता काही मला आठवत नाही. चार चरण तेवढे आठवतात. तेच याखाली देत आहे–

**इजार चापकान गाये इस्कुले आसे जाय**
**नाम तार गंगाधर हाती,**
**बड तार अहंकार धरा देखे सराकार**
**चले येन नबाबेर नाति.**

अर्थ–विजार आणि लांब व सैलसा अंगरखा घालून शाळेत येतो जातो. त्याचे नाव गंगाधर हत्ती. त्याला फार मोठी घमेंड आहे. तो सर्वांना तुच्छ समजतो. जणू नबाबाचा नातूच आहे असा चालतो.

कविता जेव्हा वाचली गेली तेव्हा मुलांच्या टाळ्यांच्या गजराने आणि मोठ्या हास्याने शाळेतील सर्व मुले तेथे एकत्र झाली. झालेल्या अपमानामुळे गंगाधराला रडू कोसळले आणि त्याने त्याबद्दल मास्तरांपर्यंत कागाळी नेली. कुमारखालीच्या चांदमोहन मैत्र महाशयांचे वडील सुपुत्र राधागोविंद मैत्र हे आमच्या क्लासावर त्यावेळी इंग्लिश शिक्षक होते. त्यांनी माझ्या हातातील कविता घेऊन ती मनःपूर्वक वाचली आणि माझ्या मस्तकावर हात ठेवून ते म्हणाले, ' तुझी ही कविता फार उत्तमच झाली आहे; पण मनुष्याला शिव्यागाळी देण्यात आपली काव्यबुद्धी खर्च करणे चांगले नाही. ' यानंतर कविता रचण्याचा माझा उत्साह वृद्धिंगत झाला.

## ईश्वरगुप्त यांची कविता

एकंदरीत सांगायचे म्हणजे मी किती लहान वयात कवितारचना करायला आरंभ केला ते स्मरणात नाही. वर्णपरिचय पुरा होताच आईने मला कृत्तिवासी रामायण वाचून दाखविण्यास सांगितले. केव्हा केव्हा ती स्वतःही मला म्हणून ऐकवीत असे. ते सगळे काव्यमय विवेचन माझ्या कानात प्रतिध्वनित होत होते. नंतर कलकत्त्याला आल्यावर ईश्वरचंद्र गुप्त यांच्या कविता हाती पडताच त्या मी आधाशासारख्या तोंडपाठ करीत असे. माझे बाबा तर काव्यरसाचे चांगलेच भोक्ते होते. ते आपल्या मित्रमंडळीत भारतचंद्र वगैरे प्रसिद्ध कवींच्या काव्याचे समालोचन करीत. या सर्व कारणांनी मला लहानपणापासूनच कविता करण्याचा नाद लागला असावा. काव्यशक्ती जागृत झाली असावी. मी माझ्या दहावे वर्षी

लिहिलेली एक चोपडी नंतर माझ्या पाहण्यात आली होती. तीत मी माझ्या कित्येक कविता पाहिल्या. त्या इतक्या उत्कृष्ट साधल्या होत्या की, एखाद्या लहान मुलाने त्या रचिल्या असतील असे वाटत नव्हते. अनुमानाने सांगावयाचे तर, कोणा एखाद्या कवीच्या त्या कविता नकलून ठेविल्या होत्या असेच म्हणावे लागेल. त्या-वरूनही असे सिद्ध होते की, नववे–दहावे वर्षीही चांगल्या कविता दिसताच मी त्यांची नकल करून ठेवीत असे.

यात्र वेळची आणखीही एक स्मरणीय गोष्ट आठवते. माझ्या दोघां सहा-ध्यायी मुलांच्या माता या संधीला माझ्या मावशी बनल्या होत्या. त्यांना मी मावशी म्हणून हाक मारीत असे आणि नेहमी त्यांच्याच घरी जात-येत असे. तसेच त्यांच्या मुलींबरोबर बहीण–भावाप्रमाणे खेळत असे. यामुळे मला माझ्या आईचा व बहिणीचा अभाव जाणवत नसे. चांगले गोडधोड काही घरात केल्यास त्या मला बोलावून खायला देत. मला एखादी वाईट संगत लागू नये म्हणून सुट्टीच्या दिवसांत आपल्या घरी राहायला बोलवीत.

अशाच या दहाअकरा वर्षांच्या वयात आणखी एक कुतूहलात्मक घटना घडल्याचे स्मरते. आमच्या कॉलेजजवळील एका गल्लीत एक मुलगी होती. तीही माझ्याच वयाची. दिसण्यात ती मोठीशी सुंदर होती असे नाही. पण तिचा चेहेरा मला फार आवडे. ती आपल्या घराच्या अंगणात खेळत असे. मी दुसऱ्या एका मुलाबरोबर रोज तिला भेटायला जायचा. आईच्या भीतीने ती रस्त्यातील मुलांशी फारशी बोलतचालत नसे, पण आम्हाला तिच्याशी बोलायला व तिच्याकडे पाहायला फार आवडते हे तिला ठाऊक होते. तेव्हा ती आमचा आवाज ऐकताच बाहेर येई आणि बालबुद्धीप्रमाणे आम्ही जे तिला काही देऊ ते कुणाला न कळविता ती मुकाट्याने घेई. मी आवडत्या बहिणीप्रमाणे तिला जवळ घेण्याचा प्रयत्न करी पण तिच्या घरची मंडळी तिला तसे करू देत नसत. बहुबाजार पाड्या-तून आमचे कॉलेज दुसरीकडे गेल्यावर आम्ही तिच्या सहवासाला मुकलो.

### प्रथम मृत्युदर्शन

या जालियापाड्यात राहात असताना आमच्या कुटुंबात दोन दुर्घटना घडल्या. उन्मादिनीचा मृत्यू ही पहिली आणि माझे पणजोबा रामजय न्यायालंकार यांचा स्वर्गवास ही दुसरी.

एकदा उन्हाळ्याच्या सुट्टीत मी घरी गेलो होतो. जाताना कलकत्त्याहून पायीच जात असे. पहिल्या दिवशी चांगडिपोता येथे मामाच्या घरी रात्री मुक्का-माला राहायचे आणि दुसरे दिवशी पहाटेसच उठून घरी पोचायचे. यावेळीही मी तसाच गेलो. बारा वर्षे वयाच्या दृष्टीने माझ्यासारख्याने २८ मैल चालणे ही काही साधी सोपी गोष्ट नव्हती. मी तर घरी पोहोचेपर्यंत अगदी घामाघूम होऊन गेलो;

पण उन्मादिनीवर माझा कितीतरी लोभ. त्यामुळे ती घरी नाही असे पाहाताच मला दाही दिशा शून्य वाटल्या. आईला विचारले तेव्हा ती म्हणाली, 'बाहेर आमराईत गेली असेल.' लागलीच मी तिकडे धावलो. माझी ती तारांबळ पाहून आई ओरडून म्हणाली, 'अरे उभा राहा. बैस तरी. मी तिला बोलावते.' पण हे तिचे ओरडणे ऐकतो कोण? मी धावत जाऊन उन्मादिनीला उचलले आणि छातीशी धरून घरी आणले तेव्हाच स्वस्थ बसलो.

अशी ही माझी आवडती उन्मादिनी त्या उन्हाळ्यात मरण पावली. तिचा मृत्यूही चमत्कारिकच. त्याचे असे झाले : बाबा एके दिवशी तिला बरोबर घेऊन जमिनदारबाबूंच्या बागेत; बालिका विद्यालयाचे संस्थापक डॉ. प्रियनाथराय चौधरी यांना भेटायला गेले. त्यांनी– डॉक्टरनी– उन्मादिनीचे लाड करून तिच्याकडून एक लिचू[१] खावविले. उन्मादिनीला आनंद वाटला. ती त्याच आनंदात हसत हसत बाबांबरोबर घरी आली. पण घरी येताच तिला भयंकर कॉलरा झाल्याचे दिसून आले. एक जुलाब व एक उलटी होताच ती अगदी निपचीत पडली. तिच्या उलटीत लिचूचा अंश दिसू लागला. ही गोष्ट मी मुख्यतः अशासाठी सांगत आहे की, तिच्या मृत्यूमुळे मला एवढा धक्का बसला की त्यावेळेपासून आतापर्यंत लिचू खाणे मला मनापासून आवडेनासे झाले. लिचू खायला घेतले की उन्मादिनीच्या शोकजनक मृत्यूची कथा मला आठवते.

सुमारे नऊ वाजता सकाळी तिच्या आजाराला सुरवात झाली आणि दुपारी तीनच्या आत ती मरण पावली. आसन्न मृत्युकाळी जेव्हा तिला पुष्करिणी जवळ आणून ठेवली तेव्हा मी जाऊन तिच्यासमोर उभा राहिलो. मला वाटले ती माझ्याकडे पाहात असून तिच्या डोळ्यांतून अश्रू वाहात आहेत. त्या तिच्या अश्रुधारांचा पुष्कळ वर्षेपर्यंत मला विसर पडला नाही. अशा रीतीने उन्मादिनी जाताच घर अगदी शून्य दिसू लागले. त्यानंतर माझ्या आणखी तीन बहिणींचा जन्म झाला. आणि ( मानलेल्या ) मावशा, बहिणी तर अनेक केल्या. पण लहानपणच्या त्या सोज्वळ आनंदी उन्मादिनीची आठवण आणि तिच्या शोचनीय मृत्यूचा धक्का मला विसरता आला नाही.

मला वाटते, यापूर्वीच्या वार्षिक पूजेच्या ( नवरात्रात ) संधीला माझे पणजोबा स्वर्गवासी झाले होते. त्यांच्या मृत्यूपूर्वी काही दिवस आपला मृत्युकाल आता जवळ आला असे त्यांना जाणवले असावे. मी वडिलांसह त्यावेळी कलकत्त्याला होतो. पणजोबांनी माझ्या आतेच्या नवऱ्याला, आम्हा पितापुत्रांना कलकत्त्याहून

---

१ लिचू हे फळ असून ते जांभळासारखे पण वरून मऊ मऊ काटे असलेले व आत जांभळासारखीच मोठी बी असलेले असे असते. बागेत हे फळझाड म्हणून लावतात.

बोलावून आणण्याचा विलक्षण तगादा सुरू केला. त्याप्रमाणे बाबा घरी गेले. मी बहुधा कलकत्त्यालाच राहिलो असेन. कारण त्यांचे शेवटचे आजारपण मला आठवत नाही. मृत्यूपूर्वी एकदोन दिवस पणजोबांनी आपणाला घराबाहेर असलेल्या चंडी-मंटपात[२] नेऊन ठेवण्याची माझ्या वडिलांना आज्ञा केली. योग्य वेळी आम्ही तेथे नेऊ असे वडिलांनी मोठ्या आवाजात ओरडून पुष्कळदा त्यांना सांगून पाहिले पण काही केल्या ते ऐकेनात. तेव्हा त्यांना चंडीमंटपात बाहेर आणून ठेवणे भाग पडले. नंतर इष्टदेवतेचे नामस्मरण करता:करता १०३ वर्षांच्या वयाला ते स्वर्गवासी झाले.

## माझा पहिला विवाह

या जेलियापाड्यात असतानाच माझे पहिले लग्न झाले. सन तारीख लक्षात नाही. मी त्यावेळी नक्की किती वर्षांचा होतो हेही ध्यानात नाही. तरी पण तेरा वर्षांपेक्षा मी जास्त वयाचा नव्हतो. माझ्या आजोळच्या जवळ असलेल्या राजपूर नावाच्या गावातील नवीनचंद्र चक्रवर्तींच्या वडील मुलीशी– प्रसन्नमयीशी– माझे पहिले लग्न झाले. प्रसन्नमयीचे वय त्यावेळी दहा वर्षांपेक्षा जास्त नव्हते. आमच्या दाक्षिणात्य वैदिकांच्या कुलरीतीप्रमाणे, प्रसन्नमयी एक महिन्याची असताना व मी दोन वर्षे वयाचा असताना माझ्या लग्नाचा वाङ्निश्चय झाला होता. ( प्रसन्नमयी माझी वाग्दत्तवधू झाली होती. )

या विवाहाच्या वेळच्या सर्वच गोष्टी माझ्या स्मरणात नाहीत. आता इतकेच आठवते की, मी कानात सुवर्णवलये, गळ्यात हार, दंडात बाजूबंद आणि हातात कडी घालून विवाहासाठी बाहेर पडलो होतो. बाबा वाजंत्रीवाले घेऊन आणि रोषणाई करून मला घेऊन गेले होते. मला नेऊन मंटपात नियोजित स्थळी बसविण्यात आल्यावर तेथील समानवयी मुलगे आले आणि, 'अरे तू काय शिकतोस ? किती अभ्यास झाला आहे ?' असे प्रश्न विचारून माझी परीक्षा घेऊ लागले. मीही थोड्याच वेळात यथोचित संकोच विसरून जाऊन त्यांच्याशी वितंड-वाद करण्याला आरंभ केला. त्यात मला पराजित करण्याऐवजी तेच पराजित झाले. मला आता चांगले आठवते, आमचा तो वादविवाद ऐकणारे आसपासचे मोठे पुरुष म्हणू लागले की, ' मुलगा फार फाजिल दिसतो. ' नंतर मला त्यांनी घरात नेले तेथे समवयस्क मुलींनी कानपिळीचा खेळ आरंभिला. त्यात माझा पराभव झाला. कानपिळीचा प्रतिसाद कानपिळीनेच द्यावा लागतो. तसे मला

२. ज्या मंटपात दुर्गा, काली इत्यादि देवींची नैमित्तिक पूजा होते त्याला चंडीमंटप म्हणण्याची प्रथा आहे.

करता आले नाही. स्त्रीमंडळीत मी अगदी कोंडला गेलो होतो. इतक्या स्त्रिया एकत्र पाहून मी अगदी गांगरूनच गेलो.

विवाहानंतर दुसऱ्या दिवशी वर-वधूला एका मेण्यात बसवून जेव्हा सर्वांनी आम्हाला निरोप दिला, तेव्हा मला तो पेचप्रसंगच वाटला. माझी ती लहान वयाची पत्नी माझ्यासमोर बुरख्यात बसली होती ती तर रडूच लागली. हातपाय पसरता येईनात. काही बोलता येईना. मोठ्या संकटातच सापडलो मी. शेवटी रस्त्यातील एका पडिक बागेत मेणा उतरविण्यात आला. लागलीच मी मेण्यातून बाहेर आलो आणि मला हायसे वाटले. सभोवार पाहातो तो लिचूच्या झाडावर पिकलेले लिचू होते. लागलीच मी झाडावर चढलो आणि लिचू पाडून खाऊ लागलो. खाता खाता आठवले की ती मुलगी– माझी पत्नी– एकटीच मेण्यात बसली आहे. तिलाही माझ्यासारखीच भूक लागली असेल. यातील काही लिचू तिला द्यावे. असा विचार करून काही लिचू घेऊन प्रसन्नमयीच्या पदरात टाकले आणि धूम पळालो. कोणीतरी पाहील ही भीती होती.

हळूहळू आमचा तो मेणा आमच्या आळीत येऊन पोचला. माझ्या आळी-तील माझे समवयस्क खेळगडी मला सामोरे आले. त्यात दोन मुलगे माझे अगदी परममित्र होते. त्यांनी येऊन मेण्याचे दार उघडले आणि हळूच मला म्हटले, ' अरे, तुझी ती रबा कुत्री आता फार चांगली झाली आहे. ' ते ऐकून माझी एक काळजी दूर झाली. फार आनंद वाटला. या रबा कुत्रीची थोडी माहिती या ठिकाणी देणे अवश्य वाटते. रबा ही लहान कुत्री होती, थंडीच्या सुटीत घरी आल्यावर एका मुलाकडून घेऊन तिचा मी सांभाळ केला होता. तरी पण तिचे नाव ठेवले होते ' रॉबर्ट. ' तीही थोडी माहिती सांगतो. ती कुत्री जेव्हा माझ्या-कडे आली तेव्हा बरोबरीच्या मुलांनी मला विचारले, ' नाव काय ठेवायचे हिचे ? ' मी चटकन सांगितले ' रॉबर्ट. ' असे सांगण्याचे रहस्य हेच की, माझ्या वरच्या क्लासातील मुले त्यावेळी ' चेंबर्स फर्स्ट बुक ऑफ रीडिंग ' हे वाचीत. त्यांच्या तोंडून मी ऐकले होते, ' रॉबर्ट ' हे एक नाव आहे, ते मी विसरलो नव्हतो. वाडीतील मुलांना काही तरी बहाद्दुरी दाखवावी या हेतूने त्या बच्चाचे नाव रॉबर्ट ठेविले. शहरात राहून आलेला विद्यार्थी मी. अर्थात् माझा शब्द म्हणजे वेदवाक्य. त्यामुळे त्या छोट्या कुत्रीचे रॉबर्ट हे नाव कायम झाले. मुलांना ते नीट उच्चारता न आल्याने त्यांनी ' रबा ' हा त्याचा सोपा उच्चार वहिवाटीत आणला. या ' रबा 'सह त्या भागातील मुलांबरोबर मी सुखाने राहात असे. पुढे मला एक प्रकारे धरूनच लग्नाला नेले. मला वाटले आता माझ्या ' रबा 'ला कोण पाहील ! आईबद्दल काही विश्वास वाटेना. कारण आईला त्यावेळी कुत्र्याचा तिटकाराच वाटे. त्यामुळे वाडीतील मुलांवर कुत्र्याचा सर्व भार सोपवून मी लग्नाला

गेलो होतो. तेच त्याला कित्येक दिवस खाऊ पिऊ घालीत व सांभाळीत. म्हणून मी आल्याबरोबर ' रबा ' खुशाल आहे ' असे त्यांनी मला सांगितले.

हळू हळू मेणा आमच्या आळीत आला. आळीतील बायका सुनमुख पाहायला आल्या. आईने हुलुध्वनी[3] करून व अक्षता, दुर्वा, फुले, चंदन, देवाचे चरणामृत वगैरेनी स्वागत करून सुनेला घरात नेले. मी मेण्यातून उतरताच 'रबा'ला पाहायला पळालो. मोठी आत्या ' अरे प्रसाद खाऊन जा ' असे म्हणत माझ्या मागून धावली. पण कोण खातो ती मिठाई आणि कोण बसतो त्या बायका-मंडळीत वधूला घेऊन ! त्यावेळी प्रसन्नमयीपेक्षा ' रबा 'च मला जास्त प्रिय होती. आता ते आठवले म्हणजे हसूच येते.

## विवाहानंतर मला चांगला मार बसला

लग्नसमारंभ संपतो न संपतो तोच एक घटना घडली. ती आठवण अद्याप मी विसरलो नाही. लग्नानंतर काही दिवसांनी माझ्या आप्तांपैकी एका पितृव्याच्या मुलीचे लग्न निश्चित झाले. माझी पत्नी प्रसन्नमयी त्यावेळी सासरीच होती. माहेरी गेली नव्हती. तिच्या बरोबर आलेल्या माहेरच्या मंडळींपैकी काही अद्याप परत गेली नव्हती. अशा स्थितीत माझ्या चुलत बहिणीचे लग्न आरंभिले. एके दिवशी आमच्या वाडीतील काही मुलांनी वऱ्हाडी मंडळीची मजा करावी म्हणून पंचरंगी रांगोळीने आसन बनविण्याची तयारी चालविली. मीही त्यात सामील होतो. त्यात मौज-मजा करता करता माझ्या मोठ्या आत्याच्या मधल्या मुलाशी – रामयादव चक्रवर्तीशी– अकस्मात माझी बाचाबाची झाली. दोघेही आम्ही एकमेकांच्या अंग-चटीला येऊन धक्काबुक्की व गुद्दागुद्दीला सुरवात झाली. माझ्या आईला ही बातमी समजताच ती धावतच तेथे आली आणि दोघांच्या कानाला धरून व थोबाडीत देऊन आम्हाला तिने एकमेकांपासून दूर केले. मधला दादा रामयादव रडत रडत आपल्या घरी जाऊन आपल्या आईला म्हणाला, ' मामीने व तिच्या मुलाने दोघांनी मिळून माझ्या अंगावर धावत येऊन मला मारले. ' मोठ्या आत्याने खरा प्रकार काय झाला याचा तपास न करता व मुलांना बोलवून त्यांच्या-कडूनही माहिती न घेता रागाने खवळून व माझ्या एका आतेबहिणीला बरोबर घेऊन ती आमच्या घरी आली आणि माझ्या आईला शिव्यागाळी देऊ लागली. दोघा नणंदा-भावजयीत चांगलेच भांडण जुंपले.

नंतर संध्याकाळच्या प्रारंभीच आई मला म्हणाली, ' आज तुझ्या कपाळी

३. हुलुध्वनीः– कोणत्याही शुभकार्यात बंगालमध्ये हिंदू स्त्रियांमध्ये जीभ व टाळूच्या सहाय्याने ' हुलु ' असा मंगलध्वनी करण्याची प्रथा आहे. मूळ संस्कृत शब्द ' उलूलू '

पुष्कळच मार खाण्याचा योग दिसतो. मी तुला लवकर जेवायला घालते, जेव आणि भट्टाचार्यांच्या आळीत तमाशा आहे तो पाहयला तिकडे जा. तुझ्या वडलांचा राग शांत झाला म्हणजे सकाळी घरी ये.' पण आईला जी भीती वाटली होती ती खरीच झाली. बाबा सायंकाळच्या सुमारास घरी येत असता मोठ्या आतेच्या घरी शिव्यांचा चाललेला वर्षाव ऐकून ते तिच्याकडे गेले आणि तिला विचारू लागले, 'रस्त्यावरून ऐकायला येईल इतक्या मोठ्या आवाजात तू कुणाला शिव्यागाळी देत आहेस?' मग काय विचारता! बाबांच्या कानात आई-विरुद्ध तिने पुष्कळसे विष ओतले. बाबांनी आणखी कुणाकडून काही ऐकले होते की नाही माहीत नाही. माझ्या आईवर रागावले की मोठ्या आत्यावर रागावले तेही मला ठाऊक नाही. तरी पण बाबांना नेहमीच वाटत असे की, आपला मुलगा इतका सद्गुणी आणि चांगला होईल की, त्याच्या बाबतीत कसलीही कोणी कधी तक्रार करणार नाही, त्याचा कोणताही दोष कोणी दाखविणार नाही. सर्व तक्रारी व दोष यापासून तो दूर असेल. या त्यांच्या समजुतीला धक्का पोचला म्हणून रागावले की काय? खरे काय ते त्यांचे त्यानाच माहीत. असो. आईने घाई केल्यामुळे मी स्वयंपाकघरात एका कोपऱ्यात बसून भराभर जेवू लागलो, इतक्यात बाबा घरात येऊन दाखल झाले. आणि आल्याबरोबर विचारले, 'तो पाजी कुठे आहे?' माझी आई सैंपाकघराच्या चौकटीवर दोन्ही हात ठेवून रस्ता अडवून उंबऱ्यावर उभी राहिली आणि म्हणाली, 'तो घरात नाही.' बाबा जर सैंपाकघरात येण्याचा प्रयत्न करतील तर आई त्यांना तसे करू देणार नाही, ती त्यांना अडवील हे मी जाणले. पण बाबा पुढे न सरकता म्हणाले, कोयता कुठे आहे तो दे पाहू' आईने विचारले, 'कोयता कशाला?' यावर बाबा रागाने उसळून म्हणाले, 'ते कशाला तुला पाहिजे? दे ना.' आईने मग कोयता आणून त्यांच्या हाती दिला. ते मग तो कोयता घेऊन घरातून बहेर पडले.

मी घाईघाईने आचवलो आणि मागच्या दाराने बाहेर पडून व घनदाट जंगल पार होऊन भट्टाचार्यांच्या वाडीत जिथे तमाशा चालला होता तेथे उपस्थित झालो. उपरणीने तोंड व मस्तक झाकून गर्दी असेल तेथे त्यात मिसळून राहा असे आईने मला सांगून ठेविले होते. त्याप्रमाणे उपरणीने तोंड व कपाळ झाकून मी तेथील गर्दीत मिसळून फिरू लागलो. हळू हळू मनातील भयभावना दूर होऊ लागली. निश्चिंतपणाने मी फिरत होतो. रात्रीची आठ साडेआठची वेळ झाली होती. इतक्यात मागील बाजूने येऊन कुणीतरी माझ्या अंगावरील उपरणे धरले.मी म्हटले, 'कोण आहे रे!' बाबा तेथे येऊन मला पकडतील असा स्वप्नातही माझ्या मनात विचार आला नव्हता. पण मागे वळून पाहातो तो प्रत्यक्ष बाबाच. त्यांनी माझ्या पाठीवर दोन ठोसे देऊन म्हटले, 'खबरदार, रडला ओरडलास तर.'

पाठीवर ठोसे बसले असल्यामुळे न रडणे मला कठीण होऊ लागले. पण करणार काय ! रडे दाबून धरू लागलो. त्याच अवस्थेत बाबा मला घरी घेऊन गेले आणि अंगणात उभा करून म्हणाले, ‘ उभा राहा. हालू नको. आलो मी. ’ मला मारण्यासाठी बांबूची काटी काढून त्यांनी तट्ट्याला टेकून ठेविली होती ती शोधण्यासाठी गेले. आईने ती त्यापूर्वीच पुष्करणीत टाकून दिली हे त्यांना काय ठाऊक ! मी दोनचार मिनिटे उभाच होतो. तितक्यात माझी आई, मोठी आतेबहीण, माझ्या लग्नातील वऱ्हाडी मंडळी माझ्या सभोवार जमली आणि म्हणू लागली, ‘ अरे, पळ पळ मार खाण्यासाठी उभा कशाला राहातोस ? ’ मी म्हटले, ‘ नाही. मी जाणार नाही. इथून हालू नको असे बाबा मला सांगून गेले आहेत. ’ आणि मग मी सुमारे अर्धातास तसाच उभा होतो.

ज्या जागी काठी ठेविली होती तेथे ती नाही असे बाबांना आढळताच आता मारावे कशाने हे ते पाहू लागले. शेवटी फिरता फिरता काहीच न मिळाल्यामुळे जळाऊ लाकडाचा एक भाग मिळाला तो घेऊन ते मला मारायला आले. तेव्हा थोरली आते माझ्या आणि त्यांच्यामध्ये येऊन म्हणाली, ‘ ए डाकू, दे ते लाकूड इकडे. या लाकडाने या मुलाला मारलेस तर तो जगेल तरी ?’ आणि मग ती बाबांच्या हातांतील ते लाकूड काढून घेण्याचा प्रयत्न करू लागली. भावा-बहिणीची चांगलीच झोंबाझोंबी जुंपली. शेवटी बाबांनी माझ्या थोरल्या आतेला असा एक धक्का दिला की ती त्या धक्क्याने चांगली तीनचार हात दूर जाऊन जमिनीवर पडली. माझी आई त्यावेळी एखाद्या दगडी मूर्तीप्रमाणे जवळच उभी होती. तिच्या तोंडून शब्दोच्चार तर होत नव्हताच पण हालचालही बंद होती. बाबांची आणि तिची नजरानजर होताच ती म्हणाली, ‘ तुम्ही माझ्याकडे काय पाहाता ? मुलाला मारून टाकायचा असेल तर मारून टाका. मी एक पाऊलही पुढे टाकणार नाही. ’ यावर बाबा म्हणाले, ‘ ठीक आहे. पाहा तर. ’ असे म्हणून ते त्या लाकडाने मला मारू लागले. तेव्हा आणखी काही लोक पुढे सरून त्या मारापासून मला वाचविण्याचा प्रयत्न करू लागले. पण त्यांच्या मस्तकावर व पाठीवर जेव्हा त्या लाकडाचे तडाखे बसू लागले तेव्हा त्यांचाही नाइलाज झाला. त्या लाकडाचे काही तडाखे माझ्या अंगावर बसताच मला चक्कर आल्यासारखे वाटू लागले. जवळची माणसे मला ओळखू येईनात. माझ्या सभोवार अनेकांची तोंडे गरगर फिरत आहेत असे मला वाटू लागले आणि शेवटी मी बेशुद्धावस्थेत जमिनीवर पडलो.

सुमारे अर्ध्या एक तासाने मी शुद्धीवर आलो. पाहिले तो मला अंगणातून उठवून घराच्या पडवीत झोपविले होते आणि दोनतीन माणसे टर्पेंटाईन तेलाचे माझ्या सर्वांगाला मालिश करीत होती. बाबा स्वतः तेल आणून देत होते आणि त्यांना मदत करीत होते. मला जाग येताच मी ‘ आई आई ’ म्हणून हाका मारू

लागलो. मी बेशुद्ध होऊन पडलेला पाहाताच ती रडत रडत घराजवळच्या रानात जाऊन पडली होती असे मी ऐकले. मी शुद्धीवर येताच लोक तिला बोलाविण्या-करिता गेले. एकामागून एक जात होते पण कुणाच्याच सांगण्यावर तिचा विश्वास बसला नाही. शेवटी लोक जेव्हा तिला फारच आग्रह करू लागले तेव्हा ती म्हणाली, ' कृष्णचरण न्हाव्याने जर स्वतः येऊन मुलगा जिवंत आहे असे मला सांगितले तरच मी येईन. दुसऱ्या कुणाच्याही सांगण्याने येणार नाही. '

हा कृष्णचरण न्हावी त्या वाडीतील एक वृद्ध दुकानदार असून तो एक फार मोठा भक्त आणि धर्मभीरू माणूस होता. वाडीतील लोक त्याला ' भक्त कृष्णचरण ' म्हणून हाक मारीत. अर्थात तेवढ्या त्या रात्री कृष्णचरणाकडे माणसे गेली. म्हातारा काठी टेकीत टेकीत मोठ्या कष्टांने आला आणि माझ्याशी दोन शब्द बोलून आईला बोलवायला निघाला. आईही त्याचे सांगणे ऐकून त्या रानातून उठून आली आणि ' बाबा, तू आहेस काय रे ' असे आर्त स्वराने म्हणून माझ्या बिछान्याशेजारी पडून रडू लागली.

इकडे मी जेव्हा चांगला शुद्धीवर आलो तेव्हा मी माझ्या स्वाभाविक हट्टाग्रहीपणाने म्हणू लागलो, ' मी मधल्या दादाबरोबर भांडण केले होते, मारामारीही केली होती. माझा अपराध झाला यात संशय नाही. पण एवढ्याशा लहान अपराधाला एवढी मोठी शिक्षा दिली हे काय बाबांनी बरे केले ? माझी पत्नी, सासुरवाडीची मंडळी, शेजारच्या घरची पाहुणे मंडळी उपस्थित असताना त्यांच्या समोर मला असे मारणे बाबांना शोभले काय ? ' मी असे बोलत आहे तोच पाहिले की, बाबा जवळच असून ते जमिनीवर नाक घाशीत आहेत ! इथेच हेही लिहिले पाहिजे की, यानंतर कितीही ते चिडले अगर संतापले तरी माझ्या अगर माझ्या बहिणीच्या अंगावर त्यांनी कधीच हात उचलला नाही. इतकेच नव्हे तर मी ब्राह्म समाजात सामील होऊन जानवे काढून टाकले तरी त्यांनी रागाने जोराजोराने आरडाओरड केली, दात चावले; पण याखेरीज काही केले नाही. माझ्या अंगाला हात लावला नाही. यावरूनच सगळ्यांना कळून येईल की त्यांचा अनुताप व त्यांची प्रतिज्ञा कशी दृढ होती ते !

### मामाचे साप्ताहिक ' सोमप्रकाश '

यानंतर थोड्याच दिवसांत माझ्या वडलांची कलकत्त्याच्या बंगाली शाळेतून बदली झाली आणि ते आमच्या गावातील हार्डिंज मॉडेल बंगाली शाळेत हेडमास्तर होऊन गेले. अर्थात् त्यांना कलकत्ता सोडून गावी जावे लागले. जाताना मला त्यांनी सिद्धेश्वरचंद्राच्या गल्लीत माझ्या मामाच्या घरी ठेविले. या ठिकाणी ईश्वरचंद्र विद्यासागर नेहमी येत आणि माझ्या मामांशी कसलीशी सल्ला मसलत करीत. नंतर ऐकले, ' सोमप्रकाश ' नावाचे एक साप्ताहिक पत्र निघणार आहे

त्याबद्दलचा त्यांचा विचारविनिमय चालला आहे. पुढे १८५८ साली 'सोम-प्रकाश' वर्तमानपत्र सुरू झाले. घरातच छापखाना आला. वर्तमानपत्र छापण्यासाठी आणि वाटण्यासाठी घरात बरेच लोक राहू लागले. घरात खूप गडबड सुरू झाली. ही गडबड सगळ्या दिवसभर व रात्री दहा अकरा वाजेपर्यंत चालायची. त्यात सर्वांपेक्षा लहान मीच. माझ्या खाण्याजेवण्याकडे कोण लक्ष देणार? तसेच लिहिण्या-वाचण्याकडे तरी कोण नजर ठेवणार? मी त्या मोठ्या माणसांत असल्यामुळे सैंपाक करणे, भांडी घासणे ही कामे करायची आणि त्यातच होईल तसा अभ्यास करायचा. शिवाय घरातील वयात आलेल्या तरुणाचे बोलणे चालणे माझ्या वयाच्या मुलांनी ऐकण्या-पहाण्या-सारखे नसे हे वेगळेच. ती सगळी आठवण झाली म्हणजे आजही मला लाज वाटते. आणि अशा अवस्थेत असताही मी वाईट मार्गाला लागलो नाही याबद्दल ईश्वराला धन्यवाद देतो.

घरात राहणारे अन्नाश्रित लोक मामाच्या भीतीने आठवडाभर शांतपणे व सभ्यपणे वागत. आठवड्यात त्यांच्या उच्छृंखल वागणुकीला आळा पडे. स्वतःच्या उद्योगात त्याना मनःपूर्वक लक्ष घालावे लागे. मामा शनिवारी गावी जात. ती शनिवारची रात्र आणि रविवारचा सगळा दिवस त्या अन्नाश्रित लोकांचे वर्तन अगदी वेगळे बने. कोणी गांजा ओढीत तर कोणी दारू पीत आणि मग एकमेकांच्या अंगावर पडत. खर्चासाठी म्हणून मामाकडून जे पैसे त्यांना मिळत त्यांचा अशा तऱ्हेने दुरुपयोग करीत. मला तर पुष्कळसे रविवार नुसत्या कोरड्या भातावर घालवावे लागत. उत्तमात उत्तम असे एवढेच की, मला ते पुष्कळ वेळी काही तरी निमित्ताने घरातून दुसरीकडे जायला लावीत. तरी पण मी त्यांच्या ऱ्या लीला पाहात असे आणि ऐकत असे, त्या अल्पवयी मुलांच्या नजरेला पडणे योग्य नव्हते. त्यांनी त्या पाहू नयेत अशाच असत. आजही ईश्वराला मी असंख्य धन्यवाद देतो याचे कारण हेच की, या सगळ्या न पाहण्यासारख्या गोष्टींपासून त्याने मला दूर तर ठेवलेच पण सुरक्षितही राखले.

मी एका दिवसाची हकीगत सांगतो. घरात राहणाऱ्या अन्नाश्रित आतांच्या गोतावळ्यात एका इसमाला सगळे जण 'मामा मामा' म्हणत. खरे म्हणजे नात्याने हा माझ्या आईचा मामा. तरीपण सर्वांबरोबर मीही याला 'मामा' म्हणूनच संबोधीत असे. फार काय, नोकरचाकर, बाणीउदमीही त्याचे खरे नात्र न घेता मामाच म्हणत. मामा इंग्रजी लिहिणेवाचणे शिकलेला नव्हता. कंपॉझिटरी, बिल-वसुली अशी काही काही कामे करून थोडा फार पैसा मिळवी. मद्यपान व इतर कांही व्यसने त्याला होती.

एके दिवशी रविवारी संध्याकाळनंतर एका आप्ताने येऊन सांगितले की, मामाने सुकियास्ट्रीटवरील एका वेश्यालयात वेडेचार करीत असता तेथे वांती केली आणि तसाच पडून आहे. हा द्वारकानाथ विद्याभूषणांच्या घरचा माणूस, असे

म्हणून त्यांच्या नावाने वेश्या शिव्या देत आहेत. वेश्यांच्या तोंडी माझ्या मामाचे नाव यावे याची मला चीड आली. मला ते असह्य झाले. मामाला तेथून उचलून आणावे असे घरातील वडीलधाऱ्या मंडळींना मी पुष्कळ सांगितले, विनविले पण तेही नशेच्या धुंदीत बेभान असल्यामुळे त्यांनी माझ्या विनवणीकडे लक्षच दिले नाही. शेवटी मीच जेदो नावाच्या नोकराला बरोबर घेऊन त्या वेश्येच्या घराकडे जायला निघालो. तेथे जाऊन पाहातो तो वाटोळ्या पानांनी आच्छादिलेल्या एका ( वेश्येच्या ) घराच्या ओसरीवर मामाने वांती केली असून त्यातच तो लोळत आहे. अर्धवट शुद्धी आहे नाही अशी अवस्था !

आम्ही तेथे जाताच त्या बाईने आमच्यावर शिव्यांची लाखोली वाहायला सुरवात केली. मी म्हटले, ' नोकराला बरोबर आणले आहे. त्याने केलेली घाण आम्ही काढून टाकतो. जागा स्वच्छ करून देतो आणि याला उचलून नेतो. उगाच शिव्यागाळी देऊ नको. ' नंतर नोकराकडून ती घाण मी काढविली आणि ' मामाला उचलून आण ' असे जेदो नोकराला सांगून मी भराभर घरी यायला निघालो. त्याकाळी कलकत्त्यात रस्त्यात, घाटावर, घरी दारू पिऊन झिंगलेले लोक मला आढळत आणि त्यांच्याबद्दल मला अतिशय घृणा व तिरस्कार वाटे. मी त्यांना नेहेमी टाळीत असे.

पुढे घरी येऊन मी त्यांची वाट पाहात बसलो. शेवटी बऱ्याच वेळाने जेदो नोकर आला आणि जोरजोराने दार वाजवू लागला. मी दार उघडून पाहिले तो मामा काही त्याच्याबरोबर नव्हता. मी त्याला ' असे का ? ' असे विचारले तेव्हा तो मामाला उद्देशून अनिर्वचनीय शिव्या देत एक सुरा घेऊन आला आणि दारात बसून म्हणाला, ' मामा येताच त्याला तोडतो. ' मी मनात म्हटले, ' रस्त्यांत दोघांची मारामारी झाली असेल. ' मी मोठ्या संकटात सापडलो. कारण जेदो हा गांजेकस आहे. जे मनात आणील ते करील. घरातील सर्वांना मी हाका मारून बोलविले. पण कोणीच उठून आला नाही. उलट ते मलाच म्हणाले, ' मरूद्या कपाळकरंट्यांना ! ' शेवटी नाइलाज होऊन बाहेरच्या दरवाजाला आतून कुलूप लाविले. ' कुलूप कशाला घालतोस ? ' असे जेदो माझा हात धरून मला म्हणाला. मी त्याला म्हटले, ' कुलपाची चावी तर आमच्या हातीच राहील ना ? मामाच्या हातात काही देत नाही. येताच दार उघडून देईन. त्याची एवढी भीती कसली ? ' जेदोला ते खरे वाटले आणि हातात सुरा घेऊन तो बाहेरच दरवाजाजवळ बसून राहिला. मी घरात वरच्या मजल्यावर झोपायला गेलो. तेथे जाऊन ऐकू लागलो तो, घराच्या मागच्या बाजूला असलेल्या एका वेश्येच्या घरात जाऊन तेथे मामांनी झिंगलेल्या आवाजात गाणी गायला सुरवात केल्याचे मला ऐकू आले. त्या रात्री तो काही घरात आला नाही.

दुसरे दिवशी माझे मामा गावाहून परत येताच त्यांना मी ही सर्व हकीगत

सांगितली. ते फार रागावले आणि त्या दोघांना मामासाहेबांनी घरातून घालवून दिले.

यानंतर माझ्या आईची आई (आजी) आणि मोठ्या मामाची पत्नी(मामी) -कलकत्त्याला येऊन काही दिवस बिऱ्हाडी राहिल्या. त्यांच्या पदार्पणाने त्या घराला पावित्र्य आलेसे वाटले. शिवाय मामाचे शनिवारच्या शनिवारी गावी जाणे बंद झाले. ही मामी, मामाची तिसरेपणाची बायको. माझ्यापेक्षा केवळ चारपाच वर्षांनी मोठी. ती आजीला कळू न देता गुप्तपणे माझ्याजवळ मिठाई आणण्याला पैसे देई. आणि मिठाई आणली की, रात्री दोघेही एकत्र बसून खूप खात असू. माझ्यासारख्या खादाड माणसाचा तो काळ किती सुखाचा गेला असेल त्याचे काय वर्णन करावे !

मोठ्या मामाजवळ मी एकदा खोटे बोललो होतो, असे प्रारंभी मी म्हटले आहे. तो प्रकार असा :— माझ्या दोघा शाळासोबती मित्रांच्या आईला मी मावशी म्हणत असे. आणि त्यांच्या बहिणीला बहीण मानीत असे, म्हणत असे. खरोखरच त्या दोघांच्याही आई माझ्यावर मावशीप्रमाणे ममता करीत. या दोघां मित्रांपैकी एकाच्या घरी आम्ही काही मुले एकदा एका सुटीत एकत्र जमलो होतो. निर-निराळ्या प्रकारच्या खेळकौतुकात एका मुलाने एका फुटक्या बाटलीची काच हातात घेऊन हसत हसत मला म्हटले, ' हे पाहा दोस्त, या काचेचे जर कुणी चावून तुकडे केले, तर त्याला मी ताबडतोब एक रुपया देईन. ' मी म्हटले, ' ठीक आहे. दे. मी चावतो.' असे म्हणून त्याच्या हातून ती काच घेऊन चावायला सुरवात केली. खालच्या वरच्या दाताच्या दोन कवळ्यांत धरून काच चावू लागलो तोच उजवीकडच्या खालच्या ओठाला ती काच लागून तो माझा ओठ फाटला. पुढे त्याच स्थितीत धावत धावत मामाच्या घरी गेलो. मोठे मामा माझ्या ओठाची ती अवस्थाच पाहून भीतीने कळवळून गेले. त्यांनी असे होण्याचे कारण विचारले तेव्हा मी उत्तर दिले, ' एका चाकूचे पाते दांतांनी मी उघडीत असता त्याचे ते पाते एकदम उघडल्यामुळे ओठ कापला गेला. ' माझे हे सांगणे मामाने खरे मानले आणि डॉक्टरला बोलवून माझ्या त्या फाटक्या ओठाला त्याच्याकडून टाके घालून घेतले.

मी त्याच्याजवळ एवढीच एक खोटी गोष्ट बोललो होतो. अजूनही या गोष्टीची मला आठवण होताच माझी मला लाज वाटते. कारण माझ्या सत्य-व्रतावर त्यांचा फार विश्वास होता. मी त्यांना कधीही खोटे सांगितल्याचे अगर बोलल्याचे मला आठवत नाही.

इतकेच नव्हे, तर माझ्या सत्यवादित्वावर त्यांचा असलेला गाढ विश्वास पाहून मी केव्हा केव्हा मनोमन आश्चर्यचकित होतो. मागाहून त्यांना दुःख होऊ नये अगर खेद वाटू नये म्हणून मी नेहमी वाईटाची संगत सोबत करण्याचे टाळीत असे. मला भीतीच वाटे. ते दृढनिश्चयी कर्तव्यपरायण होते. तंबाखू

ओढण्याचीही त्यांना सवय नव्हती. धीरगंभीरपणाने ते प्रत्येक काम करीत आणि रात्रंदिवस अध्ययनात मग्न असत. त्यांना मी पाहिले नसते अगर त्यांच्या नजरे-समोर माझ्या चारित्र्याची घडण झाली नसती तर आज माझ्यात सद्भावाची जी जागती ज्योत तेवत आहे ती तशी तेवली नसती. अशा या माणसाजवळ मी खोटे बोललो याबद्दल पुष्कळ दिवसपर्यंत माझ्या मनाला खेद होत असे आणि अन्तःकरणात ती गोष्ट टोचत असे.

कलकत्त्याला मामांच्या बिऱ्हाडी असताना घडलेल्या एका हास्यकारक घट-नेची हकीगत अशी : लहानपणी मी जे काही करीत असे त्यात इतका तन्मय होऊन जाई की दुसरे काही मला दिसत नसे की ऐकू येत नसे. एकदा झाडावरचा पक्षी बघण्याच्या नादात हत्तीच्या पायातळी तुडविला जाण्यापासून कसा बचावलो हे पूर्वी सांगितलेच आहे. मी तन्मय होऊन वाचत असता बाबांनी पुष्कळ हाका मारून देखील त्यांना उत्तर न मिळाल्यामुळे येऊन ते मला कसे मारीत व त्यांनी माझे नावही बहिऱ्या कसे ठेविले होते; हेही मी पूर्वी सांगितले आहे. असो. मामाच्या आतील बाजूस असलेल्या माडीवरील खोलीत अगदी तन्मयतेने अभ्यास करण्यात मग्न झालो होतो. इतक्यात मोठे मामा झोपण्यासाठी म्हणून वर आले. मी असा बेभान होऊन अभ्यास करीत असलो की माझे नेसते धोतर कमरेपासून अलग झाले आहे याचेही मला भान राहत नसे. असे नेहमी धोतर सुटतही असे. अशा प्रकारे माझे धोतर सुटले आहे आणि मी अभ्यासात गढून गेलो आहे. मामांच्या बुटाचा ठक् ठक् आवाज मला ऐकू येत होता; पण तितकी शुद्ध नव्हती. नेसण तर केव्हाच कमरेपासून वेगळे झाले होते, मी काही ते साव-रले नाही. शेवटी मामा जेव्हा त्या खोलीच्या दारात येऊन उभे राहिले तेव्हा मी धोतर सावरू लागलो. मामा म्हणाले, ‘ तू काय झोपला होतास ? बसून का झोप-तोस ? बिछान्यावर झोपता आले असते. ’ मी म्हटले, ‘ नाही झोपलो नव्हतो. अभ्यास करीत होतो. ’ त्यांनी विचारले, ‘ मग असा धडपडून का उठलास ? ’ मी उत्तर दिले, ‘ मला वाटले चिचुंद्री आली असावी ! ’ मामा हसून म्हणाले, ‘ अरे, चिचुंद्री काय पायात बूट घालून जिना चढून वर येते ? ’ या बोलण्याने घरातील सर्वच लोक जोरजोराने हसू लागले. शेवटी मामांनी माझ्या या अभ्या-सात मग्न असण्याच्या व मनाच्या विलक्षण एकाग्रतेच्या सवयीबद्दल संतोष व्यक्त केला.

### विद्यार्थीजीवनात सैपाकी बनलो

यानंतर थोड्याच दिवसांत मातलारेल्वे सुरू झाली. मामा डेली पॅसेंजर बनून रोज आगगाडीने गावाहून कलकत्त्याला येऊ लागले. सोमप्रकाश छापखाना कलकत्त्याहून चांगडीपोता गावी स्थलांतरित झाला. पुनः माझे बिऱ्हाड मोडले.

मी दोन दिवस याच्या बरोबर, दोन दिवस त्याच्याबरोबर अशा अवस्थेत राहू लागलो. शेवटी माझे वडील आले आणि त्यांनी मला सुकियास्ट्रीटवरील बाउड बागेतील एका आप्ताच्या घरी आणून ठेविले. तो आप्त म्हणजे माझ्या आईचा आतेभाऊ. तो कंपॉझिटरचे काम करीत असे आणि एका लहानशा झोपडीवजा घरात भाड्याने राहात असे. मी तेथे आल्यावर असे ठरले की, त्याने सकाळचा सैपाक करायचा आणि मी रात्रीचा. पण प्रत्यक्षात असे झाले की दोन्ही वेळचा सैपाक मलाच करावा लागू लागला. इतकेच नव्हे तर भांडी घासणे, केर काढणे, बाजार करणे, पाणी काढणे वगैरे कामेही माझ्याच अंगावर पडली. पुष्कळदा मला डाव्या हातात अभ्यासाचे पुस्तक आणि उजव्या हातात भात ढवळण्याची पळी अशी दोन्ही कामे एकदमच करावी लागत. पुष्कळ दिवसांनंतर त्यावेळचे माझे एक अभ्यासाचे पुस्तक माझ्या पाहण्यात आले; त्यावर डाव्या हाताचे हळदीचे डाग पडलेले अजूनही तसेच असल्याचे मला दिसले. यावरून असे अनुमान करता येते की, मसाला वाटून झाल्यावर लगेच ते पुस्तक मी वाचण्याकरता घेतले असावे आणि त्यामुळेच त्याच्यावर हळदीचे डाग पडले असावेत.

या ठिकाणी काही दिवस राहिल्यावर माझ्या वडलांनी मला कलकत्त्याच्या उपनगराजवळ भवानीपूर येथे कै. महेशचंद्र चौधरी महाशय यांच्या घरी ठेविले.

* * *

४.

# धार्मिक जीवनाचा उगम

## चौधुरींच्या घरचा 'भट्टीबाबू'

भवानीपूर येथे कै. महेशचंद्र चौधुरी महाशयांच्या घरात आप्तांवेगळा होऊन मी एकाकी स्थितीत राहू लागलो. हे सत्प्रवृत्त साधुवृत्तीचे गृहस्थ. कलकत्याच्या हायकोर्टात वकील होते. वर्धमान जिल्ह्यातील आमदपूर गावचे हे जमीनदार. कुडोराम चौधुरींचे नातू. यांचा वंश सौजन्य, सत्प्रवृत्ती, सच्चारित्र्य या बाबतीत प्रसिद्ध. महेशचंद्र चौधुरी महाशय आपल्या गुणवत्तेमुळे सर्वांच्या आदराला पात्र झालेली व्यक्ती होती. त्यांच्यातील सत्प्रवृत्ती व साधुवृत्ती जी मी पाहिली होती ती कधी विसरता येणे शक्य नाही. यांनी व यांच्या परिवारातील मंडळींनी मला स्वतःच्या आप्तसंबंधीय मुलाप्रमाणे वागविले. बाबा बंगाली शाळेत कलकत्त्याला येण्यापूर्वी यांच्या घरी पौरोहित्य करीत असत. आणि त्या संपर्कानेच यांचा त्यांच्याशी घनिष्ठ परिचय झाला. ही सर्व मंडळी इतकी सद्गुणी व आपुलकीने वागणारी होती की, मला ती घरच्यासारखीच वाटे. आणि तेही मला घरातील मुलाप्रमाणे वागवीत. मी एक गरीब ब्राह्मणाचा मुलगा यांच्या अन्नावर पोसला जात आहे, असे त्यांची माझ्याशी असणारी वागणूक पाहून, मला कधीच वाटत नसे. मी यांचा घरचाच मुलगा आहे असे वाटे.

ते मला 'भट्टी भट्टी' म्हणून हाक मारीत. याचा थोडासा इतिहासही आहे. माझ्या गावच्या एका अल्पशिक्षित ब्राह्मण तरुणाने यांच्या घरी मी असताना एकदा मला पत्र लिहिले होते. त्या वेळी त्या पत्राखाली स्वतःची सही करताना त्याने 'भट्टाचार्य' लिहिण्याऐवजी 'भट्टीय्य' असे लिहिले होते. या असल्या सहीमुळे आमच्यात पुष्कळ हास्यकल्लोळ उसळला. त्या वेळेपासून मलाही भट्टाचार्य पदवी मिळाली आणि त्या पदवीचा संक्षेप 'भट्टीय्य भट्टीय्य' असा

झाला. मला याच नावाने सगळे संबोधू लागले. भट्टीय्य शब्दाचे हळूहळू ' भट्टी ' शब्दात रूपांतर झाले. शेवटी नोकरचाकर इत्यादी सर्वच मला ' भट्टीबाबू भट्टीबाबू ' असे म्हणू लागले. वरच्या मालकांच्या तोंडून मला उद्देशून उच्चारले जाणारे ' भट्टी ' नाव मला फार गोड वाटे. कारण त्यात निष्कपट प्रेम आणि आपुलकी व्यक्त होत असे.

हे लोक मला किती आपलेपणाने वागवीत याचे एक उदाहरण या ठिकाणीच देणे चांगले. त्यांनी एकदा आपल्या कोठीची चावी माझ्या हाती दिली आणि सांगितले, ' सकाळी अभ्यासाला बसण्यापूर्वी तू या कोठीचे कुलूप काढून दार उघड. नोकरांना बोलाव आणि घरात लागणारे सर्व जिन्नस स्वतः नीट पाहून त्यांच्याकडे दे. नंतर अभ्यासाला बैस. चावी तुझ्याकडेच राहू दे. ' त्या मोठ्या परिवाराचे हे भांडारगृह म्हणजे फार मोठी जोखीम होती. ६०–७० जेवणारी माणसे. १०–१५ नोकर. ४–५ घोडे. ८–१० गुरे वासरे. जेवणाऱ्या मंडळीसाठी तांदूळ-डाळ, तेल-मीठ, घोड्यासाठी दाणा-भूशी, गुरांना पेंड-कोंडा-कणी वगैरे सगळे जिन्नस त्या. भांडारघरात असायचे. प्रत्येक दिवशी कोणते पदार्थ किती द्यायचे याची एक यादी तेथेच लावून ठेवलेली. मी सकाळी उठताच ते कोठार उघडून यादीत लिहिल्याप्रमाणे सर्व जिन्नस वजन करून नोकरांच्या स्वाधीन करीत असे आणि मग कुलूप लावून वर जाऊन अभ्यासाला बसत असे. त्यानंतर सगळ्या दिवसभर त्या भांडारकोठीचा माझ्याशी काही संबंध नसे. या सर्व जिनसांबरोबर नोकरांना लागणारा तंबाकूही मला द्यावा लागे.

## सपाक्याला निरोप दिला–घालविला

एके दिवशी माझी शाळा बंद होती. मी त्या दिवशी घरीच होतो. सैंपाकी ब्राह्मण–नवीन ठाकूर येऊन मला म्हणाला, ' भट्टीबाबू, आम्हाला आणखी तंबाकू द्या ना. ' मी प्रथमच त्याला सांगून टाकले, ' जितका तंबाकू तुम्हाला देण्याबद्दल यादीत नोंदले आहे, तितका दिला आहे. आणखी का मागता ? ' नंतर विचार केला, थोडासा तंबाकू द्यावा. त्यात काय आहे ! द्यावा झाले. आणि मग कोठी उघडून त्यातून तंबाकू आणून त्याला द्यायला गेलो तेव्हा तो म्हणाला, ' भट्टी-बाबू, आमच्याबरोबर अशा तऱ्हेने तोलूनजोखून वागू लागला तर इथे टिकून राहणे कठीण होईल बरे. ' त्या सैंपाकी ब्राह्मणाचे ते धमकीवजा बोलणे ऐकून मला वाटले या भांडाराची चावी माझ्या हाती ठेवणे बरे नाही. हे चाकर-नोकर मला अन्नाश्रित समजून माझे सांगणे ऐकणार नाहीत. पदोपदी वादविवादाचा प्रसंग येईल. असा विचार करून दुसऱ्या दिवशी भांडारकोठीची चावी मालकांना नेऊन दिली. खरे कारण कुणाला सांगितले नाही. फक्त महेशचंद्र चौधुरींचा पुतण्या श्रीशचंद्र चौधुरी यांच्याकडे तेवढे बोललो. पण त्यांनाही ते गुप्त ठेवण्यालाच

सांगितले. मी जेव्हा चावी परत द्यायला गेलो तेव्हा मालकांपैकी एकाने म्हटले, ' का परत देतोस ? तुझ्यावर आमचा पूर्ण विश्वास आहे. तुझ्या हाती चावी असली म्हणजे आम्हांला कसली काळजी नाही. ' हे बोलणे जेव्हा सुरू झाले तेव्हा श्रीशनी येऊन त्यांना घडलेली सर्व हकीगत सांगितली. मग त्यांच्यात त्याबद्दल चर्चा सुरू झाली. ती ऐकता ऐकताच मी तिथून निघून गेलो. जाताना पाहिले तो मोठेदादा अर्थात महेशचंद्र चौधुरी महाशय व्हरांड्यात एका बाजूला राहून दंत-धावन करीत होते. काही मिनिटांतच नोकराने येऊन मला सांगितले की, ' भट्टी-बाबू, लवकर या. लवकर या. काही तरी भयंकर प्रकार झालेला दिसतो. मोठेबाबू– महेशदा– तुम्हांला बोलवीत आहेत. ' लागलीच मी परत गेलो. तेथे पाहिले तो बडेबाबू–महेशदा– सैपाकघराच्या दारात उभे राहून सैपाकी ब्राह्मणाला सांगत होते, ' ठेव. ठेव तो झारा–पळी, खाली ठेव. आत्ताच्या आत्ता घरातून चालता हो. नाही तर धक्के मारून घालवून देईन. ' मी जवळ जाऊन उभा राहाताच मला ते म्हणाले, ' काय भाई, नवीन ठाकूर तुला काय म्हणाला ते सांग पाहू. ' मी सांगितले, ' जास्त काही सांगितले असे नाही. सामान्य अशी एक गोष्ट बोलला. त्यासाठी इतके रागवायचे कशाला ? ' मोठेदादा रागातच म्हणाले, ' ओः काय म्हणाला ते सांग ना. सामान्य की विशेष त्याचा विचार मी करीन. ' तेव्हा मग मला सांगावेच लागले, ' हा म्हणाला, भट्टीबाबू, आमच्याशी असे तोलूनजोखून वागू लागला तर इथे टिकून राहणे कठीण होईल. ' यावर मोठे बाबू म्हणाले, ' आणखी काय सांगायला पाहिजे ? सांगायचे काय शिल्लक ठेविले आहे ? दोन चपला मारल्या नाहीत इतकेच. आणि अशा तुझ्या सौम्य वागण्यानेच तुझा अप-मान, अनादर करायला हे मागेपुढे पाहात नाहीत. ' इतके मला बोलल्यावर पुनः ते नवीन ठाकूरकडे वळून म्हणाले, ' जा. इथली तुझी नोकरी संपली. इथे तर तू टिकू शकत नाहीसच; पण गावात तरी कसा राहातोस त्याचा विचार करतो, ( कारण बडेबाबू हे आमदपूरचे जमीनदार असून नवीन ठाकूर हा त्यांची रयत होता. )

नवीन ठाकूरला त्या घरातून अशा तऱ्हेने घालवून दिल्यावर तो बाजारात रस्त्याच्या कडेला असलेल्या एका दुकानात आश्रयासाठी राहिला. मी शाळेत जाताना त्याला तेथे पाहात असे; तेव्हा तो खिन्न मुद्रेने बसलेला दिसे. माझ्या अंतःकरणात मोठी खळबळ उडून राहिली. ' माझ्या मनात आले, मी गरीब ब्राह्मणाचा मुलगा, हाही एक गरीब ब्राह्मण. माझ्यामुळे याची नोकरी गेली ! ' हे विचार मला असह्य झाले. एके दिवशी मोठेबाबू कोर्टातून आल्यावर अंगणात शतपावली करीत असलेले पाहून, मी नवीन ठाकूरसाठी त्यांच्याकडे रदबदली करायला गेलो. ते गंभीर स्वभावाचे माणूस होते. त्यांच्याशी जवळिकीने बोलायला भीती वाटे. त्यामुळे स्तब्ध राहूनच बोलावे की न बोलावे असा विचार करीत

त्यांच्या मागून मागून फिरत राहिलो. मी अशा रीतीने मागून फिरत असलेला पाहून ते मागे वळून उभे राहिले आणि म्हणाले, ‘ काय दोस्त ! मला काही सांगायचे आहे वाटते ? ’ मी लागलीच म्हटले, ‘ आपण नवीन ठाकूरला एकदा क्षमा करा. नाहीतर माझ्या मनाला ती गोष्ट फार लागेल. ’ यावर ते म्हणाले, ‘ शीः तू मोठा मिल्की माइंडेड दिसतोस. स्वतःच्या कर्माचे फळ त्याला भोगू दे. आठदहा दिवस जाऊ देत ना. मग पाहू. ’ मी पुनः म्हटले, ‘ तो निराश्रित होऊन बाजारातील एका दुकानाच्या आधाराने दिवस कंठीत आहे. डोके टेकायला त्याला जागाही नाही. खाण्यापिण्याचीही मारामार. ती त्याची स्थिती माझ्याने पाहवत नाही. ’

इतके मी सांगितल्यावर मग त्यांनी नोकर पाठवून बाजारातून त्याला बोलावून आणले आणि सांगितले, ‘ पाहा. पाहा याच्याकडे. तू कुणाचा अपमान केलास ते पाहा. तुझ्यासाठी हा माझ्याकडे माफी मागतो आहे. भल्या माणसाची तुला पारख नाही. याच्यासाठीच तुला येऊ दिले; जा. आपले काम कर. अशा रीतीने नवीन ठाकूर आपल्या कामावर रुजू झाला. माझ्या मनाची होणारी तगमगही थांबली. त्या एका दिवसाचा तो प्रकार आणि चौधुरी महाशयांचे माझ्यावरील अकृत्रिम प्रेम माझ्या आठवणीत कायमचे राहून गेले.

यांच्या घरात आल्यामुळे माझा पुष्कळच फायदा झाला. हे त्यांचे उपकार मी कधीच विसरणार नाही. पहिली गोष्ट म्हणजे महेशबाबूंचे चरित्र माझ्या डोळ्यांसमोर असल्यामुळे ते माझा एक आदर्शच बनून गेले. जेव्हा जेव्हा मी त्यांना पाहात असे तेव्हा तेव्हा एक नवी आकांक्षा माझ्या अन्तःकरणात उत्पन्न होई. दुसरे म्हणजे येथे आल्यापासून आयते जेवण आणि वाचण्याला उपयुक्त असे पुष्कळसे ग्रंथ मला मिळाल्यामुळे अभ्यास उत्तम होऊ लागला. सगळ्या सोयी आयत्या मिळू लागल्या. जरी या घरात माझ्यासारखे अनेक विद्यार्थी विद्यार्जनासाठी राहात असत आणि अनेकदा आम्हांला सामुदायिकरीत्या एकत्र राहून अभ्यास करावा लागे, स्वाध्याय करण्याची संधी मिळे, तरीसुद्धा माझ्यामध्ये असलेल्या एकाग्रतेच्या व तन्मयतेच्या गुणामुळे अभ्यासाच्या बाबतीत माझे फारसे नुकसान होत नसे. तिसरी गोष्ट, इथे मला स्वाध्यायाकरिता समपाठी मुले मिळाली. अभ्यास स्पर्धेने होऊ लागला. स्वतःची उन्नती स्वतःच कशी करून घ्यावी हे समजले. आणि आत्मोन्नतीची साधने मिळविण्याची इच्छा वाढीला लागली.

चौथी उल्लेखनीय गोष्ट म्हणजे ब्राह्मसमाजगृह मी राहात असलेल्या या घराजवळ असल्याने मधून मधून व्याख्याने व प्रवचने ऐकण्यासाठी मला ब्राह्मसमाजात जाता येऊ लागले. मला वाटते मी १८६२ साली भवानीपूर येथे गेलो. कारण त्या ठिकाणी डेस्टिनी ऑफ् ह्युमन लाईफ या विषयावर केशवबाबूंची ( केशवचंद्र सेन ) इंग्रजी व्याख्याने ऐकली होती. याखेरीज महर्षी देवेंद्रनाथ ठाकूर

आणि स्वर्गीय अयोध्यानाथ पकडाशी महाशय हे येथील ब्राह्मसमाजात ब्रह्मविद्यालय स्थापन करून जो उपदेश करीत, त्यातीलही काही भाग मी ऐकला होता. वास्तविक तेव्हापासून मनातल्या मनात माझा ओढा ब्राह्मसमाजाकडे झुकू लागला होता.

या आकर्षणाची आणखीही दोन कारणे होती. पहिले, भवानीपूर येथे माझा एक सहाध्यायी मित्र राहात असे. त्याच्यावर माझे फार प्रेम होते. त्याचा वडील भाऊ ब्राह्म होता. तोही माझ्यावर फार लोभ करीत असे. तो मला ब्राह्म-समाजात जायला सांगे.

## गावात ब्राह्मसमाजाची चळवळ

दुसरे कारण, माझ्या राहात्या गावी तर यापूर्वीच ब्राह्मधर्माचा प्रचार चाललेला होता. शिवकृष्ण दत्त नावाच्या एका तरुणाने पहिल्या प्रथम आमच्या गावी ब्राह्मसमाजाची बातमी पसरविली. हे मी अगोदरच सांगितले आहे. त्याचा बाप ब्रजनाथ दत्त हा एक उदारचरित असा व्यवहारी माणूस होता. पंडित मंडळीशी नेहेमी शास्त्रचर्चा करण्याची त्याला फार आवड. तसेच कलकत्ता येथे ब्राह्मसमाजामार्फत प्रकाशित होणारी ' तत्त्वबोधिनी पत्रिका ' तो घेत असे. याचा उल्लेख मी पूर्वी केला आहे. त्याकाळी आमचा गाव बराच भरभराटीला येऊ लागला होता. साधारण ब्राह्मसमाजाचे एक आचार्य पूजनीय भक्तिभजन उमेशचंद्र दत्त, सन्माननीय मित्र कालीनाथ दत्त, हरनाथ बसू, रमानाथ घोष इत्यादींचे शिवनाथ दत्त हे आदर्श होते. आणि त्यांच्याच प्रभावामुळे ते ब्राह्मसमाजाकडे आकृष्ट होऊन ब्राह्मधर्मानुसार उपासना वगैरे करण्यास प्रवृत्त झाले. यामुळे गावात खूपच खळबळ माजली आणि शिवदत्तांच्या अनुयायांचा छळही होऊ लागला; पण त्याला त्यानी शौर्याने तोंड दिले. वीराप्रमाणे ते टिकून राहिले. आणि त्या-मुळे आम्ही काही ग्रामवासी तरुण त्यांच्याकडे श्रद्धेने पाहू लागलो.

१८५९ साली आमच्या गावी येणे-जाणे असलेले व टाकी येथे राहणारे डॉ. प्रियनाथराय चौधुरी महाशयांच्या प्रयत्नानी आणि ब्राह्मसमाजिष्टांच्या सहा-य्याने एक बालिकाविद्यालय स्थापन झाले. हे विद्यालय सुरू झाले मात्र, तोच माझ्या आईने त्या विद्यालयात प्रथम माझ्या बहिणींना दाखल केले. प्रियनाथबाबू गावातून निघून गेल्यावर या विद्यालयाची सर्व जबाबदारी ब्राह्मसमाजिष्ट तरुणांवर पडली.

## गावात ब्राह्मसमाजिष्टांचा छळ

पण यानंतर काही कालावधी गेल्यावर जेव्हा उमेशचंद्र दत्त, हरनाथ बसू आणि कालीनाथ दत्त प्रभृती ब्राह्म तरुणांनी मौरसी पट्टा या भागात पैसे भरून

काही काराराने जमीन घेतली आणि त्यात शाळेसाठी एक इमारत बांधण्याची तयारी चालविली तेव्हा जमीनदार बाबूलोक त्याला विरोध करण्यासाठी उठले आणि कायदेशीर मुद्यांवर त्यांनी हरकत आणली. ब्राह्म तरुणांनी शाळेची इमारत बांधण्यासाठी नौका करून सुंदरबनातून काही लाकूडसामान व कुंपणासाठी बांबू वगैरे सामान आणविले. गावाच्या पूर्व बाजूला एका नाल्यात ही नौका येऊन थांबली, ब्राह्मतरुणांना ही वार्ता समजताच त्यातील सामान उतरून घेण्यासाठी ते तिकडे गेले. पाहातात तो चोहोकडच्या मजुरांना जमीनदारांनी ते सामान वाहून नेऊ नये असा हुकूम दिल्याचे त्यांना कळले. पुष्कळ तपास करून व जास्त मजुरीचा लोभ दाखवूनही त्यांना कोणी मजूर मिळेना. शेवटी कालीनाथ दत्त, हरनाथ बसू वगैरेंनी ते सामान स्वतःच्या खांद्यावरून शाळेच्या जागी आणण्याला आरंभ केला. हे पाहून गावातील लोक आश्चर्य करू लागले; आणि सर्वत्र तीच चर्चा सुरू झाली. पण सामान ठराविक जागी आणल्यावर पाहातात तो जे कारागीर, सुतार वगैरे घर बांधणारे लोक त्यांनी ठरवून ठेविले होते ते जमीन-दाराच्या हुकुमामुळे काम करायला तयार होईनात. लागलीच ब्राह्मतरुणांनी कमरा बांधल्या आणि स्वतःच घरबांधणीचे काम करण्याला आरंभ केला. दुसऱ्या दिवशी सायंकाळपर्यंत ते नेट धरून काम करीतच राहिले आणि जमिनीची मापे घेऊन मेडी वगैरे पुरण्याचे काम पुरे करून ते रात्री घरी गेले. पण सकाळी येऊन पाहतात तो केलेल्या कामाचा मागमूसही त्या जागी नसल्याचे त्यांना दिसून आले. आणि त्याऐवजी त्याच ठिकाणी एका बाजूला एक लहानसे गवती घर उभारलेले दिसले. ते पाहून ते चकित झाले. शेवटी जवळच्या वाड्यात चौकशी करता कळून आले की शुकरमोल्ला नावाच्या, जमीनदाराच्या एका नोकराने रात्रीच्या रात्री हे गवती घर बांधून पहाटेच्या सुमारास ब्राह्मतरुणांनी घरासाठी पुरलेले खांब वगैरे उपटून ते स्वतःच्या खांद्यावरून तो घेऊन गेला. बालिका विद्यालयाचे शिक्षक व दुसऱ्या गावाहून सासुरवाडीला आलेला एक तरुण हे सकाळीच उठत असताना त्यांना खांद्यावरून खांब वगैरे तो नोकर नेत असल्याचे दिसले.

यानंतर ब्राह्मतरुणांनी कोर्टात शुकरमोल्लाच्या नावाने फिर्याद दाखल केली. हा खटला मजिलपूरगावाहून पाचसहा कोसांवर उत्तरेच्या बाजूला असलेल्या बारीपूर गावाच्या कोर्टात चालला. असे ऐकले की जमीनदारबाबूंनी या खटल्या-साठी शुकरमोल्लाच्या नावाने शाळेसाठी घेतलेल्या जमिनीचा एक बनावट दस्तैवज तयार करून ठेविला होता. खटला दाखल होताच त्यांनी त्या गावच्या प्रमुख वकिलाला तो खटला चालविण्यासाठी वकीलपत्र दिले. इकडे ब्राह्मतरुणांनी कलकत्त्याच्या ब्राह्मसमाजिष्टांना सांगून नवीन ब्राह्मवकील तयार केले. शिवाय हा खटला कसा काय चालविला जातो हे पाहण्यासाठी कलकत्त्याहून ब्राह्मतरुणही

बहुसंख्येने बारीपूर येथे आले. कोर्टात ब्राह्म प्रेक्षकांची गर्दी होत असल्याचे ऐकून जमीनदारबाबू म्हणाले होते म्हणे, ' ओहो, आम्हांला वाटले होते या गावातील काही छोकरे तेवढेच ब्राह्म. देशात इतके ब्राह्मलोक आहेत हे आम्हाला ठाऊक नव्हते.' असो. खटल्याचा निकाल होऊन शेवटी शुकरमोल्लाला काही महिन्यांची शिक्षा झाली आणि तो कलकत्त्याजवळील अलिपूर जेलमध्ये कैदी होऊन आला. मी त्यावेळी भवानीपूर येथे राहात होतो. आमच्या गावचे ब्राह्मतरुण हरनाथ बसू महाशय हे कालीघाटावर राहात असत. शुकरमोल्ला धन्याच्या आज्ञेने अन्यायाचे काम केल्यामुळे कैदेत गेला आहे हे ऐकून हरनाथ बाबूंना फार वाईट वाटले. ते बंदीखान्यात, शुकरमोल्लाला भेटण्यासाठी व त्याला खाण्याचे पदार्थ देण्यासाठी जाऊ लागले. मला चांगले आठवते की तोपर्यंत मी उघडपणाने ब्राह्मसमाजात सामील झालो नव्हतो. पण साधुवृत्तीचे उमेशचरण दत्त, कालीनाथ दत्त, हरनाथ बसू प्रभृती ब्राह्मतरुणांकडे मी पूर्ण श्रद्धेने व भक्तिभावाने पाहण्यावागण्याला सुरवात केली होती. मला शुकरमोल्लाच्या बंदिवासाबद्दल दुःख होत असल्याचे पाहून, दर रविवारी त्याला बंदिखान्यात मिठाई वगैरे नेऊन देण्याचे काम, हरनाथबाबू मलाच सांगू लागले. मी तसे करू लागलो आणि यामुळेच शुकर-मोल्लाच्या बंदिवासाची हकीगत माझ्या चांगली ध्यानात राहिली.

स्वतः जमीनदारबाबूंनी, त्या शाळेच्या जमिनीतून ब्राह्मतरुणांना घालवून देण्यासाठी व ती जमीन त्यांच्याकडून काढून घेण्यासाठी प्रयत्न केले, पण त्यात त्यांना यश आले नाही. उलट ब्राह्मसमाजाचा प्रभाव वाढला. मग या मंडळीचा वेगवेगळ्या प्रकारे छळ करण्याला त्यांनी सुरवात केली.

एका ब्राह्मतरुणाने ' खेड्यातील धर्म कसा वाचणार ? ' ही केवढी मोठी समस्या आहे ! या नावाचे एक नाटक लिहिले. त्यात जमीनदार बाबूलोकांना लोकदृष्टीने उपहासात्मक ठरविण्याचा प्रयत्न केला होता. त्यामुळे हा संघर्ष जास्तच वाढला. शेवटी जमीनदारबाबूंनी घरोघर लोक पाठवून मुलींना शाळेत न घालण्या-बद्दल ताकीद दिली. ती ताकीद अशी, ' जो मुली शाळेत पाठवील त्याला ज्ञाति-बहिष्कृत केले जाईल. ' मी जेव्हा दर रविवारी शुकरमोल्लाला खाद्यवस्तू नेऊन देत असे, तेव्हा मुली शाळेत पाठविणे जवळजवळ बंदच झाले होते. फक्त माझ्या आईवडिलांनी आपल्या मुली म्हणजे माझ्या बहिणी शाळेत पाठविण्याचे बंद केले नव्हते. त्या दोन मुलींनाच घेऊन शिक्षकांनी शाळा सुरू ठेविली.

### ब्राह्मणपित्याचा तेजस्वीपणा

पुष्कळशा गृहस्थांनी जमीनदारबाबूंची ताकीद मानली. फक्त माझ्या आईवडिलांनी ती मानली नाही. ती उभयता अत्यंत तेजस्वी वृत्तीची होती. विद्या-सागरांची आवडती. त्यांनी लोकांच्या रागालोभाची फिकीर केली नाही. तिकडे

लक्षच दिले नाही. विद्यासागर महाशयांच्या स्वभावातील अनेक गुणदोष माझ्या वडलांतही होते. ते म्हणाले, ' काय ! इतकी त्यांची जिद्द आहे ! मी माझ्या मुलां-मुलींना शिकवायचे की नाही हे मला दुसरे सांगणार ? जरी कुणाच्याही मुली या शाळेत गेल्या नाहीत तरी माझ्या मुली जाणारच. पाहूया कोण काय करतो ते ! ' असे म्हणून माझ्या दोन्ही बहिणींना घेऊन ते शाळेत गेले आणि शिक्षकांना म्हणाले, ' केवळ माझ्या मुली आणि तुम्ही शाळेत या. एक दिवसही शाळा बंद ठेवू नका. जर बंद केली तर वरिष्ठांकडे रिपोर्ट करून शाळेची ग्रँट बंद करवीन. ' पुढे काही दिवस खरोखरच एक शिक्षक आणि दोन मुली अशा तिघांवरच हे बालिका विद्यालय चालले. शिवाय ब्राह्मसमाजिस्ट तरुणांच्या बाबतीत जमीनदारांनी फार मोठा अन्याय केल्यामुळे बाबांना त्यांचा फारच राग आला. आणि त्या तरुणांचे ते पक्षपाती बनले. वाडीतील लोकांसमोर ते त्या तरुणांच्या कामगिरीची फार प्रशंसा करीत. माझा ब्राह्मसमाजाबद्दल अनुकूल ग्रह होण्याला हेही एक कारण झाले.

## आश्विन महिन्यांतील तुफानी वादळ

आता स्वतःच्या आयुष्यक्रमाबद्दल मी सांगणार आहे. चौधरी महाशयांच्या घरी असतेवेळी १८५८ सालच्या आश्विन महिन्यात मोठे सामुद्रिक वादळ झाले. ते इतके की ती आठवण एखाद्या शिलालेखाप्रमाणे माझ्या हृदयात कायमची राहून गेली. ती पूजेची सुटीची वेळ. नवरात्राचे दिवस. मला वाटते पंचमीचा किंवा षष्ठीचा दिवस असावा. पुष्कळ लोक सुटी असल्यामुळे कलकत्त्याहून घरी निघाले होते. आणि त्याच वेळी तुफानी वारे सुरू झाले. मागील लोकांना ते चांगलेच जाणवले. माझ्या गावचा एक तरुण आणि मी असे दोघे जण भाड्याच्या एका नावेतून घरी निघालो होतो. काली घाटावरून नाव सुटली. त्या दिवशी सायंकाळपासूनच आकाश ढगांनी व्यापले आणि जोराचे वारे वाहू लागले. त्यातच पाऊसही सुरू झाला. त्या वाऱ्या पावसाच्या रात्री आम्ही दोघेही नावेतच बसून रात्र केव्हा संपते याची वाट पहात राहिलो. झोपायला काही मिळाले नाही दुसऱ्या दिवशी सकाळी मेघातून उषःकालचा प्रकाश फाकू लागला. मी पाहिले तो आमची लहानगी नाव, मगराहाट स्थळाच्या उत्तरेला असलेल्या जालासि नावाच्या बेटांच्या पुंजक्याच्या किंचित् उत्तरेला विशाल जलमय सखल प्रदेश व भातजमीन यांच्या मध्ये वादळ आणि लाटा यांच्या तडाख्यांनी डोलत उभी आहे. वाऱ्याचा जोर तर इतका वेगवान होता की समोर एक पाऊल टाकणेही कठीण ! नावेत असलेल्या दोघा नावाड्यानी ती नाव कशीबशी जालासि गावच्या बाजाराला लागून असलेल्या तीराला लाविली. आम्ही उड्या मारून जमिनीवर उतरलो आणि एका दुकानाच्या आश्रयाला राहिलो. पाहतो तो तेथेही आमच्यासारखे अनेक

नौकायात्री निरनिराळ्या ठिकाणांहून येऊन आश्रयाला राहिले आहेत. हा फोफावणारा वारा पुढे लवकरच भयंकर चक्रीवादळाचे रूप घेईल असे त्यावेळी कुणालाच वाटले नव्हते; सगळे सल्लामसलत करू लागले की, सगळ्यांनी खिचडी रांधून खावी. त्या जमलेल्या मंडळीतील दोन ब्राह्मण हे काम करायला तयार झाले. ते म्हणाले, दोघांसाठी सैपाक करायचाच, मग दहा जणांसाठी करावा लागला तर त्यात काय मोठेसे!' आम्हीही, आता या कठीण वेळी आम्हांला खिचडी तरी खायला मिळणार अशा कृतज्ञतेने आनंद व्यक्त करू लागलो. पण देवाने आमच्यासाठी वेगळीच व्यवस्था करून ठेविली होती.

## वादळामध्ये, न दमणाऱ्या पथिकाचे गाणे

खिचडीचा केलेला बेत तडीला जातो न जातो, व दुकानदाराशी डाळतांदूळ खरेदीची घालमेल संपते न संपते तोच ' रों रों ' आवाज करीत चक्रीवादळ घुसू लागले. आमच्या डोळ्यांसमोर हा हा म्हणता कित्येक गवती घरे उडून पडून गेली. शेवटी तर आम्ही ज्या दुकानात बसून, आता खिचडी खायला मिळणार, या आनंदात गढून गेलो होतो ते घर थरारू लागले ! आम्हीही येत्या संकटाला तोंड देण्यासाठी कंबरा कसल्या. त्यातच उतारूंपैकी एकाने चुटक्या वाजवीत, दुःखातही हंसे येते म्हणतात त्याप्रमाणे ' वृंदावन-बिलासिनी राई आमची.' वगैरे कीर्तनी थाटात पद म्हणायला सुरवात केली. त्याला सांगण्यात आले, ' मोशाय, गाणे ठेवा बाजूला; कंबरा बांधून तयार व्हा. घर कोसळते की काय नकळे.' तो गायक हसून म्हणाला, ' राहूदे ते घर कोसळणे ! गाण्यात फार आनंद वाटत आहे. ऐका ऐका नामसंकीर्तन ऐका.' ऐकतो कोण ! कड कड आवाज करीत घर वाकू लागले. आम्ही धावत बाहेर पडलो म्हणून सुटलो. तो गायक बिचारा गाता गाता पडलेल्या घराखाली सापडला. जो आम्ही घराबाहेर पडतो तोच वावटळीत सापडून कुठच्याकुठे उडून गेलो. सुदैवाने मी आणि माझ्या गावचा तो सोबती मित्र दोघांनीही एकमेकांचे हात गच्च धरले असल्यामुळे आम्हांला त्या वादळाने फारसे दूर नेले नाही. एक दुकान कोसळून पडून त्याच्या गवती छपराच्या दोन बाजूंच्या पेंड्या जमिनीवर पडून ढिगारल्या होत्या; त्यावर आम्ही दोघेही जाऊन पडलो. पडल्यावर पडक्या घराच्या खांबांना धरून वादळाचे तडाखे सहन करू लागलो आणि थरथर कापू लागलो उभ्या उभ्या पाहिले तो पूर्वीचा तो गायक हरदास पडक्या घराच्या छपरातून हळू हळू डोके वर काढून उठत आहे. आम्हाला जवळच त्या स्थितीत असलेले पाहून हसत हसत मोठ्या परिश्रमाने आमच्याजवळ येऊन म्हणाला, ' वडलांच्या मोठ्या पुण्याईने वाचलो बुवा ! तुम्हाला तर वाटले असेल की, मी मेलोच. आणखी काही दिवस कर्मभोग भोगायचा आहे ना ! मग इतक्यातच कसा मरेन !' असे म्हणून तो खूप हसू लागला. ते त्याचे हसणे मला अजूनही आठवते.

आणि पुष्कळदा वाटते, अशा प्रकारे सुखदुःखातही प्रसन्नचित्त असणे हे मोठे सौभाग्यच म्हणायचे. कित्येक माणसे तर अशी आहेत, की ज्यांना कोणतीही गोष्ट दुःखी करू शकत नाही. यांची स्थिती खरोखरीच प्रशंसनीय.

आम्ही तिघांनीही काही काळपर्यंत वादळाचे आघात सहन करीत असा बेत चालविला होता, की जवळच राणीरासमणीचे ऑफिस दिसत आहे–हे तिच्याच जमीनदारीचे क्षेत्र. हा गाव तिच्या अमलाखालचा. तेव्हा तिच्या त्या कचेरीचा आश्रय आम्ही केला तर बरे. लागलीच तिघेही एकमेकांचे हात घट्ट धरून तेथून निघालो. पण तेथे येतो न येतो तोच ते कचेरीचे घर जमीनदोस्त झाले. चोहोंकडचा तटही कोसळून जमिनीवर पडला !

## वादळातील मित्र

या वादळाचा प्रकोप, त्यावेळी एखाद्या दुर्दान्त दैत्याप्रमाणे सर्वत्र थैमान घालीत होता. गावातील सर्वसाधारणपणे एकही घर उभे नव्हते. सर्व भूमिसात् झाली होती. चोहोकडे पाहाता पाहाता नजीकचेच एक घर उभे असलेले दिसले. मग ठरविले की, त्याच घराचा आपण आश्रय घ्यावा. जाऊन पाहतो तो त्या गावातील बहुतेक सर्व मुलेमुली बायका यांनीच ते घर भरून गेले आहे. घर नवीनच बांधलेले असल्यामुळे या भयंकर वादळात टिकून राहिले होते. त्या घराचे मालक अत्यंत वृद्ध होते. त्यांच्या तरुण मुलाने वृद्ध मातापित्यांना लवकर जेवायला घालून खोलीत ठेविले आणि आपण वीर पुरुषाप्रमाणे कंबर कसून त्या तुफानी वादळात इकडे तिकडे फिरून त्या गावातील गृहहीन झालेल्या मुलांना व बायकांना एकत्र केले. नंतर धावाधाव करून स्वतःच्या घरात आणले. आम्ही त्या घराजवळ जाऊन पाहिले, सर्वत्र बायकाच बायका दिसल्या. सर्व घर भरून गेले आहे जणू; आमच्यात असलेले एक सद्गृहस्थ पुढे सरले आणि सर्वांना दूर करून आतपर्यंत पोचले. आम्हा दोघा मित्रांना एक प्रकारचा संकोच वाटू लागला. आम्ही दारातून मागे फिरून, मागील दारात जाऊन उभे राहिलो आणि त्याच वेळी ओट्यावरचे छप्पर आमच्या अंगावर कोसळून पडले. तेव्हा आम्ही विचार केला की, अशा प्रकारच्या घरात दडपून मरण्यापेक्षा बाहेरच्या अंगणात बसून वादळाचे तडाखे खाणे बरे ! असा विचार करून आम्ही बाहेर निघालो. तोच घराच्या आतून एका वृद्ध स्त्रीचा आवाज ऐकला. 'बाबा, तुम्ही कुठे जाणार ! इतक्या लोकांना जर घरात जागा होते तर तुम्हांलाही होईल.' नंतर आम्हांला मागे वळून घरात जाणेच भाग पडले. घरात जाताच मुलांचा व बायकांचा रडण्याचा आवाज ऐकून वाटले, या ठिकाणी प्रवेश केला नसता तर बरे झाले असते. पण आता उतरती वेळ झाली होती.

अपरान्हकाळी सुमारे चार वाजल्यावर वादळी हवेचा वेग कमी होत चालला. ज्या ग्रामस्थांनी त्या घरात आश्रय मिळविला होता ते 'बाबारे ! आई

ग !' असे म्हणत आपापल्या घराकडे धावत सुटले. त्याच वेळी आमच्या नावेचे चालक दोघेही जण आमचे बिछाने व वरकड थोडेफार सामान डोकीवरून आणून हजर झाले. ते आम्हांला म्हणाले, ' नाल्यातून नाव आणून आम्ही ती तलावात एका बाजूला बांधून ठेविली होती. पण दोरी तुटल्यामुळे ती तलावात बुडाली. त्यावेळी ती वर काढण्याला काही वेळ नव्हता. सायंकाळ होत आलेली. काय करणार ! ' त्या दोघांना तसल्या त्या पडक्या ओट्यातच ' कशीतरी रात्र काढा. ' असे सांगून आम्हीही त्या दरिद्री ब्राह्मणाच्या घरातच उरली सुरली जागा मिळाली त्यात रात्र घालविण्याचे ठरविले. हा पोद नावाच्या हलक्या जातीच्या लोकांचा ब्राह्मण ( पुरोहित ) होता.

हळूहळू सायंकाळ होऊ लागली. वृद्ध दंपत्याचा शूरवीर तरुण मुलगा-स्वभावानेही तो धीट होता-सगळ्या दिवसाचे पराकाष्ठेचे परिश्रम आणि उपवास यांनी दमला भागलेला असा विसाव्यासाठी खोलीत येऊन पडला. वृद्ध आईबाप व्याकूळतेने आणि वात्सल्याने त्याला सांगू लागले, ' अरे, हात पाय धू आणि या चौरंगाखाली तुझ्यासाठी भात ठेवला आहे तो खाऊन घे. ' त्यावेळी त्या घरात आम्ही सर्वजण मिळून नऊ माणसे होतो. त्यात आम्ही परकी पाच माणसे, म्हातारा म्हातारी, तरुण मुलगा आणि गरोदर सून अशी चार घरची माणसे, आई-वडलांचा जेवणाबद्दलचा जिव्हाळ्याचा आग्रह पाहून मुलगा म्हणाला, ' हे बाबू लोक सगळ्या दिवसाचे उपाशी इथे आहेत. हे घरात बसून राहणार आणि मी एकटा जेवू ? हे काय योग्य दिसते ? ' शेवटी तो उपाशीच राहिला. कितीही समजावले तरी तो जेवायला तयार झाला नाही. त्यामुळे आम्ही परकी माणसे रागावून त्याला म्हणालो, ' हे काय बोलणे झाले ! या असल्या आपत्तीत कोण कुणाचा कसला पाहुणचार करणार ! तुम्ही सगळ्या दिवसभर धावपळ केलीत. आहे ते जेवण जेवून घ्या. यात कसला अनादर होत नाही की अन्याय होत नाही. ' पण तो काही केल्या ऐकेना. तसाच बसून राहिला. शेवटी मी विचारले, ' बरे, तुमच्या घरात आम्हा सर्वांन खाता येईल असे काही आहे का ? ' तो म्हणाला, ' तांदूळ आहेत. पण ते अगदी भिजून गेले आहेत. ' मी म्हटले ' ठीक आहे, ते भिजलेले तांदूळ आम्हाला द्या. ' मग मी ते भिजके तांदूळच घेतले आणि सर्वांना वाटून दिले. नंतर म्हटले, ' चांगले लागोत न लागोत, खा तुम्ही. नाही तर तो जेवणार नाही. ' आम्ही सर्वांनी ते भिजके तांदूळ खाण्याला सुरवात केली. तितक्यात मला आठवले की नावेतून घरी नेण्यासाठी म्हणून एक गाडगेभर कडधान्य मी आणले होते. सगळ्या दिवसभर पावसांत भिजल्यामुळे त्याला आता मोड आले होते. मी तेच भिजलेले दाणे आणून सर्वांना तांदळांबरोबर खाण्याला दिले. आमचे हे जेवण काही फारसे वाईट झाले नाही. नंतर झोपण्याची व्यवस्था. त्या गरीब ब्राह्मणाच्या घरी जेवढ्या म्हणून काही रजया गोधड्या चटया

होत्या त्या जरी भिजून गेल्या होत्या तरी थंडीने काकडणाऱ्या सर्व मुलांमुलींना अंथरण्यापांघरण्यासाठी यथाभाग आधीच वाटून दिल्या होत्या. फक्त दोन सतरंज्या काहीशा सुक्या राहिल्या होत्या. तो तरुण म्हणाला, ' एकात आम्ही कौटुंबिक सर्व भागवून घेतो. एक तुम्ही घ्या. झोपा कसेबसे झाले. आम्ही सर्वांनी मोठ्या आदराने त्याने दिलेली सतरंजी घेतली आणि त्याला उगाच उसना राग आणून म्हटले, ' तुमचा सगळा परिवार एका वस्त्रावर भागविणार आणि आम्हांला एक. ' नंतर आमच्या बरोबरच्या लोकांना म्हटले, ' एवढे एकच सुके कापड आहे. त्या बिचाऱ्यांना पांघरायला होईल. ते, आम्ही इतके जण घेऊन काय करणार ! माझे हे बोलणे तोंडदेखले आहे हे सर्वांनी ओळखले आणि ते हसू लागले. हसता हसता म्हणाले, ' आता जास्त शिष्टाई नको. ती चार जणे एकावर आणि पाच जण एकावर अशी झोपू या. असल्या या बिकट प्रसंगी नसती शिष्टाई करण्यात अर्थ काय ! ' पण त्यांच्या या आपलपोटेपणाचा मला राग आला आणि मी सतरंजीच्या बाहेर ओल्या जमिनीवरच निजलो आणि गाढ झोपी गेलो.

दुसरे दिवशी जाग येताच डोळे उघडून पाहिले तो चांगलीच उन्हे पडलेली दिसली. माझ्या पूर्वीच सर्वांनी उठून प्रातःकृत्य उरकण्याला आरंभ केला होता. मी बाहेर जाऊन पाहिले तो त्या वृद्ध दांपत्याचा मुलगा आमच्या दोघाही नावाड्यांबरोबर तलावात बुड्या मारून नौका वर काढण्याचा प्रयत्न करीत असलेला दिसला. लागलीच मी त्याला तसे न करण्याबद्दल सांगितले; पण त्याने ते ऐकूनच घेतले नाही. खूप प्रयत्न करून शेवटी त्या तिघांनी ती नाव पाण्यातून वर काढली. नावाडी त्यातील पाणी उपसू लागले व ती कोरडी करू लागले. ब्राह्मण तरुण एखाद्या हमालाप्रमाणे आमचे सामान आणू लागला. ते आणीत असता वाटेत झाडावरून तुटून पडलेल्या एका गांधील माशांच्या पोळ्यावर त्याचा पाय पडल्यामुळे त्यांतील पुष्कळशा माशा त्याच्या पायाला डसल्या आणि त्याचा पाय चांगलाच सुजला. तरी पण सामान वाहून आणण्याचे काम काही त्याने बंद केले नाही. ते सर्व पाहून त्याच्याबद्दल आम्हांला किती कृतज्ञता वाटली, ते काही भाषेने व्यक्त करता येत नाही.

मी त्या ब्राह्मणाच्या मुलाला पुढे आर्थिक मदत केली. आणि नंतर जेव्हा जेव्हा नौकेतून मी घरी जात असे तेव्हा तेव्हा त्या गावी उतरून व त्याची पूस-तपास करून थोडीफार पैशांची मदत करून पुढे जात असे. तो गाव एखाद्या तीर्थक्षेत्राप्रमाणेच मला झाला होता. काही वर्षांनी मी पुनः तिथे गेलो असता मला ते तिथे आढळले नाहीत.

**चपलाच्या पायांनी उड्डो साहेबाच्या खोलीत**

साल आणि तारीख काही आठवत नाही. भवानीपुऱ्यांत चौधुरी महाशयांच्या घरी असताना वडलांनी एक सरकारी कागद पाठवून आज्ञा केली की,

'हा कागद तू स्वतः आपल्या हाताने स्कूल इन्स्पेक्टर उड्रोसाहेब यांच्या हाती दिला पाहिजे.' त्यांच्या आज्ञेनुसार एके दिवशी कॉलेजला जाण्यापूर्वी मी उड्रो साहेबांच्या ऑफिसात हजर झालो आणि तो येण्याची वाट पाहात बसलो. साहेब त्यावेळी बाजूच्या खोलीत खाना खायला बसला होता. थोड्या वेळाने ऑफिसात आला. मी नमस्कार करून त्याच्या हाती तो कागद दिला. तो कागद घेण्यापूर्वी त्याने मला विचारले, 'ऑफिसच्या बाहेर चपला काढून न ठेवता तू तसाच आत का आलास ?'

मी उत्तर दिले, 'ऑफिसात प्रवेश करण्यापूर्वी चपला बाहेर काढून ठेविल्या पाहिजेत असा नियम असल्याचे मला माहीत नाही. तसे असते तर मी असा आत आलो नसतो.'

प्रकार असा होता. त्यावेळी माझी इतकी दारिद्र्यावस्था व कठीण परिस्थिती होती की मला नेहेमी साध्या चपलाच वापराव्या लागत. बूट वापरता येणे कठीण होते. अर्थात त्या दिवशी चपला घालूनच कॉलेजात जातेवेळी रस्त्यात असलेल्या साहेबांच्या ऑफिसांत पायात चपला असताना गेलो होतो. आणि तें पाहूनच साहेब खवळला होता.

माझे उत्तर ऐकून साहेब म्हणाले, 'तू पायात चपला असताना आत येऊन माझा अपमान केला आहेस. बाहेर चपला काढून ये.'

मी सांगितले, 'नाही साहेब, मी बाहेर चपला ठेवून येणार नाही. मी आपला कसा अपमान केला ते अजूनही माझ्या ध्यानात येत नाही. आपल्या पायात बूट आहे, आपल्या कारकुनाच्या पायांतही बूट आहे. तेव्हा ते आपण काढून ठेवाल तर मीही तसे करीन.'

साहेब म्हणाले, 'हे बूट आहेत.'

'बूट पायात घालून मी आत आलो असतो तर आपला अपमान झाला नसता असेच ना ? मग चपला पायात घालून आल्याने आपला अपमान कसा होतो हे मला कळत नाही.' मी म्हटले.

साहेब म्हणाले, 'माझ्या ऑफिसचा असा नियम आहे हे तुला माहीत नाही ?'

'नाही साहेब. असला नियम मी माझ्या जन्मात ऐकला नाही !'

'तू चपला काढणार की नाही सांग.'

'नाही साहेब, काढणार नाही.'

'तर मग तुझ्या हातचा तो कागद मी घेणार नाही.'

'मी हा कागद आपल्या डेस्कवर ठेवून जातो. ते पत्र आपल्या नावचे आहे. घ्यायचे असेल तर घ्या. घ्यायचे नसेल तर घेऊ नका. माझे काम मी केले.'

असे म्हणून डेस्कवर तो कागद ठेवला आणि मी जायला निघालो, तेव्हा साहेब म्हणाले, ' ऐक, ऐक. उभा राहा. ' अर्थात् मी थांबलो.

' राजा राधाकान्त देव अत्यंत आजारी आहेत. तू ऐकले आहेस ? '

' होय साहेब. ऐकले आहे. ' मी उत्तर दिले.

यावर साहेब मला म्हणाले, ' ठीक माझी गाडी जोडून तयार आहे. जर माझ्याबरोबर येण्याची इच्छा असेल तर चल. मी आताच त्यांना पाहायला निघालो आहे.'

' नाही साहेब, मला कॉलेजात जायला उशीर होत आहे.'

साहेबांनी विचारले, 'बरे, जर तू माझ्याबरोबर आलास तर त्याच्या खोलीत जाण्यापूर्वी चपला काढून ठेवशील की नाही ? '

' तेथे चपला काढून मग आत जाईन ' असे सांगणार तोच साहेबांनी मला अडवून विचारले, ' होय की नाही तेवढेच सांग. मला तुझे आणखी काही ऐकायचे नाही.

' होय साहेब. मी बाहेर चपला काढीन. ' मी उत्तर दिले.

' तर मग माझ्याच खोलीत येताना तू तसे का नाही करीत ? '

मी म्हटले, ' आपण कारण ऐकून घेणारच नाही. मग मी कसे सांगू ? ' साहेबांनी कारण ऐकण्याची तयारी दर्शविली असती तर मी सांगितले असते, ' बंगाली प्रतिष्ठित लोकांच्या बैठकीच्या जागी जाजम अंथरलेले असते. ' सगळेच चपला काढून आत जातात. अर्थात् मलाही त्याप्रमाणे करणे भाग आहे. ' पण साहेब माझे म्हणणे ऐकून घ्यायलाच तयार नाही. मग नाइलाजाने मी मौनच धारण केले. आणि त्यांना नमस्कार करून बाहेर पडलो. तितक्यात साहेबांनी मला पुनः हाक मारून म्हटले, ' मुला, ऐक ऐक. ' लागलीच मला आत जाणे भाग पडले.

' तू एक गोष्ट ऐकली आहेस ? स्वतःला जर मान, आदर मिळावा असे वाटत असेल तर दुसऱ्याचाही मान प्रथम राखला पाहिजे. '

' साहेब हे सद्वचन मी पुष्कळ दिवसांपासून ऐकत आहे. ते योग्यच आहे.' असे सांगून पुन्हा त्यांना नमस्कार करून घाईघाईने मी तेथून बाहेर पडलो आणि कॉलेजकडे पळत सुटलो.

सायंकाळी मोठ्या मामांनी मला बोलवून माझ्या तोंडून हे सर्व ऐकून घेतले आणि म्हटले, ' उड्रो साहेबाला तू चांगलाच जबाब दिलास. तुझ्या पायातील चपला तो काढू शकला नाही हे ऐकून मला फारच संतोष वाटला. माझा भाचा म्हणवून घेण्याला तू योग्य आहेस ' नंतर त्यांनी आपल्या ' सोमप्रकाश ' साप्ताहिकासाठी ही सगळी झालेली हकीगत लिहून देण्याला सांगितले. मीही ' उड्रोसाहेब आणि चपला ' असे हेडिंग देऊन ती सगळी हकीगत लिहून दिली. नंतरच्या

सोमवारच्या अंकात ' फलाणा साहेब आणि चपला ' असे हेडिंग देऊन मामाने तो लेख प्रसिद्ध केला. त्या लेखात त्याने बिचाऱ्या उड्रो साहेबाबद्दल अनेक बऱ्या-वाईट शब्दांत टीका केली होती. पुढे मी ऐकले की, तो लेख वाचून साहेब माझ्या-वर खूप संतापला आणि ऑफिसातील कारकुनांना म्हणाला, ' हा मुलगा कॉलेजांतून बाहेर पडल्यावर जर नोकरीबद्दल अर्ज घेऊन आला तर मला कळवा. ' उड्रो-साहेबासारख्या न्यायी व सत्प्रवृत्त पुरुषाच्या नजरेने मी दोषी ठरावा याबद्दल माझ्या मनाला फार दुःख वाटले.

पण तो साहेब सद्बुद्धीचा असल्यामुळे ही गोष्ट त्याच्या मनात राहिली नाही, तो विसरून गेला ही गोष्ट वेगळी. कारण पुढे नोकरी करण्याची वेळ आली तेव्हां, मी भवानीपूरच्या साऊथ सबर्बन स्कूलमधून हेयरस्कूलमध्ये आलो असता या साहेबाच्याच मदतीचा मला फार उपयोग झाला. आणि त्याच्या कारकुनांनी पूर्वी घडलेली ती हकीगत त्याच्या नजरेलाही आणली नाही. आणली असती तर परिणाम काय झाला असता कुणाला माहीत ! तरी पण तो मनाचा थोर असल्या-मुळे माझ्या साऊथ सबर्बनमधील शाळेच्या कामाबद्दल जसा खूष होता तसाच तो पुढेही राहिला असता, माझी पूर्वीची आगळीक जाणूनही त्याने माझ्या बाबतीत अन्याय केला नसता असे मला वाटते. माझ्या मामांनी आपल्या ' सोमप्रकाश ' साप्ताहिकात ती प्रसिद्धी दिली म्हणूनच मला त्या गोष्टीची विस्मृती झाली नाही.

## काव्यचर्चा आणि कवितायुद्ध

मधून मधून मी ' सोमप्रकाश ' मध्ये आणि ' एज्युकेशन गॅझेट ' मध्ये कविता लिहीत असे. त्या वाचून लोक माझी प्रशंसा करीत. त्यामुळे कविता करण्यात मला उत्साह वाटे. या काव्यलेखनामुळे प्यारीचरण सरकार महाशयाशी माझा विशेष निकट संबंध आला. ते त्यावेळी प्रेसिडेन्सी कॉलेजात प्रोफेसर होते-तसेच ' एज्युकेशन गॅझेट ' चे संपादक म्हणून ते काम करीत. शिवाय सुरापान-निवारिणी सभेचे ते अध्यक्षही होते. प्रथम त्यांच्या साप्ताहिकात माझ्या लहान लहान कविता छापल्या गेल्या. त्या त्यांना फार आवडल्या व त्यांनी मला कविता करण्याला उत्तेजन दिले.

यानंतर एक विशेष घटना घडली आणि त्यामुळे माझ्या कवित्वाचा ओघ दुसऱ्याच दिशेकडे वळला. आमच्या भवानीपुऱ्यात विलायतेला जाऊन आलेल्या एका डाक्टरने दवाखाना उघडला. त्याने आपल्या दरवाजावर जो साईनबोर्ड लावला होता त्यावर आपल्या नावापुढे ' डॉट्' अशी पदवी लाविली होती. आणि यामुळे आम्हा तरुण मंडळीत मोठा हास्यकल्लोळ उडाला. ती संधी साधून मी बंगाल्यांच्या साहेबी अनुकरणावर विडंबनात्मक काव्यलेखनाचा वर्षाव सुरू केला. त्यासाठी विलायतची वारी करून आलेला ' एस्. एन्. डॉट् ' असे टोपण नांव

धारण करून ' एज्युकेशन गॅझेट ' मध्ये कविता लिहू लागलो. बंगाली लोकांचे जे आवडते असेल, जे रीतिरिवाज त्यांच्यात बद्धमूल झालेले असतील त्यांवर विडंबनात्मक काव्य करावयाचे आणि इंग्रजांच्या रीतिरिवाजांची थोरवी वर्णन करावयाची हाच या काव्यकल्पनेचा हेतू. अर्थात हे सर्व उपरोधिक असावयाचे हे ठरलेलेच. दुसरा एक आमच्यातील नवकवी, स्वदेशीचा भक्त व अभिमानी बनून माझ्या प्रसिद्ध झालेल्या कवितांना कवितेतच उत्तर देऊ लागला. आठवड्यामागून आठवडे याप्रमाणे हे कवितायुद्ध सुरूच झाले. चोहोकडे त्याची चांगलीच चर्चा होऊ लागली. मी देशी भावनेनेच वागत असून केवळ साहेबी नक्कल करणाऱ्यांचा उपहास अगर विडंबन करण्यासाठीच हे सर्व कवित्व करीत असतो हे सर्वांना चांगले कळले होते. या सगळ्या कवितांपैकी काही ओळी माझ्या ध्यानात आहेत. पण त्या वाचल्या असता आपणाला हसू येईल. माझ्या प्रतिस्पर्ध्याने विद्यासागर महाशयांची प्रशंसा करणारी कविता केल्यावर मी बंगभूमीला उद्देशून लिहिले होते—

> शेंडीवाला भट्टाचार्य जणुं ज्ञानाचा भुर्क्या ।
> धवलांगी ताम्रकेशी मार्जारलोचना,
> सुखें करीन विवाह ( आहे ) आंग्लीय ललना ।

या संपर्काने प्यारीबाबूंकडे माझी प्रतिष्ठा वाढली. त्याचे झालेले एक पर्यवसान मला आठवते. मला वाटते हे यानंतर काही दिवसांनी घडले असवे. एकदा माझे मित्र उमेशचंद्र मुखोपाध्याय यांनी, चितगावचे राहणारे व प्रेसिडेन्सी कॉलेजचे एक विद्यार्थी नवीनचंद्र सेन यांनी लिहिलेली एक कविता मला आणून दाखविली. मी कविता वाचली. मला ती फार आवडली. नंतर मी उमेशबरोबर नवीनचंद्राच्या बिऱ्हाडी जाऊन त्यांची भेट घेतली, आणि ती कविता ' एज्युकेशन गॅझेट ' मध्ये प्रकाशित करण्याला त्यांना प्रोत्साहन दिले. माझ्या विनंतीवरून ती कविता त्यांनी माझ्याच हाती दिली. मी ह्यात थोडी खाडाखोड व माझ्या बुद्धीप्रमाणे सुधारणा करून प्यारीबाबूंच्या हाती देऊन आलो. त्यांनी ती एज्युकेशन गॅझेटात छापली. आणि नवीनला बोलावून त्यांना उत्तेजन दिले. पुढे नवीनचंद्र सेन यांच्या कवितासंग्रह ग्रंथातही ती छापली गेली. छापील ग्रंथ वाचला तो त्यात ती कविता होती आणि माझ्या आठवणीप्रमाणे मला वाटते मी त्यात सुधारून लिहिलेल्या चारदोन ओळी अजून तशाच आहेत. मला जेव्हा त्याची आठवण होते तेव्हा मी त्यावेळच्या त्या अल्पवयातही काव्यप्रांतात कसा व किती मुरब्बी बनत चाललो होतो ! ' असे मनात येऊन माझे मलाच हसू येते.

## शिकाऱ्याची संगत आणि मद्यपान

प्यारीबाबूंच्या सहवासात येण्यामुळे माझ्यावर एक उपकारच झाला. मद्य-

पानाचा मला भयंकर तिटकारा आला. त्याचे एक कारण मला आठवते. मी पूर्वी सांगितलेच आहे की भवानीपुऱ्यात ज्या चौधुरी महाशयांच्या घरी मी राहात असे तेथील सर्वच मंडळी सदाचरणी आणि सत्प्रवृत्त होती. त्यांच्या त्या निर्मल चारित्र्याचा माझ्या वागणुकीवर चांगलाच ठसा उमटला. चांगली घडण होत गेली. त्यांचे एक नातेवाईक आमच्यात मधून मधून येऊन चार दोन दिवस राहात असत. ते एका वाणिज्य ऑफिसात मोठ्या जागेवर हुद्देदार होते. पुष्कळ पैसा मिळवीत आणि दोन्ही हातांनी तो खर्चून टाकीत. बंदूक उडविणे, शिकार करणे, मंडळीसह नावेतून जलप्रवास करणे वगैरे ख्यालीखुशालीत पुष्कळ पैसा उधळीत आणि या सर्व कारणांनी ते गृहस्थ आमच्यासारख्या नवोदित तरुणांना 'हीरो' सारखे वाटत. पण त्यांच्यांत एक दुर्गुण होता, ते मद्यपान करीत असत. एकदा इतर व्यक्तींबरोबर त्यांच्या संगतीत मीही गंगेतील एका बेटावर काही दिवस राहण्यासाठी गेलो होतो. प्रत्येक दिवशी पक्ष्यांच्या शिकारीसाठीही त्यांच्या बरोबर जात होतो. पण, त्यांना कधीही नशेने धुंद झालेल्या अवस्थेत मी पाहिले नव्हते. ते काही असले तरी मला ते सतत मद्यपान करण्याला उत्तेजन देत. लोभाविष्ट करण्याचा प्रयत्न करीत. सांगत, 'परिमित मद्यपानाने शरीरस्वास्थ्य चांगले राहाते. मन उत्साहित असते, काम करण्याची शक्ती वाढते...' वगैरे. मला असे आठवते, त्यांच्या या आग्रहाने व उत्तेजनाने मी एक की दोन दिवस थोडे मद्यपान केलेही होते. पण केवढी आश्चर्यकारक परमेश्वरी कृपा ! त्यानंतर लागलीच माझ्या मनाला त्याचा अगदी वीट आला. प्यारीचरण सरकार, मामा आणि पितृदेव यांचे स्मरण होताच मी अगदी शरमून गेलो आणि मद्यपान कधीही करावयाचे नाही अशी दृढ प्रतिज्ञा केली, ती कायम टिकवून ठेविली. तेव्हापासून मी मद्यपाननिवारकांच्या पक्षाचा झालो.

**केकाव्यात छंद परीक्षा : निर्वासिताचाविलाप**

महेशचंद्र चौधरी यांच्या घरात राहात असताना १८६५ की १८६६ साली भवानीपुऱ्यांतील एका प्रतिष्ठिताचा मुलगा, कोणत्याशा महत्त्वाच्या गुन्ह्यामुळे काळ्यापाण्याची शिक्षा होऊन गेला. या घटनेमुळे भवानीपुऱ्यातील रहिवाशांच्या अन्तःकरणात मोठी खळबळ उसळली. माझेही मन उचंबळून आला या असल्याच विक्षुब्ध भावनेत मी कविता लिहायला बसलो. ती कविता मामांच्या साप्ताहिकात—सोमप्रकाशात—'निर्वासिताचा विलाप' या नावाने प्रसिद्ध झाली.

'निर्वासिताचा विलाप' कवितेच्या काही ओळी जेव्हा 'सोमप्रकाशा'त प्रसिद्ध करण्यासाठी म्हणून मामांच्या हाती देऊन आलो, तेव्हा त्या भीतभीतच दिल्या होत्या. वाटले, मला परत बोलवून ते माझा तिटकाराच करतील. आणखी थोड्या फार ओळी लिहून हे काव्य संपवावेच. पण पहिल्याने काव्याचा काही भाग प्रसिद्ध होताच त्यांनी कॉलेजात मला बोलवून 'आपणाला समाधान वाटल्या'-चे सांगितले आणि 'आणखी पुढचा काही भाग आहे की नाही ?' असे

विचारले. त्यामुळे मला फारच उत्साह वाटला. लागलीच मी ते काव्य पुढे लिहू लागलो. अशा प्रकारे आठवड्यामागून आठवडे माझे हे खंडकाव्य प्रसिद्ध होऊ लागले. थोडेफार प्रसिद्ध झाले न झाले तोच चोहोकडे ते समालोचित होऊ लागले. रस्त्यात, घाटावर, भाड्याच्या गाडीत लोक बोलू लागले, 'हा श्रीशिः कोण रे?' माझीही शेपटी मग फुगू लागली. मनोमन मी एक कवी होऊन गेलो. खरे सांगायचे म्हणजे त्या वेळी माझ्या कवितेत एक प्रकारचे नावीन्य असे. त्यात ईश्वरचंद्र गुप्तांचा 'मित्राक्षर' छंद अगर मायकेलचा 'अमित्राक्षर मुक्त छंद'ही नव्हता, पण उभयतांच्या मध्ये जे होते ते असायचेच. भावाला छंदोबद्ध न करता छंदाला भावमग्न केले जात होते. भावना छंदोबद्ध होत होत्या. मुख्यतः हीच माझी पद्धत सर्वांच्या दृष्टीने आकर्षक अशी होती. सर्वांचे मन वेधून घेत होती.

## द्वितीय विवाह

मी असा हा काव्यानंदात मग्न असताना एक कौटुंबिक दुर्घटना घडून आली. काही विशेष कारणाने माझे वडील, माझी पत्नी प्रसन्नमयी आणि तिच्या माहेरची मंडळी यांच्यावर रागावले. तिला त्यांनी माहेरी पाठविले. आणि सांगितले, तुला आता पुनः इकडे आणणार नाही. तिला अशा प्रकारे घरावेगळे करण्याचे जेव्हा निश्चित झाले तेव्हा प्रश्न असा उत्पन्न झाला, घरात मी एकुलता एक मुलगा—वंशधर. मग तो असा पत्नीविरहित राहिला तर वंशाचा दिवा कसा तेवायचा! वंश कसा राहायचा? अर्थात् माझे पुनर्लग्न करणे अवश्य आहे. तसे ठरले सुद्धा. मला आता चांगले समजू लागले असल्यामुळे बहुपत्नीत्व वाईट असे मला वाटे. पत्नी प्रसन्नमयी हिच्यावर माझे मोठे प्रेम जडले होते अशातला भाग नाही. तरी पण तिच्या व तिच्या माहेरच्या सामान्य अपराधाला ही जबरदस्त शिक्षा दिल्यासारखे होणार होते. मला हा एक प्रकारचा अन्याय आहे असे वाटू लागले. मी या अन्यायाचरणाला संमती कशी द्यावी हा प्रश्न मला सुटेना. अस्वस्थता वाटू लागली. तरी पण लहानपणापासूनच वडलांबद्दल माझ्या मनात अशी दहशत बसून गेली होती की त्यांच्या आज्ञेला अडथळा आणणे, नकार देणे हेही माझ्याकडून होण्यासारखे नव्हते. तरीही मी माझ्याकडून व आईमार्फत त्यांना जाणविले की या दुसऱ्या विवाहाला माझी संमती नाही.

पुढे माझ्या दुसऱ्या लग्नाचे निश्चित करून वडील मला नेण्यासाठी भवानीपूर येथे महेशचंद्र चौधरी यांच्या घरी आले आणि मला बरोबर घेऊन गेले. वाटेत, माझ्या लग्नाची आवश्यकता व ते करणे अवश्य आहे हे मला समजावून देण्याचे त्यांचे काम चाललेच होते. मला त्यांची फार भीती वाटत असल्यामुळे त्यांच्या तोंडावर माझ्याने नकारात्मक असे काही बोलवेना. त्यांचे सगळे बोलणे ऐकत चाललो होतो इतकेच. शेवटी आमच्या गावच्या उत्तरेला

दोन कोसांवर बारासत गाव होता तिकडे जाण्याला वळलो तेव्हा मी बाबांना म्हटले, ' बाबा, आपल्या सुनेला माहेरीं ठेवून तिच्या माहेरच्या मंडळींना चांगली शिक्षा देणार असा आपण जरी निश्चय केला असला तरी शेवटी ही शिक्षा आम्हालाच भोगावी लागेल. तेव्हा मला वाटते आपण हे न कराल तर बरे. ' मी असा बोललो मात्र तोच बाबा, एकदम मागे वळले आणि स्वतःच्या पायातील वहाणा आपल्या हातात घेऊन मला म्हणाले, ' तू इथूनच मागे जा. एक पाऊल जरी पुढे टाकले तरी या वहाणांनी तुला मारीन. ' मी म्हटले, ' चला. घरी आई-समोरच हे बोलणे होऊ दे. मला जे सांगावेसे वाटले ते मी सांगितले. तसे करणे न करणे हे आपल्या हाती आहेच.' यानंतर आम्ही दोघेही घरी गेलो. जाताच मी आईला सांगितले, ' आई, हे काय चालले आहे ? माझी पत्नी आणि सासुर-वाडची मंडळी यांच्यावर रागावून हे करीत आहा तरी काय ? ' आई म्हणाली, ' हे पाहा, माझ्यात तेवढे धाडस नाही. हे तुला माहीत आहे ना ? मी अडथळा आणून माझे काही चालणार नाही. जे करायचे आहे ते करूदेत. ' बाबांनी माझ्या म्हणण्याकडे लक्ष दिले नाही. मला पकडून ते लग्नाला घेऊन गेले. हा माझा दुसरा विवाह, वर्धमान जिल्ह्यातील देपूर नामक गावच्या अभयाचरण चक्रवर्ती यांची वडील मुलगी बिराजमोहिनी हिच्याशी झाला. हा विवाह १८६५ की १८६६ साली झाला ते मला आठवत नाही.

## द्वितीय विवाहाचा परिणाम

हा विवाह होताच माझे अंतःकरण भयंकर पश्चात्तापाने तळमळू लागले. एका निरपराधी स्त्रीला अन्यायाने जबर शिक्षा देण्यात आली आणि अनिच्छेने का होईना मीच ही शिक्षा देण्याला मुख्यतः कारण झालो. हा विचार मनात येताच लज्जा आणि दुःख या भावनेने मी अगदी भारावून गेलो. वड-लांच्या आज्ञेने विवाह करण्याला जाण्यापूर्वी मी या विचाराने मनाला समजाविले होते की, भगवान् रामचंद्राने पित्याच्या आज्ञेच्या पालनार्थ चौदा वर्षांचा वनवास पत्करला व फार कष्ट सोसले. मग माझे काय ! ! पित्याच्या आज्ञेचे पालन केल्याने मला चिरकाल दुःख सहन करावे लागेल एवढेच ! आणखी काय ? पण या पश्चात्ताच्या क्षणी तो विचार मला आत्मिक सामर्थ्य देण्याला अपुरा ठरला. मी मनात म्हणू लागलो, ' मनुष्य हा स्वतःच्या कृत्याबद्दल स्वतःच जबाबदार असतो. हजारो गुरूंनी आज्ञा केल्या तरी पापाचा भागीदार कोणीही होत नाही.' अशा प्रकारे आत्मनिंदेने माझे मन जास्तच अस्वस्थ झाले. त्या तीव्रतर आत्म-निंदेची आठवण होताच आजही माझ्या शरीराचा थरकाप होतो. मी हौसेमौजेने राहणारा, उपहासरसिक, मित्रप्रेमाला भुकेलेला असा माणूस होतो. विनोदात मी मनाला रमवीत असे; पण माझा तो हास्यविनोदी स्वभाव कुठे नाहीसाच झाला.

मी विषादमय चित्ताने वावरू लागलो. पाऊल टाकताना वाटे की, कुठल्या तरी खोल गर्तेत पावले टाकीत जात आहे! रात्र झाली म्हणजे वाटे आता उजाडले नाही तर बरे होईल.

अशाच अवस्थेत मी ईश्वराला शरण गेलो. ईश्वराबद्दल अविश्वास माझ्या अन्तःकरणात केव्हाच नव्हता. मला आठवते, या अशा वेळी माझे वडील माझ्याजवळ अनेकदा संस्कृत नास्तिक दर्शनातील तत्त्वे सांगण्याचा प्रयत्न करीत. नास्तिकतेचा प्रचार हाच त्या तत्त्वाचा हेतू. ते मला म्हणत, 'विद्यासागर महाशय आस्तिक नव्हत... ' वगैरे. या बाबतीत आईवडलांचा केव्हा केव्हा झगडाही होत असे, हे मी पाहिले आहे. मी असल्या या विचारांशी सहमत नसलो तरी वडलांशी मला काही ना काही बोलावेच लागे. मला त्या बोलाचालीत गुंतलेला पाहाताच आई बाबांवर रागावून माझा हात धरून मला तेथून घेऊन जाई आणि त्यांना उद्देशून म्हणे, 'पुरे झाले तुमचे ते नास्तिक तत्त्वज्ञान. राहू द्या. मुलाचे डोके खाऊ नका. ' हे काही का असे ना, पण नास्तिकवाद मला मुळीच आवडत नसे. आणि मनाला पटतही नसे. मी लहानपणासून वाडीतील समवयस्क मुलांशी जगत् व जगत्कर्ता याविषयी चर्चा करण्यात गढून जाई. तो माझा आवडता विषय होता. तरी पण यापूर्वी मी ईश्वराशी आत्म्याच्या असलेल्या संबंधाबद्दल कधी महत्त्वाचा विषय म्हणून चर्चा केलेली नव्हती. ईश्वरचरणासमोर प्रार्थना करण्याचीही मला सवय नव्हती. पण या सध्याच्या अनुतापदग्ध मानसिक अवस्थेत असताना चित्तात आलेली ग्लानी दूर व्हावी म्हणून मात्र ती करायला सुरवात केली. याच वेळी भक्तिप्रिय उमेशचंद्र दत्त महाशय, यांनी माझी ही मानसिक ग्लानीची अवस्था जाणून मला, थिओडार पार्करचे 'टेन सरमन्स अँड प्रेयर्स ' हे पुस्तक पाठवून दिले. या प्रार्थना वाचून मला माझ्या मनाला नवजीवन मिळालेसे वाटले. मी रोज रात्री झोपण्यापूर्वी एका चोपडीत एक प्रार्थना लिहून ती म्हणत असे आणि मग झोपी जात असे. इतकेच नव्हे तर दिवसातून दहा पंधरा मिनिटांच्या अंतराने ईश्वरस्मरण करीत असे आणि प्रार्थनाही करीत असे. दुःखाची गोष्ट म्हणजे माझी ती प्रार्थनेची चोपडी पुढे कुठे हरवूनच गेली. नाही तर बाल्यकालचे माझे ते धार्मिक जीवनाचे अर्धेमुर्धे उच्चारले जाणारे बोल आज मला पाहायला मिळाले असते.

## धर्मजीवनाची सुरवात ब्राह्मसमाजाविषयी उत्सुकता

प्रार्थना करता करता अन्तःकरणात दोन प्रकारचे परिवर्तन झाल्याचे मला जाणवले. पहिले म्हणजे दुर्बलतेऐवजी सामर्थ्य आले. मी मग मनात संकल्प केला, 'जे कर्तव्य आहे असे मला वाटेल, ते निर्भयतेने करीन. तन मन धन याचीही तमा बाळगणार नाही. मग जाणार ते जाऊ दे. राहणार ते राहू दे. ' अशा तऱ्हेने

धर्माचा आदेश आणि अन्तरात्म्याची प्रेरणा यांना अनुसरून चालावयाचे असे मी निश्चित केले. दुसरे म्हणजे भवानीपूर येथील ब्राह्मसमाजाच्या उपासना मंदिरात नित्यनियमित जावयाचे ठरविले. जाऊ लागलो. पण त्या बाबतीत मला कोणी काही विचारू नये व लोकांशी चर्चा करण्याची वेळही येऊ नये म्हणून मी उपासनेला आरंभ झाला की तेथे उपस्थित होत असे आणि ती संपते न संपते तो निघून जात असे.

या वेळेपासून ब्राह्मसमाजाशी माझा थोडाथोडा संबंध येऊ लागला. माझे सहाध्यायी स्नेही उमेशचंद्र मुखोपाध्याय ( जे पुढे विलायतेला जाऊन डॉक्टर होऊन आले ) हे ब्राह्ममंडळीकडे नेहमी जात–येत असत, केशवचंद्र सेन महाशयांबद्दल मला पुष्कळसे काही सांगत आणि ब्राह्मसमाजातर्फे प्रकाशित होणारे वाङ्मय व नियतकालिके वाचण्यासाठी मला देत; पण ' त्या मंडळीत चल ' असे ते सांगू लागले तर संकोची स्वभावामुळे मी जाण्याचे नाकारीत असे. एका दिवसाची गोष्ट आठवते. उमेशने मला आणि योगेन्द्रनाथ वंद्योपाध्याय (जे पुढे योगेंद्रनाथ विद्याभूषण नावाने विख्यात झाले. ) यांना प्रोत्साहन देऊन केशवबाबूंच्या कालूटोला येथील बंगल्यावर त्यांच्या भेटीसाठी जाण्याला तयार केले. मी केशवबाबूंच्या बंगल्याच्या दारापर्यंत गेलोही; पण बंगल्यात पाऊल टाकण्याचे काही मला धाडस झाले नाही. उमेशने धरलेला माझा हात सोडवून घेऊन पळून गेलो. आणखी एकदा उमेश आणि मी चित्पूररोडने येताना मध्ये पाऊस कोसळू लागला. त्यावेळी केशवबाबूंनी त्याच रस्त्याच्या बाजूला ' कलकत्ता कॉलेज ' नावाचे एक कॉलेज उघडले होते. आम्ही दोघेही पावसाच्या भीतीने या कॉलेजच्या व्हरांड्यात जाऊन उभे राहिलो. आत जाण्यासाठी उमेश मला पुष्कळ आग्रह करू लागला. पण संकोचामुळे मी आत जाऊ शकलो नाही. याच वेळी एक पश्चिमप्रांतवासी नोकर वरून खाली आला. त्याला आम्ही केशवबाबूंबद्दल विचारताच तो म्हणाला, ' केशवबाबू हे साधे माणूस नसून देवमाणूस आहेत. त्यांच्याकडेच चला. त्यांच्या तोंडचे दोन शब्द ऐकलेत तर मन कसे शांत होऊन जाईल. ' त्याची ती प्रभुनिष्ठा पाहून परीक्षा पाहण्याच्या हेतूने आम्ही केशवबाबूंची मनःकल्पित निंदा करू लागलो. आमच्या त्या तसल्या बोलण्याने तो रागावला आणि शेवटी आकाशाकडे दोन्ही हात करून केशवबाबूंना पुष्कळ आयुरारोग्य लाभावे म्हणून ईश्वराची प्रार्थना करू लागला. ते पाहून आम्ही अगदी स्तब्ध आणि मुग्ध झालो. मी म्हटले, ' उमेश, हा सामान्य मनुष्य नव्हे. ज्यांच्या नोकराच्या अन्तःकरणात इतकी निष्ठा व आदर ते असामान्यच असले पाहिजेत. ' हे माझे शब्द ऐकल्यावर उमेश मला त्यांच्याकडे ओढूनच नेऊ लागला; पण संकोची स्वभावामुळे मी जाऊ शकलो नाही.

यानंतर उमेश, योगेन्द्र, आणि निरनिराळे वर्गसोबती यांच्यासह मी आमचे

एकेकाळचे सहाध्यायी वियजकृष्ण गोस्वामी आणि अघोरनाथ गुप्त या मित्रद्वयांच्या घरी मधूनमधून जाऊ लागलो. हे एकेकाळी आमच्याबरोबर एकाच वर्गात शिकत होते; पण त्या वेळी ते ब्राह्मधर्मप्रचारक झाले होते. एके दिवशी रात्री विजय व अघोर यांनी मला भवानीपूर येथे जाऊ दिले नाही. स्वतःच्या बिऱ्हाडीच ठेवून घेतले. त्या रात्री बिऱ्हाडातील परजातीय अशा एका स्त्रीने केलेले जेवण मात त्या वाडग्यात जेवावे लागल्यामुळे रात्रभर माझे सर्वांग शिरशिरत होते. एक प्रकारचा घृणा वाटत होती. चांगलीशी झोपही लागली नाही याची मला चांगली आठवण आहे.

## वडलांचा राग

प्रार्थनेने मला आत्मिक बल दिले असे सांगितले आहे त्याचा अर्थ हाच की माणसाची वाटणारी भीती मला वाटेनाशी होत चालली व आत्मविश्वासानुसार वागण्याची प्रवृत्ती वाढू लागली. वडील कलकत्त्याला आले तेव्हा त्यांनी ऐकले की, मी ब्राह्मसमाजात उपासनेसाठी जातो. नंतर एके दिवशी मला बोलावून ब्राह्मसमाजात न जाण्याबद्दल बजावले. मी शांतपणाने पण धैर्याने सांगितले, ' बाबा मी आपल्या आज्ञेचे केव्हाही उल्लंघन केले नाही, आपली अवज्ञा केली नाही हे आपणाला माहीत आहे. आताही आपल्या सर्व आज्ञा पालन करण्याची माझी तयारी आहे. पण माझ्या धार्मिक जीवनात आपण हस्तक्षेप करू नये. मी ब्राह्मसमाजातील उपासनेला जाण्याचे टाळणार नाही. ' परक्याचे घर असल्यामुळे माझ्या या स्पष्टोक्तीवर ते काही बोलले नाहीत पण हा माझा उलट जबाब त्यांना जितका नवीन तितकाच अन्तःकरणाला धक्का देणारा वाटला. नंतर मी ऐकले की त्या-दिवशी ते पुष्कळ रडलेही. आणखी दोनतीन दिवस कलकत्त्याला राहणार होते पण न थांबता ते दुसऱ्याच दिवशी गावी निघून गेले.

घरी पोचताच त्यांचा खिन्न असलेला चेहरा पाहून आई भ्याली आणि तिने त्यांना विचारले, ' तुम्ही इतके उदास आणि खिन्न का दिसता ? मुलगा कसा आहे ? ' बाबांनी गंभीर होऊन घोगऱ्या आवाजात उत्तर दिले, ' तो मेला. ' आईला ते उत्तर ऐकून धक्काच बसला, ' अहो, काय म्हणता काय ? काय बोलता ! ' असे विचारता विचारता तिने एकदम रडायला सुरवात केली. तो तिचा आक्रोश ऐकून शेजारच्या बायकाही धावून आल्या आणि ' काय ! हे काय झाले हो ! शिवूच्या आजाराची सुद्धा बातमी समजली नाही. ' इतके झाल्यावर बाबा पुनः त्याच गंभीर घोगऱ्या आवाजात म्हणाले, ' तो मला आता मेल्यासारखाच. त्याची ब्राह्मसमाजात जा-ये सुरू झाली आहे. मी नको म्हटले तरी त्याने ऐकले नाही. जाणारच म्हणाला. ' हा सगळा झालेला प्रकार मी नंतर ऐकला.

## प्रार्थनेचे सामर्थ्य

काही असो, प्रार्थनेमुळे मला सामर्थ्य मिळाले, आशा-आकांक्षांनाही जोर आला. माझा अंतरीचा आवाज मला सांगू लागला की, 'पापी म्हणून ईश्वर काही माझा त्याग करणार नाही.' मला वाटले, पार्करच्या सरस व आशापूरक भक्तिसुधेने या बाबतीत मला पुष्कळच सहाय्य केले. ते काही असले तरी व्याकूळतेने केलेली प्रार्थना केव्हाही व्यर्थ जात नाही याचा मला साक्षात्कार झाला. ईश्वराची प्रेरणा अन्तःकरणापर्यंत पोचलेली मला जाणवू लागल्यामुळे मन आनंदमग्न होऊन गेले. आणि तेव्हापासून प्रार्थनेवर माझा दृढ विश्वास बसला. श्रद्धा जडली. यानंतर अनेक प्रलोभनांशी मला सामना द्यावा लागला, कधी कधी पतित होण्याचाही माझ्यावर प्रसंग आला, अंधारातही अनेकदा चाचपडावे लागले पण प्रार्थनेवरची माझी श्रद्धा मुळीच कमी झाली नाही. अविश्वास वाटला नाही. जीवनकलहात आणि संसारसंग्रामात, दुर्बलतेच्या वेळी या श्रद्धेमुळे मला सामर्थ्य लाभले, निराशेत आशान्वित झालो आणि निरानंदात आनंदित राहिलो. फार काय मी दिव्यनेत्रांनी पाहिले आहे, तो मंगलमय परमपुरुष आपल्या दुबळ्या लेकरांना हाताला धरून चालवीत आहे. ज्या मुलाला चालता येत नाही, वारंवार पडतो त्याने आपल्याला धरावे अशी अपेक्षा न राखता ज्याप्रमाणे त्याच्या आईला वा वडलांना त्या मुलाचा हात घट्ट पकडावा लागतो. त्याचप्रमाणे वाटते की त्या मंगलमय पुरुषाने असे दाखवून दिले, ज्या क्षणी तो मला (मंगलमय पुरुषाला) विसरतो तो पापी व दुबळा मनुष्य स्वतः मला पकडून चालू शकत नाही. म्हणून तो मंगलमय पुरुष वारंवार त्याच्या अंगाला लागलेली धूळ झाडून त्याचे अश्रू पुसून त्याला उचलून घेतो.

## मूर्तिपूजेचा त्याग—

सामर्थ्य आणि आशा यांचा अन्तःकरणात उदय झाल्यामुळे आत्मविश्वास वाढला आणि त्याप्रमाणे वागण्याचा दृढनिश्चय केला. आता मात्र खऱ्या आत्मसंग्रामाला सुरवात झाली. यापूर्वी उन्हाळ्याच्या सुटीत वा पूजेच्या (आश्विन नवरात्राच्या) सुटीत घरी गेलो असता मला देवपूजा करावी लागे. वंशानुक्रमे आमच्याकडे आलेले पंचायतन आणि निरनिराळ्या मूर्ती होत्या. बाबा नेहमी त्या सर्वांची पूजा करीत. मी घरी गेलो की माझ्याकडे देवपूजेचे काम सोपवून आपण इतर घरकामे करीत. तेवढाच त्या कामांना त्यांना अवसर मिळे. हृदयपरिवर्तनानंतर जेव्हा मी घरी गेलो त्यावेळी जातानाच ठरविले की आता देवपूजा करावयाची नाही. घरी पोचताच मी केलेला हा निश्चय आईला सांगितला. आई भीतीने गागरूनच गेली. तिला कळून चुकले की आता मोठाच झगडा होणार! मला तिने अनेक प्रकारे समजाविले, पुष्कळ विनवण्या केल्या. पण मी कोणत्याही

प्रकारे पूजा करण्याला तयार झालो नाही. 'धर्ममार्गांत फसवणूक करता येणे मला शक्य नाही' असे म्हणून हात जोडून तिची क्षमा मागितली.

शेवटी तो माझा निश्चय जेव्हा बाबांना कळविण्यात आला तेव्हा ज्वालामुखीच्या उद्रेकाप्रमाणे त्यांचा क्रोधाग्नी भडकला. मला मार देऊन देवघरात घेऊन जाण्यासाठी हातात काठी घेऊनही ते आले. मीही धैर्य धरून त्यांना म्हटले, 'का उगाच मला मारण्याचे कष्ट घेता! मी अगदी निर्भयतेने आपला मार सहन करीन. मार मारून माझे हाडन् हाड जरी वेगळे केले तरी मला तुम्ही देवघरात नेऊ शकणार नाही.' हे माझे निर्वाणीचे बोलणे ऐकून आणि दृढ निश्चय पाहून ते तटस्थ होऊन उभेच राहिले आणि सुमारे अर्धा तासपर्यंत खवळलेल्या नागाप्रमाणे फुसफुसू लागले. शेवटी देवपूजेच्या कामातून बाबांनी मला मोकळा करून स्वतः पूजा करण्याला सुरवात केली.

त्या दिवसापासून मी मूर्तिपूजेचा त्याग केला. देवपूजा बंद झाली. मी सत्य स्वरूपाचा उपासक बनलो. पण आमचे झालेले हे कौटुंबिक परिवर्तन गावातील सर्व आप्तइष्टांना कळले आणि सर्वांनी मला त्रस्त करण्याचे ठरविले. त्यानंतर बाबांनी मला गावातील ब्राह्ममंडळीत मिसळून वागण्याची बंदी केली. मी इतर वेळी त्यांच्यात जात नसे पण ज्या दिवशी सामुदायिक उपासनेचे मला निमंत्रण देत त्या दिवशी, बाबा झोपेतून उठण्यापूर्वीच मी त्या उपासनेत सामील होण्यासाठी जात असे. अर्थात घरी आल्यावर मला बोलून घ्यावे लागे आणि तिरस्कारही सहन करावा लागे. इतकेच नव्हे तर कोणी ब्रह्मोपासना करणार आहे असे ऐकले तर चार पाच मैल चालत जाऊन त्यात सामील होण्याला मला मुळीच कष्टदायक वाटत नसे.

तरीपण यावेळी गावातील काही ब्राह्म, भवानीपूरचे चार दोन ब्राह्म आणि विजय, अघोर यांखेरीज दुसऱ्या कोणाशीही माझी तशी ओळख देख झालेली नव्हती व जवळीकही वाटत नव्हती. कोणाशीही मी मिसळत नसे व संकोचामुळे विशेष बोलाचालीही करीत नसे. करण्याची इच्छाही होत नसे.

## शांखारीटोल्याचे जगत्‌बाबू

१८६७ सालच्या अखेरीअखेरीस मी भवानीपूरच्या चौधुरीमहाशयांचे घर सोडून तेथील एका प्रतिष्ठित कुटुंबातील मंडळींनी विनंती केल्यामुळे त्यांच्याबरोबर कलकत्त्यातील शांखारीटोल्यातील एका घरात येऊन राहू लागलो, ती हकीगत अशी —:जगच्चंद्र बंद्योपाध्याय नावाचे एक प्रतिष्ठित गृहस्थ भवानीपूर येथे राहात असत. महीम नावाचा त्यांचा एक मुलगा संस्कृत कॉलेजात शिके आणि आम्हांसर्वांबरोबर एका गाडीतूनच कॉलेजात जाई. या संबंधामुळे जगत्‌बाबूंशी माझा परिचय झाला. जगत्‌बाबूंचे सच्चारित्र्य, सद्धेतु, सौजन्य हे गुण पाहून त्यांच्यावर

माझी श्रद्धाभक्ती जडली. माझ्यावर ते पुत्रवत् प्रेम करू लागले. पुढे मला त्यांनी आपल्या घरी नेऊन स्वतःच्या पत्नीशी माझा परिचय करून दिला.

मी पूर्वी सांगितलेच आहे, शिक्षणसंपादन करीत असता मला शहरात राहावे लागे आणि त्यामुळे माझ्या अनेक सहाध्यायांच्या आईला मी मावशी म्हणून संबोधीत असे. त्यांच्याकडून मावशीचे वात्सल्यही मला लाभे. विशेष सांगायचे म्हणजे त्या काळात मला कुसंगतीतही दिवस घालवावे लागत. आठवण झाली म्हणजे असे वाटते, त्या मावशांच्या वात्सल्याने आणि चारित्र्यानेच त्या वाईट संगतींपासून व त्यांच्या अनिष्ठ परिणामापासून माझा बचाव झाला. असो. मी जगत्‌बाबूंच्या पत्नीलाही मावशीच म्हणून हाक मारू लागलो. या नवरा-बायकोचे माझ्यावर किती अपत्यवत् प्रेम जडले ते शब्दांनी वर्णन करता येणार नाही. शेवटी येथपर्यंत त्या वात्सल्याचा परिणाम झाला की चारदोन दिवस मी त्यांना भेटलो नाही तर मावशी मला बोलावणे पाठवी आणि 'कठोर मुलगा' म्हणून रागावल्यासारखे करी. खायला प्यायला देई आणि मग घरच्या बारीकसारीक सर्व गोष्टी सांगे. काही लपवून ठेवीत नसे. आणि मी मग त्या प्रेमळ अतिथ्याने समाधान मानून माझ्या बिऱ्हाडी येत असे.

हाय ! त्यांचा तो 'कठोर मनाचा मुलगा' ब्राह्मसमाजाच्या कामात आणि इतर वेगवेगळ्या कामाच्या धुंदीत कुठे जाऊन पडला ! ती कुठे निघून गेली ! मावशीला आणखी किती दिवस तरी मी पाहिलेच नाही. आता मनात विचार येतो, मला मावशीने कठीण मनाचा मुलगा म्हटले होते, ते अगदी बरोबर होते. मी मनुष्यांजवळून जितके प्रेम, आपुलकी मिळविली तितके मी ते परत करू शकलो नाही. या आयुष्यात वेगवेगळ्या जीवनसंघर्षांशी टकरा दिल्या आहेत आणि टिकून राहिलो आहे हेही माझ्या प्रेमळ मित्रांपासून प्रेमाचा योग्य मोबदला न देता दूर राहण्याचे कारण असावे. छळ, द्वेष, झगडे वगैरे विषमतेत सापडल्यामुळे मनाच्या उत्तापात, उद्विग्नतेत— नेहमी राहावे लागे. प्रेमाच्या सुशीतल वातावरणाचा लाभ घेण्याला मला वेळच मिळाला नाही. असो.

या मावशीच्या वात्सल्याचा मोबदला म्हणून मी इतकेच करीत असे की, महीमला रोज जवळ आणून त्याचा अभ्यास करून घेई. १८६७ सालच्या अखेरीस या जगत्‌बाबूंच्या कुटुंबाचे कलकत्त्यात शांखारीटोला येथे एका घरात जाऊन राहण्याचे ठरले. तेव्हा मावशी मला आपल्याबरोबर तिकडे नेण्याचा आग्रह धरून बसली. मीही तिच्या त्या आग्रही निमंत्रणाचा अनादर केला नाही; मला तसे करता आले नाही आणि मग आम्ही शांखारीटोल्यात येऊन राहू लागलो. तेथे आल्यावर मी आणि महीम बाहेरच्या बाजूला असलेल्या माडीवर राहात होतो. ती खोली बाहेरच्या बाजूला असली तरी देवघराच्या गच्चीवरून अन्तर्गृहात व या खोलीत मनाला येईल मला तेव्हा जाता-येता येत असे. यामुळे मावशीला

कामकाजातून थोडा अवसर मिळताच आमच्या त्या खोलीत येऊन बसता येत असे. माझा व महीमचा कसा काय अभ्यास चालला आहे हे ती पाहात असे आणि चांगल्या भल्या गोष्टी बोलण्यात वेळ घालवीत असे.

## बालिका वधूच्या मनोवेदना

मी या नवीन घरी नवीन जागी आल्यावर मावशीच्या भावाची एक मुलगी ( भाची १६।१७ वर्षांच्या वयाची ) तिच्याकडे आली. दोन .एक दिवसांतच मला ती ' दादा ' म्हणून हाक मारू लागली. आईवडिलांनी या मुलीचे लहानपणीच एका वयोवृद्ध विधुराशी लग्न लावून दिले होते. मला वाटते या मुलीला सासरच्या माणसांनी व खुद्द पतीनेही आपुलकीने वागविले नव्हते. कारण तिच्या सासरची हकीगत मी विचारली की तिच्या डोळ्यांतून अश्रू वाहू लागत. आणि ते पाहिले म्हणजे या बालविवाहाच्या प्रथेचा मला असलेला तिटकारा वाढू लागे. तिच्या या दुःखामुळे मी तिच्याकडे सासरच्या हकीगती विचारतच नसे. तिला लिहिणे वाचणे शिकण्यात सुबोध गोष्टी ऐकविण्यात गुंतवीत असे. सकाळी ती आपल्या आतेला घरकामात मदत करीत असे. त्यामुळे माझ्याकडे तिला येता येत नसे. पण सायंकाळी मी आणि महीम कॉलेजातून येताच ती आमच्या खोलीत येई. मी तिला आणि महीमला शिकवीत असे. लिहायला शिकवी, चांगल्या चांगल्या गोष्टी सांगे, त्यामुळे माझ्या पूर्वकालच्या उन्मादिनीचा– बहिणीचा अभाव काही अंशी पूर्ण झालासे मला वाटे. अनेकदा तर असे होई की मी अभ्यासात मग्न असलो की ती आणि महीम दोघेही झोपी जात. मी झोपण्यापूर्वी तिला उचलून घरात ठेवून येत असे.

मी या ठिकाणी राहत असताना माझा मित्र योगेंद्र ( जो पुढे योगेंद्र विद्याभूषण म्हणून प्रसिद्धीला आला ) याने विधवाविवाह केला. त्यामुळे मी जगत्‌बाबूंचे घर सोडून योगेंद्रबरोबर राहण्यासाठी त्याच्याकडे गेलो. हा विधवाविवाह कसा घडून आला ते पुढच्या प्रकरणात सांगणारच आहे. या घरातून जाताना मावशीला– विशेषतः त्या मुलीला सोडून जावे लागत आहे याचा मला बराच खेद वाटला. आणि त्यामुळे हा वियोग माझ्या चांगला आठवणीत राहिला. माझ्या ममतेच्या वागणुकीमुळे त्या मुलीला माझा एक आधार वाटे. यासाठी एकमेकांची ही वेगळीक आम्हा दोघांनाही चांगलीच जाणवली. तिला सोडून जाण्याचा माझा बेत जेव्हा मी तिला सांगितला तेव्हा कित्येक दिवस रडून रडून तिने आपले डोळे सुजवून घेतले. शेवटी माझे सामानसुमान घेऊन जेव्हा मी निघालो तेव्हा ती म्हणाली, ' दादा, थोडा थांब ना. तुला एकदा चांगला नमस्कार तरी करून घेते. ' बोलता बोलता तिने आपला पदर गळ्यासभोवार गुंडाळून मला प्रदक्षिणा करण्याला

सुरवात केली. एक प्रदक्षिणा पूर्ण झाली की, माझ्या पायावर डोके ठेवी आणि मोठ्याने रडे. मलाही रडे येई.

त्यावेळची ती बालविवाहाच्या परिणामाची शोचनीय अवस्था पाहून माझा तसल्या विवाहाबद्दलचा तिटकारा जो कायम झाला तो तिचा निरोप घेऊन निघाल्यावरच नव्हे तर आतापर्यंत माझ्या मनात कायम राहिला आहे. दहा अकरा वर्षांच्या मुलीचा विवाह केला जात आहे असे ऐकले की आजही मला ते दुःख जाणवते. बालविवाहाचे अनिष्ट परिणाम पूर्वी मी ऐकले होते. पाहिलेही होते. सासूच्या छळामुळे अमुक मुलगी मरण पावली, असे अनेकदा ऐकले होते. विराजमोहिनीचे – माझ्या दुसऱ्या पत्नीचे– हातपाय बांधून तिला सवतीवर दिलेले मी अनुभवीत होतो, पण या मुलीच्या अश्रूंनी, लहान मुलींचे हातपाय बांधून त्याचे दान करण्याबद्दल जितका मला राग आला, तितका मला पूर्वी आला नव्हता. कोणत्या एखाद्या विशेष घटनेने मनुष्याचा भाव कसा परिवर्तित होतो त्याचा विचार मनात आला की मनुष्यस्वभावाचे नवल वाटल्यावाचून राहात नाही.

हाय ! हाय ! घटनाचक्रात सापडून ती मुलगी कुठे गेली आणि मी कुठे जाऊन पडलो ते सांगता येत नाही. त्यानंतर अनेक वर्षांनी एके दिवशी विधवा वेषात मलिन वस्त्र धारण केलेली अशा दीनहीन अवस्थेत लहान मूल कडेवर घेऊन भवानीपुऱ्यांतील गल्लींतून कोणा एका आप्ताकडे जाताना मी तिला पाहिले होते. मला पाहताच तिने ' दादा ' म्हणून मला मोठ्याने हाक मारलेली मी ऐकली होती; पण तिची ओळख पटण्याला मला विलंब लागला. नंतर उभा राहून तिची दुःखद कर्मकहाणी ऐकली. डोळे अश्रूंनी भरून आले. पण तीच तिची अखेरची भेट !!

* * *

•५•

# विद्यार्थीदशेतील समाजसुधारणा

दुसरे लग्न केल्यानंतर माझे हृदयपरिवर्तन होत चालले. मी निरपराधी असलेल्या प्रसन्नमयीच्या–माझ्या पहिल्या पत्नीच्या–बाबतीत अन्यायाचे आचरण केल्याची मला जाणीव होऊ लागली. त्याचे परिमार्जन करण्याला मी उतावीळ झालो. ही मनाची व्यग्रता मी फक्त माझ्या मातामहीजवळ—आजीजवळ बोलून दाखविली. प्रसन्नमयीचे माहेर माझ्या मामाच्या घरापासून दूर नव्हते. अर्थात त्यांनी मनुष्य पाठवून प्रसन्नमयीला आपल्या घरी आणविले. मला ही बातमी मामाकडून कळताच मी ताबडतोब आजोळी जाऊन प्रसन्नमयीला भेटलो आणि झालेल्या अपराधाची क्षमा मागितली. त्यानंतर प्रसन्नमयी पुष्कळ दिवसपर्यंत मामाकडे आजीच्या सान्निध्यातच राहिली. मी शनिवारच्या शनिवारी तेथे जात असे.

मी प्रसन्नमयीला अशा रीतीने भेटल्याचे व भेटत असल्याचे वडलांना समजताच ते प्रथम माझ्यावर फार रागावले. पण नंतर त्यांची मी अतिशय नम्रतेने पुष्कळ विनवणी केल्यावर आणि आजीनेही पुष्कळशी खुशामत केल्यावर त्यांचे अंतःकरण ओलावले आणि ते स्वगृही सासरी प्रसन्नमयीला नेण्याला तयार झाले. मग १८६७ साली ती पुनः आमच्या घरी म्हणजे सासरी आली.

## माझे पहिले मूल : हेमलता

१८६८ च्या आषाढाच्या ११ तारखेला माझ्या पितृगृही मला पहिली मुलगी झाली. तिचे नाव हेमलता. हेमलता झाल्यावर पुनः बाबांशी माझे मतभेद उत्पन्न झाले. मनोमन कोणाशीच कोणाचे पटेना. पूर्वी मी सांगितलेच आहे की, आम्ही दाक्षिणात्य कुळात उत्पन्न झालेले कुलीन वैदिक ब्राह्मण. त्यावेळी आमच्यात

कुलसंबंधाची चाल होतीच. त्याप्रमाणे हेमलतेचा शैशवावस्थेतच वाङ्निश्चय करावयाचा; ती त्याच वयात वाग्दत्ता व्हायची. पण मी या चालीच्या विरोधी वागण्याचे बोलू लागलो. तिचा विवाह यावेळी करावयाचा नाही असे मी वडलांना पत्राने कळविले. त्यामुळे बाबा पुनः भडकले. माझ्या विरोधाला त्यांनी जुमानले नाही. मला न कळू देता एका लहान बालकाबरोबर हेमचा विवाहसंबंध ठरविला. तिचे यथाविधी वाग्दान केले आणि ते ऐकून मला अतिशय दुःख झाले.

### आत्मसंयमाचा संकल्प

ईश्वराकडे प्रार्थना करण्याने माझा हृदयपालट झालाच; पण अंतःकरणात दुसऱ्याच एका झगड्याला सुरवात झाली. सगळ्याच बाबतींत परमात्म्याच्या इच्छेवर अवलंबून राहण्याचा अवघड निश्चय मी केला. यामुळे जीवन सर्वच बाजूंनी संयमित होऊन त्याचे परिणाम दिसू लागले. प्रत्येक बाबतीत मी स्वतःवर हुकमत चालवू लागलो. ज्या ज्या विषयांची मला आसक्ती वाटे त्या त्या विषयांचा त्याग करण्याला आणि न आवडणाऱ्या विषयांचे अवलंबन करायला सुरवात केली. यावेळी प्रथम मी मांसाहार सोडला. जीवहत्यानिवारण म्हणून नव्हे तर मांस खाण्याची जी मला आवड होती ती सुटावी म्हणून. मांस खाण्याची मला इतकी चटक लागली होती की, भवानीपुऱ्यात चौधुरी महाशयांकडे असताना बहुतेक दर रविवारी सकाळीच कालीघाटावरून जिवंत बकरा येई. त्याच्या ओरडण्याचा आवाज ऐकताच माझा अभ्यासच बंद पडे. त्याची चीरफाड करून व शिजवून तो माझ्या पोटात पडेपर्यंत दुसरा काही उद्योगच मला सुचत नसे. कविता करणे व रचणे याचा मला फारच नाद; पण नवीन निश्चयाप्रमाणे लागलीच मी कविता करण्याचे व वाचण्याचे सोडून दिले आणि त्याऐवजी फिलॉसॉफी आणि लॉजिक अभ्यासण्याला सुरवात केली. मित्रमंडळीत हसणेखिदळणे, गप्पाटप्पा झोडणे हे एक मला वेडच होते; पण मनाचा कान पिरगळून मौनव्रत धारण केले. हे मनाला शासन करण्याचे काम त्यावेळी मी अतिरेकाने करीत असे.

अंतःकरणात धर्मभावनेचा उदय होऊ लागल्यापासून कॉलेजातील परीक्षांतही मला चांगले यश मिळू लागले. तेव्हापासून कॉलेजच्या परीक्षेत मी पहिला येऊ लागलो. आत्मसंयम उत्तम रीतीने सिद्धीला जावा म्हणून, जे अभ्यासाचे विषय मला कठीण जात, आवडत नसत व केव्हा केव्हा जाणूनबुजून त्यांच्याकडे दुर्लक्ष करीत असे, ते विषय आता मी आस्थेने अभ्यासू लागलो. मला चांगले आठवते, प्रथम गणितविषयाकडे मी द्यावे तसे लक्ष देत नसे आणि त्यामुळे शंभरपैकी २० च्यावर मार्क मला मिळत नसत, पुढे १८६६ सालापासून त्यात बदल झाला. गणितात मी इतका रमू लागलो की, त्या वर्षीच्या विश्वविद्यालयाच्या प्रवेश परीक्षेत प्रथम श्रेणीत तर पास झालोच पण मी सेकंड ग्रेड स्कॉलरशिपही मिळविली.

कॉलेजातही पहिला आलो. पुढेही ही प्रतिज्ञा आणि दृढनिश्चय एखाद्या व्रताप्रमाणे कायम झाला. या कठीण मानसिक संग्रामामुळे १८६८ त एल्. ए. परीक्षेत मी पास झालो होतो व ५९ रुपयांची स्कॉलरशिपही मिळविली होती. त्याचे वर्णन क्रमशः पुढे येईलच. माझ्यात झालेल्या नवीन धर्मभावनेच्या उन्मेषा-मुळेच मला या मनोनिग्रहात सामर्थ्य मिळाले.

मुख्य सांगायचे म्हणजे, माझ्या या धार्मिक जीवनाच्या आरंभापासून या १८६८ सालापर्यंतचा काल, मला सर्वांत श्रेष्ठ वाटतो. हा माझा काल अशा प्रकारे घालविण्याचे भाग्य मला लाभले याबद्दल परमेश्वराला मी मुक्तकंठाने धन्य-वाद देतो. विनय, वैराग्य, व्याकुळता, प्रार्थनापरायणता वगैरे धार्मिक जीवनातील अनेक साधने यावेळी माझ्या अन्तःकरणात विद्यमान होती. त्यामुळे मला वाटते माझ्या मनाने असे ठरविले की, धार्मिक बुद्धी कायम ठेवून ईश्वर जो मार्ग दाखवील अगर सुचवील किंवा जी प्रेरणा देईल त्याप्रमाणे वागायचे. मग नफानुकसान काही का होईना. प्रत्येक बाबतीत मग ती वैचारिक असो वा कृतिविषयक असो, ईश्वराच्या प्रार्थनेनंतर जे जाणवेल जे सुचेल ते करावयाचे. आणि जे एकदा कर्तव्य म्हणून ठरविले ते करण्यासाठी निश्चयी मनाने तत्पर असायचे. अनमान करायचा नाही. इतकेच नव्हे तर असे एकदा ठरले की मग जीवनमरणाचा प्रश्नही माझ्या आड येत नसे. आणि याचेच प्रत्यक्ष प्रमाण म्हणून की काय, योगेन्द्र-नाथ बंद्योपाध्याय व उपेद्रनाथ दास यांचा विधवा विवाह मी लावून दिला आणि माझ्या एल्. ए. परीक्षेसाठी फार परिश्रम केले. ही उदाहरणे मला दाखवून देता येतील. या खटपटीचे विशेष वर्णन पुढे येईलच.

## मित्राचा विधवाविवाह आणि सामाजिक छळ

पहिली घटना, योगेंद्राच्या विधवाविवाहाची. हा विवाह १८६८ च्या प्रारंभीच झाला. याची हकीगत अशी : ईशानचंद्र राय नावाचा नदिया-कृष्णनग-रचा राहणारा व कलकत्त्याला आलेला एक तरुण त्यावेळी कलकत्त्याच्या मेडिकल कॉलेजात शिकत होता. त्याची आई आणि एक विधवा बहीण ही त्याच्या बरोबर असत. माझ्याच ज्ञातीपैकी दादा हेमचंद्र विद्यारत्न ( जे पुढे तत्त्वबोधिनी पत्रिकेचे संपादक झाले होते ) हे या विधवा मुलीला शिकवीत असत. हेमदादाकडून मी त्या मुलीची प्रशंसा नेहेमी ऐकत असे. ते मला सांगत की, ' या मुलीचा भाऊ तिचा पुन्हा विवाह करू इच्छित आहे. मी लहानपणापासून विद्यासागर महाशयांचा शिष्य आणि विधवाविवाहाचा पक्षपाती. त्यामुळे मी मनोमन विचार केला, ' माझ्या संगतीसोबतीचा कोणी एखादा मुलगा या विधवा मुलीशी विवाह करण्याला तयार होणार नाही ?' याच संधीला माझा सहाध्यायी मित्र योगेन्द्रनाथ बंद्यो-पाध्याय विधुर झाला. त्याची प्रथम पत्नी वारली. ती वारल्यानंतर दहाबारा

दिवसांतच त्याचे आप्तइष्ट त्याला पुनः लग्न करण्याची घाई करू लागले. योगेंद्र माझ्याकडे आला आणि त्याने या बाबतीत माझे मत विचारले. मी त्याला म्हटले, 'जा. जा. मला काही विचारू नको. तुझी पत्नी मरून दहाबारा दिवसही झाले नाहीत, तोच तुझी दुसऱ्या लग्नाची घाई! बरे, लग्नच करायचे झाले तर एखाद्या आठनऊ वर्षांच्या मुलीशी तू लग्न करणार ना! मला ते पसंत नाही. तुझ्या इच्छेला येईल ते तू कर!' योगेन हे माझे उत्तर ऐकून विषण्ण मनाने घरी गेला. दोन दिवसांनी पुनः माझ्याकडे आला आणि 'तू सांगशील तसे करतो' असे म्हणून बसला. मी त्याला विधवाविवाहाबद्दल उत्तेजन दिले. त्यानेही संमती दिली. तेव्हा मग मी हेमदादाच्या मदतीने ईशानचंद्र राय यांची भेट घेतली. योगेंद्र आणि ईशानची बहीण महालक्ष्मी यांची परस्परांना ओळख करून दिली, आणि तिच्याशी त्याचा पुनर्विवाह करण्याचे ठरविले.

मला वाटते महालक्ष्मीचे वय त्यावेळी १८ वर्षांचे असावे. माझ्यापेक्षा व योगेनपेक्षा २।३ वर्षांनी लहान. विवाहाचे निश्चित होताच ती बातमी सांगण्यासाठी मी विद्यासागर महाशयांकडे गेलो. ते पूर्वीपासूनच ईशान आणि त्याची बहीण यांना ओळखीत होते. माझ्या आठवणीप्रमाणे सांगायचे तर ते त्यांना थोडीफार आर्थिक मदतही करीत होते. माझ्या तोंडून महालक्ष्मीशी योगेन पुनर्विवाह करायला तयार आहे व तसे ठरलेही आहे हे ऐकून त्यांना अतिशय आनंद झाला आणि या विवाहाला मी स्वतः उपस्थित राहतो असेही ते म्हणाले. नंतर विवाहाचा दिवस ठरविला आणि केवळ दोनतीन प्रतिष्ठित लोकांच्या उपस्थितीत विद्यासागर महाशयांनी स्वतःच्या खर्चाने हा विवाह लाविला. मला तर असे आठवते की, मुलीला थोडेफार दागिनेही त्यांनीच घातले.

या पुनर्विवाहानंतर लागलीच भयंकर छळाला सुरवात झाली. योगेंद्राच्या आप्तइष्टांनी योगेंद्राला वाळीत टाकले. आपल्यातून घालवून दिले. त्याची व ईशानची स्कॉलर्शिप, एवढाच त्यांचा आधार ठरला. नोकर मोलकरीण कोणीच मिळेनात. दिवस घालविणे कठीण होऊ लागले. अशा स्थितीत मला त्यांनी आपल्या संगतीत राहण्याला विनविले. मी त्यावेळी शांखारीटोल्यात जगत्‌बाबूकडे राहात होतो. योगेन आणि ईशान यांच्या स्कॉलर्शिपमध्ये माझी स्कॉलर्शिप जमा केल्यास त्यांना थोडेफार सहाय्य होईलसे वाटले. शिवाय मी त्यांच्याकडे राहिल्याने इतरही बरीच मदत होईल, धैर्य वाढेल, या आशेने ते मला आपल्यात येऊन राहण्याचा आग्रह करू लागले. हा विवाह जुळविण्यात मीच, मध्यस्थ असल्यामुळे त्यांच्या या अपत्तीत–आणि समाजाने बहिष्कृत केलेल्या अवस्थेत त्यांच्यापासून दूर कसा राहू? अर्थात वडलांना ही सर्व हकीकत लिहून कळविली आणि त्यांच्यांत सामील झालो.

बाबांना ही हकीगत कळताच ते खवळले. कारण ज्ञातीतील लोक आणि

गावचे सगेसोयरे यांना हे समजताच ते घोटाळा करणार हे ठरलेलेच. लागलीच 'त्या मंडळीतून तू वेगळा राहा' असे हुकूमवजा पत्र त्यांच्याकडून मला आले. मी त्यावर विनयपूर्वक विनंती केली की, मीच या लग्नाची मध्यस्थी केली असल्यामुळे अशा या विपन्नावस्थेत, समाजबहिष्कृतावस्थेत आणि आर्थिक दुःस्थितीत त्यांच्यापासून वेगळे राहणे आणि आर्थिक सहाय्य न करणे हा अधर्म आहे, अन्याय आहे. यामुळे आपल्या आज्ञेचे पालन करणे मला अशक्य आहे. पण बाबांनी माझ्या या समर्थनपर विनंतीकडे लक्ष दिले नाही आणि उलटपत्री लिहिले की, तसे तू केलेस तर प्रसन्नमयीला मी घरात ठेवून घेणार नाही आणि तुलाही पत्नीसह या घरातून घालवून देईन.

### माझे मामा

ज्यावेळी असा हा पत्रव्यवहार चालू होता त्याच वेळी मोठ्या मामांनी मला बोलवून घेतले. मीही चांगडीपोता गावी जाऊन त्यांना भेटलो. त्यांनीही वडलांचे त्यांना आलेले एक पत्र मला दाखविले. त्यांत, 'मला माझ्या हेतूपासून परावृत्त करू न शकल्यामुळे' मोठ्या मामांना ते शरण गेल्याचे मला दिसून आले. पत्र वाचून शांतपणाने व धैर्यपूर्वक सर्व झालेली हकीगत त्यांना निवेदन केली. त्यांचा किती कसा छळ होत आहे, दारिद्र्यात त्यांना कसे दिवस घालवावे लागत आहेत आणि त्या बाबतीत संघर्षाचे स्वरूप काय आहे हे त्यांना उघड करून सांगितले. आणि 'आता या अशा स्थितीत मी काय करावे, ते तुम्हीच सांगा' असे म्हणून त्यांच्यावरच मला मार्गदर्शन करण्याची जबाबदारी सोपविली.

धैर्यपूर्ण गांभीर्यात काही वेळ विचारात घालवून ते मला म्हणाले, 'नाही. तुला त्यांचा त्याग करता येणार नाही. विवाह करायला तूच त्यांना प्रोत्साहित केलेस आणि आता त्या दोघांना विपन्नावस्थेत टाकून तू अलग झालास तर तो अधर्म होईल. भ्याडपणा ठरेल. माझा तू भाचा आहेस. तुझ्या हातून असे दुष्कृत्य होता कामा नये.'

हे शब्द ऐकताच, कुणी तरी माझ्या हृदयावर दडपला गेलेला दहा मण वजनाचा बोजा उतरून ठेविला असे मला वाटले. मी सुटकेचा सुस्कारा सोडला आणि त्यांना म्हटले, 'माझ्या बाबांना तुम्ही हे सर्व लिहा.'

'मला तुमची विनंती मान्य करवत नाही, तू असे करू नको असे त्याला सांगता येत नाही. उलट या बाबतीत मी त्याला सहाय्यच करीन.' असे बाबांना त्यांनी लिहिले.

### मित्रत्वाची जोखीम

योगेन्द्राच्या विवाहानंतर त्या जोडप्याकरिता माझ्या खडतर श्रमांला आरंभ झाला. या परिश्रमातुन थोडा वेळ विसावा मिळावा म्हणून योगेन व महालक्ष्मी

यांचा निरोप घेऊन मी मामाकडे जाऊन राहिलो. दोनतीन दिवस आजोळी आजीच्या सहवासात जातात न जातात तोच एके दिवशी रात्री दहा वाजण्याच्या सुमारास ईशानकडून एक जरूरीची तार आली. 'तुझे येथे राहणे अत्यंत आवश्यकतेचे झाले आहे. लवकर ये.' असा त्यांत मजकूर होता. मग काय करणार! रेल्वेस्टेशन माझ्या आजोळहून दोन तीन मैल अंतरावर. माळावरून स्टेशनावर जायचे. पण त्यावेळी तो सगळा माळ पाण्याने भरून गेला होता. जिकडे तिकडे पाणीच पाणी. वाट सापडणे ठीण. आजी आणि मामी दोघीही मला जाऊ देत ना. मी मोठ्या काळजीत पडलो. पण मोठ्या मामानी मला त्यांतून सोडविले. ते म्हणाले, 'एक्स्प्रेस तार जर त्याने केली आहे तर तसेच काही तरी संकट उपस्थित झाले असावे; तू जाच. रात्री ३ की ३॥ वाजता एक गाडी आहे. त्या गाडीने जा.' त्यांच्या सांगण्याप्रमाणे त्याच रात्री तशा पावसापाण्यातून मी निघालो. माझ्याबरोबर मामाने एक नोकर कंदील घेऊन सोबतीला दिला. मी जलमय झालेला रस्ता तुडवीत कसाबसा रात्री बारा वाजता स्टेशनात पोचलो. आणि मग ३॥ च्या गाडीने सगळ्या रात्रीच्या जागरणाने मरगळलेल्या अवस्थेत कलकत्त्याला येऊन पोचलो.

येऊन ऐकले की, मी आजोळी गेलो त्याच्या दुसऱ्याच दिवशी योगेनची आई अकस्मात् कलकत्त्याला आली. योगेनला त्याच्या आप्तांनी तिच्या सांगण्यावरून धरून गावी नेले आणि काल सकाळपासून काही ना काही निमित्ताने त्याला तेथेच अडकवून ठेविले आहे. या बायकोला टाक, आम्ही प्रायश्चित्तपूर्वक दुसऱ्या एका मुलीशी तुझे लग्न करून देतो असे सांगून योगेनला नको जीव करीत आहेत. आईने त्याला कमालीचा अस्वस्थ केला आहे. इतकेच नव्हे तर रात्री सुद्धा ती त्याला आपल्याकडेच ठेवून घेते; त्यामुळे तिला सोडून रात्रीही त्याला महालक्ष्मीकडे येता येत नाही. ती मंडळी त्याला येऊ देत नाही. मग प्रश्न असा पडला की, महालक्ष्मीच्या सोबतीला राहायचे कोणी? तिची आई मुलीचा पुनर्विवाह होणार हे ऐकूनच कलकत्ता सोडून काशीला निघून गेली होती. इकडे, ईशानची हॉस्पिटलमधील 'नाईटड्यूटी' करण्याची पाळी! म्हणून मला तार करून बोलविले.

मी येताच प्रथम योगेनच्या आईला भेटायला गेलो. तिला अनेक प्रकारे समजाविले. तिला समजाविल्यानंतर योगेनला परिस्थितीची जाणीव करून दिली आणि त्याला महालक्ष्मीकडे रात्री राहण्याला तयार केले. त्याच्याकडून दिवसभर आईकडे राहून नंतर महालक्ष्मीकडे रात्र घालवावी असे कबूल करून घेतले. तो त्याप्रमाणे येऊ-जाऊ लागला; पण येण्याला त्याला बरीच रात्र होऊ लागली. तोपर्यंत मी जेवल्यावर महालक्ष्मीच्या खोलीत बसून तिला बंगाली व इंग्रजी शिकवीत असे. तसेच धर्मविषयक गोष्टी बोलण्यात आणि उपासनेत आम्ही तो वेळ घालवीत असू.

पण मला या यातायातीत फारच परिश्रम पडू लागले. योगेन आपल्या मानसिक तळमळीत असणाऱ्या आईकडे व आप्तइष्टांकडे नसत्या घालमेलीत पुष्कळसा वेळ घालवी. ईशानही अभ्यास व नाईटड्यूटी यात गढलेला असल्यामुळे इकडे लक्ष घालण्याला त्याला वेळच मिळत नसे. महालक्ष्मीकडे नोकर, मोलकरीण नसल्यामुळे बाजार करणे, दुसऱ्या मजल्यावर खांद्यावरून पाणी नेणे वगैरे सर्व घरकाम मलाच करावे लागे. हे सर्व आठवले म्हणजे आता मला आनंद वाटतो. ती कामे करताना होणाऱ्या श्रमाचीही मला जाणीव होत नसे. कारण महालक्ष्मीच्या भगिनीतुल्य प्रेमाची मला अहर्निश सोबत मिळे. तो आनंद मला श्रमसहिष्णू बनवी. मनुष्य मनुष्यावर असे निरपेक्ष प्रेम सहसा करीत नाही. योगेन तर सदासर्वदा आपल्या गणगोतातच गढलेला असायचा. त्यामुळे महालक्ष्मीचा सोबती, तिचा शिक्षक, तिचा सैंपाकघरातील खटपट्या एकटा मीच. मी एक दिवस दुसरीकडे कुठे गेलो तर ती अस्वस्थ होई.

माझ्या जीवनातील महत्त्वाचा काल तो हाच असे मी समजतो त्याचे कारण हेच. या कालात माझ्या अन्तःकरणात धर्मभावना आणि कारुण्य यांचा खूपच विकास झाला. दुसरीकडून मित्रांचे प्रेम आणि श्रद्धा याचा मला भरपूर लाभ मिळत होता. या सर्वांत माझ्यावर असलेल्या योगेन व ईशान यांच्या प्रेमयुक्त श्रद्धेला, विश्वासाला आणि भरंवशाला तर तोडच नव्हती.

लिहिता लिहिता मला एका गोष्टीची आठवण झाली. मात्र ही घटना यानंतर पुष्कळ कालावधीची आहे. त्यावेळी, मला वाटते ईशान राय लखनौच्या बलरामपूर हॉस्पिटलात काम करीत होता. आणि अशा वेळी रजा घेऊन तो कलकत्त्याला आला होता. एकदा सायंकाळनंतर मी त्याला भेटायला म्हणून गेलो असता त्याने तिथे मला राहवूनच घेतले. घरी येऊ दिलेच नाही. म्हणाला, ‘ माझ्या बऱ्याचशा कौटुंबिक गोष्टी बोलायच्या आहेत. तू राहाच. ’ आणि नंतर आपल्या पत्नीच्या होणाऱ्या पुष्कळशा चुका त्याने माझ्या कानावर घातल्या. तो सांगू लागला, ‘ मी माझ्या पत्नीला पुष्कळच समजाविले, पण त्याचा काहीच परिणाम झाला नाही. आता तू तरी तिची समजूत घाल. ’ मी विचारले, ‘ अरे, तू तिचा नवरा. तुझे ज्या बाबतीत ती ऐकत नाही, तिला उमज पडत नाही, तिथे मी सांगून काय होणार ? ’ यावर त्याने म्हटले, ‘ तुझ्यावर तिची श्रद्धा आहे आणि आदरयुक्त प्रेमही आहे. तेव्हा तुझ्याच सांगण्याचा झाला तर उपयोग होईल. ’ अर्थातच मी नोकरामार्फत प्रसन्नमयीला – माझ्या पत्नीला – मी आज तिकडे येत नाही असे कळविले आणि रात्र ईशान रायकडेच घालविली. त्याच्या पत्नीशी, त्यांच्यातील दांपत्यमतभेदांबद्दल व वादविवादाबद्दल पुष्कळ समजुतीच्या गोष्टी सांगितल्या. माझ्या या सांगण्याचा काय परिणाम झाला ते मला कळले नाही. पण मित्राच्या या अकृत्रिम श्रद्धेबद्दल व प्रेमाबद्दल जेव्हा जेव्हा मी विचार करतो तेव्हा तेव्हा

ईश्वराला धन्यवाद दिल्यावाचून माझ्याने राहावत नाही. कारण, त्यांच्या स्वाभाविक प्रेमळतेमुळे माझ्या मानसिक विकासाला फारच मदत झाली होती. ते उपकार काय सांगावे !

## द्वितीय पत्नीला पुनर्विवाहित करण्याचा उपक्रम

यावेळी माझ्या डोक्यात कितीतरी विलक्षण संकल्प येत. भारतोद्धाराच्या नाना प्रकारच्या योजना माझ्या मेंदूत परिभ्रमण करीत. त्या सर्वांचा उगम मला उत्साहित करणाऱ्या महालक्ष्मीत होता. या आयुष्यात मला अनेक शिष्य आणि चेले मिळाले, पण महालक्ष्मीसारखी मलाच उत्तेजन देणारी शिष्यीण मला दुसरी कोणी मिळाली नाही. याच संधीला जॉन स्टुअर्ट मिलचा ग्रंथ वाचून योगेन काही दिवस का होईना पण पक्का नास्तिक बनला होता. त्याबाबतीत माझ्याशी त्याचा रोज तर्कवितर्क आणि वितंडवाद चाले. मी त्याला आस्तिक बनविण्याचा प्रयत्न करीत असे, पण त्याचा परिणाम असा होई की तो जास्तच दृढ निश्चयाने नास्तिकवादाचा प्रचार करण्याला तयार झालेला दिसे. तो हसत हसत मला म्हणे, ' माझ्या पत्नीला तू शिष्यीण बनविलीच आहेस, शक्य त्या प्रकारांनी तू तिला धार्मिक बनव. पण त्यातून मला सोडव ना ! ' योगेनला शिकवणे–समजावणे अशक्य झाल्यामुळे मी महालक्ष्मीलाच धर्माचे पाठ देऊ लागलो. दोघेही रोज ब्रह्मोपासना करीत असू.

आम्ही तिघे जीव असे काही ' रिफॉर्मर ' बनलो होतो की, नवीनच काही तरी उपक्रम करीत असू. त्यातच आमच्या तिघांच्या सल्लामसलतीने, माझी द्वितीय पत्नी विराजमोहिनी हिला आणून तिचा पुनः विवाह करून द्यावा, असे ठरले. तोपर्यंत विराजमोहिनीला मी पत्नीत्वाचे अधिकार दिले नव्हते. पत्नी म्हणून मी तिचा स्वीकार केला नव्हता. याच १८६८ साली मी तिला आणायलाही गेलो. त्यावेळी ती ११।१२ वर्षांची अजाण मुलगी होती. मला वाटते, मी माझ्या आई-वडलांना विचारल्याशिवाय, त्यांचे मत न घेता तिला आणायला गेल्यामुळे तिच्या मातापित्याने तिला माझ्याबरोबर पाठविण्याचे नाकारले. जिचा पुनः विवाह करण्याचे मी ठरविले होते, तिला पत्नी म्हणून कसे मानावे, ते माझे कर्तव्य नव्हे असे समजून, मी तिला पत्नीचा अधिकार दिला नव्हता. अर्थात महालक्ष्मीजवळ तिला आणून ठेवावी हे मला साध्य होईना. त्यामुळे मी फार दुःखित झालो.

## एल्. ए. ची परीक्षा

त्यानंतर एल्. ए. ची परीक्षा आली. त्यात पास झालेच पाहिजे होते. योगेनच्या विधवाविवाहामुळे मला किती आणि कसा छळ सोसावा लागला होता हे मागे सांगितलेच आहे. विवाहानंतर थोड्यात दिवसांत महालक्ष्मीची प्रकृती बिघडत

चालली. नोकर मिळेना, सैंपाकीण मिळेना. त्यामुळे अजारीपणातच तिला-सैपाक-पाणी करावे लागे. तिकडे योगेनच्या नातेवाइकांनी त्याला नको जीव करून सोडले. तो अत्यंत अस्वस्थ झाला. ईशान मेडिकल कॉलेजातील ड्यूटीवर असल्यामुळे त्याला येता येत नसे. त्यामुळे नोकराने करावयाची सर्व कामे माझ्याच अंगावर पडली. मीच हरकामी आणि घरकामी बनलो. मी हेही पूर्वी सांगितलेच आहे. ही सर्व कामे करण्यात माझा वेळ जात असल्यामुळे माझा अभ्यास होईना. वर्षाच्या शेवटची परीक्षा तोंडाशी आलेली. पण त्यासाठी मला तयार होता येईना. अभ्यासाला वेळ मिळेना. अशा प्रकारे दिवस जाता जाता १८६८ सालचा सप्टेंबर महिना संपत आला. संस्कृत कॉलेजचे त्यावेळचे अध्यक्ष प्रसन्नकुमार सर्वाधिकारी महाशय माझ्यावर अतिशय प्रेम करीत. विद्यासागर महाशयांचे ते मित्र होते. या विधवाविवाहाबद्दल त्यांना फार संतोष वाटला आणि त्यांनी तसे बोलूनही दाखविले; पण माझ्या अभ्यासाचा सर्व खेळखंडोबा झाला म्हणून त्यांना वाईट वाटले. त्यांनी ऑक्टोबरच्या प्रारंभी मला बोलवून सांगितले, ‘ तू एक चांगलेच काम करीत आहेस हे काही सांगायला नकोच. पण मला तुझी एक काळजी वाटते. तू येत्या परीक्षेत कॉलेजचे नाव राखशील असा मला भरंवसा वाटत होता; पण आता अशी भीती वाटते की स्कॉलरशिप तर राहोच; पण पास होशील की नाही याचाच संशय. ’ त्यांचे ते बोलणे ऐकून मला वाटले, मी कुठच्या तरी डोंगराच्या कड्यावर उभा असून माझ्या समोर खोलच खोल दरी आहे. एक पाऊल पुढे टाकताच त्यात मी कोसळून पडेन. माझ्यासमोर आता एक कठीण समस्या उभी आहे, हे मला त्याच क्षणी डोळ्यांसमोर दिसू लागले. वाटले, स्कॉलरशिप जर मिळाली नाही तर ज्याच्यासाठी मी एवढे खडतर परिश्रम घेत आहे त्यांना माझ्याकडून काहीच सहाय्य होणार नाही. योगेन आणि महालक्ष्मी माझ्या मदतीच्या अभावी दारुण संकटात सापडतील. विचार करता करता माझे डोळे भरून आले. ‘ देवा, यावेळी मला तू राख. मला संरक्षण दे. ’ असे म्हणून मनातल्या मनात व्याकुळतेने प्रार्थना करू लागलो. पुढच्याच क्षणी मी माझे प्रातकर्तव्य निश्चित केले. सर्वाधिकारी महाशयांच्या तोंडाकडे पाहून त्यांना गंभीरपणे विचारले, ‘ आपण माझ्यावर थोडी मेहरबानी कराल का? तसे झाले तर जगण्यामरण्याचा हा प्रश्न जिद्दीने सोडविण्याचा मी प्रयत्न करून पाहतो. ’ त्यांनी विचारले, ‘ कसली मेहरबानी ? ’ मी उत्तर दिले, मी ठरवीत आहे की कलकत्ता सोडून भवानीपूर येथे जाऊन राहावे. विशेष कारणाशिवाय कॉलेजात यायचे नाही. एकाग्र मनाने अभ्यासातच सर्व लक्ष गुंतवावे आणि परीक्षेची पूर्ण तयारी करावी. कॉलेजात उपस्थित न राहिल्याबद्दल माझी स्कॉलरशिप न कटली गेली तरच मला असे करता येईल. ’ त्यांनी सांगितले, ‘ तू कॉलेजात हजर राहणार नाहीस. पण स्कॉलरशिप मात्र चालू राहिली पाहिजे. हे कॉलेजच्या नियमाविरुद्ध होते. डायरेक्टरांना विचारल्यावाचून मला असे करता येणार नाही.

मला याबाबतीत काय करता येईल हे मी दोन एक दिवसांनी कळवीन.' नंतर त्यांनी सर्व हकीगत खुलासेवार लिहून डायरेक्टरांकडून अनुमती मिळविली आणि मला रजा दिली.

योगेन आणि महालक्ष्मी यांचा निरोप घेऊन मी माझे जुने आश्रयदाते भवानीपूरचे महेशचंद्र चौधुरी महाशय यांच्या घरी जाऊन हजर झालो आणि त्यांच्याकडे अडीच महिन्यांसाठी एक खोली मागून घेतली. त्या खोलीत मी एकटाच राहायचा. त्यांनी कृपाळूपणाने माझ्या म्हणण्याप्रमाणे सगळी व्यवस्था करून दिली. मी त्या खोलीत राहून अभ्यासात गढून गेलो. सकाळी एकदा स्नान-जेवण करण्यासाठी बाहेर जात असे आणि रात्री जेवणासाठी अर्धा तास बाहेर घालवीत असे. बाकी सगळा वेळ त्या खोलीतच घालवीत असे. या अडीच महिन्यांत बिछान्यात काही झोपलो नाही. सायंकाळी नोकर खोलीत दिवा आणून ठेवीत असे. तो दिवा रात्रभर तेवत असे. फारच झोप आली तर पुस्तक उशाला घेऊन चारदोन तास झोपत असे. माझ्या आठवणीप्रमाणे अभ्यासाचे वेळापत्रक असे ठरविले होते : गणित सहा तास. ( दोन तास वाचन आणि चार तास गणिते सोडविणे. ) इतिहास सहा तास. इंग्रजी तीन तास. संस्कृत लॉजिक दोन तास. सर्व मिळून अठरा तास मी अभ्यास करीत असे. अशा प्रकारे अभ्यास करता-करता शरीर आणि मन केव्हा केव्हा अगदी भारावून जात असे. ग्लानी येई. अशावेळी अभ्यास सोडून बाहेर पडावे असे मनाला वाटे. त्यावेळी योगेन आणि महालक्ष्मी यांचे चेहरे डोळ्यांपुढे येत आणि मनातल्या मनात मी दृढप्रतिज्ञ होई. मनात येई ज्यांना उत्साहित करून या संसाराच्या जीवनयुद्धात आणून टाकले, त्यांना सहाय्य करण्याला जर मी असमर्थ ठरलो तर मला निश्चिंतपणा कसा येणार ? जीव जावो अथवा राहो पण एकदा प्राणान्तिक प्रयत्न केलाच पाहिजे. त्याच वेळी प्रार्थना करण्याची मनाला सूचना मिळे. ' हे देवा, या युद्धात मला सहाय्य कर. ' आणि अशी प्रार्थना दिवसातून अनेकदा करीत असे. लोक जसे श्रम करताना वारंवार चहा पिऊन सामर्थ्य वाढवीत, तसाच मी वारंवार प्रार्थना करून माझे मनोबल वाढवीत असे.

अशाप्रकारे श्रम करता करता जेव्हा अडीच महिन्यांनी परीक्षेची वेळ आली तेव्हा पाहिले, एका खोलीत अडीच महिने बंदिस्त राहून अभ्यास केल्यामुळे व जमिनीवर निजत असल्यामुळे कमरेत वात धरण्याला सुरवात झाली आहे, परीक्षा द्यायला जायच्या वेळी तर एका मुलाच्या खांद्यावर हात ठेवून परीक्षेच्या हॉलमध्ये उपस्थित झालो आणि परीक्षा देऊन आलो. त्याकाळी डिसेंबरच्या अखेरीस परीक्षा घेतल्या जात.

### मित्रपत्नीचा मृत्यू

मला वाटते १८६९ सालच्या जानेवारी महिन्याचा शेवटचा आठवडा

असावा. या वेळी परीक्षेचा रिझल्ट लागला. त्यावेळी आजाराशी चाललेल्या महालक्ष्मीच्या घोर संग्रामात आम्ही गुंतलो होतो. अकस्मात् कॉलऱ्याच्या रोगाने ती मरणासन्न अवस्थेत मृत्युशय्येवर पडलेली. वांती—जुलाब सुरू. त्या स्थितीत मी विद्यासागर महाशयांचे पत्र घेऊन डॉ. महेन्द्रलाल सरकारांचे पाय धरले. ते मला पूर्वीपासूनच ओळखीत होते आणि माझ्यावर त्यांचा लोभही होता. माझी ती व्याकूळ अवस्था पाहून ते रोज महालक्ष्मीला पाहायला येत. त्यांना जे उपाय करिता येणे शक्य होते त्यांत त्यांनी कमतरता केली नाही. शेवटी काही दिवस मृत्यूशी झगडता झगडता महालक्ष्मी गतप्राण झाली. ती त्यावेळी ८।९ महिन्यांची गरोदर होती. अशा अवस्थेत ती मरण पावल्यामुळे माझ्या मनाला ती गोष्ट फारच लागली. महालक्ष्मीची आई यापूर्वीच काशीहून आली होती. या शोचनीय प्रसंगी ती माझ्या गळा पडून म्हणाली, ' बाबारे इतके करूनही या पोरीला तू वाचवू शकला नाहीस रे ! ' आणि मोठ्याने हंबरडा फोडून रडू लागली. योगेन तर उशीत डोके खुपसून पडूनच होता. ईशान वेड्यासारखा होऊन खोलीतून बाहेर आणि बाहेरून खोलीत अशा फेऱ्या घालू लागला. अशा प्रसंगी महालक्ष्मी-साठी रडत कसा बसू ? पुढे काय आणि कसे करावे, या विचाराने मी अस्वस्थ झालो. अशा अवस्थेत मी असतानाच एल्. ए. परीक्षेत पास झाल्याची बातमी मला कळली. निकाल फारच छान लागला. युनिव्हर्सिटीची फर्स्ट ग्रेड स्कॉलरशिप ३२ रु., इंग्रजी व संस्कृत विषयांत युनिव्हर्सिटीत पहिला आल्यामुळें डफ् स्कॉलरशिप १५ रु. आणि संस्कृत कॉलेजची पहिली स्कॉलरशिप १२ रु. सर्व मिळून ५९ रुपयांची स्कॉलरशिप मिळाली. ज्यांच्यासाठी मी एवढे अविश्रांत परिश्रमाचे युद्ध खेळलो त्यांना ईश्वराने दुःखात लोटल्याचे व महालक्ष्मीला तर प्राणासह नेल्याचे मनात येऊन माझ्या डोळ्यांतून अश्रूंच्या धारा वाहू लागल्या. परंतु परमेश्वराने दुसऱ्या एका संग्रामाची पूर्वीपासूनच योजना केली होती, हे त्यावेळी मला समजले नव्हते. ते म्हणजे ब्राह्मधर्माची दीक्षा आणि पितृगृहातून हकालपट्टी. याचे विवरण मी पुढे सांगेनच.

महालक्ष्मी कायमची अंतरल्याचे पाहून तिची आई मला मिठी मारून म्हणाली, ' बाबा, तूही आम्हांला सोडून जाणार काय ? ' तेव्हा मी तिला बाजूला सारू शकलो नाही. भवानीपुरातून निघून त्यांच्याकडे आणखी काही महिने राहिलो. पण यानंतर थोड्याच दिवसांत योगेनने बिऱ्हाड मोडले. आमच्या जीवनाचे मार्ग पण वेगवेगळे झाले; तरी पण या सर्व धडामोडींत महालक्ष्मीचा वियोग मला चांगलाच जाणवला. तो मला विसरता आला नाही.

महालक्ष्मी गेल्यावर अभ्यासाच्या वेळी केलेल्या अतिरेकी श्रमामुळे, मला एक विशेष प्रकारचा आजार उद्भवला आणि त्याबरोबरच सर्वांगावर पांढरे पांढरे गोल गोल एक प्रकारचे फोड दिसू लागले. त्यांना थोडासा धक्का लागताच मला

असह्य वेदना जाणवत. कोणी कोणी डॉक्टर ते सर्व पाहून म्हणत, ' कुष्ठव्याधीची ही सुरवात आहे. ' डॉ. महेंद्रलाल सरकारनी अतिश्रम केल्याबद्दल मला दोष देऊन, सहा महिने मनःपूर्वक माझी चिकित्सा केली आणि मला त्या विलक्षण व्याधीतून मुक्त केले.

## उपेन्द्रनाथ दास याचा विधवा विवाह केला

यानंतर उपेन्द्रनाथ दास याच्या विधवाविवाहाची हकीगत लिहितो. ही घटना मला वाटते, १८६८ सालच्या मध्याला घडली असावी. हायकोर्ट वकील बाबू श्रीनाथ दास यांचा वडील मुलगा उपेंद्रनाथ त्या वेळी कलकत्त्याच्या ' तरुण-रिफॉर्मर 'चा पुढारी होता. त्यापूर्वी त्याने मद्रासेतून आल्यावर इंडियन रॅडिकल लीग नावाची एक संस्था स्थापन करून तिचा अध्यक्ष या नात्याने कार्य करीत होता. लोकवदंता अशी होती की कोणत्याशा कौटुंबिक कारणाने बापाशी भांडून हा मद्रासला पळून गेला होता. मद्रासहून येऊन मोठ्या उत्साहाने तरुण सुधारक मंडळाचा नेता बनला. योगेनने जेव्हा विधवाविवाह केला तेव्हा, योगेनला व मला एके दिवशी आपल्या संस्थेत बोलावून सर्वांसमक्ष आम्हा दोघांचा त्याने सत्कार केला होता. तरुण वर्गाने टाळ्या वाजवून आम्हांला प्रोत्साहन दिल्यामुळे आम्ही फुगून गेलो. कर्तबगार नामांकित रिफॉर्मर म्हणून सर्वांसमोर आलो. उपेन संस्कृत कॉलेजातील विद्यार्थी. आम्हीही संस्कृत कॉलेजचे विद्यार्थी. यामुळे या वेळेपासून उपेनशी आमचे घनिष्ठ संबंध येत चालले. योगेनला उपेनकडे जायला फारसा वेळ मिळत नसे. पण मी आणि उमेशचंद्र मुखोपाध्याय दोघेही वारंवार त्याच्या घरी जात असू आणि उपेनच्या तोंडून स्रवणारी युरोपियन फिलॉसॉफी व संस्कृतीची वाक्‌गंगा आ वासून पीत असू. केव्हा केव्हा उपेनच्या घरी मी रात्रीही मुक्काम करी.

अशारीतीने त्याच्याशी विशेष संबंध जडण्याचे एक कारणही होते. माझी द्वितीय पत्नी विराजमोहिनी हिचा पुनर्विवाह लावून द्यावा हे जे एक वेड माझ्या डोक्यात शिरले होते त्याला उत्तेजन देण्याचे काम उपेन करीत असे व वेगवेगळे मार्गही सुचवीत असे.

एके दिवशी रात्री मी उपेनच्या घरीच झोपायला होतो. त्यावेळी उपेन मला म्हणाला, ' इतकी कसली काळजी करतोस ? तुझ्या दुसऱ्या पत्नीचा विवाह, डाका, काशी किंवा लाहोर येथे तिला नेऊन ती अविवाहित आहे असे सांगून करून ये. नंतर ती दोघे तिकडेच राहू देत. हे बेकायदा होईल. होईना ! ' मी उत्तर दिले, ' ते अन्याय्य ठरेल व ती एक प्रकारची फसवणूक केल्यासारखेही होईल. ' तो यावर म्हणाला, ' खोटे कृत्य अगर अन्यायी कृत दोन प्रकारचे असते. व्हाइट लाईज अँड ब्लॅक लाईज. पैकी ही व्हाइट लाय. ' व्हाइट लाय आणि ब्लॅक लाय

हे शब्द मी प्रथमच ऐकत होतो. तेव्हा मी नवलाईने त्याला विचारले, ' उपेन, खोटेपणात आणखी व्हाइट-ब्लॅक हा कांय प्रकार ? ' तेव्हा मग त्याने व्हाईट ब्लॅकची व्याख्या मला सांगायला सुरवात केली. पण ते त्याचे सांगणे मला काही पसंत पडले नाही. मीं सर्व ऐकून त्याला म्हटले, ' अशी फसवणूक करण्याचे काम माझ्याकडून होणार नाही. ' ते काही असो; पण त्या वेळी उपेनच्या तोंडून व्हाइट-ब्लॅकचे मला नापसंत असलेले विवेचन ऐकूनही त्याची संगत मात्र सोडली नाही.

मला वाटते, याच १८६८ च्या मध्यकालात उपेनची पहिली पत्नी अकस्मात् वारली असावी. डॉक्टरला दाखविण्यालाही अवकाश मिळाला नाही. अकस्मात् कॉलरा होऊन काही तासांतच तिचे प्राणोत्क्रमण झाले, असे उपेनच्या तोंडून मी ऐकले.

या शोकजनक घटनेला काही दिवस होतात न होतात तोच एके दिवशी दुपारी उपेनने स्वतः काही मित्रांसह संस्कृत कॉलेजात येऊन मला एल. ए. च्या वर्गातून बोलवून घेतले आणि म्हणाला, ' मी एका विधवेशी विवाह करायला जात आहे. तुला हे ऐकून आनंद वाटल्यावाचून राहणार नाही. मुलगी भवानीपूर येथे आहे. चोरून आणली पाहिजे. तिच्या आईची संमती आहे; पण मामा हा तिचा पालक असल्यामुळे त्याची कबुली पाहिजे. ती मिळणे कठीण. त्याला हा विवाह मान्य नाही. ' अशा प्रकारे मुलीला चोरून आणणे बरे की वाईट, आणून ठेवायची कुठे, विवाह केव्हा कसा लावायचा हे प्रश्न त्या वेळी मनात उत्पन्नच झाले नाहीत. मुलगी कुणाला कळू न देता आणायची, विधवाविवाह करायचा या उत्साहदायक विचारात कॉलेजमधून निरोप घेऊन बाहेर पडलो आणि त्या सर्वांबरोबर निघालो सुद्धा.

आम्ही तिघे तरुण आणि ती मुलगी एवढ्यांनाच गाडीत वाव होण्यासारखा होता. गाडी निघाली ती भवानीपूरच्या एका गल्लीच्या तोंडाशी वळणावर थांबली. ठरले होते की, मुलीच्या वडील बहिणीने मुलीला दिवसा दुपारच्या वेळीच गाडीत आणून बसवून द्यायचे. गाडी उभी करून बराच वेळ झाला, पण तसे घडले नाही. आम्ही पुष्कळ वेळ उभे राहिलो. मुलगी आलीच नाही. नंतर कळले की, मुलगी दिवसाउजेडी आणता येणे शक्य नाही. सायंकाळ नंतर पुनः येऊन मार्गप्रतीक्षा करीत राहिले पाहिजे. ' कार्यभाग झाल्याशिवाय परत जाणार नाही ' असे ठरवून आम्ही ईडन गार्डनच्या रोखाने गाडी हाकली. तेथे पाव, केळी वगैरे घेऊन झाडाखाली बसलो. चांगला फराळ केला. आणि सायंकाळी पुनः पूर्वीच्याच जागी वळणावर गाडी नेऊन उभी केली. होता होता रात्रीचे दहा वाजून गेले तरी त्या मुलीचे नाव नाही. शेवटी दोघी स्त्रिया तेथे आल्या. त्यांपैकी एक विधवा मुलगी आणि दुसरी त्या मुलीची वडील बहीण असे समजले. मुलगी गाडीत बसताच विलंब न लावता आम्ही गाडी भरधाव सोडली.

उपेनच्या सांगण्याप्रमाणे ती गाडी तो संपादन करीत असलेल्या साप्ताहिक वर्तमानपत्राच्या व प्रेसच्या ऑफिससमोर जाऊन उभी राहिली. मुलीला तेथे उतरविण्यात आले. मुलगी या वेळी थरथर कापत असलेली मला दिसली. पुरुषांच्या बिऱ्हाडात स्त्रीने राहणे योग्य नाही, हे आता माझ्या लक्षात आले आणि मी उपेनला विचारले, ' लग्न होणार केव्हा आणि तोपर्यंत हिला ठेवणार कुठे ? ' उपेन म्हणाला, ' लग्न उद्या रात्री होईल. आणि तोपर्यंत हिला येथेच ठेवण्यात येईल. ' या त्याच्या बोलण्याचा मला राग आला. मी म्हटले, ' तसे कधीही होणार नाही. हे मला माहीत असते तर या कामात मी कधी सामील झालो नसतो. या असल्या पुरुषांच्या जमावात आणि धुंदावलेल्या नशाखोर मंडळीत तिला असे ठेवता येणार नाही. होणार नाही ते. ' या ठिकाणी मला हे सांगणे भाग आहे की, उपेन कधी मद्यपान करीत नसे, मद्यच नव्हे तर चिरूटही कधी ओढताना मी त्याला पाहिलेले नाही. या सगळ्या बाबतींत तो विलक्षण संयम पाळीत असे. तरीपण त्याच्या मित्रमंडळीत मद्यपान करणारे पुष्कळ होते. मला तर असे आठवते की, त्या इमारतीतील एका खोलीत यावेळीही मद्यपान करण्यात मग्न झालेले काही पुरुष होते. आणि ते सर्व पाहूनच त्या मुलीला तेथे एकाकी स्थितीत ठेवण्याला मी मोठी हरकत घेतली. शेवटी पुष्कळ तर्कवितर्क झाल्यावर उपेन मला म्हणाला, ' तर मग तुला शक्य असेल तेथे या रात्रीपुरती त्या मुलीला ठेवण्याची व्यवस्था करून ये. ' हे ऐकून मी मोठ्या संकटात पडलो. कारण सुधारकांच्या अशा कोणत्याही परिवाराशी माझा तसा विशेष परिचय नव्हता. मग मी या मुलीला कुणाकडे आणि कशी नेऊन ठेवू ? कलकत्त्यातील ब्राह्म पुढारी मंडळीत काही दिवसांपूर्वी गुरुचरण महलानवीश महाशयांशी माझा परिचय झालेला होता. त्यांना सर्व जण आणि मीसुद्धा सुधारकाग्रणी म्हणून मानीत असे. शेवटी त्या मुलीला तेवढ्या रात्री गाडीत बसवून त्यांच्या परिवारात ठेवण्यासाठी घेऊन गेलो. त्यांनीही मी सांगितलेली सर्व हकीगत ऐकून घेऊन एका रात्रीपुरते त्या मुलीला आपल्या परिवारात ठेवून घेण्याचे मान्य केले.

दुसऱ्याच दिवशी हा खिचडीविवाह झाला. मुलगी कायस्थ जातीची असल्याचे आम्हाला कळले होते. पण नंतर ती माहिती चुकीची ठरून त्याहूनही खालच्या जातीची असल्याचे समजले. कायस्थांची मुलगी असे ऐकून उपेनला वाटले होते. तरीपण विद्यासागर महाशयांच्या मताने, हा विवाह कायदेशीर ठरतो असे कळले. त्यामुळे दुसऱ्या दिवशी सकाळीच विद्यासागर यांच्या मार्गदर्शनाखाली हा विवाह व्हायचा असा बेत केला. तशी व्यवस्थाही झाली. त्याप्रमाणे पुरोहित व ब्राह्मण यांनी हा विवाह यथाशास्त्र लाविला. इकडे उपेनने शहरातील मोठमोठ्या लोकांना निमंत्रित करून एका मोठ्या सभेची तयारी केली होती. त्यासाठी काही कार्यक्रम ठरविणे अवश्य होते. त्या ठिकाणी एक ईश्वरोपासना व्हायची आणि वर-वधूची

एका संमतीपत्रकावर सही घ्यायची असे योजिले. पण उपासना कुणी चालवायची असा प्रश्न निघाला. मी आणि उमेश असे दोघेच या मंडळीत ब्राह्म म्हणून ओळखले जात असू. आमच्या बरोबर आणखी एक ब्राह्म होता; त्याचे नाव प्यारीमोहन चौधरी. ते पुढे आचार्य केशवचंद्र सेन महाशय यांच्या 'प्रेरित दला'त सामील झाले. या तिघांत मीच उपासना चालवावी असे सर्वानुमते का ठरले ते मला आठवत नाही. तरी पण माझ्या माहितीप्रमाणे विवाहापूर्वी अगदी थोडा वेळ निश्चित केले असावे. म्हणून शेवटच्या घटकेपर्यंत मला समजले नसावे. असो.

सर्व निश्चित झाल्यावर वधूला आणायला मी गेलो आणि तिकडे नशेत दंगामस्ती करणाऱ्या एका टोळीत सापडलो. त्यांनी माझी भलती ओढाताण चालविली. वधूला आणण्यासाठी म्हणून जी गाडी मी नेली होती ती त्या गल्लीच्या तोंडाशी जाते न जाते तोच, समोरून येत असलेल्या गाडीला धडकली आणि चाकात चाक अडकले. काही केल्या गाड्यांची चाके सुटेनात. तेव्हा मी खाली उतरून चाके मागेपुढे करू लागलो. तेवढ्यात झिंगलेल्या लोकांचे ते टोळके तेथे आले. त्यांतील एकजण माझ्या ओळखीचा निघाला. त्या झिंगलेल्या लोकांपैकी एकाने मला विचारले, 'हे काय बाबा ? रस्ता का आडवतोस ?' तेव्हा मी कारण सांगितले. लागलीच सर्वांनी खांद्याचा जोर लावून गाड्यांची सोडवणूक करण्याची खटपट चालविली मला पुनः एकाने विचारले, 'इज देअर एनी जंटलमन, बाबा ?' मी 'होय' म्हणून उत्तर दिले. माझे हे उत्तर ऐकताच त्या गाडीच्या दाराकडे मग कोणी गेले नाही. इतका त्यांनी मान राखला. सर्वांच्या जोरदार प्रयत्नाने गाड्यांची एकमेकींच्या गुंतागुंतीतून सुटका झाली. मग ती वधूची गाडी नोकरासह विवाहकार्यालयाकडे भरधाव निघाली. इकडे त्या झिंगलेल्या लोकांपैकी चारपाच जणांनी मला पकडले आणि म्हटले, 'इतक्या खटपटीने आम्ही गाडी सोडविली तेव्हा आम्हाला काही तरी बक्षिसी पाहिजे बाबा.' माझ्या खिशात एक रुपया आहे हे मला त्या वेळी माहीत नव्हते. त्यामुळे मी अत्यंत लीनपणाने त्यांच्या पुष्कळ विनवण्या केल्या. लग्नाची घाई आहे म्हणून सांगितले. पण काही केल्या ते ऐकून घेत ना. माझ्या अंगावर असलेली शाल काढून घेऊ लागले. अर्धा तास अशी धालमेल झाल्यावर माझ्या खिशात एक रुपया असल्याची मला जाणीव झाली, तो रुपया देऊन मी त्यांच्यापासून माझी सुटका करून घेतली आणि कसाबसा धापा टाकीत विवाहमंडपाशी येऊन दाखल झालो. तोच 'उपासना चालविण्याची' वेळ झाल्याची मला सूचना मिळाली. सगळे उत्सुकतेने माझीच वाट पाहात होते.

मी काय त्यावेळी उपासना चालविण्याच्या मनस्थितीत होतो ? प्रथम मी उपासना चालविण्याचे मान्यच करीत नव्हतो. पण माझे ऐकतो कोण ? त्यापूर्वी अशा सार्वजनिक ठिकाणी उपासना चालविल्याचे माझ्या काही आठवणीत नाही. मी आधीच संकोची स्वभावाचा; त्यामुळे असे झाले असावे. मी लाजवट स्वभावाचा

होतो हे वाचून माझ्या मित्रांपैकी काही जणांना हसूच येईल. कारण या सगळ्या बाबतीत आणि इतर विषयांत मी बेपर्वाईने वागणारा व वेछूट वृत्तीचा असल्याचे ते पाहात आले होते. असे असले तरी उपासनादी गंभीर विषयांत मला थोडीफार भीड वाटे. अशा मनस्थितीत मला जेव्हा सर्वांनी मिळून भरसभेत उपासना चालविण्याच्या खुर्चीवर नेऊन बसविले तेव्हा माझी काय अवस्था झाली असेल हे अनुभवीच जाणतील. प्रथम संगीत गायनानेच आरंभ झाला. गीताचा आरंभ ' मने कर शेवेर सेदिन भयंकर अन्ये वाक्य कवे, किन्तु तुमि रबे निरुत्तर । ' ( शेवटचा तो भयंकर दिवस आठव; इतर लोक त्यावेळी बोलतील परंतु तूं निरुत्तर असशील. ) त्या दिवसाच्या मनस्थितीला योग्य असाच गाण्याचा आशय होता. नंतर ऐकले की ब्राह्मसंगीत गाण्याला म्हणून ज्याला धरून आणले होते तो ब्राह्मसंगीत भजनांपैकी राममोहन राय यांचीच पदे जाणत होता. अर्थात् त्यांपैकीच हे एक होते. गाणे संपताच मी प्रार्थना सांगायला सुरवात केली. ती सुरवात होताच सभेतून टाळ्यांचा कडकडाट होऊ लागला. आणि म्हणूनच या विवाहाला मी प्रारंभीच खिचडी विवाह असे नाव दिले. उपासनेनंतर एका कागदावर वर-वधूंनी स्वाक्षरी केली. माझ्या आठवणीप्रमाणे सांगायचे तर साक्षीदारांत श्रद्धास्पद मित्र आनंदमोहन बसू हे एक होते. मात्र त्यावेळेपर्यंत त्यांचा-माझा बोलण्याचालण्याइतका परिचय नव्हता.

## रिफॉर्मर मित्राची कीर्ती

विवाहानंतर उपेनशी आणि त्याच्या नवविवाहित पत्नीशी माझे संबंध बरेच निकटचे होत चालले.

मी नेहेमी त्यांची चौकशी करीत असे आणि क्षेमकुशलही विचारीत असे. इतकेच नव्हे तर काही अडचण पडली तर तीही दूर करीत असे. या वेळेपासून मला आढळून आले की, उपेन कर्जफेडीकडे लक्ष न देता पैसे उसने घेतो व भाड्याने घेतलेल्या खोलीचे भाडेही न देता रातोरात पळून जातो. आणखीही असेच सगळे प्रकार. एकदोनदा मी स्वतः कर्ज काढून त्याचे देणे फेडले आणि उभयतांना ऋणमुक्त केले. तरी पण तो गैरविश्वासू आहे असे ठरविण्याला मला बराच काळ लागला. एकदा रात्री दोन वाजता उपेन सपरिवार कलकत्ता सोडून जो पळाला तो अमृतबाजारच्या शिशिरकुमार घोष यांच्या घरी पोचला. त्यावेळी शिशिरबाबू व त्यांची मंडळी सुधारकाग्रणी व ब्राह्म होती. उपेनच्या या सपरिवार पलायनाला मी, योगेन आणि उमेश मुखुज्ये असे सशस्त्र होऊन सहाय्य झालो आणि त्या स्त्री-पुरुषांना पुढे घालून नारिकेल डांगाच्या नाल्यात एका नौकेत बसवून देऊन आलो होतो. आता ही गोष्ट आठवली म्हणजे हसूच येते.

यानंतर डॉ. लोकनाथ मैत्र यांनी काही दिवसांसाठी म्हणून स्वतःच्या खर्चाने, उपेन याला स्त्रीसह काशी येथे आपल्या घरी नेऊन ठेविले होते. त्यांच्या निर्वाहाचीही सोय केली होती. अशा प्रकारे त्यांचा एका वर्षापेक्षा अधिक काळ तेथे गेला. त्या ठिकाणीही रिफॉर्मर उपेनने कीर्ती गाजविलीच. लोकनाथांना कर्ज-बाजारी करून स्वतः आजारी स्थितीत उपेन सपत्नीक कलकत्त्याला आला. आल्या-वर काही दिवस माझ्याच बिऱ्हाडी राहिला. ही जरी बरीच पुढची हकीगत असली तरी इथेच ती सांगून टाकतो.

मी त्या वेळी ब्रह्मानंद केशवचंद सेन यांजकडून ब्राह्मधर्माची दीक्षा घेऊन व वडलांकडून गृहबहिष्कृत होऊन कलकत्त्यातील कॉलेजस्वेअरच्या उत्तरेस असलेल्या एका गल्लीत एका ब्राह्म मित्राच्या घरी एकत्र कुटुंबीय म्हणून राहात होतो. कालेजांतून मिळणारी स्कॉलरशिप हाच माझा आधार. पुढे त्यांतूनच त्याच घरातील एक खोली भाड्याने घेऊन कसाबसा संसार चालवीत होतो. अशा परिस्थितीत, उपेनने मला आगाऊ काही न कळविता, भयंकर आजारी स्थितीत आपल्या स्त्रीपुत्रांसह काशीहून माझ्याच बिऱ्हाडी यावे याचा अर्थ काय? तरी पण मला तो आल्याचे समजताच, मी पुढे होऊन सर्वांना गाडीतून उतरून घेतले आणि स्वतःच्या बिऱ्हाडात आणले. माझा एक मित्र शेजारच्याच खोलीत राहात होता. त्याने माझ्यावरची ही आलेली आपत्ती ओळखून आपली खोली माझ्या स्वाधीन केली आणि तो दुसरीकडे निघून गेला. मी उपेनच्या रोगाचे निदान करण्यासाठी अन्नदाचरण खास्तगीर यांना बोलवून आणले. त्यांचे माझ्यावर फार प्रेम असे. त्यांनी उपेनला फुकट औषधोपचार करण्याचे मान्य केले.

## महानुभव ईश्वरचंद्र विद्यासागर

याच वेळी विद्यासागर महाशयांच्या सत्प्रवृत्तीचे दर्शन मला झाले. ते खरो-खरच संस्मरणीय असेच आहे. माझ्या बिऱ्हाडी आल्यावर उपेनचा आजार वाढला. इतकेच नव्हे तर या आजारातून तो निभावेल की नाही याच्याबद्दलही मला शंका वाटू लागली. जवळ जवळ आम्ही निराशच झालो म्हटले तरी चालेल. अशा तोळा-मासा स्थितीत असलेला उपेन एके दिवशी मला म्हणाला, 'जर माझ्या वडलांची एकवार तू भेट घडवून आणशील तर फार चांगले होईल. मी आता जास्त दिवस जगणार नाही असेच मला वाटते.' त्याचे वडील श्रीनाथ दास यांच्याशी तसे बोलण्याचालण्याइतका माझा परिचय नव्हता. त्यामुळे स्वतः त्यांच्याकडे जाऊन त्यांना तशी विनंती करणे मला शक्य नव्हते. काय करावे, अशा काळजीत मी पडलो. शेवटी मनात आले, विद्यासागर महाशयांच्या मार्फत श्रीनाथ दास यांना येथे आणता आले तर पाहावे. म्हणून एके दिवशी सकाळी उठून मी विद्यासागर महाशयांकडे गेलो. त्यांनी उपेनची सर्व असच्चरित वागणूक श्रीनाथ दासांकडून

यापूर्वीच ऐकली असल्यामुळे उपेनवर त्यांचा फार राग होता. मला ते माहीत नव्हते. मी उपेनच्या सहवासात असतो आणि माझ्या बिऱ्हाडीच त्याला ठेविले आहे हे ऐकूनच ते माझ्यावर फार रागावले. म्हणाले, ' काय ? ज्याला पाहिल्याबरोबर पायापासून माथ्यापर्यंत चपलांनी झोडपून काढावे असे वाटते, त्याची बाजू घेऊन तू मला असली विनंती करायला आलास ! ' एवढ्या त्यांच्या वाक्यानेच मी जाणले की हे काम यांच्याकडून होणार नाही. तरी पण मी त्यांना बोललोच, ' आपण या पिता-पुत्रांची भेट करून न दिल्यास दुसऱ्या कोणाहीकडून ते काम होणार नाही. बरे तर मी जातो, काय करणार ! उपेनची अखेरची इच्छा मला पुरी करता आली नाही ! ' असे म्हणून मी जाण्यासाठी उठू लागलो. पण मला विषण्ण चेहेऱ्याने उठलेला पाहताच विद्यासागर महाशय म्हणाले, ' जाऊ नको; थांब. अंतकाली बापाला भेटण्याची त्याला चांगली इच्छा झाली, हेही उत्तमच. प्रयत्न करून पाहातो काय करता येते ते. ' नंतर थोडा विचार करून ते म्हणाले, ' उद्या सकाळी ७।८ वाजण्याच्या दरम्यान त्याच्या बापाला मी तुझ्या बिऱ्हाडी आणतो. तू घरात राहा. ' इतके झाल्यावर मी निघून आलो.

त्याच्या दुसऱ्या दिवशी विद्यासागर महाशयांनी काहीतरी करून श्रीनाथ दास यांना माझ्या बिऱ्हाडी आणले, हे ऐकून नवल वाटले. त्याचे असे झाले, त्या दिवशी सकाळीच सात वाजता विद्यासागर महाशय हे श्रीनाथ दास यांच्या घरी उपस्थित झाले आणि श्रीनाथबाबूंना म्हणाले, ' श्रीनाथ, तुझी गाडी जुंपायला सांग बघू. तुला घेऊन एके जागी जायचे आहे. ' श्रीनाथबाबूंनी विचारले, ' कुठे जाणार ? ' त्यांनी म्हटले, ' अरे चल तर खरा, रस्त्याने जाताना सांगतो. ' लागलीच श्रीनाथबाबूंनी गाडी जुंपायला सांगितले. नंतर दोघेही गाडीत बसून निघाले. ते त्यांची गल्ली सोडून पुढे रस्त्यावर येताच विद्यासागर महाशय श्रीनाथ बाबूंना म्हणाले, ' कुठे घेऊन जात आहे समजले ? तुझा मुलगा उपेन आजारी पडून काशीहून आला असून आपल्या मित्राकडे उतरला आहे. त्याचा आजार बराच कठीण असल्यामुळे जगतो की मरतो अशी त्याची अवस्था आहे. तो मृत्युशय्येवर असून तुझ्या भेटीची वाट पाहात आहे. म्हणून त्याच्या मित्राच्या विनंतीवरून तुला न्यायला आलो आहे. ' हे त्यांचे बोलणे ऐकताच श्रीनाथबाबू रागावून म्हणाले, ' कोचमन, गाडी थांबव. ' लागलीच विद्यासागर बोलले, ' गाडी थांबव—गाडी थांबव. मी उतरतो. ' कोचमनने गाडी थांबविल्यावर विद्यासागर महाशय जेव्हा खाली उतरू लागले तेव्हा श्रीनाथबाबू त्यांचा हात धरून म्हणाले, ' हे काय ? तू का उतरतोस ? ' विद्यासागर महाशय म्हणाले, ' सोड सोड, मला सोड. तुझ्या मैत्रीची ही आता अखेरचीच घटका. मुलगा कितीही त्याज्य ठरला, तू त्याच्यावर कितीही रागावलेला असलास तरी तो मृत्युशय्येवर पडून आसन्नमरणावस्थेत तुला भेटण्याची इच्छा बाळगून आहे, तसे सांगत आहे आणि तू बाप असून त्याला दर्शनही न देता निघालास !

कसला बाप तू ?' इतके ऐकल्यावर मग श्रीनाथबाबू सावरून बसले आणि कोचमनला त्यांनी गाडी पुढे नेण्यास सांगितले. अशारीतीने ते माझ्या बिऱ्हाडी आले. श्रीनाथबाबू उपेनला भेटून निघून गेल्यावर विद्यासागर महाशयांच्या तोंडून मी ही हकीगत ऐकली.

काही असो. पितापुत्रांची भेट झाली. उपेनने आपल्या बापाला काय सगितले माहीत नाही. कारण मी त्या ठिकाणी नव्हतोच. माफी मागितली असे ऐकले. आणि त्याचा पुरावाही दिसून आला. या भेटीनंतर त्याचा बाप त्याला आर्थिक सहाय्य करू लागला. श्रीनाथबाबू निघून गेल्यावर विद्यासागर महाशय मला उपेनच्या आर्थिक स्थितीबद्दल विचारू लागले आणि त्याच्याजवळ एक कवडीही नाही असे ऐकल्यावर रडू लागले. नंतर माझ्या हाती दहा रुपये देऊन म्हणाले, 'पाहा, त्याच्या बायकोचे व लहान अर्भकाचे हाल न होतील इकडे लक्ष दे. पैशाची अडचण पडली तर मला सांग. तू एकट्याने हा खर्च कसा करणार ?' ज्याच्यावर विद्यासागर महाशयांचा पराकाष्ठेचा जळजळीत राग होता, त्याची विपन्नावस्था जाणून त्यांना रडू कोसळले ! किती दयाळू स्वभाव !

या ठिकाणी आणखी एका गोष्टीचा उल्लेख करणे अवश्य आहे. या वेळी उपेनला सहाय्य करण्याला मी सदोदित तयार असे हे पाहून मला अनेकांकडून उपहास आणि कुत्सित निंदा सहन करावी लागे. ते मला मन मानेल ते बोलत. त्यांनी उपेनच्या विरुद्ध कसले गुप्त रहस्य ऐकले होते ते त्यावेळी मला माहीत नव्हते. मी उपेनच्या पत्नीचा व्याकूळ आणि कारुण्यपूर्ण चेहरा पाहून त्या लोकांना उत्तर देण्याचे विसरून जात असे. मला वाटे, या मुलीला या मार्गात घालण्याला मी कारण झालो आहे, तेव्हा तिच्या या दुरवस्थेत तिच्यापासून दूर सरणे हे काय मला शोभेल ? योग्य दिसेल ? आणि यासाठीच तिच्या लहान अर्भकासह तिला माझ्या बिऱ्हाडी आश्रय देई, स्वतः कर्ज काढून उपेनला ऋणमुक्त करून येणाऱ्या संकटापासून मी त्यांना वाचवी. त्याचे कर्जही फेडण्याला दक्ष असे. रोज त्यांची खबर घेई. या प्राप्तकर्तव्यापासून मला कोणीही विचलित करू शकत नसे. त्या वेळी त्याच्यासाठी मला जे कर्ज झाले होते ते मी पुढे अनेक वर्षे फेडीत होतो. त्याच्या बाबतीत माझ्यावरील जबाबदारीची ज्या ज्या वेळी मला आठवण होई त्या त्या वेळी जे होईल ते सहाय्य करण्याला मी तयार असे. यानंतर कित्येक वर्षांनी उपेन विलायतेला गेला, तिथे त्याला बंदिवास घडला. पुढे इकडे आल्यावर देशीय रंगभूमीचे अभिनेते व अभिनेत्री यांच्यात तो सामील झाला आणि त्यात त्याला थोडाफार पैसाही मिळू लागला. पण या वेळी त्याच्या सर्व जुन्या मित्रांनी त्याला टाकले होते. मीही मग त्यांचेच अनुकरण केले.

### आणखी एका विधवा मुलीची कर्मकहाणी

याच ठिकाणी विद्यासागर महाशयांच्या संपर्कात घडलेल्या आणखी एका

घटनेचा उल्लेख करतो. योगेन आणि महालक्ष्मी यांच्यासहित एकत्र असताना ही गोष्ट घडली होती. योगेनचा विवाह झाल्यानंतर काही दिवसांनी आम्ही चांपातला तलावाच्या पूर्वेकडे असलेल्या एका घरात जाऊन राहू लागलो. त्या ठिकाणी विद्यासागर महाशय आठवड्यातून दोनतीन दिवस येऊन आम्हां सर्वांना भेटू लागले व आवश्यक ते सहाय्यही करू लागले. त्याच वाडीत बाजूच्या घरात एक सुतार-जातीची विधवा स्त्री राहत असे. तिची एक सहासात वर्षं वयाची मुलगी तिच्याच जवळ होती. तीही विधवाच. आम्ही महालक्ष्मीचा पुनर्विवाह केल्याचे जेव्हा त्या मुलीच्या आईला समजले तेव्हा आपल्याही विधवा मुलीचा पुनः विवाह करावा असे तिच्या मनात आले. ती आपली इच्छा तिने आम्हाला सांगितली. ती मुलगी सकाळ-सायंकाळ आमच्या घरी येत असे. आमच्यात आपला वेळ घालवीत असे. मला ती ' दादा ' म्हणून हाक मारी आणि मला मिठी मारून ती माझ्या मांडीवर बसे. एके दिवशी सकाळी ती अशा प्रकारे मला गळ्यांमिठी घालून माझ्या मांडीवर बसली आहे इतक्यात, तेथे विद्यासागर महाशय आले. त्या मुलीला यापूर्वी त्यांनी पाहिली नव्हती. माझ्या मांडीवर ती बसली आहे असे पाहून ते म्हणाले, ' ही मुलगी कोण रे ? वाः फारच सुंदर मुलगी आहे ! ' मी सांगितले, ' ही शेजारच्या घरात राहणाऱ्या एका सुतारणीची मुलगी. ही मला दादा म्हणते. माझ्या मांडीवर बसणे हिला फार आवडते. ही विधवा असून हिचा पुनः विवाह करावा असे हिच्या आईच्या मनात आहे. ' हे ऐकताच विद्यासागर महाशय एकदम चमकले, ' अरे म्हणतोस काय, ही एवढीशी मुलगी विधवा ? ' नंतर त्यांनी आपल्याकडे तिला बोलाविले, ' ये मुली ये. माझ्या मांडीवर बैस. ' लज्जेमुळे ती मुलगी पुढे सरेना. मग मीच तिला माझ्या मांडीवरून त्यांच्या मांडीवर बसविली. विद्यासागर महाशयही तिला आपल्या छातीशी धरून तिचे लाड करू लागले. त्या मुलीला व तिच्या विधवा आईला दुसरे दिवशी मेण्यात बसवून माझ्या घरी पाठवून दे अशी मला त्यांनी जाताजाता सूचना केली आणि म्हटले, ' मुलीला बेथुन स्कूलमध्ये दाखल कर. दरमहाची फी मी देईन. '

दुसरे दिवशी सायंकाळी मुलीसह आईला मेण्यात बसवून विद्यासागर महा-शयांच्या घरी पाठविण्यात आले. त्यांनी काळोख पडताना तिकडून परत आल्यावर विद्यासागर महाशयांची आई भगवती देवी हिचे फारच गुणगान केलेले ऐकून माझे सर्वांग रोमांचित झाले. आणखीही ऐकले की ती सुताराची मुलगी म्हणून भगवती देवीने तिचा तिटकारा तर केला नाहीच; पण तिला वात्सल्याने छातीशी धरले, त्यांच्याजवळ बसून त्यांना खायला दिले आणि तिला निरोप देताना दोघीं-नाही कपडे दिले. दुःखाची गोष्ट म्हणजे, या मुलीला बेथून स्कूलमध्ये दाखल करण्यापूर्वीच त्या वाडीत कॉलरा वाढला आणि त्यात महालक्ष्मी मरण पावली. आम्हीही मग ते बिऱ्हाड सोडले. आम्ही सर्वच वेगवेगळे होऊन गेलो. त्या

मुलीची आईही शेजारच्या घरून निघून गेली. मुलगी आमच्या हातावेगळी झाली.

यानंतर पुष्कळ दिवसांनी त्या मुलीची आणि माझी एकदा भेट झाली होती. तेही याबरोबरच सांगून टाकतो. त्यावेळी मी साधारण ब्राह्मसमाजाचा आचार्य आणि ब्राह्मसमाजाच्या लायब्ररीतच माझे राहण्याचे ठिकाण. एके दिवशी एक नोकर कोणा एका स्त्रीचे पत्र देण्यासाठी आला. मी ते पत्र उघडून पाहिले तो ते याच मुलीचे पत्र. तिने मला लिहिले होते, 'पुष्कळ वर्षांपूर्वी चांपातला येथील तलावालगतच्या कोपऱ्यातील घरात, त्याच वाडीतील एक सात आठ वर्षांची मुलगी आपणाला 'दादा' म्हणून हाक मारीत असे व आपल्या मांडीवर व पाठीवर चढत असे. कदाचित् आपणाला त्याची आठवण असेल. मी ती दुर्दैवी मुलगी आज संकटात सापडल्यामुळे मी आपणाला बोलवीत आहे. एकवार येथे येऊन मला भेटण्याची कृपा कराल का?' मलाही वाटले, तसेच काही संकट असल्याशिवाय इतक्या कालाने माझी तिला आठवण झाली नसावी. मी जाणेच योग्य. असा विचार करून तिच्या घरी गेलो. जाऊन जे ऐकले ते असे : आम्ही आणि तिची आई चांपातला तलावाजवळून दुसरीकडे गेल्यावर तिची आई विद्यासागर महाशयांकडे काही गेली नाही. ती वयात आल्यावर तिच्या आईनेच तिला आडमार्गाला लावले. त्या अवस्थेत असताना हळू हळू ती एका व्यक्तीची रखेली म्हणून राहू लागली. तिला दोन मुलगेही झाले. पुढे त्या मुलांसह विवाहित स्त्रीप्रमाणे ती सुखात काल घालवीत असे. ज्या व्यक्तीने तिला ठेविली होती त्या व्यक्तीने तिला एक घरही विकत घेऊन दिले होते. तसेच तिला लिहिणे-वाचणे शिकवून कंपनीचे कित्येक हजारांचे शेअरही घेऊन दिले होते. पण तिचे दोन्ही मुलगे सज्ञान होण्यापूर्वीच ती व्यक्ती त्या घरात भयंकर आजाराने अंथरुणाला खिळली. या अवस्थेत त्या व्यक्तीने कंपनीचे शेअर घेतलेले कागद वगैरे फाडून टाकून स्वतःची पत्नी व मुलगे यांच्याकडे प्रयाण केले. फक्त घर तेवढे या मुलीच्या ताब्यात राहिले. त्यामुळे दोन मुलांचा सांभाळ कसा करावा या संकटात ती पडली. निराशेच्या समुद्रात गटंगळ्या खाऊ लागली. आणि यामुळेच अशा परिस्थितीत आधार म्हणून माझी –दादाची– तिला आठवण झाली होती.

मी मधून मधून तिच्या घरी जा-ये करू लागलो. काही दिवसांनंतर पाहिले तो, तिच्या त्या परिस्थितीचा फायदा घेण्याचे ठरवून मित्रत्वाच्या मिषाने दुष्ट लोकांनी तिला घेरलेले मला दिसले. तेव्हा मी 'ते घर भाड्याने देऊन मी दाखवित त्या दुसऱ्या जागी चल' असा तिला आग्रह करू लागलो. पण तिने तसे न करता घराच्या बाहेरची जागा भाड्याने दिली व घराच्या आतील भागात मुलांसह ती राहू लागली. एके दिवशी जाऊन पाहिले तो १९/२० वर्षांची एक मुलगी कुठूनशी येऊन तिच्या परिवारात राहू लागलेली दिसली. तिने या बाबतीत जी हकीगत

मला सांगितली ती आता मला आठवत नाही. पण त्या मुलीच्या खोलीत जाजम, बिछाना, तक्क्या, हुक्का वगैरे सामान कायम ठेवलेले दिसले. त्यावेळी मला वाटले, स्वतःचे रूपलावण्य व तारुण्य नष्ट झालेले पाहून पैसा कमावण्याच्या आशेने हिने हिला आणले असावे. तेव्हा मी तिला म्हटले, 'तुझ्या घरी येण्याची ही माझी अखेरचीच खेप समज.'

या भगिनीला सोडून मला बरीच वर्षे लोटली होती. तरी पण तिची आठवण झाली म्हणजे मला अजूनही दुःख होते. तिने मोठ्या भरवशाने वडील भाऊ म्हणून माझी आठवण केली; पण दुःखसागरातून मी तिला मुक्त करू शकलो नाही याचे अजूनही मला वाईट वाटते.

## मातृस्नेहाशी स्पर्धा करणारी माझी मोलकरीण

महालक्ष्मी जिवंत असतानाच आणखी एक घटना घडली होती. आजही मला ती विसरता येत नाही. आठवणीत अगदी ताजीच्या ताजीच राहिली आहे. एके दिवशी महालक्ष्मीचा भाऊ ईशान माझ्याकडे आला आणि मला म्हणाला, 'आमच्या हॉस्पिटलात एक बाई माणूस आली आहे. तिच्या गळ्यात जखम होऊन खाता पिता येत नाही अशा अवस्थेत ती आहे. गळ्याला छिद्र करून त्यातून अन्न घालावे लागते.' नंतर आणखी एक दिवस आला आणि म्हणाला : ती बाई माणूस रडत रडत मला सागू लागली, 'दादा, भाऊ, माझे रक्षण करा. मला एखादे काम लावून द्या. यातून बरे वाटल्यावर मला त्या घाणेरड्या धंद्यांत घालू नका. तो धंदा पत्करावा लागणार नाही असे करा.' ऐकून मला वाईट वाटले. मी ईशानला म्हटले, 'तिला एकादे काम लावून द्या. तिला जगावेसे वाटत आहे तेव्हा वाचवा तिला. आपले हे आवश्यक कर्तव्यच आहे.' माझे हे बोलणे ऐकून ईशान हसून म्हणाला, 'वाः मला दुसरे काही कामच नाही वाटते ! मी तिच्यासाठी नोकरी शोधायला जाऊ ? वाः' यावर मी त्याला सांगितले, 'बरे, तर मग माझ्याच घरीं तिला मोलकरीण म्हणून आण कसा !' पण ईशानने तिकडे लक्षच दिले नाही.

पण माझे मन काही मला स्वस्थ बसू देईना. मी ईशानच्या आईला व महालक्ष्मीला समजावून सांगितले आणि तिला आमच्याच घरात मोलकरीण म्हणून आणले. आपल्याला येथे आणण्यात माझीच खटपट उपयोगी पडली, हे घरातील बायका-मंडळीकडून तिला समजले असावे. त्याचा असा परिणाम झाला की, ती माझ्या प्रत्येक सोयी-गैरसोयीकडे जास्त लक्ष देऊ लागली. तिने माझे नाव 'भलामाणूसबाबू' असे ठेविले. हे माझे नाव अनेक दिवस चालू होते. मी ब्राह्मसमाजात दीक्षित झाल्यावर प्रसन्नमयीला जेव्हा आणले तेव्हा तीही या मोलकरणीच्या तोंडून ऐकून मला त्याच नावाने संबोधीत असे.

या मोलकरणीची गोष्ट माझ्या आठवणीत राहण्याचे कारणही तसेच होते. माझ्यावरील तिचा लोभ आणि श्रद्धा पाहून माझी आईही चकित होऊन गेली होती. एकदा महालक्ष्मीच्या मृत्यूनंतर ती कसल्याशा दुखण्यात औषध घेण्यासाठी म्हणून कलकत्त्याला आली होती. तेव्हा तिला एका स्वतंत्र घरात ठेवून सेवाशुश्रूषेसाठी या मोलकरणीला तिच्याकडे ठेविली होती. एके दिवशीं आई मला म्हणाली, 'अरे हे पाहा, तुझ्याकडे माझ्यापेक्षां जास्त वात्सल्याने कोणी वागले तर मला सहन होत नाही.' मला विस्मय वाटला. मी विचारले, 'म्हणजे? तुझ्याइतके माझे वात्सल्य दुसऱ्या कुणाला वाटेल असे मला तर वाटत नाही.' यावर आई मला म्हणाली, 'तसे नव्हेरे, तुझी ती मोलकरीण आहे ना, ती माझ्यापेक्षाही तुझ्यावर जास्त लोभ करते. मी तिच्यापुढे काहीच नाही!' यावर हसून मी तिला म्हटले, 'हे तूच सांगतेस आई! बरे, पण असे तुला वाटले तरी का आणि कसे?'

आणि मग मला समजले की, आईने त्या मोलकरणीला एकदा बाजारातून गृहोपयोगी काही जिन्नस आणायला सांगितले तेव्हा तिचे सांगणे बाजूला ठेवून दुसरेच काही जिन्नस तिने आणले. तसे करण्याचे कारण त्या मोलकरणीला आईने विचारले. तिने सांगितले, 'भलामाणूसबाबूंना हे सर्व आवडते.' केवळ इतकेच नव्हे तर आई सैंपाक करायला बसली की; ही बाई दारातच ठिय्या ठोकून बसायची आणि 'असे कर, हा पदार्थ असा शिजवून तयार कर,' असे आईला सुचवीत असायची. आई मग हसून तिला म्हणायची, 'ए, माझ्या पोटच्या मुलाला काय आवडते आणि काय नावडते हे मला कळत नाही होय?' आईनेच हे सर्व मला बोलून दाखवले. पुढे आम्ही कलकत्ता सोडल्यावर या मोलकरणीचा आमचा संबंध सुटला.

आता सांगा, मी केवळ हौस म्हणून का स्त्रीजातीबद्दल इतकी सहानुभूती व आदर बाळगतो? ज्या पापात आकंठ बुडाल्या आहेत, पाप हेच ज्यांचे दैनिक आचरण बनले आहे त्यांच्या हृदयात इतका वात्सल्यभाव, इतकी कृतज्ञता! मग मला त्यांच्या संबंधाने प्रेम वाटू नये? नोकर-नोकराणीच्या बाबतीत मी कायमचाच फार भाग्यवान! याबद्दलचा पुरावा नंतर आणखीही देईन.

## वेणीसंहार नाटकातील युधिष्ठिराची भूमिका

१८६९ सालच्या वसंत ऋतुत आम्ही संस्कृत कॉलेजचे विद्यार्थी मिळून शोभाबाजारातील राजवाड्यातील नाट्यमंदिरात संस्कृत वेणीसंहार नाटकाचा प्रयोग केला. त्याची हकीगत अशी. त्यावेळी बी. ए. परीक्षेला संस्कृत वेणीसंहार नाटक लाविले होते. आमच्या कॉलेजातील वरच्या वर्गातील विद्यार्थ्यांनी विचार केला, या नाटकाचा प्रयोग करून दाखविल्यास बी. ए. क्लासच्या विद्यार्थ्यांना त्याचा

विशेष उपयोग होईल. आणि या हेतूने त्यांनी प्रयोगाची तयारी चालविली. प्रथम त्यांनी मला ही बातमी कळविली नाही. किंवा त्यांनी आपल्या मसलतीत मला सामील करून घेतले नाही. पण कामाची बहुतेक जुळणी होत आली तेव्हा माझ्याकडे येऊन त्यात मी भाग घ्यावा असा आग्रह धरला. मलाही ते गैर वाटले नाही. विशेषतः नाटक पाहण्याचा मला नाद होताच. सध्याच्या बंग रंगभूमीवर वारांगनांनी सर्व नट्यांचा अभिनय करण्याला प्रारंभ करण्यापूर्वी प्रत्येक शनिवारी नाटक पाहण्यासाठी मी जात असे. मला आठवते की, ' सोमप्रकाश ' साप्ताहिकाचा प्रतिनिधी म्हणून हरिनाभी येथून मी नाटक पाहायला कलकत्त्याला येत असे. पण वारांगना ज्यावेळी रंगभूमीवर नट्यांचे काम करू लागल्या तेव्हा मी नाटक पाहण्याचे बंद केले.

ते काही असो. पण विद्यार्थ्यांनी जेव्हा आपण होऊन मला बोलाविले तेव्हा त्यांच्या कमिटीत सदस्य होण्याचे मी मान्य केले. आणि स्वतःही अभिनेता म्हणून काम करण्याला पुढे सरलो. मी झालो युधिष्ठिर, माझा मित्र योगेन झाला अर्जुन आणि दुसरा एक मित्र झाला अश्वत्थामा. कॉलेजातील खालच्या वर्गातील काही काही सुंदर मुलांना स्त्रियांचा पार्ट देण्यात आला. आम्ही तालीम देऊन व अभिनय शिकवून सर्वांना चांगले तयार केले. प्रयोगासाठी शोभाबाजारातील नाट्यमंदिर निश्चित केले. कलकत्ता, हुगळी, कृष्णानगर वगैरे सर्व कॉलेजांतील बी. ए. च्या विद्यार्थ्यांना तिकिटे पाठवून निमंत्रित केले. इतक्यात या नाटकाविरुद्ध आमच्याच कॉलेजात मोठी चळवळ सुरू झाली. पंडित लोक म्हणू लागले, मुलांनी आपला अभ्यास सोडून या नाटकप्रयोगातच सर्व लक्ष घातले आहे. त्यातच ते गुंगून गेले आहेत आणि त्यांच्या या तक्रारीचे तसेच कारणही होते. आम्ही ज्यांना नाटकात भूमिका दिल्या होत्या तेही आपसात काही अतिप्रसंग करू लागले. ज्याला दुर्योधनाची भूमिका दिली होती तो भर क्लासातच भानुमतीला ' प्रेयसी ' ( प्रियतमा ) म्हणून हाक मारू लागला. आणि त्याला कंठालिंगन वगैरे देऊ लागला. या सर्व कारणांनी संस्कृत प्राध्यापकांच्या तक्रारीला जास्तच उग्र स्वरूप आले. मीही यात सामील आहे असे ऐकताच मला त्यांनी एके दिवशी बोलावून घेतले. मी जाऊन पाहिले तो, त्या सभेत खुद्द प्रिन्सिपॉल, मोठमोठे अध्यापक, माझे मोठे मामा, आणि इतर सर्व पंडित स्थानापन्न झालेले दिसले. ते सर्व दृश्य पाहाताच माझा तर थरकाप झाला. शिक्षेला योग्य अशा अपराध्याप्रमाणे मी भयभीत होऊन त्यांच्या समोर उभा राहिलो. प्रिन्सिपॉल, सर्वाधिकारी महाशय त्या सर्वांचे पुढारी हो न मला म्हणाले, ' हे नाटक तुम्ही करावे अशी आमाची कोणाचीही इच्छा नाही. मुलगे अगदीच बिघडून गेलेले दिसतात. तू या मंडळीत सामील कसा झालास ? '
' जी, मी प्रथम यात सामील झालो नव्हतो. मला याची माहितीही नव्हती. नंतर गेलो. यावेळी वेणीसंहार बी. ए. ला लाविले आहे, तेव्हा त्याचा प्रयोग करून

दाखविल्यास आम्हांला व इतर विद्यार्थ्यांना त्याचा उपयोग होईल असे वाटले. ' असे मी उत्तर दिले.

यावर प्रिन्सिपाल म्हणाले, ' पण तसे असले तरी कॉलेजातील मुले बिघडविणे हे काय चांगले ? '

मी उत्तरलो, ' आपण जे काही पाहात आहा तो फक्त दोन दिवसांचा मामला. नंतर सर्व काही ठीक होऊन जाईल. '

तितक्यात एक अध्यापक बोलले, ' नाही. नाही. ते काही चालायचे नाही. प्रयोग-बियोग सगळे बंद करून टाका.

' महाशयांच्या अनुमतीखेरीज काही करावे अशी माझी इच्छा नाही आपण नकार दिलात तर याच क्षणी हे सर्व बंद करणे योग्य होईल, तरी पण थोर विचारशील महाशयांनी या सर्वांचा थोडा विचार करून पाहावा, अशी माझी विनंती आहे. नाटक प्रयोगाला आता फक्त तीन चार दिवसांचाच अवधी आहे. हुगळी, कृष्णनगर वगैरे बहुतेक कॉलेजांतील विद्यार्थ्यांना निमंत्रणे गेली आहेत. यावेळी जर आम्हांला हा नाट्यप्रयोग करता आला नाही तर ती मोठी लाजीरवाणी गोष्ट ठरेल. तेव्हा कमीत कमी एक प्रयोग करण्याची आम्हांला अनुमती द्यावी. ' मी अत्यंत नम्रपणाने सांगितले.

प्रिन्सिपॉल म्हणाले, ' ठीक आहे. तू जा. आम्ही या बाबतीत विचार करून काय ते ठरवितो आणि नंतर तुला बोलावतो.'

मी तर ' जशी आज्ञा ' म्हणून तेथून निघालो. पण मित्रमंडळीत येऊन ही सर्व हकीगत सांगताच खळबळ उडालेली दिसली. त्यांची ती खवळलेली वृत्ती-शांत करायला मला बराच वेळ लागला. शेवटी अध्यापक-मंडळीकडून मला पुनः बोलावणे आले. आणि तेथे जाताच ते म्हणाले, ' तुम्हांला या नाटकाचा एकच प्रयोग करता येईल. आणि तोही तीन शर्ती पाळल्या तर, पहिली. खालच्या वर्गांतील ज्या मुलांना या नाटकात पार्ट दिला आहे त्यांनी आपल्या पालकांची परवानगी आणली पाहिजे. दुसरी, प्रयोगाच्या जागी गायक व वादक यांच्याशी कॉलेजविद्यार्थ्यांचा संपर्क येता कामा नये. तिसरी, खालच्या वर्गांतील मुलांना नाटक संपताच प्रथम घरी पाठविले पाहिजे आणि त्यानंतर तू तिथून गेले पाहिजे. मी याही वेळी ' जशी आज्ञा ' म्हणून या अटींनाही संमती दिली.

ठरलेल्या वेळी राजवाड्यातील नाट्यमंदिरात वेणीसंहार नाटकाचा प्रयोग झाला. अध्यापकांना निमंत्रण देण्यात आले होते, त्यांपैकी काही उपस्थित होते. नाटकाचा प्रयोग चांगला झाला; पण माझ्यावर त्या दिवशी फार मोठी जबाबदारी असल्यामुळे मला हसण्या-खेळण्यात थोडासुद्धा वेळ घालविता आला नाही. गायक-वादकांना प्लॅटफॉर्मच्या खाली बसवून सभोवार कनात लाविली होती. स्वतः मी

नेहमी ग्रीनरूममध्ये उपस्थित असेच. फक्त माझी भूमिका करण्याच्या वेळीच तेवढा रंगभूमीवर येई. रात्री एक वाजता नाटकाचा प्रयोग संपल्यावर मी तीन वाजेपर्यंत तेथेच बसून होतो. सर्व अभिनेत्यांना, गाडीत बसवून घरी पाठविल्यावर मग मी माझ्या बिऱ्हाडी गेलो. त्यामुळे या नाट्यप्रयोगाची इतके दिवस मला चांगली आठवण राहिली.

* * *

.६.

# ब्राह्मसमाजात प्रवेश

## ब्राह्मसमाजात प्रविष्ट झालो

ब्राह्मसमाजात मी कसा सामील झालो त्याची हकीगत आता सांगतो. १८६५ साली माझे मतपरिवर्तन झाले. त्या दिवसापासून मी क्रमशः कसकसा ब्राह्मसमाजाकडे ओढला गेलो होतो ते यापूर्वी प्रसंगानुरोधाने सांगितलेच आहे. वास्तविक, त्या वेळेपासून या १८६८ सालअखेरपर्यंत माझ्या अन्तःकरणातील व्याकुळतेची भावना हळूहळू पेटणाऱ्या अग्नीप्रमाणे वाढत होती. माझ्या अनेक जुनाट वाईट सवयी सोडून देण्याचा दृढ निश्चय मी केला होता. नीतिपर व उपदेशपर असे कोणतेही ग्रंथ मिळाले तर मला ते अत्यंत उपयोगी वाटत आणि ते हातावेगळे करवत नसत. त्यामुळे मोठ्या लोकांची चरित्रे वाचण्याला मला फार आवडत.

ही जीवनचरित्रे वाचण्याचे वेड अजूनही माझ्यात आहेच. मी विचार करून पाहिले आहे की, धर्मविज्ञानापेक्षा ( थिऑलाजी ) धार्मिक जीवनाकडे ( प्रॅक्टिकल रिलिजन ) कडे माझा नेहमीच जास्त ओढा आहे. तरी पण या प्रॅक्टिकल रिलिजन मध्येच सर्वांपेक्षा माझा जास्त पराभव झाला. याचा विचार करता मला दुःख होते आणि असे लिहिताना डोळे अश्रुपूर्ण होतात. माझ्या आकांक्षा नेहमीच आध्यात्मिक उन्नतीकडे टिकून राहिल्या. पण सर्वच प्रवृत्तींना नेहमीच मी त्यांत गुंतवून ठेवू शकलो नाही. त्यामुळे स्वतःच्या दुर्बलतेशी नेहमीच मला झगडावे लागले आहे. असो.

या कित्येक वर्षांत मी पुष्कळशी जीवनचरित्रे वाचून टाकली. मला पक्के आठवते की, प्रत्येक दिवशी सायंकाळी कॉलेजातून आल्यावर ' बीटनूस बायोग्राफिकल डिक्शनरी 'तील मोठमोठ्या लोकांची जीवनचरित्रे मी वाचीत असे. मनुष्य झगडा करून प्रतिकूल परिस्थिती असताही स्वतःच्या जीवनाचे महत्त्व वाढविण्या-

साठी साधन करीत असतो, हे पाहिले म्हणजे मला आनंद वाटतो. वैचारिक सुख मिळते. मला त्यातच मानवी जीवनाची जबाबदारी व ईश्वरी कृपा यांचे उत्कृष्ट निदर्शन आढळते. जीवनचरित्राखेरीज आणखीही काही ग्रंथांमुळे मला अशा प्रकारचा लाभ झाला आहे. थिओडर पार्करच्या ग्रंथावलीचा यापूर्वी मी उल्लेख केलेलाच आहे. न्यूमनचे 'सोल' हे पुस्तकही याच वेळी माझ्या वाचनात आले असावे. त्यानंतर माझा एल्. ए. कोर्स चालू असताना आर्थर हेल्पसचे 'एसेज रिटन् इन दि इन्टरव्हल्स् ऑफ् बिझिनेस' हे पुस्तक होते. ते अभ्यासल्यामुळे माझ्यावर इतके उपकार झाले होते की, या अनुरोधाने हेल्पसचे 'फ्रेंडस् इन कौन्सिल' हे पुस्तक मी आणून वाचले. मी अगदी खुल्या दिलाने मान्य करतो की, माझ्या धार्मिक जीवनाच्या त्या पहिल्या ऊर्मीत हे दोन ग्रंथ वाचण्याला मिळाल्यामुळे मला पुष्कळसे वैचारिक सहाय्य झाले. त्यानंतर महर्षी देवेन्द्रनाथ ठाकूर यांचा तोंडी व लिखित उपदेश माझ्या मनाला किती शक्ती आणि सहाय्य देत असे ते मला बोलून दाखविता येणे अशक्य आहे. एखादे दिवशी त्यांचा उपदेश ऐकून दहा-बारा दिवस मी त्याच गुंगीत राही. थोडक्यात सांगायचे तर या वेळी माझी ज्ञानसंपादनाची क्षुधा फारच तीव्र झाली होती. ज्या ज्या वेळी एखादा चांगला ग्रंथ माझ्या हाती येई त्या त्या वेळी भुकेलेला वाघ ज्याप्रमाणे मांसखंडावर उडी टाकतो त्याप्रमाणे मी त्यावर झडप घालीत असे.

साधारण ब्राह्मसमाजाची जडण-घडण करण्याकडे मी कित्येक वर्षे गुंतलो होतो. ती काही वर्षे कामाच्या घाईमुळे मला ही भूक चांगल्या प्रकारे भागवता आली नाही. पुनः इतक्या दिवसांनंतर ही भूक भागविण्यासाठी मी उतावीळ झालो. पण हाय ! आता माझ्यात ती शक्ती उरली नाही. आता वाटते, आता जर मला तसले ते तारुण्य व ती शक्ती मिळेल आणि माझ्या आवडीची लायब्ररी मिळेल तर एकदा पोटभर वाचून तरी घेता येईल.

## महर्षी देवेन्द्रनाथांचा आदिब्राह्मसमाज

ब्राह्मधर्म आणि ब्राह्मसमाज याचे १८६५ सालापासून मला आकर्षण वाटू लागले, तरी मी इतके दिवसपर्यंत माझ्या संकोची स्वभावामुळे त्यापासून दूरदूरच राहात असे हेही मी पूर्वीच सांगून टाकले आहे. माझ्या आठवणीप्रमाणे मला वाटते १८६७ सालापर्यंत केशवचंद्रांच्या उन्नतिशील संघापेक्षा देवेन्द्रनाथ ठाकूर आणि त्यांचा आदिसमाज यांचे मला जास्त आकर्षण वाटे. मला जितके आठवते त्यावरून माझे आप्त दादा हेमचंद्र विद्यारत्न ( जे आदिसमाजाचे ब्राह्म व तत्त्वबोधिनीचे संपादक होते आणि जे माझ्याकडे नेहेमी महर्षी देवेन्द्रनाथांची प्रशंसा व उन्नतिशील ब्राह्मसमाजाची निंदा करीत ) हेच या आकर्षणाचे मुख्य कारण होते. माझे मामा कै. वा. द्वारकानाथ विद्याभूषण उन्नतिशील दलाच्या बाजूचे नव्हते,

हेही त्याचे एक कारण असू शकेल. यामुळे उन्नतिशील दलाचे बोलणे-चालणे व कामकाज मला आवडत नसे. तसे पाहिले तर त्या दलाशी मी तसा विशेष संबंधही ठेवीत नसे. आणि म्हणूनच मूर्तिपूजा आणि जातिभेद यांचा त्याग करण्याचा मी दृढ निश्चय केला होता.

## केशव सेन यांचा उन्नतिशील ब्राह्मसमाज

१८६८ सालच्या प्रारंभापासून उन्नतिशील ब्राह्मसंघाशी माझा संबंध बराच दृढ होऊ लागला. त्याचे असे झाले : या वर्षाच्या प्रारंभीच ऐकले की, उन्नतिशील दल आता आपले उपासनामंदिर बांधण्याला सुरवात करणार असून, त्यासाठी नगरसंकीर्तन होणार आहे. ही बातमी ऐकून माझ्या मामांनी आपल्या साप्ताहिकात व बोलण्याचालण्यात स्वतःचा असंतोष प्रगट करण्याला सुरुवात केली. 'ही वैष्णवी तऱ्हा कशाला!' असा उपहास ते करू लागले. शिवाय हेमचंद्र विद्यारत्न-महाशयही अनेक प्रकारांनी उपहास–निंदा करू लागले. मुख्य कारण म्हणजे मी शाक्तवंशाचा मुलगा ! वैष्णवांच्या संकीर्तनाबद्दल पूर्वीपासूनच तितकीशी मला श्रद्धा वाटत नसे, इतकेच नव्हे तर एखादा तमाशा किंवा गाणे ऐकायला गेल्यावर जर तिथे मृदंगटाळ ही वाद्ये आहेत आणि तेथे कीर्तनाला अगर भजनाला सुरवात झाली आहे असे दिसले तर अनेकदा मी तेथून उठून जात असे. मी मनात म्हटले, हा उन्नतिशील ब्राह्मसंघ रस्त्यात नाच-गाणे करीत एकमेकांना मिठ्या मारीत निघाला वाटते. असा विचार करून मी क्रोधाविष्ट होऊन माघाच्या ११ तारखेला सकाळी त्या संघाकडे न जाता आदिसमाजात उपासनेला गेलो. उपासना संपल्यावर मंदिराच्या पायऱ्या उतरून खाली येत आहे इतक्यात कित्येक प्रतिष्ठित गृहस्थ बोलत येत होते. ते म्हणाले, ' महाशय, पाहिले ना केशवबाबूंनी शहर कसे वेडे करून सोडले आहे ते ! '

नगरकीर्तनात हास्यास्पद असे काही न वाटता या लोकांना ते प्रशंसार्ह वाटत आहे हे ऐकून मी चकित होऊन म्हटले, ' महाशय, ते कसे काय ? ' तेव्हा मग त्यांनी माझ्या हाती नगरकीर्तनाचे एक परिपत्रक दिले. मंदिराच्या पायरीवरच उभा राहून मी ते वाचू लागलो. त्यात असे होते—

> तोरा आय रे भाइ, एत दिने दुःखेर निशी हल अवसान,
> नगरे उठिल ब्रह्मनाम,
> नरनारी साधारणेर समान अधिकार
> जार आछे भक्ति पाबे मुक्ति नाहि जात विचार,
> ( बंधूंनो, तुम्ही या.
> इतक्या दिवसांनी दुःखाची रात्र संपली आहे.
> नगरात ब्रह्मनामाचा गजर होऊ लागला आहे.

सर्वसाधारण स्त्री-पुरुषांना समान अधिकार आहे.

जो भक्तिमान असेल त्याला मुक्ती मिळेल )

हे आवाहन माझ्या अन्तकरणाला जाऊन भिडले. मला वाटले जणू काय ही हाक मलाच उद्देशून आहे. यात मला अभिप्रेत असलेला ब्राह्मधर्माचा खरा आदर्श असून मला त्याने मुग्ध केले! माझे अन्तःकरण हेलावले. मी विचारले, 'यांचा हा उत्सव कुठे होणार आहे?' त्यावर उत्तर मिळाले, 'सिन्दुरियापटी येथील गोपाळ मल्लिकांच्या घरी.' लागलीच मी तिकडे निघालो. उपासनेनंतर सकाळी देवेन्द्र नाथ ठाकूर यांजकडे जेवणाचे निमंत्रण होते; पण त्यावेळी हे सर्व मी विसरूनच गेलो. गोपाळ मल्लिक यांच्या घरी जाऊन पाहातो तो, केशवबाबूंचा वडील भाऊ नवीनचंद्र सेन महाशय उत्सवाची साजसजावट करीत असलेला दिसला. उन्नतिशील संघाचे लोक तोपर्यंत तेथे येऊन पोचले नव्हते. लागलीच मी पुनः कलुटोला येथील केशवबाबूंच्या घरचा मार्ग धरला. पाहातो तो केशवबाबू आपल्या सह-यात्रिकांसमवेत नुकतेच येऊन भिक्षेच्या झोळीत मिळालेला पैसा मोजीत आहेत. माझे जुने सहाध्यायी मित्र विजयकृष्ण गोस्वामी त्यांच्यात होतेच. गोस्वामीजींनी मला पाहाताच 'काय दोस्त' असे म्हणून माझ्या गळ्याला मिठीच मारली. या आपुलकीने त्यांनी मला उन्नतिशील संघात खेचूनच घेतले म्हणायला हरकत नाही. अर्थात् इतके झाल्यावर त्यांच्या बरोबर मी गोपाळ मल्लिकांच्या घरी उत्सवाला गेलो हे सांगायलाच नको. त्या दिवशी मग कुणी भोजन केले नाही आणि मीही उपाशी असल्याची मला जाणीव झाली नाही. उत्सवमंदिरात सगळ्या दिवसभर उत्सव समारोह चाललाच होता. मी त्या गर्दीत एका कोपऱ्यात जेथे उभा होतो तेथेच सगळा दिवस आणि रात्री दहा वाजेपर्यंत तसाच उभा राहिलो. या सगळ्या वेळात जे काही तेथे चालले होते त्यांतच मीही तन्मय होऊन गेलो होतो.

सायंकाळी गव्हर्नर जनरल लॉर्ड लॉरेन्स आले. त्या दिवशी केशवबाबूंनी 'रिजनरेटिंग फेथ' या विषयावर उपदेशपर भाषण केले. अशा प्रकारचा उपदेश यापूर्वी मी क्वचितच ऐकला असेन. 'धर्मश्रद्धा जर नवजीवनलाभ करून देत नसेल तर ती धर्मश्रद्धाच नव्हे.' या सत्य वचनाने माझ्या समोर आध्यात्मिक जीवनाचा जणू काय एक नवाच दरवाजा उघडून दिला. आणि त्यामुळे मी उन्नतिशील संघाशी दृढबद्ध होऊन गेलो.

तरीपण हे ऐकून अनेकांना असे नवल वाटेल की, इतके झाले तरी, केवळ संकोची स्वभावामुळे त्या संघापासून मी दूरदूरच राहिलो होतो. त्या वेळी मी प्रत्येक दिवशी ब्राह्मोपासना करीत असे. ( यज्ञोपवीताचा त्याग केला नव्हता तरी ) पण ब्राह्ममंडळीशी मात्र मी फारसा मिळून मिसळून वागत नसे. मधून मधून रविवारी सकाळी केशवबाबूंच्या कलुटोला येथील घरात उपासनेत भाग घेण्यासाठी

जात असे. कीर्तनाच्या वेळी ते ब्राह्मलोक प्रेमात अगदी लोटपोट होऊन निर-निराळे आर्तस्वर काढीत, एकमेकांचे पाय पकडीत, केशवबाबूंच्या पाया पडत. यामुळे चांगल्या तऱ्हेने उपासनेकडे लक्ष देण्यात अडथळा येई. आणि म्हणूनच मी नेहेमी तिकडे न जाता मधून मधून जात असे.

### नरपूजेची चळवळ

याच १८६८ साली ऑक्टोबर महिन्यात मुंगेर येथून ब्राह्मसमाजात नर-पूजेविषयीच्या चळवळीला सुरवात झाली. माझे दोघे मित्र यदुनाथ चक्रवर्ती आणि विजयचंद्र गोस्वामी यांनी वर्तमानपत्रात प्रसिद्ध केले की 'ब्राह्म मंडळी केशवबाबूंना 'प्रभू, त्राणकर्ता' वगैरे शब्दांनी संबोधून त्यांचे पाय धरतात आणि 'आमचा उद्धार करा' अशी प्रार्थना करतात. वगैरे वगैरे. यावर देशव्यापी चळवळ सुरू झाली. गोस्वामीजी आणि यदुनाथ चक्रवर्ती केशवबाबूंचा संघ सोडून गेले. गोस्वामीजी तर शांतिपूरच्या स्वतःच्या घरी जाऊन वैद्यकी करू लागले. मला आठवते, मी याच वर्षी शांतिपूर येथे त्यांच्या भेटीला गेलो होतो. त्यांच्या तोंडून सर्व हकीगत ऐकावी असा माझा हेतू होता. कारण ते माझे सहाध्यायी होते हे पूर्वी सांगितलेच आहे.

उन्नतिशील संघाच्या या भांडणामुळे मला अतिशय दुःख झाल्याचे आठ-वते. तरीपण यामुळे केशवबाबूवरून माझे मन उडाले अगर मी त्यांच्यापासून वेगळा झालो असे नाही. तसेच नरपूजा करून घेण्यात ते अपराधी बनले असेही मी मानले नाही. ब्राह्मलोकांच्या आचरणात केवळ भक्तीचे आधिक्य किंवा भक्तिवेल्हाळपणाचा अतिरेक आहे एवढेच वाटले. परंतु केशवबाबूंच्या पक्षाला असलेल्या वर्तमानपत्रांत विवादकाराना जे उत्तर देण्यात आले होते व त्यांना लोकदृष्टीने जो हीन करण्याचा प्रयत्न झाला होता तो खरा व न्यायसंगत नव्हे अशी मात्र जाणीव झाल्यावाचून राहिली नाही. ते काही असले तरी १८६९ साली प्रारंभीच विजयकृष्ण गोस्वामी यानी आपली चूक मान्य करून ते जेव्हा पुनः केशवबाबूंच्या संघाला मिळण्याला तयार झाले व तशी इच्छा त्यांनी प्रदर्शित केली तेव्हा माझ्या हृदयावरचा एक भार कमी झाला असे मला वाटले. या पुनर्मीलनाच्या निमित्ताने राणाघाट नजीक कलाईघाट नावाच्या जागी, भारतवर्षीय ब्राह्ममंदिर बांधण्यापूर्वी एक उत्सव झाला. या ठिकाणी विजयकृष्ण गोस्वामी त्यावेळी सहपरिवार राहात असत. त्याआधी केशवबाबूंशी माझा प्रत्यक्ष परिचय नव्हता व तशी भेटही झाली नव्हती. इतर ब्राह्मोपासकांबरोबर त्यादिवशी मी तेथे गेलो. त्या जागी चर्चा चालली असताना, नरपूजा या संबंधाने विषय निघाला तेव्हा मी म्हटले, 'मिरर आणि 'धर्मतत्व' या वर्तमानपत्रात कुणी लिहिले माहीत नाही, तरीपण या दोन्ही

साप्ताहिकांत गोस्वामी व यदुबाबू यांच्या म्हणण्याला जे उत्तर देण्यात आले आहे ते न्याय आणि शिष्टाचार यांना सोडून आहे. '

मी हे बोललो मात्र तोच केशवबाबूंनी कानातल्या कानात दुसऱ्या एका मनुष्याकडे माझ्याविषयी चौकशी केली. त्याने सांगितले, 'सोमप्रकाश' चे संपादक द्वारकानाथ विद्याभूषण यांचे भाचे.' मला हे आठवते की, केशवबाबू त्या दिवसापासून माझ्याकडे विशेष नजरेने पाहू लागले आणि मला ओळखू लागले. या खेपेला मला केशवबाबूंचा सुप्रसन्न सरळ आणि अकृत्रिम भाव दिसून आल्यामुळे मी मुग्ध होऊन गेलो होतो. एके दिवशी सायंकाळ झाल्यावर ते शिष्यमंळींसह संकीर्तन करता करता नावेत बसून चूर्णी नदीत जलविहार करण्यासाठी गेले. आम्ही गेलो नव्हतो. सकाळी उठून पाहातो तो, केशवबाबू ब्राह्म मंडळीच्या पायांकडच्या एका बाजूला पडून गाढ झोपेत असलेले मला दिसले. जेवताना पाहिले तो सामान्य माणसाप्रमाणे डाळ-भात आनंदाने खात आहेत. अशा तऱ्हेने वेगळेपणाची जाणीवच त्यांना नसलेली पाहून मला फार आनंद झाला.

## उघडपणे दीक्षाग्रहण आणि यज्ञोपवीत-त्याग

हळूहळू १८६९ सालच्या भाद्रपदाच्या ७ तारखेला ( ता. २२ ऑगस्ट ) भारतवर्षीय ब्राह्ममंदिर स्थापनेचा दिवस उगवला. त्या दिवशी काही तरुणांना दीक्षा देण्याचा ठराव पुढे आला. माझ्या काही मित्रांनी मला विचारले, 'दीक्षा घेण्याची तयारी आहे की नाही?' मी उत्तर दिले, 'उघडपणे, दीक्षा घेणे हा ब्राह्मदेखावा आहे. तसे पाहिले तर मी ब्राह्म आहेच' ते काही असले तरी इतर तरुणांबरोबर मीही त्या ठरलेल्या दिवशी दीक्षा घ्यायची हे निश्चित झाले. त्याप्रमाणे आम्ही २१ जण तरुण, दीक्षित झालो. त्यांत केशवबाबूंचा धाकटा भाऊ कृष्णविहारी सेन, माझे सन्मान्य मित्र आनंदमोहन बसू, परलोकवासी मित्र रजनीनाथ राय आणि श्रद्धेय मित्र श्रीनाथ दत्त महाशय या सर्वांची नावे मला विशेष उल्लेखनीय वाटतात. हे निरंतर ब्राह्मधर्म आणि ब्राह्मोसमाज याची सेवा करीत होते व करीत आहेत.

मी उघडपणे ब्राह्मधर्म स्वीकारल्यावर यज्ञोपवीत तसेच ठेवावे की नाही हा प्रश्न तसाच राहिला होता. तो आता उपस्थित झाला. त्यापूर्वी माझ्या गळ्यात केव्हा जानवे असे वा नसेही. दीक्षा घेण्याच्या वेळी नव्हते. आणि मग मी ठरवूनच टाकले की, यापुढे जानवे घालावयाचेच नाही. पण या बाबतीत माझ्या आप्तइष्टांत विरोध निर्माण झाला.

मला नेहेमीच असे आढळून आले आहे की, कोणतीही एखादी महत्त्वाची गोष्ट कर्तव्य म्हणून करावयाची असे ठरविले की अंमलात आणण्याला मला विलंब लागे. तशा गोष्टीला जे आत्मिक सामर्थ्य असावे लागते त्याचा माझ्या बाबतीत

अभाव होता. वारंवार होय— नाही असा झगडा असायचा. त्यामुळे प्रवृत्तीशी चांगलेच रणांगण माजवावे लागे. केव्हा मला जय मिळे तर केव्हा माझा पराभव होई. आणि मग काही दिवसांनी पुरेशा सामर्थ्याने मी त्यात सिद्धी मिळवीत असे. एका उडीत स्वर्ग गाठायचा, एकाच प्रयत्नात मुक्ती मिळवायची. एकदम दृढप्रतिज्ञ होऊन संयमित व्हायचे हे माझ्या नशिबात बहुतेक घडून येतच नसे. मी ज्या वेळी उठण्याची इच्छा करत असतो त्याच वेळी पडतो. या घटनेत ज्या शत्रूच्या हाती मी अगोदर शरणागती पत्करली आहे त्याची शृंखला एकाएकी तोडणे किती कठीण आहे हे मला दाखवून द्यावे असे ईश्वराच्या मनात आहे, असे खूप चिंतन आणि मनन करून मला पूर्णपणे कळून चुकले आहे. यामुळे ज्या पापाचा मी त्याग करीत आहे त्याविषयी घृणा वाढे. आणि त्यातून मला सुटता येत नाही याबद्दल व्याकुळताही वाढे.

## मानसिक आणि कौटुंबिक द्वंद्व

अशा स्थितीत यज्ञोपवीत ठेवणार नाही असा संकल्प करूनही ते काढून टाकण्याला मला काही दिवस लागलेच. प्रथमतः मातृदेवीला माझी ही प्रतिज्ञा कळताच माहेरी येऊन तिने मला बोलावणे पाठविले. आणि रडूनकढून, विनवण्या करून माझ्या गळ्यात यज्ञोपवीत अडकवून ती गेली. नंतर ज्याला ज्याला मी विचारीत असे तो तो यज्ञोपवीताचा त्याग करू नको असेच सांगे. आणि मी कितीही विचार केला तरी त्या कृत्यात माझ्या समोर संकटेच उभी असलेली मला दिसू लागली. मी आईबापांचा एकुलता एक मुलगा. उन्मादिनी ( माझी बहीण ) वारल्यानंतर आणखी तीन बहिणी मला मिळाल्या पण त्या सगळ्याच लहान, मीच आईवडिलांचा एकमेव आधार. लोक जेव्हा म्हणत की, ( तू असे केलेस तर ) ‘ आई मरेल आणि मग वडिलांना वेड लागेल. ’ तेव्हा मला त्याचे काहीच नवल वाटत नसे. काय करावे, कसे करावे ! हाच प्रश्न ! ! तसे पाहिले तर माझ्या आयुष्यात असा बिकट प्रसंग केव्हाच निर्माण झाला नव्हता. गळ्यात जानवे ठेवूनच मी उपासना करायला जात असे; पण उपासना करता येत नसे. कोणी तरी अन्तःकरणातून ‘ छे, छे, हे गैर आहे. ’ असे म्हटल्यासारखे वाटे. पण कुणाला तरी माझी जरूर आहे, कोणी तरी मला बोलवीत आहे, अशी द्विधा अवस्था होई. मनात उठलेल्या वादळामुळे मनःसंघर्षामुळे माझी प्रकृती खालावत चालली. पचनशक्ती बिघडून अजीर्ण होऊ लागले. शेवटी मी अगतिक होऊन देवाचे पाय धरले. त्यालाच अनन्य शरण गेलो. विचार करण्याचे सोडून दिले. कर्तृत्वाचा अभिमान टाकला. प्रार्थना करता करता वारंवार ( देवाला ) विनवू लागलो, ‘ माझ्याविषयी तुला जे काय करावेसे वाटत असेल ते कर. ’ आणि काय आश्चर्य ! काही दिवसांत चित्तात आश्चर्यकारक परिवर्तन होत असल्याची मला जाणीव झाली. वाटणारी

भीती आणि भीषणता कशी कुठे गेली कळलेच नाही. माझ्या हृदयात अपूर्व सामर्थ्य आणि उत्साह संचारल्यासारखे वाटले. उठता, बसता, झोपेत आणि जागे असताना मला नेहमी एक अपूर्व असा धीर देणारा आवाज ऐकू येऊ लागला. कोणी तरी मला सांगत आहे, 'तुझे काम आहे. तुझी जरूर आहे. तू पुढे सरून चालू लाग.' मी त्यावेळी माझ्या पत्रात बाबांना हे सर्व लिहून कळविले होते. माझे पत्रातील निवेदन वाचून नक्कीच ते हसले असतील. मी जानवे काढून टाकले. आणि मला असे का करावे लागले तेही पितृदेवांना निवेदन केले. ते पत्र माझ्या मामांकडे पाठवून देऊन, 'मला बोलवून घेऊन त्याला चार शब्द सांगा.' असे त्यांनी मामांना विनविले.

मामांनीही मला आपल्या घरी बोलवून घेतले. विशेष गाजावाजा न करता माझ्याशी, जानवे काढून टाकल्याबद्दल व धर्मभावनेबद्दल तर्कवितर्क लढविले. इथे मला हे सांगितले पाहिजे की, माझे मामा अतिशय धर्मभीरू स्वभावाचे व उदात्त वृत्तीचे होते. कुणाच्याही धर्मभावनेत ढवळाढवळ करणे हे त्यांच्या स्वभावाला मानवत नसे. ते माझ्यावर रागावले नाहीत किंवा खवळूनही उठले नाहीत. मित्रामित्रात जसे मोकळ्या मनाने, खुल्या दिलाने बोलणे होते त्याचप्रमाणे अत्यंत सौजन्याने माझे-त्यांचे बोलणे झाले. नंतर मी कलकत्त्याला आल्यावर माझ्या मामांनी वडलांना पत्राने कळविले की, 'मनुष्याला अनेक प्रकारचे अन्धत्व येते, त्यांतलाच धर्मान्धता हाही एक प्रकार आहे. तसा हा धर्मांध झाला आहे. जबरदस्तीने याला काही सांगितले तर त्याचा उपयोग होणार नाही. निदान मला तरी तसे वाटत नाही.' मला वडिलांच्या फायलीत नंतर हे पत्र मिळाले.

## वडिलांपासून वेगळीक

पण वडिलांनी मामांचा सल्ला काही मनावर घेतला नाही. कलकत्त्याला येऊन मला ते धरून घेऊन गेले आणि सुमारे एक महिनापर्यंत घरातल्या घरात एक प्रकारे नजरबंदीत ठेविले. ब्राह्मणाच्या मुलाने जानवे काढून टाकणे ही गोष्ट त्या भागात अगदी नवीन. कुणी कधी न ऐकलेली न पाहिलेली. त्यामुळे सगळा गाव माझ्या विरुद्ध झाला. इतकेच नव्हे तर चार-दोन कोसांपलीकडे राहणाऱ्या शेतकऱ्यांच्या बायकाही मला पाहायला येऊ लागल्या. त्यावेळी माझ्यासंबंधी त्यांच्या मनात कसले विचार असत याचा विचार केला की आजही मला हसू येते.

एके दिवशी सकाळी मी बसल्या बसल्या वाचीत होतो, इतक्यात काही शेतकऱ्यांच्या बायका माझ्याजवळ येऊन उभ्या राहिल्या. माझ्या हातापायांच्या प्रत्येक हालचालीकडे त्या लक्षपूर्वक पाहात होत्या. त्यांचा श्वासोछ्वास होत होता की नाही न कळे. इतक्या तन्मयतेने त्या माझ्याकडे पाहात होत्या. थोड्या वेळाने मी जेव्हा म्हटले की, 'आई, थोडे तेल दे ग. स्नान करून येतो.' तेव्हा त्या

स्त्रियांपैकी एकीने म्हटले, ' आईसाहेब, हा चांगला बोलतो की ! ' आईने तिला उत्तर दिले, ' का नाही बोलणार ? त्याला काय बोलता येत नाही ? ' आणि हे ऐकून मी केवढ्याने तरी हसलो. मला वाटले, मी कर्तव्य म्हणून ठरवून तसे वागतो, पण या सामान्य माणसांना तो वेडपटपणा वाटतो. शिक्षणाने केवढा हा बदल घडविला आहे ! आणखी एकदा सायंकाळी एक आप्त स्त्री आली. तिने माझ्याकडे पाहिले, तो मी चुरमुरे खात होतो. तिला आश्चर्य वाटून ती म्हणाली, ' अगबाई, हा तर चुरमुरेसुद्धा खातो आहे ! कोण म्हणतो माणसात नाही म्हणून ? ' तिची समज झाली होती ( किंवा करून देण्यात आली होती ) की, ' मी माणसातून उठलो. वेडा बनलो. '

असो, माझ्या वडलांनी मला सुमारे महिना दीड महिना अशा प्रकारे नजरबंदीत ठेविले होते. या कालावधीत रात्रंदिवस लोकांची रीघ लागलेली असे. प्रत्येकाच्या तोंडी एकच गोष्ट, एकच मुद्दा आणि एकच चर्चा. एकच हरकत त्याच त्याच शिव्यागाळी. त्या सर्वांशी बोलणार तरी किती आणि वादविवाद तरी कसला करणार ! शेवटी मी मौनव्रत स्वीकारले. कोणी काही म्हणो, काही तर्क करो. उत्तर म्हणून द्यायचे नाही. शेवटी बाबांनी मला अशा तऱ्हेने बंदीत ठेवणे व्यर्थ ठरवून निरोप दिला. त्या दिवसाचा तो प्रसंग आठवला म्हणजे आजही माझे डोळे अश्रूंनी भरून येतात. ते तसे सहृदय होते. त्यांच्या मनात हीनपणा औषधालासुद्धा नव्हता. त्यांनी मला आवश्यक त्या सर्व वस्तु–बिऱ्हाडाचे सामान– दिले आणि स्वतःच्या खर्चानें कलकत्त्याला रवाना केले. मला यापुढे घर वर्ज्य झाले, ते मला घरात पाऊल टाकू देणार नाहीत हे त्यावेळी माझ्या ध्यानात आले नाही. त्यांनी मला गृहत्यागी करण्याची शपथच घेतली होती म्हणे. मी त्यावेळी तसा मोठा नव्हतो. त्या वेळेपासून १८।१९ वर्षे त्यांनी माझे तोंडही पाहिले नाही आणि माझ्याशी बोललेही नाहीत.

माझ्या वडलांनी मला घरातून घालविल्यावर अशी प्रतिज्ञा केली होती की, ' याचे तोंडही पाहणार नाही. ' तरी पण मी आईसाठी घरी गेल्यावाचून राहात नसे. माझी आई त्यावेळी कोणत्या दयनीय स्थितीत प्रपंच चालवीत होती ते वर्णन करून सांगणे कठीण आहे. मी तिला भेटायला जात असे पण मी गावात पाऊल टाकावे अशी वडलांची इच्छा नव्हती. त्यामुळे त्यांच्या नकळत, ते घरी नसताना मी तेथे जात असे. मी आईच्या दर्शनासाठी आलो आहे असे लोकांच्या तोंडून ऐकताच मला मारण्याकरितां ते गुंड लोकांना पैसे देऊन आणीत. वाडी-तील मुले माझ्यावर लोभ करीत. त्यामुळे बाबांनी लाठीवाले गुंड आणलेले पाहाताच गुप्तपणानें धावत येऊन मला ती बातमी देऊन जात. आणि मी लग-लीच आईची पायधूळ मस्तकाला लावून खिडकीवाटे बाहेर पडून पळून जात-असे. अशा तऱ्हेने धावत पळत आल्यावर, माझे तेथेच राहणारे एक ब्राह्ममित्र

कालीनाथ दत्त महाशय यांच्याकडे मुक्कामाला राहात असे. नंतर मी ऐकले की, अशा तऱ्हेने मला मारण्यासाठी लाठीवाले आणण्यात बाबांनी कित्येक वर्षांत २२ रु. खर्च केले होते. दरिद्री ब्राह्मणाच्या दृष्टीने प्रतिज्ञापालन म्हणून मला मारण्यासाठी बाबांनी २२ रुपये खर्च करणे ही काही सामान्य गोष्ट नव्हती. बाबांची ही दृढ प्रतिज्ञता माझ्यात जर थोड्याशा आधिक्याने असती तर फार चांगले झाले असते.

शेवटी बाबांनी आपली ही संकल्पित प्रतिज्ञा का मोडली, त्यांचा निश्चय कसा ढळला हे मला सांगता येत नाही. असे ऐकले आहे, की, गावातील स्त्रिया विरोधी झाल्यामुळे आपली ही प्रतिज्ञा त्यांना पाळता आली नाही. गावचे लोक नेहमीच माझ्यावर प्रेम करीत. मी वडलांना न कळेल अशा रीतीने गावी जात असे खरा, पण गावातील सर्व आप्तांना भेटत असे. तसेच वाडीवाडीतून जाऊन बायकांनाही भेटून येत असे. गावातील स्त्रियांचा माझ्यावर फार लोभ. मीही त्यांना माय-बहिणी मानीत असे. शेवटी स्त्रियांची माझ्यावरील ही ममता पाहून गावचे लोक बाबांना म्हणू लागले, ‘ तू त्याला स्वतःच्या घरी येऊ देऊ नकोस फार तर! पण, गावातही त्याने पाऊल टाकू नये हे काय तुझे भलतेच ? तू काय ग्रामधिकारी आहेस ? ’—

अशा रीतीने गावच्या लोकांची माझ्या बाबतीत अनुकूलता पाहून हळूहळू बाबाही त्या मताचे झाले. आणि मग मी सरळच घरी जाऊन आईला भेटून येऊ लागलो. मी घरात येत आहे असे पाहून बाबा स्वतः घराबाहेर जात. मी आत असे-पर्यंत त्या बाजूला ते येत नसत. मला भेटणे वा माझ्याबरोबर बोलणे एवढे फक्त त्यांनी बंद केले होते. मला घरात राहायला अगर जेवणखाण करायला त्यांची हरकत नसे. इतकेच नव्हे तर स्वतः बाजारात जाऊन मला आवडणारे खाण्याचे पदार्थ ते विकत आणून आईकडे देत आणि तिला सांगत, ‘ केळ्यांचा भोक्ता घरात आला आहेना, म्हणून ही केळी विकत आणली आहेत. त्याला खायला दे. ’ अशी दुरून जवळीक काही काळ चालली.

## कलकत्त्यातील नवा संसार

मी वडलांच्या घरातून बाहेर काढला जाताच अफाट समुद्रात पडावे तसे मला वाटले. सुदैव एवढेच की त्यावेळी मला स्कॉलर्शिपची बरीच मोठी रक्कम मिळत होती. त्यामुळे अन्नवस्त्राच्या काळजीने गांगरून जावे लागले नाही. मी कलकत्त्याला येताच पटलडांगा भागातील मिर्जाफर्स लेनमध्ये श्रीयुत बाबू हरगोपाल सरकार यांच्या घरी संगतीसोबतीने राहू लागलो. ह्यांनी रामतनू लाहिरीच्या पुतणीशी—अन्नदायिनीशी—विवाह करून संसार थाटला होता. अन्नदायिनीची बहीण कुमारी राधाराणी लाहिरी त्यावेळी आमच्यातच होती. यांच्या सहवासाने मला पुष्कळच फायदा झाला. एकतर यांना पाहून स्त्रीजातीवरची श्रद्धा फारच वाढली. मला

त्यांच्याबद्दल आदर वाटू लागला. या सर्वांच्या आपलेपणाच्या वागणुकीमुळे रामतनू बाबूंशी माझे बोलीभाषण होऊ लागले, त्यांच्यातील साधुभावाचा मला जो आदर्श दिसला त्याचा मला कधीच विसर पडणार नाही. नंतर मी सासुरवाडीहून प्रसन्नमयीला–पत्नीला–आणले आणि या प्रेमळ मंडळींच्याबरोबरच आम्ही राहू लागलों.

प्रसन्नमयी कलकत्त्याला येऊन गृहप्रपंच पाहू लागली खरी; पण काही महिन्यांतच ती आजारी पडून बिछान्याला खिळली. स्कॉलर्शिप हाच काय तो माझा आधार. इकडे बी. ए. च्या परीक्षेचा अभ्यास चालू. संसाराची काळजी, आजाऱ्याची सेवासुश्रुषा, लहानग्या हेमलतेची जोपासना या सगळ्या घरकामांमुळे माझ्या अभ्यासात व्यत्यय येऊ लागला. या अशा बिकट प्रसंगी प. वा. डॉ. अन्नदाचरण खास्तगीर महाशय आणि इतर काही डॉक्टर मित्र यांचे जर मला सहाय्य मिळाले नसते तर या विपन्नावस्थेतुन मला पार होताच आले नसते.

१८७० साली श्रावणाच्या आठ तारखेला माझ्या दुसऱ्या मुलीचा– तरंगिणीचा–जन्म झाला. ती सातोळीच जन्मली. त्यामुळे कापसाच्या उबेत ठेवून तिला जगवावे लागले होते. त्यामुळे तिचे नाव ' तुली ' असे पडले आणि तेच पुढे चालू झाले. तिचे ते कृत्रिम उष्णता देऊन जगविणे, डॉ. खास्तगीरसारख्या चिकित्सानिपुण डॉक्टरला म्हणूनच साधले. नाही तर ती जगेल असे कुणालाच वाटले नव्हते. एकदोन महिन्यांनी हवा बदल करण्यासाठी म्हणून, कलाईघाटावरील ज्या हवेलीत उत्सव झाला होता आणि तेव्हापासून ज्या ठिकाणी माझे ब्राह्ममित्र नीलकमल देव राहात होते तेथे प्रसन्नमयीला ठेवून आलो. आणि मी ३३ नंबरच्या मुसलमान पाडा लेनमध्ये ज्या घरात रजनीनाथ राय, नन्दलाल राय, सारदानाथ हलदार, श्रीनाथ दत्त, कालीप्रसन्न चक्रवर्ती वगैरे माझे ब्राह्ममित्र राहात असत त्या घरात त्याच्याबरोबर राहून बी. ए. परीक्षेचा अभ्यास करू लागलो.

## त्यावेळची मेम–शिक्षकीण

यावेळची लक्षात ठेवण्यासारखी गोष्ट म्हणजे गणेशसुंदरीचा खिस्तीधर्मात प्रवेश आणि तेथून परत ब्राह्म धर्मात आगमन. गणेशसुंदरी ही कलकत्त्यात राहणारी एका वैद्य कुटुंबातील विधवा मुलगी. मिशनरी महिला त्यावेळी हिंदू कुटुंबात घरोघरी जाऊन अन्तःपुरात राहणाऱ्या बायकामुलींना शिकवीत असे आणि पुस्तके वाचून घेत. थोड्या मोबदल्यात शिकविण्यास त्या तयार असत. स्त्रीवर्गात साक्षरताप्रसार करण्याचा त्यांचा हा प्रयत्न चागला यशस्वी होई. यामुळे पुष्कळ प्रतिष्ठित लोक आपल्या घरी त्याना बोलवून घरांतील बायकामंडळीत शिक्षणप्रसार करण्याची संधी देत. मीही प्रसन्नमयीला आणल्यावर प्रथम अशारीतीने शिकविण्याची व्यवस्था केली. याबाबतीत घडलेली एक कौतुकास्पद गोष्ट मला आठवते. ती इथेच मी सांगून

टाकतो. एक मेम-शिक्षकीण प्रसन्नमयीला शिकवायला म्हणून आठवड्यात दोन वेळ माझ्याकडे येई. पहिल्या वेळी तिने, मनुष्यजातीचे आद्य जनक-जननी–ही आदम आणि हवा ( ॲडम ॲंड ईव्ह ) असल्याचे सांगून ती रसाळ कथा माझ्या पत्नीला ऐकविली आणि ती निघून गेली. त्यानंतर घरकामाच्या व्यापात गढून गेल्यामुळे प्रसन्नमयीला त्या तिच्या कथाकथनाचा विसर पडला. दुसऱ्या वेळी मेमशिक्षकीण आली आणि तिने येताच माझ्या पत्नीला विचारले, बाई, मानवाचे आद्य जनक-जननी कोण ? प्रसन्नमयीला काहीच आठवेना. तिच्या डोळ्यांपुढे काळोखी आली. आदम आणि हवा तिला आठवेनात. पण ती मेम काहीशा रागाने दोन शब्द बोलून म्हणाली, ' तुझ्या बाबूसाहेबांना विचारून घे ना ! ' मेमसाहेब पुनः येण्याचा दिवस उजाडताच माझ्या पत्नीने मला विचारले, ' अहो, मनुष्य प्रथम कसा उत्पन्न झाला ? ' मी सांगितले, ' ते कोण जाणे पण एका विद्वानाने सांगितले आहे की, मनुष्य प्रथम वानर होता. वानरापासून माणूस झाला.' त्या दिवशी मेमसाहेब येताच तिने विचारले, ' मनुष्य कसा झाला ? ' प्रसन्नमयी आदम–हवाला केव्हाच विसरून गेली होती. मेमसाहेब थोड्याशा त्रस्त मनाने म्हणाली, ' तू तुझ्या बाबूजींना का नाही विचारलेस ? ' प्रसन्नमयी त्यावर भीत भीत म्हणाली, ' त्यांना मी विचारले तेव्हा त्यांनी सांगितले : वानरापासून माणूस झाला ' यावर मेम म्हणाली, ' तुझे बाबू फार खट्याळ आहेत. तुझी त्यांनी थट्टा केली.' प्रसन्नमयीने उत्तर दिले, ' नाही; थट्टा केली नाही. अगदी खरे खरे सांगितले त्यांनी. '

योगायोग असा की, मी त्यावेळी शेजारच्या खोलीत होतो; त्यामुळे मेम-साहेब जाता जाता माझ्या खोलीत आल्या. त्यावेळी डार्विनच्या नव्या संशोधनाची तात्त्विक अशी सर्व माहिती मी त्यांना सांगितली. त्यांनी प्रसन्नमयीला दुसऱ्या एका वेळी सांगितले की, ' तू तुझ्या बाबूजींना काही विचारू नको.' माझ्या पत्नीच्या तोंडून मला हे कळताच मी खूप हसलो.

अशाच प्रकारची एक मिशनरीबाई गणेशसुंदरीला शिकवायला येत असे. एके दिवशी गणेशसुंदरी आपल्या विधवा आईला आणि भावाबहिणींना काही न सांगता मिशनऱ्यांच्या गोटात पळून गेली. पुढे ती मला भेटली त्यावेळी सांगत होती, मेमबाई तिला ज्या ज्या वेळी शिकवायला येई, त्या त्यावेळी उपदेश करी, ' तूं खोलच खोल अशा नरकाच्या तोंडाशी उभी आहेस.' असे तिने सांगितले की गणेश-सुंदरीचा भीतीने थरकाप होऊन जाई. आणि शक्य तितक्या लवकर ( नरकोत्तारण करणाऱ्या ) येशूच्या आश्रयाला आपण केव्हा जाऊ असे तिला होऊन जाई. कारण अगर शिकवण काही असो; पण अशा भयभीत वृत्तीत तिने ( उद्धारक ) मिशनरींचा आश्रय घेतला. ती त्यांच्याकडे कुणाला काही न सांगता पळून गेली व नंतर या-बाबतीत शहरात मोठी खळबळ उडाली आणि हायकोर्टात दावाही दाखल करण्यात

आला. पण या दाव्यात गणेशसुंदरीचे भाऊ हरले. ती वयात आलेली असून स्वतःच्या इच्छेने मिशनरींकडे आली असे सिद्ध झाले. या संबंधाने चळवळ आणि वर्तमानपत्री सुरुद्धविरुद्ध चर्चा चाललीच होती. शिव्यागाळीही चालत. केवळ वर्तमानपत्री टीकेवरच भागले नाही; तर एके दिवशी मारामारीही झाली. गणेशसुंदरी त्यावेळी पादरी व्हॉनसाहेब यांच्या आश्रयाला होती. तो एकदा कॉलेजस्क्वेअरच्या कोपऱ्यावर उभा राहून धर्मप्रचार करीत होता. त्यावेळी गणेशसुंदरीचा भाऊ चंद्र हा आपल्या टोळीसह तेथे उपस्थित झाला आणि लांडग्यांप्रमाणे त्या पादऱ्यावर सर्वांनी हल्ला चढविला. पादरी बिचारा ठोसे, गुद्दे, दगड, ढेंकळे यांचा मारा सहन करीत पळता पळता कॉलेजच्या समोर असलेल्या श्यामाचरण दे विश्वास महाशयांच्या घरात शिरला; त्यामुळे त्याचा बचाव झाला. त्या घरातील लोकांनी हल्ला करणाऱ्या तरुणांच्या टोळीला घालवून दिले. तेही तरुण मिळेल त्या गल्लीतून पळून गेले. मग पादरीसाहेब म्हणाले, ' काय सांगू पुरोहितबुवा, तुम्ही आड आले नसतेत तर मी तिघांना तरी लोळविले असते. ' या त्याच्या शब्दांनी आम्हाला खूप हसू आले होते. असो.

वर्तमानपत्री चळवळ थांबली खरी; पण ब्राह्मतरुणांनी गणेशसुंदरीच्या भाऊबंदांशी सल्लामसलत करून तिला खिस्ती पादऱ्यांच्या हातून सोडविण्याचे ठरविले. खिस्तीलोकांजवळ आपण सुखी नाही. माझी चूक मला आता कळून आली आहे आणि मी माझ्या आईकडे यायला तयार आहे ' असे गणेशसुंदरी म्हणत असल्याचेही मी ऐकले. मी ' जातिभ्रष्ट झाले असल्यामुळे भीतीने आई मला आपल्याकडे घेत नाही ' असेही ती सांगत होती. अशा स्थितीत ब्राह्मतरुण मंडळी, ' गणेशसुंदरीला तुम्ही आपल्याकडे आश्रय द्या ' असे मला सांगू लागली. मी त्यावेळी नवा संसार थाटून घरप्रपंच चालवू लागलो होतो. त्या मुलीची ती अनुकंपनीय अवस्था जाणून मलाही ' नाही ' म्हणवेना. विचार केला, ' आम्हांला जी मीठभाकर मिळते आहे त्यांत तिचीही जोगवण होईल ! '

आणि मग गणेशसुंदरी जशी खिस्त्यांकडे पळून गेली होती तशीच तिकडून पळून माझ्याकडे आली आणि बहिणीप्रमाणे आमच्या दुःखातील वाटेकरी होऊन संसार संभाळून कित्येक वर्षे राहिली. पुढे परमेश्वराच्या कृपाशीर्वादाने एका योग्य व्यक्तीशी ( राधाकान्त बंद्योपाध्याय नावाच्या मला पूज्य असलेल्या मित्राशी ) ती विवाहित झाली. मी तिचे गणेशसुंदरी हे नाव रद्द करून दुसरे मनोमोहिनी हे नाव प्रख्यात केले; ती त्याच नावाने आजही माझी बहीण म्हणून ब्राह्मसमाजात ओळखली जाते.

### ब्राह्मसमाजातील ' आनन्दवादी दल '

कलकत्त्यात ब्राह्मसमाजाची अनेक दले अगर संघ होते. त्यातील सगळी

मंडळी माझ्याशी मित्रत्वाने वागत. त्यावेळी उन्नतिशील ब्राह्मदलात ‘ आनन्दवादी दल ’ नावाचा एक संघ होता. ‘ अमृतबझार ’चे शिशिरकुमार घोष आणि त्यांचे बंधू या दलाचे नेते म्हणून प्रसिद्ध होते. याची थोडीशी हकीगत आहे ती सांगतो. १८६६ साली केशवबाबूंनी, ‘ जीझस् ख्राइस्ट, एशिया अँड युरोप ’ या विषयावर एक व्याख्यान दिले आणि त्याची खूपच प्रसिद्धी झाली. या व्याख्यानामुळे गव्हर्नर जनरल लॉर्ड लॉरेन्स यांची केशवबाबूंवर फारच मर्जी बसली इतकेच नव्हे तर ते एकमेकांचे मित्रही बनले. हळू हळू केशवबाबूंच्या दलातील लोकांचा अर्थात् अनुयायांचा येशू ख्रिस्ताकडे बराच कल झुकू लागला. ख्रिस्ताच्या जन्मदिवशी येशूच्या ध्यानधारणेत दिवस घालविणे, बायबल वाचणे, त्यावर प्रवचन देणे, ख्रिस्ती मिशनऱ्यांशी मिळून मिसळून वागणे वगैरे गोष्टी होऊ लागल्या. बाकी या गोष्टी यापूर्वीहि या लोकांकडून होत असत. आता त्या जास्त होऊ लागल्या इतकेच. याचा परिणाम असा झाला की, ख्रिस्तपद्धतीप्रमाणे ‘ अनुताप ’ आणि ‘ प्रार्थना ’ यावर हे उन्नतिशील दल जास्त भर देऊ लागले. पाप मानणे हा प्रकार नवीन-ब्राह्म समाजात प्रबल बनत चालला. अनुतापव्यंजक संगीत पद्यरचना होऊ लागली. याच संधीला, मला वाटते १८६७ साली गोस्वामीजींनी आपल्या वरिष्ठांना निमंत्रित करून उन्नतिशील दलाला वैष्णव संकीर्तन ऐकविले. तेव्हापासून ब्राह्मसमाजात संकीर्तनाची प्रथा सुरू झाली. या सगळ्या उत्तेजक कारवाईचा परिणाम म्हणूनच की काय १८६८ साली ( पूर्वी सांगितल्याप्रमाणे ) नरपूजा हा एक नवा उपक्रम उगवला. पापाची जाणीव आणि अनुतापाची विव्हलता इतक्या पराकोटीला गेली की त्या अवस्थेत ब्राह्मलोक केशवबाबूंच्या पायांवर लोटांगण घालून व्याकूळतेने रडत. हुंदके देत. अश्रुविसर्जन करीत.

इकडे अशा रीतीने अनुतापाची व्याकूळता आणि प्रार्थनेच्या लाटा उसळू लागल्या तेव्हा दुसरीकडे ब्राह्म मंडळीतील एका दलातील लोक म्हणू लागले, ‘ इतका अनुताप करण्याची आणि रडण्याओरडण्याची काय गरज ? प्रेममय प्रभूच्या घरात रडण्याओरडण्याचे काय काम ? आनंदमय प्रभूचे प्रसन्न वदन पाहून आनंदित व्हा ना !’ आणि असे प्रतिपादन करणाऱ्या मंडळींना ब्राह्मलोक ‘ आनंदवादी दल ’ असे म्हणू लागले. शिशिरबाबू यांचे मुख्य होते. नरपूजेचा प्रकार पाहून हे आमच्यातून बाजूला झाले. आम्हांला त्यांनी वगळले. १८६९ सालच्या माघोत्सवात मुंगेरहून आलेला एक ब्राह्मसमाजिष्ट; उपासना संपताच केशवबाबूंचे पाय धरून कसलीशी प्रार्थना करू लागला. त्यामुळे शिशिरबाबूंचे वडील भाऊ हेमंतबाबू रागावले आणि ‘ हे असले प्रकार आपल्याला पसंत नाहीत ’ असे म्हणून त्या रागातच बाहेर पडून निघून गेले. त्रैलोक्यनाथ संन्याल महाशयही तसेच रागावून बाहेर जात असलेले मी पाहिले. हा महोत्सव भारतवर्षीय ब्राह्ममंदिराच्या अर्धवट तयार असलेल्या इमारतीत शामियाना घालून साजरा करण्यात आला होता.

यानंतर अमृतबझारच्या दलाला, आमच्या उपासनेत सामील झालेले फारसे पाहिले नाही. कलकत्त्यातील पटेलडांगा भागात पटुयाटोला लेनमध्ये जशोहरच्या मंडळाची एक इमारत होती. शिशिरबाबू त्या ठिकाणी मधूनमधून येत. ते आले की आनंदवादी दलातील सर्वांचा समागम होई. ते मलाही बोलवीत त्यावेळी साधारणतः गायन आणि कीर्तन होत असे. शिशिरबाबू तर उत्तमच कीर्तन करीत. त्यांचे ते कीर्तन आम्हाला तर वेडे करून सोडत असे. टाकीनिवासी पूज्य मित्रवर्य हरलाल राय तर त्या कीर्तनात लोटपोट होत असत. संगीतही नवीन प्रकारचे असे. कित्येक चरण येथे उद्‌धृत केल्यास त्यातील भावमयतेची कल्पना करता येईल. एका पदात ईश्वराला संबोधून म्हटले जाई—तोमार रागे रांगानयनातले,

बहे देखि प्रेमधार.

( तुझ्या अनुरागाने रंगलेल्या डोळ्यांतून—प्रेमधारा वाहात असलेल्या दिसतात. ) आणखी एक पद त्यांच्या तोंडून नेहमी ऐकण्यात येई ते असे—

मा जार आनंदमयी, तार कि वा निरानंद ?

( आई ज्याची आनंदमयी त्याला कसले दुःख ? )

तवे केन रोगे–शोके पापेतापे वृथा कांद ?

( तर मग रोगाने. शोकाने, पापतापाने वृथा रडणें कशाला ? )

माझखाने जननी बसे, सन्तानगण तार चारीपाशे,

( आई मध्ये बसते आणि तिची मुले तिच्या चारी बाजूला असतात. )

भासाह्याछेन प्रेममयी प्रेमनीरे !

( प्रेमळ आई प्रेमाश्रूच्या सागरात मुलांना खेळवीत आहे. )

एकवार बाहुतुले मा मा बले नृत्य कर संतानवृंद

( एकवार ऊर्ध्वबाहू होऊन आई आई म्हणत मुलांनो नृत्य करा. )

असे गाणे म्हणत सर्वजण नाचू लागत.

एका बाजूला असे अनुतापाचे उद्‌गार आणि क्रंदन ऐकत असे तर दुसऱ्या बाजूला त्यांच्यात जाऊन आनंद व नृत्य पाहात असे. त्यावेळी ते मला फार आवडत असे. शिशिरबाबूंच्या भावांचा आपसातील सद्‌भाव पाहून मन अगदी मुग्ध होऊन जाई. त्यानंतर ते कलकत्त्यात हिदेराम बांडुज्जे यांच्या गल्लीत येऊन घर बांधून राहिले. मग तर त्यांची-माझी नेहमीच भेट-गाठ होत असे. शिशिरबाबूंची ती निष्कपटता पाहून मी मुग्ध होई. एका दिवसाची गोष्ट मला आठवते. त्यांनी त्या दिवशी मला आपल्याकडे जेवायला बोलाविले होते. भोजनाच्या वेळी मी तेथे जाताच ते मला म्हणाले, ' परक्यासारखे बाहेर बसून काय जेवायचे. चल सैंपाकघरात जाऊन आईला सांगतो, आईच्या हातचे गरमागरम जेवण जेवल्यावाचून समाधान होत नाही ! ' आणि मग आम्ही दोघेही सैंपाकघरात बसून

जेवलो. त्यांची आई गरमागरम भात-भाजी वाढीत होती आणि आम्ही समाधानपूर्वक भोजन करीत होतो, याची मला चांगली आठवण आहे.

यानंतर मात्र शिशिरबाबू व त्यांचे भाऊ ब्राह्मसमाजातून हळूहळू वेगळे झाले.

## प्रसिद्धीची विटंबना

पण एका कारणाने यावेळी माझी आध्यात्मिक स्थिती, असावी तशी चांगली राहिली नव्हती. ते कारण असे, जोपर्यंत मी ब्राह्मलोकांच्या मागे मागे होतो आणि स्वतःला त्या सर्वांहून कमी दर्जाचा मानीत होतो तोपर्यंत माझे अन्तःकरण विनय आणि व्याकूळता या भावनेने तुडुंब भरलेले असे. सर्वसामान्य लोकांत ब्राह्म म्हणून ओळख देण्याएवढी आपली योग्यता नाही असे मला वाटे. पण दीक्षाग्रहणानंतर माझी ही अवस्था राहिली नाही. मी अकस्मात् जणू काय एकदम पुढे आलो आणि एक मोठा ब्राह्म म्हणून सर्वपरिचित झालो. ब्राह्म लोकांत सर्वत्र मला मान मिळू लागला. माझा आदर-सत्कार होऊ लागला. पण या मान-मान्यतेला मी योग्य नव्हतो. मला वाटते माझा इतका मानसन्मान होण्याची दोन कारणे होती. पहिले, १८६८ सालच्या अखेरीस ' निर्वासिताचा विलाप ' हे माझे काव्य, पुस्तकरूपाने प्रसिद्ध झाले. आणि या प्रसिद्धीबरोबरच माझ्याकडे लोकांचे लक्ष वेधले. सर्वत्र प्रशंसा होऊ लागली. आणि सहजच उदीयमान कवी म्हणून लोक मला ओळखू लागले. दुसरे, मी दीक्षा घेतली त्यावेळेपासून माझे मामा 'उन्नतिशील ब्राह्मदलाला' ' केशवदल ' म्हणून आपल्या ' सोमप्रकाश ' साप्ताहिकात प्रसिद्धी देऊन गोळीबार करू लागले. यामुळेही सर्वसाधारण लोकांत मी नामांकित झालो. त्या वा या कोणत्याही कारणाने असो, मी तेव्हापासून लोकांच्या डोळ्यांसमोर आलो आणि एक मोठा ब्राह्म म्हणून मला लोक ओळखू लागले. काही दिवस हा मानमान्यतेचा त्रास बराच जाणवला. पूर्वीची चित्ताची व्याकूळता, तन्मयता पुष्कळशी ओसरली. मी बेभान झालो. ज्या सगळ्या वाईट आणि तिरस्करणीय गोष्टी मी मनःपूर्वक टाळीत असे, त्या बाबतीत संयम राखीत असे त्यांनी पुनः उचल केली. डोके वर काढले.

पण माझ्यावर परमेश्वराची विशेष कृपा म्हणावी लागेल की, मी लवकरच आत्मनिरीक्षणाच्या सहाय्याने स्वतःची होत असलेली घसरगुंडी ओळखली आणि ती सुधारण्याकडे तत्परतेने लक्ष घातले. दीक्षेच्या वेळी आणि या बेभान अवस्थेत माझ्या मनाच्या पालटणाऱ्या अवस्था मी कित्येक कवितांतून व्यक्त केल्या होत्या. माझ्या आठवणीप्रमाणे सांगायचे तर त्या सर्व धर्मतत्त्व पत्रिकेत प्रकाशित झाल्या होत्या. कुणी शोधल्यास पत्रिकेच्या फायलीत त्या आजही मिळू शकतील. केवळ

चार दोन चरण मला आठवतात. वडलांनी मला घरावेगळा केल्यानतर मी कविता लिहिली ती—

भासाये जीवन–तरी विपत्तिर सागरे
( लोटू जीवन नौका विपत्ति–सागरी )
जाइ देव ! देख देख रक्षा कर आमारे.
( चाललो देवा ! पाहि पाहि माझे रक्षण करी. )
मोर पक्ष छिल जारा
( माझ्या पक्षाचे जे होते, )
विपक्ष इहल तारा.
( विरुद्धपक्षी झाले ते. )
घेरिल सकलदिक अपवाद आंधारे
( 'घेराओ' केले सर्व बाजूंनी अपवाद–तमी रे )
बहिल प्रलय झड मस्तकेर उपरे
( डोक्यावरून झंझावाताचे वाहू लागले वारे. )

प्रारंभी ज्या आध्यात्मिक अवस्थेचा उल्लेख केला होता, त्या अवस्थेला उद्देशून मी एक कविता केली ती–

निज दले गेले परे समादर पाइ हे ।
( आपुल्या दली गेल्याने मज मिळेल मान आदर. )
आपनारे बड भावि ताइ हे
( म्हणून मी स्वतःला मोठा समजतो )
किन्तु कि जे बड आमि
( पण मी किती मोठा आहे )
जान तुमि अन्तर्यामी
( ते अंतर्यामी तू ओळखतोस )
नय अगोचर प्रभु कोनो कथा नाई हे
( हे प्रभु, तुला अगोचर अशी, कोणतीही गोष्ट नाहीं रे )

असो, दीक्षा आणि सामान्य मानमान्यतेचा हा धक्का यांच्या संघर्षातून मुक्त होण्याला मला काही दिवस लागले. मी ब्राह्म समाजात चट्‌कन इतका आदरणीय का ठरलो त्याचे प्रमाण म्हणून दोन घटनांचा उल्लेख करतो.

माझा दीक्षाविधी झाल्यानंतर काही महिन्यांनी श्यामबझार–ब्राह्मसमाजाचा वार्षिक उत्सव आला. त्यावेळी त्या समाजाची प्रतिष्ठापना करणारे काशीश्वर मित्र महाशय जिवंत होते. त्यांनी मला एका मनुष्याकडून निरोप पाठविला, की मला

त्या उत्सवाच्या उपासनेत द्विजेन्द्रनाथ ठाकूर व अयोध्यानाथ पाकडाशी महाशया-बरोबर मुख्य वेदीवर बसायला पाहिजे. हा निरोप ऐकून भीतीने मी गांगरून गेलो. पण त्यांनी माझे काहीच ऐकून घेतले नाही. शेवटी त्यांच्या आज्ञेला मला मान तुकवावी लागली. पण ते निघून गेल्यावर, वेदीवर मुख्य उपदेशक म्हणून बसायला पाहिजे ही भावना मला गांगरून टाकू लागली. मला भीतीच वाटू लागली. पण करणार काय? वचन तर देऊन चुकलो!

तेव्हा मग अनन्योपाय होऊन उपदेश लिहायला बसलो. उपदेशाचा आराखडा तर तयार केला. उपासनेच्या वेळी वेदीवर बसून भीत भीत तो वाचलाही. पण वेदीवरून खाली उतरताच द्विजेंद्रबाबूंनी मला घट्ट मिठी मारून माझ्या उपदेशाची फार प्रशंसा केली. सभेच्या ठिकाणीही पुष्कळ लोक आपले समाधान व्यक्त करू लागले.

दुसरे दिवशी कॉलेजात बी. ए. चा अभ्यास चालू असताना माजी डेप्युटी मॅजिस्ट्रेट ईश्वरचंद्र घोषाल यांच्याकडून कॉलेजच्या अध्यक्षांच्या नावाचे एक पत्र आले, त्यात 'शिवनाथ भट्टाचार्य नावाचा, तुमच्या बी. ए. च्या क्लासमध्ये एक विद्यार्थी आहे, त्याला काही वेळ माझ्याकडे पाठवा.' असा मजकूर होता. त्या वेळचे अध्यक्ष प्रसन्नकुमार सर्वाधिकारी यांनी मला बोलवून विचारले, 'ईश्वर घोषालनी तुला कशाला बोलाविले आहे?' मी उत्तर दिले 'मला काहीच माहीत नाही. त्यांच्याशी माझे कधी बोलीभाषणही झालेले नाही.' त्यांनी नंतर मला त्यांच्याकडे पाठविण्यापूर्वी ईश्वर घोषालसंबंधाने पुष्कळशा गोष्टी सांगितल्या. ते म्हणाले, 'हुशारीने वाग. कदाचित् ते तुला ख्रिस्ती धर्मात पाठवतील.' तेथे जाऊन पाहतो तो गोष्ट खरी. सर्वाधिकारी महाशयांनी जे सांगितले होते तेच ऐकावे लागले. घोषाल महाशय आदले दिवशी झालेल्या श्यामबाजारच्या उपासनेला उपस्थित होते. त्यांनी ख्रिस्तीधर्माचा मोठेपणा दाखविण्यासाठी, आद्य प्रॉफेट मंडळीची भविष्यवाणी आणि त्याप्रमाणे पुढे घडलेल्या घटना यांची तुलना करून महत्त्व सांगायला आरंभ केला आणि मला बायबलचे एक पुस्तक बक्षिस म्हणून दिले; इतकेच नव्हे तर माझ्यावर मुलापेक्षाही जास्त प्रेम असल्याचा देखावा करून मला निरोप दिला. मी येता येता विचार केला, 'मग यांनीच ख्रिस्तीधर्म का स्वीकारला नाही?'

श्यामबाजारच्या उपदेशाची झळ एवढ्यावरच ओसरली नाही. थोड्याच दिवसांनी 'सिन्दुरियापटि' कौटुंबिक समाजातून क्षेत्रनाथ शेठ नावाच्या एका प्रतिष्ठित गृहस्थाने येऊन मला म्हटले, 'त्या समाजातील सर्वांची अशी इच्छा आहे की, तुम्ही त्या समाजाचे आचार्यपद स्वीकारावे; पूर्वी अयोध्यानाथ पाकडाशी हे तेथे आचार्य म्हणून काम करीत होते; पण कार्यबाहुल्यामुळे त्यांनी ती जागा सोडली तेव्हा तुम्ही ती जागा स्वीकारावी.' पाकडाशी महाशयांवर माझी फार श्रद्धा होती. त्यांच्या उपदेशामुळे मला पुष्कळसे मार्गदर्शन झाले होते. वास्तविक ब्राह्म

आचार्यात चिंतनशीलता, स्वाभाविक जिज्ञासा, आध्यात्मिक दृष्टी हे गुण प्रकर्षाने असावे लागतात. पाकडाशी महाशयांत हे गुण ओतप्रोत होते. अशा दुर्मिळ थोर पुरुषाने भूषविलेल्या वेदीवर आचार्य म्हणून मी बसावे याचा मला खूप संकोच वाटू लागला. पण त्या गृहस्थांच्या आग्रहाला मला नकार देववेना. शेवटी एका शुक्रवारी येऊन उपासना चालविण्याचे ठरविले. यावेळी उपदेश करावयाचा तो लिहूनच घेऊन गेलो होतो. पण या प्रवचनानेच माझ्यावरचे संकट दसपटीने वाढले. त्या मंडळींनी मला सोडायचे नाही असेच ठरविले आणि तसे बोलूनही दाखविले. त्यामुळे ती आचार्यांची जागा मला स्वीकारणे भाग पडले. आणि यामुळे आध्यात्मिक क्षेत्रात माझी बरीच उन्नती झाली. इतकेच नव्हे तर आचार्याचे कार्य कसे करावे तेही शिक्षण मिळाले. पुढे कित्येक वर्षे मी हे काम करीतच होतो. कुठेही असलो तरी शुक्रवारी सायंकाळी सिन्दुरियापटी येथे उपस्थित होत असे. त्यावेळी काय बोलावे याचा आठवडाभर मी विचार करीत असे. उपासक मंडळीचा अभाव का जाणवतो हाही प्रश्न सोडविण्याचा मी प्रयत्न करीत असे. शिवाय प्रत्येकाच्या सुखाने सुखी व दुःखाने दुःखी होण्याचा माझा प्रयत्न चालूच होता. शेवटी सांगायचे म्हणजे आचार्यपदाची जबाबदारी व महत्त्व किती आहे याची मला अखंड काळजी वाहावी लागे; त्यामुळे त्या ज्ञानाचा माझ्यात विकास होऊ लागला.

हळू हळू त्या अल्पसंख्य अशा उपासक मंडळींत माझ्याबद्दल आपुलकी निर्माण झाली. माझ्याबद्दल प्रेम वाटू लागले आणि ही जवळीक फार काळ तशीच टिकून राहिली आहे. गोपाळचंद्र मल्लिक, नेपाळचंद्र मल्लिक, सिंदुरियापटी परिवारातील दोघे बंधू जोपर्यंत जिवंत होते तोपर्यंत ते मला निरनिराळ्या प्रकारे योग्य ते सहाय्य देत असत. शेवटी साधारण–ब्राह्म–समाज स्थापन झाल्यावर गोपाळचंद्र मल्लिक हे माझ्याबरोबर त्यांत दाखल झाले आणि ब्राह्मपद्धतीने विवाहित होऊन त्यांच्या वडलांकडून बहिष्कृतही झाले. त्यांचे वडील प. वा. मणिलाल मल्लिक हे आदिसमाजनिष्ठब्राह्म होते. त्यांनीच हा कौटुंबिकसमाज स्थापन केला होता.

१८७१ साली आषाढच्या १४ तारखेला माझा पहिला मुलगा प्रियनाथ याचा जन्म झाला.

## ढाक्याची 'अबलाबांधव' पत्रिका

त्याच वेळची उल्लेखनीय घटना म्हणजे, 'अबलाबांधव' पत्रिका संपादक व ब्राह्म समाजात सुपरिचित असे द्वारकानाथ गंगोपाध्याय महाशय यांची झालेली भेट व सहवास. तोपर्यंत ढाका हे समाजसुधारणेचे मुख्य क्षेत्र होऊन गेले होते. याच संधीला 'महापाप बालविवाह' नावाने एक पत्रिका ढाक्याहून प्रसिद्ध होऊ लागली होती. त्यातील लिखाणामुळे तेथील तरुण मंडळीवर आमची फारच श्रद्धा

बसली. अशा या वंगभूमीत अबलाबांधवचे दर्शन घडले. मला वाटले, वंगदेशाच्या एका कोपऱ्यातून स्त्रीवर्गाचा हितैषी असा हा कोण जन्माला आला! 'अबला-बांधव 'च्या संपादकांना मी त्यावेळी ओळखीत नव्हतो. पण त्यांचे ते जिवंत आणि तेजस्वी लिखाण हृदयाच्या तळमळीने लिहिले जात आहे असे मला वाटू लागले आणि फार आवडलेही. पुढे ढाक्याचे प्रसिद्ध डेप्युटी मॅजिस्ट्रेट अभयाचरण दासांचा मुलगा प्राणकुमार दास एकदा कलकत्त्याला येऊन त्याने मला आणि काही इतर तरुणांना त्या पत्रिकेच्या लेखकवर्गात समाविष्ट करून घेतले. मला जेवढे आठवते त्यावरून मी कुमारी राधाराणी लाहिडी हिला सांगूनसवरून या पत्रिकेची लेखिका करून घेतली होती. अबलाबांधव पत्रिकेत मधून मधून माझे गद्यपद्यात्मक प्रबंध प्रसिद्ध होत. सांगायला दुःख वाटते ते हेच की त्या अबलाबांधव पत्रिकेची एकही फाईल शोधूनसुद्धा मला मिळाली नाही.

अबलाबांधवशी अशातऱ्हेने संबंध जडला असताच, एके दिवशी कॉलेजात अभ्यास चालू होता इतक्यात उमेशचंद्र मुखोपाध्याय आले आणि मला म्हणाले, 'अरे भाई, अबलाबांधवचे एडिटर आम्हांला व तुला भेटण्यासाठी कलकत्त्याला आले आहेत.' लागलीच आमच्या त्या 'हीरो'ला भेटण्यासाठी मी वर्गातून बाहेर पडलो. जाऊन पाहिले तो उंचच उंच एक शिबडी पुरुष, स्कूलमास्तराप्रमाणे लांबलचक अंगरखा घालून उभा आहे! हेच द्वारकानाथ गंगोपाध्याय. त्या दिवशी काही विशेष बोलीभाषण झाले नाही. त्यावेळी ते थोडे दिवस कलकत्त्यात राहून परत गेले असावेत. पण त्यानंतर थोड्या दिवसांतच 'अबलाबांधव' पत्रिकेचा संसार घेऊन कलकत्त्यात आले. आणि पूर्ववर्गीय तरुणांचे नेते म्हणून ब्राह्मसमाजात स्त्रीस्वातंत्र्याचा पहिलावहिला ध्वज त्यांनी फडकावला.

याच वेळी ढाक्याहून जसे हे आले तसेच बारिसालहून प. वा. मित्र दुर्गा-मोहनदास हेही कलकत्त्याला आल्यामुळे स्त्रीस्वातंत्र्याच्या दृष्टीने माणिकांचनयोग साधल्यासारखेच झाले. याचा परिणाम काय झाला ते आता ओघानेच सांगतो.

* * *

७.

# केशवचंद्रांच्या भारतआश्रमात

दीक्षा घेतल्यानंतर केशवचंद्र सेन यांच्याशी माझा विशेष परिचय झाला. जवळीक वाढली; त्यांच्यात आणि माझ्यात असे काही विशेष होते की मला पाहाताच ते आनंदित होत असत आणि मीही त्यांना पाहाताच आनंदित होई. हसणे बोलणे, थट्टामस्करी हेही प्रकार त्यांच्यात-माझ्यात चालत. परकेपणा मुळीच राहिला नव्हता. एकदा एकजण मला म्हणाला होता, ' केशवबाबूंच्या मनाची एक चावी तुमच्या जवळ आहे, ' आणि हे त्याचे विधान फारसे चुकीचे नव्हते. कारण त्यांच्याजवळ मी माझ्या मनातील बऱ्यावाईट सर्व गोष्टी मनमोकळेपणाने बोलत असे. बोलण्याला मुळीच संकोच वाटत नसे; अगदी अनिर्बंधपणाने मी सर्व हकीगती त्यांच्या कानावर घालीत असे. इतकेच काय पण त्यांच्या ज्या गोष्टी माझ्या मनाला पटत नसत, त्याही त्यांना सांगण्याला मी कचरत नसे. अगदी मनमोकळेपणाने सांगत असे.

त्यांची माझी थट्टामस्करीची कशी बोलणी चालत, याची काही उदाहरणे या ठिकाणी देणे मला गैर वाटत नाही. एकदा हरिनाभी ब्राह्मण-समाजाच्या वार्षिक उत्सवात सकाळची उपासना चालविण्याचे आचार्यपद त्यांनी चालवावे हे माझे बोलणे त्यांनी मानले. मी त्यावेळी हरिनाथ स्कूलचा हेडमास्तर होतो. ते कलकत्त्याला राहात. तरीपण उपासना चालविण्यासाठी अगदी पहाटे उठून ते जे निघाले ते उजाडते न उजाडते तोच माझ्या दारात येऊन उभे राहिले. त्यावेळच्या त्यांच्या प्रातःकालीन उपाहाराची मी व्यवस्था करून ठेवली होती. त्यात त्यांना इतर पदार्थांबरोबर ओले हरभरे व आले सकाळच्या फराळाला अवश्य लागे हे मला माहीत होते. म्हणून ओले हरभरे व आले यांची व्यवस्था करण्यात आली होती. ओले हरभरे पाहाताच ते फार खूष झाले. आणि ते मला म्हणाले ' शाबास!

पण मी सकाळी ओले हरभरे खातो, हे तुम्हांला कसे कळले!' मी उत्तर दिले, 'इतके दिवस तुमच्या सहवासात असताही मला एवढी गोष्ट समजू नये ? आपल्या दैनिक रीतिरिवाजांपैकी एक छोटीशी बाब मला समजली यात नवल कसले ?' मी आणखी पुढे त्यांना विचारले, 'पण हे ओले हरभरे तुम्हाला इतके आवडतात याचे कारण काय ?' त्यांनी हसत हसत सांगितले, 'वा: हरभरे खायला नकोत ? गाडीला जुंपल्यावर मग काय अवस्था व्हायची ?' आणि तसेच हसता हसता ते पुढे आणखी म्हणाले, 'नुसते गाडीला जुंपूनच भागत नाही. त्यावर चाबकाचे फटकारे मारण्याचेही काम चालते.' मी मधून मधून त्यांच्या कामकाजाबद्दल टीका-टिप्पणी करायलाही कमी करीत नसे. त्याला उद्देशून हे सर्व चालले होते. चाबूक खाणे म्हणजे टीका सहन करणे. त्यांचे ते हेतुगर्भ बोलणे ऐकून मीही हसत हसत म्हटले, 'बेअदबीची माफी असावी. आपण वेदीवर बसून चांगले टोले हाणण्याला-ही कमी करीत नाही !' आणि मग यावर आम्ही दोघेही खूपच दिलखुलास हसलो.

आणखी एकदा माझ्या मित्राच्या मुलीचे नामकरण होते, त्यावेळी त्यांनी उपासना चालविण्याला येतो म्हणून सांगितले. सायंकाळी ७ वा. उपासनेला आरंभ व्हायचा ठरले. ठरलेल्या वेळी आम्ही सर्व त्यांची वाट पाहात बसलो. ते आले नाहीत. असे समजले की, ते गव्हर्नर जनरलच्या बंगल्यावर सायंकाळच्या मीटिंगला गेले आहेत. फक्त त्यांना भेटून तसाच येतो असे सांगूनही गेले आहेत म्हणे. वाट पाहाता पाहाता ८ वाजले; ८॥ झाले तरी त्यांचे दर्शन नाही. शेवटी सुमारे ९ वा. येऊन दाखल झाले. मी हसून त्यांना म्हटले, 'आपण बड्या लोकांबरोबर इतके का गुंतता ? आपणाला तर एखादा किताब, पदवी वगैरेही कोणी काही दिलेली दिसत नाही !' त्यांनीही हसत हसत उत्तर दिले, 'असे का बरे म्हणता ? के. सी. एस्. आय्. ( केशवचंद्र सेन मी. ) ही मला मिळालेली पदवी काय लहान-सान आहे ?'

एकदा मी त्यांच्या घरी गेलो होतो. तेव्हा पाहिले, ते झोपी गेले असूनही डोळ्यांना चष्मा आहे तसाच आहे ! जाग आल्यावर मी त्यांना म्हटले, 'जर झोपायचेच तर डोळ्यांना चष्मा कशाला ?' त्यांनी हसून उत्तर दिले, 'अरे बाबा, स्वप्न तरी पाहिले पाहिजे की नको ?'

### केशवचंद्रांचे परदेशगमन

१८७० सालच्या प्रारंभी जेव्हा केशवचंद्र सेन हे इंग्लंडला गेले तेव्हा जाण्यापूर्वी आम्हा सर्वांना एकत्र जमवून त्यांनी पुष्कळशा गोष्टी सांगितल्या. 'मी विलायतेला जात आहे. पुढे काय होईल याची खात्री नाही. माझ्या अनुपस्थितीत ज्या मतभेदांची शक्यता आहे, त्यांसंबंधीही तुम्हाला काही सांगावे असे वाटते.'

त्यांनी जे सांगितले त्यांतील एक गोष्ट मला आठवते. ते महापुरुषांविषयीच्या आपल्या मताचा उल्लेख करून म्हणाले, ' मी महापुरुषांना, महात्म्यांना, चष्म्या-प्रमाणे समजतो. चष्मा जसा डोळ्यांचे आवरण होऊ शकत नाही, पण दृष्टी उज्ज्वल करतो. त्याप्रमाणे महान् पुरुष हे ईश्वर आणि मनुष्य यांच्यामध्ये उभे राहून ईश्वर-दर्शनाला व्याघात होऊ देत नाहीत. उलट ईश्वरदर्शनाला ते साहाय्य करितात. अथवा ते महात्मे द्वारपाल आहेत असे मानल्यास, द्वारपाल ज्याप्रमाणे आलेल्या व्यक्तीला मालकाच्या समोर घेऊन जातो, त्यानंतर त्याचे काही काम उरत नाही, त्याप्रमाणे महात्मे हे ईश्वरचरणी मानवाला उपनीत होण्याला कारण होतात. त्या दोघांची भेट झाल्यावर आपण तेथे राहात नाही.' मला वाटते, मी त्यावेळी त्यांना विचारले होते, ' महात्मे हे चष्म्याप्रमाणे असतात, हे बरोबर आहे. पण कुणालाही जर वारंवार ' हा पाहा तुझा चष्मा, हा पाहा डोळ्यांवरचा तुझा चष्मा ' असे ते सांगू लागले तर दृश्य पदार्थापासून त्याची नजर चष्म्यातच गुंतून राहाते; त्या-प्रमाणे महात्मे अगर महान् पुरुष हे ईश्वरदर्शनाला सहाय्यक झाले तरी ' हा महान् पुरुष, हा महात्मा ' असे म्हणून त्यांच्याकडेच जर आपली दृष्टी अधिक आकर्षित करण्यात आली तर ईश्वराला मागे टाकले, त्याला बाजूला लोटले असे नाही का होणार ? '

असो. केशवचंद्र इंग्लंडला गेल्यावर त्यांच्या ताटातुटीमुळे मला मानसिक क्लेश बरेच जाणवू लागले. आणि ते मनाचे आन्दोलन व्यक्त करण्यासाठी मी एक कविताही लिहिली होती. मात्र ती त्यांच्या पत्नीच्या शब्दांत होती. मला वाटते ती ' अबला-बांधव ' किंवा दुसऱ्या कोणत्या एखाद्या पत्रिकेत प्रसिद्ध झाली असावी. मी केशवबाबूंकडून पुष्कळसे काही शिकलो. कोणत्या तऱ्हेने ईश्वराचे काम करावे हे त्यांना पाहूनच मी जाणले. ईश्वरावर विश्वास, अगर भरंवसा कशाला म्हणतात हे त्यांच्यामुळेच मला कळले.

केशवबाबू काही महिन्यांनंतर इंग्लंडहून परत आले. पण आल्याबरोबर त्यांनी अनेक कामांचे आराखडे सर्वांपुढे ठेविले. इंडियन रिफॉर्म ॲसोसिएशन नावाची एक संस्था स्थापन करून तिच्या मार्फत, टेंपरन्स, एज्युकेशन, चीप लिटरेचर, टेक्निकल एज्युकेशन वगैरे विभाग त्यांनी उघडले. मी सर्वच कामांत त्यांचा अनुयायी बनलो होतो. मद्याच्या बाबतीत जो विभाग होता त्या विभागातून ' मद्य की विष ? ' या नावाचे एक मासिकही सुरू केले होते. त्यात मद्यपानाचे दुष्परिणाम दाखविण्यासाठी गद्यपद्यमय प्रबंध प्रकाशित होत. त्या सर्वांत माझेच लिखाण जास्त असे. शिवाय ' सुलभ समाचार ' नावाचे पैसा किंमतीचे एक वर्तमानपत्रही प्रसिद्ध होत असे, त्यातही मी लिहीत असे.

याच वेळी केशवबाबूंनी, पुरातन सोसायटी ऑफ् थीईस्टिक फ्रेंडस्चे पुनरुज्जीवन केले. त्यांत व्याख्यान देण्याचे काम त्यांनी माझ्याकडे सोपविले होते.

त्याप्रमाणे इंग्रजीत मी एक व्याख्यानही दिले. केशवबाबूच अध्यक्ष होते. त्या व्याख्यानाच्या दिवशीच्या इतर काही गोष्टींचे मला स्मरण नाही. एवढे मात्र आठवते की, अमेरिकेचे युनिटेरियन मिशनरी सुप्रसिद्ध डॅलसाहेब हे त्या सभेला उपस्थित होते. त्यांनी आपणाला 'ब्राह्म फॉलोअर ऑफ् क्राईस्ट' म्हणून जाहीर केले.

> याच इंडियन रिफॉर्म ॲसोशिएशनच्या पक्षातून केशवबाबूंनी आणखी एक काम केले होते. त्यांनी एका छापील पत्रकाद्वारे देशातील प्रख्यात डॉक्टर मंडळींकडे; या देशातील मुलींच्या विवाहाचे योग्य वय कोणते असावे, याची पृच्छा केली होती. या प्रश्नाचे उत्तर देताना बहुतेक देशी व विदेशी डॉक्टरांनी, हे वय १६ वर्षांहून जास्त असले पाहिजे अशी शिफारस केली. फक्त डॉ. चार्लसने कमीत कमी १४ वर्षांचे वय निर्देशित केले होते. या अभिप्रायानुसार १८७२ साली मुलींचा विवाहकाल १४ वर्षांचा असावा असा तीन नंबरचा कायदा करण्यात आला. या विवाह-कायद्याच्या चळवळीत आम्ही सर्वांनी भाग घेतला होता.

याच संधीला वा याच्या पूर्वी अगर नंतर आदिब्राह्मसमाजाचे माजी अध्यक्ष भक्तिभाजन राजनारायण बसू महाशयांचे 'हिंदुधर्माची श्रेष्ठता' या विषयावर व्याख्यान झाले होते. आणि या व्याख्यानाचे थोडक्यात विवरण 'टाईम्स' दैनिकाला पाठविण्यात आले. 'फ्रेंड ऑफ् इंडिया' पत्राचे त्यावेळचे संपादक व विलायतेतील 'टाईम्स' पत्राचे वार्ताहर रुट्लेज साहेब यांनी हे विवरण पाठविले होते. याचा परिणाम म्हणून इकडे व विलायतेला या भाषणावर चर्चा होऊ लागली. त्या व्याख्यानात राजनारायणबाबूंनी ब्राह्मधर्माला, उच्च हिंदुधर्म म्हणून प्रतिपादिले होते. उन्नतिशील दल या मताला विरोधी होते. केशवबाबूंनी मला व पंडित गौर-गोविंद राय यांना या विषयावर दोन प्रबंध लिहून ते वाचावे असा आदेश दिला. त्याप्रमाणे मी इंग्रजीत आणि गौरगोविंद बाबूंनी बंगालीत प्रबंध लिहून त्याचे जाहीर वाचन केले. या सभेचे अध्यक्षस्थान केशवबाबूंनी स्वीकारले होते.

## केशवचंद्र यांचा 'भारतआश्रम'

या कालातील सर्वप्रथम कार्य म्हणजे 'भारतआश्रमा'ची स्थापना. केशवबाबू इंग्लडला गेले त्यावेळी इंग्रजांचे कौटुंबिक कामकाज पाहून चकित झाले होते. इकडे आल्यावर ते नेहेमी म्हणत, 'मिडल क्लास इंग्लिश होमच्या धर्तीवर कोणतीही इन्स्टिटयूशन पृथ्वीवर दुसरी नाही.' त्यांना वाटले, कित्येक ब्राह्म कुटुंबियांना एकत्र ठेवून त्यांचे जेवण, विश्रांती, काम, उपासना यांची योजना— काही दिवसांपुरती का होईना—नियमबद्ध करून पद्धतशीर रीतीने वागणूक

ठेविल्यास त्याचा सर्व ब्राह्मंडळीवर परिणाम होईल व प्रचारही केला जाईल. आणि याच उद्देशाने त्यांनी 'भारतआश्रमा'ची स्थापना केली. त्यांचे प्रचार करणारे अनुयायी सर्वप्रथम भारतआश्रमात आले. त्यानंतर आमचीही बाहेरची अनेक कुटुंबे त्यांत गेली; केशवबाबूंची ही योजना कार्यवाहीत आणण्याचा आम्ही दृढसंकल्प केला.

भारतआश्रम स्थापन झाल्यावर केशवबाबू काळुटोलाचे घर सोडून आमच्या संगतीत येऊन राहू लागले. कलकत्त्यातील १३ नंबर मिर्जापूर स्ट्रीटवरील घरात (सध्या सिटी स्कूलच्या जमिनीवर असलेल्या हवेलीत) पहिले काही दिवस घालवून नंतर शहराबाहेरील काही काही बागबंगल्यात आम्ही जाऊन वसती करू लागलो. प्रथम बेलघेरियाच्या एका बागेत, नंतर कांकुडागाछीच्या एका बागेत काही दिवस मुक्काम केला. या सगळ्या जागी केशवबाबूंच्या पवित्र सहवासात राहण्याची आम्हांला सुसंधी मिळाली. प्रत्येकजण स्वतःच्या परिवाराचा खर्च देत असे व आम्ही एकत्र कुटुंबाप्रमाणे राहात असू. एकत्र भोजन, एकत्र बसणे उठणे, एकत्र फिरायला जाणे या सहकारितेमुळे आमचा तो काल फार आनंदात गेला. शहरात ज्यांचे काम असे ते दिवसभर बाहेर राहून वस्तीला निर्दिष्ट ठिकाणी येत. सकाळ सायंकाळच्या उपासनेत एकत्र असायचे आणि धार्मिक चर्चा व्हायची. प्रत्येक हालचालीत आम्ही केशवबाबूंच्या मार्गदर्शनाप्रमाणे वागत असू. त्यांच्या उपयुक्त सल्ल्याचा व सदुपदेशाचा आम्हां सर्वांना सहज् लाभ होई.

ब्राह्मधर्म प्रचारात सर्वस्वाला वाहून घ्यावे याच हेतूने मी भारतआश्रमात दाखल झालो होतो.प्रथम माझा असा बेत होता की, कॉलेजची परीक्षा पास झाल्यावर वकिली करावी आणि त्यासाठी वकील मित्रांचा सल्ला घेऊन तीन वर्षे 'लॉ क्लास' जॉईन केला होता. आणखी असे आठवते की, बी. एल्. परीक्षा देण्याचे मला आणखी एक कारण होते. त्यावेळच्या लै. गव्हर्नरनी, संस्कृत कॉलेजचे प्रिन्सिपाल प्रसन्नकुमार सर्वाधिकारी महाशय यांना सांगितले होते, 'मला ज्युडिशिअल सर्व्हिससाठी तुमच्या कॉलेजातील मुलांची गरज आहे. कारण ते ( तुमच्या कॉलेजचे विद्यार्थी )'हिंदू लॉ' या विषयात विशेष पारंगत असतात.' त्यानंतर सर्वाधिकारी महाशयांनी येऊन आम्हांला बी. एल्. परीक्षेला बसण्यास प्रोत्साहन दिले. शिवाय माझ्या आदरणीय मामांनीही मला याविषयी आग्रह केला, आणि त्यामुळेच 'लॉ लेक्चर्स'ला मी आस्थेने उपस्थित राहू लागलो. पण बी. ए. पास होताच माझे लक्ष दुसरीकडे वेधले. मी केशवबाबूंचा अनुयायी बनून, ब्राह्मधर्म प्रचारासाठी माझे आयुष्य खर्चीन असा निश्चय करण्याचा उत्कट विचार माझ्या मनात उद्‌भवला. इतकेच नव्हे तर एका गुप्तपत्राने मी तसे केशवबाबूंना कळवूनही बसलो. ते मला म्हणाले, 'तू हळू हळू क्रमशः माझ्या कार्यात सहकारी हो. त्यानंतर काय होते ते पाहू.' नंतर मी १८७२ साली प्रारंभीच एम्. ए. परीक्षेत उत्तीर्ण होऊन 'शास्त्री' ही

पदवी घेतली आणि कॉलेजातून बाहेर पडलो. तोच त्यांनी नवीनच स्थापन केलेल्या महिला विद्यालयात मला अध्यापनाचे काम देऊन आश्रमात सहकुटुंब राहण्याचा आदेश दिला. मला वेतनरूपाने जे देण्यात येई ते, प्रचारक संघाचे कायमचे परिचारक श्रद्धेय कांतिचंद्र मित्र यांच्याकडे जमा केले जाई. माझ्या कौटुंबिक खर्चाची सर्व व्यवस्था ते पाहात. त्या बाबतीत मला काळजी वाहावी लागत नसे. अर्थात् त्यावेळी सगळे प्रचारक आणि त्यांच्याबरोबर मी अत्यंत दारिद्र्यात दिवस कंठीत होतो. तरीही केशवबाबूंच्या आश्रमातील (भारतआश्रम) सर्व कार्यात व उत्सवादि कार्यक्रमात जिवाच्या ओढीने मी लक्ष घालीत असे. मी आश्रमाला सर्वस्वी वाहून घेतले होते. आश्रमाच्या आविर्भावासंबंधाने मी त्यावेळी एक कविताहि केली होती, ती मला वाटते ' धर्मतत्त्व ' पत्रिकेत प्रसिद्ध झाली असावी.

त्या कालात केशवबाबू आणि त्यांची धर्मपत्नी या उभयतांचे जे साधुसदृश वर्तन व धर्मनिष्ठा मी पाहिली होती ती आयुष्यात विसरण्यासारखी नव्हती. प्रत्येक दिवशी दुपारच्या वेळी आश्रमवासिनी स्त्रियांना घेऊन शाळा चालविली जाई. मी त्या शाळेचा अध्यापक होतो. एके दिवशी केशवबाबू आपल्या पत्नीला उद्देशून मला म्हणाले, 'अहो, तुम्ही हिला इंग्रजी शिकवा ना!' अर्थात् त्यानंतर ती माझी विद्यार्थिनी बनली. ती स्वाभाविक सरळ बाळबोध वळणाची आहे हे केशवबाबू चांगले जाणत असत. त्यांनी विलायतेहून येताना कित्येक चिल्ड्रेन्स मॅगेझाईन व रीडिंग बुक्स आणिली होती. त्यांच्यांतील एक त्यांनी शिकविण्यासाठी मला दिले. मी हसून म्हटले, ' हे लहान मुलांचे पुस्तक आहे. ' त्यांनी उत्तर दिले, ' अरे, ती प्रथमच इंग्रजी शिकत आहे ना ? असेना का लहान मुलांचे पुस्तक. तू शिकवायला आरंभ कर म्हणजे ही मनाने किती लहान मुलासारखी आहे हे तुला कळून येईल. ' आणि मग त्याचे प्रत्यंतरही मला आले. तिच्या वाचायच्या पुस्तकात एका लहान मुलीचे चित्र होते, तिचे केस अतिशय कुरळे होते. मुलगी दिसण्यात मोठी सुंदर पण फार खोडकर. त्या चित्राबरोबरच तिच्या खोडकरपणाच्या अनेक गोष्टी होत्या. आचार्यपत्नीने आपल्या आयुष्यात असल्या खोड्या मुळीच ऐकल्या नसाव्यात. त्यामुळे त्या वाचून तिला फार राग आला. तिला ते चित्र पाहणे म्हणजे कपाळशूळ वाटू लागला. एके दिवशी वाचण्यासाठी म्हणून तिने ते पुस्तक उघडले तोच, तेच चित्र आले. ती खूप रागावली आणि स्वतःशीच म्हणाली, ' बाई ग ! किती दुष्ट मुलगी आहे ! पाहाताच राग येतो. ' तिचे ते आत्मगत भाषण ऐकून मी हसत म्हटले, ' कुणावर रागावता ? ते तर चित्र आहे ! आणि त्या सगळ्या कल्पित गोष्टी ! ! ' पण तिने माझ्या या सांगण्याकडे लक्षच दिले नाही. आपल्या द्वितीय कन्येचा उल्लेख करून तिने मला विचारले, ' मी काय माझ्या या मुलीचे केस कापून घेऊ ? हिचेही असेच कुरळे केस आहेत. तिला पाहाताच या चित्राची मला आठवण होते.' ते ऐकून मला हसूच आले.

आणखी एका दिवसाची एक घटना उल्लेखनीय वाटते. त्या दिवशी केशवबाबूंशी काही एका महत्त्वाच्या विषयावर त्यांच्या खोलीत चर्चा करण्यासाठी म्हणून गेलो होतो. वास्तविक ती त्यांची विश्रांतीची वेळ. पण पाहातो तो ते खोलीत दिसेनात. त्यांच्या पत्नीला विचारले, तेव्हा ती म्हणाली, ' मला कोणत्याशा कारणाने रागावलेली पाहाताच ते प्रथम बोलले, तूही रागावलेली दिसतेस ! नंतर स्वतःच्या खोलीतच ते डोळे मिटून स्वस्थ बसून होते. जणू काय पाषाणमूर्तीच. आणि मग उठून बाहेर निघून गेले. तुम्ही शोधाल तर बागेतील कोपऱ्यात असलेल्या एखाद्या झाडाखाली डोळे मिटून बसलेल्या स्थितीत ते तुम्हांला आढळतील.' ते तिचे गंभीरतेचे बोलणे ऐकून मी हसू लागलो. तेव्हा ती म्हणाली, ' हसता काय ? असे डोळे मिटून बसल्या बसल्याच त्यांनी मला सुधारली. माझ्याकडून काही अन्यायाची गोष्ट घडताच रागवायचे नाही की वैतागायचे नाही. डोळे मिटून पाषाणप्रतिमेप्रमाणे बसून राहायचे. मी तर त्यांची ती अवस्था पाहून लज्जेने चूर व्हायची. आणि यापुढे माझ्या हातून अशी चूक होऊ देऊ नको म्हणून वारंवार परमेश्वराच्या चरणाशी बसून कळवळून प्रार्थना करायची. '

तिने भाविकपणाने सांगितलेली ही हकीगत ऐकून मी मनाशी विचार करू लागलो, सर्वसाधारण लोकांत जे इतक्या तेजस्वी वृत्तीने वागतात, वक्तृत्वात जे अग्निज्वाला-उद्‌गीरण करतात, ज्यांच्या माणुसकीच्या प्रभावाने धरणी कंपायमान होते ते आपल्या घरात इतक्या संयमाने वागतात हे नवल नव्हे तर काय ? आणि खरे सांगायचे म्हणजे केशवबाबूंची आत्मसंयमनशक्ती अत्यंत अद्‌भुत होती. वाद-विवादात, तर्क-वितर्क लढविण्यात आम्ही सर्व अत्यंत चिडखोर बनतो, रागाने खवळतो; पण केशवबाबू धीरस्थिर वृत्ती दाखवून स्वपक्षाचे समर्थन करण्यात यशस्वी होतात. अन्तःकरणात कदाचित् ते खवळून जात असतील; पण बाहेर सागरासारखे गंभीर ! मात्र मर्मवेधक उक्तीने श्रोत्यांना कानपिचक्या देण्यात ते अत्यंत कुशल. पुष्कळ दिवस त्यांच्या समागमात एकत्र राहिल्यामुळे एकदोन वेळ चिडलेले व संतापलेले असे मी त्यांना पाहिले आहे. बाकी नेहमीच्या वागणुकीत आणि बोलण्या-सवरण्यात नेहमीच ते मूर्तिमंत संयमाची मूर्ती म्हणूनच मी त्यांना जाणले व संयमाचा आदर्श मानले आहे. इतकेच नव्हे तर याची आठवण झाली म्हणजे हृदय उचंबळून येते आणि स्वतःची दैनंदिन वागणूक पाहून लाज वाटल्यावाचून राहात नाही. त्यांच्या संयमाचा हा दृष्टांत चिरस्मरणीय असाच होऊन राहिला आहे. शेवटी इतकेच सांगावयाचे की, केशवबाबूंच्या खोलीतून बाहेर पडून बागेत जेव्हा मी त्यांना शोधू लागलो तेव्हा खरोखरच कोपऱ्यातील एका वृक्षाखाली डोळे मिटून ध्यानस्थ बसलेले ते मला आढळले.

आचार्यपत्नीचा साधा सरळ स्वभाव व माझ्यावरील निष्कपट ममता याचे एक उदाहरण दिल्याशिवाय राहवत नाही. येथेच ते सांगून टाकतो. मी एके दिवशी

शाळेत शिकविताना पाहिले तर ती दिलेला अभ्यास करून आलेली मला दिसली नाही. म्हणून तिला म्हटले, ' दुपारच्या जेवणानंतर तुम्ही आपल्या खोलीत झोपता त्यावेळी आपल्या पतिराजांकडून कठीण वाटणारा अभ्यास शिकून घेतला असता तर तो अगदी सहज तयार झाला असता.' माझ्या या सांगण्याप्रमाणे दुसऱ्या दिवशी दुपारच्या विश्रांतीच्या वेळी अभ्यास करायला ती बसली. केशवबाबू तिला बारीकसारीक अर्थविवरण व त्यातील हेतू सांगू लागले. इतक्यात आचार्यपत्नी बोलून गेली, ' जा. जा. तुम्हाला शिवनाथ बाबूंसारखे शिकवताच येत नाही.' या तिच्या बोलण्यावर केशवबाबू खूप मोठ्याने हसू लागले. त्याच्या दुसऱ्याच दिवशी ती दोघे पतिपत्नी एकत्र आहेत अशावेळी काही कामानिमित्त म्हणून मी तेथे गेलो. मला पाहताच केशवबाबू हसून म्हणाले, ' शिवनाथ, तू माझ्या समक्ष हिला शिकव पाहू. तू असा काही शिकवतोस म्हणे की, माझे शिकविणे हिला रुचतच नाही. मला म्हणते, तुम्हांला शिवनाथबाबूंसारखे शिकवताच येत नाही !' मी हसून उत्तर दिले, ' यांचे सांगणे आपण जाणले नाही. अहो माझ्यावर यांची इतकी ममता आहे की मी जे काही करीन ते यांना आवडतेच. या सर्वोत्कृष्ट उपदेशक म्हणून आपणाला ओळखतात तर मला सर्वोत्कृष्ट शिक्षक मानतात. ते काही असेना का, आपल्या तोंडचे हे शब्द ऐकून माझ्या श्रमाचे सार्थक झाले असे मला वाटते.'

या भारतआश्रमात राहात असताना, आचार्यपत्नीची पतिभक्ती आणि बालसुलभ सरळ साधा भाव याचे एक निदर्शन माझ्या पाहण्यात आले तेही येथे सांगून टाकणे बरे. आश्रम स्थापन झाल्यानंतर तो काही दिवस १३ नं. मिर्जापूर-स्ट्रीट भवनात होता. त्यावेळी पोक्त स्त्रियांचे विद्यालय सुरू झाले नव्हते. त्यावेळी केशवबाबूंनी खिस्तीधर्म प्रचारिका कुमारी पिगट हिला विनंतीपूर्वक म्हटले होते, की तुम्ही आठवड्यातून काही दिवस सायंकाळच्या वेळी येऊन आश्रमात राहणाऱ्या स्त्रियांत येऊन बसावे, त्या काय शिकतात हे पाहावे आणि त्यांना निरनिराळ्या प्रकारचा हितोपदेश करावा.' कुमारी पिगट ही केशवबाबूंना मानीत असे आणि त्यांच्यावर तिचा श्रद्धाभावही होता. म्हणून त्यांची ही विनंती तिने मान्य केली आणि ती आश्रमात येऊ लागली. एके दिवशी स्त्रियांशी इकडच्या तिकडच्या गोष्टी बोलताना ती म्हणाली, ' ज्यांनी खिस्त धर्म स्वीकारला नाही त्यांना अनंत-काल नरकवास भोगावा लागेल अशी माझी खात्री आहे. विश्वास आहे.' आचार्यपत्नी त्यावेळी त्या ठिकाणी होती. तिने ते शब्द ऐकताच ती चमकून म्हणाली, ' आई ग ! हे काय आणखी ? ज्याची सरळ सरळ श्रद्धा नाही, त्याला अनन्तकाल नरकवासाची शिक्षा ? ' कुमारी पिगटने उत्तर दिले, ' होय. आमच्या धर्मात तसे सांगितले आहे. इतकेच काय पण तुमच्या पतींनीही जर खिस्तीधर्माचा स्वीकार केला नाही, त्या धर्माची दीक्षा घेतली नाही तर त्यांनाही ही नरकवासाची शिक्षा भोगावी लागेल.' हे उत्तर ऐकताच आचार्यपत्नीचा चेहेरा अत्यंत गंभीर

झाला. तिच्या नेत्रांतून एकसारख्या अश्रुधारा वाहू लागल्या. थोड्याच वेळातती तिथून उठून आपल्या खोलीत गेली. त्यानंतर कुमारी पिगटजवळ ती आलीही नाही. मी समजावून सांगितले तरी ती आली नाही आणि केशवबाबूंच्या समजावण्यानेही ती येऊ शकली नाही. ती म्हणाली, 'कुमारी पिगटचे तोंडही मी यापुढे पाहणार नाही.' तिला किती समजावण्यात आले की, खिस्तीधर्मात जे आहे ते तिने सांगितले. केशवबाबूंबद्दल तिरस्कार व्यक्त करावा म्हणून ती बोलली नाही.' पण ती कुणाचे काही ऐकूनच घेईना. पुढे काही दिवसांनी मला वाटते कुमारी पिगटशी तिचे पुनर्मीलन झाले असावे.

## द्वितीय पत्नीचे आगमन

याच काळात माझ्या कौटुंबिक जीवनात एक मोठे परिवर्तन झाले. माझी द्वितीय पत्नी विराजमोहिनी हिला माझ्याकडे आणावे लागले. यापूर्वी दोन वर्षे तिचे आईवडील, भाऊबहिणी वगैरे निकटची माणसे अकाली वारली होती. ती एकटीच चुलत्याकडे राहू लागली. चुलत्याला तो एक बोजाच वाटला. त्यानंतर तिच्या त्या चुलत्याने, माझ्याकडे येऊन तिला तुम्हीं आपल्याकडे आणा असा आग्रह चालविला. तिचा पुनः विवाह करून द्यावा या इच्छेने मी अनेकदा तिला आणण्यासाठी त्यांच्याकडे गेलो असता, मला निराश होऊन तसेच परत यावे लागले होते. आणि मग मी तिला आणण्याचा नाद, काही काल सोडून दिला होता. यावेळी तिच्या चुलत्याच्या विनंतीमुळे मला माझ्या प्राप्तकर्तव्याची तीव्रतेने जाणीव झाली. पण माझे कित्येक ब्राह्ममित्र माझ्या या प्रयत्नाला विरोध करून म्हणाले, 'ब्राह्म मनुष्याने दोन्ही पत्नींसह एकत्र राहणे अयोग्य आहे. शिवाय ब्राह्म-धर्मात बहुविवाह प्रथा वर्ज्य. तसल्या विवाहाला विरोध करणे हेच आमचे मुख्य काम. मग तुम्ही जर दोन्ही पत्न्यांसह एकत्र राहू लागला तर त्या बहु विवाहाच्या प्रथेला विरोध कसा करणार?' मी म्हटले, 'मी काही दोन पत्नींसह संसार थाटावा म्हणून तिला आणतो असे नव्हे. तिचे आई-वडील वारल्यानंतरही तिला मी आश्रय देऊ नये याचा अर्थ काय? यांत तिचा काय अपराध? बहुविवाहाचा हा अपराध मी केला आहे; तिने नव्हे. मी तिला आणून लिहिणेवाचणे शिकविणार. आणि तिला मान्य असेल तर तिचा दुसरा विवाह करून देणार, या हेतूने मी तिला आणीत आहे.' या मतभेदाच्या कोड्यातून सुटण्यासाठी मी केशवबाबूंना शरण गेलो. त्यांनी विराजमोहिनीला आणण्याचा सल्ला देऊन मला म्हटले, 'ज्या देशात बाल-विवाह चालतो तेथे बहुविवाह पद्धतीत मुलींचा अपराध कोणता? कोणी एखादा दहा जणींशी विवाह केलेला मनुष्य जर ब्राह्म झाला तर त्या दहाही जणींना त्याने आश्रय दिलाच पाहिजे. इतकेच नव्हे तर तसे न केल्यामुळे त्या स्त्रियांपैकी एखादी भलत्या संकटात पडली तर तो त्याला जबाबदार आहे!'

## पत्नीचा पुनः विवाह करून देण्याचा विचार

मी प्राप्तकर्तव्य म्हणून १८७२ सालच्या मध्यकाली विराजमोहिनीला आणायला गेलो. तिला पत्नी म्हणून मी स्वीकारणार नाही; पण तिचा पुनर्विवाह होईपर्यंत रक्षणाची व शिक्षणाची व्यवस्था करीन अशा बेतानेच मी तिला आणायला गेलो होतो, असे मला पक्के स्मरते. आश्रमात ठेवायची आणि महिला विद्यालयात दाखल करावयाची अशी योजना. नंतर ती पुनर्विवाह करण्याला तयार झाली नाही तर लिहायला वाचायला शिकल्यावर तिला एखादे चांगले काम देता येईल ती सुखी होईल व तिला आत्मरक्षणही करता येईल, या विचाराने मला मनोमन आनंद झाला. तिच्या कल्याणाकरिता जे काही मला करता येईल ते करावयाचे हा माझा हेतु प्रसन्नमयीला मी समजावून सांगितला होता. अशा तऱ्हेने तिला आणल्यावर आश्रमात प्रसन्नमयीजवळ ठेविले. विराजमोहिनीचे वय त्यावेळी १४।१५ वर्षांचे असावे. तिला मी सांगितले, 'मी आतापर्यंत पत्नी म्हणून तुझा स्वीकार केला नाही त्याचे कारण असे, तू मोठी झाल्यावर, तुला समजू लागल्यावर तुला जर दुसऱ्या कोणाशी विवाह करावासे वाटले तर तसे करून देईन. तसे नसेल आणि तू चांगली शिकली सवरलीस व तुला एखाद्या चांगल्या कामाला वाहून घ्यायची इच्छा झाली तर तसे तुला करता येईल. त्यासाठीच तुला मी शाळेत दाखल करीत आहे. तू आता चांगले लिहिणे—वाचणे शीक.' असे सांगून तिला स्कूलमध्ये दाखल केली. पण तसे दाखल करून काय उपयोग? माझे बोलणे ऐकून ती चमकलीच. 'आई ग! स्त्रियांचा असा कितीदा विवाह होतो?' असा तिचा मनोभाव व्यक्त झाला. पुनर्विवाहाकडे स्त्री ही किती तिरस्कृत भावनेने पाहते याचे हे निदर्शन होते. ते पाहून मी मनोमन उभारलेला माझा डोलाराच कोलमडून पडला. मस्तकात संचारलेले भूत पार उतरले. अर्थात् माझ्या योजनेतील दुसरा भाग म्हणजे तिला शिक्षण देणे हेच मला कार्यवाहीत आणावे लागले.

## दांपत्यजीवनातील अडथळा

इतके झाले तरी दुसऱ्या एका बाबतीत माझी कसोटी पाहण्याचे परमेश्वराने ठरविले. ती एक माझी परीक्षाच ठरली. प्रसन्नमयी आणि विराजमोहिनी जेव्हा एकाच ठिकाणी एकत्र राहू लागल्या, आणि विराजमोहिनीला पत्नी म्हणून स्वीकारणे मी वर्ज्य केले तेव्हा व्यवहार या दृष्टीने प्रसन्नमयीपासूनही मला वेगळे राहणे भाग पडले. प्रसन्नमयीशी पुष्कळ दिवस चालू असलेला पतिपत्नी संबंध तसाच पुढे चालविणे अयोग्य वाटू लागले. हेमलता, तरंगिणी आणि पुत्र प्रियनाथ अशी तीन मुले संसारात नांदत होती. आश्रमात, शाळेची जागा व केशवबाबूंची ऑफिसची जागा आणि मला राहण्यासाठी दिलेल्या दोन खोल्या

याखेरीज जास्त जागा नव्हती. रात्री प्रसन्नमयीच्या खोलीत मी न झोपावे तर कुठे झोपणार? दूर कुठे तरी झोपायला जावे तर तेही माझ्या दृष्टीने योग्य वाटेना. प्रसन्नमयींलाही क्लेशकारकच वाटणार. शेवटी प्रसन्नमयीला समजावून तिचा निरोप घेतला आणि आश्रमाच्या आवारात मोकळी जागा मिळेल तिथे झोपू लागलो. योगायोगाने यातून एक उपाय निघाला. हिंदू कॉलेजच्या व्हरांड्यात कारकुनांचे एक टेबल मोकळेच पडलेले असे. रात्री त्याचा उपयोग केला जात नसे. रात्री जेवण आटोपताच एक पुस्तक घेऊन त्या ठिकाणी मी जायचा आणि ते पुस्तक उशाखाली घेऊन टेबलावर आराम झोपी जायचे, असा क्रम सुरू केला. तलावाच्या मैदानावरून येणाऱ्या वाऱ्यामुळे चांगली झोप लागत असे. सकाळीच उठून स्नान वगैरे आटोपल्यावर केशवबाबूंकडे उपासनेत सामील होई, मित्रमंडळीत जेवण होत असे आणि जेवणानंतर महिला विद्यालयात शिकवायला जाई. सायंकाळी मित्रमंडळीत धार्मिक चर्चा चाले. तेथे वेळ घालवी आणि सायंकाळनंतर रात्रीचे जेवण आटोपताच हिंदू कॉलेजच्या व्हरांड्यात टेबलावर झोपायला जाई. तिथे माझा वेळ फार चांगला जात असे. मध्यरात्री त्या निर्जन जागी ईश्वरचिंतनात मी वेळ घालवीत असे. मात्र उजाडण्यापूर्वी मला उठावे लागे. उषःकालचा तो ब्राह्म-मुहूर्त मला फार प्रशंसनीय वाटे.

मला असे वाटे की, मी रात्री गोलदिघीच्या ( वाटोळा तलाव ) बाजूला टेबलावर झोपत आहे हे कुणालाच कळत नसावे. पण काही दिवसांतच प्रसन्नमयी आणि विराजमोहिनी यांनी तो शोध लावला. मी कसा कुठे झोपतो हे त्यांना कळले. झोपण्याच्या जागेच्या अभावी हिंदू कॉलेजच्या व्हरांड्यात पडून मी रात्र घालवितो हे पाहून प्रसन्नमयी तर रडूच लागली. विराजमोहिनीला वाटले, ' आपणच यांच्या या दुःखकष्टाला कारण. ' या विचाराने ती अत्यंत खिन्न होऊन वेळीअवेळी रडत असे.

## स्त्रीस्वातंत्र्याची चळवळ

याच वेळी आणखी माझे श्रद्धेय मित्र नगेंद्रनाथ चट्टोपाध्याय महाशय आपली नोकरी सोडून कृष्णनगरहून प्रचारकदलात सामील होण्यासाठी आले. त्यांचे अशारीतीने येण्याचे जेव्हा निश्चित झाले त्या दिवशी कांतिचंद्र मित्र महाशयांशी केशवबाबूंचे जे बोलणे झाले त्या बोलण्याच्या वेळी मीही तेथे उपस्थित होतो. त्या दिवशीचे ते बोलणे मी कधीच विसरलो नाही. कांतिबाबू येऊन म्हणाले, ' नगेंद्र येतो म्हणत आहे काय करावे ? '

' ते तर उत्तमच. येऊ देत त्यांना, काय आणि कसे याची का काळजी करता ? आणखी करायचे आहे काय ? ' केशवबाबू म्हणाले. यावर ' चालायचे कसे ? ' असा कांतिबाबूंनी प्रश्न केला. ' तो विचार करण्याचा तुला काय अधिकार ?

जो त्याला आणीत आहे तोच त्याची काळजी वाहील.' केशवबाबू शांतपणाने म्हणाले.

त्यांचा असा हा निर्भय आणि श्रद्धाळू भाव अनेक ठिकाणी, अनेक प्रसंगीं प्रकट झालेला मी पाहिला आहे. नगेंद्रबाबू कृष्णनगर येथे आपल्या आईला ठेवून एक मुलगा आणि पत्नी यांच्यासह आश्रमात आले.

पण आल्यावर अल्पकालातच केशवबाबूंच्या अनुयायी प्रचारकदलाशी नगेंद्रबाबूंचे आणि माझे पटेनासे झाले. आमच्याबद्दल त्यांना आस्था वाटेना.

माझ्याबद्दलची त्यांची आस्था नाहीशी होण्याची कारणे दोन. पहिले कारण यावेळी स्त्रीस्वातंत्र्याची चळवळ सुरू झाली. १८७२ साली माझे मित्र द्वारकानाथ गांगुली, दुर्गामोहन दास, रजनीनाथ राय, अन्नदाचरण खास्तगीरप्रभृती कित्येक ब्राह्मतरुणांनी केशवबाबूंना सांगितले कीं, आम्ही आमच्या स्त्रियांना घेऊन उपासना मंदिरात पडद्याबाहेर बसू इच्छितो. स्त्रियांना पडदा नको. आणि केवळ एवढे बोलूनच ते राहिले असे नाहीत, तर निश्चित असे काही ठरण्यापूर्वीच एके दिवशी अन्नदाचरण खास्तगीर आणि दुर्गामोहन दास आपापल्या पत्नी व मुली यांसह पडद्याबाहेर साधारण उपासक मंडळीत येऊन बसले. असे कित्येकदा ते बसल्यावर उपासक मंडळीतील निरनिराळे सभासद याबद्दल प्रतिवाद करू लागले. आपसात चळवळ सुरू केली. आणि त्याची मजल इतकी दूरवर पोचली की, त्यांनी केशवबाबूंना सांगून टाकले, अशा मंडळींनी मंदिरात येण्याचे बंद केले पाहिजे. शेवटी पडद्याबाहेर येऊन बसणाऱ्या महिलांना तसे करू नका असे सांगण्यात आले. त्यामुळे पुढारलेले अतिसुधारक लोक रागावले. केशवबाबूंना तर ही आपत्तीच वाटली. या दोन पक्षांत एकी कशी होईल याचीच ते काळजी करू लागले.

स्त्रीस्वातंत्र्यवादी दल, होत असलेला विलंब सहन करायला तयार नव्हते. मंदिरात येण्याचे त्यांनी बंद केले आणि प्रथम बहुबाजार स्ट्रीटवरील खास्तगीर यांच्या घरी आणि नंतर दुसऱ्या एका ठिकाणी उपासना करायला सुरवात केली. त्यांनी एकदा महर्षींना (देवेन्द्रनाथ ठाकूर) आणूनही आपल्या नियोजित ठिकाणी उपासना चालविली. माझे मित्र द्वारकानाथ गंगोपाध्याय हे या दलाचे मुख्य नेते झाले. त्यांच्याबरोबर पुष्कळ दिवस मी एका घरात, एका कुटुंबात राहिलो होतो. मनोमन एकमेकात स्नेहही दृढ झाला होता. मी त्यांच्या पक्षाचा एखादा प्रचारक बनलो नाही हे खरे, पण त्यांच्याशी असलेला स्नेह संबंध मी सोडला नव्हता. स्त्रियांना पडद्याबाहेर बसविण्याला माझा विरोध नव्हता. उलट, त्या जर तशा तऱ्हेने बसण्याची इच्छा करीत असतील तर त्यांना बसू देणे योग्य, असेच मला वाटत होते. तरी द्वारिकाबाबूप्रमाणे, त्यांना तशा रीतीने बाहेर बसू दिल्यानेच

त्यांचा उद्धार होणार आहे असे मला वाटत नव्हते. त्यावेळीं माझी मनोभावना तशी होती, असो.

त्यांनी स्वतंत्र समाज स्थापन करून मला मधून मधून उपासना चालविण्यालाही बोलविले होते. असे मी केल्याने केशवबाबू माझ्यावर रागवोत वा न रागवोत पण त्यांच्या अनुयायांत माझ्याबद्दल असंतोष निर्माण होणारच; पण स्त्रीस्वातंत्र्यवादी पक्षाचे सर्व लोक माझे मित्र असून, त्यांचे माझ्यावर मनापासून प्रेमही होते. तेव्हा त्यांनी उपासनेला बोलविले तर मी ते निमंत्रण कसे नाकारणार? अर्थात मला त्याचे निमंत्रण स्वीकारावे लागले. आणि त्यांच्या पक्षीय मंडळीत जाऊन उपासना चालविण्याचा क्रमही मी ठेविला. प्रमुख प्रचारकाशी माझ्या मतभेदांचे हे एक मुख्य कारण होते.

शेवटी केशवबाबूंनी आपल्या उपासनामंदिरात स्त्रीस्वातंत्र्यवादी पक्षाच्या स्त्रियांना पडद्याबाहेर एका कोपऱ्यात बसण्याची व्यवस्था केली आणि मग विरोधी पक्षाने, आपली वेगळीक मोडून केशवबाबूंच्या मूळपक्षात सामिलीकरण केले. ते उपासनेला येऊ लागले.

## स्त्रीशिक्षणाच्या बाबतीत मतभेद

मंदिरात स्त्रियांना खुल्या मंडपात बसण्याच्या अधिकारासंबंधाने जो वाद होता तो आता मिटला होता खरा; पण स्त्रीशिक्षण आणि स्त्रियांचा सामाजिक अधिकार यासंबंधाने केशवबाबूंशी जो पुढारलेल्या दलाचा मतभेद होता तो असा सहजासहजी मिटण्यासारखा नव्हता. आश्रमात जे महिला विद्यालय होते, त्यात विश्वविद्यालयाच्या नियमानुसार स्त्रियांना शिक्षण देण्याला केशवबाबूंचा विरोध होता. इतकेच नव्हे तर भूमिती हा विषय शिकवावा की नाही यावरून त्यांच्याशी माझा वादविवाद झाला होता. भूमिती, लॉजिक आणि मेटाफिजिक्स हे विषय शिक्षणक्रमात अवश्य आहेत असे माझे मत होते. मी सांगितले होते, ' हे सगळे न शिकविले तर खऱ्या विचारशक्तीचा विकास होणार नाही. ' यावर केशवबाबू म्हणाले होते, ' ते विषय कशाला शिकवायचे? ' स्त्रियांना भूमितीच्या शिक्षणाचा काय उपयोग? त्यापेक्षा एलिमेंटरी प्रिन्सिपल्स ऑफ सायन्स हे विषय डायरेक्ट मेथडने शिकवावे. ' मी सायन्समध्ये मेंटल सायन्सचाही समावेश करीत होतो. त्या वेळी कॉलेजातून नव्या उमेदी व आशा घेऊन मी बाहेर पडलेला असल्यामुळे, मेंटल-सायन्स ही बाब मला विशेष आकर्षणीय वाटत होती. मग माझ्या विद्यार्थिनींना ते शिक्षण दिल्यावाचून राहतो थोडाच! मी तोंडी शिकवणीत तो विषय तर घेतच असे; पण लॉजिक या विषयावरही बोलत असे. विद्यार्थिनी आपल्या नोटवहीत ते सर्व लिहून घेत असत. अजूनही त्या नोट्स माझ्या काही जुन्या विद्यार्थिनींच्या संग्रहात असण्याचा संभव आहे. माझ्या त्यावेळच्या मुख्य विद्यार्थिनी

तीन होत्या. राधाराणी लाहिडी, सौदामिनी खास्तगीर. ( पुढे ती मिसेस बी. एल्. गुप्त या नावाने प्रसिद्धीला आली. ) आणि प्रसन्नकुमार सेनची पत्नी राजलक्ष्मी सेन. या तिघीही जणी त्यावेळी पूर्ण वयात आलेल्या असून यांना शिक्षणाची विशेष अभिरुचीही होती. त्यामुळे यांना शिकविण्यात मला फार आनंद वाटत असे.

## केशवचंद्रांचा आदेश म्हणजे ईश्वराचाच आदेश काय ?

स्त्रीस्वातंत्र्याची चळवळ आणि स्त्रीशिक्षणासंबंधी मतभेद याखेरीज माझ्यावर केशवबाबूंचा राग असण्याचे आणखी एक कारण होते. मी केशवबाबूंच्या काही काही मतांवर शंका उपस्थित करीत असे. या शंका व त्यावर माझे बोलणे केव्हा केव्हा केशवबाबूंच्या समक्षही होत असे. केशवबाबू आपली सर्व कृत्ये ईश्वराच्या आदेशाप्रमाणे होत आहेत असे म्हणत. ते म्हणत, ' माझी सर्व कृत्ये ईश्वरी आज्ञेने होत असतात आणि सर्वांनी त्याप्रमाणे वर्तन केले पाहिजे. ती आज्ञा मानली पाहिजे. ' मला यात अशी भीती वाटे की, यामुळे त्यांच्या संगतीत असलेल्यांचे विचारस्वातंत्र्य कुंठित होईल. त्यांच्या विचारशक्तीला स्वातंत्र्य राहणार नाही. त्यांचा आदेश ईश्वरी आदेश म्हणून सर्वांनी मानला पाहिजे किंवा स्वतःचे हातपाय बांधून त्यांना समर्पित झाले पाहिजे. मी केशवबाबूंना म्हणत असे, 'तुम्ही स्वतः तो ईश्वरी आदेश आहे म्हणून त्याच्यापुढे मान वाकवा आणि त्याप्रमाणे वागा, पण इतरांकडून तशी वर्तणूक होत आहे की नाही, आम्ही सर्व त्याप्रमाणे वागत आहो की नाही इकडे लक्ष देऊ नका.' पण माझ्या या हरकतीकडे ते मुळीच लक्ष देत नसत. त्या ऐकूनही घेत नसत. याबाबतीत मी त्यांच्याशी तोंडी आणि पत्राने पुष्कळ वादविवाद केला. तर्कही लढविले. मनुष्याला विचारस्वातंत्र्य असावे हाच माझा मुख्य मुद्दा होता. आणि तो राखावा म्हणून मी बद्धपरिकर झालो होतो. त्यांना मी सांगत असे, ' महर्षि देवेंद्रनाथ हे आपले प्रत्येक काम ईश्वरी आज्ञेप्रमाणे होत आहे असे मानून चालतात. ते केव्हाही त्याबाबतीत इतरांवर सक्ती करीत नाहीत; इतरांनी त्यांचे विचार मानले नाहीत तर ते त्यांचा द्वेष करीत नाहीत. रागवतही नाहीत. '

केशवबाबूंनी जेव्हा आश्रम स्थापन केला, तेव्हा मी हे कार्य ईश्वराच्या आदेशाप्रमाणे केले आहे असे ते म्हणाले. इतकेच नव्हे तर सर्व ब्राह्म समाजाने हा आदेश मानला पाहिजे असे आवाहनही त्यांनी केले. ते आवाहन मानून जे त्यांच्यात सामील झाले नाहीत त्यांच्यावर ते या नाही त्या कारणाने रागावू लागले व द्वेषही करू लागले. प्रथम प्रथम सर्वांना ही त्यांची सक्ती असह्य वाटली. इतकेच काय पण माझ्या आठवणीप्रमाणे सांगायचे तर श्रद्धेय प्रतापचंद्र मजुमदार महाशयही प्रारंभी हा ईश्वरी आदेश मानायला तयार होतना. आम्ही सहपरिवार आश्रमात गेलो पण ते ' इंडियन मिरर ' मध्येच गुंतून राहिल्यामुळे आश्रमात

येऊ शकले नाहीत. आश्रमाच्या ईश्वरी आदेशाची आपण घोषणा केली तर इतर लोकांत— ब्राह्म समाजात— विरोध उत्पन्न होईल, अशी त्यांना भीती वाटली. मला पक्के आठवते, मी वेलघेरिया व कांकुडगाछी येथील उद्यानगृहातून येऊन कलकत्त्यात त्यांची भेट घेतली तेव्हा मला उपरोधिक स्वराने ते म्हणाले, 'काय हो, तुमचे स्वर्गराज्य कुठपर्यंत आले?' जरी पुढे त्यांनी स्वतः होऊन आमच्यात येऊन वेगळीक काढून टाकली होती तरी काही दिवस प्रचारकांकडून त्यांची निंदा व तिरस्कार झालाच.

नगेंद्रबाबूंवर प्रचारकांचा रोष होण्याचे आणखी एक कारण होते. त्यांना त्यावेळी एकप्रकारच्या डोकेदुखीने ग्रासले होते. ते त्या त्रासाने लोकांत मिसळणे-बोलणे कधीकधी टाळीत असत. एकटे एकटे राहण्याने त्यांना आराम वाटे. किंवा अगदी खास मित्रांशी बोलण्यात वेळ घालवीत. आश्रमाच्या उपासनेस ते उपस्थित असत हे खरे, पण इतर वेळी अनेकदा प्रचारक मंडळीशी विचार विनिमय करण्याला बसण्याचे ते टाळीत असत. प्रचारक मंडळी ज्यावेळी दहाजण मिळून केशवबाबूंशी गोष्टी बोलत व त्यांचा उपदेश ऐकत तेव्हा नगेंद्रबाबू स्वतः प्रिय मित्र प्रख्यात रामकृष्ण मुखोपाध्याय यांच्या घरी पडल्या पडल्या त्यांच्या तोंडच्या ज्ञानोपदेशपूर्ण कथावार्ता ऐकण्यात गुंगून जात. नगेंद्रबाबूंचा आणखी एक नर्व्हसनेस असा होता, की त्यांच्या विरुद्ध कोणी चर्चा करू लागला तर त्याच्याकडे ते जात नसत. आणि अशा रीतीने दिवसेंदिवस नगेंद्रबाबू व प्रचारक महाशय यांच्यातील वेगळीक वाढत आहे असे माझ्याही दृष्टोत्पत्तीस आले. मी अनेकदा त्यांना सांगत असे, 'ज्यांच्याबरोबर काम करण्यासाठी म्हणून तुम्ही आला आहा त्यांच्याशी असे फटकून वागणे योग्य नाही.' पण असे सांगून काय उपयोग? मनुष्याचा स्वभाव असा अल्पावधीत थोडाच बदलणार!

ते एकटेच फिरायला जात. पुष्कळदा कसल्यातरी गंभीर चिंतनात ते गढून गेलेले दिसत. एका दिवसाचा प्रसंग मला आठवतो. त्या दिवशी आम्ही सगळे कांकुडगाछी बागेत असलेल्या भारताश्रमात जमलो होतो. सायंकाळची उपासना आटोपल्यावर केशवबाबूंशी सगळ्यांचेच निरनिराळ्या विषयांवर बोलणे-चालणे चालले होते. तितक्यात 'नगेंद्रबाबू कुठे आहेत?' असे केशवबाबूंनी विचारले. लगलीच नगेंद्रबाबूंची शोध-चौकशी सुरू झाली. तेव्हा कळले की ते सायंकाळपासूनच कुठे दिसले नाहीत. रात्रीचे सुमारे ९ वाजून गेले आणि मग चटोपाध्याय महाशय अवतीर्ण झाले. मी त्यांना गुप्तपणे एकांती बोलावून विचारले, 'आपला खूप तपास चालला होता. आपण होता तरी कुठे?' यावर त्यांनी उत्तर दिले, 'आज मनाला फारच उद्विग्नता वाटत आहे. म्हणून मी माणिकतला नाल्याच्या काठी तीन चार तास फिरण्यात घालविले. त्या स्थितीत एक पद्यरचनाही

झाली. तेच पद गात राहिलो.' त्यांनी मग ते पद मला गाऊन दाखविले. ते पद असे :

आमि कि बले प्रार्थना बल करि आर !

( मी कोणत्या शब्दांत तुझी प्रार्थना करावी ते तरी सांग. )

आमार सकल कथा फुराइल, फिरिल ना मन आमार !

( माझे सगळे बोलणे सांगणे संपले पण मनाचा काही पालट होईना. )

तुमि देख सब थेके अंतर, तुमाय कथाय के भुलाते पारे

( तू अंतःकरणात राहून सर्व पहातोस, तुला शब्दांनी कोण भुलवू शकेल ? )

प्राणेर प्राण, बलब कि आर, कि आर आछे बलिबार !

( प्राणाचाही प्राण तू ! काय सांगू आणखी ! आणखी सांगायचे तरी काय राहिले आहे ? )

ओ हे, प्राण यदि चाहे तो मार, तुमि थाकिते कि पार दुरे ?

( देवा, खरोखर प्राण जर तुझी इच्छा करीत असेल तर तू दूर कसा राहशील ? )

आपनि एस पापीर द्वारे, ताइ पतितपावन नाम तोमार ।

( आपण होऊन तू पाप्याच्या दाराशी येतोस. आणि म्हणूनच तुझे पतितपावन हे नाव आहे. )

हे पद ऐकले आणि मला वाटले, नगेंद्रबाबू सायंकाळच्या वेळी आमच्यात न मिसळता एकटेच राहिले हे उत्तम झाले. पण प्रचारक लोक नेहमीच असे मानायला तयार नव्हते. ते मनात म्हणत, ' नगेंद्र जर आमच्या बरोबरीने काम करायला आले आहेत तर आम्ही जे करतो अगर जसे वागतो तसेच त्यांनीही वागले पाहिजे.' पुढे पुढे ते नगेंद्रबाबूंवर जास्तच रागावू लागले. आणि या बाबतीत त्यांचे माझे वाद-विवादही होऊ लागले. मी नगेंद्रबाबूंचा पक्ष घेऊन त्यांच्याशी तर्क-वितर्क करू लागलो. आणि मग तेही ' आळशाचा पाठिराखा ' म्हणून माझा तिरस्कार करू लागले.

### नेमनियमाच्या पद्धतीबद्दल मतभेद

आणखी एका बाबतीत मतभेदाची पाळी आली. केशवबाबू इंग्लंडहून आल्यावर त्यांनी ज्या वेगवेगळ्या योजना आखल्या, त्यात भारतातील ब्राह्म-मंदिरात येणाऱ्या उपासकांना बोलावून त्यांत संघटितपणा आणण्याचा प्रयत्न करणे ही एक होती व तसा ते प्रयत्न करू लागले. पण उपासक मंडळींना बोलविताच ते स्वतंत्रपणे आपापले मत व्यक्त करू लागले. अनेक विषयांत मतभेद आणि तर्कवितर्क उपस्थित होऊ लागले. उपासकांच्या कार्यपद्धतीत नियमबद्धता असावी

व तसे नियम तयार व्हावे याविषयी तरुण मंडळीपैकी अनेकांना उत्सुकता वाटू लागली. त्यांची तशी इच्छा असणे स्वाभाविक असले तरी केशवबाबूंना हे पसंत नव्हते असे वाटते. कारण थोड्याच दिवसांत उपासकमंडळीपैकी काही काहींना मधून मधून बोलाविण्यात येत असलेले रद्द करण्यात येऊ लागल्याचे दिसू लागले. वर्षाच्या शेवटी एकदा सर्वजण संमेलनाप्रमाणे एकत्रित होत असत; एवढेच शेवटी शिल्लक राहिले. काम नियमबद्ध असावे असेही आम्हांला वाटत होते. पण ही आमची इच्छा एक वेळ जागृत होऊन पुन्हा भस्माच्छादित सुप्त झाली.

* * *

॰८॰

# ग्रामसुधारणेला स्वतःला वाहून घेतले.

## आजारी मामांचे बोलावणे—

या सगळ्या मतभेदांच्या वावटळी चालू असतानाच १८७३ सालच्या प्रारंभी माझे परमपूज्य मामा 'सोमप्रकाश 'चे संपादक द्वारकानाथ विद्याभूषण महाशय आजारी पडले आणि मला त्यांनी बोलावणे पाठविले. काही दिवसांपासून त्यांचे आरोग्य बिघडून ते अंथरुणाला खिळले होते. त्यांनी काम करण्याचेही सोडले होते. त्यांना काही करवतच नव्हते. लवकरच पेन्शन घेऊन संस्कृत कॉलेजातून सेवानिवृत्त व्हावे आणि हवाबदल करण्यासाठी बंगालच्या वायव्येकडील एखाद्या चांगल्याशा ठिकाणी जावे असा त्यांनी बेत केला होता. पण आपल्या 'सोमप्रकाश' साप्ताहिकाचे संपादकत्व, आपण स्थापन केलेले गावातील संस्कृत-इंग्रजी स्कूल, आपला सर्व व्यवहार, आपल्या परिवाराची देखभाल या सर्वांची जबाबदारी कोण स्वीकारणार! ही त्यांना काळजी पडली. त्यांच्या मुलांत हा भार व ही जबाबदारी पेलण्याची शक्ती नव्हती. मोठ्या मामांनी मला स्वतःच्या नजरेखाली वाढविले होते. शिक्षण दिले होते, हुषार केले होते. मी ही लहानपणापासून त्यांचे धार्मिक व नैतिक चरित्र डोळ्यांसमोर ठेवून पावले टाकीत असल्यामुळे, मला तेच सर्वश्रेष्ठ वाटत. आज मला जे स्वरूप आले होते ते यांच्यामुळेच. नाहीतर माझी काय अवस्था झाली असती देवालाच माहीत.

मामांनी मला बोलावून म्हटले, ' यावेळी तू येऊन माझी ही अनेकविध जबाबदारी स्वीकारली नाहीस तर मला काही हवापालट करण्यासाठी कुठे जाता येणार नाही. '

मी मोठ्याच संकटात पडलो. केशवबाबूंच्या सूचनेप्रमाणे एका कामाचा बोजा मी शिरावर घेतला आहे. आता मामांनी केलेली ही सूचना वा मागणी!

काय उत्तर द्यावे हे न सुचल्यामुळे मी तसाच काही न बोलता विचार करीतच कलकत्त्याला आलो. आल्यावरही तोच विचार चालू होता. नगेंद्रबाबू वगैरे मित्रांशी विचार-विनिमय केला. सर्वांनीच मामांना आधार दिला पाहिजे, ते तुमचे कर्तव्य आहे असे सांगितले. शेवटी खूप विचार आणि मनन केल्यावर केशवबाबूंकडे जाऊन त्यांना म्हटले, ' नव्या वर्षाचा आरंभ होत आहे. यावेळी महिला स्कूल-मध्ये शिकविण्याचे माझे काम आपण दुसऱ्या कोणालाही देऊ शकाल. तेव्हा तशी आपण व्यवस्था करावी. मला माझ्या मामांच्या साहाय्याला जाणे भाग आहे.' यावर ते काही बोलले नाहीत. मनातल्या मनात ते असंतुष्ट झाले की काय तेही त्यावेळी मला कळले नाही. नंतर मला कळले की मी अशा रीतीने जावे हे त्यांना पसंत नव्हते. प्रचारकार्यात सर्व आयुष्य घालविण्याचा संकल्प करून मी आलो असताना घरगुती व्यवहाराच्या निमित्ताने मी परत जावे हे त्यांना आवडले नाही. असो.

मी मामांच्या कार्यव्यापाला हातभार लावण्यासाठी हरिनाभी येथे आजोळी गेलो. गेल्यानंतर 'सोमप्रकाश'चे संपादकत्व, शाळेची व्यवस्था व हेडमास्तर, इस्टेटीचा कारभार आणि त्यांच्या कुटुंबपरिवाराची देखभाल या सर्व गोष्टी मी माझ्या हाती घेतल्या. मामाही माझ्याकडे हे सर्व अधिकार देऊन निश्चितपणाने काशीला गेले.

एक दोन दिवसांत केशवबाबूंनी मला बोलावणे पाठविले व त्यांच्याकडे जाताच ते मला म्हणाले, ' तुमच्या दोन्ही पत्नींना ज्या तऱ्हेने आश्रमात ठेविले आहे त्या तऱ्हेने आता यापुढे त्यांना तसे ठेवता येणार नाही. विराजमोहिनी कदाचित आत्महत्याही करील अशी भीती वाटते.' वास्तविक अशा प्रकारची भीती मला वाटत नव्हती. कारण कलकत्त्यात असताना मी या सर्व गोष्टी तिला समजावून सांगत असे, ते असो; पण केशवबाबूंच्या या सांगण्यावर बरीच चर्चा होऊन असे ठरले की, प्रसन्नमयी माझ्याबरोबर हरिनाभी येथे राहील. आणि विराजमोहिनीला आश्रमाबाहेर कोठेतरी ठेवता येईल. मी दर शनिवारी तेथे येऊन रविवारचा दिवस तिच्या संगतीत राहून जाईन.

या नवीन व्यवस्थेप्रमाणे प्रसन्नमयी माझ्याबरोबर हरिनाभीला आली. नगेंद्र-बाबू आश्रमातून निघून काही मित्रांसह दुसरीकडे बिऱ्हाड करून राहू लागले. विराजमोहिनी त्यांच्यांत राहू लागली. मी दर शनिवारी कलकत्त्याला येऊन रविवारी त्यांच्याकडेच राहून जात असे.

त्यावेळी ज्या पद्धतीने ही सर्व कामे मी करीत असे, ती पद्धत अशी— विराजमोहिनी माझ्यापासून वेगळी राहण्याला तयार होईना. तेव्हा मी असे ठरविले की, जेव्हा ती आणि प्रसन्नमयी एकत्र असतील तेव्हा मी त्या दोघीत न राहाता दुसरीकडे राहावयाचे आणि त्या दोघी वेगवेगळ्या ठिकाणी एकमेकींपासून दूर

राहातील तेव्हा मी पती या नात्याने त्यांच्यांत राहावयाचे. याप्रमाणे ही पद्धत सुरू झाली. प्रसन्नमयी जिवंत असेपर्यंत पुष्कळ वर्षे याच पद्धतीने माझा गृहस्थाश्रम चालत असे.

याच १८७३ सालच्या २५ डिसेंबर रोजी नाताळच्या दिवशी हरिनाभी येथे माझी तिसरी मुलगी सुहासिनी हिचा जन्म झाला.

हरिनाभी येथे आल्यावर मी एका फार मोठ्या व्यापाच्या भोवऱ्यात सापडलो. पहिले, मामांच्या शाळेची सर्व व्यवस्था जेव्हा मी पाहू लागलो तेव्हा, त्यापूर्वी कित्येक वर्षे गावात असलेल्या व ठाण मांडून राहिलेल्या मलेरियाच्या त्रासामुळे शाळेतील विद्यार्थ्यांची संख्या बरीच घटली असून, जमेपेक्षा खर्चाचेच प्रमाण जास्त असलेले आढळले. याचा परिणाम असा झाला की, हेडमास्तर म्हणून मला १०० रुपये वेतन मिळत असले तरी ४०।५० रु. सेक्रेटरी या नात्याने इतर शिक्षकांच्या वेतनापायी खर्च करण्याची पाळी माझ्यावर येऊ लागली. दुसरीकडे सोमप्रकाश वर्तमानपत्राचा सर्वच भार माझ्यावर पडल्याने निरनिराळी वर्तमानपत्रे वाचणे व लिहिणे या कामाकडे पुष्कळसा वेळ द्यावा लागे. शिवाय मधून मधून मोठ्या मामांची तालुकदारी पाहण्यासाठी व तेथील व्यवस्था ठेवण्यासाठी मला सर्वत्र खारे पाणी असलेल्या सुंदर बनात जाऊन एकदोन दिवस राहावे लागे. त्यांतच या दगदगीमुळे मलेरियानेही मला पछाडले. वारंवार येणाऱ्या तापामुळे लिव्हरच्या वेदना जाणवू लागल्या. औषधपाणी करून त्या आजाराचा उपशम करीत असे. तरी कामाच्या व्यापातून सुटका होणे अशक्य झाले. अर्थात अविश्रांत श्रम आणि दगदग चालूच राहिली.

### ग्रामसुधारणा करण्याचा प्रयत्न

घरच्या कारभारावाचून आणखीही काही बाबतीत मला झगडावे लागत होते. सोमप्रकाशची व्यवस्था हातात घेतल्यावर मला दिसून आले की, राजपूर, हरिनाभी वगैरे गाव, काही वर्षांपासून कलकत्त्याच्या दक्षिणेकडे उपनगराप्रमाणे असलेल्या बेहाला वगैरे गावांसहित एका म्युनिसिपालटीत सामील करण्यात आले आहेत. तेव्हापासून सुमारे दहा वर्षे हरिनाभी, राजपूर, चांगडीपोता वगैरे गावची रयत रीतसर म्युनिसिपालिटीचा टॅक्स देत आली आहे. योग्यवेळी टॅक्स न भरल्यास त्यांची भांडीकुंडी लिलाव केली जात असत. पण गेल्या दहा वर्षांत गावातील रस्त्यांवर म्युनिसिपालिटीने मूठभर माती टाकण्याचीही उदारता दाखविलेली नाही. इतकेच काय पण या इतक्या दीर्घावधीत दलदलीने भरलेल्या अनेक खड्ड्यातील चिखलही काढलेला नाही. तपासाअंती कळले की म्युनिसिपल कमिटीत बेहाला आणि त्याच्या आसपासच्या वस्तीतील बरेचसे लोक निवडून आल्यामुळे पैसा त्या भागातच खर्च केला गेला आहे, जात आहे.

मला हा मोठा अन्याय वाटला. ही अनावस्था नाहीशी व्हावी म्हणून संकल्पपूर्वक सोमप्रकाशात लेखणी चालवू लागलो. त्यामुळे सोमप्रकाश वाचणारे बाहेरचे लोक रागावू लागले. केवळ वर्तमानपत्रातच लिहून मी समाधान न मानता, शालागृहात ग्रामस्थ लोकांना बोलावून याबाबतीत चळवळ करण्याला आरंभ केला. अनेकांच्या स्वाक्षऱ्या घेऊन वरिष्ठांकडे एक अर्जही पाठविला. जरी सगळ्या प्रयत्नांचे यश हरिनाभी सोडण्यापूर्वी मला पहाता आले नाही, तरीपण सांगायला आनंद वाटतो की, याच प्रयत्नांनी राजपूर वगैरे गाव, बेहाला गटातून वेगळे होऊन एक वेगळी म्युनिसिपालिटी होण्यात त्याचे पर्यवसान झाले आणि गावांचा कायापालटही झाला.

मी याच वेळी दुसऱ्या एका चळवळीला सुरवात केली आणि ईश्वरकृपेने त्यातही मी यशस्वी झालो. सोमप्रकाशात लिहायला असा आरंभ केला की, राजपूर वगैरे मलेरियाने पीडित असलेल्या सगळ्या गावांसाठी एक गव्हर्नमेंट चॅरिटेबल डिस्पेन्सरी असली पाहिजे. मी हरिनाभीत असतानाच याची दखल घेतलेली मला दिसून आली. प्रथम डॉक्टर आणि औषधांची पेटी माझ्याकडे पाठविण्यात आली. मी या डॉक्टर महाशयांना व त्यांच्या दवाखान्याला हरिनाभीतीलच एका सद्-गृहस्थाच्या घरात वेगळी असलेली जागा देण्याची तत्परता दाखविली. आता या धर्मार्थ दवाखान्याची चांगली उन्नती झाली आहे.

आणखी तिसरीही एक चळवळ करणे भाग पडले. ती म्हणजे मामांची शाळा स्वतःच्या जमिनीवर कायमची प्रतिष्ठित करणे. ही शाळा स्थापन करताना मामांनी थोडेफार अविचाराचेच काम केले होते. आपली ही शाळा उच्च प्रतीची होईल अशी त्यांची कल्पना. त्यासाठी शिक्षकांची प्रारंभिक वेतनश्रेणीच वाढवून ठेविली होती. प्रथम पंडिताला ४० रु. वेतन. पण हे एवढे वेतन कुणालाच देण्यात आले नव्हते. हेडपंडित महाशयांना त्यापूर्वी पाच वर्षे दरमहा २५ रुपयेच मिळत. याचप्रमाणे इतरांनाही शाळा स्थापनेच्या वेळी ठरलेल्या वेतनापेक्षा पुष्कळच कमी वेतन मिळे. वेतनश्रेणी वाढवून ठेवण्याचा असा परिणाम झाला होता की, ज्या ज्या वेळी विद्यार्थ्यांकडून मिळणाऱ्या फीतून काही पैसा शिल्लक राही तो त्या त्या वेळी वाढीव वेतनश्रेणीच्या टक्केवारीत दिला जाई. पुष्कळ दिवसांपासून बेंच, नकाशे, ग्लोब, लायब्ररी यात पैसा खर्च केला गेलाच नाही. या वस्तूंचा अभाव वेळोवेळी चांगलाच जाणवत असे. पण पैशांच्या अभावी याची पूर्तता करता आली नाही.

या गैरसोयीमुळे मी शिक्षकांची संकल्पित वेतनश्रेणी पुष्कळ कमी केली आणि शाळेची उन्नती करण्याचे ठरविले. सर्वप्रथम माझे वेतन १०० रु. चे ८० करून इतर शिक्षकांनाही गेल्या पाच वर्षात जे वेतन मिळत होते तेच ठराविक वेतन असावे असे इनस्पेक्टरांना कळविले. त्यामुळे शिक्षकवर्गात फार मोठी

खळबळ माजली. माझ्या आईचा चुलत भाऊ कैलासचंद्र चक्रवर्तीमहाशय हे त्या-वेळी स्कूलचे हेडपंडित होते. त्यांनी या चळवळीचे नेतेपद स्वीकारले. शिक्षकांपैकी काही शिक्षक तर ' ही शाळा मोडून आपण नवीन शाळा स्थापन करू ' अशी भीती दाखवू लागले. मी काही दिवस सगळ्याच बाबतीत मौन स्वीकारले होते. असे करण्यात शाळेला उच्चावस्था आणावी हा माझा हेतू आहे हे त्यांना मी गुप्तपणाने समजावले आणि उत्तम रीतीने दाखवूनही दिले; पण काही केल्या ते आपली चळवळ थांबवायला तयार होत ना. शेवटी एके दिवशी शाळा सुटल्यावर सगळ्या शिक्षकांना एकत्र आणून त्यांच्या समोर घड्याळ ठेविले आणि सांगितले की, ' ज्यांना ज्यांना ही शाळा सोडून जायचे असेल व जे शाळेविरुद्ध चळवळ करू पाहात असतील त्यांना मी दहा मिनिटांचा वेळ देतो. या वेळात त्यांनी राहणार की जाणार ते सांगितले पाहिजे. जर राहायचे असेल तर त्यांनी शाळेविरुद्ध चळवळ करणार नाही असे वचन देऊन राहिले पाहिजे. ' माझा हा स्पष्ट आदेश ऐकून सर्वच निरुत्तर झाले. दहा मिनिटांनंतर सगळी चळवळ बंद झाली. पण पुष्कळसे मनातल्या मनात माझ्यावर रागावले ते रागावलेच. काय करणार ! कर्तव्यपालनासाठी लोकात अप्रिय व्हावे लागले.

## शाळेचे शिक्षक नाटकात सोंगे घेत

आणखी एका चळवळीने यापेक्षाही तीव्र स्वरूप धारण केले. शाळेची सर्व व्यवस्था मी पाहू लागल्यावर मला असे आढळून आले की शाळेतील काही शिक्षक, गावातील जत्रेच्या नाटकात सोंगे घेत असतात. विशेषतः दोघांबद्दल मला समजले, एकजण ' भगीदिदी ' चे सोंग घेतो तर दुसरा आणखी कसले. केवळ शौक म्हणून काढलेल्या या गावठी नाटक मंडळीचे पुरस्कर्ते, निष्क्रिय असे काही धनिक पुत्र होते. त्यांचे रिकामपणचे हे उद्योग. यातील काही दारुबाज होते तर दुसरे उच्छृंखलतेने दुर्वर्तन करण्यात निष्णात होते. शाळेतील ते दोन शिक्षक त्यांच्या टोळीत सामील असत्. त्यामुळे विद्यार्थी मुले त्या दोघांकडे अवज्ञेच्या नजरेने पाहात. स्कूलच्या बोर्डावर लिहीत ' भगिदिदी, रागवू नको. ' असे पुष्कळ. मला तर हे सर्व मुळीच सहन होत नसे. मी एक सर्क्यूलर काढले की, ' शाळेच्या शिक्षकांपैकी कोणीही या हौशी नाटकमंडळीतील नटवर्गात गेल्यास त्याच्या शिक्षकाच्या पेशाला ते अयोग्य आहे असे समजण्यात येईल. ' हे वाचून त्या दोन्ही शिक्षकांना नाटकमंडळी सोडावी लागली. त्या मंडळीतील शौकीन तरुण, या कारणाने माझ्यावर जास्तच चिडले.

हा क्रोध त्यांनी अनेक दिवस हृदयात गुप्त ठेविला होता. शेवटी १८७४ सालच्या चैत्र महिन्याच्या शेवटी घोषयात्रेच्या उत्सवाच्या निमित्ताने दारूच्या धुंदीत यांनी आपल्या दोस्तमंडळींसह माझ्या राहात्या जागेवर हल्ला चढविला

आणि माझ्याबरोबर असलेल्या एका विद्यार्थ्यांचे डोके फोडले. हा दंगा त्यांनी का केला त्याचे कारण असे :

धोबयात्रेच्या उत्सवात गावच्या जमिनदारबाबूंकडे या निमित्ताने अनेक कार्यक्रम व नाचरंग होई व शाळेसमोर रस्त्यापर्यंत त्या त्यांच्या समारंभानिमित्त भरणारा बाजार भरे. मी शाळागृहातच आतील बाजूस सहकुटुंब राहात असे. या दिवशी सायंकाळी शाळेच्या अभ्यासगृहात बसून मी काही वाचीत आहे, इतक्यात समोरच्या बाजारातून एक मुलगा माझ्याकडे येऊन सांगू लागला, ' पत्त्यांचा डाव खेळणाऱ्या एका दुकानदाराने माझ्या एका सहाध्यायला पत्त्याचा खेळ दाखविता दाखविता फसवून त्याचे सर्व पैसे लुबाडले आहेत आणि मुलगा रडत आहे. '

हे त्याचे बोलणे ऐकताच मी त्या दुकानदाराकडे गेलो आणि मुलाला फसविल्याबद्दल त्याला रागाने बोलू लागलो. म्हटले, ' असा फसवा खेळ खेळणे बेकायदेशीर आहे. मी पोलिस इनस्पेक्टरला कळवीन ' आणि मी घरी आलो. नंतर ऐकले की तो दुकानदार माझ्या विरुद्ध तक्रार घेऊन जमिनदारबाबूंकडे गेला होता. त्यावेळी तेथे जमिनदारबाबू मित्रमंडळीसह मजलशीत बसले होते. आपल्या रंगेल आणि रगेल दोस्त मंडळींच्यासमोर तो दुकानदार ही तक्रार घेऊन आलेला पाहून म्हणाले, ' आं ? इतका उद्धटपणा ! आमच्या गावात येऊन नोकरी करीत असलेल्याचा आमच्या उत्सवात हस्तक्षेप ! जा, काय म्हणतो पाहा तरी. ' आपल्या रगेल दोस्तांना उद्देशून हे त्याचे वाक्य होते.

मग काय विचारता ! आधीच उल्हास ! त्यात फाल्गुन मास. लागलीच तेथून लाठीवाले काही तरुण शाळागृहावर आक्रमण करण्यासाठी धावले. ते अशा-प्रकारे खवळून येत आहेत हे ऐकताच एका जवळच्याच मुलाला पुढचे दार बंद करून आतून कुलूप घाल म्हणून सांगितले व आतल्या बाजूला कुलूप लावलेले असू द्या. हा प्रक्षोभ थांबल्यावर जमीनदारबाबूंना झालेला प्रकार समजावून सांगता येईल ' असे मी माझ्या मनाशी ठरविले.

मुलगा कुलूप लावीत आहे इतक्यात ती हल्लेखोर टोळी तेथे हजर. त्यांनी लाठीच्या तडाख्याने मुलाचे डोके फोडले, आणि नंतर ते शाळागृहात आले. मी आत्मरक्षणासाठी सज्ज होऊन अगदी निर्भयपणाने त्यांच्यासमोर जाऊन उभा राहिलो. त्यांनी माझ्यावर काही हात उचलला नाही; कोणीतरी एकजण पुढे येऊन त्या हल्लेखोर तरुणांच्या कानात काहीसे म्हणाला आणि बग ते सगळे लोक एकामागून एक असे बाहेर निघून गेले. मी फिर्याद केली असती तर फौजदारी गुन्ह्याखाली त्यांना चांगलीच शिक्षा झाली असती; पण तसे करणे मला योग्य वाटले नाही. आणि ते चांगलेच झाले; कारण ते जमीनदार त्यानंतर माझ्या बाबतीत व शाळेच्या बाबतीत चांगलीच सहानुभूती दाखवू लागले.

## हरिनाभी ब्राह्मसमाज

अशी सगळी कामगिरी चालली असताही हरिनाभी येथे पाऊल टाकताच मी ब्राह्मसमाजाला पुनरुज्जीवित करण्याच्या कार्याला लागलो. काही तरुणांचे याच वेळी इकडे विशेष लक्ष गेल्यामुळे व नवीन कार्यक्रमात त्यांचे मन ओढ घेऊ लागल्यामुळे ते समाजात येऊ लागले. माझ्या विनंतीला अनुसरून यापूर्वी या ब्राह्मसमाजातील उत्सवाचे वेळी महर्षी देवेंद्रनाथ ठाकूर आणि आचार्य केशवचंद्र सेन हे आले होते आणि त्यांनी आमचा पुरस्कारही केला होता. या वेळी माझे मित्र प्रकाशचंद्र राय यांना मी शाळेचे दुय्यम शिक्षक केले होते. ते माझ्याबरोबर शाळेच्या जागेतच राहात. प्रसन्नमयी तर त्यांना वडलांप्रमाणे मान देई. यांच्या-प्रमाणे भक्तिव्याकुलता मला फारच थोड्या पुरुषांत आढळली. आमची कौटुंबिक उपासना नेहेमी होतच असे. शिवाय मी आणि प्रकाशचंद्र असे दोघेही रोज सायंकाळी पुष्कळ वेळपर्यंत धर्मजीवनातील गंभीर तत्त्वांची चर्चाही करीत असू. त्यांच्या या सहवासाचा मला व प्रसन्नमयीला पुष्कळच फायदा झाला. तेव्हापासून प्रकाशचंद्रांशी माझी इतकी गाढ मैत्री जमली की, त्यानंतरच्या सामाजिक बंडाळी-तही ती विस्कळीत झाली नाही. याच वेळी प्रकाशची पत्नी अघोरकामिनी काही दिवस हरिनाभी येथे आमच्यात येऊन राहिली होती. तिचीही आमच्या कौटुंबिक स्वास्थ्याला बरीच मदत झाल्यावाचून राहिली नाही.

## पतिता स्त्रीची मुलगी लक्ष्मीमणी

या हरिनाभी गावी असतानाची आणखी एक उल्लेखनीय घटना आहे. कारण याच वेळी लक्ष्मीमणी ही आमच्या आश्रमात आली. ही मुलगी ढाका शहरातील एका पतिता ( वेश्या ) स्त्रीची मुलगी. हिच्या आईने हिला लहानपणी एका मुलींच्या शाळेत घातली होती. त्या शाळेत लक्ष्मीमणीला एका ख्रिश्चन शिक्षिकेचा व एका ब्राह्म शिक्षकाचा सहवास लाभला.

ही शिक्षिका व शिक्षक या दोघांच्या सहवासात आल्यावर आपल्या आईचे जीवननिर्वाहाचे साधन किती घृणास्पद आहे याची तिला कल्पना आली. पुढे लक्ष्मीमणी जेव्हा १३।१४ वर्षांची झाली तेव्हा तिची आई आपला पूर्वापार चालत आलेला व्यवसाय व जीवननिर्वाहाची सोय यांची थोडथोडी माहिती मुलीला देऊ लागली. खोट्या प्रेमाचा अभिनय, फसवे डावपेच, आर्जवी वृत्ती वगैरे सप्रयोग शिक्षण देण्यात जेव्हा तिला अपयश आले, तेव्हा बळजबरीने प्रयोग करण्याला ती प्रवृत्त झाली. एकदा बिचाऱ्या लक्ष्मीमणीला एका पुरुषाबरोबर एका खोलीत सारा दिवस तिने कोंडूनही घातले. ओरबाडून, चावून, हातपाय झाडून हातांनी जितका प्रतिकार करता येईल तितका सारा दिवस करून तिने आत्मरक्षण केले. सायंकाळच्या वेळी दार उघडले आहे असे पाहून लक्ष्मी जी तेथून निसटली ती थेट त्या ब्राह्म

शिक्षकाकडे येऊन दाखल झाली. त्याने तिला एका ब्राह्म कुटुंबात आणून ठेविले. तिच्या आईने दुष्ट लोकांच्या चिथावणीवरून मुलगी आपल्याला परत मिळावी म्हणून त्या ब्राह्मपालकावर फौजदारी केली. मुलीला फूस लावून पळवून नेल्याचा आरोप ठेवला व तिला आपल्या स्वाधीन करण्याची मागणी केली; सुदैवाने हा खटला एका इंग्रज न्यायाधीशापुढे चालला. सगळी हकीगत त्याच्या लक्षात येताच त्याने लक्ष्मीला तिच्या आईच्या हातून मुक्त करून त्या ब्राह्मपालकाच्या स्वाधीन केले.

कज्ज्याचा निकाल अशा रीतीने आपल्या विरुद्ध झाल्याचे पाहून लक्ष्मीच्या आईने तिला आपल्या हाती आणावी म्हणून दुसऱ्या मार्गाने प्रयत्नाला सुरवात केली. मुलीला भेटायला तू येऊ नको असे सांगितले तरी काही केल्या ती ऐकेना. लक्ष्मीच्या आश्रयदात्याला ती सळो की पळो करून सोडू लागली, तेव्हा मग तिचा उद्धारकर्ती ब्राह्म तरुणमंडळी लक्ष्मीला त्या संकटातून मुक्त करण्याकरिता कलकत्त्याला घेऊन आली. पण तेथे त्यांना तिला ठेवण्याकरिता योग्य जागा न मिळाल्यामुळे हरिनाभी येथे माझ्याकडे आले. मी प्रसन्नमयीशी सल्लामसलत करून लक्ष्मीला आश्रय दिला. या ठिकाणी हेही सांगणे अवश्य आहे की गणेशसुंदरी वा मनोमोहिनी त्यापूर्वीच विवाहित होऊन माझ्या घरातून निघून गेली होती.

लक्ष्मीमणी माझ्याकडे राहायला आल्यानंतर एका ब्राह्मतरुणाशी तिचा विवाह झाला. पण त्या बिचारीला जास्त दिवस वैवाहिक सुख उपभोगिता आले नाही. विवाहानंतर आपल्या पतीसह ती उत्तर बंगालमध्ये जलपाईगुडी येथे राहू लागली होती. तेथे एका वर्षातच ती मरण पावली.

* * *

.९.

# कलकत्त्यात अध्यापन

## 'सोमप्रकाश पत्रिके'चा नवा संसार

हरिनाभी येथे मी राहायला आल्यापासून मलेरियाचेही आगमन झाले. त्यावेळी त्याचे प्रमाण चांगलेच वाढले होते. मी गेल्याबरोबर मला त्या तापाने पछाडले आणि वारंवार येणाऱ्या तापामुळे मी अगदी वैतागून गेलो. शिवाय, पूर्ववर्णित सगळ्या कारणांनी मला फार श्रम करावे लागले. त्यामुळे दीड वर्षातच माझी प्रकृती अतिशय खालावली.

माझी त्या वेळची ती अवस्था पाहून, माझे शुभचिंतक व त्या भागातील शाळांचे डे. इन्स्पेक्टर राधिकाप्रसाद मुखोपाध्याय यांनी मला भवानीपूरच्या नवीन स्थापन झालेल्या साऊथ सबर्बन स्कूलचे हेडमास्तर केले. माझ्या आठवणीप्रमाणे सांगायचे म्हणजे १८७४ सालच्या अखेरीस मी या शाळेत हेडमास्तर म्हणून आलो. आणि हरिनाभी येथे माझ्या जागी, माझे ग्रामवासी व वडील बंधूप्रमाणे मला पूज्य असणारे श्रद्धेय उमेशचंद्र दत्त महाशय हे हेडमास्तर झाले. विराज-मोहिनीही त्यांच्या बरोबरच हरिनाभी येथे जाऊन त्यांच्या कुटुंबात राहू लागली. प्रसन्नमयी लक्ष्मीमणीसह माझ्याबरोबर भवानीपूर येथे आली. मी शनिवारी हरिनाभी येथे जाऊन रविवारी सोमप्रकाशचे सर्व काम करीत असे आणि सोमवारी भवानीपूर येथे अध्यापनासाठी येत असे. अशा प्रकारे काही दिवस गेले. शेवटी मी माझ्या कामाच्या सोयीसाठी म्हणून मामांचे ते साप्ताहिक आणि छापखाना भवानीपुरातच आणला. सोमप्रकाशला इंग्रजी पुरवणीची जोड देऊन ते साप्ताहिक भरभराटीला आणण्याच्या प्रयत्नाला लागलो. छापखान्याचीही बरीच प्रगती केली.

याशिवाय भवानीपुरात येताच कित्येक ब्राह्ममित्रांच्या सहकार्याने एका ब्राह्मसमाजाची स्थापना केली. माझ्या राहत्या घरातच या समाजाची साप्ताहिक

उपासना होत असे. आचार्यांचे कामही मलाच पुष्कळ दिवसपर्यंत करावे लागे. मधून मधून कलकत्त्याहून नरेंद्रबाबू वगैरे मित्रमंडळीपैकी कोणाकोणाला आणून उपासना चालवीत असे.

सिंदुरियापटी ब्राह्मसमाजाच्या आचार्यत्वाची जी जबाबदारी माझ्यावर होती, ती मी हरिनाभी येथे असतानाही पत्करलीच होती. आणि अनेकदा झड-वादळातूनही जाऊन तेथील कामगिरी करावी लागे; ती यावेळी माझे मित्र केदारनाथ राय यांच्याकडे मी सोपविली. त्यांनीही ती पुढे अनेक दिवस आस्थेने सांभाळली होती.

## स्त्रियांच्या उच्चशिक्षणाची चळवळ

मी हरिनाभी येथे असताना कलकत्त्यातील भारतवर्षीय ब्राह्मसमाजात निर-निराळ्या चळवळी चालल्या होत्या. मी भवानीपुरात आल्यावर या चळवळीच्या प्रवाहात सापडलो. यातील काही काही चळवळी मी भारतआश्रमात असतानाच प्रथम सुरू झाल्या होत्या. पडदानशीन स्त्रियांना उपासनेच्या वेळी सर्वांबरोबर बस-विणे, आणि स्त्रियांना शिक्षण देणे या दोन बाबींसंबंधाने केशवबाबूंशी; द्वारकानाथ गांगुली, दुर्गामोहन दास, रजनीनाथ राय, अन्नदाचरण खास्तगीर वगैरे ब्राह्म-समाजियांचा कसा मतभेद झाला होता त्याचे वर्णन मी पूर्वी केलेच आहे. द्वारका-नाथ गांगुली यांचा पक्ष भारतआश्रमातील पूर्वीच्या महिला विद्यालयाने संतुष्ट न होता, महिलांच्या उच्च शिक्षणाच्या उद्देशाने नवीन विद्यालय स्थापन करण्याला पुढे सरसावला.

प्रथम या पक्षातील लोकांनी हिंदुमहिला विद्यालय या नावाने एक विद्या-लय स्थापन केले. विलायतेतून नवीनच आलेली कुमारी ॲक्रॉइड हिच्याकडे त्यांनी या विद्यालयाची सर्व व्यवस्था सोपविली. पण काही वर्षांनी ही कुमारिका विवाहित झाल्यामुळे हे विद्यालय, ' बंगमहिला विद्यालय ' या नावात परिवर्तित झाले आणि काही दिवसांनी ते बेथून कॉलेजला जोडण्यात आले.

बालिगंज येथे एक घर भाड्याने घेऊन ही शाळा उघडण्यात आली. गांगुलीभाई स्वतः एक शिक्षक झाले. केवळ शिक्षकच नव्हे तर रात्रंदिवस विसावा न घेता या विद्यालयाच्या उन्नतीसाठी त्यांनी कायावाचा-मनाने स्वतःला वाहून घेतले.

मी भवानीपूर येथे आल्यावर पाहिले, तेव्हा ही शाळा उत्तम चालली होती. गांगुलीभाई कोणत्याही प्रकारे हयगय करणारे नव्हते. त्यांची चिकाटी विलक्षण होती. माझे त्यांच्यावर मनःपूर्वक प्रेम व श्रद्धा जडली होती. अशा प्रकारचा सच्चा व सत्यानुरागी मनुष्य आढळणे कठीण. पूर्वी सांगितलेच आहे

की, गांगुलीभाई हे स्त्रीस्वातंत्र्याचे कट्टर भोक्ते व नेते होते. मी स्त्रीस्वातंत्र्याच्या बाबतीत त्यांच्या इतका कट्टर नसलो तरी, स्त्री-जातीची उन्नती व्हावी असे मनःपूर्वक इच्छीत असे. मी भवानीपूर येथे येताच गांगुलीभाईंनी मला एखाद्या रक्तपिपासू जळवेप्रमाणे आपल्याकडे असे काही ओढून घेतले की मला माझी मुलगी हेमलता हिला त्यांच्या विद्यालयात दाखल करणेच भाग पडले. अर्थात् ती वंग महिला विद्यालयाची विद्यार्थिनी बनली.

## प्रचारकांच्या कृतिशीलतेबद्दल न्याय-अन्याय पाहावा की नाही ?

याच वेळी आणखी एका आंदोलनाला आरंभ झाला. मी हरिनाभी येथे असताना केशवबाबूंच्या भारतआश्रमात एक घटना घडून आली. यावेळी माझे एक ग्रामस्थ ब्राह्ममित्र हरनाथ बसू महाशय आपल्या परिवारासह भारतआश्रमात राहात असत. हरनाथबाबू मनमोकळ्या स्वभावाचा महा-उत्साही असा मनुष्य होता. त्याची मिळकत कमी आणि खर्च जास्त असल्यामुळे त्याच्या जमाखर्चाचा केव्हाच मेळ बसत नसे. तो परिवारासह आश्रमात होता खरा; पण कर्जाने गांजला होता. आश्रमचालकांनी त्याला त्या बाबतीत बराच त्रास दिल्यामुळे त्याने आपल्या स्त्रीपुत्रांना सासुरवाडीला पाठविण्याचे ठरविले. पण जाताना आश्रमाचे देणे त्याला फेडता आले नाही. त्याची पत्नी विनोदिनी आपल्या मुला-मुलींना घेऊन माहेरी जाण्यासाठी गाडीत बसली; इतक्यात आश्रमाच्या अध्यक्षांच्या हुकमाने, काही नोकर आश्रमाच्या फाटकाशी आले आणि म्हणाले, ' आश्रमाच्या देण्याची फेड केल्याशिवाय आम्ही गाडी जाऊ देणार नाही. ' झालेल्या या आपल्या अपमानामुळे विनोदिनी रडू लागली आणि तिने आपल्या अंगावरचे दागिने काढून दिले. त्यानंतर तिची गाडी सोडण्यात आली. यामुळे हरनाथबाबू रागावले आणि त्या रागाच्या भरात विनोदिनीच्या नावासह त्यांनी ही सर्व हकीगत ' साप्ताहिक समाचार ' नावाच्या एका ब्राह्मविरोधी साप्ताहिकात प्रसिद्ध केली.

स्थानिक वर्तमानपत्रांना असे काही खाद्य पाहिजेच होते. ते त्यांना सहज मिळाले आणि त्यांनी त्याचा फायदा घेऊन सर्वत्र टीकेची मोठी झोड उठविली. त्यात आश्रम आणि केशवबाबू यांच्याविरुद्ध जितके काही लिहिता येण्यासारखे होते तितके लिहिले. आणि सर्वत्र मोठी खळबळ उडाली. ही संधी साधून अत्यंत पुढारलेल्या पक्षातील एका ब्राह्मतरुणाने आश्रमाला उद्देशून कटाक्षतेने एक अत्यंत कटूक्तिपूर्ण असे पत्र ' साप्ताहिक समाचार ' पत्रात प्रसिद्ध केले. तेव्हा केशवबाबूंना नाइलाजाने त्या साप्ताहिकसमाचारावर फिर्याद गुजरावी लागली. माझ्या आठवणी-प्रमाणे मला वाटते या फिर्यादीत शेवटी आपसात समझोता झाला. या बाबतीत मी हरनाथबाबू आणि त्यांची पत्नी यांना, ही हकीगत वर्तमानपत्रात प्रसिद्ध

केल्याबद्दल खूप दोष दिला होता व फिर्यादीच्या बाबतीत केशवबाबूंच्या पक्षाचा बनलो होतो.

पण या चळवळीतुन व खळबळीतून आणखी एका चळवळीचा उगम झाला. विनोदिनीला जाताना नोकराकडून दारात अडविणे आणि तिचा अपमान करणे याबद्दल तरुण ब्राह्मपक्षाने, विशेषतः गांगुलीभाईंच्या अनुयायांनी आश्रमावर रोष प्रकट करून या कार्यवाहीचा न्याय करण्यासाठी व सत्य काय आहे ते प्रकट करण्यासाठी केशवबाबूंना आव्हान केले. या आव्हानविषयक सूचनेला उत्तर म्हणून धर्मतत्त्वपत्रिकेत प्रसिद्ध केले की, 'प्रचारक हे ईश्वरनियुक्त असतात, ब्राह्मलोक हे त्याचा न्याय करू शकत नाहीत, ती बाब न्यायालयीन होत नाही.' झाले. या उत्तराने, समाजाची कार्यपद्धती आणि शासन यासंबंधाने एक नवीन चळवळ सुरू झाली.

द्वारकानाथ गांगुली यांच्या पक्षाने या चळवळीत सक्रिय भाग घेतला. मी भवानीपूर येथे आलो तेव्हा, केशवबाबूंचे मत व त्यांचे कार्य यांना विरोध करण्यासाठी एक पक्ष चांगलाच सिद्ध झालेला मला दिसला. मी येताच या पक्षाने मला आपल्यात ओढले. कारण ब्राह्मसमाज स्थापनेचे नियम, घटना आणि केशवबाबूंच्या काही मतांना विरोध करणे या बाबतीत या पक्षाचा मी पूर्वीपासूनच समर्थक होतो.

## केशवबाबूंच्या मताचे समालोचन

यानंतर माझ्या घरात व इतर वेगवेगळ्या ठिकाणी या विरोधी पक्षाच्या वारंवार सभा होऊ लागल्या. शेवटी ब्राह्ममंडळींना सावध करण्याकरिता युद्धघोषणा करण्याचे ठरले. ही युद्धघोषणा दोन प्रकारांनी सुरू झाली. प्रथम कलकत्ता ट्रेनिंग ॲकॅडेमी नावाच्या शाळेत केशवबाबूंविरुद्ध दोन व्याख्याने झाली. एक माझे व्याख्यान झाले आणि दुसरे माझे मित्र नगेंद्रनाथ चट्टोपाध्याय यांचे झाले.

माझ्या व्याख्यानात मी काय सांगितले ते सर्वच काही मला आता आठवत नाही. मुख्यतः केशवबाबूंच्या काही मतांचे मी फक्त समालोचन केले होते. त्यासंबंधाने मला इतकेच आठवते की, रविवारच्या 'मिरर' मध्ये त्यांनी त्याचा उल्लेख करून त्यातील माझ्या उदार भावनेची प्रशंसा केली होती. पण नगेंद्रबाबूंचे वक्तृत्व त्यांना मुळीच आवडले नाही. समाजकार्याला नियमबद्धता असावी. याबद्दलचे विवेचन करताना नगेंद्रबाबू म्हणाले होते की, केशवबाबूंची नेपोलियनशी तुलना करावी लागेल. नेपोलियनने ज्याप्रमाणे बहुजन समाजाचा पक्ष घेऊन लढाई केली, त्यांच्या निशाणाखाली कार्य केले आणि शेवटी सम्राटाचा राजमुकुट त्याने स्वतःच्या मस्तकावर धारण केला, त्याप्रमाणे केशवबाबूंनी ब्राह्मप्रतिनिधींची

सभा स्थापन करून आदिब्राह्मसमाजाशी वादविवाद आरंभिला आणि शेवटी यथेच्छाचारी राजा होऊन त्यांनी अधिकार चालविला. आणि याच विधानाने केशवबाबूंचे अनुयायी वा प्रचारक आमच्यावर रागाने जळफळू लागले.

## मासिक ' समदर्शी '

अशा रीतीने एका बाजूला वक्तव्ये सुरू झाली तर दुसऱ्या बाजूला १८७४ सालच्या नोव्हेंबर महिन्यापासून समदर्शी नावाचे एक द्विभाषी मासिक सुरू झाले. मित्रमंडळींनी मला त्या मासिकाचे संपादक केले. अर्थात सर्वसाधारण ब्राह्मसमाजाच्या दृष्टीने मी त्या पक्षाचा नेता बनलो. ' समदर्शी 'त मी व इतर लेखक केशवबाबूंच्या काही काही मतप्रणालीबद्दल विरोध दर्शवीत असू आणि स्वतंत्रपणे धर्मतत्त्वांची चर्चा करीत असू. ' समदर्शी ' काही दिवस चालले होते, नंतर बंद झाले; पण समदर्शी पक्ष तसाच राहिला आणि ब्राह्म समाजाची नियमपद्धती बनवावी –घटना तयार करावी – म्हणून जी चळवळ चालविली जात होती ती तशीच चालू राहिली.

## आणखी एक निराश्रित मुलगी

भवानीपूर येथे मी असताना कित्येक उल्लेखनीय अशा कौटुंबिक घटना घडल्या. याच वेळी माझी सर्वात लहान मुलगी सरोजिनी हिचा जन्म झाला. दुसरी घटना अशीः एके दिवशी मी हायस्कूलमधून येऊन पाहिले तो एक निराश्रित मुलगी आपल्या बोचकी, बिछाने वगैरे सामानासह माझ्या घरी उपस्थित झाली. तिला कुठे राहण्याला जागा नाही म्हणून माझ्याकडे आश्रय मागावा हा तिचा हेतू. तिने स्वतःच्या आयुष्याचे इतिवृत्त सांगितले. खरेखोटे देवाला माहीत. मी मोठ्या संकटात पडलो. दुसरा आश्रय पाहा म्हणून सांगावे तर तो काही पुरुष नव्हे ! तरुण मुलगी ! ' तू रस्त्यात कुठेही पड ' म्हणून मी कसे सांगू ? विशेषतः माझी पत्नी प्रसन्नमयी अत्यंत दयाळू स्वभावाची होती. निराश्रित, दीन दरिद्री मनुष्याच्या बाबतीत तिची दयार्द्र वृत्ती पाहून सगळेच मुग्ध होत. त्या तरुण मुलीने येताच तिला ' आई ! ' म्हणून हाक मारली. मग काय विचारता ! लागलीच तिने तिला आपल्या जवळ ओढून घेतले. पूर्वी होती लक्ष्मीमणी, आता आली ही. स्वतःचा एक मुलगा आणि चार मुली त्यात या दोघांची वाढ झाली. शेवटी प्रसन्नमयीचा त्या मुलीला आधार मिळाला !

## ख्रिस्तीय हायचर्चचे साहित्यवाचन

भवानीपूर येथील वास्तव्यात स्मरणीय अशा आणखी दोन गोष्टी आहेत. पहिली, यावेळी एका ख्रिश्चन पाद्री महाशयांशी माझा परिचय झाला. विशेष मैत्री जडली. तो हायचर्चचा कट्टर धर्माभिमानी होता. मी त्याच्या घरी पुष्कळ वेळ

घालवीत असे. त्याच्या आग्रहामुळे मी यावेळी हायचर्चची अनेक पुस्तके वाचीत असे. ही पुस्तके वाचून माझा खूपच फायदा झाला. दोनतीन महिनेपर्यंत त्यांचा माझ्या मनावर खूप प्रभाव होता. त्यात जॉन हेनरी न्यूमनचे एक पुस्तक ( ॲपोलॉजिया प्रो व्हिटा सुया ) विशेष उल्लेखयोग्य असे मला वाटले. न्यूमन कोणत्या प्रकारे सत्यानुरागाने प्रेरित होऊन संशयाच्या भोवऱ्यात सापडला, ते सर्व पाहून माझ्या अन्तःकरणात, एक विषादमिश्रित आश्चर्यभाव निर्माण झाला.

## रामकृष्ण परमहंसांशी संबंध

यात्रमाणे एका बाजूने जसा ख्रिस्तीय शास्त्र व ख्रिस्तीय साधुत्वाचा ठसा मनात ठसला जाई तसाच, दुसऱ्या बाजूने त्याच वेळी रामकृष्ण परमहंसांशी मला संभाषणाचा योग आला. त्याची हकीगत अशी : आमच्या भवानीपूर ब्राह्म समाजाच्या एका सभासदाने दक्षिणेश्वर येथील मुलीशी विवाह केला होता. तो अधून-मधून सासुरवाडीला जाई आणि तिकडून आल्यावर मला सांगे की, दक्षिणेश्वरच्या कालीमंदिरात एक पुजारी ब्राह्मण आहे. त्याच्यात काही तरी विशेषत्व असल्याचे मला जाणवले. या मनुष्याने धार्मिक साधनेसाठी अनेक क्लेश सोसले आहेत. हे त्याचे सांगणे ऐकून मला रामकृष्णांना भेटण्याची इच्छा झाली. जाईन जाईन म्हणता म्हणता, ' मिरर ' मध्ये माझ्या वाचण्यात आले की केशवचंद्र सेन महाशय त्यांच्या दर्शनाला गेले होते आणि त्यांच्याशी संभाषण करण्यात त्यांना समाधान आणि नवल वाटले. हे ऐकून दक्षिणेश्वरी जाण्याची मला जास्तच उत्कंठा वाटली. शेवटी एके दिवशी मी माझ्या त्या मित्राला बरोबर घेऊन दक्षिणेश्वरी गेलो.

पहिल्या भेटीपासूनच माझ्याकडे रामकृष्णांचे विशेष लक्ष वेधले आणि ते त्यांचे आकर्षण पहिल्या दिवसापासूनच मला जाणवले. माझ्या अन्तःकरणातही कसली तरी न कळण्यासारखी विशेष जाणीव उत्पन्न झाली. दुसऱ्या कोणी एखाद्या माणसाने धर्मसाधनेसाठी इतके कष्ट भोगले असतील की नाही देव जाणे ! रामकृष्णांनी मला सांगितले की, ' आपण काली मंदिरात पुजारी होतो. त्या ठिकाणी अनेक साधुसंन्यासी येत. धर्मसाधनेसाठी त्यांपैकी जो जे सांगे ते सर्व मी करून पाहिले आहे. इतकेच काय पण अशाप्रकारे साधना करता करता मी अगदी वेडा होऊन गेलो होतो. काही दिवस तर उन्मादग्रस्ताप्रमाणे माझी अवस्था झाली होती. शिवाय माझ्यात अशी एक विकृती निर्माण झाली होती की भावावेशात मी बेशुद्ध होऊन जात असे ' या बेशुद्धावस्थेत मी त्यांना अनेकदा पाहिलेही आहे. इतकेच नव्हे तर काही दिवसांनी मला पाहताच ते अत्यानंदाने बेहोश होऊन धावतच माझ्याकडे येत आणि मला घट्ट मिठी मारून अचेतन होऊन पडत. असो.

रामकृष्णांच्या सहवासात असताना अशी एक भावना माझ्या अन्तःकरणात उत्पन्न होई की, धर्म एकच. रूपे वेगळाली. धर्माचे हे उदार व उदात्त स्वरूप

तसेच त्यातील विश्वैक्य वृत्ती, रामकृष्ण परमहंस बोलता बोलता व्यक्त करीत. त्यातील एक उदाहरण उज्ज्वलतेने मला आठवते. एकदा मी दक्षिणेश्वरी जायला निघालो असताना, माझ्या भवानीपुरातील त्या ख्रिस्ती पाद्री मित्राला बरोबर घेऊन गेलो. माझ्या तोंडून त्याने रामकृष्णांसंबंधाची माहिती ऐकून तो माझ्या संगतीने येण्याला तयार झाला. मी तेथे जाताच रामकृष्णांना सांगितले, ' महाराज, माझा हा एक ख्रिस्ती मित्र आपल्याला भेटण्यासाठी आला आहे. ' लागलीच रामकृष्णांनी जमिनीवर डोके ठेवून त्याला प्रणाम केला आणि म्हटले, ' येशू ख्रिस्ताच्या चरणी माझे शेकडो नमस्कार ' माझ्या ख्रिश्चन मित्राने चकित होऊन विचारले, ' महाराज, आपण येशूच्या चरणी प्रणाम करीत आहा. आपण त्यांना कोण समजता ? '

रामकृष्णांनी उत्तर दिले, ' का ? ईश्वराचा अवतार ! '

यावर त्या ख्रिश्चन मित्राने विचारले, ' ईश्वराचा अवतार कसा ? कृष्णादि अवतारांप्रमाणे ? '

रामकृष्णांनी सांगितले, ' होय. त्याप्रमाणेच. परमात्म्याचे अवतार असंख्य. त्याप्रमाणे येशू हाही एक अवतार ! '

ख्रिस्तीय मित्राने विचारले, ' आपण अवतार म्हणजे समजता तरी काय ? '

रामकृष्णांनी लागलीच उत्तर दिले, ' तो कसा हे तुम्हांला ठाऊक आहे काय ? मी असे ऐकले आहे की, कोणा एखाद्या ठिकाणी समुद्राचे पाणी गोठून त्याचे बर्फ होते. समुद्र अमर्याद अनंत पसरला आहे. एके जागी कोणत्या एका विशेष कारणाने तो गोठला गेला, हातात पकडण्याला, स्पर्श करण्याला योग्य झाला. अवतार म्हणजेही काहीसा असाच प्रकार ! अनंत शक्ती जगात व्यापून राहिली आहे. कोणत्या एखाद्या विशेष कारणाने, कोणत्या एखाद्या विशेष जागी, थोडीशी ईश्वरी शक्ती मूर्तरूप झाली, मूर्तिरूप तिने धारण केले ! ती स्पर्श करण्याला, पाहण्याला योग्य झाली इतकेच. येशू वगैरे महान् विभूती ज्या शक्तीने दृश्य होतात ती ईश्वरीशक्ती अर्थात् ते ईश्वराचे अवतार ! तेच रूप ! तेच सामर्थ्य ! !

रामकृष्णांच्या सहवासात आल्यामुळे मला धर्माची सार्वभौमिकता, त्यातील भाववैशिष्ट्य जाणता येऊ लागले. अनुभूती निर्माण झाली.

यानंतर रामकृष्णांशी माझा बंधुभाव जास्त दृढतर होत गेला. इतकेच काय, पण मी जर त्यांना अनेक दिवस भेटलो नाही तर मला भेटण्यासाठी ते इतके व्याकूळ आणि उतावळे होत की मला भेटावे म्हणून ते आपण होऊन माझ्या घरीही येत.

### मित्रपत्नी ब्रह्ममयी

याच कालातील आणखी एक स्मरणीय गोष्ट. माझे मित्र दुर्गामोहन दास

महाशय यांची प्रथम पत्नी ब्रह्ममयी हिची माझ्यावरील ममता आणि तिचा मृत्यू, यामुळे माझ्या हृदयावर झालेला आघात, यासंबंधाची आहे. दुर्गामोहनबाबू त्यावेळी भवानीपुराजवळच राहात असत. त्यांच्या घरी माझी नेहमी जा–ये असे. ब्रह्ममयी-कडे माझे विशेष लक्ष वेधले होते. ती माझ्यावर अत्यंत आत्मीयतेने लोभ करीत असे. तिचा तो पावित्र्यपूर्ण चेहेरा माझ्या स्मृतीला जागवीत आहे. प्रसन्नमयीप्रमाणे तिचीही अपत्याची भूक स्वतःच्या लेकरांवर भागत नसे. तिनेही कित्येक निराश्रित मुलींना आपल्या घरात आश्रय दिला होता.

ब्रह्ममयी माझ्या सर्व प्रकारच्या सत्कार्यांना प्रोत्साहन देत होती. याबद्दलचे एक उदाहरण येथे देतो. एकदा भवानीपूर ब्राह्मसमाजाचे एक सदस्य क्षितिकंठ मल्लिक आणि मी अशा दोघांनी असा बेत केला की, भवानीपुरात एक लायब्ररी आणि एक अभ्यासगृह केले तर फार उत्तम होईल. या संकल्पाप्रमाणे 'आम्ही एके दिवशी दुर्गामोहनबाबूंकडे रुपये मागण्यासाठी गेलो. दुर्गामोहनबाबूंनी आर्थिक मदत करण्याचे नाकारले. तेव्हा त्या बाबतीत त्यांच्याशी बराच वादविवाद झाला. मी म्हटले, 'आपल्याकडून काहीतरी आर्थिक सहाय्य न मिळवीन तर मी नावाचा शिवनाथ शास्त्रीच नव्हे.' ते म्हणाले, 'माझ्याकडून जर आर्थिक सहाय्य मिळविण्यात तुम्हांला यश आले तर मी दुर्गामोहन दास नव्हे.' नंतर क्षितिकंठ-बाबूंशी तर्कयुद्ध सुरू झाले. मी तितक्यात बाजूला सरून एकदम माडीवर ब्रह्ममयी-कडे गेलो. आणि माझी संकल्पित योजनाही तिला चांगल्याप्रकारे समजून सांगितली. माझे ते वक्तव्य ऐकून ती म्हणाली, ज्ञानविषयक चर्चा वाढली तर ते चांगलेच. तुम्ही स्त्रियांना वाचण्याला योग्य अशीही पुस्तके त्यात ठेवणार काय? थोडीफार वर्गणी दिल्याने प्रतिष्ठित स्त्रियांना चांगली चांगली पुस्तके वाचायला मिळतील?'

'अवश्य. तशी पुस्तके त्यांना मिळतीलच' मी उत्तर दिले.

'तर मग मी एकदम ५० रु. आणि दरमहा ४|४ रुपये देईन' ब्रह्म-मयीने स्पष्ट सांगितले.

'तसे असेल तर या कागदावर आपल्या नावाची सही करून द्या बघू.' अशा रीतीने एका कागदावर सांगितलेला देणगीचा व वर्गणीचा आकडा लिहून त्यावर त्यांची सही घेतली आणि खालच्या मजल्यावर जाऊन तो कागद दुर्गामोहन-बाबूंसमोर धरला. आपल्या पत्नीची सही पाहून दुर्गामोहनबाबू मला म्हणाले, 'ए रास्कल, तरीच तुझा इतका जोर. माझ्याकडे हरलास तर विलायतेला अपील करीन असेच ठरवून तू आलास ना?' आणि मग हशाच हशा पिकला. दुर्गा-मोहनबाबू नंतर वर जाऊन ब्रह्ममयीला म्हणाले, 'अग, हे पाहा, मला विचारल्या-वाचून या दळभद्र्यांच्या नादी लागू नको. त्यांचे काही ऐकूच नको. तू आपल्या

या श्रीकाराने, लक्ष्मीहस्ताने सही केली आहेस तेव्हा मला ती रक्कम दिल्यावाचून दुसरा उपायच नाही. '

ब्रह्ममयी म्हणाली, 'चांगले आहे. ते तर फारच उत्तम काम करीत आहेत. स्त्रियांच्या उपयोगासाठी एक लायब्ररी झाली तर काय वाईट ?'

ब्रह्ममयीच्या माझ्यावरील मायाममतेचे आणखीही एक उदाहरण आहे. एकदा मी पैशांच्या अगदी ओढाताणीत सापडलो होतो. त्या महिन्याअखेरीला मुलांनी प्रसन्नमयीचा केस बांधताना तोंड पाहण्याचा आरसा फोडला. प्रसन्नमयीने ही गोष्ट मला सांगितली नाही. ती मनात म्हणाली, 'महिना संपायला आता थोडेच दिवस आहेत. तोपर्यंत मी कसेही निभावून नेईन. नवा महिना सुरू होताच आरसा आणता येईल !' अशातच एके दिवशी सायंकाळच्या वेळी ब्रह्ममयी फिरायला म्हणून आमच्या घरी आली. पाहते तो, प्रसन्नमयी पाण्याच्या भरलेल्या मोठ्या मडक्यात डोकावून आपले तोंड पाहात आहे आणि केस बांधीत आहे, असे तिला दिसले. तिला त्याचे आश्चर्य वाटून तिने प्रसन्नमयीला विचारले, 'अग हेमाच्या आई, हे ग काय ! पाण्याने भरलेल्या मोठ्या मडक्याजवळ काय करीत आहेस ?'

प्रसन्नमयी हसून म्हणाली, 'अहो, आरसा मुलांनी फोडून टाकला. त्यांची तर पैशांची मोठी ओढाताण सुरू आहे. मग त्यांना आरशाबद्दल कसे बोलू ? महिना संपताच विकत आणता येईल, म्हणून पाण्यात पाहून केस बांधीत आहे.'

ब्रह्ममयी हसत म्हणाली, 'अगबाई, मी असे कधी ऐकले नव्हते.'

प्रसन्नमयीने तितक्याच प्रसन्नतेने हसून म्हटले, 'पाहिलेत, मी कशी एक नवीन युक्ती सुचविली ते.'

दोघींचे या विषयावर असे हसणेखिदळणे चालू असता स्कूलमधून मी तेथे आलो आणि सर्व हकीगत ऐकून खूप हसू लागलो. नंतर प्रसन्नमयीला म्हटले, 'तुझ्यासारख्या गृहिणीबरोबर संसार चालविणे फारसे कष्टकारक होणार नाही. छान बुद्धी चालविलीस बरे. ते असो, पण मला बोलली असतीस तर मी आरसा आणून दिला असता !'

'तुमची पैशाची तणातणी आहे म्हणून बोलले नाही.' प्रसन्नमयीने उत्तर दिले.

थोड्या वेळाने ब्रह्ममयी निघून गेली. आम्हाला वाटले, ती घरी गेली असावी; पण एका तासातच एक मोठा आरसा घेऊन आपली उपस्थित ! आणि माझ्या पत्नीला म्हणते कशी, 'ही माझी देणगी तू स्वीकारलीच पाहिजेस.' अशा

तऱ्हेने, अशा ममत्वाने, आणि आग्रहाने तिने हे उद्‌गार काढले की, आम्हांला त्या देणगीचा स्वीकार करणेच भाग पडले. नाकारताच येईना. मनात मात्र मी अगदी मुग्ध होऊन गेलो. नंतर मला समजले की, आमच्या घरातून बाहेर पडल्यावर ती घरी न जाता सरळच बेंटिंक स्ट्रीटवर गेली आणि तेथील एका परिचित दुकानदाराकडून आरसा विकत घेऊन आली.

ब्रह्ममयीमुळे दुर्गामोहनबाबूंच्या घरी मी जखडला गेलो होतो. मला ती विसाव्याची एक जागा वाटे. आठवड्यातून बहुतेक रोज सायंकाळी स्कूलमधून येताच मी ब्रह्ममयीकडे जात असे. जाऊन पाहावे तर बैठकीची खोली खुर्च्या, कोच, टेबल वगैरेने सुंदर सजविलेली, पण ब्रह्ममयीचे जणू काय त्या सजावटीकडे लक्षच नाही. ती आपली एका कोपऱ्यात जमिनीवर, आलेल्या काही मुलींजवळ गोष्टी करीत बसलेली असायची. एका दिवसाची एक घटना सांगतो. एके दिवशी गोष्टी बोलता बोलता एक मुलगी म्हणाली, ' म्युनिसिपल मार्केटमध्ये पुष्कळ लिचू आल्या असून त्या आम्ही आणून खाल्ल्या आहेत. ' तितक्यात ब्रह्ममयी कशा-लाशी म्हणून तेथून उठून गेली आणि घाईघाईने परत आली. नंतर पुनः गप्पा-सप्पा चालू झाल्या व वेळ मोठ्या मजेत चालला. इतक्यात म्युनिसिपल मार्केट-मधून मोठमोठ्या लिचू तेथे आणण्यात आलेल्या दिसल्या. ब्रह्ममयी मुलींना उद्देशून म्हणाली, ' खा ना. काही लिचू खाऊन पाहा. ' आणि मग त्यावरच खूप हशा पिकला.

तिच्या घरात पाऊल ठेवताच ती, आपल्या आश्रयाला असलेल्या मुलींच्या बाबतीत कायकाय करणे योग्य आहे यासंबंधाने माझ्याशी सल्लामसलत करण्याची उत्सुकता दाखवी. पुष्कळदा सायंकाळ होता होता स्वतःच्या हातचा काहीतरी पदार्थ खावविल्यावाचून मला तेथून जाऊ देत नसे.

ही ब्रह्ममयी १८७६ सालच्या नोव्हेंबर महिन्यात आम्हा सर्वांना सोडून दिव्यलोकी निघून गेली. तिच्या त्या मृत्यूने आम्ही सर्वच— विशेषतः मी स्वतः मर्माहत दुःखित झालो. ती निघून गेल्यावर तिच्या सगळ्या सहृदयतेच्या व चांगुलपणाच्या आठवणी माझ्या अन्तःकरणात वारंवार येऊ लागल्या. त्यामुळे मला माझा शोका-वेग आवरेनासा झाला. तिच्या स्वर्गारोहणानंतर एक महिनापर्यंत प्रत्येक दिवशी सायंकाळी तिच्या घरी आम्ही सर्व जमून तिचे स्मरण करीत ब्रह्मोपासना चालवू लागलो. यावेळी उपासनेला योग्य पण शोकसूचक अशी पुष्कळच पद्यरचना मी केली होती. त्यातील पुष्कळशी पदे, साधारण ब्राह्मसमाजाच्या ब्राह्मसंगीतिकेत उद्‌धृत केलेली आहेत. दुर्गामोहनबाबूंनी ब्रह्ममयीच्या श्राद्धादिवशी बाहेरील कोणालाच निमंत्रण दिले नाही. आमच्यासारखे काही अंतरंग मित्रच, ज्यांची ब्रह्ममयीवर श्रद्धा होती, भक्ती होती व जे तिच्या आजारीपणात वारंवार तिच्या समाचाराला

येत, तेवढ्यांनाच बोलवीत आणि त्यांच्यासह उपासना करीत. पण उपासना संपल्यावर डोळे उघडून पाहातो तर अनिमंत्रित असे केशवचंद्र सेन महाशय आपण होऊन येऊन उपासनेत भाग घेतलेले दिसले. ब्रह्ममयीवरील आपली श्रद्धा व भक्ती व्यक्त करणे हाच त्यांचा हेतू होता.

मी भवानीपुरात असताना, माझे श्रद्धास्पद मित्र नगेंद्रनाथ चट्टोपाध्याय महाशय फारच दारिद्र्यावस्थेत दिवस कंठीत असल्याचे कळले. ब्रह्मानंद केशवचंद्र सेन यांच्या बरोबर राहून कार्य करण्यासाठी म्हणून कृष्णानगरहून नोकरी सोडून सहकुटुंब कलकत्त्याला ते आले, भारतआश्रमात राहिले; पण केशवबाबू आणि त्यांचे अनुयायी यांच्याशी मतभेद झाल्यामुळे त्यांना आश्रम सोडून बाहेर पडावे लागले, हे पूर्वी सांगितलेच आहे. ते काही ब्राह्ममित्रांसह काही दिवस स्वतंत्र जागेत राहात होते; पण त्यांचे दिवस अत्यंत कष्टाने जाऊ लागले. आर्थिक अडचणीने ते चांगलेच गांजले. हरिनाभी येथे असताना मी माझी दुसरी पत्नी विराजमोहिनी हिला त्यांच्या संगतीत ठेवली होती आणि दर शनिवारी मी त्यांच्याकडे जातही असे. मी शक्य ते आर्थिक सहाय्यही त्यांना करीत असे; पण तेवढ्याने त्यांचे आर्थिक वैगुण्य नाहीसे होत नसे. त्यानंतर मी जेव्हा भवानीपूर येथे साऊथ सबर्बन स्कूलचा हेडमास्तर म्हणून आलो तेव्हा विराजमोहिनीला हरिनाभी येथे साधू उमेशचंद्र दत्त यांजकडे ठेविली आणि नगेंद्रबाबूंना परिवारासह भवानीपूर येथील माझ्या बिऱ्हाडी आणले. त्यांचा सर्व खर्च चालवू लागलो. तेथे त्यांना एक मूलही झाले. त्यानंतर काही दिवसांनी ते कलकत्त्याला परत गेले.

## हेयर स्कूलचे हेडपंडित

भवानीपूर साऊथ सबर्बन स्कूलमधून, मला वेळोवेळी उत्साहित करणारे व सहाय्यक राधिकाप्रसन्न मुखुर्ज्ये महाशय यांनी माझ्यासाठीं हेयरस्कूलमध्ये १२० रु. वेतनाची हेडपंडित व ट्रान्सलेशनमास्तर या हुद्याची नवीन जागा तयार केली आणि त्या जागेवर मला नेमण्यात आले. राधिकाबाबूंच्या सल्ल्याने उड्रो-साहेबाने मला ही जागा दिली. असे ऐकले होते की, सर क्लिफसाहेब ही जागा दुसऱ्या कोणाला देण्याच्या विचारात होता. पण ते रहित करून डायरेक्टर उड्रो-साहेब यांनी माझी नेमणूक त्या जागेवर केली. पूर्वी उड्रोसाहेबाशी माझे भांडण झाले होते आणि माझ्यावर त्याचा राग आहे हे राधिकाबाबू जाणून होते. आता अनुमानच करायचे तर उड्रोसाहेब सद्धेतूने कार्य करणारे होते. दीर्घद्वेषी नव्हते. त्यांच्या मनात माझ्याबद्दलचा राग शिल्लक राहिलाही नसेल. किंवा राधिका-बाबूंनी आपल्या कुशलबुद्धीने विरोधीभाव येऊ न देता माझी प्रशंसा करून उड्रोसाहेबांकडून संमती घेतली असेल. ते काही असले तरी उड्रोसाहेबाने सर

क्लिफची सूचना मागे सारून अगर अमान्य करून मला ती जागा दिली हे खरे.

मला वाटते १८७६ सालच्या प्रारंभी मी हेयर स्कूलमध्ये आलो. काही दिवस भवानीपूर येथूनच जा-ये करीत होतो. शेवटी माझे मामा द्वारकानाथ विद्याभूषण महाशय काशीहून प्रकृती सुधारून आल्यावर ते भवानीपूर येथेच आपले ' सोमप्रकाश ' साप्ताहिक व छापखाना ताब्यात घेऊन राहू लागले तेव्हा मी तेथून सहकुटुंब ॲम्हर्स्ट स्ट्रीटवरील एका घरात बिऱ्हाड करून राहू लागलो.

* * *

. १० .

# भारतसभेची स्थापना ( १८७६–७७ )

मी कलकत्त्यात येऊन राहू लागल्यावर आमचा ' समदर्शी ' पक्षही जास्त संघटित होत चालला. ब्राह्मसमाजात नियमबद्ध पद्धत चालू व्हावी म्हणून दोन प्रकारांनी प्रयत्न होऊ लागले. प्रथम, भारतवर्षीय ब्राह्ममंदिर हे ट्रस्टींच्या हाती सुपूर्त करण्याचा प्रयत्न करणे. दुसरे, ब्राह्मसमाजात प्रतिनिधीसभा स्थापन करण्याचा प्रयत्न करणे. केशवबाबूंनी साधारण ब्राह्मसमाजाची वा उपासक मंडळींची सभा बोलविण्याचे बंद केले होते. अर्थात आम्हांला नेहेमी कोणती एखादी चळवळ करणे झाल्यास ती करता येत नसे. वर्षातून एकदा उत्सवाच्या वेळी ब्राह्ममंडळींची जी संमिलित सभा होई तीत आम्ही, ट्रस्टींच्या हाती मंदिराची व्यवस्था सोपवावी असा ठराव उपस्थित करीत असू, ' पण मंदिराला कर्ज आहे, तसे कर्ज ठेवून ट्रस्टींच्या हाती मंदिर सोपविणे योग्य नाही असा केशवबाबूंनी एका वेळी आक्षेप घेतला आणि आमचा ठराव फेटाळून लावला. दुसऱ्या एका वेळी कर्जफेडीची मुदत ठरवून काही व्यक्तींकडे ती जबाबदारी सोपविली. तिसऱ्या वेळी कर्जाचा बोजा आम्ही काही व्यक्तींनी घेण्याची तयारी दाखविली. पण कोणत्याच तऱ्हेने केशवबाबू तो ठराव पास करण्याला कबूल होत ना. आनंदमोहन बसू महाशयांनी जरी समदर्शी पक्षात सदस्य रूपाने भाग घेतला नव्हता, ते थोडेफार दूर दूरच राहात तरी पण ते याविषयीचा ठराव किती महत्त्वाचा व जबाबदारीचा आहे हे जाणून होते. ज्या कोणत्याही प्रकारे मंदिराचा ताबा ट्रस्टीकडे जाईल ती व्यवस्था व्हावी असे त्यांचे पक्के मत होते. अशा स्थितीत केशवबाबूंकडून वारंवार अडथळे होऊ लागले; याचा त्यांना रागही आला.

एका बाजूला हा ठराव पास व्हावा असे प्रयत्न चालू होते तर दुसऱ्या बाजूला ब्राह्मप्रतिनिधीसभा नावाची एक सभा प्रतिष्ठित करण्याचे प्रयत्न चालू

होते. आम्ही शेवटी ठराव तयार केले आणि केशवबाबूंनीही त्यात भाग घेण्याची इच्छा व्यक्त केली. एक कमिटी नेमण्यात आली. तीत त्यांनी आपले नावही दिले. थोडेफार नियमही तयार करण्यात आले.

## केशवचंद्र विरुद्ध ब्राह्मतरुणपक्ष

या सगळ्या विवादिक प्रकरणात केशवबाबूंची वृत्ती पाहून आम्हांला फार खेद झाला. त्यांनी समदर्शी पक्षाला अनुलक्षून रविवारच्या 'मिरर' मध्ये स्केपटिकस्, सेक्युलॅरिस्टस्, अन्‌बिलिव्हर्स वगैरे दुरुत्तरांचा वर्षाव सुरू केला. यामुळे फार दुःख वाटले आणि त्याच 'मिरर' मध्ये मी त्याचे प्रत्युत्तरही दिले.

यानंतर हे वर्तमानपत्री शाब्दिक भांडण, उत्तर-प्रत्युत्तर, लेखन व तरुण ब्राह्मपक्षातील केशवबाबूंच्या आदर्शासंबंधाने निरनिराळी चर्चा, उपहास, निंदा वगैरे प्रकारांनी केशवबाबूंचा अनुयायी प्रवीण ब्राह्मपक्ष व तरुण ब्राह्मपक्ष यांच्यात वैचारिक आणि स्वभावगत दूरत्व दिवसेंदिवस वाढत चालले.

याबाबतीत थोडे स्पष्ट बोलणे आवश्यक वाटते. याच्या पूर्वी काही दिवसांपासून केशवबाबूंनी वैराग्याचा प्रचार करण्याला आरंभ केला होता. ते वैराग्य कसे होते त्याचे थोडे स्पष्टीकरण करणे बरे. ते स्वतःच्या तीन मजली घराच्या गच्चीवर एक झोपडीवजा घर बांधून स्वतः रांधून जेवू लागले. आहारात विशेषसा बदल झाला नाही; पण पाणी पिण्याच्या ग्लासाऐवजी मातीचे भांडे वापरू लागले. झोळी घेऊन स्वतःच्या घरात भिक्षा मागू लागले. कुटुंबातील माणसे भिक्षा म्हणून मूठमूठ तांदूळ त्यांना घालू लागली. त्यांचे पाहून कित्येक प्रचारकही स्वतः रांधून खाऊ लागले. यानंतर थोड्याच दिवसांनी कोन्नगराजवळ एक बाग घेऊन केशव-बाबूंनी त्या जागेला 'साधन-कानन' असे नाव ठेविले आणि स्वतः आपल्या प्रचारकपक्षीय मंडळीसह तेथे वास्तव्य करू लागले. त्या ठिकाणी स्वतःच्या हाताने रांधणे, पाणी शेंदणे, बागेतील जमीन खणणे वगैरे वैराग्याचे आचार पूर्णतः अमलात आणू लागले. यावर कलकत्त्याच्या तरुणब्राह्मपक्षात खूप हास्यकारक चर्चा होऊ लागली.

स्पष्ट सांगायचे म्हणजे याच्या अगोदरच काही दिवसांपासून तरुण ब्राह्म-पक्षावरील केशवबाबूंच्या प्रभावाला—श्रद्धेला—ओहोटी लागली होती. त्यांचे असे पक्के मत झाले होते की, केशवबाबूंनी एकेकाळी महर्षी देवेंद्रनाथांशी भांडून ब्राह्म प्रतिनिधी सभा संघटित करून ब्राह्म समाजाची घटना व नियम बनविण्याचा जरी प्रयत्न केला असला, तरी हळूहळू त्यांचा नियमानुसार व घटनेनुसार वागण्याच्या पद्धतीवरील विश्वास उडून गेला होता. त्यांना यावेळी असे वाटत असावे की, धर्मसमाजाच्या कार्यप्रणालीत सर्वसाधारण लोकांचा हात नसावा, तर ईश्वरप्रेरित महान् पुरुषांचाच एकाधिकार चालावा. आणि याच कारणाने ब्राह्मसमाजाच्या

कार्यकर्तृत्वात दुसऱ्याचे कर्तृत्व चालू द्यायचे नाही, स्वतःच सर्वाधिकारी असायचे व सर्वांनी तसे मानायचे, हा संस्कार त्यांच्या अन्तःकरणात दृढमूल झाला असल्यामुळे तरुण मंडळींनी त्यांच्याकडून तोंडे फिरविली. आमच्या मनावरून त्यांचे कर्तृत्व पुष्कळसे लोपून जाऊ लागले.

## भारतसभेची स्थापना

ज्यावेळी ब्राह्मसमाजात हे सर्व आन्दोलन चालले होते त्यावेळी आनंदमोहन बसू, सुरेंद्रनाथ बंद्योपाध्याय, आणि मी असे तिघे एका नवीन विचाराच्या घालमेलीत गुंतलो होतो. आनंदमोहन बसू विलायतेहून आल्यापासून आम्ही एकत्र जमलो की, पहिली ही गोष्ट निघे की, वंगदेशात मध्यमवर्गीय जनतेसाठी कोणतीही एखादी राजकारणाची चर्चा करणारी राजकीय सभा नाही. ब्रिटिश इंडियन ॲसोसिएशन ही उच्चवर्गीयांची–श्रीमंतांची–सभा. या सभेचे सदस्य होणे हे मध्यमवर्गीयांचे काम नव्हे. त्यांना ते पेलण्यासारखे नाही; तरी पण मध्यमवर्गीयांची संख्या व त्यांचा प्रभाव ज्या रीतीने वाढत आहे त्यावरून त्यांच्याकरिता एखादी योग्य अशी राजकारणाचा विचार करणारी सभा असणे अवश्य आहे. आम्हां तिघांच्या विचारविनिमयानंतर असे ठरविण्यात आले की, देशहितसंबंधाचा विचार करणाऱ्या वेगवेगळ्या व्यक्तींशीं या बाबतीत प्रथम विचारविनिमय करणे इष्ट. ' अमृतबझार ' चे शिशिरकुमार घोष महाशय, आनंदमोहनबाबूंचे मित्र व माझेही परम मित्र होते. प्रथम त्यांनाच सल्लामसलतीसाठी म्हणून आमच्यात घेण्यात आले. त्यानंतर प्रसिद्ध बॅरिस्टर मनोमोहन घोष महाशयांनाही आमच्यात सामील करून घेतले. पुढे मनोमोहन घोष यांच्या घरी ही सल्लामसलत चालली. त्यांच्या सगळ्याच चर्चेच्या वेळी मी उपस्थित नव्हतो. जरूरीच्या कामामुळे मी दुसरीकडे गेलो होतो. काय चर्चा चालली आहे ते आनंदमोहनबाबू व सुरेंद्रबाबू यांच्या तोंडून ऐकत असे.

जेव्हा एक सभा स्थापन करण्याचे अशाप्रकारे ठरविण्यात आले तेव्हा एके दिवशी आनंदमोहनबाबू आणि मी, ईश्वरचंद्र विद्यासागर यांना भेटण्यासाठी गेलो. विद्यासागर महाशयांचा अशा प्रकारच्या उपक्रमाला चांगलाच पाठिंबा होता. ते म्हणाले, ' अशा या संस्थेमुळे देशाची एक मोठी गरज भागेल. मोठा अभाव दूर होईल. ' लागलीच आम्ही त्यांना आमच्या या सभेचे पहिले अध्यक्ष होण्याची विनंती केली. पण त्यांनी प्रकृतीच्या अस्वास्थ्याचे कारण सांगून ती विनंती अमान्य केली.

पहिली प्रकट सभा एल्बर्ट हॉलमध्ये घेतली आणि भारतसभा स्थापन केल्याची घोषणा केली. आनंदमोहन बसूंना त्या सभेचे कार्याध्यक्षपद दिले. त्या दिवसाची विशेष आठवण राहण्याचे कारण म्हणजे त्याच दिवशी सुरेंद्रबाबूंचा

मुलगा मरण पावला असताही ते सभेला आले आणि सर्व प्रारंभिक कार्यात त्यांनी आपुलकीने भाग घेतला. आनंदमोहनबाबू कार्याध्यक्ष, सुरेनबाबू उपकार्याध्यक्ष आणि आम्ही कित्येकजण कार्यकारी मंडळाचे सभासद झालो. अशाप्रकारे पदाधिकाऱ्यांची निवड झाल्यावर लागलीच वर्गणीबद्दलची एक सभा घेऊन मी वर्गणी गोळा करणारा खजिनदार झालो. पुढे मी ९३ नं. कॉलेजस्ट्रीटवर एक भाड्याचे घर घेऊन तेथे भारतसभेचे ऑफिस ठेविले. त्या ऑफिसच्या खोलीची जीर्णावस्था पाहून सुप्रसिद्ध सुरसिक कवी इन्द्रनाथ वंद्योपाध्याय यांनी आपल्या 'भारत उद्धार' काव्यात लिहिले, 'कडी आगे पडे किंवा दडी भागे छेडे' 'तुळई आधी कोसळते की दोरी आधी सुटते!' आणि खरोखरच आयत्यावेळी मिळालेल्या त्या खोलीचीही अवस्था तशीच होती.

याच ९३ नं. कॉलेजस्ट्रीट भवनात आतल्या बाजूला कित्येक ब्राह्ममित्र राहात. त्यांच्यात मीही काही दिवस राहिलो होतो. त्यावेळी भारतसभेच्या खोलीत कमिटीच्या संमतीनुसार समदर्शीपक्षाच्या बैठकीही होत. या ठिकाणी असतानाच मी संसारातील लक्ष काढून ब्राह्मसमाजाच्या सेवेला स्वतःला वाहून घेतले होते. ज्या चिरस्मरणीय रात्री केशवबाबूंकडे नापसंतीचे पत्र पाठविण्याचा निर्णय घेण्यात आला. त्या रात्री भारतसभेच्या या खोलीतच ही सभा घेण्यात आली होती. स्पष्ट सांगायचे म्हणजे, भारतसभा आणि साधारण ब्राह्मसमाज हे जणू काय जुळ्या भावंडांप्रमाणेच जन्मले होते. एकमताची माणसेच दोन ठिकाणी कार्य करणारी, असे झाले होते.

**पाच मित्र**

या बाजूला मी, केदारनाथ राय, नगेंद्रनाथ चट्टोपाध्याय, श्रीयुत कालीनाथ दत्त आणि श्रीयुत उमेशचंद्र दत्त असे पाचजण मित्र एकत्र येऊन धर्मसाधनेसाठी एक लहासा संघच बनविला. आम्ही पाचजण एकत्र बसायचे, मनमोकळेपणाने धर्मविषयक बोलणेचालणे करावयाचे आणि वेगवेगळ्या ठिकाणी एकत्र येऊन उपासना चालवायची हा आमचा कार्यक्रम. मधून मधून धर्मोपदेशासाठी महर्षी देवेंद्रनाथ ठाकूर यांच्याकडे आम्ही जात असू. त्यांनी आमचे नाव 'पंचप्रदीप' असे ठेविले होते. एके दिवशी ते म्हणाले, 'लोक जसे पंचप्रदीप पेटवून देवतेची आरती करतात त्याप्रमाणे तुम्ही 'पंचप्रदीप' ईश्वराची आरती करीत आहा' हे नाव आम्हाला फार आवडले. आम्हीही मग आपसात बोलताना आमच्या एकत्रित होण्याला 'पंचप्रदीप' संमेलन असे म्हणू लागलो.

**आणखी एक पतिता स्त्री : थाकमणी**

याच वेळेच्या आणखी दोन उल्लेखनीय घटना आहेत. मी लक्ष्मीमणीला स्वतःच्या बिऱ्हाडात आश्रय दिला होता ही गोष्ट कलकत्त्यात सर्वत्र प्रचारित झाली होती. या दोन घटनाही अप्रत्यक्षतेने या गोष्टीशी निगडित होत्या.

एके दिवशी माझा एक प्रचारक मित्र रामकुमार विद्यारत्न आणि मी असे दोघेही महर्षी देवेंद्रनाथ ठाकूर यांचे चरणदर्शन करून घरी येत होतो. राजेंद्रलाल मल्लिकांच्या घरासमोर एका स्त्रीच्या जवळून आलो पण तितकेसे तिच्याकडे लक्ष दिले नाही. तिचा चेहेराही पाहिला नाही. त्यानंतर काही पावले टाकून पुढे आलो. तितक्यात मागून स्त्रीच्या आवाजात म्हटलेले ऐकले, 'अहो, शास्त्री महाशय, तुम्ही सध्या कुठे असता ?' चटकन् मागे वळून पाहिले तो, एक गौर-वर्णाची तरुण स्त्री एका लहान मुलीचा हात धरून येत असलेली दिसली. तोंडावळा पाहून मी तिला ओळखले. भवानीपूर येथे असताना मी एका निर्जन गल्लीत राहात असे. ही पतित स्त्री तेथून जवळच राहात होती. माझ्या मुलीबरोबर तलावात स्नानादि उरकीत असे. पण तिने माझी ओळख ठेविली आहे आणि माझे नावही ती जाणते हे मला माहीत नव्हते. असो. मी मागे वळून तिच्याकडे पाहताच ती स्मितहास्यपूर्वक मला म्हणाली, 'तुमच्याशी माझे थोडे महत्त्वाचे काम आहे. तुम्ही कुठे राहता ते मला कळेल तर मी तेथे येऊन तुम्हाला भेटेन. नाही-तर मी शिवठाकूर गल्लीत ×× नंबरच्या घरात राहाते तेथे तुम्हाला यावे लागेल.'

यानंतर विद्यारत्न महाशय आणि मी आपसात बोलू लागलो. मी म्हटले, 'मला जर ही ओळखते तर मी कोणत्या तऱ्हेचा मनुष्य आहे हेही हिला माहीत असले पाहिजे. मग माझ्याशी हिचे काय काम असावे ?' खरोखर या बाबतीत माझा काही तर्क चालेना. आणि काय करावयाचे तेही ठरविता येईना. मात्र एक प्रकारचे नवल वाटू लागले. बिऱ्हाडी आल्यावर केदारनाथ राय यांना सगळी हकीगत सांगितली. ते एकेकाळी या वर्गातील स्त्रियांत काम करीत होते. ते म्हणाले, 'ती व्याकुलतेने तुम्हाला बोलवीत आहे तेव्हा खात्रीने काही बाबतीत तिला तुमची मदत पाहिजे असावी. चला. एकदा शिवठाकूर गल्लीत तिच्या घरी जाऊन येऊ.' या निर्णयानुसार दुसऱ्या रविवारी सकाळीच आम्ही दोघेही शिव-ठाकूर गल्लीतील तिच्या घरी जाऊन दाखल झालो. पाहिले तो ते घर तसल्याच स्त्रियांनी गच्च भरलेले आहे, त्यावेळी ९ वाजले होते. तरीपण त्यातील काहीजणी आपापल्या खोलीत झोपलेल्या होत्या, तर काहीजणी उठल्या होत्या आणि प्रातः-कृत्ये उरकीत होत्या.

मला भेटलेल्या त्या स्त्रीचे नाव थाकमणी. आम्ही आलेले पाहताच तिला आश्चर्य वाटले. आपल्या बोलावण्याप्रमाणे हे आपल्या घरी येतील; असे स्वप्नातही तिला वाटले नव्हते. तिच्या रागरंगावरून तिच्यात एक आश्चर्यकारक बदल झालेला आढळला. त्या दिवशी रस्त्यात तिची माझी भेट झाली तेव्हा हसून खेळून निःसंकोचपणे माझ्याशी बोलली होती. मला उद्देशून 'तू तू' असे संबोधन तिने केले होते; पण त्या दिवसाची ती तऱ्हा आज नव्हती. ही वेगळीच मूर्ती आढळली.

' आपण ' अशा संबोधनानेच तिने बोलण्याला आरंभ केला आणि गंभीर व अनुतप्त भावनेने ती आपली जीवनकहाणी सांगण्याला तयार झाली. तिने जे सांगितले ते संक्षेपतः असे होते :

ती कलकत्त्यापासून जवळच कोणत्याशा ठिकाणी राहणाऱ्या एका सभ्य ब्राह्मण परिवारातील मुलगी. तिची आई आणि भाऊ अजून जिवंत आहेत. इतकेच नव्हे तर ही संकटात आपत्तीत असल्यास मागणीप्रमाणे होईल ती मदतही करतात. लहानपणीच एका कुलीन ब्राह्मणाशी हिचा विवाह झाला. त्याच्या इतर अनेक स्त्रिया होत्या. ती कधी आपल्या सासरी पतीच्या घरी गेली नाही. कधी काळी तिला पतीचे दर्शन झाले होते इतकेच. अशा स्थितीत दिवस, महिने, वर्षे जात असता ती वयात आली. गल्लीतील एक पुरुष तिच्या आगेमागे फिरू लागला. पुढे त्याने तिला फूस लावून घराबाहेर काढली आणि त्यावेळच्या चौदाव्या कायद्याच्या भीतीने त्याने तिला भवानीपुरातील त्याच निर्जन घरात आणून लपवून ठेविले. त्या ठिकाणी असताना हिने मला पाहिले होते. आणि माझ्याविषयी बरेचसे काही ऐकलेही होते. तिथे असतानाच माझ्या आश्रयाला असलेल्या लक्ष्मीमणीलाही तिने पाहिले होते. आणि ब्राह्मंडळींनी तिचा उद्धार करून माझ्या घरात तिला कसे ठेविले होते तेही ऐकले होते. म्हणून आपल्या त्या लहानग्या मुलीला माझ्या हाती सोपवावे या हेतूने तिने मला बोलविले होते.

मी विचारले, ' तुझी आई आणि भाऊ आहेत. त्यांची परिस्थितीही चांगली आहे. मग या आडवाटेला तू पाऊल का टाकलेस ? '

तिने मला उत्तर दिले, ' काय करू ? मागे फिरण्याचा उपाय नाही. मार्ग नाही. घराबाहेर पडलेल्या मला परत घरात कोण घेणार ? म्हणून विचार केला, ज्याच्याबरोबर बाहेर पडले त्याच्याकडेच राहावे आणि तशीच मी राहिले आहे. त्या बिचाऱ्याची पत्नी आहे, मुलेबाळे आहेत. मिळकत थोडी. त्यामुळे माझा सर्व खर्च चालविणे त्याला मुष्कील होत आहे. मला मोठ्या दुःखाकष्टात दिवस घालवावे लागतात ! माझे जे काय व्हायचे ते झाले; पण आता वाटते मुलीचा तरी या आडवाटेतून बचाव व्हावा. शास्त्री मोशाई, आपण लक्ष्मीमणीला ठेवून घेतलीत म्हणून मी आपल्या पायाशी शरण आले आहे. '

मी म्हटले, ' अग, तुझी मुलगी अजून तुझ्या अंगावर पिते. अशी ही लहान अंगावर पिणारी मुलगी काय आईला सोडून राहील ?'

ती म्हणाली, ' होय. हा थोडाफार विचार करण्यासारखाच प्रश्न आहे. पण आपुलकीने आणि मायेने आपला प्रतिपाल होत आहे असे वाटल्यास हळू हळू माझा हिला विसर पडेल. आपल्या पत्नीच्या वात्सल्याने आणि ममतेने ती मला विसरेल. '

' ठीक आहे. आणखी दोनतीन महिने जाऊ देत. मुलीचे दूध सुटू दे. नंतर अमुक पत्त्यावर मला कळीव. '

असे सांगून विद्यारत्न महाशयांसह तेथून निघून आलो. हाय ! पुढे तिने मला काहीच बातमी दिली नाही. नंतर आजारी पडल्यामुळे मी ते बिऱ्हाड सोडले आणि मुंगेर येथे निघून गेलो; नंतर बरे वाटल्यावर साधारण ब्राह्मसमाजाच्या कामात गुंतून गेलो. थाकमणी आणि तिची मुलगी माझ्या आठवणीतच राहिली नाही. कदाचित् तिचे ते मत बदललेही असेल किंवा पुढे माझा पत्ता तिला मिळाला नसेल. कोणत्याही कारणाने का होईना, थाकमणी संबंधाने पुढे मला काहीच कळले नाही.

## ख्रिश्चन तरुणीचा मतिभ्रम

दुसरी घटना अशी: या घटनेत उल्लेखिलेल्या या स्त्रीचा पत्ता पुष्कळ शोध चौकशी करूनही कुणाला कळणार नाही म्हणून मी ही घटना लिहीत आहे. हेयरस्कूलमध्ये काम करीत असताना एके दिवशी फिरून वगैरे आल्यावर पाहिले तो, एक ख्रिश्चन तरुणी एका मुलास घेऊन माझी वाट पाहात आहे असे मला आढळले. कारण विचारता असे समजले की तिचा नवरा अतिशय दुर्गुणी असून त्याने तिला तीन दिवस मारझोड करून अखेर घराबाहेर काढली. ती तीन दिवस मुलासह आश्रयासाठी म्हणून पुष्कळ ठिकाणी फिरून शेवटी माझ्या आश्रयाला आली आहे. लक्ष्मीमणीला आश्रय देऊन मी तिचे कोणत्या प्रकारे संरक्षण केले ते तिने ऐकले आणि माझ्या आश्रयाला आली. पुढे ही स्त्री माझ्याकडे राहिली. नंतर मी विचार केला, ही ख्रिश्चन स्त्री, तेव्हा एकाद्या खिस्ती परिवारात हिला ठेवता आले तर उत्तम होईल. पुढे पतिपत्नीची एकीही होईल. हा विचार मनात येताच मी एका पादरी मित्राला पकडले. त्यानेही दयाळूपणाने तिला एका ख्रिस्ती परिवारात नेऊन ठेविले. पण तिचे घरभाडे व मायलेकरांचा जेवणखर्च मला द्यावा लागे. मी स्वतः व काही वर्गणी जमवून हा खर्च चालवीत असे.

अशा रीतीने तिच्या राहण्याची व्यवस्था होताच मी तिच्या पतीला शोधून काढले आणि माझ्या घरी त्याला बोलवून आणून पत्नीचा स्वीकार करण्याची विनंती केली. तो म्हणाला, ' सध्या आहे त्या ठिकाणी ती सुरक्षित आहे. शिवाय आपल्या मदतीचा हात तिच्या सुखस्वास्थ्याला कारण होत आहे. आणखी काही दिवस अशाच स्थितीत राहू दे, तिला या स्थितीचा उमज पडू दे, तिची वर्तणूक सुधारू दे मग तिला मी स्वतःकडे आणीन. ' मीही मनात म्हणालो, ' एकाकी अवस्थेत काय सुख असते ते तिला समजू दे. ' आणि ती मग तशीच परोपजीवी राहिली. मी स्कूलमधून येताना मधून मधून तिला पाहून येई.

अशा अवस्थेत तिच्या वागणुकीतील दोन गोष्टींचे मी लक्षपूर्वक निरीक्षण केले. पहिली, मी तेथे जाऊन थोडा वेळ बसल्यावर उठायला लागलो की ती मला सहज उठू देत नसे. दुसरी, तिच्या चेहेऱ्यावर या स्थितीचा विषाद वाटल्याचे काहीही चिन्ह दिसत नसे. एके दिवशी ती इकडच्या तिकडच्या गोष्टी बोलता बोलता ती मला म्हणाली, ' आपण माझे दुःख निवारण करू शकाल. मी पैशाअडक्याच्या कमतरतेबद्दल बोलत नाही, तर स्त्रीचे जे दुसरे दुःख वा गरज असते त्याबद्दल बोलत आहे. ' या तिच्या अखेरच्या वाक्याने माझे डोळे किंचित उघडले. नंतर आणखी काही प्रश्नोत्तरे झाल्यावर तिच्या तोंडून अशी स्पष्ट कबुली मला समजली की, ती माझ्याकडे आपला एक ' अनैतिक प्रियकर ' या दृष्टीने पाहात आहे. हा तिचा हेतू समजताच मी ताबडतोब तिच्या खोलीतून उठून बाहेर आलो; तेव्हा ती भयभीत होऊन वा अन्य काही कारणाने असो, मला म्हणाली, ' आणखी एक गोष्ट आहे. ' आणि मला तिने अडवले. माझा मार्ग रोखून धरला. प्रथम मला वाटले, जोरदार शब्दांनी तिला धमकावून तिच्या हातून सुटावे. पण विशेष गडबड आणि तोंडातोंडी झाल्यास ती गोष्ट सर्वांना समजेल आणि मला लांछनास्पद व्हावे लागेल. तिच्या दृष्टीनेही ते योग्य नव्हे असे वाटून तसे मी केले नाही. फक्त इतकेच म्हटले, ' तुझ्याजवळ बंगाली भाषेतील बायबल आहे? '

' आहे. ' ती म्हणाली.

' ते आण पाहू. ' मी सांगितले.

' त्याचे आता काय काम ? ' तिने विचारले.

' आण तरी. त्याचे काही कारण आहे. ' मी सांगितले.

मनात नव्हते तरी बायबल आणून तिने माझ्या हाती दिले. नंतर मी त्या पुस्तकातील, येशूने ज्या परिच्छेदात मानसिक पापाचरणाची निंदा केली होती तो परिच्छेद काढून तिला वाचायला दिला. ती काही केल्या तो मजकूर वाचीना, पण फारच आग्रह केल्यामुळे तो परिच्छेद तिने वाचला.

नंतर मी म्हटले, ' पाहा, तुम्ही लोक ज्याला आपला प्रभू म्हणता त्याचा केवढा हा अमूल्य उपदेश आहे ? तू हा उपदेश कितीदा तरी वाचला असशील ! मग तुझी अशी वृत्ती का ? तसेच मी असा पापाचरणी मनुष्य आहे अशी तुझी कल्पना तरी कशी झाली ? तुझ्या नवऱ्याने तुला माझ्या हाती विश्वासाने सोपविले आहे. मग मी काय त्याचा अशा प्रकारे विश्वासघात करण्याइतका नीच मनुष्य आहे ? '

मी त्याच दिवशी तिला इतका रागाने बोललो व उपदेश केला, की आयुष्यात अशा तऱ्हेने मी आतापर्यंत कोणालाच बोललो नव्हतो. त्याच्या दुसऱ्याच दिवशी

तिच्या नवऱ्याला बोलवून आणून सांगितले की, ' तू आपल्या बायकोला घेऊन जा. तिला अशा रीतीने घराबाहेर ठेवणे चांगले नाही. ' तो तिला घेऊन गेला.

यानंतर या स्त्रीला मी आणखी एकदा पाहिले होते. कित्येक वर्षांनी शहराजवळील कोणत्याशा एका रस्त्याने जाताना, रस्त्याच्या बाजूला असलेल्या एका घरातून तिचा मुलगा बाहेर आला आणि मला म्हणाला, ' आम्ही या घरात राहतो. आईने आपणाला पाहिले आणि एकवार भेटून जा असे सांगितले आहे. ' मी त्या घरात जाताच त्याच्या आईने गळ्यात पदर घेऊन माझ्या पायावर डोके ठेविले. आणि घरची खुशाली विचारली. मीही थोडा वेळ थांबलो, तिची खुशाली विचारली आणि तसाच निघून आलो.

## राजनारायण बसू

हळूहळू आम्ही १८७७ सालात पदार्पण केले. या सालच्या प्रारंभीच मी हरिनाभीच्या उत्सवाला गेलो. तेथे श्रद्धेय उमेशचंद्र दत्त महाशयांच्या घरी कौटुंबिक धर्मकार्यासाठी ब्राह्मंडळी एकत्र जमली होती. या सम्मेलनाला आदिब्राह्म समाजाचे कार्याध्यक्ष स्व. राजनारायण बसू महाशयही आले होते. ते माझ्यावर फार लोभ करीत असत. त्यांचा सरळ आकृत्रिम भक्तिभाव मला मुग्ध करीत असे. ते त्यावेळी कार्यनिवृत्त होऊन वैद्यनाथ–देवघर येथे राहात होते. मी मधून मधून त्यांच्या पवित्र सहवासात कालक्षेप करण्यासाठी त्या ठिकाणी जात असे. ते अत्यंत विनोदी व आनंदात काळ घालविणारे पुरुष होते. मीही तसाच वागत असे. त्यामुळे आम्ही दोघे एकत्र आल्यावर आमची ' जिगरदोस्ती ' उचंबळून येई. हसता हसता लोकांचे पोट दुखू लागे. आताही हरिनाभी येथे तोच प्रकार घडला, एके दिवशी रात्री समाजाची नित्योपासना झाल्यावर जेवणानंतर आमच्या गप्पागोष्टी सुरू झाल्या आणि त्यात रात्रीचे दोन वाजून गेले. ब्राह्मंडळी हसता हसता लोटपोट झाली.

त्याकारणाने असो वा हरिनाभी येथे असलेल्या मलेरियाच्या साथीने असो, मी कलकत्त्याला येताच तापाने फारच आजारी पडलो. तापाबरोबर खोकला सुरू झाला आणि खोकल्यातून रक्तही पडू लागले. एक डॉक्टर म्हणाले, ' हा दम्याचा प्रादुर्भावाचा खोकला असावा.' पण डॉक्टर महेन्द्रलाल सरकार म्हणाले, ' क्षयाचा आरंभ असावा.' पहिली स्टेप आणि त्या रोगावर औषधोपचार सुरू झाले.

## आईवडलांची वागणूक

या आजाराच्या वेळी माझे परमपूज्य आईवडील काय करीत होते व माझा विश्वासू प्रेमळ नोकर खुदाई काय करीत होता ते या ठिकाणी लिहिणे योग्य वाटते. त्यापूर्वी आठ वर्षेपर्यंत माझे पितृदेव माझे तोंडही पाहात नव्हते. पुत्राचे तोंड

पाहणार नाही अशी त्यांची प्रतिज्ञा होती. या बाबतीत, मी गावी येऊ नये म्हणून ते प्रथम कसे प्रयत्न करीत, आलोच तर लाठीवाले गुंड माझ्यावर कसे सोडीत, इतक्या उपरही मी घरात आल्याचे कळताच ते घर कसे वर्ज्य करीत, रस्त्यात मी दिसलो तर मला कसे टाळीत, हे सर्व पूर्वी मी लिहिलेच आहे. मी आजारी पडल्यावर मला जेव्हा कळून चुकले की, आजारातून निभावणे कठीण आहे, जगणे मुष्कील, तेव्हा त्यांना ही बातमी कळविणे मला योग्य वाटले. रुग्णशय्येवरूनच मी त्यांना पत्र लिहिले, ' जर योग्य वाटले तर मला भेटून आपली पायधूळ माझ्या मस्तकाला लावून जावे. तसे आपण केले तर हाच अखेरचा निरोप. पुढे परलोकी भेटू. ' त्यापूर्वी माझ्याकडून पत्र गेल्यास बाबा ते उघडूनही पाहत नसत. पत्त्यावर माझे हस्ताक्षर पाहून फाडून टाकीत. पण हेच पत्र त्यांनी का आणि कसे वाचले ते मला सांगता येत नाही. मी आजारी असल्याचे लोकांकडून ऐकले असावे त्याचाच हा परिणाम.

असो. एके दिवशी सकाळीच माझ्या घराच्या दारात एक गाडी येऊन उभी राहिली. प्रसन्नमयीने खिडकीतून पाहिले आणि धावतच येऊन मला सांगितले, ' बाबा आणि आई दोघेही आली आहेत ! ' आई वर आली; पण बाबांनी काही घरात पाऊल ठेविले नाही. आई वर येताच एकदम माझ्या रुग्णशय्येजवळ आली आणि बसून रडू लागली. ' बाबा का नाही आले ? ' असे मी विचारले तेव्हा तिने सांगितले, ' ते वैद्याला बोलवायला गेले आहेत. ' तपासाअंती मला कळले की ' बाबांनी माझे पत्र पाहताच, आईचे दागिने गहाण ठेवून पैसे काढले आणि ते घेऊन मला औषधोपचार करण्यासाठी ते आले आहेत. या घरात आले नाहीत तरी, माझे जातभाई दादा हेमेंद्रविद्यारत्न महाशय यांच्या घरी राहून माझी औषधयोजना करतील.

यथाकाली वैद्य आले. बाबांनी त्यांना माझ्या बिऱ्हाडी आणून पोचविले आणि ते रस्त्याच्या कडेला असलेल्या दुकानात बसून राहिले. वैद्यांनी मला तपासून जो निर्णय घेतला तो त्यांनी वैद्यांच्या तोंडून ऐकला.

त्यांच्या या परकेपणाच्या वागणुकीने माझ्या डोळ्यांतून खूप अश्रुपात झाला. त्यापूर्वीच्या आठ वर्षांत त्यांना काय थोड्या अडीअडचणींतून जावे लागले ! खूप आपत्ती आल्या; पण माझ्याकडून जाणून बुजून असे त्यांनी एका पैशाचेही सहाय्य घेतले नाही. इतकेच नव्हे तर आईच्या हाती घरखर्चासाठी काही पैसे द्यावे अशी माझी इच्छा आहे असे कळले तर रागाने चरफडून घर डोक्यावर घेत. त्यांनी मला अगदी त्याज्य पुत्रच ठरविले होते. पण त्याच त्याज्य पुत्राने अडचणीच्या वेळी त्यांचे स्मरण केले, तेव्हा मग त्यांच्याने स्वस्थ बसवले नाही. दरिद्री ब्राह्मण ! जवळ पैसा अडका तरी कुठचा असणार ! जे काही हाताशी

सापडले तेच घेऊन ते धावले. केवढा उदार आणि उदात्त स्वभाव! खरोखर हाच त्यांच्या स्वभावातील लक्षात ठेवण्यासारखा विशेष गुण होता.

ते आल्यानंतर त्यांनी काही दिवस मुक्काम करून स्वतंत्र खोली भाड्याने घेतली आणि माझ्या शुश्रूषेसाठी आईला तेथे ठेवून ते निघून गेले. आईही विराज-मोहिनीला घेऊन माझ्यासह त्या नवीन जागेत राहिली. आईचे जप-तप, व्रतवैकल्य, उपवास यांचे प्रमाण बरेच वाढले. रोज ती दीड मैल रस्ता पायी चालत गंगास्नान करून येई. इष्ट देवतेच्या चरणी शेकडो वेळा डोके टेकून या अधम पुत्रासाठी जीवनभिक्षा मागे. नंतर घरी येऊन माझ्या रुग्णशय्येजवळ बसल्या बसल्या पार्थिव-लिंगाच्या पूजनात मग्न होऊन जाई. मी निजल्या निजल्या, तिची ही निष्ठेने चाललेली पूजा पाहात असे.

तिकडे, बाबांनी माझ्याजवळ आईला ठेविले म्हणून तेथे जाताच त्यांच्यावर बहिष्काराचा दंडुका उगारण्यात आला. यात आप्त स्वकीय आणि ज्ञातिबंधू होते. काहींचे मतभेद होते, पण आपसात त्यांची बोलाचाली होतच असे. कोणी अनुकूल तर कोणी प्रतिकूल इतकेच. बाबा मात्र त्यावेळी वज्रकठोर बनून त्या सर्वांविरुद्ध दंड थोपटून उभे राहिले आणि म्हणाले, 'माझे घर वाळीत टाकतील इतकेच ना? टाकू देत. माझे कर्तव्य मी केले आहे.' त्यांनी त्यांच्या त्या बडबडी-कडे पूर्णतः दुर्लक्षच केले. या घासाघाशीत काही दिवस असेच गेले.

इकडे आई माझ्या परिचर्येत गढून गेलेली. माझे पणजोबा रामजय न्याया-लंकार महाशय अत्यंत साधुवृत्तीचे पुरुष होते. आईने त्यांच्याकडूनच मंत्रदीक्षा घेतली होती. अर्थात तेच तिचे गुरू होते. त्यांच्यावर आमच्या ज्ञातिबांधवांची व परिवाराची अत्यंत भक्ती होती. निष्ठा होती. त्यांची हातात धरण्याची काठी, त्यांची जपमाळ, त्यांचे योगासन वगैरे ज्या काही त्यांच्या नित्य वापरातील वस्तू होत्या, त्या सर्वांवर आईची इतकी भक्ती होती की, आप्तस्वकीयांच्याच नव्हे तर दुसऱ्याही कोणाच्या घरात एखादा रोगी बिछान्याला खिळल्यासारखा झाला तर या सर्व वस्तू, पवित्र स्मृतिचिन्ह म्हणून त्याच्या बिछान्यावर ठेवल्या जात. तो आजारातून उठल्यावाचून त्या वस्तू तेथून हालविल्या जात नसत. त्या ठरीव नियमाप्रमाणे माझ्या मातृदेवतेने माझ्या बिछान्यावर पणजोबांची ती सर्व पवित्र स्मृतिचिन्हे अत्यंत भक्तिभावाने ठेवून दिली होती. तीन महिनेपर्यंत ती तशीच होती. तेथून तिने ती हालवू दिली नाहीत. मी आजारातून उठल्यावर ती स्थाना-न्तरित करण्यात आली.

## नोकराचे भक्तिप्रेम

या आजाराच्या वेळी माझ्या आईवडलांचे जसे आश्चर्यकारक सन्तान-वात्सल्य पाहिले, तसेच माझा विश्वासू प्रेमळ आणि आज्ञाधारक नोकर खोदाई

याचीही अद्भुत प्रभुभक्ती किंवा धन्यावरील निष्ठा अनुभविली. खोदाईची आठवण माझ्या अन्तःकरणात पवित्र प्रेमनिर्झराप्रमाणे कायम राहिली आहे. मी त्याला माझ्या ' मेज बौ ' ( मधली सून ) नावाच्या कादंबरीत अमर करण्याचा प्रयत्न केला आहे. भवानीपूर येथे हेडमास्तर असताना खोदाईला नोकर म्हणून ठेविला. तेव्हापासून त्याचे बहुमोल असे अनेक गुण पाहून मनोमन मी त्याच्यावर अगदी मोहून गेलो. माझ्यावरही त्याचे असलेले गाढ प्रेम मी अनुभविले. तो माझा कल्याणकारी मित्र आणि सगळ्या कुटुंबाचा व परिवाराचा रक्षक होता. मी त्याच्या हाती पैसाअडका व संसाराचा सर्व भार सोपवून निश्चिंत असे.

आजारी पडल्यावर मी अर्धपगारी रजा घेऊन जेव्हा रुग्णशय्येवर पडलो, तेव्हा खोदाईचा पगार देणे मला अशक्य होईल असे वाटून, आनन्दमोहनबसूंच्या सल्ल्याने मी रोगमुक्त होईपर्यंत अधिक पगारावर त्याला त्यांच्या घरी ठेविला. आई जेव्हा माझ्यासह स्वतंत्र घरात राहू लागली तेव्हा एके दिवशी सकाळीच पाहिले तो खोदाई तेथे हजर. ' काय खोदाई, तू आलास कसा ? ' मी विचारले.

' आपला आजार वाढला आहे हे ऐकताच माझ्याने तेथे राहावेना. ते काम सोडून येथे आलो ! ' तो म्हणाला.

' चांगले केले नाहीस. तुझ्या पोटाला कोण घालणार ? ' मी विचारले. ' ती काळजी आपण करू नका. मी पगार घेणार नाही. नारायणाने आपणाला वाचविले म्हणजे माझ्या पगाराचा हिशेब करून आपण द्याल. आणि आपण जर या आजारातून उठलाच नाही तर माझा पगारही संपला. '

त्याचे ते निर्धाराचे बोलणे ऐकून माझ्या डोळ्यांत पाणी आले. माझ्या कोणत्याही कसल्याही बोलण्याने तो मागे फिरला नाही. मला फिरविता आला नाही. तो राहणार म्हणून आला आणि राहिलाही.

मला बरे वाटले तेव्हा आई गावी निघून गेली आणि मी माझ्या पूर्वीच्या बिन्हाडी आलो. त्यावेळी रजेवरच होतो. दिवसामागून दिवस चालले होते. पण प्रसन्नमयीने माझ्याकडे घरखर्चाच्या पैशांची मागणी केली नाही. विचारले तर सांगे, ' कसे कुणाला माहीत खोदाई सर्व खर्च चालवीत आहे. आई, तू बाबूंना त्रास देऊ नको. रुपये नसले तर मला सांग. असे आणखी सांगतो. ' नंतर तपासाअंती मला कळले की, खोदाईने आपल्या गळ्यातील सोन्याची साखळी गहाण ठेवून पैसे आणले होते आणि ते प्रसन्नमयीजवळ दिले होते.

यानंतर हवाबदल करण्यासाठी मी मुंगेरला गेलो. खोदाई आमच्या बरोबर होताच. तिथे गेल्यावर मात्र त्याची प्रकृती ढासळली. मी त्याचे सगळे कर्ज फेडून घरी जाण्यासाठी त्याला पैसे दिले आणि त्याच्या घरी पाठविले. तेथे गेल्यावर तो मरण पावला. तो जितके काही महिने जिवंत होता तितके महिने मी त्याचा मासिक पगार त्याच्या घरी पाठवीत असे. पण हाय ! एवढे केल्याने काय त्याच्या

माझ्यावरील प्रेमाच्या ऋणाची फेड होईल काय! ऐकले की, मरण्याच्या वेळी तो आपल्या मुलाला म्हणाला होता, ' जर कधी कामकाज शोधण्यासाठी कलकत्त्याला गेलास तर माझ्या बाबूजींकडे नोकरीला राहा ! '

### अपत्याचा पहिला चिरवियोग

मुंगेर येथे हवाबदल करण्यासाठी मी रजेवर गेलो असता त्याठिकाणी एक शोचनीय संकट ओढवले. मुंगेर येथे ज्या ठिकाणी मी राहात होतो त्याच्या वरच्या मजल्यावरील गॅलरीचा कठडा कमी उंचीचा होता. आमचे बिन्हाड तेथे नेल्यावर दुसऱ्याच दिवशी सायंकाळी आलेल्या काही मंडळीसह तेथे बोलत बसलो होतो. इतक्यात काहीतरी खाली पडल्याचा धाड् असा आवाज कानावर आला. धाईघाईने उठून पाहिले तो, माझी सर्वात धाकटी, अवघ्या एक वर्ष दहा महिन्यांची मुलगी सरोजिनी, गॅलरीतील कठड्यावर चढून खाली दगडी फरशीवर पडल्याचे दिसून आले. ती रडली तर नाहीच पण तिने हालचालही केली नाही. एका दगडावर निपचित पडून राहिली. धावत खाली जाऊन तिला तशीच उचलून वर आणली. शुद्धीवर आणण्यासाठी पुष्कळ प्रयत्नही केले; पण काही नाही. रात्री साडेआठच्या सुमारास ती गतप्राण झाली. मित्रमंडळींनी तिचा मृतदेह स्मशानात नेऊन त्याचे उत्तरकार्य केले.

मी प्रसन्नमयीला सगळ्या रात्रभर एक प्रकारे जबरदस्तीनेच बिछान्यावर झोपवून ठेविली. तिला उठूच दिले नाही. कारण वारंवार उठून ती एखाद्या वेड्याप्रमाणे बाहेर धाव घेऊ लागली. आधीच कन्याशोकाने विव्हल झालो होतो. त्यात तिचा हा शोकोन्माद। त्यामुळे सगळी रात्र मला जागता पहारा द्यावा लागला. माझा कन्यावियोग एका कवितेच्या रूपाने प्रगट झाला आणि तो मी ' पुष्पांजली ' काव्यसंग्रहात प्रकाशित केला.

सरोजिनीच्या मृत्यूनंतर मी आणखी काही दिवस मुंगेर येथे राहिलो. नंतर कुटुंब-परिवार तेथेच ठेवून कलकत्त्याला येऊन नोकरीवर हजर झालो. या वेळेपासून प्रसन्न-मोहिनी ( प्रसन्नमयी आणि विराजमोहिनी ) एकत्रच राहू लागल्या. मी मात्र पूर्वीच्या नियमाप्रमाणे त्या दोघींपासून वेगळा राहू लागलो. असल्या मानसिक संग्रामात अनेक दिवस गेले.

### काव्यग्रंथ

मला वाटते याच वेळी माझ्या फुटकळ कविता एकत्र करून त्या सर्वांचा ' पुष्पमाला ' नावाने एक काव्यग्रंथ मुद्रित झाला. मी लिहिलेल्या पुस्तकांत जी काही मला अत्यंत आवडणारी पुस्तके होती, त्यांत पुष्पमाला ग्रंथाचा अंतर्भाव करावा लागेल. कारण यात अंतरीच्या अनेक भावना स्फूर्तिरूपाने व्यक्त झाल्या आहेत.

* * *

.११.

# केशवचंद्र सेन यांच्याशी वेगळीक

## केशवचंद्रांनी केलेले कन्यादान

मुंगेरहून कलकत्त्याला परत आल्यावर ऐकले, की केशवबाबूंनी आपल्या वडलार्जित वाड्याचा काही भाग विकून, त्या रकमेतून मिस् पिगॉट यांचे शाला-गृह विकत घेतले आणि त्याचे नाव ' कमलकुटीर ' असे ठेविले. तेथे कुचबिहार पक्षाच्या मध्यस्थांना—विवाह निश्चित करणारा अगर वधूपरीक्षा करणारा घटक. बंगाली भाषेत यांना ' घटक ' अशी संज्ञा आहे— केशवबाबूंनी आपली वडील मुलगी वधू म्हणून दाखविली.

## सत्याचरणाचे जीवनव्रत

दुसरीकडे याच वेळी कित्येक उत्साही ब्राह्म एकत्र होऊन त्यांनी आणखी एका कार्याची प्राणप्रतिष्ठा केली. त्यांनी एक प्रकारे कट्टर असे पूर्ण संघटित दल निर्माण करण्याचा उद्योग आरंभिला. असे ठरले, की या दलातील प्रत्येकाने मूल सत्यसिद्धांताला व्रताप्रमाणे पाळायचे आणि त्या प्रतिज्ञापत्रकावर स्वाक्षरी करून त्या सर्वांनी एका पूर्ण संघटित दलात दृढबद्ध व्हायचे. त्यातील काही मुख्य व्रते उल्लेखनीय वाटतात. ( १ ) त्यांनी एकाच ईश्वराची उपासना करा-वयाची. ( २ ) त्यांनी सरकारी नोकरी पत्करायची नाही. ( ३ ) पुरुषाला २१ वर्षे व मुलीला १६ वर्षे पूर्ण झाल्यावाचून त्यांनी विवाह करावयाचा नाही. किंवा तशा प्रकारच्या विवाहाचे पौरोहित्य करावयाचे नाही. ( ४ ) जातिभेद माना-वयाचा नाही. वगैरे. मला त्यांनी निमंत्रण दिल्यामुळे मी त्यात सामील होण्याचे ठरविले. एके दिवशी एक विशेष उपासनेचा दिवस ठरविण्यात आला. या दिवशी विशेष उपासना आटोपल्यावर प्रतिज्ञापत्रकावर त्या सर्वांनी आपापली स्वाक्षरी

करावयाची, अग्नी सिद्ध करायचा, आणि ईश्वराचे नामस्मरण करीत करीत अग्नीला प्रदक्षिणा करता करता आम्ही आपापल्या स्वाक्षरी केलेल्या त्या सर्व प्रतिज्ञा त्या पेटत्या अग्नीत टाकायच्या व प्रार्थनेनंतर पुनः प्रतिज्ञापत्राचे वाचन करून त्यावर सही करावयाची. मी सर्वांबरोबर तसे केले. आनंदाची गोष्ट ही, की मी आणि याच दलातील दुसरा एक अशा दोघांनी सरकारी नोकरीचा राजीनामा दिला. इतकेच नव्हे तर स्वाक्षरी केलेल्या सर्व प्रतिज्ञा आयुष्यभर पाळल्या.

बिपिनचंद्र पाल, सुंदरी मोहनदास, आनंदचंद्र मित्र वगैरे ब्राह्ममित्र मंडळी या प्रतिज्ञाबद्ध दलात होती. माझ्या आठवणीप्रमाणे सांगायचे तर मैमनसिंह येथील शरच्चंद्र रायही त्या दिवशी उपस्थित होते. जेव्हा हे सर्व ईश्वरनामस्मरण करीत अग्नीला प्रदक्षिणा घालू लागले त्यावेळी एक आश्चर्यकारक शक्ती आणि प्रतिज्ञा आमचे अंतःकरण व्यापून राहिल्याची जाणीव झाली. पण पुढे थोड्याच दिवसांत कुचबिहार विवाहाचे जे वादळ उठले त्यात आमचे हे लहानसे दल कुठच्या कुठे फाकून गेले ! त्या चळवळीत या दलाने मोठ्या उत्साहाने भाग घेतला होता.

या वेळेपासून सरकारी नोकरी सोडून ब्राह्मधर्म प्रचारात व ब्राह्मसमाजाच्या सेवेत आपणाला वाहून घ्यावे असे मला उत्कटतेने वाटू लागले. पण चालू नोकरी सोडून दुसरी नोकरी पत्करावी असेही वाटेना. या बाबतीत मी मित्रवर्य आनंद-मोहन बसू यांना सल्लागार म्हणून निवडले होते. प्रचारकार्यात संपूर्ण आयुष्य वेचावे याला त्यांची पूर्ण संमती होती. पण उदरनिर्वाहाची काही तरी सोय झाल्यावाचून चालू सरकारी नोकरी सोडू नये असे म्हणून ते मला अडवू लागले.

## हिंदू राजघराण्यात केशवचंद्र यांच्या मुलीचा विवाह

या नोकरीच्या घालमेलीत माझे काही दिवस जातात न जातात तोच कुच-बिहारच्या विवाहाचे वादळ उठले. आणि प्रगतिशील ब्राह्मदल द्विखंडित झाले.

१८७८ सालच्या जानेवारीच्या प्रारंभीच, कुचबिहारचे मॅजिस्ट्रेट व माझे पूर्वपरिचित यादवचंद्र चक्रवर्ती महाशय, अज्ञान ( वयात न आलेला ) राजाच्या विवाहाची सर्व तयारी करण्याच्या कामाचा, व विवाह निश्चित करण्याचा मुखत्यार म्हणून कलकत्त्यात आले. काशीचे सुप्रसिद्ध होमिओपॅथिक डॉक्टर लोकनाथ मैत्र महाशय यावेळी कलकत्त्यालाच राहात होते. मित्रत्वामुळे मी मधून मधून त्यांच्या-कडे जात असे. त्या ठिकाणी राजप्रतिनिधी म्हणून आलेल्या यादवबाबूंची आणि माझी भेट होत असे. मी त्यांच्या तोंडून ऐकले की, केशवबाबू आपल्या मुलीचा, वयात येण्यापूर्वीच विवाह करण्याला तयार आहेत. हा विवाह कोणकोणत्या शर्ती-वर व्हायचा याच्या वाटाघाटी चालू आहेत. या वाटाघाटींच्या सगळ्याच गोष्टी माझ्याकडे ते बोलले नाहीत. पण हळू हळू आमच्या कानावर आले की, ते सर्व ठरविण्यासाठी कुचबिहारहून राजपुरोहित येत आहेत. त्यानंतर हा विवाह कसकसा होणार या गोष्टीही जवळून वा दुरून माझ्या कानावर आल्या. वधू व वर यांचा

विवाहाच्या योग्य वयात येण्यापूर्वीच विवाह होणार. तरीपण वयात येईपर्यंत दोघेही स्वतंत्र राहतील. केशवबाबू स्वतः जातिबहिष्कृत असल्यामुळे ते कन्यादान करू शकणार नाहीत. त्यांचा धाकटा भाऊ कन्यादान करील. राजपरिवाराच्या पद्धतीप्रमाणे विवाह होईल. फक्त त्यात देवदेवतांच्या नावाऐवजी ईश्वराचे नाव लिहिले जाईल. राजोपाध्ये विवाहाचे धार्मिक कार्य करतील. वगैरे शर्ती त्यात होत्या.

आणखी असेही ऐकले कीं, यादवबाबू – या विवाहाचे अधिकृत प्रतिनिधी-विवाहाचे बोलणे करण्यासाठी दुर्गामोहन दास यांच्या घरी गेले होते. तेव्हा त्यांची पत्नी ब्रह्ममयी हसून म्हणाली होती, ‘ छे–छे. आमच्या मुलीचा राजेरजवाड्यांशी विवाह होणार नाही. तसे पाहिले तर आधी मुलगा वयाने लहान, शिवाय राजे-लोकांशी संबंध. छे. हे नाही जमायचे. हे असे करणे चांगले नव्हेच. आमच्या ! मुलीबाळी, राणीराजकन्यांशी चांगल्याप्रकारे मिळून मिसळून कशा वागणार, यादवबाबू हे सर्व ऐकून निराश झाले आणि तेथून केशवबाबूंकडे गेले.

या सर्व बातमीने कलकत्त्याच्या ब्राह्मदलात मोठीच खळबळ उडाली. आम्ही सर्वांनी ठरविले की, या संकटप्रसंगी ब्राह्मसमाजाने अंगीकारलेले सत्य-संकल्पाचे व्रत सर्वांनी दृढतेनें पाळले पाहिजे. आणि असे करताना केशवबाबूंच्या या कृत्याला विरोध करणे हे आम्हा सर्वांचे प्रातकर्तव्य राहील. ज्या केशवबाबूंनी व्यापक चळवळीनंतर १८७२ सालचा कलम ३ चा वर-वधूच्या विवाह मर्यादे-बद्दलचा कायदा संमत केला आहे. तेच स्वतः तो मोडायला तयार झाले आहेत हे कसे व्हायचे ? अर्थात् यावेळी ब्राह्मसमाजाचे कायदेकानू रक्षण करण्यासाठी आम्हा सर्वांना बद्धपरिकर झालेच पाहिजे. पण त्यापूर्वी एकदा मित्रत्वाच्या भावनेने केशवबाबूंची भेट घेऊन त्यांच्या समोर या सर्व गोष्टींची विचारणा करणे योग्य. या निर्णयानुसार फेब्रुवारीच्या दोन तारखेला आम्ही तिघे मित्र मिळून केशव-बाबूंच्या भेटीला गेलो. जाण्याच्या दिवशी श्रद्धेय श्री. प्रतापचंद्र मुझुमदार महा-शयांची भेट घ्यायला गेलो. ते विशेष काही सांगू शकले नाहीत. फक्त म्हणाले, ‘ मी नुकताच मुंबईहून आलो आहे. मला या बाबतीत काहीच समजले नाही. तुम्ही केशवबाबूंकडे जा. मीही लवकरच येतो. ’ याप्रमाणे आम्ही जाऊन केशव-बाबूंशी बोलणे सुरू केले तोच, तेही एका बाजूला येऊन बसले. केशवबाबूही स्पष्ट असे काहीच सांगेनात. ते म्हणाले. ‘ मला यावेळी विशेष असे काहीच सांगता येत नाही. ’ मी म्हटले, ‘ ही बातमी ऐकून सर्व ब्राह्ममंडळी फारच खवळून उठली आहेत. आम्हाला सर्व काही खुलासेवार समजणे इष्ट आहे. सर्वच मंडळी काही आपल्याकडे येऊ शकत नाही; आम्हांला जिथे भेटतात तिथे आम्हांला अडवून धरतात. तक्रार करतात. तेव्हा त्यांना योग्य ते उत्तर देऊन त्यांना शांत करण्या-साठी आमच्याजवळ तुमचा काही तरी खुलासा तर पाहिजे ? ’ पण काही केल्या

ते काही सांगेनात. शेवटी मला हेही सांगावे लागले की, ' खास्तगीर महाशयांच्या मुलीच्या लग्नाच्या वेळी ब्राह्मसमाजाचे नियम पाळले नाहीत, आदर्श राखला नाही म्हणून आपणच त्यांना कितीतरी नावे ठेविली. तेव्हा आपल्या मुलीच्या विवाहाच्या बाबतीत तुम्ही जर तसेच केले तर ब्राह्ममंडळी पुनः त्याच मार्गाचा अवलंब करणार ! ' या माझ्या बोलण्यावर केशवबाबू फार रागावले. यापूर्वी इतके रागावलेले मी त्यांना केव्हाच पाहिले नव्हते. आम्हाला वाटले आता यांना जास्त त्रास देण्यात अर्थ नाही. लागलीच आम्ही उठलो. मी म्हटले, ' आपणाला राग येतो. तेव्हा यावेळी हे बोलणे राहू दे. ' नंतर आम्ही तसेच निघून आलो.

प्रयत्न संपल्यावर आमच्याच दलात विचारविनिमय सुरू झाला. यावेळी समदर्शीदल, स्त्रीस्वातंत्र्यदल, नियमानुसार वागणारे दल. ही सगळी दले वा पक्ष एक झाले. इतकेच नव्हे तर वृद्ध शिवचंद्र देव महाशयही आमच्या एकत्रित पक्षात आले. ब्राह्मसमाजावर ही एक आपत्तीच आली आहे असेच सर्वांना वाटू लागले. आमच्या मनात कोणकोणत्या दुश्चिंतांचा उद्भव होत होता ते भाषेत व्यक्त करणे कठीण आहे. आनंदमोहनबाबू त्या वेळी मुंगेर येथे आपला परिवार ठेवून कलकत्त्याला आले आणि हायकोर्टाच्या जवळ असलेल्या आपल्या चेंबरमध्येच राहू लागले. मी नेहेमी त्यांच्याकडे जात असे आणि दोघेही बसून हायहाय करीत असू. मी त्यांच्या कोचावर बसून आहे. ते कोटाच्या दोन्ही खिशांत दोन हात घालून गंभीर चिंतामग्न स्थितीत तासचे तास शतपावली करीत आहेत असेही काही दिवस गेले. दोघांच्याही तोंडून शब्दोच्चार होत नसे. बराच वेळ असे झाल्यावर एकेकदा माझ्याजवळ येऊन उभे राहात आणि म्हणत, ' शिवनाथबाबू, काय होणार ? काय करता येईल ? '

## केशवचंद्रांकडे प्रतिवाद-पत्र

शेवटी असे ठरले की, सर्वांनी एके दिवशी एकत्र बसून ठराव करणे अवश्य आहे. त्याप्रमाणे कॉलेजस्ट्रीटवरील भवनातील इंडियन ॲसोसिएशनच्या हॉलमध्ये एके दिवशी रात्री सर्वांची बैठक झाली. केशवबाबूंना काही सांगावे की नाही, जर सांगायचे तर काय सांगावे, कोणी कोणी त्यावर सह्या कराव्या या चर्चेत रात्रीचे सुमारे दोन वाजले. शेवटी निश्चित झाले, विरोधदर्शक असे एक पत्र काही व्यक्तींच्या स्वाक्षरींसह केशवबाबूंच्या हाती द्यावे. पण त्या मध्यरात्री दोघे मित्र दुर्गामोहनदास व द्वारिकानाथ गांगुली हे म्हणाले, ' हे विरोधीपत्र पाठविल्याने केशवबाबूंकडून या पत्रातील मजकुराचा योग्य उपयोग न झाल्यास स्वतंत्र ब्राह्मसमाज स्थापन करावा लागेल हे अनिवार्य आहे. तसे करायला तुमची तयारी आहे की नाही ? ' यावर आनंदमोहनबाबू आणि मी असे दोघेही म्हणालो, ' तसा स्वतंत्र समाज स्थापन करावा असे काही अजून आम्ही ठरविलेले नाही, त्यामुळे तसे वचन

देता येत नाही. सध्या जे आम्हाला कर्तव्य वाटते तेच आम्ही करीत आहो. याचे पर्यवसान काय होईल याचा व नंतर काय करावे याचा अजून विचार केलेला नाही. ' यावर दुर्गामोहनबाबू म्हणाले, ' या असल्या पोरकट व्यवहारात मी नाही असे समजा. जे आमच्याबरोबर अखेरपर्यंत जायला तयार नसतील त्यांच्याशी आम्ही सहमत नाही आणि तसल्या पत्रकावर मी सहीही करणार नाही. ' आणि ते व द्वारिकाबाबू दोघेही निघून गेले.

हे दोघे निघून गेल्यावर विरोधीपत्राचा मजकूर ठरविण्यात आला. दुसरे दिवसापासून त्या पत्रकावर विशिष्ट ब्राह्ममंडळींची स्वाक्षरी घेण्याचे काम सुरू झाले. सर्वांना पूज्य असणारे शिवचंद्रदेव महाशय यांची सही सर्वांच्या प्रारंभी होती. कोणत्या विचाराने काय मनात आले नकळे, पण दोन दिवसांनी दुर्गामोहनबाबू व द्वारिकाबाबू या दोघांनीही त्या पत्रकावर आपली स्वाक्षरी केली. इकडे ९ फेब्रुवारी १८७८ च्या निघणाऱ्या ' इंडियन मिरर ' मध्ये कुचविहार विवाह निश्चित झाल्याचे प्रसिद्ध झाले. त्याच दिवशी आमच्याकडून नियुक्त करण्यात आलेल्या तीन व्यक्ती, विशिष्ट ब्राह्ममंडळींच्या २६ सह्यांचे ते विरोधदर्शक पत्र केशवबाबूंकडे घेऊन गेले. केशवबाबूंचे प्रचारक कांतिचंद्र मित्र यांनी ते पत्र घेतले.

आम्ही अशाप्रकारचे प्रतिवाद पत्र केशवबाबूंकडे पाठविल्यावर लागलीच ते छापून गावोगावीच्या सर्व ब्राह्मसमाजिष्टांना पाठविले आणि त्यांचे मत मागविले. चोहोकडून आमच्याप्रमाणेच विरोधदर्शक पत्रे केशवबाबूंकडे येऊ लागली.

## सरकारी नोकरी सोडली

इकडे माझ्या आयुष्यातील दुसरी आपत्ती उपस्थित झाली. पहिली आपत्ती उपवीतत्याग केला त्यावेळची; आता दुसरी आपत्ती आली ' नोकरी सोडणे ' ही. सरकारी नोकरी करावयाची नाही हा एक नियम होताच. त्या विशेष प्रतिज्ञेच्या दिवसापासूनच सरकारी नोकरी सोडण्याचा कृतनिश्चय केला होता. कॉलेजातून पास होऊन बाहेर पडताच ब्राह्मसमाजसेवेतच आयुष्य घालवायचे, त्या सेवेला संपूर्ण वाहून घ्यावयाचे असे ठरलेच होते. त्यासाठीच केशवबाबूंच्या भारताश्रमात दाखल झालो होतो. त्यांच्याशी जुळले नाही म्हणून काही दिवस दुःखित अन्तःकरणाने कामकाजाला जात होतो; पण आत्मशांती लाभेना, समाधान वाढेना. काय करावे या चिंतेत काळ जात होता. शेवटी १८७६ च्या अखेरीस नोकरी सोडावी असे निश्चित केले. फक्त सगळ्या कामाधामाचे संगतीसोबती व सर्व बाबतीत सल्ला मसलत देणारे आनंदमोहन बसू महाशय यांनी ' काही थोडे दिवस थांबा ' ' काही दिवस थांबा ' असे सांगून काही काल मला अडवून धरले होते.

आता हा संकल्प पुनः अन्तःकरणात जाग्रत झाला. अस्वस्थता वाढू लागली. माझे मन संशयरूपी हिंदोळ्यावर बसल्याप्रमाणे दोलायमान होऊ लागले.

एका बाजूला काळजी आणि भावी सांसारिक भीषणता डोळ्यांना भेडसावू लागली' साधारण ब्राह्मसमाज त्यावेळी भावी काळाच्या गर्भात होता. कोणाच्या तोंडाकडे पाहावे असा कोणीही कुठेच नव्हता. इकडे लक्ष द्यावे तर आता वृद्धावस्थेस पोचलेल्या आई-वडलांना आधार कोणता हा प्रश्न भेडसावू लागला. त्या दोघांनी नेहमीच दैन्य व दारिद्य भोगले आहे. मी त्यांचा एकच एक मुलगा असून-नसून सारखाच होणार. त्यांचे दारिद्य व दैन्य नष्ट होणार नाही इत्यादि इत्यादि. माझ्या दोन स्त्रिया आणि लहान मुलगा व मुली त्यांना तरी कोण पाहणार ? माझ्या संसाराचा भार मी कसा सोसू ? या चिंतेने माझे मन दुबळे बनत चालले. दुसरीकडे ब्राह्मसमाजाच्या नव्या चळवळीने मला चोहोकडून आपल्या जाळ्यात ओढण्याला सुरवात केली. माझ्या ध्याना-मनातून ब्राह्मसमाज जाईना. त्याची मला जास्त ओढ वाटू लागली. शाळेच्या कामकाजाकडेही मला चांगलेसे लक्ष देववेना. ' काय करावे कसे करावे ' या चिंतेने मन अगदी भारावून गेले. माझ्या आहारावरही त्याचा परिणाम झाला. चांगली झोपही येईनाशी झाली. आणि या एकंदर कारणांनी, पचनशक्ती बिघडली. शारीरिक दौर्बल्य जाणवू लागले.

शेवटी माझा कायमचा संकटकालीन मित्र आणि चिंता वाहणारा परमेश्वर याच्या चरणी आत्मनिवेदनाची प्रार्थना करणे हा एकच मार्ग उरला. त्यालाच मी अनन्यभावाने शरण गेलो. आयुष्यातील मुख्य मुख्य संकटाच्या वेळी मी नेहेमी त्याचीच प्रार्थना करीत असे. त्यानेच मला अंधारात प्रकाश दिसू लागे. त्याची अमृतवाणीही ऐकू येई. अन्तर्यामीचे ते शब्द मला संजीवित करीत. एके दिवशी अत्यंत व्याकूलतेने मी त्या परमात्म्याचीच प्रार्थना करायला बसलो. ती प्रार्थना संक्षेपतः अशी होती—

' स्त्री जेव्हा आपल्या प्रियकरासाठी आईबाप, आप्तस्वकीय, लाभालोभाची माणसे या सर्वांना टाकून रस्त्यातील पाथेय म्हणून सौभाग्यालंकाराची पेटी बरोबर घेते. नंतर जरूर पडल्यास त्याचाही त्याग करून पुढे जाण्यास कचरत नाही. तशीच पुढे जाते. त्याप्रमाणे तुझ्यासाठी मी सर्वांना सोडूनही संसाराची शिदोरी म्हणून ज्या नोकरीच्या लोभात गुंतलो आहे. हे परमेश्वरा, आवश्यकता असेल तर त्यातूनही सोडवून तू मला घेऊन जा ! ' या प्रार्थनेनंतर माझ्या अन्तःकरणात एक अद्‌भुत परिवर्तन घडत असल्याचे मला जाणवू लागले. संसाराबद्दलची भीती व काळजी कुठच्या कुठे नाहीशी झाली आणि अन्तःकरणातून ' नोकरी सोड - सोड लवकर ' असा आवाज मला अस्वस्थ करू लागला. माझे मन त्या आवाजात गुंतले. मित्रमंडळीपैकी पुष्कळजण मला या साहसापासून मागे ओढू लागले. पण कुणालाही न जुमानता कुणाचे काहीही न ऐकता नोकरी सोडण्याचे मी निश्चित केले. जाणारा एकेक दिवस मला वर्षाप्रमाणे वाटू लागला. मार्च महिन्याची अखेर गाठली असती तर हेअर स्कूलच्या नियमाप्रमाणे त्या वर्षाचा बोनस म्हणून

स्कूलफंडातून मला दोनशे अगर तीनशे रुपये मिळाले असते. शिक्षक मित्र, त्यासाठी तरी वर्षअखेरपर्यंत थांबा असे वारंवार मला सांगू लागले. पण अन्तःकरणातून निघणाऱ्या आवाजाने मला तितका अवसर देण्याचे नाकारले. १५ फेब्रुवारीलाच मी डायरेक्टरांच्या हाती नोकरीचा राजीनामा देऊन मुक्तीचा सुस्कारा सोडला. १ मार्चपासून स्वतंत्र होऊन मी ब्राह्मसमाजाच्या प्रचाराला व चळवळीला वाहून घेतले. माझा राजीनामा पाहून प्रेसिडेन्सी कॉलेजचे प्रिन्सिपॉलसाहेब व डायरेक्टर-साहेब यांनी मला परत बोलावून राजीनामा परत घेण्याचा आग्रह केला; पण त्यांच्या आग्रहाकडे कोणत्याही प्रकारे मी लक्ष दिले नाही, देऊ शकलो नाही. मित्रांनी जर 'तुमचे चालणार कसे?' असे विचारले असते तर 'मला काही माहीत नाही; पण मी थांबायला तयार नाही. माझ्याने थांबवत नाही.' असे मी स्पष्ट उत्तर देऊन मोकळा झालो असतो.

या वेळेपासून ईश्वराने माझा सर्व भार वाहिला व आयुष्यभर मला योग्य प्रकारे सांभाळले. मी त्याच्या कारुण्याचे आणखी कसे व कशाप्रकारे वर्णन करू? त्याने कोणत्या प्रकारे माझ्या सगळ्या गरजा भागविल्या व हे कार्य अव्याहत कसे चालविले त्याचा विचार केला असता मी स्वतःच आश्चर्यचकित होतो. अकल्पनीय व आकस्मिक अशा अभावग्रस्त अवस्थेतून अगदी सहज आणि कल्पनातीत प्रकारांनी त्याने मला पार पाडले. मला निश्चित केले. धन्य त्याची कृपा!

### प्रगतिशील ब्राह्मदलाची पत्रिका

इकडे आम्ही चळवळ चालविण्यासाठी १७ फेब्रुवारी पासून 'समालोचक' नावाचे एक बंगाली साप्ताहिक पत्र आणि २१ मार्चपासून 'ब्राह्म पब्लिक ओपिनियन' नावाचे एक इंग्रजी साप्ताहिक पत्र प्रकाशित करण्याला आरंभ केला. दुर्गामोहनबाबू व आनंदमोहनबाबू हे दोघेही वरील दोन्ही साप्ताहिकांचा खर्च चालविण्याला तयार झाले. दुर्गामोहनबाबूंचा धाकटा भाऊ भुवनमोहन दास महाशय इंग्रजी साप्ताहिकाचे व मी बंगाली साप्ताहिकाचे संपादक झालो. या साप्ताहिकात चोहोकडच्या ब्राह्मसमाजियांची उलटसुलट मते प्रकाशित होऊ लागली.

### ब्राह्मसमाज कमिटी

ही सगळी मतभेदाची वावटळ आणि वर्तमानपत्री प्रचार झाल्यामुळे कलकत्त्यातील आणि बाहेरील निरनिराळ्या ठिकाणच्या ब्राह्मंडळीत फारच मोठी खळबळ उडाली. या चळवळीने चांगलेच मूळ धरले. हा प्रकार पाहून आम्ही मोठ्या काळजीत पडलो. आमच्या मित्रमंडळीत अशी मसलत ठरली की, या झंझावाताच्या वावटळीत सुकाणूधारकाचे काम करण्यासाठी, समाजातील काही विशिष्ट व्यक्तींच्या सहकार्याने एक 'ब्राह्मसमाज कमिटी' नावाची नियंत्रक समिती

स्थापन करणे चांगले. लोकांचे मतामत व हेतू ओळखून ती समिती, काय उपाय-योजना करावयाची ते ठरवील. ती समिती त्या बाबतीत चळवळही चालवील. ही कमिटी कृतीत आणण्यासाठी एक मीटिंग घ्यावी म्हणून आम्हीं केशवबाबूंकडे २३ फेब्रुवारी रोजी आम्हाला आल्बर्ट हॉल मिळावा अशी मागणी केली. कारण तेच त्या हॉलचे संचालक होते. त्यांनी अनुमती दिली. पण मीटिंग करण्यासाठी म्हणून जेव्हा त्या ठिकाणी आम्ही गेलो तेव्हा 'गॅसचे दिवे देण्याचा हुकूम नाही' असे तेथील व्यवस्थापकाने सांगितले. 'सभेला हॉल द्यावा' एवढाच आदेश केशवबाबूंकडून आला आहे. पण जागा मागणी करताना गॅसच्या दिव्यांचा उपयोग करण्याची मागणी नसल्यामुळे तसे करण्यात आलेले नाही. असेही त्याच्याकडून समजले. यामुळे आमच्यापुढे एक मोठेच संकट उपस्थित झाले. शेकडो लोक सभेला आलेले, त्यात स्त्रियाही होत्या असे मला आठवते. जमलेल्या सर्व लोकांना सभागृहात कुठे कुणी बसावे हेही आम्हाला दाखविता येईना. सर्वत्र अंधारच अंधार पसरलेला. सभा बोलविणारे मोठ्या पेचप्रसंगात सापडले. ताबडतोब बाजारातून मेणबत्त्या, गॅसबत्त्या आणण्यात आल्या. पण दुसऱ्या पक्षातील काही तरुण मंडळीनी आरडून ओरडून, शिव्यागाळी देऊन असा काही बाजार भरविला की, मीटिंग घेताच येईना. त्यानंतर २८ फेब्रुवारीला टॉऊनहॉलमध्ये ब्राह्म मंडळींनी सभा घेऊन 'ब्राह्मसमाज कमिटी' स्थापन केली.

या 'ब्राह्मसमाज कमिटी' संबंधाने आणखी एक गोष्ट आठवते. ठराव लिहिण्याच्या वेळी कोणी कोणी मित्र इतकी कडक भाषा वापरण्याचे सुचवू लागले की, ती भाषा वापरण्याने केशवबाबूंशी एकत्र राहणेच अशक्य होऊन गेले असते. यामुळे आनंदमोहन बसू व मी अशा दोघांनी अशी हरकत घेतली की, 'केशवबाबूंना आम्ही काढून टाकूच असे आम्ही अजूनही म्हणत नाही. म्हणून ज्यामुळे आम्हाला पुढे त्यांना काढून टाकणे भाग पडेल असे शब्द या ठरावात येणार नाहीत.' या आग्रहाच्या हरकतीमुळे ठरावातील शब्दरचना सौम्य झाली.

इकडे यामुळे 'मी अगदी मवाळ माणूस आहे' असे ठरवून मित्रांनी माझ्या हातून समालोचक पत्र काढून घेतले आणि ते द्वारकाबाबूंकडे सोपविण्यात आले आणि मग ते त्या पत्रातून शब्दांचा अग्निवर्षावच करू लागले. मला आणखी असेही आठवते की, यावेळी देवीप्रसन्न राय चौधुरी हे १३ नं. कॉलेज स्ट्रीटवर आमच्याबरोबर राहात असत. ते द्वारकाबाबू गांगुलीशी 'समालोचक' पत्राच्या बाबतीत सहकार्य करू लागले.

## कुचबिहार हिंदू विवाह

केशवबाबू ब्राह्म समाजाच्या विरोधाला न जुमानता, लवमात्र लक्ष न देता विवाहासाठी मुलीला घेऊन कुचबिहार येथे गेले. कुचबिहारमध्ये आमच्या समाजाचे

लोक होतेच. त्यांच्याकडून आम्हाला तिकडे होणाऱ्या बारीक सारीक सर्व गोष्टी कळू लागल्या आणि ' समालोचक ' साप्ताहिकात ' सारस पक्ष्याच्या उक्ती ' या शिरोलेखाखाली आम्ही त्या प्रकाशित करू लागलो. बातम्या येत होत्या. पहिली, केशवबाबूंना कन्यादानविधी करता आला नाही. दुसरी, विवाहविधीत राजाच्या पुरोहित ब्राह्मणांनी पौरोहित्य केले. गौरगोविंद राय नुसते हजर होते. ते काही करू शकले नाहीत. तिसरी, विवाह-संस्कारात ब्रह्मोपासना करता आली नाही. चौथी, विवाहसंस्कारात अग्नी प्रज्वलित करून होम करण्यात आला. वर तेवढा त्या ठिकाणी होता. वधूला उचलून आणण्यात आले. पाचवी, विवाहाच्या ठिकाणी राजकुलाच्या पद्धतीप्रमाणे गौरीहराची स्थापना करण्यात आली होती. प्रतापचंद्र मुझुमदार वगैरेंच्या विरोधाला न जुमानता हा पूजाविधी झाला. मूर्ती उठविण्याचे नाकारण्यात आले.

## आचार्यपदावरून केशवचंद्रांना काढण्यात आले

मुलीचा विवाह आटोपून केशवचंद्र सेन १८ मार्च रोजी परत आले. शहरातील ब्राह्मपक्षात जोराच्या हालचाली व चळवळी चालूच होत्या. केशवबाबू भारतवर्षीय ब्राह्मसमाजाचे संचालक होते. त्या समाजाची सभा बोलविण्याबद्दल शिवचंद्र देव पुढारी असलेल्या ब्रह्मोपासकांचे एक निवेदनपत्र त्यांच्याकडे गेले. ते मीटिंग बोलाविण्याचे मान्य करीनात. अर्थात मीटिंग बोलविण्याचा उपाय खुंटला. तेव्हा त्यांना आचार्यपदावरून काढून टाकण्यासाठी भारतवर्षीय ब्राह्म मंदिराच्या उपासकांनी एक मीटिंग घेण्याबद्दलचे आवेदन पत्र काढले. केशवबाबूंनी ते आवेदन पत्र मानले नाही. अर्थात् मीटिंग भरविता आली नाही. पण या आवेदनपत्राचा अगर आवेदनपत्र काढणाऱ्यांचा उल्लेख न करता केशवबाबूंनी स्वतःच आपल्या नावाने २१ मार्च रोजी एक मीटिंग बोलाविली. ज्या प्रसिद्धीपत्रकाने ही मीटिंग घेण्यात आली त्यातील भाषाच विलक्षण होती. ' बाबू केशवचंद्र सेन विल प्रपोज दॅट बाबू केशवचंद्र सेन बी डिपोज्ड. ' या विलक्षण जाहिरातीचे रहस्य काय आहे हे आम्हाला जाणता आले नाही. असो.

ठीक वेळेवर आम्ही वेगवेगळ्या गटांनी ता. २१ मार्चला सभेला उपस्थित राहिलो. प्रारंभीच अध्यक्ष कोण? या महत्त्वाच्या प्रश्नावर मोठा गोंधळ माजला. केशवबाबूंच्या मित्रांनी त्यांनीच अध्यक्ष व्हावे असे सुचविले. आम्ही म्हटले, ' तसे कसे होईल? ज्यांच्या कार्याचा न्याय करण्याबद्दलची ही मीटिंग आहे ते अध्यक्ष कसे होतील? ' आम्ही अध्यक्ष म्हणून दुर्गामोहनबाबूंचे नाव सुचविले. पण ते मान्य करीनात. कोणी अध्यक्ष व्हावे या चर्चेतच पुष्कळ वेळ निघून गेला. शेवटी दुर्गामोहनबाबूंनाच अध्यक्ष करण्याला केशवबाबूंनी मान्यता दिली. पण यासंबंधाने मते घ्यायच्या वेळी सभासद कोण आणि सभासद कोण

नाही हा प्रश्न आला. केशवबाबूंच्या मित्रमंडळींनी विरोधी पक्षातील अनेकांबद्दल आक्षेप घेण्याला आरंभ केला. शेवटी केशवबाबूंच्या मताने व अनुमोदनाने दुर्गा-मोहनबाबूंची अध्यक्ष म्हणून निवड झाली. नंतर केशवबाबूंनी स्वतःच स्वतःच्या पदच्युतीचा ठराव पुढे यावा असे सुचविले. दुर्गामोहनबाबूंनी अध्यक्ष या नात्याने हा ठराव मांडण्याचे काम माझ्यावर सोपविले. मी ठराव मांडण्याला उभा राहताच केशवबाबू आपल्या पक्षातील मंडळींसह सभात्याग करून निघून गेले. आणि मग सेन कुटुंबीय मुले व त्या मुलांचे मित्र यांनी आरडून ओरडून सभेचे काम स्थगित करण्याचा प्रयत्न आरंभिला.

आम्ही त्या गलबल्यातच कित्येक ठराव पास करून घेतले. त्यांपैकी एका ठरावाने केशवबाबूंना आचार्यपदावरून काढण्यात आले आणि दुसऱ्या ठरावाने काही आचार्यांची नियुक्ती करण्यात आली.

## विलक्षण स्पर्धा

अशा प्रकारे २१ मार्चचा गुरुवार गेला. नंतरच्या रविवार २४ मार्च रोजी बातमी समजली की, केशवबाबूंनी मंदिराच्या दाराला कुलूप लाविले असून, मंदिररक्षणासाठी आपल्या काही अनुयायांना आत बसविले आहे. हे समजताच द्वारिकानाथबाबू गांगुली माझ्याकडे आले आणि म्हणाले, 'चला, आपणही ब्राह्ममंदिराच्या दाराला कुलूप घालून येऊ. मंदिरावर आमचाही हक्क आहे. कारण मंदिरासाठी सर्वांनीच पैसा दिला आहे. केशवबाबू एकटेच कोण जबरदस्तीने अधिकार चालविणार ?' मी या सर्व भांडणात भाग घेण्याची अनिच्छा दर्शविताच ते थोडेसे माझ्यावर रागावले आणि दुसऱ्या दोघा मित्रांना घेऊन मंदिराला स्वतःचे कुलूप लावण्यासाठी गेले.

खरोखरच हा कुलूपबंदीचा प्रकार विलक्षण कुतूहलाचा झाला. द्वारकानाथ गांगुली आणि देवीप्रसन्नराय चौधुरी कुलूप किल्ली घेऊन गेटजवळ गेल्यावर पाहतात तो, मंदिराला कुलूप लाविलेले आहे आणि केशवबाबूंचे काही अनुयायी आत आहेत. हे दोघे जाऊन गेटजवळ उभे राहतात तोच ते धावतच दुसऱ्या बाजूला आले. तर्क-वितर्क आणि वादावादी सुरू झाली. द्वारिकाबाबू त्यांना म्हणाले, 'मंदिर काय केवळ तुमचेच नाही. आमचेही आहे, तुम्ही जबरदस्तीने अधिकार का चालवावा ? आपण आतून कुलूप घातले आहे आम्ही बाहेरून घालू ! ' असे म्हणून द्वारिकाबाबू आणि देवीप्रसन्नबाबू कुलूप लाविण्यासाठी पुढे सरले. केशवबाबूंचे मित्र आतून विरोध करण्याचा प्रयत्न करू लागले. हात धरणे, एकमेकांना रेटणे, ढकलून देणे वगैरे प्रकार सुरू झाले. अशा या खेचाखेचीत केशवबाबूंच्या एका अनुयायी शिष्याच्या हाताला गेटच्या लोखंडी शिगा लागल्या असाव्यात. जखमही झाली असावी. बाहेर अफवा उठली की, प्रतिवादींनी

हाताचा चावा घेतला. या सर्व गोष्टींचा परिणाम काही दिवस हसण्यात आणि वर्तमानपत्री थट्टाविनोदात झाला.

पण ही बातमी शहरात पसरताच सायंकाळी मंदिराच्या दाराशी खूप गर्दी झाली. आमच्या पक्षाचे लोक पुनः सायंकाळी नटून सजून व आपले नियोजित आचार्य रामकुमार विद्यारत्न यांना घेऊन उपासना सभा घेण्यासाठी गेले. मला बरोबर येण्याचा त्यांनी विशेष आग्रह केला, पण मी गेलो नाही. ब्रह्मोपासनेचा अधिकार गाजविण्यासाठी जाणे मला योग्य वाटले नाही. मित्रमंडळींनी तेथे जाऊन पाहिले तो, साधू अघोरनाथ गुप्त अपराण्हकाळी ४ वाजल्यापासून मंदिरातील वेदीवर बसून शास्त्रग्रंथ पठण करीत आहेत. तेव्हा मग ही गेलेली मंडळी स्तब्ध बसून प्रतीक्षा करू लागली. क्रमाने उपासनेची घंटा वाजली. अघोरनाथबाबू वेदीवरून खाली उतरू लागले आणि विद्यारत्न महाशय पुढे जाण्याच्या तयारीत आहेत इतक्यात कोणीतरी मागून त्यांची शाल पकडून त्यांना मागे ओढले. तिकडे केशवबाबू पोलिसांचे पथक बरोबर घेऊन आले आणि त्यांनी वेदी आपल्या ताब्यात घेतली. लागलीच प्रतिवादी पक्ष सुमारे ७०।८० लोकांसह मंदिर सोडून बाहेर पडले. मी त्यावेळी मंदिराजवळील माझे एक परिचित डॉक्टर मित्र उपेंद्रनाथ बसू यांच्या घरात, पुढे काय होते हे पाहण्यासाठी वाट पाहात होतो. लज्जा आणि संकोच वाटल्यामुळे, प्रतिवादी मंडळींबरोबर मंदिरात गेलो नाही. नंतर प्रतिवादी पक्ष मंदिरातून हाकलला गेल्यावर ती सर्व मंडळी डॉ. बसूंच्या घरी आली. आणि मग मी त्यांना घेऊन ब्रह्मोपासना केली.

अशा प्रकारे आमच्या स्वतंत्र उपासनेला प्रारंभ झाला. उपासना झाल्यावर प्रतिरोधकारी पक्ष पुनः मंदिरात अधिकार संपादन करण्यासाठी गेला. मी मात्र त्यांच्याबरोबर गेलो नाही. केशवबाबूंची उपासना तोपर्यंत संपली नसल्याचेही ऐकले. त्यांची उपासना संपताच प्रतिपक्षाने खाली बसून प्रार्थनासंगीत म्हणायला आरंभ केला. यांचे हे संगीत सुरू होताच उमानाथ गुप्त प्रभृती, केशवबाबूंचे कित्येक अनुयायी शिष्य ' दयाल बल जुडाक हिया रे ' हे गाणे म्हणत व मृदंगटाळांचा उद्‌घोष करीत करीत खाली आले आणि प्रतिरोधकारी पक्षाचे संगीत ऐकू न येईल असा प्रयत्न करू लागले. पोलिस सुपरिंटेन्डेन्ट कालीनाथ बसू आपल्या सहचर पोलीस पार्टीसह येऊन आमच्या प्रतिवादी पक्षातील मंडळींना निवडून निवडून बाहेर घालवून देऊ लागले.

## साधारण ब्राह्मसमाज

यानंतर पत्रांची जा–ये करण्यात काही दिवस गेले. तिकडे ब्रह्मसमाज कमिटी, झालेली सर्व हकीगत; कलकत्ता व आसपासच्या ठिकाणातील ब्राह्ममंडळींना कळवून त्यांची मते मागवू लागली. बहुतेक लोकांनी, स्वतंत्र ब्राह्मसमाजाची

स्थापना करावी अशीच सूचना केली. त्याप्रमाणे पुढील ज्येष्ठ महिन्याच्या दुसऱ्या तारखेला ( १५ मे रोजी ) टॉऊन हॉलमध्ये ब्राह्मलोकांची सभा बोलवून साधारण ब्रांह्मसमाजाची स्थापना करण्यात आली.

ह्या विवादिक विषयाचे चिंतन करताना अगर त्याबद्दल लिहिताना खेद तर अवश्य वाटतोच; पण हे भांडणच जर ब्राह्मसमाजाचे एक अंग होऊन राहिले तर मग का लिहू नये ? स्मरण आहे तितके लिहून ठेवणे चांगले म्हणून लिहिले. वादविवाद ब पक्षोपपक्ष सुरू झाले म्हणजे स्पर्धेने मनुष्य कसा अंध बनतो त्याचे दिग्दर्शन करण्यासाठी एका घटनेचा उल्लेख करून या भागाचा उपसंहार करतो.

चालू गडबडीचा व चळवळीचा आमच्या पक्षाने फायदा करून घेण्याचे ठरवून जे जे लेखणीची करामत करण्यात पारंगत होते त्यांनी त्यांनी केशवबाबूं-विरुद्ध लेखणी चालविण्यात कौशल्य दाखविण्याला आरंभ केला. ' हा काय ब्राह्म-विवाह ? ' या नावाची मी एक पुस्तिका लिहिली. पूर्वोक्त संघटित मंडळीच्या पक्षातील एक सदस्य वज्रयोगिनीनिवासी आनंदचंद्र मित्र यांनी एक चांगले उत्तम कवी म्हणून साहित्य क्षेत्रात प्रतिष्ठा मिळविली होती. त्यांनी यावेळी कुचबिहार विवाहाचा विरोध दर्शविणारी एक लहानशी नाटिका रचिली. आम्हांला मात्र हे माहीत नव्हते. इतकेच नव्हे तर ही नाटिका माझे मित्र केदारनाथ राय यांच्या छापखान्यात छापली जात आहे हे मला ठाऊक नव्हते. जेव्हा ही नाटिका प्रसिद्ध झाली तेव्हा त्याची एक प्रत माझ्या हाती पडली. त्यात पाहिले तो अगदी कमी-पणा येईल अशा खालच्या दर्जाच्या उपहासात्मक भाषेत केशवबाबूंवर व त्यांच्या पक्षावर हल्ला चढविला होता. विशेष चुकीची व अन्यायाची गोष्ट ही की आचार्य पत्नीलाही त्यात आणून तिच्यावर त्याच उपहासात्मक बोचक भाषेत श्लेषात्मक विनोद केला होता. आचार्यपत्नीवर अन्तःकरणपूर्वक पूज्यभाव असणाऱ्यांपैकी मी एक होतो. तो प्रकार पाहून मी अगदी भडकलो. ताबडतोब मी आनंद मित्रांना बोलावून आणि केदारनाथांना विनंती करून या पुस्तकाचा प्रचार व प्रसार बंद केला, आणि मिरर ऑफिसात जाऊन केशवबाबूंच्या पक्षातील प्रचारक मित्रांना सांगून आलो की, ही पुस्तिका तुमच्या हातात पडलीच तर मनाला काही वाटू देऊ नका. आम्हाला पूर्वी माहीत नव्हते पण नंतर आमच्या नजरेला ही गोष्ट येताच आम्ही या पुस्तिकेचा प्रचार बंद केला आहे.

हाय ! हाय ! पक्षभेदाने मनुष्य किती अंध बनतो ! तरी पण असे असताही आचार्य पक्षाने आमच्या पक्षावर दोषारोप करावयाचा तो केलाच. म्हणे, ' त्यांनी नाटिका लिहून आचार्यपत्नीची निंदानालस्ती करण्यालाही कमी केले नाही ! ' भाषाही किती हलक्या दर्जाची आहे ! आणि त्यांनी याविषयी अशा रीतीने लिहिले की जणू काय ही नाटिका मीच लिहिली आहे. तेव्हा मात्र

मी फारच शरमिंदा होऊन गेलो. अशा प्रकारच्या पक्षीय झगड्यात धर्म टिकत नाही. आम्ही पक्षांधतेने जो धर्म हरवून बसलो त्याची शिक्षा किती दिवस भोगावी लागणार हे एक परमेश्वरच जाणे.

ब्राह्मसमाजाला या प्रकारांनी बहुजन समाजात जो कमीपणा आला आहे, त्यातून अजूनही तो मान वर करू शकत नाही. अशा बहुजन समाजात ब्राह्म-समाजाची ही अधोगती आमच्याच पापाची शिक्षा आहे, असे म्हणायला हरकत नाही.

* * *

.१२.

# साधारण ब्राह्मसमाजाची स्थापना

साधारण ब्राह्मसमाजाच्या आधाराने मी जे काही केले आहे तेच माझ्या आयुष्यातील मुख्य काम. आता हे मनात आले म्हणजे माझे मलाच आश्चर्य वाटते. कोणत्या तऱ्हेने ईश्वराने मला या भोवऱ्यात आणून टाकले, त्याच्या शब्दांनी वा आदेशाने माझ्यावर कसा अधिकार गाजविला, माझ्या स्वाभाविक दुर्बलतेने मला कितीतरी वेळा त्याने दर्शविलेल्या मार्गापासून व निर्दिष्ट कार्यापासून दूर करण्याचे योजिले; पण त्याने मला मुळीच दूर जाऊ दिले नाही. जणू काय माझी शेंडी पकडूनच हे सर्व त्याने करून घेतले.

एवढे हे महान् व्रताचरण चालू असताही माझे सुखासक्त मन पुष्कळ दिवस सुखाच्या प्रलोभनातून सुटू शकले नाही. वारंवार आत्मविस्मृती आणि ईश्वर-विस्मृतीत सापडून ते सुखाच्या मागे धावत राहिले. विशेष काय सांगू ! या आंत-संग्रामामुळेच माझ्याकडून जितके काम करून घेता येईलसे वाटत होते तितके घेता आले नाही. मी पुष्कळ वर्षे दोन्ही हातांनी ईश्वराची सेवा करू शकलो नाही एक हात प्रबळ अशा प्रवृत्तीच्या सामुदायिक शक्तीशी झगडण्यात गुंतून ठेवावा लागला आणि दुसऱ्या हाताने ईश्वराची होईल ती सेवा केली. वेळोवेळी मनात येई, माझ्यासारख्या दुबळ्या व्यक्तीकडे मुख्य कार्याचा भरिभार नसता तर साधारण ब्राह्मसमाजाच्या दृष्टीने ते चांगले झाले असते. त्याच्यावर लोकांची जास्त श्रद्धा जडली असती.

वास्तविक इतक्या दिवसांनंतरही मी जितका विचार करतो तितके मनाला वाटते की, ज्या महत्त्वाच्या आणि जबाबदारीच्या कार्याला मी हात घातला होता, त्याचा कठीणपणा आणि जोखीम मला कळावी तितकी कळली नव्हती. त्यातील अवघडपणा मला जाणवला नाही. वादविवाद आणि कलह चालू असताना देखील

मी मोठ्या उत्साहाने पुष्कळ कामे करण्यासाठी धावलो. दौर्बल्याकडे लक्ष देण्यास व ते दूर करण्याचा प्रयत्न करण्यास मला वेळ मिळाला नाही. तयारीही करावी तशी केली नाही. नित्याच्या कामकाजाच्या व्यवस्थेतच माझा सर्व वेळ जात होता. धर्मजीवन, त्यातील बिकटपणा आणि खोली यांचा अभ्यास करायला एकांत व मनःस्वास्थ्य मला पाहिजे होते ते मिळाले नाही. साधनाही करता आली नाही. केव्हा केव्हा वाटते, जाऊ द्या. आपण अंग झाडून मोकळे व्हावे या भानगडीतून आणि फक्त सर्वांच्या पिछाडीला राहून प्रोत्साहन देण्याचे काम करावे. पण घटनांमागून घटना अशा घडत गेल्या की मनात काही कल्पना नसताही मला एकदम पुढे सरणे भाग पडले. ईश्वराने मला मागे तर राहू दिलेच नाही पण दूरही ठेविले नाही. ते सगळे उघड करून लिहिण्यात आता अर्थ नाही. कारणही नाही. तो सगळा झगडा होऊन गेला. संपला, जी प्रवृत्ती, सर्पाप्रमाणे मला मधूनमधून वेटोळे घालून निःशक्त बनवीत होती, कासावीस करीत होती ती ईश्वराने निर्दाळून टाकून त्यातून मला मुक्त केले आहे. तो जे करतो ते चांगलेच म्हणायचे. इतकेच नव्हे तर त्याने आतापर्यंत मला झगड्यात गुंतवून ठेविले होते तेही माझ्या कल्याणासाठीच. जे सगळे बैल चालता चालता दोन्ही बाजूंचे गवत व झुडपे खाण्याची इच्छा करतात, त्यावर तोंड टाकू पाहतात त्यांची तोंडे मुखरी घालून बंद केली जातात आणि त्यांच्या पाठीवर चाबकाचे फटकारे मार-मारून सिध्या रस्त्याने सरळ चालण्याला त्यांना भाग पाडले जाते, त्याप्रमाणे विधात्याने मला आपल्या सेवेसाठी मार्गस्थ केले आहे. धन्य आहे त्याचा महिमा. दर्पहारी भगवानाने माझा अभिमान नाहीसा करण्यासाठीच माझे मनःकल्पित गर्वमंदिर मधून मधून मोडून धूलिसात् केले आहे. नाहीतर माझी अभिमानी वृत्ती अहंकारातच संतुष्ट राहिली असती. म्हणून म्हणतो, त्या परमात्म्याची शिकविण्याची पद्धतच वेगळी आणि अतर्क्य.

आणखी एक सांगायचे राहिलेच. मी जर स्वतः प्रलोभनाला वश झालो नसतो, नसत्या भांडणतंट्यात पडलो नसतो, कोणत्या मार्गाने गेल्यास माणसाचा अधःपात होतो याचा सुगावा जर मला लागला नसता तर प्रलोभनात सापडून अधःपाताकडे जाणाऱ्या स्त्रीपुरुषांना मी कसा सहानुभूती दाखवू शकलो असतो ? बुद्धिमान गृहस्थ ज्याप्रमाणे मुलाला कोणा एखाद्या विषयाच्या बाबतीत जबाबदारीची जाणीव करून देताना त्यासंबंधाने खालच्या पायरीपासून वरच्या पायरीवर पाऊल टाकण्याला सांगत असतो, त्याचे संशय, भ्रम, दुःख, प्रलोभन, झगडा यांचे दिग्दर्शन करतो, त्याप्रमाणे मोक्षदाता विधाता आपल्या या सामान्य भक्ताला, अनुग्रहीत सेवकाला दुसऱ्याला साहाय्यक बनेल अशी शिकवण देत असताना बऱ्यावाईट गोष्टींचाही शोध—बोध देण्याला कुचराई करीत नाही. त्याची योजना जितकी विचित्र तितकीच त्याची करुणाही अकल्पनीय ! त्या विधात्याची धन्य आहे !

## साधारण ब्राह्मसमाजाचे नामकरण आणि त्याचा परिणाम

आता साधारण ब्राह्मसमाजाची हकीगत सांगतो. प्रथम सांगावयास पाहिजे की साधारण ब्राह्मसमाज हे नाव कसे झाले? आम्ही जेव्हा स्वतंत्र समाजाची स्थापना केली तेव्हा आमच्या मनात दोन विचार मुख्य होते. पहिला, भारतवर्षीय ब्राह्मसमाजात एकनायकत्व – किंवा एकाधिकार पद्धत पाहिली होती. केशवबाबूच सर्वाधिकारी. अर्थात् आता तसे असता कामा नये. या ठिकाणी लोकतंत्री पद्धतीने सर्व कामे व्हायची. दुसरा असा, केशवबाबू हे ब्राह्मलोक व ब्राह्मसमाज या सर्वांचीच उपेक्षा करीत गेले. येथे तसे होता कामा नये. येथे सभासद व समाजिष्ट या सर्वांच्या मताने कार्य चालायचे. आमच्या मनात हे दोन मुख्य हेतू होते. अर्थात् आम्ही समाजाची घटना व नियम करताना हे दोन उद्देश या समाजाचे मुख्य राहतील असे लिहिले. धर्माविषयी कोणतेही नवीन मत किंवा धार्मिक जीवनाचा कोणता एखादा नवा आदर्श आपण स्थापन करावा असे आमचे ध्येयच नव्हते. उलट आमचा मनोभाव असा होता की, आम्हीच भारतवर्षीय ब्राह्मसमाजाचे खरेखुरे कार्य करीत आहो, तपशिलात थोडाफार बदल इतकेच.

साधारण ब्राह्मसमाज हे नाव कसे ठेवण्यात आले ते आठवत नाही; पण ही मात्र आठवण पूर्ण आहे की, आमच्या मुख्य हेतूला पोषक किंवा मुख्य हेतूचे द्योतक म्हणून, आमचे उत्साही मित्र स्व. वा. गोविंदचंद्र घोष महाशय यांनी या नावाचा उल्लेख केला होता. गोविंदबाबू हे भारतवर्षीय ब्राह्मसमाजाची स्थापना करणारांपैकी एक होते. यांनीच यावेळी आमच्यात सामील होऊन, साधारण ब्राह्मसमाजाच्या स्थापनेविषयी आणि त्याची पहिली नियमावली तयार करण्याविषयी आम्हाला पुष्कळसे साहाय्य केले होते. इतकेच नव्हे तर यावेळी त्यांच्या एका सुपुत्राचेही नामकरण करताना ते त्यांनी 'साधारणचंद्र' असे ठेविले. नाव ऐकून आम्हालाच हसू आले. मग इतर हसतील यात नवल कसले? नामकरणाचा संस्कार आटोपून येताना मी आनंदमोहनबाबूंच्या गाडीतून येत होतो. 'साधारणचंद्र' या नावाच्या बाबतीत गाडीत खूपच हास्यरस उसळला. तेव्हा आनन्दमोहनबाबू म्हणाले, 'माझ्या मुलाचे नाव ठेवताना मी अनुष्ठानपद्धतीचंद्र' असेच ठेवीन.

नव्या समाजाचे 'नाव काय ठेवणार,' 'नाव काय ठेवणार' अशी आमच्या सर्वांच्याच मनात चर्चा चालू होती. जो तो तोच विचार करीत होता. शेवटी एके दिवशी काही मित्रमंडळी मिळून आम्ही महर्षींचे पदवंदन करण्यासाठी गेलो. ते त्यावेळी चुंचुडा शहरात गंगातीरावरील एका घरात एकटेच राहात होते. 'साधारण ब्राह्मसमाज' नाव ऐकून ते म्हणाले, 'चांगले आहे. आमच्या समाजाचे नाव 'आदिसमाज' आम्ही कालसापेक्ष आहो. केशवबाबूंच्या समाजाचे नाव

' भारतवर्षीयसमाज '. ते देशाला धरून आहेत. पण तुम्ही देशकालातीत आहा. तसेच होऊन जा, ' आणि तेथेच आम्ही साधारण ब्राह्मसमाज हे नाव ठरवून आलो. आणि तेच ठेविले.

पण हे नाव ठेवल्यामुळे तीन ठिकाणी तीन परिणाम झाले. जुन्या ब्राह्म मंडळीतील अनेकांनी हे नाव पसंत केले नाही. त्यांना हे नाव वजनदार, अर्थ-गांभीर्यपूर्ण असे वाटेना. पोरकटपणा, बाष्कळपणा असाच यातुन अर्थ निघतो असे त्यांचे म्हणणे आणि यामुळे जुन्या ब्राह्ममंडळीतून जे आमच्यात सामील होतील अशी आम्हाला आशा होती त्यांतील पुष्कळसे आमच्यात सामील झाले नाहीत. दुरूनच पाहात राहिले. दुसरे, हे नाव ठेवल्यामुळे बाहेरील लोक मनात म्हणाले, हे काही कोणा एकाच्या मालकीचे नव्हे. सर्वांचीच मालकी. येथे मनमानेल तसे वागण्याची मुभा आहे. यामुळे असे होई की, बाहेरील लोकांपैकी कोणी मंदिरात येऊन जर गडबड करू लागले आणि त्यांना अडथळा केला तर, ' सर्वसाधारण लोकांची संपत्ती आहे! आम्हाला अडविण्याचे कारण? ' असे ते म्हणतील हे विधान ऐकून आम्ही हसत असू. तिसरा परिणाम झाला तो याहीपेक्षा महत्त्वाचा. या नावाच्या प्रभावाने जे याचे सभासद झाले, त्यांच्या मनात हीच गोष्ट निरंतर जाणवत राहिली की, व्यक्तिगत प्राधान्याला विरोध करणे हेच या समाजाचे मुख्य तत्त्व. कर्मचाऱ्यांना कार्य करण्याला साहाय्य करण्याऐवजी त्यांच्या कार्यातील दोष दाखवून त्यांना वेळोवेळी अडविणे हेच जणू काय समाजाचे मुख्य काम होऊन बसले. अशा हेतूने प्रेरित झाल्यामुळे कार्यारंभ करणे व कर्मचारी मिळणे प्रथम प्रथम आम्हाला फार अवघड गेले. वार्षिक सभेत इतिवृत्त वाचताना, विना-वेतन काम करणाऱ्यांची प्रशंसा करून पुढेही असेच काम केले जाईल अशी प्रशंसा करण्याऐवजी, सभासद मंडळी अशा उत्सुकतेने व कान टवकारून ते इतिवृत्त ऐकत की, यात चूकभूल कुठे मिळते आणि त्याबद्दल कार्यकर्त्यांचे आम्ही वाभाडे कसे काढतो इकडेच त्यांचे सर्व लक्ष. या अवस्थेत कार्यारंभ केल्यावर पुष्कळ वर्षांनी ही प्रवृत्ती पुष्कळशी नाहीशी झाली. पण उत्सुकतेने व कान टवकारून दोष काढण्याची प्रवृत्ती, व्यक्तिगत त्रास देण्याची प्रवृत्ती, व्यक्ति-स्वातंत्र्याकडे जरूरी-पेक्षा अधिक असलेला ओढा आणि एकतेने कार्य करण्याऐवजी वादविवाद कर-ण्याची प्रवृत्ती हे दोष अजूनही पूर्णपणे नाहीसे झालेले नाहीत. साधारण ' ब्राह्म-समाजाची प्रवृत्ती ' म्हटली म्हणजे सभासदातील मतविरोध, दोषप्रदर्शनाची इच्छा इत्यादींचा बोध होतो. पुष्कळ प्रमाणात हे नाव धारण केल्याचा हा परिणाम आहे असे म्हणायला हरकत नाही.

मी पूर्वी सांगितलेच आहे, मी जेव्हा नोकरी सोडली तेव्हा साधारण ब्राह्म-समाजाची स्थापना झाली नव्हती. नुकतीच चळवळ सुरू झाली होती. ही चळवळ कारणरूप झाली खरी पण चळवळ सुरू झाली नसती तरी मी नोकरी सोडलीच

असती. तशी माझी तयारी होती. ब्राह्मसमाजाचा प्रचार आणि ब्राह्मसमाजाची सेवा या दोन कामांचा व्याप सांभाळावा, याच हेतूने मी नोकरी सोडली. परंतु नोकरी सोडली तरी मी कुणालाही भारस्वरूप होऊ नये हे चांगले हाही माझ्या मनाचा हेतू होता. आणि यासाठी असे ठरविले होते की, कॉलेजच्या विद्यार्थ्यां-साठी संस्कृत शिकविण्याचा एक प्रायव्हेट क्लास उघडावा. महिन्याला दोन रुपये-प्रमाणे फी घ्यावी. ३०|४० विद्यार्थी मिळताच माझ्या आवश्यक खर्चाची सोय होईल. उरलेला वेळ मला ब्राह्मसमाजाच्या कामाकडे लावता येईल आणि इतर अनेक कार्यांत विद्यार्थ्यांसाठी एका समाजाचीही स्थापना करता येईल. या कल्पनेनेच मी तसे केले. पण साधारण ब्राह्मसमाज स्थापन झाल्यावर दैनंदिन काम इतके वाढले की, रात्री विद्यार्थ्यांना संस्कृत शिकविण्यासाठी क्लास चालविण्या-इतका वेळच उरला नाही. त्यांच्यासाठी एक समाज स्थापन करणे उरले होते. तो १८७९ साली स्थापन करण्यात आला.

साधारण ब्राह्मसमाज स्थापन होताच निरनिराळ्या कारणांनी माझे श्रम फारच वाढले. प्रथमतः मुख्य पदाधिकारी हे, घटना व नियम तयार करण्यात आणि बाहेरगावी असलेल्या सगळ्या समाजिष्टांशी संपर्क साधण्यात गुंतले. या कामामुळे मला त्यांच्याकडेच संपूर्ण वेळ घालवावा लागे. दुसरे, इंग्रजी साप्ताहिक पत्र ‘ब्राह्म पब्लिक ओपिनियन’ मध्ये ब्राह्मधर्म आणि ब्राह्मसमाजविषयक प्रबंधादि लिहिण्याची; तसेच सहसंपादकत्व आणि तत्त्वकौमुदी पत्रिकेचे संपूर्ण संपादकत्व करण्याची जबाबदारी मला स्वीकारावी लागली.

## तत्त्वकौमुदी

या तत्त्वकौमुदीच्या प्रकाशन आणि संचालनाचा भार सर्वस्वी माझ्यावरच सोपविला गेला होता. आम्ही कित्येक महिन्यांपूर्वी ‘समालोचक’ नावाचे एक बंगाली साप्ताहिक सुरू केले होते आणि माझ्या मित्रांनी माझ्या हातून काढून घेऊन ते मित्रवर्य द्वारकानाथ गंगोपाध्याय यांच्या हाती सोपविले होते. ते नव प्रतिष्ठित साधारण ब्राह्मसमाजाचे प्रमुख साप्ताहिक करावे हे योग्य वाटेना. ते नावही कुणाला आवडेना. शिवाय ज्या तऱ्हेने ते चालविले जात होते त्यातही बदल करणे जरुरीचे वाटले. म्हणून त्याची संपूर्ण जोखीम एका ब्राह्म मित्राच्या हाती सोपवून आम्ही नवीन स्थापन केलेल्या साधारण ब्राह्मसमाजासाठी एक नवीन पत्र सुरू करण्याच्या मार्गाला लागलो. नूतन नियतकालिकाचे नाव काय असावे याचा विचार करता करता; महात्मा राजा राममोहन राय यांनी एक नियतकालिक चालविले होते त्याचे नाव होते, ‘**कौमुदी**’ आदिब्राह्मसमाजाचे नियतकालिक ‘**तत्त्वबोधिनी.**’ भारतवर्षीय ब्राह्मसमाजाच्या नियतकालिकाचे नाव ‘**धर्मतत्त्व**’ असे मनात येऊ लागले. शेवटच्या दोन नियतकालिकांपैकी ‘तत्त्व’

आणि राजा राममोहन राय यांचे 'कौमुदी' अशी दोन्ही नावे एकत्र करून आमच्या नियतकालिकाचे नाव 'तत्त्वकौमुदी' असे ठेविले. आमच्या मनातील हेतू असा होता की, राजा राममोहन राय यांच्या कालापासून आध्यात्मिक आणि सार्वजनिक महान् धर्माचा जो भाव प्रचारित होत आला आहे तोच तत्त्वकौमुदीने पुढे चालवावा. १८७८ सालच्या २९ मे रोजी ज्येष्ठाच्या १६ तारखेला 'तत्त्व-कौमुदी' चा पहिला अंक निघाला.

तत्त्वकौमुदीतील प्रत्येक ओळ मलाच लिहावी लागे. असेच पुष्कळसे दिवस गेले. साहाय्यक असा कोणीच मिळेना. एकेका दिवशी तर असे व्हावे की, दोन्ही पत्रिकांचे अंक एकेच दिवशी निघावयाचे. सकाळचे स्नान व उपासना आटोपताच छापखान्यात जाऊन बसायचे आणि दोन्ही पत्रिकांचे काम आलटून पालटून चालू करायचे. तत्त्वकौमुदी झाली की ब्राह्मपब्लिक ओपिनियन. असे सगळा दिवसभर चालायचे. मध्ये फक्त एका तासात जेवण करून घ्यायचे, तितकाच मोकळा वेळ. अशा प्रकारे काम करून रात्री दहा वाजता झोपायला जायचे असे ठरलेले. पण केव्हा केव्हा त्यावेळीही घटना व नियम बनविणाऱ्या कमिटीत जाऊन बसावे लागे. एक दिवसाचे वेळापत्रकच मला आठवते. त्या दिवशी सकाळी ६ वाजता जो कामाला बसलो तो रात्री ११ वाजता एक पुस्तिका लिहून पुरी केली. या पुस्तिकेचे नाव 'हा काय ब्राह्मविवाह ?'

## साधारण ब्राह्मसमाजाची नियमावली तयार करणे

पहिल्याप्रथम घटना व नियमावली तयार करणे हा एक फार मोठ्या कष्टाचा व गुंतागुंतीचाच भाग होता. एका आनंदमोहन बसूंखेरीज आम्ही सगळेच या बाबतीत अनभिज्ञ होतो. तेच याबाबतीत आमचे सारथी झाले. तेव्हा त्यांच्याच घरी या घटना व नियमावली तयार करणाऱ्या कमिटीचे वारंवार अधिवेशन भरे. त्या अधिवेशनात विचारविनिमय आणि तर्कवितर्क यांचाच काथ्याकूट चालायचा. घटना आणि नियम सर्वांगसुंदर व कायदेशीर कशा तऱ्हेने होतील, गतकालातील चूकभुलीचे संशोधन कसे होईल, ब्राह्ममंडळींत एकता कशी नांदेल, ब्राह्मसमाजाचे सामर्थ्य कसे वाढेल ही सगळी काळजी सर्वांनाच जाचत होती. शेवटी घटना व नियम तयार होऊन त्याच्या प्रती शहरातील व शहराबाहेरील सर्व समाजांकडे पाठ-विण्यात आल्या व त्यांच्याकडून मतेही येऊ लागली. त्या मतामतांचा विचार करण्यात कमिटीचे दिवसामागून दिवस जाऊ लागले. सभा होऊ लागल्या. मी एके दिवशी आनंदमोहन बसूंना हसत हसत म्हटले, 'ही कमिटी काही 'कमि'टि राहिली नाही 'बेशि'टि होऊन गेली.' ( कमी=कमी; बेशि=जास्त; टि हा आदरार्थी प्रत्यय. )

एका दिवसाची घटना मला चांगलीच आठवते. त्या दिवशी सकाळीच

६ वाजल्यापासून सायंकाळी ६–३० वाजेपर्यंत मी 'ब्राह्मपब्लिक ओपिनियन' व 'तत्त्वकौमुदी'च्या कामात अगदी गढून गेलो होतो, तितक्यात अगदी काळोख पडताना आनंदमोहन बसूंकडून पत्र आले की, त्या दिवशीच्या नियामक कमिटीत तुम्ही असणे अवश्य आहे.' मी उत्तरी लिहिले, 'मला वगळून काम चालू दे. मी आज सकाळपासून आतापर्यंत येथेच कामात गुंतलो आहे.' यावर त्यांनी लिहिले, तुम्ही उपस्थित असलेच पाहिजे. रात्रीचे जेवण झोप वगैरे येथेच होईल.' अर्थात मला जाणे भाग पडले. तेथे गेल्यावर जेवण वगैरे आटपून ६॥ वाजता नियम तयार करण्याच्या कामात गढून गेलो. नियमावलीचा निष्कर्ष निघता-निघता रात्रीचा एक वाजला. माझ्याने बसवेनासे झाले. झोपेने डोळे झाकू लागले. शेवटी मित्रमंडळी प्रश्नोत्तरात गढून गेलेली पाहून मी हळूच आनंदमोहनबाबूंच्या डिनरच्या टेबलाखाली उतरलो व खाली असलेल्या मॅटिंगवर आडवा झालो आणि तेथेच गाढ झोपी गेलो. सुमारे ३ वाजता रात्री तेथे माझी अनुपस्थिती सर्वांना जाणवली. नंतर माझा शोध सुरू झाला. मला यातले काहीच समजले नाही. मी गाढ झोपलो होतो. शेवटी आनंदमोहनबाबूंनी टेबलाखाली डोकावून पाहिले तो मी झोपलेला असल्याचे त्यांना दिसले. तेव्हा मोठाच हास्यकल्लोळ उडाला. अखेरीस आनंदमोहनबसूंनी माझ्या दोन्ही पायांना धरून बाहेर काढले आणि डोळ्यांना पाणी लावून नवीन ठराव ऐकण्याची मला विनंती केली.

## आनंदमोहन बसू

या ठिकाणी आनंदमोहन बसू महाशयांसंबंधाने थोडीफार विशेष हकीगत सांगणे अवश्य वाटते. साधारण ब्राह्मसमाजाची स्थापना व त्याची कार्यपद्धती या-संबंधाने त्यांनी जे काही केले ते कायमचे आठवणीत राहण्यासारखेच झाले. साधारण ब्राह्मसमाजाच्या सर्व सदस्यांनी प्रारंभीच त्यांना अध्यक्ष म्हणून निवडून दिले हे योग्यच झाले. कारण त्यांच्याच सहाय्यामुळे आमच्या सर्व हालचाली व कामकाज बिनचूक होत गेले. त्यात त्रुटी राहिली नाही. त्यांच्या सारथ्याशिवाय आम्हाला हा डोलारा उभाच करता आला नसता. त्यांनी यावेळी जे अविश्रांत परिश्रम केले ते प्रत्यक्षदर्शी लोक कधीच विसरणार नाहीत. इतरांना त्याची कल्पनाही येणार नाही. विशेष सांगावयाचे म्हणजे साधारण ब्राह्मसमाजाच्या शीर्षस्थानी ते होते आणि मी त्यांचा उजवा हात होतो. आमच्या दोघांच्या मताने जे ठरवीत असू तेच मी करीत असे. १८७४ साली ते विलायतेहून ज्या दिवशी आले त्या दिवसापासून ब्राह्मसमाजासंबंधाने जे जे काही माझ्याकडून केले गेले ते त्यांच्याच सल्ल्याने होते, असे मी म्हटले तर ती अतिशयोक्ती होणार नाही. तसेच तेही जे करीत ते मला विचारल्यावाचून, माझे मत घेतल्यावाचून करीत नसत. हा आमचा सहवास अविच्छिन्न होताच आणि ही स्वाभाविक मैत्रीही

कायम टिकली. मी अशा कितीतरी रात्री त्यांच्या घरी घालविल्या आहेत. त्यात केवळ ब्राह्मसमाजाचेच चिंतन असावयाचे. शेवटी रात्री दोनतीन वाजता जेव्हा त्यांची पत्नीच आम्हाला काळवेळाची आठवण करून देई आणि उठवी, तेव्हाच आम्ही झोपायला जात असू. आनंदमोहनबाबू मीटिंगला येणार आहेत असे जेव्हा आम्हाला समजे तेव्हा आम्हाला भीती वाटे की, आज रात्री दोन वाजण्याच्या आत काही मीटिंग संपणार नाही. कामालाही अंत असणार नाही. बोलणे तर चालायचेच. स्वतः ते उठणार नाहीत. आम्हालाही उठू देणार नाहीत. वास्तविक त्यांच्या हातून कोणाची सुटका होणेच कठीण. कुणी उठू लागलाच तर ते स्वतः खुर्चीवरून उठून दोन्ही हातांनी त्याला धरून जोराने बसवीत आणि म्हणत, 'आणखी थोडा वेळ बसा. आता सगळे एकदमच उठूया.' आणि हा 'थोडा वेळ' म्हणजे दोनतीन तासांची गणती. त्यांच्या पत्नीच्या तोंडून ऐकले आहे की, या संधीला खटल्याचे कागद पाहताच ते म्हणायचे, 'हे सर्व कालसर्प आहेत. पाहाताच भीती वाटते. पोटासाठी बॅरिस्टरी करायची इतकेच.' हायकोर्टाचे ॲटर्नी त्यांच्या बाबतीत आम्हांला सांगायचे, 'हाय हाय, इतकी शक्ती असून काम काही व्हावे तसे होत नाही. बोस एकदा सांगू देत की आपण स्वस्थपणे शहरात बसून राहातो. आणि मग पाहा, आम्ही त्यांना फर्स्ट प्रॅक्टिशनर म्हणून प्रसिद्धीला आणतो. पण बसू महाशय आमच्या बोलण्याकडे लक्षच देत नाहीत. बाहेरगावी जाऊन थोडी-फार जास्त पुंजी जमा करून आणीत. अशाने ब्राह्मसमाजाचे काम आपल्याला जास्त करता येई. जास्त वेळ देता येई. त्यांची कामकाज करण्याची ही अशी पद्धत होती. अनन्यतेने देशाच्या कल्याणाच्या कार्यात संपूर्ण लक्ष घालावे असे त्यांना मनापासून वाटे. पण परिवार मोठा असल्यामुळे हे त्यांचे विचार जागच्या-जागीच मावळून जात. त्यांचा तो आकृत्रिम विनय, निर्मल ईश्वरप्रेम, निष्कपट स्वदेशानुराग, स्वजनप्रेम आणि अशाप्रकारची कर्तव्यनिष्ठा फारच थोड्या माणसांत मला आढळली. मोठे सुदैव आणि परमात्म्याची महत्कृपा हीच की, अशा दुर्मिळ देवमाणसाला मी मित्ररूपाने मिळविले होते.

साधारण ब्राह्मसमाज स्थापन झाल्यावर याची प्रारंभिक कार्यव्यवस्था कर-ण्यात काही महिने गेले. प्रथम नियमावली तयार करणे, ती सर्व सदस्यांकडे पाठवून त्यांची मते मिळविणे आणि त्या वेगवेगळ्या सूचनाउपसूचनांचा विचार करून निश्चित धोरण ठरविणे, एका मुद्रणालयाची स्थापना करून त्यात समाजाचे नियतकालिक व पुस्तकादि छापणे आणि प्रचार करणे या कामातच मला निरंतर गुंतून राहावे लागले.

## साधारण ब्राह्मसमाजाचे पहिले प्रचारकपथक

अशाप्रकारे काही महिने निघून गेल्यावर शेवटी समाजाच्या कमिटीला

ब्राह्मधर्म प्रचाराच्या कार्याकडे लक्ष देण्याला वेळ मिळाला. चार व्यक्तींना आपले मुख्य प्रचारक म्हणून निवडण्यात आले. त्या चार व्यक्ती या— ( १ ) पंडित विजयकृष्ण गोस्वामी ( २ ) पंडित रामकुमार विद्यारत्न. ( ३ ) बाबू गणेशचंद्र घोष आणि ( ४ ) मी स्वत .

यात पंडित विजयकृष्ण गोस्वामी हे सर्वसाधारण लोकांत चांगल्या परिचयाचे. हे संस्कृत कॉलेजात माझे सहाध्यायी होते हे मी पूर्वी सांगितलेच आहे. शिवाय पुरोगामी ब्राह्मसमाजाकडे लक्ष वेधण्याला ते मुख्य कारण झाले होते. विभूतिपूजेला विरोध केल्यावरही केशवबाबूंशी पुनः सहयोग साधून ते पुनः प्रचारकार्यात गढून गेले होते. १८७१–७२ सालची भारतसुधारसभा व त्यातील धर्मादाय विभाग आणि प्रौढ महिला विद्यालय तसेच भारतआश्रम स्थापित झाल्यावर आपल्या प्रकृतिस्वास्थ्याकडेही लक्ष न देता प्रौढमहिलांना शिकविण्यात व वेहाला नावाच्या गावी मलेरियाने ग्रस्त झालेल्या रयतेला, धर्मादाय औषधे देण्यात मुख्य वितरक म्हणून ते पुढे सरले होते. अगदी सकाळीच उठून स्नान आणि उपासना आटोपून औषधांची पेटी घेत आणि सहासात मैल वेहालागावी औषधे देण्यासाठी चालत जात व तेथून दुपारी बारा अगर एक वाजता परत येऊन जेवीत. जेवल्यानंतर दोन वाजता प्रौढ स्त्रियांना शिकविण्यात मग्न होत. त्यानंतर अनेक दिवस मी पाहात असे तेव्हा ते स्त्रियांसाठी त्यांना योग्य अशी पुस्तके लिहिण्यात रात्रीच्या वेळी गढून गेलेले असत. मी वारंवार या अतिश्रमाबद्दल त्यांना सावध करीत होतो; पण माझ्या सांगण्याकडे ते लक्षच देत नसत. पण हे अतिश्रम प्रकृती किती दिवस सहन करणार ? एके दिवशी छातीत कळ आल्यामुळे हे गुसाईजी बेशुद्ध होऊन पडले. आणि मग ते छातीचे दुखणे तसेच राहून गेले. ती व्यथा सहन व्हावी म्हणून मोठ्या प्रमाणात मॅर्फिया सेवन करण्यावाचून दुसरा उपायच उरला नाही. आणि मग त्याचे प्रमाण वाढत गेले. त्याशिवाय त्या वेदना कमी होतच नसत. पुढे तर ती त्यांना सवयच होऊन गेली. सेवन करण्याचे प्रमाणही बरेच वाढले. यानंतर आपले राहण्याचे व कार्याचे मुख्य ठिकाण वाघआँचडा हे ठरवून तेथे ते बराच काळ घालवू लागले. येथे असतानाच त्यांनी कुचबिहारच्या विवाहाला विरोध दर्शविला होता. नंतर साधारण ब्राह्मसमाज स्थापन करणाऱ्या प्रमुखांना ते भेटले. त्यात सामील झाले आणि शेवटी ते आमचे प्रथम व प्रमुख प्रचारकही बनले.

विद्यारत्न भैय्या तर पूर्वीपासूनच आमच्यात मिळूनमिसळून काम करीत होते. त्यांनी ब्राह्मधर्माची दीक्षा घेतल्यावर त्यांची पत्नी त्यांच्याबरोबर राहिली नाही. त्यांचे सासरे हे एक प्रसिद्ध असे तांत्रिक साधक ( शाक्त ) होते. संसाराशी संबंध न ठेवता ते ठिकठिकाणी फिरून दिवस काढीत. स्वतःची मुलगी विवाहित असली तरी वयाने मोठी नसल्यामुळे त्यांनी तिला ब्राह्मसमाजिष्ट नवऱ्याकडे

पाठविली नसावी. कोणत्याही कारणाने असो पण विद्यारत्न महाशयांची पत्नी ज्ञानदा पुष्कळ वर्षे आमच्याकडे आली नाही हे खरे. अर्थात् विद्यारत्न भैय्या आपल्या सासऱ्यांप्रमाणे स्वतंत्रपणे ठिकठिकाणी ब्राह्मधर्माचा प्रचार करण्यासाठी फिरू लागले. समदर्शी पथकाशी केशवबाबूंच्या पथकाचे जुळेना म्हणून ते तिकडे गेलेच नाहीत. स्वतंत्र कार्य करू लागले. महर्षी देवेंद्रनाथांची त्यांच्यावर फारच कृपा होती. ते त्यांना खूप मदत करीत असत. साधारण ब्राह्मसमाज स्थापन झाल्यावर त्याच्या उत्साही प्रचारकांत हे अग्रगण्य झाले तेव्हा त्यांनाही प्रमुख प्रचारकांत घेण्यात आले.

बाबू गणेशचंद्र घोष हे यापूर्वी आसामात कसल्याशा कारभारात गुंतले होते. यावेळी तो सर्व स्वोपार्जनाचा कारभार सोडून प्रकृतिस्वास्थ्यासाठी ते मुंगेर येथे आले व आमच्याच परिवारात राहू लागले. साधारण ब्राह्मसमाजाची स्थापना होताच त्यांनी प्रचारक पथकात सामील होण्याची इच्छा दर्शविली. तेव्हा त्यांनाही प्रमुख प्रचारकांत घेण्यात आले.

## बिहारी एक्क्यातून प्रचारयात्रा

प्रचारक म्हणून आमची चौघांची निवड होताच आम्ही निरनिराळ्या ठिकाणी प्रचारकार्यासाठी बाहेर पडलो. २४ मे १८७८ रोजी मी बिहार आणि बंगालच्या वायव्येकडील प्रांतात प्रचारासाठी निघालो. प्रसन्नमयी आणि विराज-मोहिनी त्यावेळी मुलांना घेऊन मुंगेर येथेच राहात होत्या. मी प्रथम तेथे गेलो. त्या ठिकाणी द्वारकानाथ बागची नावाचे एक उत्तम गायक असे ब्राह्ममित्र राहात होते. त्यांना मी माझ्याबरोबर घेतले. माझ्या विनंतीवरून नोकरी सोडून त्यांनी माझ्याबरोबर येण्याचे मान्य केले. आम्ही त्यावेळी कोणकोणत्या ठिकाणी काय काय विशेष काम केले ते सगळे आता आठवत नाही. वेगवेगळ्या ठिकाणी फिरता फिरता उत्तर बिहारमधील नेपाळच्या सीमेला लागून असलेल्या मतिहारी शहरी त्यावेळी गेलो असल्याचे आठवते. त्यावेळी तेथे जाण्याला रेल्वेची सोय नव्हती. मुजःफरपुराहून ५० मैलांचा प्रवास एक्कागाडीतून करावा लागे. एक्का गाडीत बसण्याचा हा मला पहिलाच प्रसंग. एक्कागाडी हे एक अद्‌भुत वाहन असल्याचेच मला दिसले. एकच घोडा त्याला जुंपलेला. घोडा हाकणाऱ्याच्या मागे उतारूंनी बसावयाचे. बैठक एकापुरतीच अर्थात् दोघांना बसण्याला जागा अपुरी. त्यावर घुमटीसारखे एक आच्छादन. त्याने उन्ह-पावसापासून चांगलेसे रक्षण होणे कठीण. चाकाला स्प्रिंगा नाहीत. खटखट आवाज व्हायचा व वरखाली उठल्या पडल्या-सारखे व्हायचे. अर्ध्या तासातच माझ्या कमरेला कळ लागली. गाडीच्या दोन्ही चाकांना करताल बांधलेला. त्यामुळे चाकांच्या खडखडाटात आणि करतालच्या झणझणाटात बाहेरचे काहीच ऐकू येत नसे. गाडी वेगाने धावू लागली की चाकाच्या आवाजाने कान गप्प होत. गाडीत बसल्यावर असे वाटले की उतारूंनी ' आई ग,

बाबारे ' म्हटले तर कुणाला ऐकू जायचे नाही. इतकेच नव्हे तर, गाडीवानालाही ते ऐकू येणार नाही. आणि त्याच्या गाडी चालविण्यात खंड पडणार नाही.

या एक्कागाडीतून जाताना पहिल्याच दिवशी काही मैल गेल्यावर मी एका दुकानात उतरलो आणि जवळ जवळ बेशुद्धच होऊन पडलो. आता सकाळी उठून पुढे जाणे काही होत नाही असेच मनात आले. पण सकाळी उठून पाहातो तो कंबर दुखण्याची बरीच कमी झाली. लागलीच पुढच्या प्रवासाला आरंभ केला. दोन दिवसांनी मतिहारी शहरात दाखल झालो, तेथे काही दिवस मुक्कामच केला. पुढे आणखी दोनदा मी त्या शहरात गेलो.

मतिहारीहून परत आल्यावर आम्ही बांकीपूर आणि अलाहाबादवरून लखनौला आलो. तेथे येताच मला एक तार आली. त्यावरून माझी थोरली मुलगी हेमलता कलकत्ता येथे फार आजारी असल्याचे कळले. मुंगेर येथे परिवाराची राहण्याची व्यवस्था केली व बायकामुलांना तिकडे पाठविले; तेव्हा शिक्षणासाठी म्हणून एका मित्राच्या देखरेखीखाली हेमलतेला कलकत्त्यालाच ठेवून आलो होतो. तारेने ही बातमी येताच मी लखनौचे काम बंद ठेवून कलकत्त्याला निघालो. येताना मुंगेरहून प्रसन्नमयीला बरोबर घेतले होते. विराजमोहिनी सर्व मुलांना घेऊन मुंगेर येथेच राहिली.

## साधारण ब्राह्मसमाजाचे मंदिर उभारण्याची खटपट

प्रचारक म्हणून प्रवास केल्यावर मी कलकत्त्याला परत आलो आणि ' तत्त्वकौमुदी'चे संपादकत्व, उपासक मंडळींचे आचार्यत्व वगैरे कामात मग्न झालो. भारतवर्षीय ब्राह्ममंदिराचा त्याग केल्यावर त्याच्याच मागच्या बाजूला असलेल्या डॉ. उपेंद्रनाथ बसू यांच्या घरात काही दिवस आमचे दैनिक उपासनेचे कार्य चालले. उपेंद्रनाथ बाबू, या आपत्काली आमचे सहाय्यक बनून आपले देवघर आमच्या उपासनेसाठी देऊन आमचे उपकारकर्ते झाले होते. काही दिवसांनंतर ४५ नं. बेनियाटोला लेनमध्ये एक सुप्रशस्त खोली भाड्याने घेऊन तेथे आम्ही साप्ताहिक उपासनेचे फर्निचर, पुस्तके वगैरे घेऊन आलो. यावेळी तेच ठिकाण आमचे प्रमुख उपासनाकार्यालय बनले.

मी प्रचारकार्य संपवून आल्यावर पाहिले तो, मित्रमंडळींनीं २११ नं. कॉर्नवॉलिस स्ट्रीटवर एक लहानसा जमिनीचा तुकडा ठरविला होता आणि त्या ठिकाणी उपासना मंदिर बांधण्याच्या हेतूने तो तुकडा विकत घेण्याची त्यांची इच्छा होती. त्यासाठीं प्रत्येकाने स्वतःची एक महिन्याची प्राप्ती देण्याचे कबूल केले होते. मी या मंडळीत उत्साहाने सामील झालो. पुढे ऐकले, की आर्थिक सहाय्यासाठी महर्षी देवेंद्रनाथ यांच्याकडेही एक विनंतिपत्र पाठविण्यात आले असून त्यावर माझे, दुर्गामोहनबाबू यांचे व गुरुचरण महलानवीश यांचे आणि

इतर कोणाकोणाचे अशी नावे आहेत. महर्षींनीं, आपले वडील चिरंजीव द्विजेन्द्रनाथ ठाकूर महाशयांना ही बातमी कळवून विशेष माहिती मिळविण्यास सांगितल्याचेही समजले. त्या माहितीत जमिनीची किंमत, मंदिर बांधण्यासाठी होणारा खर्च, ट्रस्टी कोण आहेत, या प्रश्नांचा अन्तर्भाव होता. यावरून वाटले की, ते ट्रस्टी नेमण्यापूर्वी रक्कम देणार की नंतर, कोणाकडे देणार, किती देणार हे अजमावीत असावेत.

एके दिवशी महर्षींची भेट घेण्यासाठी गेलो. ते त्यावेळी आपल्या जोडासांको येथील भव्य वाड्यातच होते. जाऊन पाहिले तो भक्तिभूषण राजनारायण बसू महाशय तेथे बसलेले दिसले. मग आम्हा तिघांत पुष्कळच बोलणे झाले. महर्षींचा माझ्यावर व राजनारायण बसूंवर फारच लोभ होता. राजनारायण बसू व मी एकदम तेथे असणे हा महर्षींना एक मणिकांचन योगच वाटला. त्यांच्या हृदयाचे द्वार उन्मुक्त झाले. प्रेमानंदाचा झरा उफाळून येऊ लागला. तिघांच्याही आनन्दोल्हासयुक्त खुल्या हास्याने तो एवढा मोठा वाडा हादरून जाऊ लागला. हळूहळू निर्झराच्या सुस्निग्ध जलाप्रमाणे महर्षींच्या वाक्स्रोताला भरती आली. त्यात हाफेज, नानक, अनेक ऋषी, उपनिषदे, आली. आम्ही दोघे तर त्या वाक्झरीत ओतप्रोत न्हाऊन निघालो. पाहिले तो, बोलता बोलता महर्षींचे दोन्ही कान लाल झालेले दिसले. त्यांच्या मस्तकावरील केसही मधून मधून ताठ होत होते. अशावेळी बोलण्यात थोडा विच्छेद झालेला दिसताच मी विचारले, 'आमच्याकडून आलेल्या आर्थिक सहाय्याबद्दलच्या विनंतीचे काय झाले?' यावर महर्षी हसून म्हणाले, 'तुमचा अर्ज फाईल करण्यात आला आहे.' पुनः मी विचारले, 'मग त्याचा निकाल केव्हा बाहेर पडणार?'

महर्षी म्हणाले, 'काही दिवसांनी.'

यानंतर पुनः वाक्यालापांचे तरंग, हास्याचे फवारे आणि भावनेच्या लाटा पसरू लागल्या. शेवटी मी निरोप घेण्याच्या हेतूने उठलो, तेव्हा महर्षींनीं माझा हात धरून म्हटले, 'चला काहीतरी खाऊ घातल्यावाचून मी तुम्हाला निरोप देणार नाही.' नंतर माझा हात धरून ते मला दक्षिणेकडील कोपऱ्यात असलेल्या एका खोलीत घेऊन गेले. पाहातो तो तेथील टेबलावर निरनिराळ्या मिष्टान्नांनी परिपूर्ण पात्रे आमची वाटच पाहात होती. महर्षींनी मला एका खुर्चीवर बसविले. ते स्वतः माझ्याजवळच्याच एका खुर्चीवर बसले. आणि स्वतःच्या हाताने एकेक खाद्य पदार्थ उचलून माझ्या हाती देऊ लागले. महर्षींची ही पद्धतच होती की ज्याच्यावर त्यांचा लोभ असेल त्याला ते स्वतःच्या हाताने उचलून एकेक पदार्थ खावयास देत आणि आनंदित होत. मलाही त्यांनी तसेच केले. खाता खाता मी म्हटले, 'पुष्कळ झाले; पोट भरले अगदी' त्यांनी एक चांगला खाण्याचा जिन्नस उचलला आणि हसून म्हटले, 'तसे म्हणून कसे चालेल बाबा, हे सर्व पदार्थ घरच्या

बायकामंडळींनी स्वतःच्या हाताने बनविले आहेत. नाही खाल्ले तर त्यांचा मान तो काय राहिला ! तुम्ही तर स्त्रीस्वातंत्र्याच्या पक्षाचे ' असे म्हणून ते खूप मोठ्याने हसले. असले सुंदर, असे पवित्र आणि इतके निष्कपट हास्य मनुष्यात मला फारच कमी आढळले. राजनारायण बसू महाशय आणि महर्षींचे वडील सुपुत्र द्विजेंद्रनाथ ठाकूर आमच्यात निष्कपट हास्याबद्दल प्रसिद्ध होते. पण महर्षींचे हास्य काही कमी चित्ताकर्षक नव्हते ! तरीपण सर्वांनाच हे त्यांचे हास्य दिसण्याचा अगर ऐकण्याचा योग येत नसे. अगदी अन्तरंगी प्रेमळ माणसांनाच हे प्रेमाचे अट्टहास्य ऐकण्याला मिळे. तेच सुदैवी असत.

खाणे झाल्यावर पुनः आम्ही महर्षींच्या बैठकीच्या खोलीत आलो. पाहतो तो राजनारायण बसू तोपर्यंत बसूनच होते. हळूहळू त्यांच्या कानात या भरपेट खाण्याबद्दल मी बोललो. वर्णनही केले तेव्हा तेही हसू लागले. तितक्यात पाहतो तो, महर्षींनी आपली कॅशबॉक्स आणण्याचा आदेश दिलेला दिसला. ती बॉक्स येताच त्यांतील चेकबुक काढून ते लिहू लागले. माझे तिकडे लक्ष गेल्याचे पाहा-ताच ते हसतहसत मला म्हणाले, ' तुमच्या अर्जाचा निकाल लिहीत आहे. '

मी राजनारायण बसूंना उद्देशून म्हटले, ' केवळ ब्राह्मणभोजनच नव्हे तर हातोहात दक्षिणेचाही दानधर्म व्हायचा योग दिसतो ! '

राजनारायण बसू यावर म्हणाले, ' खरेच. असाच योग दिसतो खरा.'

महर्षींनी चेकवर सही करून तो माझ्या हाती देत इंग्रजीत म्हटले, ' धिस् इज माय अन्‌कंडिशनल गिफ्ट् ' मी मनात विचार केला, ' ट्रस्टींच्या नेमणुकीचा बंदोबस्त इत्यादी प्रथम त्यांना पाहायचे होते. पण त्या अटी आता राहिल्या नाहीत. '

चेककडे नजर देऊन पाहिले. सात हजारांचा चेक होता. पूर्वी मित्र-मंडळीच्या तोंडून ऐकले होते, 'आपण दोन हजारांपेक्षा जास्त देणार नाही' अशी इच्छा त्यांनी प्रदर्शित केली होती. अर्थात् मी दोन हजार रुपयांचीच अपेक्षा करून राहिलो होतो. पण त्या ठिकाणी सात हजारांचा आकडा पाहताच मी चकित होऊन गेलो.

माझ्या तोंडाकडे पाहून महर्षी म्हणाले, ' काय, संतोष आहे ना ? '

यावर मी म्हटले, ' फारसे बरे झाले नाही. आणखी थोडा वेळ बसावे असे मनात होते. पण ही दक्षिणा हाती पडताच आता बसावेसे वाटत नाही. धावत जाऊन सर्व मंडळींना सांगावे असे वाटू लागले आहे. '

महर्षी हसून म्हणाले, ' तर मग जाच. '

इतके झाल्यावर मी निघून आलो. पण आनंदाचा आवेग एवढा मोठा होता की, चेक खिशात न घालता महर्षींच्या त्या खोलीतच टाकून आलो. रस्त्यां-तून पुनः मागे गेलो. आणि मग यावर खूपच हशा पिकला.

यावेळी संध्याकाळ होत आली होती. मी धावतच आनंदमोहनबाबूंच्या मॉटस्लेनमध्ये असलेल्या घरी येऊन दाखल झालो. जाऊन पाहातो तो, तेथे कित्येकजण बसून समाजाविषयीच्या अनेक योजनांवर विचारविनिमय करीत आहेत. मी माझ्याकडचा चेक मिस्टर बोसच्या समोर ठेविला मात्र; त्यांनी तो पाहून टाळ्यांचा गजरच केला. आणि खुर्चीवरून उठून मला आपल्या हृदयाशी दाबून धरले. नंतर मित्रमंडळीत सर्वत्र आनंदोद्गार निघू लागले. लागलीच मिस्टर बोसनी भरपूर मिठाई मागविली आणि सर्वांनी अत्यानंदाने तोंड गोड केले.

यानंतर गुरुचरण महलानिवीश आणि मी अशा दोघांवर मंदिर उभारण्याचा व पैसा जमविण्याचा सर्व भार सहजच आला. मी बिहार, पंजाब, बंगालचा वायव्येकडील भाग वगैरे ठिकाणी फिरून आणखीही कित्येक हजार रुपये जमविले होते.

* * *

.१३.

# भारतभ्रमण

१८७९ सालच्या माघोत्सवाचे वेळी जमीन विकत घेऊन नवीन मंदिराचा शिलान्यास करण्यात आला. जुने व अनुभवी शिवचंद्र देव महाशय यांना पुढाकार देऊन आम्ही महान् कार्य पुरे केले. जेव्हा समाजाचे प्रमुख सभासद आणि त्यांच्या पत्नी यांनी एकेक मूठ मृत्तिका पायाभरणीसाठी खड्ड्यात टाकण्याला आरंभ केला, तेव्हा डोळ्यात येणारे अश्रू मला आवरेनात. एका बाजूला उभा राहून मी ईश्वराला धन्यवाद देऊन अश्रुमोचन करू लागलो.

## सिटीस्कूल

या वेळीच मी आणि आनंदमोहनबाबू आणखी एका नवीन कार्याच्या गडबडीत होतो. आम्ही दोघांनी सल्लामसलत करून ठरविले की, एक वरच्या दर्जाचे स्कूल स्थापन करणे अवश्य आहे. असे केल्याने दोन कार्ये साधतील. पहिले हे की, अनेक उत्साही व श्रद्धावान ब्राह्म तरुणांना शिक्षकाचे काम देऊन हाताजवळ ठेवता येईल. त्यांच्याकडून समाजाचेही पुष्कळसे कार्य होईल. दुसरे, बहुसंख्य मुलांच्या मनात ब्राह्मधर्म व ब्राह्मसमाजाबद्दल आस्था उत्पन्न करता येईल व ब्राह्म भावना ठसविण्याचे कार्य साधेल. त्यावेळी आनंदमोहन बाबू, सुरेन्द्रबाबू आणि मी असे तिघे वंगीय तरुण पक्षाचे प्रमुख नेते होतो. आम्ही सुरेंद्रबाबूंना विनंती केल्यावरून त्यांनीही आमच्यात आपले नाव नोंदण्याचे मान्य केले. आमच्या तिघांच्या नावाने स्कूलबद्दलचे प्रास्ताविक निवेदन प्रसिद्ध झाले. स्कूलचे नाव सिटीस्कूल असे जाहीर करण्यात आले. आनंदमोहन बाबूंनी स्कूलसाठी सामानसुमान घेण्याला पैसे दिले. सुरेनबाबू शिकवू लागले. आणि मी सेक्रेटरीचे काम करू लागलो. पहिल्याच दिवशी शाळेत शिकविण्याला आरंभ झाला असे म्हटले तर ती अतिशयोक्ती होणार नाही. पहिल्या महिन्यातच खर्च वजा जाता शिल्लक

उरली आणि काही महिन्यांनी आनंदबाबूंनी आगाऊ दिलेली रक्कम फेडण्यात आली.

सिटीस्कूल स्थापनेची ही गोष्ट विसरता येण्यासारखी नाही. जणू काय एका दिवसात उभारलेले ते रोमनगरच. निरनिराळ्या स्कूलमधून काढून टाकलेली मुले, दुर्गुणी मुले टोळ्या टोळ्यांनी शाळेत भरती होण्यासाठी येऊ लागली. त्यामुळे मुलांची निवड करणे हे एक महाकठीण कर्म होऊन बसले. केवढी काळजी, किती परिश्रम आणि केवढी सावधगिरी यावेळी कारणी लावावी लागली त्यांचे आता वर्णन करणे फार कठीण. एक दोन घटनाच काय त्या सांगता येतील.

मुलांची निवड करण्यासाठी मी एक नियम जाहीर केला होता; प्रत्येक शिक्षकाच्या हाती एक एक चोपडी देऊन असे सांगितले की, त्यात त्यांनी दिवसानुदिवस क्लासातील दुष्टबुद्धीच्या मुलांना अर्थात जे विनाकारण शाळा चुकवितात असे व अभ्यास करीत नाहीत असे किंवा दुर्वर्तनी असतील त्या सर्वांची नावे लिहावयाची. आठवड्याने शोध चौकशी केल्यावर त्यातील दुर्वर्तनी मुलांची यादी दुसऱ्या एका चोपडीत केली जाई. या चोपडीचे नाव ब्लॅकबुक असे होते. ही चोपडी मुलांच्या नकळत लायब्ररीच्या डेस्कमध्ये ठेवण्यात येई. मी ती मधून-मधून पाहात असे. त्यामुळे सर्व वर्गातील दुराचरणी मुलांची नावे मला नखदर्पणांत दिसत. क्लास पाहायला गेलो की त्यातील खोडकर द्वाड मुलांची चौकशी मी प्रथम करीत असे.

एकदा असे दिसून आले, की तिसऱ्या वर्गातील एका मुलाचे नाव वारंवार ब्लॅकबुकात नोंदले जात आहे. तो कोण आहे हे तरी पाहावे म्हणून मी त्या क्लासात गेलो. गेल्यावर त्याच्या बाबतीत तपास केला, त्यानंतर जो प्रकार घडला तो असा–

क्लासातील मुले म्हणाली, ' सर, तो आज गैरहजर आहे. '

मी विचारले, ' का ? '

यावर कोणी काहीच उत्तर दिले नाही.

मी पुनः प्रश्न केला, ' त्याच्या वाडीतील कोणी एखादा मुलगा आहे का ? सांगा बघू तो का आला नाही ते ? त्याला काही आजार झाला आहे का ! '

एक मुलगा सांगू लागला, ' नाही सर, तो आजारी नाही. '

मी विचारले, ' तर मग तो का आला नाही ? '

दुसरा एक मुलगा म्हणाला, ' सर तो गुंडांना भाड्याने आणायला गेला आहे. आज सुटीनंतर मारामारी होणार. '

मी विचारले, ' का ? कुणाबरोबर ? '

त्या मुलाने उत्तर दिले, ' हिंदूस्कूलच्या मुलांबरोबर. '

मी प्रश्न केला, ' का ? कशासाठी ? '

तो मुलगा उत्तरला, ' जी, आज दहा वाजता हिंदूस्कूलचा एक मुलगा आला आणि तो बजावून गेला की, सुटीनंतर त्याला असा उठवून नेऊ की कुणाला त्याची खबरबात कळणार नाही ! '

मी विचारले, ' ठीक आहे. आणखी कोणकोणत्या स्कूलमधील मुले या मारामारीत सामील आहेत ? '

तो मुलगा म्हणाला, ' आल्बर्ट स्कूलमधील आणि ट्रेनिंग इन्स्टिटयूशन-मधील. '

मी लागलीच त्या क्लासमधून येऊन हिंदू स्कूलच्या भोलानाथ महाशयांना, आल्बर्टच्या कृष्णविहारी सेन यांना आणि ट्रेनिंग इन्स्टीटयूशनच्या कानाईलाल बाबूंना पत्राने कळविले की, ' ही मारामारी बंद केली पाहिजे. ' त्यांनी आपापल्या स्कूलमधील विद्यार्थ्यांना सावध राहण्याचा इषारा दिला.

अर्थात् मारामारीचे बीजच नाहीसे झाल्यामुळे, त्याला अंकुरच फुटला नाही.

भोलानाथ बाबूंनी एका दरवानाबरोबर त्यांच्या शाळेतील त्या मुलाला माझ्याकडे पाठविले. आणि चिठ्ठीत लिहून कळविले की ' हा मुलगा दहा वाजता सिटीस्कूलमध्ये गेल्याचे कबूल करीत नाही. मी खरे सांगण्यासाठी अनेक प्रकारे समजावून सांगितले, पण तो काहीच कबूल करीना. ' नंतर मी तिसऱ्या वर्गातून चार पाच मुलांना बोलवून त्यांना तो मुलगा दाखविला. त्यांनी त्याच्या तोंडावर सांगितले की, ' हा दहा वाजता आमच्या स्कूलमध्ये आला होता. ' लागलीच मी त्याच्या कानाला धरून त्याला एका कोपऱ्यात उभा केला. आणि ' तुला खालच्या वर्गात घालण्याबद्दल भोलानाथबाबूंना आणि ( त्याच्या वडिलांचे नाव विचारून घेतल्यावर ) तुझ्या वडिलांना पत्र लिहितो असे म्हणून लिहिण्याचा आव आणला. तेव्हा तो भोकाड पसरून रडू लागला आणि माझे पाय धरून त्याने सगळी हकीगत कबूल केली. त्यानंतर काही शिक्षा न करिता मी त्याला सोडून दिले.

## शाळेतील मुले गांजा ओढतात

यानंतर चोहोबाजूच्या स्कूलपरिसरात माझ्याबद्दलची विद्यार्थ्यांना एक प्रकारची दहशत वाटू लागली. आणि या दहशतीतून एकेदिवशी एक कौतुकावह घटना घडली. एके दिवशी मी बिऱ्हाडी जाण्यासाठी सिटीस्कूल मधून बाहेर पडलो. पाहिले तो मला पाहाताच गोलदिघीतील झुडपाआड जाऊन काही मुले लपलेली दिसली. ती अशाप्रकारे लपली नसती तर कदाचित् माझे त्यांच्याकडे लक्षच गेले नसते. पण लपण्याचा त्यांचा प्रयत्न पाहून माझे तिकडे लक्ष गेले. मी विहिरीच्या कडेला जाऊन बोटाच्या संकेताने त्यांना माझ्याकडे बोलाविले. ती भीतीने घाबरत घाबरत माझ्याकडे आली.

मी विचारले, ' तुम्ही कुठच्या शाळेतील विद्यार्थी ? '

ते म्हणाले, ' जी, हिंदू, आल्बर्ट आणि हेअर स्कूलमधील. '

मी विचारले, ' तुम्ही यावेळी स्कूलमध्ये न जाता इथे कशाला आला ? '

त्यांनी उत्तर दिले, ' जी, दुसऱ्या तासाला आम्ही क्लासात जाऊ. '

मी विचारले, ' तुमच्यात आमच्या सिटीस्कूलमधील कोणी आहे का ? '

त्यांनी सांगितले, ' जी, आहे. '

मी म्हटले, ' कोण तो ? बोलाव पाहू. '

त्यांनी म्हटले, ' तो बाजारात गांजा ओढायला गेला आहे. धरून देऊ सर! '

मी सांगितले, ' चला. कुठे आहे पाहू. '

तेव्हा मग त्यांना सुटलो यातून असे वाटले. माझ्या हातून निसटण्याचा उपाय मिळाला. मला बरोबर घेऊन ते माधवदत्तच्या बाजारात गेले. मी एका फाटकावर उभा राहिलो. दोन दोन विद्यार्थी इतर फाटकावर उभे राहिले. आणि दोघे बाजारात गेले. थोड्याच वेळात सिटी स्कूलच्या एका मुलाला त्यांनी धरून आणले.

पकडून आणणारे म्हणाले, ' पाहा सर, खिशात गांजा होता. याने टाकून दिला. ' खरेच. मी पाहिले तो खिसा उलटा झाला होता. आतील भाग बाहेर पडला होता. ते दिसल्यावर मी त्या मुलाला म्हटले, ' खरे सांग. गांजा होता की नाही ? आणि गांजा ओढलास की नाही ? '

मुलाने सांगितले, ' नाही सर, मी गांजा ओढला नाही. '

मी दुसऱ्या मुलाकडे पाहून म्हटले, ' चला आपण त्या गांजाच्या दुकानात जाऊ या. गांजा विकत घेतला होता की नाही ते तरी पाहू. '

त्यानंतर मुलांनी घेरलेल्या त्या मुलाला घेऊन मी त्या गांजा विकणाऱ्या दुकानदाराकडे निघालो. आम्ही अशा तऱ्हेने जात असलेले पाहून गेटवरचा शिपाईही आमच्या बरोबर आला. आणि ते चांगलेच झाले. गांजाच्या दुकानदाराला भीती दाखविण्याला तो एक उपायच बनला. आम्ही गांजाच्या दुकानात गांजा विकणाऱ्यासमोर जाऊन उभे राहिलो. आणि मग रस्त्यातील आणखीही बघे लोक आमच्यात सामील झाले. मी दुकानदाराला त्या मुलाकडे बोट दाखवून विचारले, ' या मुलाला गांजा विकलास की नाही ? '

दुकानदार काहीसा भयचकित होऊन म्हणाला, ' नाही मोशाई, गांजा विकला नाही. ' मी त्याचा चेहेरा निरखून पाहून जाणले की हा खोटे बोलत आहे. लागलीच मी उग्र स्वरूप धारण केले आणि दरडावून विचारले, ' खरे बोल. बरोबर पहारेवाला शिपाई साक्षी आहे. शाळेतील मुलांना गांजा विकतोस म्हणून पोलिस इन्स्पेक्टरला मी लिहिले तर तो तुझे लायसेन्स रद्द करील. '

आता मात्र तो चांगलाच घाबरला आणि 'मी या मुलाला गांजा विकला' असे त्याने स्पष्ट कबूल केले. नंतर मी त्या मुलाला घेऊन सिटी स्कूलमध्ये परत आलो. मी त्याचे नाव हजेरीबुकातून काढून टाकले आणि कारण दर्शवून त्याच्या बापाला तसे पत्र लिहिले.

त्याच्या दुसऱ्याच दिवशी त्याचा बाप येऊन दाखल झाला आणि माझ्या हातीपायी पडून म्हणाला, 'जर मुलगा सुधारला तर आपल्याकडेच सुधारेल. माझ्यावर दया करा आणि याला आपल्या शाळेतच ठेवा.' याचा परिणाम काय झाला ते माझ्या स्मरणात नाही. तरी पण त्या वेळी दुष्ट आणि व्रात्य मुलांना सुधारण्यात व तसा तो न सुधारल्यास त्याला योग्य मार्गदर्शन करण्यात मी प्रवीण ठरलो होतो एवढे खरे.

जर कोणा शिक्षकांच्या नजरेला हे सर्व वर्णन आले तर त्यांना माझे एवढेच सांगणे आहे की, एखाद्या शहरात अनेक विद्यालये असली आणि त्यातील शिक्षकांनी जर एकमेकांशी सहकार्याने वागण्याची तत्परता दाखविली, तसेच शिक्षक आणि पालक यांनी एकमेकांना सहकार्य दिले तर विद्यालयाची शासनपद्धती उत्तम राहील. तरी पण आजकालच्या पुष्कळशा विद्यालयांत या दोहोंचाही अभाव दिसतो.

सिटी स्कूल स्थापन झाल्यावर ती इमारत आमच्या सर्वच कार्यांचे केंद्र झाले. यातील एका खोलीत साधारण ब्राह्मसमाजाचे ऑफिस ठेवण्यात आले. याशिवाय विद्यालयातील एका भागात आम्ही रोज सकाळ-सायंकाळ काही मंडळी एकत्र जमवून ईश्वरोपासना करू लागलो. तसेच साधारण ब्राह्मसमाजाचे साप्ताहिक अधिवेशनही येथेच होऊ लागले. अशा रीतीने समाजाच्या कार्यांची उत्तरोत्तर प्रगती होऊ लागली.

## विद्यार्थी मंडळाची स्थापना

सिटीस्कूलचा जम चांगला बसल्यावर काही महिन्यांनी आनंदमोहनबाबूंशी सल्लामसलत करून माझा अनेक दिवसांचा एक संकल्प कार्यान्वित करण्याचे मी योजले. पहिली योजना, विद्यार्थीसमाज नावाचा एक समाज स्थापन करणे. पहिल्याने एक आठवड्याआड रविवारी सकाळी थोडक्यात उपासना आटोपून इतर आवश्यक विषयांचे मार्गदर्शन व उपदेश करणे ही पद्धत सुरू केली. स्कूल-कॉलेजांतून धर्मविहीन शिक्षण देण्यात येत असे; त्यात बदल करून तो अभाव काही प्रमाणात दूर करावा असा माझा हेतू होता. यामुळे माझा उपदेश व मार्गदर्शन त्या तऱ्हेने होत असे. यातील पुष्कळशी व्याख्याने मी आणि आनंदमोहन बसू देत असू. प्रथम सिटी स्कूलच्या एका खोलीत विद्यार्थी मंडळाची सभा होई. नंतर उपासनामंदिर बांधून तयार झाल्यावर हे अधिवेशन तेथे भरू लागले.

पाच तऱ्हेने विद्यार्थीसमाजाचे कार्य सुरू झाले. ( १ ) प्रथम पाक्षिक व नंतर साप्ताहिक उपासना व व्याख्याने. ( २ ) विद्यार्थीगृहाची पाहणी. ( ३ ) मधून मधून शहरानजीकच्या बागांतून सायंकाळच्या सहली. ( ४ ) मधून मधून सायंकाळच्या समितीची व्यवस्था ( ५ ) पुस्तक-पुस्तिका छापणे व प्रचार.

या पंचोपचारी कार्यामुळे पुष्कळच लाभ झालेला दिसून आला. विद्यार्थी मंडळाच्या सभासदांची संख्या दिवसेंदिवस वाढू लागली. कधी कधी दोन अडीचशे तरुण घेऊन आम्ही कंपनीच्या बागेत जात असू-त्या ठिकाणी उपासना व स्नेह-भोजनही होई. त्यावेळी विद्यार्थीसमाजाव्यतिरिक्त तरुणांना धर्म आणि नीति-शिक्षणाला उपयोगी अशा वेगळ्या सभासमित्या नव्हत्या. सभासदांची संख्या वाढण्याचे हेही एक कारण होते. असो.

या विद्यार्थीसमाजद्वारा साधारण ब्राह्म समाजावर फारच मोठा उपकार झालासे वाटले. यामुळे अनेक उत्साही तरुणांचे साधारण ब्राह्मसमाजाकडे विशेष लक्ष वेधले. तसेच सभासदांच्या अंतःकरणात नीती आणि धर्म यांची भावना दृढमूल झाली. चांगला ठसा उमटला. हिंदूधर्माच्या नावाखाली मागासलेपणाच्या ( जुनाट विचारसणीच्या ) पुनरुत्थानाची लाट उसळली; तर तिला जबरदस्त अडथळा उत्पन्न झाला. विचारसरणी धर्माभिमुख झाली. 'ईश्वर अचेतन शक्ती की सचेतन पुरुष.' 'प्रार्थनेची आवश्यकता व युक्तायुक्तता.' 'जातिभेद' 'परलोक' वगैरे विषयांवर जी व्याख्याने होत, त्यामुळे त्यांचा त्या त्या वेळी फारच उपयोग झालेला दिसे. परिणामही दृढ होई. यांपैकी पुष्कळशी पुस्तके छापली गेली आणि प्रचारितही झाली. त्यामुळे पुष्कळसे कामही होई आणि माझाही फायदा होत आहे; असे मला वाटे.

नंतर एकवार या उत्साही सभासदातून कित्येकांना घेऊन इनर सर्कल बनविण्याचाही प्रयत्न झाला होता. मी या मंडळीत आठवड्यातून एकदा बसत असे आणि निरनिराळ्या विषयांवर परिसंवादही करीत असे. विद्यार्थीसमाज अजूनही आहे पण मी पूर्वीप्रमाणे यांच्या कामाची मुख्य जोखीम माझ्यावर घेऊ शकत नाही.

## घरात निराश्रित मुलींची वाढ

यावेळी प्रसन्नमयी आणि विराजमोहिनी मुलांमुलींसह मुंगेरहून कलकत्त्याला राहण्यासाठी आल्या. त्या आल्यावर हळूहळू आमच्या निवासस्थानी निराश्रित मुलींची संख्या वाढू लागली. त्यावेळी मुलींसाठी वेगळ्या बोर्डिंगची व्यवस्था नव्हती. माझ्या काही काही मित्रांच्या मुलींनाही मला आश्रय द्यावा लागे. शिवाय अगदी निराश्रित अशा मुलीही माझ्याकडे आश्रयासाठी येऊ लागल्या. प्रसन्न-मयीची अपत्यक्षुधा जणू काही आवरतच नव्हती म्हटले तरी चालेल. तिची

स्वतःची मुले होतीच; तरी कोणी एखादी मुलगी निराश्रित आहे असे पाहताच तिला स्वतःच्या मांडीवर घेतल्याशिवाय तिला चैनच पडत नसे. अशा प्रकारे माझ्या घरात आलेल्या अशा पाच सहा मुलींचा तर नेहेमीच भरणा असे. आम्ही मोठ्या आनंदाने या सर्वांसह राहात असू. एकेका वेळी तर आमच्याकडे दोन तीन पेक्षा जास्त अशा झोपण्याच्या खोल्याही नसत. प्रसन्नमयीच्या मुलांत एकदोन. माझ्याकडे एकदोन, विराजमोहिनीच्या खोलीत दोनचार अशा मुली असत आणि असा हा प्रकार नेहेमीच चाले. प्रसन्नमयी आणि विराजमोहिनी या दोघीही सैपाकपाणी करून सर्वांना उत्तम तऱ्हेने सांभाळीत. या मुलींपैकी अनेकींचे पुढे विवाह झाले आणि त्यांचे संसारही सुखाचे झाले. कित्येकींनी शिक्षण घेऊन आर्थिक स्वातंत्र्य मिळविले आणि त्यांनी परोपकारातही आयुष्य घालविले. त्यासाठी जगदीश्वराला मी धन्यवाद देतो.

## पश्चिम भागात प्रचारासाठी प्रवास

तत्त्वकौमुदी आणि विद्यार्थी-समाज यांच्या कामाची व्यवस्था करून तसेच प्रसन्नमयी व विराजमोहिनी यांच्या कलकत्त्यातील घरसंसाराची व्यवस्था लावून मी १८७९ सालच्या मे महिन्यात समाजकार्याच्या प्रचारासाठी बाहेर पडलो. यावेळी आमच्या कमिटीने असे ठरविले की, ' मी बंगालचा वायव्येकडील भाग, पंजाब, सिंध, मुंबई, गुजराथ, मद्रास वगैरे सर्व भारत-प्रदक्षिणा करावी. ' मीही त्याप्रमाणे तयारी चालविली. तरीपण भारत प्रदक्षिणेसाठी मुख्य म्हणजे आर्थिक मदतीची आवश्यकता होती; तिकडे माझी दृष्टीच गेली नाही. समाजकार्यकर्त्यांनीही तिकडे लक्ष दिले नाही. समाजाच्या ऑफिसातून पैसे घ्यावे आणि निघावे. असा मी विचार केला होता. मनातल्या मनात असेही ठरविले होते की, एकदम आग्रा येथे जावे. जाताना बांकीपूर किंवा अलाहाबाद येथे उतरावयाचे कारण नाही, आदल्या वर्षी या सर्व ठिकाणी गेलो होतो. विशेषतः पूर्वीच मला समजले होते की, माझा आग्रा येथे राहणारा मित्र नवीनचंद्र राय लवकरच सेवानिवृत्त होऊन सपरिवार आपल्या जमिनदारीच्या ग्रामी जाणार आहे. तेव्हा तो निघण्यापूर्वी त्याच्याकडे जाऊन दोन दिवस राहण्यासाठी मी उतावीळ झालो होतो.

## पैसा कुठे आहे ?

ईश्वरावर माझी श्रद्धा अढळ नव्हती आणि असे असताही माझी गरज त्याने कशी भागविली त्याचे प्रत्यंतर दाखविण्यासाठीच या माझ्या भारत प्रचार यात्रेचे विशेष वर्णन करण्याचे मी योजिले आहे.

आग्रा येथे जावे असे मनाशी ठरवून निघण्याच्या दिवशी समाजाच्या ऑफिसात पैशांची मागणी केली. ऑफिसातील कारकुनाला माझी मागणी ऐकून

झाडावरून एकदम खाली पडल्यासारखाच धक्का बसला. मी जाईन आणि जाते-वेळी पैशांची मागणी करीन अशी कुणाची कल्पना नव्हती. मी धर्मप्रचारासाठी सगळ्या भारतवर्षाची प्रदक्षिणा करावयाचे ठरविण्यात आले आहे, मी केव्हा प्रवासाला निघणार हे अगोदर कळविलेही आहे. असे असताही मला द्यावे लागणारे गाडीभाड्याचे पैसे जमवून ठेविले नाहीत याचे मला नवल वाटले. समाजाच्या कारकुनाला मी म्हटले, ' पेटीत हात घालून पाहा काही पैसे हाती लागतात की नाही. मी आज रात्रीच्या गाडीने निघणार अशी बंगालच्या वायव्येकडील भागातील मित्रांना पत्रेही पाठविली आहेत. आता मला विलंब लावताच येत नाही. इतके सांगितल्यावर पेटीत शोधून त्याने आठ रुपये आणि काही आणे बाहेर काढले. मी रेल्वे टाईमटेबल पाहून ठरविले की, एवढ्या पैशात डुमराओन पर्यंत जाता येईल. कारकून तर वारंवार दोन दिवस थांबून जा असे म्हणतच होता. पण का ते न कळे तसे राहावे असे काही मला वाटेना. मी अनेकदा पाहिले आहे, प्रचाराला जाण्याचा दिवस एकवार प्रार्थनापूर्ण अन्तःकरणाने निश्चित केला की, काही झाले तरी तो दिवस टाळावयाचा नाही. फार मोठे विघ्न आले तरी निघावयाचेच. यावेळीही तसेच झाले. मी निघण्याची वेळ बदलली नाही. मित्रांची अगर परिवारस्थ मंडळींची आग्रहाची सूचनाही मला कृतनिश्चयापासून ढळवू शकली नाही. मी त्याच दिवशी रात्री गाडीत बसलो. मनात आले, माझा मित्र प्रकाशचंद्र राय बांकीपूर येथे आहे. त्याच्याकडे एकदोन दिवस राहून व पाथेय म्हणून त्याच्याकडून काही रुपये घेऊन पुढे जाईन. अशा बेतानेच बांकीपूरचे तिकीट काढून निघालो.

दुसऱ्या दिवशी सकाळीच बांकीपूर स्टेशनवर उतरलो तोच प्रकाशचंद्र रॉय सरकारी कामासाठी दुसरीकडे जाणार म्हणून स्टेशनवर हजर. त्याला घाई असल्यामुळे मला विशेष काही बोलताच आले नाही. तरीपण घाईतच त्याने मला विचारले, ' हे काय ! तू येणार हे मला कळविलेस नाही ! ' मी सांगितले, ' भाई, येथे उतरावे असे प्रथम माझे ठरले नव्हते. काल निघण्याच्या वेळीच मनात आले त्यामुळे कळविता आले नाही. '

प्रकाशचंद्र म्हणाले, ' ज़ा तर आमच्या घरी जा. त्या ठिकाणी अघोर-कामिनी आहे. आतिथ्याची काळजी नको. चार दिवस थांब. काम पुरे होताच मी येतो. ' असे म्हणून दुसऱ्या प्लॅटफार्मवर उभ्या असलेल्या गाडीत जाऊन ते बसलेसुद्धा.

मी अघोरकामिनीकडे हजर झालो. तिच्या त्या आतिथ्यप्रवीणतेने व लोभस वागणुकीने ते घर मला तीर्थक्षेत्राप्रमाणे पवित्र वाटे. मी परमानंदाने तेथे राहिलो. शिवाय तेथील प्रतिष्ठित लोकांच्या सहकार्याने तेथे एक व्याख्यानही झाले. आणि इतरही थोडीबहुत कामे झाली.

## कादंबरी लिहिण्याला वेळ मिळाला

इतके झाले तरी प्रकाशचंद्रांची भेट झाली नाही. मी मे महिन्याच्या अखेरपर्यंत आठवडाभर त्यांची वाट पाहात राहिलो. या मुदतीत एक काम मला संपविता आले. नॅशनल इंडियन ॲसोसिएशनच्या सदस्यांच्या विनंतीला मान देऊन त्यांना एक कौटुंबिक कादंबरी लिहून देण्याचे मी वचन दिले होते. त्या वचनाची येथे मला पूर्ती करता आली. या ८।१० दिवसांत ' मेजबऊ ' नावाची एक कादंबरी लिहून ती मी कलकत्त्याला पाठवून दिली.

प्रकाशचंद्र राय आला नाही तो नाहीच. पुढे काय करावे याचा मला मोठा पेच पडला. प्रवासखर्चासाठी पैसा कुठून मिळवावा हा प्रश्न. विचार केला की अघोरकामिनीकडे प्रकाशचंद्राने संसारखर्चासाठी म्हणून काही पैसे दिले असतीलच. मी मागितले तर नाही म्हणणार नाही. पण प्रपंचात तिला अडचण पडली तर ! अर्थातच संकोचामुळे माझी गरज माझ्याने तिला सांगवेना. हाती असलेल्या पैशात डुमराओनपर्यंत मला जाता येईल. तेथे व्रजेंद्रकुमार बसू नावाचे एक ब्राह्म स्नेही आहेत. त्यांच्याकडे रुपये मागता येतील.

असा विचार करून एके दिवशी सकाळी मी अघोरकामिनीला म्हटले, ' आज मला लवकर जेवायला वाढ. डुमराओनला जाईन म्हणतो. ' लागलीच तिने सैंपाकाची तयारी चालविली. मी बॅग-बिछाना बांधू लागलो. इतक्यात एक बंगाली बाबू आले. त्यांच्याशी माझी ही पहिलीच ओळख. त्यांचे नाव तिनकडी घोष. त्यांच्या नावाने बांकीपूर येथे टी. के. घोष अकॅडमी झाली आहे. त्यांनी आल्याबरोबर मला विचारले, ' मोशाई, आपण अशी व्याख्याने देत देतच भारत-वर्षभर फिरणार वाटते ? '

मी उत्तर दिले, ' जी हां ! अशा संकल्पाने तर बाहेर पडलो आहे. ' ते म्हणाले, ' माझी एक विनंती आहे; पण सांगायला लाज वाटते. ' मी चटकन म्हटले, ' सांगा ना. त्यात लाज संकोच कसला ! ' ते म्हणाले, ' आपल्या या कामासाठी काही मदत करावी अशी माझी इच्छा आहे.

मी लागलीच सांगितले, ' जे द्यावेसे वाटत असेल ते अवश्य द्या. ईश्वराची देणगी म्हणून मी त्याचा स्वीकार करीन. अशा दानानेच तर आमचे हे कार्य चालायचे '

त्यांनी तीन रुपये दिले आणि ते निघून गेले. मी हिशेब करून पाहिले आणि अलाहाबादेपर्यंत मला जाता येईल असे वाटले. लागलीच डुमराओनला उतरण्याचे रहित केले आणि अलाहाबादला जाण्याचेच ठरविले. जेवताना अघोर-कामिनीला मी माझा बेत सांगितला.

जेवून बाहेर येतो तो मला स्टेशनवर घेऊन जाण्यासाठी एक्का गाडी आलेली दिसली. आणि आणखी एक बाबूही माझ्या भेटीच्या अपक्षेने बसलेले पाहिले. त्यांनी कलकत्त्याच्या समाजाला देणगी म्हणून मला तीन रुपये दिले. मी कलकत्त्याच्या समाज कचेरीला ती देणगी त्यांच्या नावाने जमा करण्यास लिहून ते रुपये वाटखर्चाला बरोबर घेतले. आणि मग अलाहाबादला जाण्याचा बेत रद्द करून एकदम आग्र्याचे तिकीटही काढले.

## आग्रा

आग्रा स्टेशनवर उतरून मित्रवर्य नवीनचंद्र राय यांच्या घरी पोचलो तेव्हा माझ्याजवळ फक्त आठ आणे उरले होते. तेथे जाऊन पाहतो तो, नवीनचंद्रबाबूंनी रजा घेतली असून आपले पुष्कळसे सामान ब्राह्मग्रामी पाठविले आहे आणि दुसऱ्या दिवशी पत्नीसह निघण्याच्या तयारीत ते आहेत असे दिसून आले. त्यांनी तेथील बऱ्याचशा बंगाली प्रतिष्ठित लोकांशी घाईघाईने माझा परिचय करून दिला आणि दुसऱ्या दिवशी आग्रा येथून पत्नीसह ते निघून गेले. ते घाईत असल्यामुळे व त्यांना प्रवासात बराच खर्च करावा लागणार या जाणिवेने मी त्यांना माझ्या वाट-खर्चाबद्दल काही बोललो नाही.

आग्रा येथे पाठ, प्रवचन, व्याख्यान वगैरे कार्यक्रम झाला. पण मला लाहोरला कसे जाता येणार, पैसा कोण देणार हा प्रश्न उरलाच. ज्यांच्या घरी मी उतरलो होतो ते काही ब्राह्मसमाजिष्ट नव्हते. शिवाय माझा नुकताच परिचय झालेला. त्यांच्याकडे भिक्षा कशी मागावी? अर्थात काही याचना करू शकलो नाही. शेवटी मनात आणले, टुंडला येथे एक यज्ञोपवीत त्याग केलेले दीक्षित ब्राह्म आहेत असे ऐकिले होते. तेव्हा त्यांना शोधून काढून त्यांच्याकडेच आर्थिक सहाय्याची याचना करावी.

## टुंडला

मनाशी असे ठरवून आठ आणे रकमेच्या भांडवलावर विश्वासून एके दिवशी सायंकाळी टुंडला स्टेशनवर उतरलो. पहातो तो दोहोंकडून दोन गाड्या प्लॅटफार्मवर आलेल्या दिसल्या. उतारू चढउतार करीत होते. फार मोठी धांदल उडाली होती. मी माझे सामानसुमान उतरून घेऊन प्लॅटफॉर्मवर येरझारा घालू लागलो. हेतु हा की दोन्ही गाड्या निघून गेल्यावर स्टेशनमास्तरला त्या ब्राह्म गृहस्थाचा पत्ता विचारावा. इतक्यात काळ्या रंगाचा एक तरुण आला आणि त्याने एकदम माझ्या पायांवर लोटांगणच घातले. ‘ कोण मोशाय, कोण मोशाय ’ म्हणून मी त्याला उठवून पाहिले तो, तो सोमप्रकाश ऑफिसातील एक जुना बिलकलेक्टर! कसल्याशा अपराधावरून मी त्याला कामावरून कमी केले होते.

येथील रेल्वेच्या लोको ऑफिसात तो नोकरीवर आहे हे मला माहीत नव्हते. मला पाहून त्याला जसे आश्चर्य वाटले तसेच त्याला अशा या अपरिचित ठिकाणी पाहून मीही विस्मयचकित झालो. त्याने विचारले, ' मोशाय, इकडे कसे ? '

मी सांगितले, ' मी आग्र्याला गेलो होतो, आता लाहोरला निघालो आहे. या ठिकाणी अमुक बाबू राहातात. त्यांना भेटण्याची इच्छा आहे. त्यांचे घर कुठे, माहीत आहे ? '

तो हसून म्हणाला, ' मोशाय, तो तर आपल्यातला ब्राह्म राहिला नाही आता. तो अगदी वेगळाच बनला आहे ! '

मी चकित होऊन म्हटले, ' म्हणतोस काय ? मला तर हे काहीच माहीत नाही ! ' तो म्हणाला, ' तर मग आता आधी आमच्याकडेच चला. त्यांना भेटायचे असेल तर नंतर भेटा. मी आपल्याकडे जेवलाखाल्लेला माणूस! माझ्याकडे आपण आलेच पाहिजे. आपली पायधूळ माझ्या घराला लागलीच पाहिजे. मला आपण घालवून दिले होते त्याबद्दल माझ्या मनात काही राग वगैरे नाही. माझी तशी चूक झालीच होती. '

मला असा काही तरी अधार पाहिजेच होता. त्यात त्याचा आग्रह. मग मी मागेपुढे कशाला पाहू ! त्याच्या निमंत्रणानुसार त्याच्याकडे गेलो. त्याच्या बिऱ्हाडात उतरण्याची सोय झाल्यावर मनात आले, आता लाहोरला जाण्याच्या खर्चाची काय सोय ? मी कलकत्त्याहून निघताना ठरविले होते की, खर्चाच्या बाबतीत कलकत्त्याला मी लिहिणार नाही. स्वतःचा खर्च स्वतःच कसातरी भागवावयाचा. प्रचारकार्य असेच स्वावलंबी करावयाचे. या प्रतिज्ञेनुसार पैशांची फार चणचण असूनही आतापर्यंत मी कलकत्त्याला लिहिले नव्हते. मित्रांनाही कळविले नव्हते. पण आता मात्र मोठा बिकट प्रश्न उपस्थित झाला. ज्याच्या बिऱ्हाडी आलो आहे तो एक तर ब्राह्म नव्हे. तशात तो आमचा नोकर होता आणि मीच त्याला कामावरून काढून टाकले होते; म्हणून त्याच्याकडे मदत मागणे मला गैर वाटले. मनालाच ती योजना प्रशस्त वाटेना. बरे तसा जवळचा असा दुसरा कोणी दाता दिसेना. शेवटी ठरविले की लाहोरच्या भाड्यापुरते पैसे या मनुष्याकडून घ्यायचे आणि लाहोरला गेल्यावर ते परत त्याला पाठवायचे. विचार करण्यात दोन दिवस केव्हाच निघून गेले. पण हे दोन दिवस काही व्यर्थ गेले नाहीत. मी ज्याच्याकडे उतरलो होतो त्याच्या मार्फत तेथील स्कूलच्या हेडमास्तरांची परवानगी घेऊन विद्यागृहाच्या अंगणात मी एक व्याख्यान दिले. त्या व्याख्यानाला स्थानिक बंगाली व हिंदुस्थानी प्रतिष्ठित असे पुष्कळ लोक उपस्थित होते. व्याख्यानाच्या दुसरे दिवशी लाहोरला निघण्याचे ठरलेले. ते मी त्याला सांगितलेही होते. त्याच्या जवळून कर्जाऊ रुपये घ्यावे असे मी ठरविले होते खरे, पण रात्रीच्या

जेवणाचे वेळेपर्यंत केवळ संकोचामुळे त्याच्याकडे तसा शब्दोच्चार करवेना; सकाळी उठून पाहातो तो, तो ऑफिसला गेलेला. सैंपाकिणीला माझे जेवण करण्याबद्दल त्याने सांगितले होते. मी स्नान उपासना आटोपून जेवण्याच्या तयारीत होतो इतक्यात तो आला आणि 'जेवण करून घ्या. चला. गाडीची वेळ झाली.' असे म्हणू लागला. आता कर्जाचा प्रश्न आला.

मी त्याला विचारले, 'हो, लाहोरचे भाडे किती आहे रे?'

तो म्हणाला, 'त्याची काळजी आपणाला नको. माझ्याकडून आपण पैसे घेणार नाही म्हणून लाहोरचे तिकीटच काढून स्टेशनात ठेविले आहे.' मी म्हटले, 'अरे, तिकीटसुद्धा इतक्यात काढलेस?'

नंतर मी लाहोरला निघालो. मार्गात मनात आले, ईश्वराच्या कृपेसंबंधाने आणि श्रद्धेबद्दल माझ्या अन्तःकरणात अविश्वास उत्पन्न झाला ही केवढी खेदाची गोष्ट आहे! धिक्कार असो मला! शेकडो वेळा धिक्कार!! आणखी असेही वाटले, की मी प्रत्येक वेळी स्वतःवरच विश्वासून काळजीच्या भोवऱ्यात गरगर फिरत राहातो आणि विधाता कुठून तरी अकस्मात् अकल्पनीय रीतीने माझी गरज भागवितो! त्याचे काम करतानाही मी त्याच्यावर विश्वासून राहू नये? अशा प्रकारे पुनः पुनः स्वतःचा धिक्कार करीत शेवटी लाहोरला येऊन पोचलो.

## लाहोर : शिवनारायण अग्निहोत्री : सरदार दयाळसिंग

११ जून रोजी मी लाहोर येथे पोचलो. आणि तेथील 'बिरादर-इ-हिन्द' नावाच्या मासिकाचे संपादक, गव्हर्नमेंट कॉलेज सर्व्हे टीचर ब्राह्ममित्र शिवनारायण अग्निहोत्री यांच्या घरी अतिथी म्हणून गेलो. त्या ठिकाणी त्यांची पत्नी लीलावती यांच्या प्रेमळ आणि श्रद्धाळू वागणुकीमुळे मला तिचे फार उपकार वाटले. लाहोरात जाताच पाहिले तो, काही दिवसांपूर्वी दयानंद सरस्वती महाशय यांनी तेथे आर्यसमाजाची स्थापना केली होती व अजूनही वेदांच्या बिनचूकपणावर तर्कवितर्क चाललेले आहेत. मी अग्निहोत्रींच्या विनंतीवरून त्यासंबंधी एक व्याख्यान दिले. त्याशिवाय हे बिनचूक शास्त्र आहे असे का मानले जात नाही त्याचीही काही सयुक्तिक कारणे लिहून दिली. अग्निहोत्री महाशयांनी त्याचा अनुवाद करून तो 'बिरादर-ई-हिंद' पत्रात छापला. इतकेच नव्हे तर हिंदू, मुसलमान आणि ख्रिश्चन या सर्वांना त्याचे उत्तर देण्याला निमंत्रण दिले. यावरून कित्येक महिनेपर्यंत वेगवेगळ्या पत्रांत पुष्कळच चर्चा झाली.

मी लाहोर सोडण्यापूर्वी लालसिंग नावाच्या एका शीख तरुणाने माझा सेवक व सहाय्यक म्हणून माझ्याबरोबर येण्याची इच्छा दर्शविली. माझाही आत ईश्वरावरील विश्वास दृढ झाला होता. त्याच्या विशेष आग्रहावरून मी त्याला बरोबर

घेण्याचे ठरविले. त्याने मला उर्दू शिकवावे आणि मी त्याला ब्राह्मधर्माची दीक्षा द्यावी असे आपसात ठरले. दुसरे दिवशी या बाबतीत सर्व काही योजना ठरवू असेही आश्वासन दिले. तेव्हा त्याचा खर्च कसा चालविता येईल त्याची मुळीच काळजी केली नाही.

परमेश्वर त्याची व्यवस्था करील असेच माझ्या मनाने घेतले.

## लालसिंगाची झोळी

आणि काय आश्चर्य! असा संकल्प होतो न होतो तोच त्याच रात्री सरदार दयाळसिंगाचे एक पत्र मिळाले. दयाळसिंग हा सरदार लेहनासिंहाचा मुलगा. लेहनासिंह महाराज रणजितसिंहाच्या ताब्यातील डोंगरी प्रांताचा गव्हर्नर. त्याने आपले मुख्य ठिकाण अमृतसर येथे ठेविले होते. सरदार दयाळसिंग हा त्याचा एकुलता एक मुलगा. वडिलांच्या इष्टेटीचा अधिकारी. तारुण्यातच त्याने युरोपचा प्रवास केल्यामुळे तो उदारवृत्तीचा बनला होता. मायदेशी परत आल्यावर तो ब्राह्मसमाजात सामील झाला आणि सर्व प्रकारची देशहितकर कार्ये मोठ्या उत्साहाने करू लागला. यापूर्वी त्याचीमाझी कधीच भेट झाली नसावी असे मला वाटते. या पत्रात त्याने लिहिले होते, ' लालसिंग तुमच्याबरोबर येत आहे हे उत्तमच. त्याच्या खर्चासाठी मी ५० रु. देत आहे. ' मी लालसिंगाला एक झोळी तयार करून त्यात ते ५० रु. ठेवण्यास सांगितले ' या ५० रुपयांतून माझ्यासाठी पाच पैसेही खर्चावयाचे नाहीत, हा सर्व पैसा तुझ्याच दैनंदिन खर्चासाठी आहे. मात्र खर्च होणाऱ्या पैन्‌पैचा हिशेब बरोबर ठेव. माझ्या खर्चासाठी म्हणून जो जे काही देईल तेही याचा झोळीत ठेवावयाचे. आपल्या गरजेबद्दल कुणालाच काही सांगावयाचे नाही अगर मागावयाचे नाही. आपण होऊन जो कोणी काही देईल ते या झोळीत घाल असे सांगावयाचे. बेग नॉट, बॉरो नॉट, रिफ्यूज नॉट. अर्थात् भिक्षा मागावयाची नाही. कर्ज काढावयाचे नाही, कोणी दिले तर परत करायचे नाही या तीन गोष्टी एका कागदावर लिहून तो कागद मी त्याच झोळीत ठेवला, आणि ' अशाप्रकारे हे काम करायचे. ' असेही त्याला सांगून ठेविले.

## मुलतान

अशाप्रकारे आम्ही मुलतानचा प्रवास संपवून सिंधकडे निघालो. मुलतान येथे असताना एक घटना घडली ती मला स्मरणीय वाटते. तेथे पाहिले तो, काही बंगाली गृहस्थ नोकरीच्या, कामधंद्याच्या निमित्ताने राहिलेले दिसले. शिवाय पंजाबी लोकांपैकी काही शिकलेल्यांनी एकत्र होऊन ब्राह्मसमाजाची स्थापना केली होती. काही सुशिक्षित बंगालीही त्यात सामील झाले होते. आम्ही दोघेही तेथे जाताच मोठ्या उत्साहाने त्या मंडळींनी आमचे स्वागत केले. मी एका बंगाली

गृहस्थाकडे मुक्काम केला आणि लालसिंग जवळच्याच एका पंजाबी गृहस्थाकडे राहिला. ज्या बंगाली गृहस्थाकडे मी राहिलो होतो तेथे माझे चांगलेच आदरातिथ्य झाले. त्याच्या गृहिणीला तर माझ्याबद्दल अगत्य वाटलेच पण जेवायला बसल्यावर असे आढळून आले की इतर बंगाली गृहिणींनीही आपल्या घरातून तऱ्हेतऱ्हेच्या भाज्या व मेवामिठाई आणली आहे. त्यांनी माझे उत्तम प्रकारे आदरातिथ्य केले. मोठ्या उत्साहाने व्याख्याने, उपासना, चर्चा वगैरे होऊ लागली.

लालसिंगाला कित्येक पंजाबी-बंगाली मित्रांनी विचारले, 'तुमचा खर्च कसा काय चालतो ? प्रवासाचा खर्च आहे ना ?' लालसिंगाने माझ्या आदेशा-प्रमाणे त्यांना सांगितले, 'आमची आर्थिक परिस्थिती सांगण्याची आज्ञा नाही. तरीपण कुणी काही दिले तर त्याचा आम्ही स्वीकार करतो.'

नंतर जाण्याचा दिवस आला. आम्ही स्टेशनाकडे निघालो. मित्रमंडळी जमावाने आमच्याबरोबर चालली. मार्गात आणखीही मंडळी मिळाली. आमच्या या निरोपसमारंभाला चांगलाच समुदाय एकत्र झाला. तितक्यात माझ्या खिशात कुणी तरी हात घातला. जणू काय, माझ्या खिशातून कोणी तरी काही काढूनच घेत आहे असे प्रथम मला वाटले. 'कोणी खिशात हात घातला ?' असे म्हणून मी मागे वळून पाहिले, तो एक पंजाबी सुशिक्षित गृहस्थ दिसला. मी पाहताच तो हसून म्हणाला, 'इटीज ए ट्रायफल्. यू नीड नॉट सी इट् हियर, यू मे सी इट् इन् धि ट्रेन.' गाडी सुटल्यावर मी खिशात हात घालून पाहिले तो मित्रांनी वीस रुपयांच्या दोन नोटा दिलेल्या दिसल्या. मी त्या दोन नोटा ईश्वराच्या नावाने मस्तकाला लाविल्या, त्याला धन्यवाद दिले आणि लालसिंगाच्या झोळीत टाकल्या. आमचा प्रवास खर्च असा स्वतःप्रवृत्त दानदक्षिणेवर चालला होता. आमची अयाचित वृत्ती कायम होती. अशाप्रकारे आम्ही मुलतान, सक्कर, हैदराबाद, कराची वगैरे शहरे पाहून बोटीने मुंबईला निघालो.

## हैदराबाद ( सिंध ) चे नवलराय

हैदराबाद येथे असतानाची एक स्मरणीय घटना आठवते. त्या ठिकाणी मी आमच्या एका ब्राह्ममित्राकडे उतरलो होतो. त्याचे नाव नवलराय शौकीराम आडवानी. त्यांची सज्जनता, धर्मनिष्ठा, आणि परोपकारपरायणता पाहून मला कृतार्थता वाटली. त्यावेळी ते सरकारी ऑफिसात एका कचेरीत मोठ्या अधि-काराच्या जागेवर होते. त्यांचे वृद्ध वडील शौकीराम त्यावेळी हयात होते. त्यांनी मला मुलाप्रमाणे वागविले आणि आपलेपणा दाखविला. तेथे राहिल्यावर नवलराय यांच्या कामकाजाकडे माझे लक्ष वेधले. मुख्यतः त्यांनी आपल्या उत्साही प्रयत्नांनी एका सुंदर बागेत उभारलेले समाज-मंदिर मला दिसले. आठवड्यातून एक दिवस

तेथे विशेष उपासना चालते. शिवाय सभासद:लोक दररोज सायंकाळी तेथे जमून नामस्मरण करतात. त्यांच्याबरोबर त्या सभेच्या ठिकाणी जाऊन मी पाहिले तो येणारे सभासद हळू हळू, पाय वाजू न देता मूकतेने येऊन कोणी मंदिराच्या कोपऱ्याला, कोणी मंदिराच्या एका बाजूला तर कोणी जमिनीवर एका बाजूला बसत. तसेच एक गाणे व एक प्रार्थना झाल्यावर त्याच पद्धतीने बाहेर जात. बागेत गेल्यावर मग परस्परांशी बोलणेचालणे व्हायचे. नवलराय यांच्या परोपकारपरायण-तेचे स्वरूप म्हणजे मध्यमवर्गीय मुलांसाठी त्यांनी स्थापन केलेले स्कूल. त्या स्कूल-मध्ये ब्राह्मतरुणांना शिक्षकाचे काम देऊन त्यांनी शहरातील ब्राह्मपक्षाची वाढ केली आहे. शिवाय प्रत्येक रविवारी सकाळी समाजाची उपासना संपल्यावर स्थानिक बंदीगृहात जाऊन बंदिवानांना जमवून धर्मोपदेश देण्याचा क्रम त्यांनी सुरू केला होता. स्थानिक सरकारकडून त्यांनी तशी परवानगीही मिळविली होती. मी दोन रविवारी त्यांच्या या बंदीगृहातील सभेला उपस्थित राहिलो होतो. तेथे बंदीगण टोळ्याटोळ्यांनी येऊन जमिनीवर बसत. नवलराय उभे राहून सिंधी भाषेत त्यांना उपदेशपर थोडेफार सांगत आणि ईश्वराला धन्यवाद देत. ते काय सांगत ते मला समजले नाही; पण ऐकता ऐकता बंदींच्या नेत्रांतून अश्रू वाहताना दिसले. कित्येकांना ' उः ' ' आः ' अशा उद्‌गारांनी आपल्या भावनाही व्यक्त करताना पाहिले.

## एका बंदीचे मुक्ततेनंतरचे आचरण

नंतर मी ऐकले की या त्यांच्या साप्ताहिक उपदेशाने अनेक बंदींचे हृदय-परिवर्तन होऊन ते सुधारले होते. आणि याला आधार म्हणून त्यांनी स्वतः अनुभविलेली एक गोष्ट सांगितली. 'एकदा आपण सरकारी कामासाठी खेड्यात गेलो होतो. तिकडून घरी येत होतो. रस्त्यात गर्द झाडी ओलांडताना रात्र झाली. रात्र कुठे व कशी घालवावी म्हणून मी घाबरलो. तितक्यात जवळच मला एक लहान झोपडी दिसली. सहजच तिकडे माझी पावले वळली. थोडे अंतर चालून जातो. न जातो तोच त्या झोपडीतून एक मनुष्य माझ्याकडे आला आणि म्हणाला, " आपणाला आठवते काय ? आपण ××× महिन्यात जेलमध्ये व्याख्यान देण्या-साठी गेल्यावेळी एका कैद्याबरोबर पुष्कळ वेळ संभाषण करीत होता तोच कैदी मी, आपल्या उपदेशाने मी दुर्वर्तनाचा मार्ग सोडला. मी आता कोणतेच वाईट काम करीत नाही. माझ्याकडे येऊन पाहा. मी आपल्या पत्नीसह आणि मुलांसह येथे राहात आहे. ती सगळी आपल्याला धन्यवाद देतात. आज रात्री आमच्याकडे आपण राहा. आपल्या सेवेने आम्ही धन्य होऊ. " नंतर त्या रात्री मी त्याच्या झोपडीत मुक्काम केला. आराम वाटला. अशा सुखाच्या माझ्या रात्री फारच थोड्या गेल्या असतील.' विशेष सांगायचे म्हणजे,

नवलरायांच्या अशा या अनेकविध गुणांनी मला त्यांचे घर तीर्थस्थानाप्रमाणे पवित्र वाटले.

## मुंबई

२९ ऑगष्ट १८७९ रोजी आम्ही बोटीने मुंबईला आलो. मुंबईत बी. एम्. वागळे, नारायण परमानंद, रामकृष्ण गोपाळ भांडारकर, महादेव गोविंद रानडे, मिस्टर कुंटे, तेलंग वगैरे महान पुरुषांशी परिचय झाल्यामुळे माझ्यावर एक मोठा उपकार झालासे मला वाटले. विशेषतः परमानंद महाशयांचा अकृत्रिम विनय, आणि निर्मळ साधुत्व माझ्या आठवणीत कायमचे राहिले आहे. नारायण गणेश चंदावरकर त्यावेळी कॉलेजचे विद्यार्थी होते, तरी त्यावेळीही त्यांची प्रतिभाशक्ती विकसित झालेली जाणवत होती. त्यावेळी ते 'इन्दुप्रकाश' वर्तमानपत्राचे संपादकत्व करीत होते. त्यामुळे मला त्यांचे पुष्कळच साहाय्य झाले.

## अहमदाबादेत कवी साराभाई

मी लालसिंगाला मुंबईत ठेवून गुजराथेत गेलो. सुरत करून १४ सप्टेंबर रोजी अहमदाबादेला अलो. अहमदाबादेला जाऊन मी सुप्रसिद्ध भोलानाथ साराभाईकडे अतिथी म्हणून उतरलो. निष्कपट ईश्वरभक्ती, पवित्र आचरण, सात्त्विकवृत्ती असे हे साधुवृत्तीचे गृहस्थ. अशी माणसे फारच थोडी आढळतात. यांच्या सहवासात काही दिवस घालविल्यामुळे मला फार आनंद वाटला. हे उत्तम कवी तर होतेच, पण यांनी तयार केलेली संगीत भजनावली, साऱ्या गुजराथेत अमृताप्रमाणे दिव्य माधुरी ठेवून गेली आहे. घरोघर या भजनावलीने सर्वांनाच मोहिनी घातली आहे. अहमदाबादेहून २६ सप्टेंबरला मी बडोद्याला आलो. सर टी. माधवराव हे त्यावेळी बडोद्याचे प्रधानमंत्री होते. त्यांनी संस्थानचे पाहुणे म्हणून माझा आदरसत्कार केला व मानही दिला.

गुजराथेतून मुंबईत आल्यावर लवकरच कलकत्त्याला येण्याबद्दल मला कलकत्त्याच्या मित्रांची तार मिळाली. मी लालसिंगासह जबलपूरहून अलाहाबादेला आलो. अलाहाबादेला पोचल्यावर लालसिंगला तार आली की, 'तुझी आई फार आजारी आहे; अमृतसरला लवकर ये.' आता त्याचीमाझी ताटातूट होण्याची वेळ आली. तेव्हा त्याच्या काखेत अडकविलेल्या झोळीत काय आहे ते पाहणे क्रमप्राप्त झाले. त्यात मला कलकत्त्याला व लालसिंगाला अमृतसरला पोचण्याचा खर्च भागून दोन रुपये शिल्लक उरतील असे दिसून आले. ते रुपये माझ्याजवळच राहिले; पण कलकत्त्याला जाताना कोणत्या कारणाने न कळे पण ते दोन रुपयेही खर्चून गेले. ईश्वरीकृपेचा हा मला आश्चर्यकारक प्रत्यय आला. करुणामय परमा-

त्याने अशाप्रकारे माझ्याकडून अयाचित वृत्तीने पुष्कळ वेळा प्रचारकार्य करून घेतले. धन्य त्याची दया ! धन्य त्याची करुणा !

## रानडे महाशयांची भेट
## बंगाली व महाराष्ट्रीय उच्चाधिकारी लोकांतील फरक

या प्रचार-प्रवासातील काही आठवणी आजही मला स्मरतात. पहिली, ज्या दिवशी स्वर्गवासी रानडे महाशयांशी माझी प्रथम भेट झाली तो एक संस्मरणीय दिवस असेच मला वाटले. त्या दिवशी सकाळी चंदावरकरांनी येऊन मला सांगितले, ' आमच्या मुंबई प्रेसिडेन्सीच्या विद्वान मंडळींचे प्रमुख मिस्टर रानडे काल रात्री आपल्या नोकरीच्या ठिकाणाहून मुंबईला आले आहेत. चला मी त्यांचीतुमची भेट करून देतो. ' लागलीच मी त्यांच्याबरोबर बाहेर पडलो. रस्त्यातून चालता चालता मी असा विचार करीत होतो, की मुंबई प्रांतातील उच्च शिक्षण घेतलेल्यांचे प्रमुख आणि सरकारचे वरिष्ठ अधिकारी यांना भेटायला निघालो आहे. ते कसे दिसतात कसे वागतात कुणाला माहीत ! रस्त्याने चालताना .चंदावरकरांनी रान-ड्यांचे गुणवर्णन खूपच चालविले होते. त्यामुळे मी मोठ्या पेचात सापडल्यासारखा होऊन भीतभीतच ठरलेल्या ठिकाणी पोचलो. जाऊन पाहिले तो खोलीच्या बाहेर जमिनीवर पसरलेल्या जाजमावर एक गृहस्थ बसलेले आहेत. त्यांच्या अंगात एक साधेसे बनियन व डोकीला रात्री घालण्याची कानटोपी ( कलकत्त्यातील रस्त्याने जाणारे सामान्य लोक घालतात तशी ) घातलेली होती. समोर असलेल्या एका तक्क्यावर एक वर्तमानपत्र असून ते ते वाचीत होते. चंदावरकरांनी पुढे होऊन त्यांच्याशी माझा परिचय करून दिला. त्यांनी मला नमस्कार करून बसायला सांगितले, त्या नंतर त्यांच्या तोंडून ज्या गोष्टी मी ऐकू लागलो व त्यापासून काही शिकू लागलो. त्यापूर्वी कोणाच सुशिक्षित माणसाच्या तोंडून मी ऐकलेल्या नव्हत्या. उठून ' येताना त्यांचा तो साधा पोषाख आणि नम्रतेची वागणूक मनात येऊन वाटले, शिकलेले बंगाली पदाधिकारी लोक आणि मुंबईचे हे उच्चाधिकारी विद्वान् लोक यांत केवढा हा फरक ! ' उच्चदर्जाचे बंगाली पदाधिकारी वागणुकीत व पोषाखी थाटात बडेपणा मिरवितात आणि त्यासाठी खूप खर्च करतात. मुंबई प्रेसिडेन्सीतील प्रतिष्ठित व वरच्या दर्जाचे अधिकारी पोषाखाकडे व तशा आढ्यतेच्या वागणुकीकडे तितकेसे लक्ष देत नाहीत ही एक विचार करण्यासारखी गोष्ट आहे.

याच प्रसंगासंबंधाची आणखी एक गोष्ट स्मरणात आहे. मी नंतर एकदा प्रचाराच्या निमित्ताने ( १८८४ सालच्या ६ डिसेंबरनंतर काही दिवस ) पुणे शहरी याच महादेव गोविंद रानडे महाशयांच्या घरी पाहुणा म्हणून गेलो होतो.

त्याचे वर्णन याच ठिकाणी करतो. त्या वेळेलाही रानडे महाशयांचे दैनिक जीवन पाहून मी मुग्ध झालो होतो. ते त्यावेळी पुण्याच्या स्मॉलकॉज कोर्टाचे जज्ज असावेत. अशा प्रकारचा एखादा बंगाली अधिकारी असता तर त्याच्या बंगल्यावर बाह्य थाटमाट व साजशृंगार किती दिसला असता ! दोन घोड्यांची गाडी, पोषाखाचा भपका, नोकरचाकर, दासदासी यांचा केवढा भपका दिसला असता ! पण रानडे यांच्या बंगल्यावर मला तसे काहीच दिसले नाही. कोर्टातून येताच सरकारी पोषाख काढून ठेवून आपले महाराष्ट्रीय लाल किनारीचे धोतर परिधान करून अंगात बनियन घालून, लाल किनारीचे उपरणे ते घेत आणि पुणेरी जोडे पायात घालून माझ्याबरोबर फिरायला म्हणून बाहेर पडत. फिरून आल्यावर ते एका लाकडी झोपाळ्यावर बसत. त्यांचा एक खासगी चिटणीस वर्तमानपत्रे घेऊन जमिनीवर बसलेला असे. तो एक एक वर्तमानपत्र उचलून वाचू लागे. एकेका प्याऱ्यातील दोन दोन ओळी वाचून आणखी पुढे ऐकावयाचे की नाही हे ते ठरवीत. त्याप्रमाणे पुढे वाचणे होई; नाहीतर तो प्यारा सोडून देण्यात येई. वाचतावाचता कोणत्या संपादकाला कोणती तार करायची अगर पत्र पाठवावयाचे ते तोंडी सांगून ते लिहून घेत. अशा या कामात दोन अडीच तास घालविल्यावर ते जेवायला जात. सकाळी रानडे महत्त्वाचे सर्व विषय वाचीत व त्यावर विचार करीत. अशाप्रकारे विचार आणि कार्य यांचा प्रवाह निःशब्दतेने सतत चाललेला असे. मी ते सर्व पाहून मुग्ध तर झालोच, पण मला ते अनुकरणीयही वाटले.

अशा प्रकारे मी अनेकदा रानडे महाशयांच्या घरी अतिथी म्हणून जाऊन राहिलो आहे. आणि त्यांचा जीवनक्रम जवळून पाहिला आहे. त्यांच्या पोषाखात व वागणुकीत थोडेसुद्धा अवडंबर नसे. मुंबईच्याही अशा अनेक थोर लोकांत साध्यासुध्या राहणीचा प्रकार मी पाहिला आहे. इतकेच नव्हे तर, पंजाब आणि मद्रासकडील थोर लोकांची राहणी अशीच साधीसुधी असल्याचे मला दिसून आले; त्यात अवडंबर आणि दिखाऊपणा मुळीच नसायचा. मद्रास शहरातील अधिकारी हिंदू सद्‌गृहस्थ एखाद्या मित्राचे स्वागत करण्यासाठी स्टेशनवर आले असता त्यांच्या पायात चपला नसत. रेल्वेने मद्रासला पोचल्यावर हे मी अनेकदा पाहिले आहे. प्रतिष्ठित हिंदू लोकांत चामड्याच्या चपला वापरण्याची पद्धत नव्हती. सध्या काय पद्धत आहे मला ठाऊक नाही. सारांश, बंगाली लोक इंग्रजांच्या समागमात आल्यापासून जो बडेजाव करायला शिकले तसा इतर प्रांतांतील लोक शिकले नाहीत.

### मॅडम ब्लव्हॅटस्की आणि कर्नेल ऑल्काट यांची व्यर्थ खटपट

मुंबईत असतानाची उल्लेखयोग्य अशी दुसरी घटना थिऑसॉफिकल सोसायटीची स्थापना करणारी मॅडम ब्लॅव्हॅटस्की आणि तिचा सहकारी मित्र

कर्नल ऑल्कॉट यांची भेट झाली ही आहे. ही दोघे मी तेथे जाण्यापूर्वी थोडे दिवस अगोदर मुंबईला येऊन स्थायिक झाली होती आणि स्वतःच्या सोसायटीचा प्रचार वेगवेगळ्या तऱ्हेने ती करीत होती. माझे एक मित्र मला व लालसिंगाला बरोबर घेऊन त्यांच्याकडे गेले आणि आमचा त्यांच्याशी त्यांनी परिचय करून दिला. आमच्या भेटीने त्यांना अतिशय आनंद झाला आणि आम्हांला आपल्या सोसायटीत सामील करून घेण्यासाठी त्यांनी प्रयत्न सुरू केला. दिवसामागून दिवस त्यांचे आमचे तर्कवितर्क आणि चर्चा सुरू झाली. मी त्यांना सांगत असे, 'आपल्या पुष्कळशा गोष्टी मला पटतात, रुचतात आणि मानवतातही; पण ईश्वरासंबंधी जो भाव व्यक्त करता, तो तेवढा मला पटत नाही. आपण अद्वैतवादी मताचे, मला भक्तिधर्म आवडतो. आमचा ईश्वर जिवंत, सामर्थ्यसंपन्न ज्ञानमय आणि प्रेममय पुरुष. त्याच्याशी प्रेमभक्तीनेच मानवाचे परित्राण. ईश्वरावर प्रेमभक्ती करण्यातच मनुष्यजन्माची सार्थकता.' माझे हे बोलणे ऐकून मॅडाम ब्लॅव्हॅटस्की माझा अनेक तऱ्हेने उपहास आणि थट्टा करीत असे. मी तिच्या त्या उपहासाकडे लक्षच देत नसे.

लालसिंगाला मुंबईला ठेवून मी गुजराथेत गेल्यावर लालसिंग नेहेमी त्यांच्याकडे जात असे. मी गुजराथेतून आल्यावर मला समजले की ती दोघेही लालसिंगाला मुलाप्रमाणे पोटाशी धरीत आणि त्याचे लाड करीत. भेटायला गेला की ठेवूनच घेत, उठायला लागला तर उठू देत नसत. निरनिराळे पदार्थ खायला देत. तो शिखांचा मुलगा असल्यामुळे त्याच्या डोकीवर लांब लांब केस असत. मॅडम ब्लॅव्हॅटस्कीची एक मैत्रीण त्याचे ते लांबसडक केस चांगले विंचरून स्वच्छ करून नीट बांधीत असे. मी गुजराथेतून आल्यावर जेव्हा त्यांना भेटायला व त्यांचा निरोप घ्यायला गेलो आणि लालसिंगाला बरोबर घेऊन निघालो तेव्हा मॅडाम ब्लॅव्हॅटस्की हसून मला म्हणाली, 'तुम्हाला इतके समजाविले पण ते व्यर्थ गेले!'

## 'सन्डे मिरर' पत्रात डिव्होशनल कॉलम

मुंबई प्रांतात असतानाची तिसरी संस्मरणीय घटना, गुजराथची राजधानी अहमदाबाद येथे घडली, ती अशी : यावेळी कलकत्त्याच्या रविवारी निघणाऱ्या 'मिरर' पत्राच्या डिव्होशनल कॉलमात, ईश्वरवाणीरूपाने वेगवेगळ्या गोष्टी प्रकाशित होत. उपासक मंडळींनी ईश्वराच्या चरणाजवळ बसून विचारले, 'आम्ही आमच्या आचार्यांना कोणत्या भावनेने पाहावे?' ईश्वराने यावर उत्तर देताना, आचार्यांना कोणत्या भावनेने पाहायला पाहिजे ते सांगितले वगैरे. डिव्होशनल कॉलम हा, केशवबाबूंच्या स्वतःच्या विशेष वाणीने अलंकृत झालेला भाग आहे, हे सर्वांना माहीत होते व त्याच भावनेने ते त्याचा स्वीकार करीत.

या उक्तीत पुष्कळ चांगले विषय असत. ते वाचल्याने जिज्ञासूंचे खूप समाधान होई. उपकारही झालेसे वाटत. शिवाय त्यातील काही गोष्टी वाचल्याने हसू येई, असाही मजकूर असे. मी अहमदाबाद येथे असताना २१ सप्टेंबरचा अंक पाहिला. त्यातील त्या विशिष्ट कॉलमात, 'ईश्वरीय वाणी' म्हणून विरोधी पक्षीय लोकांना उद्देशून विलक्षण शिव्यागाळी असलेल्या आढळल्या, माझ्या आठवणीप्रमाणे सांगायचे तर त्या मजकुराचा भावार्थ असा : 'देन दि लॉर्ड गॉड रोल्ड डाउन ए हिल ऍंड सॉ ए नंबर ऑफ मेन सिक्रेटली वर्किंग टु अण्डरमाईन हिज किंग्डम. देन दि लॉर्ड स्पोक : ओ स्केप्टिक्स्, मटिरियालिस्ट्स' वगैरे.

एक तर मी त्यावेळी कलकत्त्याहून फार दूर होतो. कलकत्त्याला कोणत्या अभिनव प्रकारामुळे हा तप्त लाव्हारस बाहेर वाहू लागला आहे, त्याचा मला काहीच अंदाज करता येत नव्हता. अहमदाबादेतील एका मित्राने हा मजकूर वाचून मला ऐकविला. प्रथम आम्ही दोघे खूप हसलो. पण दुसऱ्याच क्षणी हसण्याचा तो आवेश ओसरून अन्तःकरणाला आत्यंतिक दुःखभावना जाणवू लागली. ईश्वराच्या बोलण्यात असला विद्वेष व्यक्त होणे फारच शोचनीय असे मनाला वाटू लागले.

## पश्चिम प्रांतात स्वपक्षासह केशवचंद्र

यानंतर मुंबईहून मी कलकत्त्याला यायला निघालो. अलाहाबादहून कलकत्त्याला यायला निघालो, तेव्हा वाटेत मधल्याच एका स्टेशनात पाहिले तों, केशवचंद्र स्वपक्षीय मंडळीसह उभे. आमच्या त्या गाडीतून सिमला येथील अधिकारीवर्ग खाली उतरत होता. गाडीत भयंकर गर्दी. फिरंगी उच्छृंखल पोरांनी इंटरचा डबा चिक्कार भरलेला. त्यांचा सगळा प्रवास हास्यपरिहासयुक्त करमणुकीत चालला होता. त्यांच्या हास्यकल्लोळाला कोठेच विराम नव्हता. सुदैव इतकेच की आम्ही ज्या डब्यात होतो त्यात आम्हीच तेवढे तीन चार जण होतो. गाडीत जागा न मिळाल्यामुळे केशवबाबू फलाटावर इकडे तिकडे धावाधाव करीत असलेले पाहून आम्ही ज्या डब्यात होतो त्यात बसण्यासाठी त्यांना बोलाविले. केशवबाबू, बाबू बंगचंद्र रॉय वगैरे मंडळी आमच्या डब्यात आली. आणि उमानाथ गुप्त वगैरे काही मंडळी बाजूच्या इंटरच्या डब्यात शिरली. उमानाथ बाबूंच्या हातात खैरी रंगाच्या कापडात गुंडाळलेली कसलीशी एक वस्तू होती. त्याच डब्यात एक फिरंगी तरुण आडवा झाला होता. ही मंडळी आत येताच त्याने उमानाथ गुप्तांना विचारले. 'व्हॉटस् दॅट ?'

उमानाथबाबूंनी उत्तर दिले, 'ए बिगुल !'

फिरंगी पुनः म्हणाला, 'ए बिगुल ? कमिंग फ्रॉम दि अफगाण वॉर ?'

उमानाथबाबूंनी उत्तर दिले, ' नो. फ्रॉम ए ब्राह्मसमाज एक्सपिडीशन. ' आणि त्यावेळी मग मला समजले की, हे लोक गाजीपूर वगैरे शहरे फिरून सॅल्व्हेशन आर्मीचे अनुकरण करीत, समरयात्रा गाजवीत चालले आहेत. कारण याबद्दलची माहिती ' मिरर 'मधून यापूर्वी मी वाचलीच होती. मी फिरंगी तरुणाची उपहासगर्भ तर्कटे कमी व्हावी म्हणून एका कागदावर ' केशवचंद्र सेन वुइथ हिज फ्रेंडस ' असे लिहून तो कागद त्याला दाखविला तेव्हा मग त्याची वटवट थांबली.

गाडी सुरू झाली. चांगल्या गप्पागोष्टी सुरू झाल्या. सुखाने प्रवास होऊ लागला. इतक्यात बंगचंद्र राय की दुसरा कोणी बरोबर आठवत नाही, त्याने तो रविवारचा ' मिरर ' काढला आणि त्यातील शिव्यागाळीचा उल्लेख करून मला विचारले, ' तुम्ही हे वाचलेत की नाही ? ' मला फार राग आला. त्या रागाच्या आवेगातच उत्तर दिले, ' नवलच वाटते तुमचे ! त्या लिखाणाबद्दल लाज शरम काही न वाटता त्यावरच हसत हसत पुनः त्या गोष्टीची आठवण करून देता ? आमच्या-वर त्यांचा राग होणे साहजिकच आहे. इतकी चिरफाड होऊन सवतासुभा निर्माण केल्यामुळे आमच्यावर त्यांनी का रागावू नये ? पण ज्या कोणी ते लिहिले त्यांनी स्वतःच्या नावाने आम्हाला शिव्या का दिल्या नाहीत ? माणसांमाणसातीलच हा व्यवहार आहे. असे हे चालायचेच; अशी मी समजूत करून घेतली असती. पण तसे न करता प्रत्यक्ष ईश्वराला त्या रंगमंचावर आणणे आणि त्याच्या तोंडून त्या अभद्रभाषेचा उच्चार करणे हे किती घृणास्पद आहे ! ईश्वरावर भक्ती असलेला मनुष्य असे कधीतरी करील काय ? '

अशा या वादविवादात आम्ही बांकीपूर स्टेशनात येऊन पोचलो. ते लोक आपल्या सर्व मंडळीसह तेथे उतरून मार्गस्थ झाले.

ते अशा रीतीने उतरून गेल्यावर मला दुःख वाटले ते याचेच की, समाजा-संबंधीच्या भांडणानंतर इतक्या दिवसांनी केशवबाबूंची भेट झाली; अशावेळी मला इतके भडकून जाण्याचे काय कारण होते ? असो. माझ्या मनाला यामुळे एवढेच समाधान वाटले की ज्यांच्या विरुद्ध जे काही बोलायचे होते त्यातील पुष्कळसा भाग, त्यांच्या समक्षच बोललो. उगाच विपर्यास व्हायला नको.

ऑक्टोबरच्या मध्याच्या सुमारास मी कलकत्त्याला पोचलो; त्यावेळी 'सन्डे मिरर' मध्ये आलेल्या या शिव्यागाळीचे मूळ कारण मला समजले. याच वर्षाच्या मधल्या काळात, साधारण ब्राह्मसमाजाचे नेते म्हणून ओळखल्या जाणाऱ्या सभासदांतील एका व्यक्तीचे नाव घेऊन कोणी तरी त्यांच्याकडे त्या व्यक्तीच्या अतिशय घृणास्पद दुर्वर्तनाचा पाढा वाचला. निंदा केली. त्या मंडळींनी त्या बोलण्यावर विश्वास ठेविला. आणि त्याचेच पर्यवसान संडे मिररच्या ठराविक कॉलममधील ईश्वरीय वाणीच्या रूपाने व्यक्त झाले.

ज्या निंदेवर त्या लोकांनी विश्वास ठेविला होता, त्या बाबतीत एवढेच सांगावयाचे आहे की, मी त्यावेळी कलकत्त्यात नव्हतो. स्वतः मला त्याचा तपास करता आला नाही. पण द्वारकानाथ गांगुली हे आमच्यातील सत्यव्रती, सत्यवादी, न्यायपरायण आणि तेजस्वी पुरुष म्हणून प्रसिद्ध होते. ते सर्वांच्या माहितीचे होते. तसेच ते कोणा एकाची भीडमुर्वत ठेवतील असेही नव्हते. त्यांनी मला सांगितले की, आपण खूप तपास करूनही या निंद्य लोकापवादाचा विश्वसनीय असा कोणताच पुरावा अगर आधार मला मिळाला नाही. '

* * *

.१४.

## साधारण ब्राह्मसमाजाचे मंदिर उभारले

१८८० सालापासून मला वाटते मी युनिव्हर्सिटीत एंट्रन्स आणि एल्. ए. परीक्षेत संस्कृतचा परीक्षक होऊ लागलो. तेव्हापासून पुष्कळ वर्षेपर्यंत परीक्षकाचे काम केले आहे. प्रथम प्रथम परीक्षकाचे भर-वेतन म्हणून मला दरसाल ५००। ६०० रुपये मिळत. क्रमाने हे वेतन कमी होत गेले. सरासरी दरसाल साडेतीनशे धरले तर मला अशाप्रकारे आठ दहा हजार रुपये मिळाले. शिवाय माझ्या पुस्तक-लेखनातूनही मला कित्येक हजार रुपये मिळाले आहेत पण या मिळकतीतून मला काहीही शिल्लक ठेवता आले नाही.

### पैसा साठविला नाही

अर्थसंग्रहाचा विचार मनात आला की वाटते, जर त्याच मार्गाने जायचे होते तर कामकाज सोडले का ? नृत्य करायला तयार झाल्यावर बुरखा घेणे चांगले नाही. दोन मार्ग आहेत. एक अर्थसंपादन करावयाचा हा संसारव्यवहाराचा मार्ग. दुसरा धर्मप्रचाराचा मार्ग. संसार—व्यवहाराचा मार्ग पत्करावयाचा असेल तर पैसा मिळविला पाहिजे आणि संग्रहही केला पाहिजे. जर धर्मप्रचाराच्या मार्गाने जायचे असेल तर पैशाची कमाई आणि संग्रहीवृत्ती इकडे विशेष लक्ष देता कामा नये, धर्मप्रचाराकडे लक्ष दिले पाहिजे, सेवेत लक्ष गुंतविले पाहिजे आणि ईश्वरी कृपेवर विसंबून राहिले पाहिजे.

आता प्रश्न असा, मिळविलेले इतके हजार रुपये गेले कुठे ? चांगल्या कामातच खर्च झाले. समाजाच्या मित्रमंडळींनी जे आतापर्यंत मला दिले ते कधीच माझ्या खर्चाइतके मला मिळाले नाही. माझ्या आईच्या आजारीपणात तिला अनेकदा कलकत्त्याला आणून वेगळ्या जागेत ठेवण्यात व औषधपाणी करण्यात मला खर्च करावा लागला. गावी असलेले जुने पडके घर दुरुस्त करून ते आई-वडिलांना

राहता येईल व सुखाने आयुष्य कंठता येईल असे ठेवावे लागले. शिवाय पूर्वीचे देणे मला फेडावे लागलेच. त्याखेरीज ब्राह्मसमाजाचे जे जे काम मी स्वतः पुढाकार घेऊन केले ते करण्यासाठी जो खर्च आला, जे कर्ज झाले त्याची सर्व जोगवण मलाच करावी लागली. तोही खर्च काही कमी नव्हता. साधनाश्रम, प्रथम ब्राह्म बालकनिवास, बांकिपूरची राममोहन राय सेमिनरी वगैरे खूपच कामे केली होती. खरोखर या बाबतीत मी मंगलमय परमेश्वरालाच धन्यवाद देतो. त्याचीच कृपा समजतो. आपल्या सेवेला अयोग्य असलेल्या या भक्ताचा त्याने निरंतर अपत्यवत् सांभाळ केला. आश्चर्य वाटेल इतका पैसाही मला दिला.

यासंबंधाने काही उल्लेखयोग्य अशा गोष्टी सांगणेच अवश्य आहे मी ज्या वेळी भवानीपूर साउथ सबर्बन स्कूलचा हेडमास्तर होतो, तेव्हा माझे काही रुपये चोरीला गेले. शिवाय इतर काही कारणे घडली आणि मी कर्जबाजारी झालो. त्यावेळी मित्रवर्य दुर्गामोहन दास यांनी मला ४०० रुपये कर्जाऊ दिले. आणि मित्रवर्य आनंदमोहन बसू यांनी २५० की ३०० रु. कर्जाऊ दिले. नंतर जेव्हा साधारण ब्राह्मसमाजाची स्थापना होऊन मी प्रचारक म्हणून बाहेर पडण्याचे ठरविले तेव्हा दुर्गामोहन दास व आनंदमोहन बसू यांच्याकडे प्रथम गेलो आणि त्यांना सांगितले, ' तुमच्या कर्जाचे काय करावयाचे ? देणे असताना मी नोकरी सोडून प्रचारकार्याला कसा वाहून घेऊ ? ' माझ्या या चिंताग्रस्त प्रश्नाचे उत्तर न देता तो त्यांनी हसण्यावारी उडवून लाविला. ते म्हणाले, ' समाजासाठी आम्हांला शेकडो रुपये खर्चावे लागतील ! तुम्ही आपल्या अगदी सामान्य कर्जाचे काय घेऊन बसला ! ते रुपये आम्ही समाजाला दान दिले आहेत असेच समजतो. ' यावर मी म्हटले, ' ठीक. मी जर पुढे केव्हा कोणत्याही उपायाने पैसे मिळविले आणि आपले देणे मला देता आले तर ते रुपये आपण घेतलेच पाहिजेत. ' त्यांनी सांगितले, ' ठीक आहे. त्यावेळी पाहू. यावेळी समाजाचे कार्य तर करा. '

त्यावेळी हे बोलणे एवढ्यावरच संपले. पुढे परीक्षकाचे वेतन मिळताच मी दुर्गामोहनबाबूंना ' आपले रुपये घेऊन जाण्यासाठी मनुष्य पाठवा. ' असे लिहिले. त्यांनी उत्तरी कळविले, ' गुड बॉय्. क्वाइट वर्दि ऑफ् यू ! मेक ओव्हर दि फोर हंड्रेड रुपीज टू जी. सी. महलानवीश ॲज पार्ट ऑफ् माय काँट्रिब्यूशन टु दि मंदिर बिल्डिंग फंड. '

त्याने मित्राला आपले कर्तव्य पुरे करू दिले आणि समाजाचेही कार्य केले. आनंदमोहनबाबूंचे देणे फेड करण्याची वेळ सुमारे वीस वर्षांनी आली. वीस वर्षां-नंतर मी जेव्हा रुपये घेऊन जाण्याबद्दल त्यांना पत्र लिहिले तेव्हा त्यांनी उत्तरी कळविले की, ' आपल्याकडे जुने कागदपत्र नाहीत आणि या देण्याची हकीगत मला स्मरतही नाही. ' पुढे त्यांच्या जेव्हा लक्षात आले की, कर्जफेडीवाचून माझ्या मनाला शांतता येणार नाही, तेव्हा मनात नसतानाही त्यांनी ते रुपये घेतले. पण

नंतर ऐकले की, ते रुपये स्वतंत्र तऱ्हेने घरातील बायकामंडळींच्या हाती देऊन त्यांना असे सांगितले की, त्यांनी ते रुपये मला साहाय्य करण्यात खर्च करावे. ' त्यांनी असे शेकडो रुपये मला मदत करण्यासाठी खर्च केले आहेत. ' त्याबद्दल किती म्हणून सांगावे ! त्यांच्या विषयीच्या कृतज्ञतेचे ऋण मला केव्हाच फेडता येणार नाही. आजही पुष्कळसे माझे मित्र माझ्या मागे मदतीचा हात उंचावून राहिले आहेत. मला कसली केव्हा थोडी फार गरज आहे हे समजताच साहाय्यासाठी त्यांचा उजवा हात पुढे होतो. हे सांगताना माझे डोळे अश्रूंनी भरून येतात. मी काही दिवस त्यांना दिसलो नाही तर माझ्या भेटीची त्यांना विलक्षण तळमळ लागते. ते समजतात की मी कसल्या तरी विवंचनेत कालक्रमण करीत असेन. लागलीच त्यांची पत्रांमागून पत्रे येतात. किंवा कोणी स्वतःच येऊन उपस्थित होतात.

## १८८० सालचा माघोत्सव

१८८० सालचा माघोत्सव, अर्धवट बांधलेल्या मंदिरावर चांदवा उभारून साजरा करण्यात आला. या निमित्ताने शुभारंभ म्हणून गोसांईजी, विद्यारत्नभैया, शिवनारायण अग्निहोत्री आणि मी या चौघांना विशेष उपासनेनंतर प्रचारक म्हणून गौरविण्यात आले.

## अनभ्यस्त घोडेस्वाराचा दार्जिलिंग प्रवास

याच वर्षी वैशाखाच्या पहिल्या तारखेला ( बंगाली नव वर्षदिनी ) दार्जिलिंग पर्वतावर नवीन बांधलेल्या उपासना मंदिराचे उद्‌घाटन करण्याचे निश्चित झाले होते. त्या मंदिराच्या उद्‌घाटनासाठी मी तेथे गेलो. त्यावेळी उत्तर बंगालमध्ये शिलीगुडीपर्यंत रेल्वे होती. शिलीगुडीपासून दार्जिलिंगपर्यंत रेल्वेचे रूळ घातले असले तरी गाडीची ये-जा सुरू झाली नव्हती. मी शिलीगुडी येथे जाऊन डॉ. आनंदचंद्र रॉय यांच्या घरी उतरलो. त्यावेळी शिलीगुडीपासून दार्जिलिंगपर्यंत टांगा नावाची एक प्रकारची गाडी जात-येत असे. पण या टांग्याचे भाडे इतके जास्त होते की, माझ्या गरीब ब्राह्ममित्रांना माझ्यासाठी तितका खर्च करणे फारच कष्टाचे होईल असे मला वाटले. तेवढा भार त्यांच्यावर घालू नये असा माझा बेत; म्हणून चौकशी केली तेव्हा समजले की पर्वतारोहण करण्यासाठी घोडे मिळतात. आयुष्यात मी कधीच घोड्यावर बसलो नव्हतो. लहानपणी बाळसवंगड्यांबरोबर मी कधी कधी बैलावर बसत असे आणि त्याच्यावरून पडून एकदा बराच दुखावलोही होतो. कदाचित् हे मी पूर्वी सांगितलेही असेन; घोड्यावर बसण्याचे भाग्य मात्र मला कधीच लाभले नव्हते. पण करणार काय ? वैशाखाच्या पहिल्या तारखेपूर्वी मला दार्जिलिंगला जाणेच भाग होते. युनिटेरियन मिशनरी डॅलसाहेब

टांग्याच्या अपेक्षेने डाकबंगल्यात बसून होता. कारण त्यावेळी रोजच टांग्याची जा-ये होई असे नाही. माझ्याजवळ तितके पैसेही नव्हते व टांग्याची वाट पाहायला वेळही नव्हता. म्हणून घोड्यावर बसूनच जाण्याचे मी ठरविले.

एके दिवशी सकाळी आनंदबाबूंनी एक पहाडी घोडा आणून त्यावर मला बसविले. मी डुलतडुलत पुढे चाललो. 'शुकना' पार होतो न होतो तोच चढण सुरू झाली. त्यावेळी मोतद्दार मला म्हणाला, 'हा घोडा नसून घोडी आहे आणि त्यात गाभण!' ते ऐकताच मला फार वाईट वाटले. मी लागलीच खाली उतरलो आणि मोतद्दाराच्या हाती लगाम देऊन पायीपायीच पहाडी चढण चढू लागलो. पहाडी मार्गात ज्याला 'शॉर्टकट' (जवळचा अगर सरळ रस्ता) म्हणतात त्या रस्त्याने मी पहाडाची सरळ चढण आक्रमू लागलो. वळणे नसल्यामुळे रस्ता जवळचा व सरळ वाटे खरा; पण चढणेच कठीण होऊन जाई. पाठीपोटी वेदना जाणवत. दमणूक जास्त होई. काय करणार! दुसरा काही उपायच नसल्यामुळे मारूनमुटकून चढण्याचे काम सुरूच ठेविले. घोड्यावर चढून खार्सियांग येथे दुपारी दोनतीन वाजता पोहोचता येते असे ठरलेले; पण पायीच चालत असल्यामुळे तेथे रात्री आठ वाजता जाऊन पोंचलो.

त्यावेळी बर्डकंपनी नावाची, या पहाडी मुलखात एक कंपनी होती. ती सामानसुमान नेण्याआणण्याचे काम करी. प्रियनाथ बसू नावाचे एक बाबू (प्रतिष्ठित गृहस्थ) खार्सियांग येथे या कंपनीचे एजंट होते. पूर्वी केलेल्या व्यवस्थेनुरूप मी त्यांच्याकडे उतरलो. त्याच्या दुसऱ्या दिवशी मला दार्जिलिंगला पोचणे अवश्य होते. नाही तरी मी एवढ्याच प्रवासात इतका दमून गेलो होतो की चार दोन दिवस विसावा घेतला असता तर तो पाहिजेच होता. प्रियनाथबाबू म्हणाले, 'मी घोड्यावर बसून सकाळीच दार्जिलिंग येथे जाणार आहे. तुमच्यासाठीही एक घोडा आणवतो.' हे ऐकताच मला भीती वाटली. त्यांनी अभय देऊन म्हटले, 'भिण्याचे कारण नाही. मी बरोबर आहेच.' दुसऱ्या दिवशी सकाळीच उठून पाहातो तो, माझ्यासाठी एक गुटगुटीत पहाडी तट्टू आणण्यात आला आहे आणि त्यांच्यासाठी बर्ड कंपनीच्या तबेल्यातून शुभ्ररंगाचा सजविलेला घोडा आणून ठेविलेला आहे. माझा घोडा पाहून मी हसून म्हटले, 'प्रियनाथबाबू, हे काय केले आहे? अहो तुमचा हा घोडा तर चांगला जवान दिसतो. माझ्यासाठी एखादा लंगडा किरकोळ घोडा आणला असता तरी चालले असते.' तेही हसूनच म्हणाले, 'बसा घोड्यावर. मी आहे सोबतीला.' मी निघण्याच्या तयारीने बाहेर पडलो. मी पुढे आणि प्रियनाथबाबू मागाहून. दोघेही घोडेस्वार. घोड्यात चढाओढ आणि स्पर्धा असते हे त्यावेळेपर्यंत मला माहीत नव्हते. प्रियनाथबाबूंच्या घोड्याने आपली चाल सुरू करताच माझा तट्टू दौडत सुटला. मी कधीच घोड्यावर बसलो नव्हतो. त्यामुळे हा दौडादौडीचा प्रसंग मला

अगदी नवा ! मी दोन्ही पायांनी तट्टूचे पोट दाबून धरले. दोन्ही हातांनी त्याची आयाळ घट्ट पकडली आणि जवळ जवळ त्याच्या सर्वांगाला चिकटून आमची ही अश्वयात्रा सुरू झाली. मला वाटते ही जखडपट्टी त्या तट्टूलाही नवीन होती. त्याला वाटले असावे, हा कोण प्राणी मला चिकटून राहिला आहे ! कारण माझी ही पकड ढिली व्हावी म्हणून त्याने वर मान करून आपली दौड खूप जोरात वाढविली. प्रियनाथबाबू मागून मोठ्याने ओरडून म्हणाले, ' मोशाय, थांबा थांबा. पार खाली गेला. लवकरच दरीत कोसळाल ! ' मी तितक्याच जोराने ओरडलो ' आपण थांबा. आपल्या घोड्याला आवरा. तो थांबल्यावाचून हा थांबणार नाही. ' लागलीच त्यांनी आपल्या घोड्याचा वेग कमी केला. मीही जिवापाड जोर लावून माझ्या तट्टूचा लगाम खेचला. हळूहळू माझ्या तट्टूचा वेग मंदावला. अशा प्रकारे ही अश्वयात्रा संपवून मी दार्जिलिंग येथे दाखल झालो आणि मंदिराचा उद्घाटन समारंभ पार पाडला. येताना बहुधा मी टांग्यानेच पहाड उतरलो.

## मोतिहारीत वेदाच्या बिनचूकपणावर चर्चा

यानंतर काही कालाने म्हणजे १८८० च्या जुलै महिन्यात मी मोतिहारी समाजाच्या उत्सवाच्या निमित्ताने तेथे गेलो होतो. त्याठिकाणी सर्व संप्रदायांचे विद्वान लोक जमून एक मोठी चर्चा व्हायची होती. त्याबद्दलची थोडक्यात माहिती देतो. प्रकार असा :–मी जाऊन एका मित्राच्या घरी उतरलो. दोन दिवसांनी तेथील आर्य समाजाचे अध्यक्ष येऊन त्यांनी माझ्याबरोबर वेदाच्या बिनचूकपणा-बद्दल, चर्चा सुरू केली.

मी म्हटले, ' एक बिनचूक शास्त्र इतके आवश्यक आहे असे आपण का समजता ? ' ते म्हणाले, ' मनुष्याच्या धार्मिक जीवनासारख्या गंभीर विषयांत, चुकीला पात्र असलेल्या मानवीबुद्धीवर विसंबून कसे चालले ? '

मी उत्तर दिले, ' वेदांचे निर्दोषत्व मानूनही चुकीला पात्र असलेल्या मानवी बुद्धीला तो टाळू शकत नाही. सायणाचार्यांनी वेदाचा अर्थ एक प्रकाराने केला आहे, तर दयानंद सरस्वतींनी तो दुसऱ्या प्रकाराने केला आहे. मग अशावेळी ईश्वराला अभिप्रेत असलेला अर्थ अमुकच आहे असे कोण सांगू शकेल ? येथेही भ्रांतिशील मानवबुद्धीला न्यायाधीशाच्या रूपाने दोन्ही भाष्यकारांवर बसविण्यात येत आहे. बिनचूक शास्त्र दिले तर बिनचूक टीका करणारा पण द्यायला पाहिजे. नाहीतर भ्रांतिशील मानवीबुद्धीच्या हातून त्याची सुटका होणार नाही. आणखी पाहा, या देशात बिनचूक शास्त्र म्हणून ज्या वेदांना पूज्य मानले जाते, त्यातील काही भाग दयानंदांनी वर्ज्य ठरविला आहे. काही भाग शास्त्र म्हणून ग्रहण केला आहे तर काही भाग शास्त्र नाही म्हणून वर्ज्य केला आहे ! तेसुद्धा भ्रांतिशील बुद्धीच्या द्वाराच ना ? म्हणूनच तर भ्रांतिशील बुद्धीपासून कशी सुटका व्हायची ?'

या मूळ सिद्धांतावरच चर्चा चालली. होताहोता त्या दिवशी सायंकाळ होत आली. दुसऱ्या दिवशी ठरलेल्या वेळी पुन्हा चर्चेला आरंभ व्हायचा असे ठरले. इतक्यात शहरात अशी लोकवार्ता प्रचारित आली की, कलकत्याहून ब्राह्मसमाजाचा प्रचारक आला असून शास्त्रशुद्धीचा वाद चालू आहे. वेदातील शुद्धाशुद्ध भाग कोणता, स्वीकारणीय भाग कोणता, वर्ज्य भाग कोणता याची चर्चा चालू आहे. झाले. दुसरे दिवशी मुंग्यांच्या रांगेप्रमाणे हिंदू, मुसलमान, खिश्चन सर्वच संप्रदायांचे लोक चर्चास्थानी उपस्थित असलेले दिसू लागले. सभास्थानी बोट शिरण्याला वाव नाही अशी गर्दी झाली. पुनः ती पूर्वदिवशी अर्धवट राहिलेली चर्चा सुरू झाली. मी डसलेल्या जळूप्रमाणे माझ्या मुद्याला पक्का चिकटून राहिलो. बिनचूक टीकाकार भाष्यकार दिला नाहीतर बिनचूक शास्त्र देणे व्यर्थ आहे हे माझे म्हणणे मी कायम ठेविले. प्रतिपक्षालाही माझे हे म्हणणे खोडून काढता येईना. तर्कवितर्कांचे फाटे फुटू लागले इतकेच. अशातऱ्हेने खूप तर्कवितर्क चालला आहे, इतक्यात हिंदू संन्याशांचा एक जमाव तेथे येऊन दाखल झाला. हिमालयातील तीर्थयात्रा करून हे लोक वाराणशीला चालले होते. त्यांनी ऐकले की अमुक ठिकाणीं पंडित मंडळीत वेदांच्या बिनचूकपणाबद्दल चर्चा, वादविवाद सुरू आहे. खूब विद्वान जमले आहेत, म्हणून केवळ कुतूहलाने हा संन्याशांचा जमाव तेथे आला. या संन्याशांच्या नेत्याचे नाव फणीन्द्रयती. पाहिले तो मनुष्य मोठा बुद्धिमान आणि संस्कृत भाषाविशारद दिसला. असा मनुष्य येथे आला हे पाहून मीही आनंदित झालो. मग त्याच्यात व माझ्यात वाद-विवाद सुरू झाला. त्यात असे ठरले की, आमच्या पक्षातील दुसऱ्या कोणी मनुष्याने प्रश्न केला तर त्याने उत्तर द्यावयाचे नाही. तसेच त्या संन्याशांपैकी इतर कोणा संन्याशाने प्रश्न विचारल्यास मीही उत्तर द्यावयाचे नाही. प्रश्न विचारायचा झाल्यास माझ्यामार्फत अथवा त्याच्यामार्फतच विचारला पाहिजे. एकाचे बोलणे संपल्यावाचून दुसऱ्याने बोलावयाचे नाही. नंतर क्रमशः प्रश्नोत्तरांना–चर्चेला–आरंभ झाला. त्या दिवशी त्या वादाची पूर्तता झाली नाही. दुसरे दिवशी पुनः शाळेच्या पटांगणात सायंकाळी ही चर्चा पुढे चालेल असे जाहीर झाले.

ठरल्याप्रमाणे त्या दिवशी सायंकाळी सर्व संप्रदायांचे लोक पटांगणावर जमले. चांदण्याच्या प्रकाशात हिरवळीवर बसून वादविवाद सुरू झाला. पण वादविवाद हीच ज्याची मर्यादा, तो वादविवाद कधीतरी संपणार काय? निकाली निर्णय जाहीर होणार काय? दोन्हेही पक्ष पूर्ण हट्टाला पेटलेले! स्वतःचा मुद्दा सोडायला कोणीच तयार नाही. शेवटी रात्री ११ वाजता 'शास्त्र सत्य आहे' मानणारा पक्ष 'स्वामीजी की जय' 'स्वामीजी की जय' अशा ओरडून किंचाळून घोषणा करू लागला. त्यातच आमच्या पक्षातील कोणी एकजण ओरडला, 'कुत्तों को भोंकना दो!' हे शब्द स्वामीजींच्या पक्षांतील लोकांच्या कानावर पडले

मात्र, लागलीच त्यांनी आपले लाठीसोटे उगारले आणि प्रतिपक्षावर आक्रमण करायला सरसावले. शेवटी फणींद्रयती आणि मी अशा दोघांनी मध्ये पडून ती मारामारी टाळली. यानंतर दोनएक दिवसांतच फणींद्रयतींशी माझे सलोख्याचे बोलणे-चालणे झाले. जाताना ते मला म्हणाले, 'तुम्ही काशीला आलात तर आम्हांला भेटण्याला विसरू नका.' मीही त्यांची विनंती मान्य करण्याला चुकलो नाही.

## साधारण ब्राह्मसमाजाच्या मंदिराची बांधणी पूर्ण कशी होईल ?

मोतिहारीहून कलकत्त्याला आल्यावर काही महिन्यांतच माझ्यावर एका मोठ्या कामाची जोखीम येऊन पडली. ती म्हणजे अर्धवट उभारून झालेले समाजाचे मंदिर पूर्ण कसे करावयाचे ही. १८७९ सालच्या प्रारंभी मंदिराचा शिलान्यास झाला. त्यावेळी आनंदमोहन बसूंचे श्वशुर भगवानचंद्र बसू हे रजेवर आले होते. त्यांनी हे मंदिर बांधणीचे काम आपल्या शिरावर घेण्याचे मान्य केले होते. रुडकीहून शिक्षण घेऊन आलेले सुप्रसिद्ध इंजिनीअर नीलमणी मित्र हे बिनखर्चाने प्लॅन वगैरे करून देऊन साहाय्याला पुढे सरले. बांधणीचे कार्य चालू झाले.

१८८० चा माघोत्सव अर्धवट बांधलेल्या मंदिरातच पूर्ण करावा लागला होता. त्यावेळी आशा करण्यात आली होती की, १८८१ चा माघोत्सव, पूर्ण झालेल्या मंदिरातच करण्यात येईल. पण १८८० च्या ऑगस्ट महिन्यात पाहिले तो उरलेल्या काही महिन्यांत शिल्लक राहिलेले बांधकाम पूर्ण होणे कठीण. भगवानबाबूंची कल्पनाशक्ती फार विलक्षण होती. त्यांच्या डोक्यात अनेक युक्त्या-प्रयुक्त्या येत. यामुळे निरनिराळी कामे योजून ते बरेच तोट्यात आलेले होते. मंदिराचे कार्य पूर्ण करण्याचे ठरवून त्यांनी विचार केला की, नेपाळ तराईतून शालवृक्षाची लाकडे आणली तर ती स्वस्त दरात मिळतील. त्याप्रमाणे त्यांनी नेपाळ तराई येथे तशी ऑर्डरही पाठविली होती. ती लाकडे कित्येक महिन्यांनी निरनिराळ्या लहानमोठ्या नद्यांतून तरंगत यावयाची. तेव्हा विलंब होऊ लागला. शेवटी ती लाकडे जेव्हा आली तेव्हा त्यातील पुष्कळशी कमजोर असल्याचे आढळून आले. काय करावे, कसे करावे म्हणता म्हणता कालक्षेप होऊ लागला. इकडे भगवानबाबूंची दुसरीकडे नेमणूक झाली. अर्थात त्यांना जाणे भाग पडले.

तेव्हा मग इमारत कमिटी अनन्योपाय होऊन तिने गुरुचरण महलानवीश व मी या दोघांवर माघोत्सवापूर्वी मंदिर बांधून पूर्ण करण्याची जबाबदारी सोपविली. मी अशा प्रकारच्या कामात अगदीच अननुभवी. तेव्हा पुढे काय करावे तेच सुचेना. मोठ्या काळजीत पडलो. शेवटी रात्री बिछान्यात पडल्यावर विचार करता करता एक योजना मनात आली. मी जेव्हा भवानीपूर साऊथ सबर्बन शाळेचा हेडमास्तर होतो तेव्हा चोवीस परगण्यात डिस्ट्रिक्ट इंजिनीयर सुप्रसिद्ध

राधिकाप्रसाद मुखुर्ज्ये महाशयांशी माझी मैत्री झाली होती. या आपत्तीच्या वेळी त्यांनाच शरण जाण्याचे ठरविले. दुसऱ्या दिवशी सकाळीच स्नान आणि नित्योपासना आटोपून राधिकाबाबूंकडे गेलो. त्यांनी माझ्या तोंडून सर्व हकीगत ऐकून घेऊन त्या कामाचा भार घेण्याचे मान्य केले. लागलीच एका घोड्याने ओढली जाणारी दोन चाके असलेली खुली टमटम गाडी ( इंग्रजी Tandem वरून बंगालीत हा शब्द आला आहे.) आली. टमटमला घोडा जोडण्यात आला आणि आम्ही दोघे त्यात बसून मंदिराकडे येण्याला निघालो. त्यांनी झालेल्या कामाची दहाबारा मिनिटांत पाहणी केली आणि नेपाळ तराईतून आलेल्या लाकूडसामानाची पाहणी करून जे टाकाऊ होते त्यावर खडूच्या निशाण्या केल्या. कोणत्या पद्धतीने मंदिराचे अवशिष्ट काम पूर्ण करावयाचे याची रूपरेषा आम्हाला समजावून दिली. लोखंडी खांब व कांबी कुठे मिळतील त्याचे पत्ते लिहून दिले आणि नंतर, खांबावर बसविण्याच्या लोखंडी कांबी व तुळयांची ऑर्डर देण्यासाठी स्वतःच टमटममध्ये बसून, चित्पूरच्या लोखंडी कारखान्यात निघून गेले. जाताना दुसऱ्या दिवशी सकाळीच आपल्या घरी येण्याची मला सूचना देण्यास ते विसरले नाहीत. त्यानंतर दुसऱ्या दिवशी भवानीपूर येथे त्यांच्या घरी जाऊन मी पाहिले तो एक कॉंट्रॅक्टर बसून असलेले दिसले. त्याला त्यांनीच बोलावून आणले होते. त्यांच्याशी मंदिर पूर्ण करण्याचे कॉंट्रॅक्ट करण्यात आले. दुसऱ्या दिवशी लेखी करार झाला. आगाऊ रक्कम दिली गेली आणि दोन दिवसांतच मंदिराच्या बांधकामाला आरंभ झाला. जणू काय माझ्या मस्तकावरील भार उतरला गेला असेच मला वाटले. महलानवीश रोजच्या कामावर देखरेख करू लागले. मी त्या कामाच्या जबाबदारीतून मुक्त होऊन दुसऱ्या कामाकडे वळलो. आणि मंदिरासाठी आर्थिक साहाय्य मिळविण्याला उद्युक्त झालो.

१८८१ सालच्या माघ महिन्याच्या १० तारखेला ४५ नं. बेनियाटोला लेनपासून नगर कीर्तन करीत येऊन मंदिराची प्राणप्रतिष्ठा केली. काय तो दिवस! आम्ही भजन गात गात येऊन पाहिले तो वृद्ध शिवचंद्रदेव मंदिराची किल्ली हातात घेऊन दाराशी उभे आहेत. आमची दिंडी तेथे येताच त्यांनी ईश्वराचे शुभाशीर्वाद मागून मंदिराच्या दाराचे उद्घाटन केले. दार उघडले. मोठ्या उत्साहाने मंदिराचा उद्घाटन समारंभ पार पडला.

* * *

. १५ .

# दक्षिणभारताचे नवदर्शन

## बोटीने मद्रासकडे

१८८१ चा माघोत्सव आणि मंदिराचे उद्घाटन झाल्यावर काही दिवसांनी ( फेब्रुवारीच्या मध्यभागी ) मी मद्रासला गेलो. हा प्रवास मी बोटीनेच केला. त्यावेळी मद्रासची परिस्थिती काय होती हे समजावे म्हणून या ठिकाणी त्या प्रचार-प्रवासाचे थोडेसे वर्णन देत आहे. मद्रासच्या बंदरात पोचलो त्यावेळी पाहिले तो ते बंदर अजून चढण्याउतरण्याला योग्य असे करण्यात आलेले नव्हते. म्हणून बोटी बंदरापासून सुमारे तीन चार मैलांवर उभ्या राहात. तेथून पडावातून बंदरावर उतरावयाचे. या पडावातून बंदरापर्यंत जाणे म्हणजे नवीन मनुष्याला फार भयंकर दिव्यच वाटायचे. जोराने येणाऱ्या लाटा पडावावर आपटल्याने आतील उतारूंच्या अंगावरील कपडे भिजून जात. पडाव लाटेबरोबर एका वेळी दहा हात उंच उचलला जायचा, नंतर ती लाट गेल्यावर तो पडाव पुनः दहा हात खाली आल्यावर बोटीवरील लोकांना दिसेनासा व्हायचा. अशा तऱ्हेचा पडावाचा प्रवास संपल्यावर ' त्राहि त्राहि ' म्हणत म्हणत मी एकदाचा किनाऱ्यावर उतरलो.

## ब्राह्मणांचे जेवण शूद्राने पाहायचे नाही

मद्रासेतील ब्राह्मसमाजाचे काही सभासद माझे स्वागत करण्यासाठी बंदरात आलेले होते. त्यांनी माझे स्वागत करून मला एका घरात नेऊन पोचविले. पाहिले तो तेथे त्या घरातील वरचा मजला माझ्यासाठी भाड्याने घेऊन ठेवण्यात आलेला होता. तसेच समाजाचे एक सदस्य, बुचिया पंतलु महाशय यांच्या घरून जेवण आणून मला देण्यासाठी एका ब्राह्मण मुलाची योजनाही केली होती. योग्य वेळी स्नान वगैरे आटोपून आलेल्या ब्राह्ममंडळीशी मी बोलत बसलो आहे, इतक्यात त्या

ब्राह्मण मुलाने इंग्रजीत मला जेवणाला बोलाविले. मी जेवायला जाताना जमलेल्या मित्र-मंडळींना म्हटले, ' चला. मी जेवायला बसतो. तेथेच आपण बसून बोलूया. यावर ते काही बोलले नाहीत आणि माझ्याबरोबर आलेही नाहीत. मी जाऊन भोजनाला बसल्यावर त्या ब्राह्मण मुलाला इंग्रजीतून सांगितले, ' त्यांना यायला सांग आणि बसायला खुर्ची दे. ' तो चकित होऊन जीभ चावून म्हणाला, ' ते शूद्र आहेत. आपण जेवीत असताना ते येथे कसे येतील ? जेवताना त्यांनी पाहू नये असे आहे. ' नंतर मला समजले की, याच कारणाने ते माझ्याबरोबर आले नाहीत. तपासाअंती मला कळले, की त्या देशात ब्राह्मणाचे जेवण शूद्रांना पाहण्याचा अधिकार नाही. इतकेच नव्हे तर ' चेट्टी ' वगैरे काहीं काही संप्रदायांत पित्याचे जेवण मुलालाही पाहण्याचा अधिकार नाही. ब्रह्मण आणि शूद्र एकत्र प्रवास करीत असले तर ब्राह्मणाला आपले जेवण कापडाचा पडदा लावून करावे लागते.

## मद्रासेतील व्याख्याने

यानंतर मी सभासदांशी जातिभेदाच्या अनिष्टतेबद्दल बोलू लागलो. आणि त्यासंबंधाने नंतर एक व्याख्यानही दिले. त्या व्याख्यानाने शहरात मोठी खळबळ उडाली. याच वेळी मद्रास शहरी ' पाच्चियाप्पा हॉल ' नावाच्या इमारतीत इंग्रजी भाषेत मी एक व्याख्यान दिले. त्यातच प्रसंगानुरोधाने, भारतीय गव्हर्नमेंटच्या खर्चाळू कारभाराचा उल्लेख करताना म्हटले की, ' त्याचा परिणाम असा झाला आहे, दि पुअर मॅनस् सॉल्ट इज नॉट् फ्री फ्रॉम ड्यूटी. ' त्याच्या दुसऱ्या दिवशीच ' मद्रास मेल ' नावाच्या इंग्रजांच्या वर्तमानपत्रात, ' दि पुअर मॅनस् सॉल्ट् इज नॉट् फ्री फ्रॉम ड्यूटी. ' या शिरोनामाखाली एक प्रबंध छापला गेला. त्यात असे म्हटले होते, ' वंगदेशातून राजकीय कराचा योग्य तो हिस्सा मिळत नसल्यामुळे दुसऱ्या प्रांतातील गरीब प्रजेला करभाराचा त्रास सोसावा लागतो. ' याशिवाय त्या लेखात बंगाली लोकांची निंदाही केली होती. मी त्या निंदेवर उत्तरादाखल एक पत्र लिहिले आणि ' हिंदू पेट्रियेट 'चे संपादक कृष्णदास पाल महाशयांना इतर मुद्यांवर उत्तरादाखल लिहा असे गुप्त पत्र दिले. त्यांनी ' बेंगॉल दि मिल्क-काऊ ऑफ् दि ब्रिटिश गव्हर्नमेंट ऑफ् इंडिया ' नावाचा एक स्टॅटॅस्टिकली माहिती-पूर्ण असा प्रबंधात्मक लेख प्रसिद्ध केला. या सगळ्या कारणांनी तेथील सुशिक्षित व इंग्रज लोकांत माझे नाव प्रसिद्ध झाले. त्यानंतर परशुवाकम्, मैलापूर वगैरे मद्रासच्या अनेक उपनगरांतून मला व्याख्यानांसाठीं निमंत्रणे येऊ लागली. अनेक मोठमोठ्या जाहीर सभांतुन माझा पुष्पमालांनी गौरव करून आदराने माझ्याविषयी आपलेपणाही व्यक्त करण्यात आला. सर्वत्र माझे अभिनंदन होऊ लागले. याच प्रवासात दिवाणबहादुर रघुनाथराव वगैरे बऱ्या लोकांशी माझा परिचय होऊन त्यांच्याशी माझी मैत्री झाली.

मी जेव्हा अशा प्रकारे मद्रासेत काम करीत होतो तेव्हा उत्तरविभागातील राजमहेंद्री वगैरे ठिकाणी चांगलीच चळवळ सुरू झाली होती. राजमहेंद्रीत वीरेश-लिंगम पंतलू नावाचे प्रतिभाशाली प्रसिद्ध लेखक आणि समाजसुधारणावादी माझ्या पाहण्यात आले. त्यानी तेलगू साहित्यात फारच चांगली कामगिरी केली होती. आणि देशात विधवाविवाहाची चाल रूढ व्हावी म्हणून पुष्कळच प्रयत्न चालविले होते. त्यांच्या प्रोत्साहनाने झालेल्या पुष्कळ पुनर्विवाहित दांपत्यांवर समाजबहिष्कृत होण्याचाही प्रसंग आला होता. आणि त्या बाबतीत मोठी चळवळही चालू होती.

त्याच वेळी, राजमहेंद्रीनजीक समुद्रतीरावर असलेल्या कोकोनाडा नावाच्या शहरी रामकृष्णय्या नावाचे एक ' कामटी ' जातीचे धनिक गृहस्थ राहात असत. ( कामटी ही जात बंगाल्यातील वैद्य नावाच्या जातीसारखी आहे. ) यांनी विधवाविवाहाची चाल समाजात रूढ व्हावी म्हणून प्रयत्न चालविले होते. त्यामुळे सुधारक पक्षात पुढारी म्हणून त्यांना ओळखण्यात येई. त्यांनी विधवाविवाहाला कायदेशीर स्वरूप यावे म्हणून विद्वान् पंडितांना व शास्त्र्यांना एकत्र जमवून वादविवादाची प्रथा चालू केली होती. अशी चळवळ चालू असताना रामकृष्णय्यांनी मद्रासच्या वर्तमानपत्रात माझे नाव व मते प्रसिद्ध झाल्याचे वाचले. लागलीच मला कोकोनाडा येथे येण्यासंबंधी त्यांच्या तारावर तारा येऊ लागल्या.

## कोकोनाडा

शेवटी मी कोकोनाडा येथे गेलो. बंदरात उतरताच पाहिले तो, मला नेण्यासाठी रामकृष्णय्यांची गाडी आलेली होती. त्या गाडीत बसून मी त्यांच्या वाड्यात दाखल झालो. माझ्याबरोबर ब्राह्मण सैपाकी नसल्याचे पाहून त्यांना नवल वाटले. तेव्हा मी सांगितले, ' मी एक गरीब प्रचारक आहे. मला काय ब्राह्मण सैपाकी बरोबर बाळगणे परवडेल ? मी ज्यांच्याकडे जातो, त्यांच्याकडेच जेवतो. मी जात मानीत नाही. ' माझे हे बोलणे ऐकून रामकृष्णय्यांचे तोंड म्लान झालेले मला दिसले. मला वाटले त्यांच्या मनाला असे वाटले असावे की, कसल्या विलक्षण मनुष्याला मी बोलवून बसलो ! ' ते काही असले तरी माझ्याशी वाग-ण्यांत त्यांनी पूर्ण सौजन्य तर दाखविलेच, पण पाहुणचारातही काही कमतरता होऊ दिली नाही.

मला राहण्यासाठी म्हणून आपल्या वाड्याजवळच एक स्वतंत्र घर दिले. आणि माझे कामकाज व जेवण वगैरे आणण्यासाठी एका नोकराची नेमणूक केली. दोन दिवस जातात न जातात तोच त्या लहानशा शहरात लोकवार्ता उठली की, रामकृष्णय्यांनी बंगदेशातून एक नास्तिक पंडित आणला असून तो येथील सर्व विवाहयोग्य अशा विधवांची लग्ने लावून जाणार आहे. या लोकवार्तेने मला मोठ्या अडचणीत टाकले. रस्त्यातून अगर गल्लीबोळातून जाणे मुष्किलीचे होऊन बसले.

बाहेर पडताच टोळ्याटोळ्यांनी लोक माझ्यामागून येऊ लागत. रस्त्यारस्त्यात लोक जमून माझ्या हालचालींवर लक्ष ठेवीत. माझी दाढी आणि डोक्यावरील बारीक कापलेले केस पाहून मी खिश्चन आहे असे समजत आणि मग त्यावर विलक्षण चर्चा सुरू होई.

## कामत्याने स्पर्श केलेल्या पाण्याने स्नान केल्याचा परिणाम

एके दिवशी सकाळी माझ्याबरोबर विधवाविवाह कायदेशीर व शास्त्रानुमोदित आहे की नाही याचा न्याय करण्यासाठी पंडितांचा एक जमाव येऊन दाखल झाला. ते लोक संस्कृतात बोलत होते. त्यांचे संस्कृत उच्चार ऐकून मला वंगदेशातील संस्कृत उच्चारांचा तिटकारा वाटू लागला. त्यापूर्वी संस्कृतात बोलण्याची मला सवय नव्हती. त्यामुळे संस्कृतात बोलताना मला जरा थांबून थांबून बोलावे लागे. तसे असले तरी विचार-विनिमय होऊ लागला. इतक्यात एक घटना घडून आली. रामकृष्णय्यांच्या नोकराने मला स्नानासाठी पाणी आणले. त्याला पाहताच जमलेल्या ब्राह्मणमंडळींची गडबड उडाली. ते आपसात खाणाखुणा, संकेत, कुजबुज करून एकमेकांना काहीतरी सांगू लागले. हे पंडित लोक असे काय करतात याचा मला उलगडा होईना. काही वेळाने चर्चा बंद करून ते उठले आणि निघून गेले. मी उठून व्हरांड्यात उभे राहून पाहिले, तेव्हा मला दिसले की, रस्त्यात ठिकठिकाणी जमावाने उभे राहून पंडितलोक कसलातरी विचारविनिमय करीत आहेत. त्यांच्यातील भीमराव नावाचा इंग्रजी जाणणारा व माझ्याबद्दल आदर बाळगणारा एक ब्राह्मणतरुण, धावत धावत वरच्या मजल्यावर आला आणि मला म्हणाला की, ' तुम्ही ब्राह्मण असून कामटी नोकराने आणलेल्या पाण्याने स्नान करीत असल्याचे पाहून ती ब्राह्मणमंडळी फार रागावली आहेत आणि शहरातून शक्य तितक्या लवकर तुम्हाला घालवून द्या असे सांगण्यासाठी रामकृष्णय्यांकडे निघाली आहेत. ' मी हसून उत्तर दिले, ' कामत्याने आणलेल्या पाण्याने मी स्नान केल्याबद्दल इतका गोंधळ उडाला ! मग मी त्याच्याकडेच जेवतो हे कदाचित त्यांना ठाऊक नसावे ! '

यानंतर सगळी ब्राह्मणमंडळी बिचाऱ्या रामकृष्णय्यांच्या दारातच धरणे धरून बसली, त्यामुळे ते मोठ्या पेचात सापडले. त्यांनी मला निमंत्रण देऊन मद्रासेतून बोलविले होते, त्यामुळे कोकोनाडामधून तुम्ही जा असे त्यांना उघडपणे मला सांगवेना आणि या सर्व ब्राह्मणमंडळीच्या रागातून आपला कसा बचाव करावा हेही उमगेना. शेवटी मला भेटण्याचेच त्यांनी टाळले.

मी मात्र अशा प्रसंगी मोठ्या संकटात पडलो. त्यांना अशा प्रकारे संकग्रस्त करून आपण येथे राहणे योग्य नाही असेच मला वाटले. मी शाकाहारी असल्यामुळे मला फिरंग्यांच्या हॉटेलातही जाता येणे शक्य नव्हते. माझे खूप बारीक

कापलेले केस व दाढी पाहून इतर खाणावळवाले मला ख्रिश्चन समजून हॉटेलात घेईनात. काय करावे तेच समजेना. शेवटी ठरविले की, राजमहेंद्रीत विधवा-विवाहाचा प्रचार करणारा पक्ष मला बोलवीत आहे तेव्हा त्यांच्याकडेच जाणे चांगले. पण तिथे जायचे म्हणजे नावेतून आणि तीही नाव कालव्यातून जायची. नाव आठवड्यातून एकदोनदाच यायची. कधी यायची हे नक्की ठरलेले नाही. ती केव्हा येते याची वाट पाहात राहिले पाहिजे. बरे, अशी वाट पाहात बसून तरी किती दिवस राहायचे ? शेवटी रामकृष्णय्यांकडे मनुष्य पाठविला आणि कळविले, ' मला मेणा आणि मेणावाहक द्या. मी राजमहेंद्रीला जातो. ' तीस मैल मेण्याने जाणे म्हणजे काही कमी खर्चाचे नव्हे. आणि त्यामुळेच रामकृष्णय्यांनी माझ्या या निरोपाकडे कानाडोळा केला असावा. शेवटी ब्राह्मणतरुण भीमराव याला मी म्हटले, ' हे पाहा, माझे सामानसुमान वाहून नेण्यासाठी दोन कुली ठरवून दे. मी चालतच राजमहेंद्रीला जातो. बोटीसाठी तीनचार दिवस वाट पाहात बसून राहणे मला योग्य वाटत नाही. '

माझी ही सूचना ऐकून भीमराव म्हणाला, ' काय ? तुम्ही चालत राज-महेंद्रीला जाणार ? छे, तसे मुळीच करू नका. चला माझ्या घरी या. काही दिवस माझ्याच घरी राहा. ' मी म्हटले, ' नको, भीमराव तसे करू नका. तुम्ही येथील ब्राह्मण पाहिलेत ना ? कामट्याकडील पाण्याने मी स्नान केले तर त्यांनी केवढा गहजब केला ! तुमच्यावरही अशीच आपत्ती कोसळेल. विशेषतः तुम्ही गरीब माणूस सामान्य वेतन मिळविणारे कारकून. कशीबशी भाड्याची एक खोली घेऊन राहता. त्यात आणखी मला कशाला ठेवून घेता ? ' पण भीमरावाने माझे काहीच ऐकून घेतले नाही. तो म्हणाला, ' तुम्ही चलाच. त्या लहान खोलीतच सर्व राहू. मला कोण काय शिक्षा करील ती करू दे. मी त्यांना जुमानीत नाही. ' असे म्हणून माझ्या हरकतीकडे लक्ष न देता सामान नेण्यासाठी त्याने कुली आणला. आणि मला आपल्या खोलीवर नेले. तेथे गेल्यावर आपली आई, बहीण आणि पत्नी यात मला सामील केले. मी बाहेरच्या पडवीत बैठक घालून बसलो.

त्याच्या दुसऱ्या दिवशी भीमराव म्हणाला की, ' समोरच्या रस्त्याच्या पली-कडे एक छापखाना आहे. सायंकाळनंतर त्याच्या ऑफिसच्या खोलीत कोणी नसते. त्यांना सांगून रात्रीच्या वेळी ती जागा मी आपल्याकडे घेतो. त्या ठिकाणी लोकांच्या गाठीभेटी घेता येतील. कारण पुष्कळ लोक तुम्हाला भेटण्यासाठी उत्सुक आहेत. ' मी म्हटले, ' छान उत्तम आहे. तसेच कर. ' नंतर भीमरावाने त्या छापखानेवाल्या-कडे जाऊन दोन तीन दिवसांसाठी ती छापखान्याची ऑफिसची जागा मागून घेतली. त्यांनीही ती जागा द्यावयाला संमती दिली. लागलीच शहरातील शिकलेल्या लोकांना ही माहिती त्याने दिली. पण सायंकाळनंतर मी तेथे जाऊन पाहतो तो प्रेसवाल्यांनी त्या खोलीला कुलूप लावून ते स्वतः केव्हाच तेथून पसार झाले

होते. नंतर ऐकले की, भीमरावाला ती खोली देण्याचे प्रेसवाल्याने मान्य केल्याचे शहरातील ब्राह्मणमंडळींना समजताच त्या सर्वांनी प्रेसवाल्याला धमकी देऊन जागा न देण्याबद्दल बजावले. हे सर्व ऐकून मी हसून म्हटले, ' बाबारे, कामट्याकडच्या पाण्याने स्नान केल्याबद्दल ही शिक्षा बरं का ! '

## कोकोनाडाच्या शाळागृहात व्याख्यान

दुसरे दिवशी सकाळीच भीमरावाला, मी स्थानिक इंग्रजी स्कूल कमिटीचे अध्यक्ष मॅजिस्ट्रेटसाहेब यांच्याकडे पाठविले आणि सांगितले, ' ते शाळागृहात माझे व्याख्यान करायला तयार आहेत की नाहीत ते विचारून ये. तसेच तयार असतील तर ते अध्यक्ष होतील की नाही हेही विचार. ' व्याख्यानाचा विषय ' दि ब्राह्मसमाज, इट्स हिस्ट्री अँड इट्स प्रिन्सिपल्स ' असा होता.

मॅजिस्ट्रेट साहेबांनी यापूर्वीच ' मद्रास मेल ' पत्रात माझे नाव वाचले होते आणि माझे पत्रही त्यांच्या वाचण्यात आले होते. अर्थात् ब्राह्मसमाज म्हणजे काय हेही ऐकण्याची त्यांना उत्सुकता होती. म्हणून माझी विनंती ऐकताच त्यांनी व्याख्यानासाठी शाळागृह देण्याचे मान्य केले व अध्यक्ष होण्यालाही ते तयार झाले. व्याख्यान झाल्यावर इंग्रजांनी मला घेरून टाकले. निरनिराळे प्रश्न विचारले. ' तुम्ही आमच्याबरोबर चहा घ्याल का ? ' असाही प्रश्न केला. मी होकारार्थी उत्तर देताच त्यांनी निमंत्रण देण्याची इच्छा प्रकट केली. पण दुसऱ्या दिवशी नौकेने राजमहेंद्रीकडे जावयाचे असल्यामुळे, ' मला त्या निमंत्रणाचा स्वीकार करता आला नाही. रामकृष्णय्या हे व्याख्यान ऐकायला आले होते. त्यांनी जेव्हा पाहिले की, शहरातील बडया बडया इंग्रज लोकांनी मला घेरून टाकले आहे व चहाचेही निमंत्रण दिले आहे, तेव्हा गर्दी थोडी कमी झाल्यावर आत येऊन त्यांनी माझ्या कानात सांगितले, माझ्या एका बंगल्यात मी तुम्हाला राहायला जागा देतो. चला, या लोकांच्या भेटीगाठी घेता येतील. भीमरावाकडे काय तसे होणार आहे ? '

मी हसून त्यांना धन्यवाद दिले आणि म्हटले, ' मी नौकेतून उद्या राजमहेंद्रीला जात आहे. '

## राजमहेंद्री

दुसऱ्याच दिवशी नौकेतून मी राजमहेंद्रीला पोचलो आणि तेथे जाऊन वीरेशलिंगमच्या प्रेमालिंगनाने आणि त्याच्या पत्नीच्या आपुलकीच्या आतिथ्याने कृतार्थ झालो. वीरेशलिंगमची पत्नी म्हणजे खरोखरच एक स्मरणीय व्यक्ती. जितकी ती दृढनिश्चयी, तेजस्विनी आणि कर्तव्यपरायण, तितकीच सहृदय व परोपकारी. तशाप्रकारची सहधर्मचारिणी लाभल्यामुळेच मित्रवर्य वीरेशलिंगम् निरनिराळ्या सामाजिक छळणुकींतही भरपूर सामाजिक कार्य करू शकले. तेथे मोठ्या उत्साहाने माझ्या कामाला सुरवात झाली.

राजमहेंद्रीहून मी पुन्हा मद्रासला आलो. तेथील प्रतिष्ठित मंडळींनी एक जाहीर सभा घेऊन माझ्या कार्याचा गौरव केला आणि त्यांच्या प्रेमाचे प्रतीक म्हणून एक घड्याळ देणगीदाखल दिले.

## कोईमतूर

या खेपेला मी मद्रासहून प्रथमच कोइमतूरला ब्राह्मधर्म प्रचारासाठी गेलो. त्यासंबंधींच्या काही गोष्टी आठवणींत आहेत. मद्रास ब्राह्मसमाजाचे अध्यक्ष रंगनाथम् मुदलियार महाशय आणि मी असे दोघेही तिकडे गेलो होतो. तेथील समाज सदस्य आम्हाला कोइमतूरला नेण्यासाठी अगोदरच्या पदनूर स्टेशनपर्यंत पुढे आले होते. ते गाडीतच मला समजावू लागले की, येथे कोइमतूरला असे-पर्यंत तुम्हांला जातिभेद मानून राहावे लागेल.'

मी म्हटले, 'ते कसे जमायचे? मी तर फार पूर्वीपासून जातिभेद मानीत नाही!'

त्यांनी म्हटले, 'तसे म्हणून चालते थोडेच? तुम्ही जातिभेद मानून चालला नाही तर येथील सर्वच कार्य मातीमोल होऊन जाईल.'

मी उत्तर दिले, 'आम्ही वस्तुतः जे करतो आणि मानतो ते माणसांना ठाऊक असणेच चांगले म्हणूनच करतो. आम्ही जातीला महत्त्व देऊ शकणार नाही. ते आमचे कार्यच नव्हे.'

त्यांनी पुनः म्हटले, 'हा बंगाल देश नव्हे. येथे जो जात मानीत नाही त्याला खिश्चन समजून बहिष्कृत करण्यात येते. येथील अनेक खिश्चन सांप्रदायिकांनाही जातिभेद मानून वागणे भाग पडते.

(आणि ही खरी वस्तुस्थितीच होती. कारण तेथे मला जानवे घातलेले खिश्चनही आढळले. इतकेच नव्हे तर जातिभेद मानणाऱ्या अनेक खिश्चनांशी माझा परिचय व बोलीभाषणही झाले.)

अशा प्रकारे तर्कवितर्क व संभाषण करीत करीत आम्ही कोईमतूर येथे येऊन दाखल झालो. तेथे पाहिले तो त्या लोकांनी आमच्यासाठी एक स्वतंत्र घर घेऊन ठेविले होते. जेवणाच्या वेळी एक ब्राह्मणसैंपाकी आम्हाला तेथे बोलावून घेऊन गेला. जेवताना पाहिले तो, फक्त माझ्यासाठी आसन घातलेले. माझे मित्र रंगनाथम् यांच्यासाठी आसन नाही. विचारले असता सैंपाकी म्हणाला, 'त्यांचे जेवण वेगळ्या ठिकाणी होईल.' माझा नाइलाज झाला व मला एकट्यानेच जेवावे लागले. जेवणानंतर ऐकले की, त्यांना एका अंधाऱ्या गोठ्यात नेऊन तेथे जेवायला घातले होते. ते शूद्र असल्यामुळे त्यांना ही शिक्षा. हे ऐकून मला फार वाईट वाटले. समाजाचे सभासद सायंकाळी जमल्यावर मी त्यांना म्हटले, 'तुम्ही हे काय चालविले आहे? मद्रासेत असताना मी त्यांच्या घरी जेवीत असे. त्यांची

पत्नी मला वाढीत असे. शिवाय ते समाजाचे सेक्रेटरी आणि माझे मित्र. या ठिकाणी जेवणाचे वेळी त्यांना वेगळे का वाढले ?'

ते हसून म्हणाले, 'या ठिकाणची सगळी व्यवस्था करणारे आम्ही. आमच्या सांगण्याप्रमाणे सर्व व्हायचे. आपण काही या बाबतीत बोलू नका.'

माझे मित्र रंगनाथमही मला म्हणाले, 'जसे चालले आहे तसे चालूद्या. आपण काही गडबड करू नका.'

अर्थातच मला गप्प बसावे लागले; पण मनाला बरे वाटले नाही.

यानंतर सकाळ-सायंकाळ आमच्या राहत्या ठिकाणी समाजाचे सभासद व इतर स्थानिक लोक जमू लागले. प्रत्येक वेळी पाहिले तो एक मनुष्य माझ्याजवळ नेहमी असे, पण आमच्याबरोबर बिछान्यावर न बसता तो जमिनीवरच बसून राही. तपासाअंती मला कळले की, तोही समाजाचा एक सभासदच आहे. असे वेगळे बसण्याचे कारण विचारता मला सांगण्यात आले की, तो मनुष्य 'पंचमा' अर्थात श्रेष्ठ अशा चारही वर्णांनी बहिष्कृत असा अस्पृश्य मानलेला. तो समाजप्रिय व समाजाचा सदस्य खरा; पण इतर सभासदांसह एकासनावर बसण्याची त्याला हिंमत नाही. हळूहळू त्याची हकीगत मी त्याच्या तोंडून ऐकली ती अशी—तो पोलिसात असून अल्पवेतन मिळवितो आणि कोइमतूर शहरापासून जवळच एका झोपडीत परिवारासह राहतो.

एके दिवशी मी त्याला म्हटले, 'तुझे घर किती अंतरावर आहे? मला तुझे घर आणि बायकोमुले पाहायची आहेत.'

त्याने सांगितले, 'आपण रोज सकाळी फिरायला जाता त्याच रस्त्यालगत माझे घर आहे.'

मी म्हटले, 'अस्से ? तर मग उद्या तू आपल्या घरासमोर रस्त्यात उभा राहा आणि मी येताना मला बोलवून घे.'

तो म्हणाला, 'आपण फिरून आल्यावर दूध पिता. माझ्या घरी आल्याने आपल्या दुग्धपानाला विलंब होईल.'

मी उत्तर दिले, 'तू माझ्यासाठी थोडे दूध ठेव. तुझ्या येथेच मी दूध पिऊन निघेन. मग तर झाले ?'

माझ्या या सूचनेचे त्याला नवल वाटले. त्याच्या या नवलाईचे कारण त्यावेळी मला तितकेसे उमगले नाही.

त्यानंतर दुसऱ्या दिवशी सकाळी मी फिरून येत असता त्याच्या घरी गेलो. त्याने अंगणात वेताचे एक स्टूल ठेविले होते. त्यावर बसलो. त्याच्या पत्नीला व मुलांना पाहिले. त्यांचे माझे बोलीभाषणही झाले. बंगाल देश व ब्राह्मसमाज यांविषयी अनेक गोष्टी झाल्या. त्याने दूध आणि उप्मा (शिरा) दिला तो मी घेतला आणि खाल्लाही.

इतके झाल्यावर घरी येऊन बसतो न बसतो तोच ही गोष्ट शहरभर सर्वत्र झाली. 'पंडित शिवनाथशास्त्री यांनी एका पंचमाच्या घरी जाऊन दूध घेतले व उप्‌माही खाल्ला.' या वार्तेने सर्वत्र मोठी खळबळ उडाली आणि माझ्या खोलीवर भराभर समाजाचे सभासद येऊ लागले. प्रत्येकाच्या तोंडी 'हाय हाय! काय केलेत हे!' हेच शब्द. मी त्यांना सांगितले, 'असे काही होईल असे खाण्याच्या वेळी मला वाटले नव्हते. शिवाय त्याची विनंती तरी मी अमान्य कशी करू?'

यानंतर लोकांना समजले की, 'मी इतर लोकांकडेही जेवतो' आणि मग शूद्र मानलेल्या प्रतिष्ठित लोकांकडून मला निमंत्रणावर निमंत्रणे येऊ लागली. कित्येक दिवस असा हा भोजनसमारंभ चालला. 'मी जात मानीत नाही' हे सर्वांना स्पष्ट कळून चुकले. तरी पण माझ्या व्याख्यानाला बहुसंख्येने सर्व लोक उपस्थित राहात. सभासदांची भीतीही दूर झाली.

**बंगलोर**

याच प्रवासात मी म्हैसूर संस्थानातील बंगलोर शहरीही गेलो. त्या ठिकाणी सैनिकांचा एक 'रेजिमेंटल ब्राह्मसमाज' होता. एक सुभेदार या समाजाचा मोठा उत्साही सभासद होता. तसेच गोपालस्वामी अय्यर नावाचा एक तरुणब्राह्मण या समाजाचे आचार्यपद चालवीत असे. समाजाच्या कार्यासाठी त्या सुभेदाराने एक घरही घेऊन दिले होते. त्यात मुलींची एक शाळा भरत असे. समाजाचे कार्यही तेथेच चाले. मी तेथे गेल्यावर त्याच घरात राहू लागलो. गोपालस्वामी अय्यरच्या घरी माझी जेवण्याची व्यवस्था करण्यात आली होती.

तेथील माझ्या वास्तव्याने बंगलोर शहरात मोठे आन्दोलन सुरू झाले. माझी व्याख्याने ऐकायला खूपच गर्दी जमू लागली. एका व्याख्यानाचे वेळी म्हैसूरचे दिवाण सुप्रसिद्ध रंगाचार्लू महाशय यांनीच खुद्द अध्यक्षस्थान स्वीकारले होते.

**ब्राह्मकन्या कमलाम्मा हिची श्रद्धा**

बंगलोर येथे असताना अशी एक घटना घडून आली की, तिचे विस्मरण मला कधीच होणार नाही. माझ्या अन्तःकरणावर त्या स्मृतीचा ठसाच उमटला. एके दिवशी एका स्थानिक परिवाराने कौटुंबिक उपासनेसाठी मला आपल्याकडे बोलविले. जाऊन ऐकले की, घराची मालकीण ही एक ब्राह्मणकन्या असून ती विधवा झाल्यावर माहेरी आली असता एका शूद्राशी प्रेमबद्ध होऊन त्याच्याबरोबर निघून गेली. पुढे तिला एक मुलगी झाली. मी तेथे गेलो त्यावेळी त्या मुलीचे वय १६।१७ वर्षांचे असावे. बाप मयत झाल्यावर ती मुलगी आपल्या आईसह, ब्राह्मसमाजाच्या एका वृद्ध सभासदाच्या देखरेखीखाली तेथेच राहिली. अशा स्थितीत त्या आश्रयदात्या सभासदाने त्या मुलीला इंग्रजी व संस्कृत शिकविले. मी त्या मुलीची दोन्ही भाषांत परीक्षा घेतली, तेव्हा तिच्या प्रावीण्याबद्दल समाधान

वाटले. तिच्या आईने, आपल्यासह मुलीला कलकत्त्याला नेऊन हिचा तेथे विवाह लावून द्या असा मला खूप आग्रह केला; पण प्रचारासाठी मला अनेक ठिकाणी जावे लागणार असल्यामुळे मला तिचा तो हेतू पूर्ण करता आला नाही.

पुढे काही वर्षांनी मी बंगलोरला जाऊन त्या मुलीसंबंधाने तपास केला तेव्हा लोकांनी सांगितले की, तिची आई मरण पावल्यावर मुलगी वाईट मार्गाला लागली. ऐकून फार वाईट वाटले. मी त्यावेळी तिला कलकत्त्याला नेऊन योग्य वराशी तिचे लग्न लावले असते तर तिला ही वाईट स्थिती आली नसती, असे वाटून मी दुःखित झालो.

नंतर मी तिचा विशेष तपास न करता इतर कामात गढून गेलो. एके दिवशी मला भेटायला आलेल्या काही प्रतिष्ठित लोकांशी बोलत बसलो असता एका नोकराने येऊन सांगितले, ‘प्रतिष्ठित गृहस्थाची एक मुलगी आपल्या भेटीची अपेक्षा करीत आहे.’ लागलीच मी बाजूच्या खोलीत जाऊन पाहतो तो तेथे ती मुलगी कमलाम्मा अर्थात् कमलिनी उभी. ती त्यावेळी २२।२३ वर्षांची असावी. मला पाहताच तिने माझ्या पायावर फुलें वाहून डोके ठेविले. आणि आपला नवरा म्हणून जवळच उभ्या असलेल्या एका शूद्र जातीच्या प्रतिष्ठित गृहस्थाचा परिचय करून दिला.

पुढे तिची माहिती समजली ती अशी : आईच्या मृत्युकाली या गृहस्थाशी तिचा विवाह झाला. आईचा पालक म्हणून असलेल्या पूर्वीच्या ब्राह्मसमाजिष्ठ गृहस्थानेच तो विवाह लावून दिला होता. हा विवाह अत्यंत गुप्तपणाने झाला असल्यामुळे लोकांना ठाऊक नव्हता. शिवाय या विवाहामुळे तिच्या नवऱ्याला जातिबहिष्कृत व्हावे लागले होते. इत्यादी हे सर्व ऐकून मला फार आनंद वाटला. हा सगळाच प्रकार मला नवीन असल्यामुळे तो चांगला लक्षात राहिला आहे. यानंतर त्यांची माझी भेट झाली नाही.

**पुनः मद्रास**

मी मे महिन्यात मद्रासचा प्रवास संपवून कलकत्त्याला परत आलो. पण पुनः सप्टेंबर महिन्यात तिकडून वारंवार तारा येऊ लागल्या. प्रत्येक तारेत ‘या या, अवश्य या. आलेच पाहिजे’ अशा तऱ्हेचा संदेश असायचा. तिथला प्रकार असा होता, नवविधानसमाजाचे प्रचारक अमृतलाल बसू महाशय त्यावेळी मद्रास प्रदेशात निरनिराळ्या ठिकाणी फिरून खुद्द मद्रासेत आले होते. त्यामुळे आमचे बुचियापंतलु महाशय भ्याले आणि पुनः पुनः मला तारेने व पत्रांवर पत्रे पाठवून बोलवू लागले. आपण ज्या कामाची उभारणी केली आहे ती ढासळून पडेल असे त्यांना वाटू लागले. अशा या वेळी व प्रसंगी तेथे जावे की नाही याची मला

शंकाच वाटू लागली. तरीपण कमिटीने मला पाठविलेच. तेथे जाताच मी कामालाही आरंभ केला. अमृतबाबूंशी माझे पुष्कळ दिवसांपासूनचे आपुलकीचे नाते होते. घरी असताना त्यांच्याशी मी मिळूनमिसळून वागत असे. पण नवविधान आणि साधारण ब्राह्मसमाज यांच्यात उघडपणे विरोध चाललाच होता, याच वेळी मी ' दि न्यू डिस्पेन्सेशन अँड दि साधारण ब्राह्मसमाज ' या नावाचे इंग्रजी पुस्तक लिहिले व ते मद्रासेतच छापले आणि तेथूनच प्रकाशित केले.

दुसऱ्या वेळी मद्रासला गेलो त्यावेळीं मद्रासच्या ब्राह्मपित्रांनी त्यांच्या अध्यक्षांच्या घराजवळच असलेले एक घर भाड्याने घेऊन त्यात माझी राहण्याची व्यवस्था केली होती. मी अध्यक्षांच्या घरी दोन्ही वेळ जेवीत असे. त्यांची पत्नी स्वतः स्वयंपाक करून बहिणीप्रमाणे माझ्याजवळ बसून मला वाढीत असे. मी सगळा दिवस वाचन, चिंतन आणि नवीन लेखन यात घालवीत असे. सायंकाळी समुद्रतीरावर फिरायला जाई.

## दुष्काळातील अनाथ बालक

एके दिवशी सायंकाळी माझ्या ब्राह्ममित्रांबरोबर फिरायला म्हणून बाहेर पडलो होतो. रस्त्याने जाता जाता पाहिले तो एक वयस्कर माणूस एका अल्पवयी मुलाला जोरजोराने मारीत आहे आणि तो मुलगा त्या माराने कळवळून मोठमोठ्याने किंचाळत आहे असे दिसले. त्याचा तो आक्रोश ऐकून मी जागच्या जागीच उभा राहिलो. या मुलाचा हा बाप असून त्याने काही आगळीक केल्यामुळे अशा तऱ्हेने त्याला मारीत असावा असे वाटले. उभ्याउभ्याच, बरोबर असलेल्या ब्राह्ममित्राला मी विचारले, ' हा काय या मुलाचा बाप आहे ? इतके का हा याला मारीत आहे ? ' त्याने सांगितले, ' हा याचा बाप नव्हे कोणी आप्तही नव्हे. हा मुलगा आईबापावेगळा निराश्रित आहे. याला डोके टेकायलही जागा नाही. रात्री या गृहस्थाच्या दारात हा झोपतो. पोटाला अन्न मिळत नाहीं. दारोदार भिक्षा मागून खातो. हा वयस्कर माणूस या अल्पवयी मुलाला घरोघर फिरून कोळसे जमवून आणायला सांगतो व चार दोन दिवसांनी एखादा पैसा दिला तर देतो. असा या दोघांचा करारच झालेला आहे. माराच्या भीतीने मुलगा कोळसे आणून देतो. आज त्याने तसे कोळसे आणले नसल्यामुळे तो त्या मुलाला मारीत आहे. ' तपासाअंती मला समजले की, कित्येक वर्षांपूर्वी मद्रासेत जो दुष्काळ पडला होता त्यात पुष्कळ लहान मुले मातृपितृहीन झाली होती. त्यांपैकी अनेकांना जमवून मिशनऱ्यांनी आपल्या अनाथाश्रमात आश्रय दिला होता; पण पुष्कळशी मुले निराश्रितच राहिली. मीही पुष्कळदा सकाळी फिरायला जात असता प्रतिष्ठित गृहस्थांच्या घरासमोर अशी झोपलेली मुले मला दिसत. ते पाहून व ही सगळी हकीगत ऐकून माझे मन अतिशय उद्विग्न झाले. आणि तशा मनःस्थितीतच मी घरी आलो.

दुसऱ्या दिवशी सकाळी ब्राह्म मित्रमंडळी मला भेटायला आली असता त्यांना मी म्हटले, ' झाली तर अशा अनाथ मुलामुलांची सांभाळण्याची आणि शिक्षणाची काही व्यवस्था करा, नाहीतर समाजमंदिरात मोठमोठी व्याख्याने देण्याचा काय उपयोग ? ' माझे हे दुःख दूर करावे म्हणून एका ब्राह्म मित्राने त्याच दिवशी सकाळी रस्त्यावर जाऊन तशा तऱ्हेच्या एका निराश्रित मुलाला बोलावून माझ्याकडे आणले. प्रथम तो घरात येण्याचे मान्यच करीना. कारण अशा प्रकारच्या जातिभ्रष्ट मुलांना घरात येण्याचा अधिकारच नाही या दृढमूल संस्कारामुळे तो घरात येण्याला तयार होईना. पुष्कळसे समजाविल्यावर तो अंगणात येऊन उभा राहिला. मी त्याला वर येण्याबद्दल पुष्कळदा सांगितले, तरी तो येईना, तेव्हा मीच खाली उतरून रस्त्यावर आलो आणि त्याला खाण्यासाठी उप्मा आणले. मी ' हात पुढे कर ' म्हणताच त्याने हात पसरला. पण जेव्हा उपमा त्याच्या हातावर ठेवू लागलो तेव्हा हाताला हात लागेल या भीतीने त्याने आपला हात मागे घेतला. शेवटी त्याचा हात धरून त्याच्या हातावर उप्मा दिला आणि तसाच त्याला माडीवर घेऊन गेलो. नंतर एक लहानशी खोली दाखवून म्हटले, ' या खोलीत तू रात्री राहायचे. जेथे मी जेवतो तेथे जेवायचे. ' नंतर नोकराकडे त्याची सर्व व्यवस्था सोपवून मी मित्राच्या घरी गेलो. तेथे त्याच्या पत्नीला सगळी हकीगत सांगून त्याला जेवायला वाढण्याची विनंती केली. तिनेही माझी विनंती मान्य केली. आणि काही दिवसांसाठी का होईना तो मुलगा माझ्याकडे राहिला.

वेळच्यावेळी त्याला जेवणखाण मिळत आहे या भरंवशावर मी निश्चिंत होतो. पण एके दिवशी सकाळीच बाहेर गेल्यावर काही विशेष कामामुळे मला घरी येण्याला विलंब लागला. माझी जेवणाची ठरलेली वेळ होऊन गेली होती. मी जेवायला जाऊन पाहतो तो बाहेरच्या दरवाज्यासमोर रस्त्यावर एका पानात कुत्र्याला भात घालतात त्याप्रमाणे त्या मुलाला वाढले असून तो तेथे बसून जेवीत आहे ! हे पाहून मी आत गेलो व जेवायला बसल्यावर मित्राच्या पत्नीला विचारले. ' माझ्या मुलाला, रस्त्यावर कुत्र्याला घालतात त्याप्रमाणे जेवायला का वाढले ? ' तिने हसून उत्तर दिले, ' अहो, तो जातीतून बाहेर गेला असून अशा प्रकारची मुले प्रतिष्ठित गृहस्थांच्या घरात येऊ शकत नाहीत. ती सगळी मुले अशीच रस्त्यावर खातात. '

त्यानंतर तिच्याशी माझे जे संभाषण झाले ते असे—

मी म्हटले, ' मी जातीतच आहे की नाही याबद्दल तुला काय वाटते ? मी सर्व जातींच्या लोकांकडे जेवतो, खातो हे तुला माहीत आहे. कितीदा, तरी तुला मी म्हटले आहे की ××× फिरंग्याकडे मला बोलाविले आहे. तू माझा भात करू नको. ज्या मनुष्याने ब्राह्मण असताही जानवे काढून टाकले आहे आणि

जो कोणाच्याही घरी खातो जेवतो त्याला काय जात आहे ? असे असता मला आपल्या घरात जेवायला का वाढतेस ? '

मित्राची पत्नी हसून म्हणाली, ' आपली गोष्ट वेगळी. आपले करणे आपणाला शोभते. आपण तर ब्राह्मणच आहात. '

मी म्हटले, ' माझ्यावरील श्रद्धेमुळे, आपलेपणामुळे तुला तसे वाटते इतकेच.'

माझ्या मित्रपत्नीची माझ्यावरील श्रद्धा व लोभ किती होता याचा थोड्याच दिवसांत मला अनुभव आला. कांही दिवसांनी तिने आपल्या मोठ्या मुलीला माझ्याकडे आणून म्हटले, ' हिची मुले वाचत नाहीत. दोनदा बाळंत झाली आणि दोनदाही मुले वारली. तेव्हा मुले वाचतील असे काहीतरी हिला औषध दिले पाहिजे. ' मी हसून म्हटले, ' मी काय डॉक्टर–वैद्य आहे म्हणून औषध देऊ ? ' तिने उत्तर दिले, ' आपण तिच्या मस्तकावर हात ठेवून आशीर्वाद द्या आणि पायधूळ तिच्या मस्तकाला लावा. तसे तुम्ही करताच तिची मुले वांचतील. ' जी जातिभ्रष्ट मुलाला रस्त्यात कुत्र्याप्रमाणे भात वाढते तीच अशा निष्ठेने माझा आशीर्वाद आपल्या मुलीला देण्याला मला सांगते, याचे मला आश्चर्य वाटले.

या ठिकाणी एवढेच मला सांगावयाचे आहे की, तो मुलगा इतक्या आपुलकीने मी सांभाळीत असताही समाजाच्या एका उत्सवाच्या दिवशी माझ्या घरातून पळून गेला. पुष्कळ शोधूनही सापडला नाही. नंतर ऐकले, की पुनः पूर्वीप्रमाणे तो रस्तोरस्ती फिरत आहे ! ऐकून वाटले, या जातीच्या मुलांमुलींची मुख्य अडचण ही की, निरुपद्रवाने राहाणे, शिस्तीत वागणे त्यांना अशक्य होऊन जाते. तरीपण या निराश्रित मुलांमुलींबद्दलची माझी खटपट व्यर्थ गेली नाही. मद्रासच्या ब्राह्ममित्रमंडळीनी यानंतर काही दिवसांनी आपल्या मंदिराजवळील एका घरात श्री राजा राममोहन राय रॅग्ड स्कूल नावाची, या अनाथ मुलांसाठी एक शाळा स्थापन केली. पुढे एका मिड्ल स्कूलमध्ये त्याचे पर्यवसान झाले.

### मद्रासच्या देवदासी

आणखी एक घटना त्याच वेळी वा त्यानंतरच्या माझ्या मुक्कामात मद्रासेत घडली. त्याचाही याबरोबरच उल्लेख करतो. मी मद्रासेत असताना अनेक प्रतिष्ठित लोकांच्या तोंडून ऐकले की, तंजावरहून येणाऱ्या गायकगायिका व त्यांचा वाद्यवृंद फार मनोरम असतो. ब्राह्ममित्रमंडळींना मी म्हटले, तंजावरची गायक मंडळी कुठे गाण्यासाठी आल्याचे ऐकल्यास मला सांगा. मी जाऊन गायन ऐकेन. माझे हे सांगणे ऐकून त्या मंडळीत बरीच चर्चा झाली असावी. सर्वांनाच माझी ही उत्सुकता कळली असावी. कारण एके दिवशी एक मद्रासी प्रतिष्ठित गृहस्थ ( जो समाजाचा सभासद नव्हता. ) माझ्याकडे आला आणि ' आपल्या घरी

तंजावरच्या गायकमंडळींचे गाणे आहे; ते ऐकायला तुम्ही या, ' असे निमंत्रण देऊन गेला.

मी त्यापूर्वी अनेक ठिकाणी पाहिले होते की, डान्सिग गर्लस् नावाच्या जातीच्या काही पतिता स्त्रिया आहेत. देवमंदिरातील कामकाज करणे हा त्यांचा मुख्य धंदा. देवदासी म्हणूनच त्यांना अनेक ठिकाणी ओळखतात. सर्वसाधारण वेश्यांपेक्षा याची राहणी थोड्या वरच्या दर्जाची. त्या बिनहरकत प्रतिष्ठित लोकांच्या घरी जा-ये करतात. विवाहादि मंगलकार्यात नृत्य-गायनही करतात. प्रतिष्ठित लोक त्यांना आपल्यात मिळून मिसळून घेण्यात संकोच मानीत नाहीत. कोणत्याही कौटुंबिक उत्सवात यांची उपस्थिती नाही असे होतच नाही. मद्रास प्रांतात त्यांची सर्वत्र मिळून मिसळून वागण्याची पद्धत व जाणे-येणे पाहून मला शरम वाटली आणि दुःखही झाले. तरी पण त्या प्रतिष्ठित गृहस्थाने जेव्हा मला गाणे ऐकायला येण्याचे निमंत्रण दिले त्यावेळी मला भीती वाटली की, अशा तऱ्हेने मला आता या स्त्रियात मिसळण्याची वेळ येणार ! म्हणून मी जवळच उपस्थित असलेल्या ब्राह्मसमाजिष्ठ मित्राला हळूच कानात विचारले की, ' अशावेळी काय करायचे, कसे वेगळे वागायचे ते सांगा. ' त्याने जाऊन त्या गृहस्थाला काय सांगितले ते मला कळले नाही, पण तो येऊन मला म्हणाला, ' तुम्हाला डान्सिगगर्लस्मध्ये बसविण्यात येणार नाही. ' तेव्हा मग मी त्याच्या निमंत्रणाचा स्वीकार केला आणि सायंकाळी गाणे ऐकायला गेलो.

घरात जाऊन पाहिले तो एका बाजूच्या खोलीत स्त्रियांची बसण्याची व्यवस्था केलेली होती. तेथे अनेक प्रतिष्ठित स्त्रिया बसून गाणे ऐकत आहेत, असे मला दिसले. मी निर्भयतेने श्रोते मंडळीत जाऊन बसलो आणि गाणे-बजावणे ऐकू लागलो. काही वेळानंतर तीनचार, चांगला पोषाख केलेल्या, निरनिराळ्या अलंकारांनी नटलेल्या अशा तरुण मुली त्या ठिकाणी आल्या. घरच्या मालकाने स्वतः उठून मोठ्या आदराने त्यांचे स्वागत केले आणि त्यांना माझ्या जवळ बसविले. मला वाटले, या एखाद्या बड्या घराण्यातील तरुणी असाव्यात. म्हणून त्यांना सर्वसाधारण स्त्रियांत न बसविता बैठकीमध्ये बसण्याला जागा दिली. घरवाल्या प्रतिष्ठित गृहस्थांनी मला वचन दिले होते की, ' डान्सिग गर्लस्मध्ये तुम्हाला बसविले जाणार नाही.' म्हणून माझ्या मनात ती कल्पनाही आली नाही. पण मी निरखून पाहिले तो, जे माझे दोन ब्राह्ममित्र माझ्याबरोबर गेले होते ते एकमेकास डोळ्यांनी खाणाखुणा करून हसत आहेत असे दिसले. लगलीच मी त्यांना हळूच विचारले, ' हू आर दे ? ' त्यांनी सांगितले, ' दे आर डान्सिग गर्ल्स ' हे ऐकताच मी ताबडतोब त्या बैठकीतून उठलो आणि आणि ती जागा सोडून जाण्याच्या तयारीला लागलो. तेव्हा घरमालक माझ्या समोर येऊन माझ्या पायावर डोके ठेवून विनंती करू लागला, ' आपण बैठकीतून उठून जाऊ नये. '

लोकातही माझ्या या वागणुकीने थोडी गडबड उडाली व कुजबुज सुरू झाली. डान्सिंग गर्ल्स् आल्यामुळे मी उठून जात आहे हे ऐकून जमलेली मंडळी आ वासून एकमेकांकडे पाहात राहिली. स्त्रियांसंबंधी तर बोलायलाच नको. त्यांनी अशा तऱ्हेचा प्रकार आतापर्यंत कुठेच पाहिला नव्हता. अर्थातच त्या चकित होऊन सभोवार पाहू लागल्या. मी घरमालकाची विनयपूर्वक कशीबशी समजूत घालून त्याच्या हातून माझी सुटका करून घेतली आणि बाहेर रस्त्यावर आलो.

त्या रात्रीच ही गोष्ट सर्व शहरभर झाली. 'अरे दोस्त, डान्सिंग गर्ल्स् आल्या होत्या म्हणून पंडित शिवनाथशास्त्री त्या बैठकीतून उठून गेले!' दुसऱ्या दिवशी मी फिरायला म्हणून बाहेर पडलो तेव्हा लोक एकमेकांच्या अंगाला स्पर्श करून व माझ्याकडे बोट दाखवून ती गोष्ट व्यक्त करीत असलेले मला दिसले. कोणी कोणी प्रतिष्ठित गृहस्थ मला समक्ष गाठून संतोष व्यक्त करू लागले. 'आपण एका सामाजिक व्याधीबद्दल स्पष्ट तिरस्कार व्यक्त केलात हे उत्तमच झाले. समाजाची अवस्था काय आहे हे प्रतिष्ठितांना समजलेच पाहिजे.' असे बोलून दाखवू लागले.

मद्रासेतून मी मुंबईला आलो आणि काही दिवसांनंतर कलकत्त्याला परतलो.

### यदुमणी घोष यांचा मतिविकार (बुद्धिभ्रम)

मद्रास–मुंबईवरून मी कलकत्त्याला आल्यावर काही दिवसांनी एक उल्लेखनीय घटना घडली. एके दिवशी सकाळी मी १३ नं. कॉलेज स्ट्रीटवरील खोलीत बसून 'ब्राह्म पब्लिकओपिनियन' किंवा तत्त्वकौमुदीसाठी लिखाण लिहीत असता, यदुमणी घोष नावाचे एक ब्राह्ममित्र येऊन दाखल झाले. ते ओरिसात जन्मलेले होते. आणि यांना आम्ही केशवबाबूंच्या पट्टशिष्यांपैकी प्रचारक प्रवेशार्थी शिष्य म्हणून ओळखीत होतो.

मी उठून त्यांचे स्वागत करतो न करतो तोच त्यांनी मला विचारले, 'मोशाय, बिनतिकिटाची (स्टँप नसलेली) हँडनोट दाव्यात गुजरता येते की नाही?'

मी म्हटले, 'आधी बसा तरी. नंतर त्या बाबतीत बोलू.' यदुमणी म्हणाले, 'नंतर बसतो. दावा चालतो की नाही आधी सांगा.' मी उत्तर दिले, 'माझ्या माहितीप्रमाणे सांगायचे तर तशी हँडनोट चालत नाही.' यदुमणी म्हणाले, 'ओ तर मग माझे हजारो रुपये पाण्यात गेले!' मी विचारले, 'आहे काय प्रकार? कुणाच्या नावाने दावा गुजरणार?' यदुमणीने उत्तर दिले, 'केशवचंद्र सेन यांच्या नावाने.' मी चकित होऊन प्रश्न केला, 'म्हणजे? केशवबाबूंच्या विरुद्ध दावा?'

माझ्या या प्रश्नाला उत्तर देताना यदुमणी म्हणाले, ‘ कमलकुटीर विकत घेताना केशवबाबूंनी माझ्याकडून कित्येक हजार रुपये कर्ज घेऊन हँडनोट लिहून दिली. त्यावर तिकिट लावलेले नाही. नंतर असे सांगितले, ‘ कमलकुटीरच्या उत्तरेला असलेल्या मंगलवाडी भागात तुमच्यासाठी एक घर बांधून देईन. त्या जमिनीची किंमत व घरबांधणीचा खर्च वजा जाता जे रुपये राहातील ते रोखच देईन.’ मी हे म्हणणे मान्य केले. पण त्यानंतर यदुमणीला मतिविकार होऊन त्यांचे मत बदलले असावे. संशय उत्पन्न झाला असावा. असे वाटून मी म्हटले, बिनतिकिटाची हँडनोट लिहून दिली हे चांगले केले नाही. जर हँडनोट दिली तर त्यावर योग्य ते तिकीट लावून व सही करूनच दिली पाहिजे होती. पण आपणाला या बाबतीत केशवबाबूंचा संशय का आला? आणि हँडनोटेचे तरी कारण काय होते? त्यांची वडलार्जित इस्टेट काय थोडी आहे? मनात येताच ते काय आपली रक्कम देऊ शकणार नाहीत? आणि आपण त्यांना न विचारतापुसता ही धावपळ का चालविली आहे?’

पण काही केल्या त्यांची समजूत करणे फार कठीण आहे असे मला वाटले. त्यांच्या दोन्ही डोळ्यांकडे पाहिले तो त्यांच्यात उन्मादग्रस्ताचे लक्षण दिसले. कारण त्यानंतर त्यांनी जी भयंकर हकीगत सांगितली, त्यामुळे तर त्यांचा मतिभ्रंश झाल्याची माझी खात्रीच पटली. ते सांगू लागले, काल सायंकाळी मोलकरीण माझ्यासाठी दूध तापवीत होती. तितक्यात केशवबाबूंच्या पत्नीने मोलकरणीला सांगितले, “ बाई, तू दुसऱ्या कामाला जा. मी दूध तापविते.” असे म्हणून स्वतः दूध तापवू लागली. माझे दूध तापवून देण्याची केशवबाबूंच्या पत्नीला इतकी काय गरज?’

मी उत्तर दिले, ‘ वा: ही तर फार चांगली गोष्ट आहे. यासाठी तुम्ही तिच्या बाबतीत कृतज्ञ असले पाहिजे. आपण त्यांच्या घरी राहाता त्यामुळे त्यांची गृहिणी तुम्हांला आपल्या मुलाप्रमाणे मानते. मोलकरणीला दुसरे काम होते म्हणून तिला दूर करून ती स्वतः दूध तापवू लागली. हे तर अपत्यवात्सल्य. यात दोष कसला! या तिच्या ममतेच्या वागणुकीबद्दल तिला तुम्ही धन्यवाद दिले पाहिजेत.’ यदुमणी यावर म्हणाले, ‘ नाही. आपण समजला नाही. मला विष पाजण्याचा हा तिचा प्रयत्न होता. तसे केले म्हणजे पैसे देण्याचे आपोआप टळले!’

मी दोन्ही कानांवर हात ठेवून म्हटले, ‘ छे. छे. हे तुमचे बोलणे ऐकणे हेही पाप ठरेल. आपण त्या सरलहृदयी सती साध्वीला अजून चांगले ओळखले नाही!’

यदुमणी म्हणाले, ' ठीक आहे. मी भुवनमोहन दास ॲटर्नींकडे चाललो. कायद्यानुसार काय करता येईल हे मला पाहिले पाहिजे. '

मी चटकन उठून त्यांचा हात धरून म्हटले, ' बसा. बसा. जे काही करता येईल ते आम्ही करू. गोंधळून जाऊ नका. स्नान करा, जेवण होऊ द्या आणि शांतपणाने बसा. '

पण त्यांनी माझ्या विनंतीकडे अगर आग्रहाकडे लक्ष न देता माझ्या हातून आपला हात सोडवून घेऊन भवानीपूरचा रस्ता धरला.

माझे लिहिण्याचे काम तेवढ्यावरच राहिले. मी लगेच भुवनमोहन दासना एका मनुष्यामार्फत पत्र पाठविले की, ' या वेडसर माणसाच्या सांगण्याकडे तुम्ही लक्षच देऊ नका. ' नंतर मी कमल कुटीरकडे केशवबाबूंना भेटण्यासाठी गेलो आणि त्यांना सर्व हकीगत सांगितली.

केशवबाबू म्हणाले, ' काय हे आश्चर्य ! त्याला मनातल्या मनात माझा असा संशय वाटत आहे याचा त्याने मला सुगावाही लागू दिला नाही ! काय बोलायचे आता ? '

मी म्हटले, ' तेच तर मलाही नवल वाटते. आपण हँडनोट जर दिली तर त्याला तिकीट लावणे योग्य होते. त्यांच्या संशयाचे कारण हेच आहे ! '

केशवबाबू म्हणाले, ' अरे, सांगायचे काय ? मला तो हँडनोटही लिहू देईना आणि घेईनाही. शेवटी मी त्याच्याकडून किती रुपये घेतले त्याचा लेखी पुरावा त्याच्याकडे असावा म्हणून ती चिठी लिहिली आणि जबरदस्तीने त्याला घ्यायला लावली.'

ते आणखी पुढे म्हणाले, ' तसे असेल तर याच आठवड्यात त्याचे रुपये देऊन टाकतो. ' आणि नंतर त्यांनी तसे केलेही. यदुमणीसाठी जे घर त्यांनी बांधले होते ते मग दुसऱ्याला दिले.

यदुमणी ते रुपये घेऊन देशभ्रमणासाठी बाहेर पडला. शेवटी युरोपात जाऊन तो मरण पावला. या ठिकाणी हेही सांगणे अवश्य आहे की, भुवनमोहन दासनीही ॲटर्नींचे पत्र न देता त्याचे रुपये तावडतोब देऊन टाका असे केशवबाबूंना मित्रत्वाच्या नात्याने गुप्तपणे पत्र लिहिले होते.

पण हाय ! मला सांगायला लाज वाटते ! या पक्षीय भांडणाचा शेकडो वेळा धिक्कार करण्याची मला इच्छा होते. यामुळे मानवी स्वभाव किती विकृत होतो, याचेच मला दुःख वाटत आहे. इतके होऊनही केशवबाबूंच्या अनुयायांनी व प्रचारकांनी वर्तमानपत्रात, आपल्या विकृत मनाचा असा परिचय दिला की, ' विरोधी पक्षाने काय ( केशवबाबूंच्या बाबतीत ) कमी केले ? आचार्यांच्या

नावाने दावा ठोकण्यापर्यंत त्यांची मजल गेली ! ' आणि श्लेषात्मक लिखाणावरून त्यांनी असे सुचविले की, ' या सगळ्याचा पुढारी मी, कारवाई माझी. ' ही श्लेषोक्ती वाचून माझ्या डोळ्यांतून अश्रू वाहू लागले. आणि पक्षोपपक्षामुळे कार्यकर्ते कसे दूषित होतात हे कळून आले. या अनिष्ट परिणामाची आठवण मला केव्हाच विसरता आली नाही.

* * *

.१६.

# कृतिशील जीवन

यानंतर पाचसहा वर्षांत माझ्या हातून जे जे विशेष कार्य झाले, त्याचा उल्लेख करतो.

**प्रमदाचरण सेन यांचे नीतिविद्यालय**

प्रथम याच कालात मुलांमुलींसाठी, रविवारी चालणारी दोन नीतिविद्यालये स्थापन झाली. पहिल्याचे मुख्य प्रवर्तक होते ' सखा 'चे संपादक प्रमदाचरण सेन. हा प्रथम हेयरस्कूलमध्ये माझ्याजवळ शिकत होता आणि त्यावेळी विद्यार्थ्यांना घेऊन ज्या सगळ्या सभासमिती मी करीत असे त्यांनाही हा उपस्थित असे. त्यावेळेपासून त्याचे माझ्यावर पितृतुल्य प्रेम होतेच. शिवाय माझ्या प्रत्येक कार्यात माझ्या सहाय्याला असे. धर्मपुत्र हा शब्द जर कोणा एखाद्याच्या बाबतीत वापरणे योग्य असेल तर प्रमदा हा माझा धर्मपुत्रच होता असे म्हणता येईल. यानंतर त्याने ब्राह्मसमाजाची दीक्षा घेतली आणि माझ्या घरी मुलाप्रमाणेच राहात असे. सिटीस्कूल स्थापन झाल्यावर त्याची त्यात एक शिक्षक म्हणून नेमणूक करण्यात आली. त्यानेच स्वतःच्या खटपटीने कित्येक तरुणांना हाताशी धरून सिटीस्कूलच्या इमारतीत मुलांसाठी एक नीतिविद्यालय स्थापन केले.

तसा प्रत्यक्षतः या नीतिविद्यालयाचा माझ्याशी काही संबंध नव्हता. पण मी त्याचा प्रेरक, मार्गदर्शक व सल्लागार होतो. मधून मधून त्यात हजर राहात असे आणि उपदेशही देत असे.

ज्या नीतिविद्यालयाशी माझा प्रत्यक्ष संबंध होता ते १८८४ सालापासून माझ्या उपासना मंदिरात भरू लागले. या विद्यालयाची सर्व खटपट करणाऱ्या व शिक्षिका म्हणून आमच्या काही मुलीच होत्या. त्यात गुरुचरण महलानवीश महाशयांची मुलगी सरला, भगवानचंद्र बसू महाशयांची मुलगी लावण्यप्रभा,

चंडीचरण सेन यांची मुलगी कामिनी, आणि माझी मुलगी हेमलता, या मुख्य. हेम ही या सर्वांत वयाने लहान होती. या विद्यालयाचा मी स्थापना करणारा व पुरस्कार करणारा होतो. या सर्व मुलींबरोबर बसून मी धर्मग्रंथ वगैरे वाचीत असे. नीतिविद्यालयाच्या कामकाजाविषयी सल्ला देत असे आणि प्रत्येक गोष्टीत मी या सर्वांच्या बरोबर असे.

## शिशुमासिक पत्रिका ' मुकुल ' चा जन्म

कित्येक वर्षांनी ( १८९५ साली ) मुलामुलींसाठी एक मासिकपत्रिका काढण्याचा त्या चार मुलींनी संकल्प केला. आणि लागलीच माझ्या संपादकत्वाखाली ' मुकुल ' नावाचे एक मासिक प्रकाशित केले. पण थोडेच दिवस मी त्याचा संपादक म्हणून होतो. ईश्वराच्या कृपेने हे नीति-विद्यालय अजूनही आहे आणि प्रत्येक रविवारी सकाळी ब्राह्मबालिका विद्यालयात त्याची अधिवेशने होतात.

## ' इंडियन मेसेंजर ' चे संपादकत्व

१८८३ साली मला आणखी एका कामात हस्तक्षेप करावा लागला. आमच्या समाजाचे इंग्रजी वर्तमानपत्र ' ब्राह्म पब्लिक ओपिनियन ' चा कसा जन्म झाला ते पूर्वी सांगितलेच आहे. यावेळी त्याच्यात दोन बदल झाले. पहिला, यातील राजकारण विभागाचे संपादक, भुवनमोहन दास महाशय यांनी ते संपादकत्व सोडले. दुसरा, ज्या दोन मित्रांनी याचा व्ययभार स्वीकारून मालकी हक्काने हे वर्तमानपत्र चालविले होते त्यांनी ती जबाबदारी सोडली. त्यामुळे समाजालाच ते अधिकार आपल्याकडे घ्यावे लागले. आणि मी अशी एक सूचना सर्वांसमोर ठेविली की, वर्तमानपत्राचे नाव बदलावे, त्यात धार्मिक बाबींना मुख्य स्थान असावे. आणि राजकारणाला दुय्यम स्थान द्यावे; अर्थात अशा तऱ्हेचे नवीन वर्तमानपत्र व्हावे. त्याप्रमाणे ' इंडियन मेसेंजर ' नावाचे वर्तमानपत्र सुरू झाले आणि त्याचे मी संपादकत्व स्वीकारले.

## ब्राह्ममिशन प्रेसची स्थापना

' इंडियन मेसेंजर ' प्रथम दुसऱ्याच्या छापखान्यात छापले जाई. त्यामुळे जास्त खर्च करावा लागे आणि प्रेसशी नेहेमी भांडणतंटेही होत. त्यामुळे समाजाचा स्वतंत्र प्रेस असावा अशी आवश्यकता उत्पन्न झाली. पण समाजाच्या सदस्यांनी पूर्वी एक छापखाना काढला होता व त्यात त्यांना तोटा सोसावा लागला; त्यामुळे नवीन प्रेस घेण्याला ते तयार होतना. स्वर्गवासी मित्र द्वारकानाथ गांगुली महाशय हे कार्यकारी समितीत या ठरावावर मला वारंवार विरोध करू लागले. पण गेल्या काही वर्षांत माझी मनःस्थिती अशी झाली होती की, समाजासाठी म्हणून जे काही मला अत्यावश्यक असे वाटे ते केलेच पाहिजे ही भावना दृढ होऊन बसे.

त्यामुळे मित्रमंडळीनी जरी विरोध केला तरी माझ्याकडून जर होण्यासारखे असेल तर मीच ते काम करीत असे आणि नंतर त्यांची समजूत घालून त्यांनी त्या कामात भाग घ्यावा म्हणून प्रयत्न करीत असे. त्याप्रमाणे या वेळीही स्वतः कर्ज काढून ब्राह्ममिशन प्रेसची स्थापना केली. हे कर्ज शेवटी प्रेसच्या मिळकतीतून फेडण्यात आले.

या प्रेसच्या स्थापनेच्या बाबतीत मला पुष्कळच श्रम घ्यावे लागले होते. टाईपवाल्याशी टाईपांची व्यवस्था करणे, बाजारात जाऊन प्रेसचे सर्व सामानसुमान आणणे, कंपॉझिटर व मशीनमन नेमणे, कामकाज चालविण्यासाठी योग्य माणसांची नेमणूक करणे, रोज त्यांच्या कामाची पाहणी करणे, जमाखर्च पाहाणे इत्यादी सर्वच कामे मला करावी लागत. दुसरीकडे, हे मुद्रणयंत्र समाजाच्या मालकीचे करण्या-साठी ज्यांचे प्रमुख गांगुली आहेत, अशा समाजाच्या कमिटीतील मित्रमंडळीशी तर्कवितर्क करावा लागे. मित्रमंडळींपैकी काहीजण म्हणत, " स्वतः कर्ज काढून प्रेस काढलात, तर तो स्वतःच्या मालकीचा करा ना ? इतका झगडा कशाला ? " परंतु माझी मनोभावना तशी नव्हती. ज्यातून ब्राह्मधर्म प्रचारोपयोगी पुस्तक-पुस्तिका प्रकाशित करता येतील असे एक मुद्रणयंत्र ब्राह्मसमाजाजवळ असावे असे मला वाटत होते. म्हणूनच याचे नाव ' ब्राह्ममिशन प्रेस ' असे मी ठेवले, आणि हा समाजाकडे सोपवावा म्हणून मी प्रयत्न करीत होतो.

कमिटीतील सभासदांना माझ्या मताशी मिळवून घेईपर्यंत कित्येक वर्षे सर्व प्रेस माझ्याच हाती ठेवावा लागला आणि त्याची काळजीही वाहावी लागली. शेवटी १८८७ साली समाजाने हा प्रेस आपल्याकडे घेतला.

## वर्धमान जिल्ह्यातील एका गावी आलेले संकट

१८८३ सालातील एक स्मरणीय घटना. वर्धमान जिल्ह्यातील बडबेलून नावाच्या गावी प्रचारासाठी म्हणून मी गेलो असता तेथील पुण्यदाप्रसाद सरकार नावाच्या एका प्रेमी ब्राह्मसमाजनिष्ठाकडे उतरलो. कारण त्याने कित्येक ब्राह्ममित्रांना ' आपल्या गावी येऊन २४ मे रोजी ब्रह्मोत्सव करण्याची ' विनंती केली होती. त्यात मलाही आमंत्रण होते. आम्ही कित्येक मित्र मिळून योग्यवेळी बडबेलून येथे येऊन दाखल झालो. तेथे पोचायला सायंकाळ झाली. आम्ही जाऊन पुण्यदाप्रसाद यांनी उभारलेल्या गवती घरात उतरलो.

दुसऱ्या दिवशी सकाळी उठताच कसलीशी एक वस्तू विकत आणण्यासाठी मी एका तरुणाला बाजारात पाठविले. त्याने तिकडून येऊन सांगितले की, ' दुकानदार म्हणतो, तुम्हाला दुकानातून काहीही मिळणार नाही. ' मला या त्याच्या सांगण्याचे नवल वाटले. कारण ब्राह्मधर्म प्रचारासाठी मी अनेक खेड्यांत व अनेक शहरी गेलो होतो; पण तेथे कोणाही दुकानदाराची व

मनुष्याची अशी वृत्ती मला आढळली नव्हती. तितक्यात पुण्यदाप्रसाद येऊन म्हणाला, 'गावच्या जमीनदाराने, कलकत्त्याहून आलेल्या बाबू लोकांना तू कोणताही जिन्नस देता कामा नये असे बजावले आहे.' पुण्यदाप्रसाद स्वत. गरीबच होता पण आवश्यक असलेल्या वस्तू तो स्वतः आम्हाला पुरवीत होताः परंतु त्यांच्या धरचीही मंडळी प्रतिकूल. शिवाय दुकानातून तर काही मिळणार नाही.

हे सगळे ऐकून मला हसूच आले. मी म्हटले, 'आता सकाळची उपासना तर आटपून घेऊ या. त्यानंतर परमेश्वर काय करील ते खरे! काय काय होते ते पाहू तरी!!' नंतर स्नाने वगैरे आटोपून आम्ही सर्व उपासनेला बसलो. उपासना आटोपून उठलो तो, बाजूच्या खोलीत आमच्यासाठी उपाहाराचे पदार्थ, सैंपाकासाठी लागणारे तांदूळ, डाळ, भाजी वगैरे जिन्नस आणि भोजनासाठी कमळाची मोठी मोठी पाने कोणी तरी गुपचुप ठेवून गेला आहे. असे आढळले. तो सर्व प्रकार पाहून आम्ही चकित झालो. आधी आम्ही सर्वांनी उत्तमपैकी फराळ केला. नंतर आमच्यापैकीच एकाने त्या बाजूच्याच खोलीत सैंपाकासाठी चूल तयार केली आणि तो सैंपाकाच्या तयारीला लागला. दुपारी आम्ही सुग्रास अन्नाचे उत्तमपैकी भोजन केले.

सायंकाळी उपासनेसंबंधी धार्मिक चर्चेत आम्ही गढून गेलो आहो इतक्यात कोणीतरी येऊन त्या बाजूच्या खोलीत सायंकाळच्या भोजनाची सर्व व्यवस्था केल्याचे आढळले; पण अशाप्रकारे आवश्यक वस्तू कोण पुरवीत आहे असे मी पुण्यदाला विचारले; पण या बाबतीत तो काहीच सांगू शकला नाही.

## स्त्री-हृदयाचे वात्सल्य

दुसऱ्या दिवशी पहिल्या दिवशीचीच पुनरावृत्ती झाली. आम्ही अशा रीतीने ब्रह्मोत्सव यथासांग पार पाडला. उपासना, पाठपारायण, धर्मचर्चा सर्व काही झाले. मात्र या प्रसंगी गावातील कोणा एकानेसुद्धा डोकावूनही पाहिले नाही. तिसऱ्या दिवशी सकाळीच मी म्हटले, 'गावचा एक मनुष्यही आला नाही! चला आपण आज नगरकीर्तनाला निघू या.' आम्ही सात वाजता कीर्तनाला बाहेर पडलो. पाहिले तो मध्यरात्री ज्याप्रमाणे सगळा गाव निस्तब्ध असतो, तसाच निस्तब्ध दिसला. ज्या रस्त्याने जावे त्या रस्त्यालगतची सर्व घरे बंद. मनुष्यप्राण्याचे दर्शन नाही. मी म्हटले, 'चांगलेच कीर्तनगायन चालू द्या. लोकांनी आपल्या घराची दारे बंद करून घेतली आहेत. ती तशीच राहूद्यात. ईश्वराच्या कृपाळूपणाच्या कथा आपण त्यांच्या कानात ओतीत जाऊया. आणि खूपच उत्साहाने कीर्तन होऊ लागले. तितक्यात रस्त्याने जाता जाता एक अगदी बीभत्स दृश्य दिसले. एक मनुष्य उघडानागडा होऊन, नेसूचे धोतर मस्तकाला गुंडाळून आणि हातातील गुडगुडीची ( हुक्क्याची ) नळी बासरीप्रमाणे तोंडात धरून नाचत

नाचत आमच्या समोरून येत असलेला दिसला. मी मित्रांना म्हटले, 'त्याच्याकडे मुळीच पाहू नका. देवाचे नाव गात चला.' काही वेळाने पाहिले तो तो मनुष्य लाजून, धोतर नेसून व खाली मान घालून निघून जात असलेला आढळला.

त्यानंतर काही अंतर चालून गेल्यावर आणखी एक विघ्न तयार. पाहिले तो एक अगदी खालच्या वर्गाच्या लोकांची टोळी दारू पिऊन धुंदावलेल्या स्थितीत ढोल वगैरे वाद्ये वाजवीत वाजवीत आणि मोठ्याने ओरडत किंचाळत धडपड करीत आमच्यावर जवळ जवळ येऊन आदळलीच. मी आमच्या मंडळींना म्हटले, 'त्यांच्या जाण्याचा मार्ग सोडून चला. गाणे भजन चालू दे. त्यांच्याकडे ढुंकूनही पाहू नका.' इतके झाल्यावर मोकळ्या मिळालेल्या रस्त्याने ते निघून गेले. आम्ही कीर्तन करीत पुढे चाललो.

शेवटी आम्ही एका चौरस्त्यावर येऊन थांबलो. तेव्हा मी सांगितले, 'आता येथेच उभे राहून पुष्कळ कीर्तन करा. हे लोक किती वेळ दारे बंद करून राहतात ते पाहू तरी.' कीर्तन चांगलेच रंगत चालले. दुसरे कोणी न ऐकतना, पण त्या एकतानतेत रंगलेल्या कीर्तनाने आमचे कठोर हृदय आर्द्र होऊ लागले. शेवटी पाहिले तो खट असा आवाज होऊन एका घराचा दरवाजा उघडला आणि काही लोक आमच्याजवळ उभे राहिले आहेत असे आढळले. आणखी थोड्या वेळाने पाहतो तो आणखी एका घराचा दरवाजा उघडला. पुनः काही लोक येऊन आमच्याजवळ उभे राहिले. अशा प्रकारे पाहाता पाहाता बहुसंख्य लोकांनी आम्हाला घेरून टाकले, तेव्हा मग मी म्हणालो, 'मला उभे राहण्यापुरते काही तरी उंच आसन आणून द्या. म्हणजे मी चार शब्द सांगेन.' तितक्यात पुण्यदाने धावत धावत जाऊन कोणाच्याशा घरातून रॉकेलचा एक रिकामा डबा आणला आणि त्यावर उभा राहून मी व्याख्यान देऊ लागलो. '... तुम्ही दारे बंद करून आत का राहिला? देवाचे नाव ऐकणार नाही? ईश्वराशी काय तुमचे भांडण आहे? तो तर सर्वांचा प्रभू! सर्वांचा रक्षक. परित्राणपरायण...' वगैरे वगैरे. अशा काही जोरदार सुयुक्तिपूर्ण भाषेत माझे भाषण चालले होते की, अशी यापूर्वी मी फारच थोडी भाषणे केली असतील. पाहाता पाहाता त्या जमलेल्या मंडळीतील अनेकांच्या डोळ्यांतून अश्रुधारा वाहात असलेल्या दिसल्या. नंतर मोठ्या उत्साहाने तसेच कीर्तन करीत करीत आम्ही समाजाच्या मंदिरात आलो. गावातील पुष्कळ जण आमच्याच बरोबर समाजमंदिरात आले. इतके झाल्यावर आमच्यासंबंधीचा जमीनदारबाबूंचा दुराग्रह बदलला. त्यांनी आपण होऊन आम्हाला आपल्याकडे बोलवून जेवायला घातले. आम्ही ईश्वरी कृपेचे गुणगान करीत करीत कलकत्त्याला परतलो.

नंतर ऐकले की, जमीनदारबाबूंनी आम्हाला उपाशी ठेवण्यासाठी सर्वांना ताकीद दिलेली ऐकून गावातील काही सहृदय स्त्रियांनी कुणाला काही कळू न

देता आमच्या जेवणाखाणाची सर्व व्यवस्था आपण होऊन केली होती. मी स्त्रियांना विशेष मान देतो तो उगाच नव्हे !

## केशवचंद्र सेन यांचा स्वर्गवास

१८८४ सालच्या प्रारंभीच ब्रह्मानंद केशवचंद्र सेन महाशय स्वर्गवासी झाले. मृत्यूपूर्वी काही दिवस त्यांना बहुमूत्ररोगाने पछाडल्याचे कळून आले. आम्हाला भारतवर्षीय ब्राह्मसमाज आणि ब्राह्ममंदिर यातून घालवून दिल्यावर त्यांचे काम फारच वाढले. मोडकळीला आलेल्या समाजाला पुन्हा उभा करण्याकरिता त्यांना भयंकर परिश्रम करावे लागले. त्यातच आमच्या श्लेष-दुरुक्ती इत्यादींनी त्यांचे मानसिक दुःख अधिकच वाढविले. आम्ही त्यांचा पक्ष सोडून गेल्यावर थोड्याच दिवसांत ते ब्रेनफीव्हरने पुष्कळ दिवस बिछान्याला खिळून होते. त्यानंतर जरी ते असाधारण मानसिक सामर्थ्याने उत्साहाच्या आवेगाने उठून कृतिशील बनले तरी ते आजारी पडत असत. या सगळ्या मानसिक, शारीरिक व्यथेतच पुन्हा त्यांना 'नवविधान'चा अभ्युदय करून त्याचा प्रचार व सामर्थ्यवाढ करण्यात देह-मनासहित सर्व शक्ती उपयोगात आणावी लागली आणि या एकंदर कायिक, वाचिक व मानसिक अतिश्रमामुळे त्यांना हा बहुमूत्राचा आजार जडला असावा असे वाटते.

प्रथम त्यांच्या निकटवर्ती मित्रमंडळींना या रोगसंचाराचा अंदाजच आला नाही आणि जेव्हा हा रोग झाल्याची त्यांना जाणीव झाली तेव्हा सर्व संप्रदायांची ब्राह्ममंडळी घाबरली आणि बावरलीही. नवविधानी मित्रमंडळ मान्य करूदे वा न करू दे, पण आम्हीही त्यांच्या रोगमुक्तीकरिता ईश्वराची प्रार्थना करू लागलो. १८८३ सालच्या उन्हाळ्यात केशवचंद्र सेन हवापालट करण्यासाठी सिमला शैल-निवासी ( Hill Statin ) गेले. पण त्या शैलनिवासाने त्यांना व्हावा तसा आरोग्यलाभ झाला नाही. त्यामुळे त्याच सालच्या ऑक्टोबरात ते पुन्हा कलकत्त्याला आले. आम्हाला तर, ते रुग्णावस्थेतच परत आल्याचे कळले आणि मी ताबडतोब त्यांना पाहायला कमलकुटीरमध्ये गेलो. मला आलेला पाहाताच त्यांना संतोष वाटला. आपल्या आजाराची सर्व हकीगत त्यांनी मला सांगितली. पाया-वरचे पांघरूण बाजूला करून आपला पाय दाखवीत ते म्हणाले, "पाहा, माझ्या पायाच्या पोटऱ्या कधी इतक्या बारीक झाल्या नव्हत्या. हे वाईट लक्षण आहे." यावर मी म्हटले, 'ईश्वर करो आणि या प्रसंगातून आपला बचाव होवो !' यानंतर जितके दिवस ते आजारी होते तितके दिवस मधून मधून मी त्यांना भेटायला जात असे. त्यांच्या पत्नीचा अश्रुभाराक्रांत चेहेरा जेव्हा जेव्हा मला दिसे तेव्हा तेव्हा माझे अश्रू मला आवरेनातसे होत. 'किती सुखाने मी भारत आश्रमात दिवस काढले ! आणि नतर काळाने किती दुःखदायक दिवस दाखविले !' असे

वारंवार मनात येई. अप्रत्यक्षपणे आम्हीच यांच्या मृत्यूला एक कारण झालो असे मनात येऊन दुःखाने मी भाराक्रांत होत असे.

नंतर ऐकले की, वैद्य डॉक्टरलोक त्यांना मांसाचे सूप घालीत आहेत व त्यामुळे त्यांच्या मूत्रात ॲलब्युमेन होऊन यकृतात ग्रॉव्हेल दिसत आहे. हे ऐकल्याबरोबर लागलीच मी धावतच त्यांना पाहायला गेलो. जाऊन कमलकुटीरात पाय ठेवतो न ठेवतो तोच त्यांचा वेदनाविव्हल स्वर ऐकला. रोग्याचा अशा प्रकारचा आर्तस्वर मी क्वचितच ऐकला असेल. जवळ जाऊन पाहिले, तो ते वेदनांनी तळमळत होते. बिछान्यावर एका कुशीवर त्यांना निजून राहवत नव्हते. त्या वेदना, तो आर्त स्वर आणि ते विव्हळणे पाहून मला माझे अश्रू आवरेतना.

पुढे ८ जानेवारी रोजी सकाळी त्यांचा आत्मा नश्वर मृत्युलोक सोडून स्वर्गलोकी निघून गेला. त्या सकाळी मी त्यांच्या मृत्युशय्येजवळ उभा होतो. सायंकाळी त्यांचा मृतदेह घेऊन अनवाणी पायांनी सर्वांबरोबर आम्ही पुष्कळ जण स्मशान घाटावर गेलो आणि अश्रुजलाने सुस्नात होऊन या आयुष्यातील एका श्रेष्ठ गुरूला चिताग्नीत समर्पण करून आलो !

इतके दिवस झगडा-भांडण चालू होते पण ब्रह्मानंद ( केशवचंद्र सेन ) जेव्हा निघून गेले तेव्हा काही दिवसपर्यंत मन निस्तब्ध गंभीर भावनेत मग्न होऊन, कसले तरी चिंतन करण्यात गढून गेले. केशवचंद्रांबरोबरच लौकिकदृष्ट्या ब्राह्मसमाज नाहीसा झाला. त्यामुळे त्यांच्या अन्तर्धानाबरोबर निराश होऊन तो जो मागे सरला, तो आता समोर येतच नाही. त्यांच्या जीवनातील ती महान शक्ती कुठे आणि माझ्यासारख्या दुबळ्या निसत्त्व मनुष्याचे प्रयत्न कुठे ! दिव्यत्व आणि सामान्यत्व यात केवढा मोठा हा भेद !! असो.

१८८४ साली केशवचंद्र सेन स्वर्गवासी झाले. त्यानंतर १८८८ साली मी विलायतेला जाईपर्यंत ज्या ज्या घटना घडल्या त्या सर्वांचेच स्मरण आहे, असे नाही. तरीपण ज्या चारदोन घटना आठवतात त्या येथे लिहून ठेवतो.

## खार्सियांग येथील एकांतवास

१८८६ सालच्या उन्हाळ्यात आम्ही समाजाचे चार प्रचारक, म्हणजे नवद्वीपचंद्र दास, रामकुमार विद्यारत्न, शशिभूषण बसू आणि मी अशा चौघांनी असा संकल्प केला की आपण हिमालयातील पहाडावर निर्जन जागी एकांतात काही दिवस घालवावे. या बाबतीत आणखी असेही ठरले की यासाठी कुणाकडे काही द्रव्ययाचना करावयाची नाही. जागेचा विचार करता खार्सियांग हा शैलनिवास निश्चित झाला. दार्जिलिंग येथे फार गर्दी गडबड असते म्हणून तितके लांब जाणे नको. या योजनेप्रमाणे खार्सियांगला जाण्यासाठी तयार झालो. एक झोळी बनवून त्यात ज्याचे जे देण्यासारखे काही होते ते टाकले. आणि ती झोळी नवद्वीपचंद्र दास

यांच्या हाती देऊन मोकळा झालो. म्हणजे दासबाबू हे आम्हा सर्वांचे कोषाध्यक्ष झाले. पूर्व-उत्तरबंग रेल्वेकडून आम्हाला फ्री पास मिळाल्यामुळे एकदम आम्ही खार्सियांगला येऊन दाखल झालो आणि तेथे एक घर भाड्याने घेऊन त्यात साधन भजन करीत बसलो. बारीक मोठ्या कामासाठी एक नोकर ठेवला. तो केरवारा काढणे, भांडी घासणे वगैरे कामे करी. नवद्वीप बाबूंनी बाजारहाट करण्याची जोखीम घेतली. शशिबाबूंनी बिछाने घालणे व पोस्टात जा-ये करणे पत्करले. विद्यारत्न भैयाने फराळपाण्याची तजवीज करणे व आल्यागेल्याचा समाचार घेणे हे काम पत्करले आणि मी सैंपाकाचे काम स्वतःकडे घेतले.

सकाळी उठून प्रातर्विधी आटोपताच आम्ही चारहीजण एकत्रच उपासना करीत असू. नंतर थोडाफार फराळ करून साधनभजन झाल्यावर जो तो मन मानेल तिकडे फिरायला जात असे. अशा प्रकारे प्रत्येकजण हे दोन तास आपापल्या मर्जीप्रमाणे ध्यानधारणेत घालवी. त्या वेळात प्रत्येकजण स्वतःच्या इष्ट पद्धतीनुसार चिंतन-ध्यान-उपासनादि करी. मला सर्वांच्या अगोदर बिऱ्हाडी यावे लागे.

फिरायला राहात्या घराच्या गेल्यावर जवळच असलेल्या डोंगरावर एका झऱ्याच्या काठी असलेल्या प्रशस्त शिलातलावर माझी बसण्याची जागा मी ठरविली. त्या ठिकाणी प्रत्येक दिवशी बसून चिंतन, ध्यान आणि उपासना यात मी ठराविक काल घालवीत असे. एक महिना अशा रीतीने साधना केल्याने मला पुष्कळच मानसिक शांतिसमाधानाचा लाभ मिळाला. इतकेच नव्हे तर या भागातून जेव्हा जेव्हा मला दार्जिलिंगला जाण्याचा प्रसंग येई तेव्हा तेव्हा या प्रस्तरासनाकडे नजर जाताच उपासनेची भावना अन्तःकरणात साग्रत होई. या साधनेचा परिणाम कायमचा स्थायी होऊन राहिला आहे. या ठिकाणी राहात असता आमचे अनेक ब्राह्ममित्र दार्जिलिंगला जाता येता आमच्यासाठी खाण्याचे पदार्थ व काही रक्कम देऊन जात.

याप्रमाणे सुमारे एक महिना खार्सियांग येथे राहिल्यावर एके दिवशी सकाळची उपासना आटोपताच पहाडावरून खाली जाण्याचे आम्ही ठरविले. अर्थात त्यावेळी कोषाध्यक्षाची झोळी पाहणे प्राप्त झाले. पाहतो तो आम्हाला आपल्या कार्यस्थानी जायला जो खर्च येणार त्यात अकरा रुपये कमी. नोकराचा पगार द्यायचा होताच. घराचे भाडेही दिलेले नव्हते वगैरे. मी अशी सूचना केली की कुणाकडे याचना करावयाची नाही. असेल त्यात भागवयाचे असा विचार केला. त्यानुसार नोकराला वेतनापोटी माझ्या अंगावर घ्यायचे जाडेभरडे कांबळे द्यायचे ठरले. कंदील विकण्यात आला. पण नोकराकडे वेतनाबद्दल घोंगडे देण्याची गोष्ट काढताच तो हसू लागला. पगारापोटी आपल्या अंगावरचे घोंगडे देणारे हे हवापालट करण्यासाठी आलेले लोक, इतके दरिद्री असतील या गोष्टीवर त्याचा विश्वासच बसेना.

शेवटी आता करायचे काय, निघायचे कसे हा प्रश्न उत्पन्न झाला. तेव्हा आमचा याचना न करण्याचा नियम मोडून याचक-भिक्षुक-बनण्याचे ठरविले. मी एका ब्राह्ममित्राकडे याचनेचे पत्र लिहायला बसलो आणि माझे पाहून विद्यारत्न भैया दार्जिलिंगचे डेप्युटी मॅजिस्ट्रेट पार्वतीचरण राय यांना पत्र लिहू लागला. चार-दोन ओळी लिहिल्या न लिहिल्या तोच माझ्या मनाला कसेसेच वाटू लागले. केलेला अयाचकवृत्तीचा नियम मोडावा हे मनाला रुचेना. लागलीच चारदोन ओळी लिहिलेली ती चिठी मी फाडून टाकली. मी पत्र फाडलेले पाहून विद्यारत्न भैय्यानेही स्वलिखित पत्र फाडले.

त्याच दिवशी दार्जिलिंगहून, अमेरिकन युनिटेरियन मिशनरी सी. एच्. ए. डॉल साहेब यांचे एक पत्र आले. त्यांनी लिहिले होते, ‘ मी परवाचे दिवशी खाली उतरत आहे. तुम्ही केव्हा निघणार ? तुमच्याशी एका विशेष बाबतीत बोलायचे आहे. जर तुम्हीही त्याच दिवशी निघत असाल तर बरोबरच जाऊ. म्हणजे जाताना ती गोष्ट बोलता येईल. ’ मी उत्तरी लिहिले, ‘ आमच्याकडे शिलीगुडी-पर्यंतचे भाडे देण्याइतका पैसा नाही. बहुतेक शिलीगुडीपर्यंत आम्हाला पदयात्राच करावी लागेल. ’

त्याच्या दुसऱ्याच दिवशी एक आश्चर्यकारक घटना घडली. कलकत्त्याहून पोस्टाने एक पत्र आले. उघडून पाहिले तो त्यात दहा रुपयांची करन्सी नोट दिसली. पाठविणाऱ्याचे नाव नव्हते. ‘ आपल्या वाटखर्चासाठी ’ इतकेच लिहिले होते. नवल नव्हे तर काय ! कारण त्याच वेळी आम्ही तेवढे रुपये कसे मिळतील या काळजीत होतो. तोच दहा रुपये तयार. लागलीच आम्ही देणे वगैरे फेडून टाकले आणि दार्जिलिंग मेलने शिलीगुडी स्टेशनात उतरण्याचे निश्चित केले.

निश्चयाप्रमाणे दुसरे दिवशी थर्डक्लासचे तिकीट काढून स्टेशनात उभा आहे तोच डॅलसाहेब तेथे आले. आम्हाला पाहाताच ते म्हणाले, ‘ वाः पैसा नाही म्हणून पदयात्रा करीत शिलीगुडीला जाणार असे लिहिले आणि हे काय ? ’ मी हसून उत्तर दिले, ‘ एक तशीच अलौकिक घटना घटना घडली आहे ! ’ नंतर त्यांनी मला ओढीतच सेकंड क्लासच्या डब्यात नेले. माझे सेकंडक्लासचे उर्वरित भाडे त्यांनी दिले. आणि शिलीगुडीपर्यंत सगळ्या रस्ताभर आपल्या उद्भवलेल्या एका नवीन कामासंबंधीचे विचार त्यांनी विस्तृतपणे सांगितले. त्यांनी जो प्रस्ताव माझ्यापुढे ठेविला तो माझ्या स्मरणानुसार असा होता. त्यांनी बोलता बोलता सांगितले, ‘ आपण, एकमात्र सत्यस्वरूप ईश्वरावर श्रद्धा असलेल्या व्यक्तींना एकत्र करून एक सभा स्थापन करूया. ते ख्रिस्ती असोत वा ब्राह्म असोत वा नसोत. फक्त नास्तिक नसले म्हणजे झाले. या मंडळींना घेऊन एक सार्वभौमिक धर्मप्रचार करण्याचा प्रयत्न करूया. ” वगैरे. या मूळ सिद्धांताच्या अनेक शाखाप्रशाखा होत्या. पण आता त्या माझ्या ध्यानात नाहीत. कलकत्त्याला जाताच हे कार्य

हाती घ्यायचे असा मात्र निर्णय घेतला. पण हाय ! डॉलसाहेब कलकत्त्याला आल्यावर थोड्याच दिवसांत फार कठीण आणि दुर्धर अशा कुक्षिरोगाने (जठरव्याधीने) आजारी पडले आणि मेडिकल कॉलेजच्या हॉस्पिटलात प्राणास मुकले.

या हिमालयीन मुक्कामात मी 'हिमाद्रीकुसुम' नावाचा एक काव्यग्रंथ लिहिला. तो पुढे थोडासा वाढवून छापला.

### आसामचा प्रवास

खार्सियांगहून आल्यावर काही दिवसांनी म्हणजे १८८६ सालच्या जुलै महिन्यात, मी धर्मप्रचारासाठी आसाम प्रांतात जाऊन धुबडी, गोयालपाडा, गोहत्ती, तेजपूर, नेगाव, शिवसागर, डिब्रूगड आणि शिलाँग या सर्व ठिकाणी गेलो. ज्या कारणांनी या प्रचारप्रवासाची हकीगत मनात आठवते ती कारणे अशी :– मी धुबडीहून डिब्रूगडकडे जात असता रस्त्यात एके ठिकाणी माझे (स्वर्गीय) मित्र द्वारकानाथ गांगुली हे येऊन मला मिळाले. ते 'संजीवनी'चे एजंट म्हणून आले होते व भारतसभेचे उपाध्यक्ष म्हणून आसामच्या कूलीकायद्याचे आणि त्यासंबंधी इतर काही कामाचे संशोधन करण्यासाठी जात होते. पण ते मला मिळाल्याने एक नवाच प्रकार घडून आला. ज्या ठिकाणी मी जाई आणि व्याख्यानाची जाहिरात देई त्या ठिकाणी तेथील इंग्रज अधिकारी, तेथील वकिलांना आणि इतर प्रतिष्ठित लोकांना विचारीत, 'हे शिवनाथ शास्त्री कोण? हे काय कूलीकायदा वगैरे राजकीय कारभाराच्या चौकशीसाठी आले आहेत?' ते उत्तर देत, 'छे. तसे काही नाही. हे फक्त ब्राह्मधर्मप्रचारक आहेत.' 'मग द्वारकानाथ गांगुली यांच्याबरोबर का?' हा त्या अधिकाऱ्यांचा दुसरा प्रश्न असे. त्यांना उत्तर मिळे, 'ते दोघे मित्र असल्यामुळे बरोबरीने फिरतात. इतकेच' नंतर त्या त्या ठिकाणचे डेप्युटी कमिशनर वगैरे इंग्रज कर्मचाऱ्यांपैकी काही माझ्या व्याख्यानाला उपस्थित राहू लागले. इतकेच नव्हे तर डिब्रूगड येथे माझे व्याख्यान झाले त्या दिवशी फार मोठे वादळ होऊन पाऊस पडला. व्याख्यानाच्या जागी जाऊन पाहातो तो प्रतिष्ठित लोकांपैकी बरीचशी मंडळी आलेली दिसतना. पण डेप्युटी कमिशनर मात्र उपस्थित होते.

आम्ही डिब्रूगड येथून निघाल्यावर मार्गात शिवसागरला गेलो. या ठिकाणी जा-ये करताना दोन वेगवेगळ्या प्रकारच्या अडचणी आल्या. जाताना स्टीमरच्या बंदरात पाहिले तो शिवसागरच्या मित्रमंडळीनी आमच्यासाठी हत्ती पाठविले होते. आम्ही दोघांही वीर पुरुषांनी हत्तीवर आरोहण केले. हत्तीचा लहरी स्वभाव असतो हे यापूर्वी पाहण्याची अम्हाला संधी मिळाली नव्हती. यावेळी ते पाहिले. माहुताच्या दुर्व्यवहाराने असो वा अन्य काही कारणाने असो वाटेत हत्ती बराच

खवळलेला दिसला. आणि आमच्यासह आडवाटेला असलेल्या एका तलावात गेला. आमच्या पायापर्यंत पाणी आले. हसावे, रागवावे की उडी मारून बाहेर जावे हे आम्हाला ठरविता येईना. शेवटी माहुताने बरेच प्रयत्न करून व गोड गोड बोलून त्या हत्तीला राजमार्गावर आणले आणि मग आम्ही योग्य वेळी उतरण्याच्या ठिकाणी आलो.

येताना दुसऱ्याच एका संकटात सापडलो. मध्ये काही दिवस पुष्कळ पाऊस पडल्यामुळे सर्वत्र पाणीच पाणी होऊन गेले त्यातच कळले की ब्रह्मपुत्रानदाला फार मोठा पूर आला आहे. पण काय करणार ! आम्हाला तर लवकर येणे क्रमप्राप्त होते. आमची जाण्याची व्यवस्था करण्यासंबंधाने आम्ही तेथील आमच्या मित्र मंडळीला फार घाई करू लागलो. त्यांनी त्याप्रमाणे आमची जाण्याची तजवीज केली.

निघण्याच्या दिवशी सकाळीच पाहिले, तो एक हत्ती आलेला दिसला. मनोमन वाटले. हा फार शांत आणि शिष्ट दिसतो. हा काही तलावात नेऊन बुडविणार नाही. पण आम्ही जेवणे वगैरे आटोपून निघण्याच्या वेळी पाहिले तो हत्ती कुठे दिसेना. जंगलात कुठे शिरला होता त्याचा शोध करूनही पत्ता लागेना. शेवटी तेथील वकील मित्रांपैकी एकाने आम्हाला आपली गाडी दिली. योग्यवेळी गाडीत बसून काही अंतर गेल्यावर आम्हाला दिसले रस्ता चिखलाने भरलेला. त्यातून गाडी जाणे कठीण. चिखलात गाडीची चाके रुतू लागली. शेवटी द्वारिबाबू खाली उतरून गाडी लोटू लागले व ओढू लागले. शेवटी गाडी सोडूनच द्यावी लागली. आणि मग कूलीच्या मस्तकावर सामान चढवून आम्ही पायी पायीच आठ मैलांचे अंतर तोडून बंदरावर जावे असा बेत केला. पण शहराच्या बाहेर मोकळ्या जागी येऊन पाहातो तो एक शालवृक्षाच्या खोडापासून बनविलेली नाव ( हिला बंगालमध्ये शालती म्हणतात. ही आकाराने लहान पण वेगवान असते. ) तेथे तयार आहे. चोहोकडे पाणीच पाणी झाल्यामुळे ती शहराजवळ आली होती. लागलीच ती नाव भाड्याने ठरवून आम्ही दोघे तिथे त्यात चढून बसलो. दहा एक हात ती नाव जाते न जाते तोच दिसून आले की, नावेत जागोजागी छिद्रे असून ती फक्त चिखलाने बुजविली आहेत. आमच्या भाराने त्या छिद्रांवरचा चिखल दूर झाला आणि नावेत पाणी शिरू लागले. लागलीच आम्ही त्यातून खाली उतरलो. आणि ढोपरभर पाण्यातून चालतच बंदराकडे निघालो.

### गांगुली भैया बुडाले

तो तसा एक कुतूहलोत्पादक प्रकार झाला खरा. गांगुलीभैय्या अशा तऱ्हेने पाण्यातून चालताना माझ्यापासून वीस पंचवीस हात पुढे होते. त्यांचा उत्साह काय विचारावा ! माझ्याने त्यांच्याप्रमाणे चालवत नव्हते. अर्थातच मी थोडाफार मागे

राहिलो होतो. अशा प्रकारे दोघांची गुडघाभर पाण्यातील वाटचाल चालू होती. चालता चालता अकस्मात् गांगुलीभैया पाण्यात बुडाले. सामान घेऊन चालणाऱ्या कूलीच्या तोंडून मी ऐकले, की त्या ठिकाणी एक नाला व त्यावर पूल होता. ब्रह्मपुत्रा नदीला महापूर आलेला असल्यामुळे नाला तर पार वाहून गेला आणि पूलही मोडून गेला असावा. मी घाबरलेल्या स्थितीत पुढे जाऊन पाहिले तो गांगुली भैयांनी काही अंतरावर डोके वर काढलेले दिसले आणि पुनः ' मी गेलो. बुडालो ' असे ओरडता ओरडता ते दिसेनासे झाले. आता मात्र मी निराश झालो. वाटले, नाल्यातील प्रवाहाबरोबर ते वाहात गेले असावेत. सुदैवाने पुनः पाहिले तो काही अंतरावर त्यांचे डोके पाण्यावर दिसले. यावेळी आपल्या हातांनी काही तरी त्यांनी पकडले असावे. नंतर समजले की नाल्याच्या नाजूला असलेले एक झुडूप त्यांच्या हाताला लागले व त्याची फांदी त्यांनी गच्च धरली. नाल्याच्या परतीराला किंचित् दूर एक शालती नाव उभी होती. मी ओरडून नावाड्याला बोलवू लागलो. " बाबूंना वाचीव बाबूंना वाचीव. बक्षीस देईन. " माझ्या या आरडा-ओरडीमुळे नावाडी आपली शालती घेऊन द्वारिकाबाबूंकडे आले आणि त्यांनी त्यांना उचलून नावेत घेतले. त्यांना चांगले शुद्धीवर आणण्यात काही वेळ गेला. नंतर आम्ही दोघे जण तसेच पुढे चालू लागलो.

आता अस्तमानाची वेळ होत आली. तहानेने आमचा घसा कोरडा पडला. गढूळ पाणी पिण्याचे धाडस करवेना. काय करावे अशा विचारात असताना एका उंचवट्यावर एक बंगला असलेला दिसला. मनात विचार केला, बंगला आहे तेव्हा तिकडे माणसे असणारच. ती पाणी देऊ शकतील. नंतर त्या उंचवट्यावर चढून बंगल्याजवळ जाऊन पाहातो तो, तो गव्हर्नमेंटचा इन्स्पेक्शन बंगला असल्याचे दिसून आले. तेथे एक आसामी नोकर होता. त्याच्याजवळ पाण्याने भरलेली एक कळशी असून त्यावर एक पेला उपडा ठेवलेला होता. लागलीच आम्ही त्या माणसाजवळ पाणी मागितले. त्यानंतर त्याचे आमचे जे बोलणे झाले ते असे.

त्या नोकराने विचारले, " तुम्ही पाणी पिणार कसे ? "

मी उत्तर दिले, " का ? तुझ्या त्या पेल्यातून दे. "

तो म्हणाला, " तसे करता येणार नाही. तुम्हाला भांड्याला शिवू देणार नाही. तुम्ही ' काळे बंगाली ' आमचे पिण्याचे भांडे तुमच्या हाती कसे द्यायचे ? त्या भांड्याला तुमचा स्पर्शही होता कामा नये. "

यावर आम्ही दोघेही म्हणालो, " ठीक आहे. हातांची ओंजळ करून त्याने पाणी पितो. तू त्या ओंजळीत पाणी ओत म्हणजे झाले. " नोकराने शंका काढली, तुमच्या हाताचा, पाणी ओतणाऱ्या पेल्याला स्पर्श झाला तर ? तसे होणारच. "

इतक्यात द्वारिकाबाबू झाडाची पाने तोडून आणण्यासाठी निघाले. आणि

जाताना त्या नोकराला सांगून गेले, ' बरे तर, मी झाडाची पाने आणून त्यांचे द्रोण करतो. त्यात तू पाणी ओत म्हणजे झाले.'

गांगुली भैयांना येण्याला उशीर होऊ लागला. तेव्हा तेवढ्या वेळात मी त्या नोकर माणसाला ब्राह्मधर्म सांगायला सुरवात केली. मी म्हटले, ' तुला लाज कशी नाही वाटत ? ज्या ईश्वराने तुला निर्माण केले त्यानेच आम्हालाही जन्माला घातले. तसे पाहायला गेल्यास तू आणि आम्ही भाऊ भाऊ झालो. आज या संकटात सापडून तहानेने आमचा प्राण जाऊ पाहात आहे, तुझ्याजवळ पाणी आहे पण ते तू आम्हांला देऊ शकत नाहीस. ईश्वराने सर्वांसाठीच पाणी निर्माण केले आहे. पण ते आम्हाला तुझ्याने देववत नाही ! किती लज्जास्पद गोष्ट आहे ही ! "

का ते न कळे पण माझे हे सांगणे संपताच तो नोकर माणूस हळूच म्हणाला, " बरे तर. माझ्याकडच्या पेल्यानेच तुम्ही पाणी प्या. " हे ऐकताच मी द्वारिका-बाबूंना ओरडून सांगितले, " या, या, लवकर या. मी याला ब्राह्मधर्माची दीक्षा दिली आहे आणि हा आम्हाला स्वतःच्या पेल्यातून पाणी द्यायला तयार झाला आहे. "

नंतर आम्ही दोघेही खूप हसलो आणि त्याच्या पेल्याने पोटभर पाणी पिऊन तृप्त झालो.

पुनः पायचालीने त्या तसल्या गुडघाभर गढूळ पाण्यातूनच पुढे चाललो आणि सायंकाळ होता होता स्टीमरच्या बंदरात येऊन पोचलो. तेथील बाबू लोकांना आमचे आगमन नवलाचे वाटून ते विचारू लागले, " केवढे नवल ! या जलप्रलया-तून तुम्ही आलात तरी कसे ? " आम्ही हसून उत्तर दिले, " हस्तीदर्शन, गाडीकर्षण, नौकास्पर्शन आणि शेवटी संतरण. " आणि मग याची व्याख्या करून जेव्हा सर्व वृत्तांत सांगितला तेव्हा चांगलाच हास्यकल्लोळ उसळला. त्याच्या दुसऱ्या दिवशी आम्ही दोघे जण घरी परतलो.

## पिता-पुत्र मीलन

१८८८ सालातील एक विशेष स्मरणीय घटना अशी : काशी येथे माझे पितृदेव एका विशेष आजाराने रुग्णशय्येवर पडले होते. मी यज्ञोपवीताचा त्याग केल्यादिवसापासून त्यांनी मला त्याज्यपुत्र ठरवून घराबाहेर टाकले होते. त्यापासून इतक्या वर्षांत त्यांनी माझे तोंडही पाहिले नाही; इतकेच नव्हे तर मी मरणासन्न स्थितीत असतानाही ते भेटले नाहीत. प्रथम प्रथम मी मिळविलेल्या पैशातून पावली चवलीलाही ते स्पर्श करीत नसत. दिले तर घेत नसत. मी माझ्या मोठ्या आतेभावाच्या हातून शीतनिवारणार्थ त्यांना कांबळे वगैरे पोचवीत असे. तो मोठ्या कौशल्याने बाबांकडून त्याचे पैसे घेई आणि ते पैसे माझ्या आईच्या

हाती देई. मी जेव्हा भवानीपुरात साऊथ सबर्बन स्कूलमध्ये काम करीत होतो त्यावेळी माझ्या मधल्या बहिणीचा विवाह झाला. त्यावेळी मी लग्नाच्या खर्चाला मदत म्हणून गुप्तपणे आईच्या हाती काही रुपये दिले होते. नंतर ही गोष्ट बाबांना समजताच ते इतके रागावले की त्यांनी त्या रागाच्या भरात घराच्या छपराला आग लावली. शेजारचे लोक आले आणि मग त्यांनी ती आग विझविली. पण नंतर हा त्यांचा क्रुद्धभाव क्रमाक्रमाने ओसरत चालला. आणि मग मी दरमहा आईकडे दहा रुपये देत असतो हे ऐकून ते रागावले नाहीत. पण त्या पैशांना ते स्पर्श करीत नसत. ते आईच्या हातीच राहात.

अशा तऱ्हेने वडलांचा संसार चालला असताना मध्येच बाबांनी नोकरीतून मुक्त होण्याचा संकल्प केला. कारण नोकरी सोडून गावाचा त्याग करून काशी-वास केला की या अधमपुत्राचे मुखावलोकन करण्याचा प्रसंग येणार नाही. काशीक्षेत्री राहण्यासाठी जाण्याआधी दोघेही तीर्थक्षेत्रे करावी म्हणून गया, वृन्दावन वगैरे तीर्थदर्शनाला बाहेर पडली. त्यावेळी मी त्यांच्या तीर्थयात्रेच्या खर्चासाठी म्हणून काही द्रव्यसहाय्य केले. बाबांनीहि कृपाळूपणाने त्याचा स्वीकार केला. मलाही त्यामुळे कृतार्थ झालोसे वाटले. पुढे यात्रा करीत करीत ती दोघेही काशीला आली आणि तेथे राहू लागली. तेथे बाबांचा मोठा मानसन्मानही झाला. त्यांचे पेन्शन आणि माझ्याकडून मिळणारी थोडीफार मदत यामुळे त्यांनी तेथे सुखाचा संसार थाटला.

मी माझ्या बहिणीला–ठाकूरदासीला वडिलोपार्जित घरात घराची राखण-दारी करायला ठेवल्यामुळे मलाही पुष्कळसा निश्चिंतपणा आला आणि माझे दैनं-दिन कार्य निर्विघ्नपणाने चालू झाले.

असे दिवस चालले होते इतक्यात १८८८ सालच्या १२ फेब्रुवारी दिवशी रविवारी ब्राह्ममंदिरातील उपासना आटोपून वेदीवरून खाली उतरतो न उतरतो तोच काशीहून माझ्या एका डाक्टर मित्राकडून तारेने बातमी आली, ' तुमचे वडील फार आजारी आहेत. तुम्ही ताबडतोब निघा. ' मी लागलीच निघण्याची तयारी केली आणि माझी दुसरी पत्नी विराजमोहिनी हिला बरोबर घेऊन आगगाडीने काशीक्षेत्री निघालो. दुसऱ्या दिवशी दुपारी काशीला पोचलो आणि वाटेत डॉक्टर मित्रवर्यांची गाठ घेतली. त्यांच्या सांगण्यावरून वडलांना कॉलरा झाल्याचे कळले. नाडीही हाताला लागत नाही असे ते म्हणाले; तेव्हा त्यांनाच बरोबर घेऊन बाबांच्या बिऱ्हाडी आलो. नाडी तर लागत नव्हतीच. त्यातच उचकी सुरू झाली होती. सगळी चिंतायुक्त दुःखी चेहेऱ्याने बसून होती. अशा स्थितीत बाबांजवळ जेव्हा मी जाऊन उभा राहिलो तेव्हा आज अठरा वर्षांनी पहिल्यांदाच त्यांनी क्षीण नजरेने माझ्याकडे पाहिले. परंतु मला पाहून त्यांनी तोंड फिरविले. विराजमोहिनीवर त्यांचा फार लोभ. तिने प्रथम त्यांची पायधूळ मस्तकाला लाविली

आणि ती त्यांच्या बिछान्याजवळ बसली. तेव्हा बाबांनी तिच्या तोंडाकडे पाहिले आणि ते रडू लागले. मी डॉक्टर मित्रांना बाबांना तपासून शेजारच्या खोलीत या असे सांगून मी त्या खोलीत गेलो. डॉक्टर आत येऊन मला म्हणाले, "आता नाडी हाताला लागत आहे." मी परमेश्वराला धन्यवाद दिले. नंतर आईला, बाबांना माझ्याशी बोलण्याची विनंती करण्यास सांगून म्हटले, "मी आजारा-संबंधाने त्यांच्याकडून सर्व हकीगत कळल्याशिवाय डॉक्टरना तरी कसे समजावून सांगू ?" माझे हे म्हणणे आईने त्यांना सांगितले तेव्हा त्यांना माझे म्हणणे पटले म्हणून असो वा ज्या दिवशी ते आजारी पडले त्याच्या दुसऱ्याच दिवशी अगदी तत्परतेने मी आलो हे पाहून असो, माझ्या यज्ञोपवीतत्यागानंतर अठरा वर्षांनी त्यांनी पहिल्यादाच माझे तोंड पाहिले व माझ्याशी ते बोललेही.

आजाराच्या जोरदार आक्रमणाने क्षीण झालेले असतानासुद्धा त्यांच्या चेहऱ्यावर थोडीसुद्धा ग्लानी वा खिन्नता दिसत नव्हती. डॉक्टरांनी त्यांचे मनगट हातात धरून जेव्हा 'नाडी चालते आहे' असे म्हटले तेव्हा बाबा हसून म्हणाले, 'आधी अनाडी त्यात नाडी म्हणे.' आई रडत होती तिच्याकडे बोट दाखवून ते मला म्हणाले, 'ही किती असमंजस आहे पाहिलेस ? ज्यासाठी काशीक्षेत्री येणे घडले ते तर आपोआप होत आहे. त्याबद्दल आनंद मानायचा ते राहिलेच. उलट रडण्याला आरंभ ! काशीक्षेत्री मी काही व्यापारधंदा करायला आलो नाही. मरायला आलो आहे. ते मरण अनायासे येत आहे त्याचा इतका शोक कशाला !' मी म्हटले, 'बाबा, हे तर आपण सहज म्हणून बोललात, पण आईच्या अन्तः-करणाला ते कसे रुचणार ?' यावर बाबा म्हणाले, 'तर मग तिने येथे येता कामा नये होते. तिचे येणे अयोग्य.' नंतर मी ऐकले की कोंवळ्या तालफळाचे पाणी दिल्याने उचकी थांबेल. लागलीच ती तसली फळे मिळविण्याला मी उतावीळ झालो. दुसरे दिवशी माझे एक मित्र बाबांना पाहायला आले. बाबा हसत हसत त्यांना म्हणाले, 'बघा, याला ताल न मिळाल्यामुळे हा वेताल होऊ पाहात आहे !' माझे ते मित्र जाताना हसत हसत म्हणून गेले, 'यांना मारण्याला यमसुद्धा भिऊन माघार घेईल. असले मानसिक सामर्थ्य सर्वांतच आढळते असे नाही.'

असो. हे काही असले तरी बाबा काही दिवसांतच त्या आजारातून उठले. त्यांनी पथ्यपाण्याला सुरवात केल्यावर व ते तरतरीत आहेत असे पाहून आम्ही कलकत्त्याला आलो. आम्ही जायला निघालो तेव्हा ते मला म्हणाले, 'मी सूनबाईला गाडींत बसवून येतो.' मी म्हटले, 'नको. बाबा तसे करू नका. आपल्या सुनेला तर मीच आणले आहे मी तिला घेऊन जाईन. आपण उठू नका. पण ते काही केल्या माझे म्हणणे ऐकून घेईनात. प्रयत्नपूर्वक उठू लागले. काय कर-णार! मग दोघांनी त्यांच्या खांद्याला धरून त्यांना बिछान्यातून उठविले आणि हळूहळू

जिन्यावरून खाली आणले. नंतर काठीच्या नेटाव्याने एकाचा हात धरून ते हळूहळू गल्लीच्या तोंडाशी वळणावर आले आणि मोठ्या रस्त्याच्या कडेला उभ्या असलेल्या गाडीशी येऊन थांबले. मी आणि विराजमोहिनीने त्यांची पायधूळ मस्तकाला लावून गाडीत चढलो नाही तोच बाबा रडत रडत चक्कर आल्यासारखे होऊन रस्त्यात खाली बसले. शेवटी त्यांना दोघातिघांनी धरून कसेबसे घरी नेले.

यानंतर काही काळाने ( १८८८ च्या १३ एप्रिल रोजी ) बाघआँचडा येथे राहणारे श्रीमान योगेंद्रनाथ वंद्योपाध्याय नावाच्या तरुणाबरोबर माझी द्वितीय कन्या तरंगिणी हिचा विवाह झाला.

* * *

. १७.

# इंग्लंडचा प्रवास

१८८८ साली माझे मित्रवर्य दुर्गामोहनदास आणि त्याबरोबरच डेप्युटी कलेक्टर बाबू पार्वतीचरण राय या दोघांनी इंग्लंडला जाण्याचे ठरविले. दुर्गामोहनबाबू आपल्याबरोबर मला या म्हणू लागले व त्यासाठी लागणारे बोटीचे भाडे द्यायलाही तयार झाले. मी त्यांच्याकडून आल्यावर माझ्या मित्रमंडळींसमोर हा माझा प्रयाणाचा बेत सांगताच त्यांच्यापैकी काहींनी मला द्रव्यसहाय्य करण्याचे अभिवचन दिले. या सगळ्यांच्या आग्रहाने मी दुर्गामोहनबाबू व पार्वतीचरण राय यांच्यासह १८८८ च्या १५ एप्रिल रोजी इंग्लंडला निघालो.

मी सेकंड क्लासचे तिकीट काढले होते. दुर्गामोहनबाबू व पार्वतीचरणबाबू फर्स्टक्लासमध्ये होते. बंगालच्या उपसागरात बोट जाताच पार्वतीचरणबाबूंना बोट लागली. वान्त्या होऊ लागल्या. म्हणून ते स्वतःच्या कॅबिनमध्येच पडून राहिले. दुर्गामोहन काहीसे बरे होते पण निघताना ते दुर्बल अवस्थेतच निघाले होते. मी पाळीच्या तापाने आजारी असतानाच या प्रवासाला निघालो होतो. पूर्णिमा–अमावास्येला माझी तापाची पाळी असे. ताप आला की कॅबिनमध्येच एकाकी स्थितीत मला पडून राहावे लागे. पडल्या पडल्या त्या प्रासंगिक भावनेत मी जे गाणे तयार केले होते ते नंतर कलकत्त्याला पाठविले आणि ते मला वाटते तत्त्वकौमुदीत प्रकाशितही झाले. नंतर ब्रह्म संगीत ग्रंथात त्याचा समावेश करण्यात आला होता.

१ आमि एक मुखे मायेर गुण बलि केमने ?
२ आर कोन मा आछे एमनकरे पालिते जाने ?
३ कि स्वदेशे कि विदेशे मा आमार सर्वदा पाशे
प्राणे बसे कहेन कथा मधुर बचने ।

४ आमि तो घोर अविश्वासी, (माके) भुले थाकि दिवानिशी
मा आमार सकल बोझा बहेन यतने ।

५ ए अनन्त सिंधु जले मा आमाय रेखेछेन कोले,
कत शान्ति कत आशा दितेछेन प्राणे ।

६ हाय आमि कि करिलाम ! एमन माये ना चिनिलाम !
ना संपिलाम प्राण-मन एमन चरणे ।

अर्थ– १ मी (माझ्या) एकाच तोंडाने आईचे गुणवर्णन कसे करू ?

२ अशा तऱ्हेने (लालन) पालन करणारी दुसरी आणखी कोणती आई आहे ?

३ स्वदेशात (म्हणा) अथवा परदेशात (म्हणा) आई नेहमी माझ्याजवळ हृदयात बसून गोड भाषेत गोष्टी सांगते.

४ मी तर महान् अश्रद्धाळू माणूस ! आईचा मला रात्रंदिवस विसर पडतो;— पण माझा सगळा भार, ती अगत्याने सांभाळते.

५ या अफाट महासागरात माझी आई मला आपल्या ओसंगावर घेऊन सांभाळीत आहे— माझ्या मनाला ती किती आशा आणि किती शांती देत आहे !

६ अशी माझी आई असून; हाय ! मी तिला ओळखले नाही—
काय केले मी हे ! तिच्या अशा चरणांवर मी आपले तन मन का बरे अर्पण केले नाही !

बोटीवर असताना दोन घटना घडल्या त्यामुळे मी इंग्रजांची वागणूक आणि फ्रेंचांची वागणूक या दोहोंतील भेद जाणू शकलो. पहिली घटना अशी; आमच्याबरोबर एक इंग्रज सहप्रवासी होता. तो सहा महिन्यांपूर्वी भारतात फिरण्यासाठी म्हणून आला होता. आतां तो फिरून परत निघाला होता. तो एके दिवशी जेवायला बसला असता सोबतच्या इतर इंग्रजांजवळ एतद्देशियांना खूप शिव्या देऊ लागला. भारतात राहाणाऱ्या इंग्रजांच्या तोंडून जे ऐकले होते आणि स्वतः जे पाहिले होते ते सांगून एतद्देशियांसंबंधी तिरस्कार व्यक्त करीत होता. मी त्यावेळी काहीच बोललो नाही. जेवणानंतर वरच्या डेकवर जेव्हा तो फिरायला गेला तेव्हा मीही तेथेच हवा घेत होतो. तो येताच त्याच्या जवळ जाऊन त्याला सभ्य तऱ्हेने म्हटले, "आपण जेवते वेळीं ज्या सर्व गोष्टी बोलत होता त्या बाबतीत आपल्याला काही सांगावे अशी माझी इच्छा आहे. आपणाला या देशात पुरते सहा महिनेही झाले नाहीत, आपण जे ऐकलेत त्यातील पुष्कळसे यथातथ्य नाही.' माझे हे बोलणे ऐकताच त्याने आपले तोंड फिरविले आणि म्हटले, "जरूर नाही. तुमचे म्हणणे ऐकून घेण्याची माझी इच्छा नाही." त्या दिवसापासून मी त्याचा संसर्ग

टाळला आणि त्यानेही माझ्याबाबतीत तसेच केले. एका बोटीत एका क्लासात राहायचे, एकाच टेबलावर जेवायचे पण आमच्यात केवढा दूरान्वयीभाव निपजला. बोलणे, परिचय, संभाषण काही नाही.

दुसरी घटना अशी : बोट जेव्हा फ्रान्सच्या मार्सेल्स बंदरात येऊन उभी राहिली तेव्हा मी ठरविले की, एकवार शहर पाहून यावे. मोठमोठ्या नावा येऊन बोटीवर माल चढवीत होत्या. मी एका बाजूला उभा होतो. थोडी गर्दी ओसरल्यावर उतरावे असा बेत. तितक्यात दोघे फ्रेंच गृहस्थ आलेले दिसले. ते तिथले पॅसेंजर असावेत. त्यांच्याबरोबर त्यांचे काही मित्र त्यांना पोचविण्याला आले होते. त्यातील एक प्रतिष्ठित गृहस्थ, मित्राला पोचवून परत जाताना मी बाजूला उभा आहे असे पाहून माझ्याजवळ आला आणि मला म्हणाला, " आपण भारतातून आला असावा असे मला वाटते ? "

मी " होय " असे उत्तर दिले. " आपल्याला मार्गात त्रास वगैरे झाला नाही ना ? " त्याने विचारले.

" नाही मी अगदी चांगल्या स्थितीत आलो. " मी सांगितले.

नंतर त्याने मला चिरूट पुढे करून " पाहिजे काय " म्हणून विचारले. " मी चिरूट ओढीत नाही " असे सांगितल्यावर हातातील चिरूट त्याने लपविला. शेवटी म्हणाला, " आपण बंदरात जाणार ? पण सावधगिरी बाळगा. चांगला दुभाषा घ्या. नाहीतर लोक फसवितील. " असे म्हणून जाताना एका चांगल्या माहितीतल्या दुभाष्याला माझ्या स्वाधीन करून गेला.

इंग्रज गृहस्थाच्या वागणुकीत आणि याच्या वागणुकीत किती फरक !

या समुद्रप्रवासातील आणखी एक उल्लेखनीय घटना अशी आहे– बोटीतील प्रवासी आपल्या करमणुकीसाठी म्हणून निरनिराळे प्रकार शोधून काढीत. साहेब आणि मडमा यांच्यात नाचगायन आणि खेळ चालतच होते. आम्ही ' मिर्जापूर ' नावाच्या बोटीने चाललो होतो. त्यातील फर्स्टक्लासच्या उतारूंनी अशा प्रकारच्या नृत्यगान क्रीडेला सुरवात केली. सेकंडक्लासात चीन देशातून आलेले कित्येक इंग्रज मिशनरी कोलंबो बंदरातून चढून आमच्यात मिसळले. त्यांना मी म्हटले, " या. आपण आठवड्यातून एक दिवस सेकंडक्लासात निरनिराळ्या विषयांवर व्याख्याने देण्याचा उपक्रम सुरू करू. पहिल्या वर्गाच्या उतारूंनाही त्यात निमंत्रित करू. " माझा हा उपक्रम सर्वांना मानवला आणि आमची साप्ताहिक व्याख्यानमाला सुरू झाली. त्यातील एक व्याख्यान मला द्यावे लागले. जरी पुष्कळसे उतारू आले नाहीत तरी जे आले होते त्यांनी माझ्या व्याख्यानाबद्दल संतोष प्रकट केला. या निमित्ताने नॉर्वे देशातील एका प्रतिष्ठिताशी माझा परिचय झाला व मित्रत्वही होऊन गेले. आपला फर्स्टक्लास सोडून हे अनेकदा दुसऱ्या वर्गात येऊन माझ्याशी संभाषण करण्यात वेळ घालवीत.

## लंडनातील बिऱ्हाड

शनिवार ता. १९ मे रोजी आम्ही लंडन येथे आलो. दोन दिवसातच मी ब्राह्मसमाजाच्या हितैषिणी मिस् कॉलेट यांना भेटलो. त्या त्यावेळी लंडनच्या उत्तर भागात हायबरी जवळील एका घरात एकट्याच राहात असत. एक मोलकरीण त्यांची सगळी व्यवस्था ठेवी. त्याशिवाय भावाची मुलगीही त्यांच्याकडे राहात असावी. मिस् कॉलेट मला म्हणाल्या, "तू या उत्तर लंडनातच राहण्याची एखादी व्यवस्था कर. म्हणजे दोघांची वारंवार गाठभेट होईल." मी त्यांच्या सांगण्याप्रमाणे उत्तर लंडनातच कॅमडेनस्ट्रीटच्या बाजूला हिलड्रॉपरोड नावाच्या गल्लीत एका कुटुंबात राहण्याची जागा मिळविली व तेथे राहू लागलो.

खोली घेऊन तर बसलो खरा; पण पुष्कळ दिवस मन भारतातच गुंतून राहिले. रस्त्यात सगळीकडे केवळ गोरी माणसे, मी फिरायला निघालो की सर्वजण आश्चर्यचकित होऊन माझ्याकडे बघत राहात. माझी भाषा कुणी समजत नसे आणि मी मेलो की जगलो इकडेही कोणी लक्ष देत नसे. हे सगळे पाहून मी कुठे आलो हा, असे वाटून मन बेचैन होई. हे सर्व मला कसेसेच वाटू लागले. शिवाय स्वदेशातून निघताना जो पाळीचा ताप बरोबर घेऊन आलो होतो तो इंग्लंडला गेल्यावरही कित्येक महिने तसाच होता. तापाने तळमळत खोलीतच पडून राहात असे. कोणी माझ्याकडे ढुंकून पाहणारा मनुष्यही नव्हता. घरातील बायकांपैकी तर कोणीच पुरुषांच्या खोलीत येत नसत. नोकर एक वेळ चहा देऊन जाई तेवढाच.

खेरीज माझ्या मनाला एक प्रकारचा कोरडेपणा, एकाकीपणा वाटे तो वेगळाच. कोलाहलपूर्ण अशा या राजधानीत ईश्वराने जणू काय माझा त्याग केला आहे! अशा स्थितीत बरेच दिवस मी मोठ्या दुःखात घालविले. नंतर काही दिवसांनी बिछान्यात पडल्या पडल्या मी एका गेय पद्याची रचना केली ती अशी—

१ जानलाम ना मा, बुझलाम ना मा, एंदेर रीति केमनधारा,
२ थाक थाक लुकाओ कोथाय, करे आमाय दिशेहारा ?
३ आमि आंचलधरा छेले, जेते हय कि एकला फेले ?
४ मायेर मुख ना देखते पेले, भये छाओयाल हये सारा !
५ यदि बल कि गुण आछे, बाँधा रवे आमार काछे,
६ ( तुमि ) आपनार गुणे आपनि बाँधा, ओ आमार मा चमत्कारा ?

अर्थ– १ आई, तुझ्या वात्सल्याची ही काय रीत आहे, हे मी समजलो नाही आणि जाणलेही नाही.

२ मला असा गोंधळवून टाकून तू कुठे लपून राहतेस ग ?

३ तुझ्या पदराच्या आधाराने राहाणारे मी तुझे लेकरू आहे. असे असताना मला एकटा टाकून तुला जाववते तरी कसे ?

४ आईचे तोंड न दिसल्याने भीतीने तुझे लेकरू व्याकूळ झाले आहे !

५ जर विचारशील की तुझ्याकडे असा कोणता गुण आहे, की ज्याकरिता मी तुझी बांधली राहू ?

६ आपल्याच गुणांनी स्वतः बांधली राहाणारी, अशी माझी चमत्कारिक आई आहेस तू.

ज्या कुटुंबात मला राहायला जागा मिळाली होती, ते कुटुंब इंग्लंडातील मध्यमवर्गातील खालच्या दर्जाचे मानले जाई. त्या कुटुंबातील स्त्रिया सगळा दिवस काबाडकष्ट करून, दरवाजे खिडक्या वगैरेंना लागणारे पडदे तयार करीत आणि ७५ वर्षे वयाचा म्हातारा घरमालक बाप, ते सगळे पडदे नोकराच्या डोकीवर देऊन प्रतिष्ठित गृहस्थांच्या घरात आणि दुकानात विकून यायचा. त्या कुटुंबात केवळ वृद्ध आईवडील आणि तीन मुली होत्या. शिवाय ते कुटुंब आपल्या घरात माझ्यासारखे येणारे पाहुणेही (पेइंग गेस्ट म्हणून) ठेवीत. मी ज्यावेळी तेथे होतो, त्यावेळी त्या घरात माझ्याशिवाय एक जपानी, (त्यानंतर त्याच्याजागी एक रशियन) एक आयरिशमन, व दोन इंग्रज तरुण राहात.

घरवालीने दोन दिवसातच मला चांगले ओळखून घेतले आणि माझ्या कपड्यालत्त्यांकडे ती विशेष लक्ष देऊ लागली. आणि लंडन शहर पाहण्याच्या बाबतीत ठाऊक असाव्या लागणाऱ्या अत्यावश्यक सर्व गोष्टी ती नेहेमी मला सांगू लागली. तिने मला इतके चांगले ओळखले होते की मी चहा प्यायला गेलो की ती हसून म्हणत असे "मिस्टर शास्त्री ! थांबा. थांबा. मी अगोदर तुमच्या गळ्यात बिब* बांधते." मी तिच्या घरात निरुपद्रवावस्थेत व सुखात राहू लागलो. हळूहळू इंग्रज समाजातील बऱ्यावाईट गोष्टींचे मी निरीक्षण करू लागलो.

## इंग्लंडच्या सर्वसाधारण समाजातील गुणदोष

दोष प्रथम सांगून टाकतो. लंडनला गेल्यावर दुसऱ्या दिवशीच बिऱ्हाडाला जागा पाहण्यासाठी म्हणून बाहेर पडलो. एक बंगाली तरुण (कोण ते चांगलेसे आठवत नाही.) माझ्याबरोबर होता. मी पुढे चाललो होतो. तो मागून येत होता. मागूनच तो अकस्मात् मोठ्याने ओरडला, "मोशाय, मोशाय बाजूला सरून उभे राहा. पकडलेच आपणाला." मी मागे वळून पाहिले तो दारूच्या नशेत असलेली एक स्त्री माझ्या गळ्याभोवती असलेली चादर पकडण्याकरता येत

*bib बिब् म्हणजे लहान मुलाचे लाळेरे.

आहे आणि म्हणत आहे, "हिअर इज माय मॅन" दुसरी एक बाई तिला बाजूला ओढण्याचा प्रयत्न करीत आहे. मी हा प्रकार पाहून त्या दोघी दूर गेल्यावर बंगाली तरुणाला म्हटले, "हे आम्ही कुठे आलो रे? हे काय पाहातो आहे?" तो म्हणाला, 'आणखी थोडे दिवस राहा म्हणजे आणखीही अशी अनेक दृश्ये दिसतील.' आणि मग झालेही तसेच. अतिरिक्त मद्यपानाची आणखी अनेक दृश्ये दिसू लागली. स्त्रिया झिंगून किंवा नशेत चूर होऊन तोल सावरू शकत नाहीत, पोलीस त्यांना पकडून नेत आहेत अशीही दृश्ये पाहिली. तेथील वाईट चालीच्या स्त्रिया फार धाडशी. पुरुषांना रस्त्यात पकडून त्यांना त्या घेऊन जात. आम्ही इंग्लंडला पोचण्यापूर्वी काही दिवस असा एक कायदा तेथे जारी झाला होता की, एखाद्या स्त्रीने रस्त्यात किंवा दुसरीकडे कुठे एखाद्या अपरिचित पुरुषाला त्रास दिला आणि त्या पुरुषाने तसे जर पोलिसांना कळविले तर लागलीच पोलिस तिला गिरफदार करतील व कायद्यानुसार तिला सजा होईल. पण परदेशातील काळा मनुष्य त्यांनी पाहिला की त्यांना वाटे येथील हा कायदा याला कुठचा माहीत असणार? आणि त्यामुळे काळ्या माणसाला अशा तऱ्हेने सतावून सोडण्याला त्या मागेपुढे पाहात नसत, भीत नसत. एकदा मी रात्री बऱ्याच उशिरा बिऱ्हाडी येत होतो. गल्लीच्या जवळ असलेल्या एका वळणावर मी येतांच एका स्त्रीने मला "गुड इव्हिनिंग" केले आणि विचारले, "कसं काय ठीक आहे?" मी रीतीप्रमाणे "क्वाईट वेल. थँक यू." असे उत्तर दिले. मला वाटले, दुकानात, पोस्ट ऑफिसात कितीतरी स्त्रिया भेटतात. त्यापैकी कोणीतरी असेल. पण पाहतो तो ती त्यांपैकी नव्हती. ती मला पुनः म्हणाली, "डू यू वॉंट ए स्वीट हार्ट?" बोलता बोलता माझा हात आपल्या काखेत धरून ती माझ्या बरोबर चालू लागली. मी घृणेने तिच्या हातून माझा हात सोडवून घेऊन म्हटले, "तू असतेस कुठे? रात्री अपरात्री अशी फिरतेस का?" यावर तिने मला जे उत्तर दिले आणि माझ्याशी ज्या तऱ्हेचे वर्तन केले, त्याची आठवण करायलाही मला लाज वाटते. मी लागलीच तिचा हात झिडकारून घाईघाईने बिऱ्हाड गाठले. तरीपण काही वेळ ती माझ्या बरोबर चालत राहिलीच. अपरिचित पुरुषाशी स्त्रीची अशा प्रकारची धाडशी वागणूक मी यापूर्वी कधी पाहिली नव्हती. आमच्या देशातील तरुण अशा ठिकाणी येऊन कोणत्या संकटात पडत असतील देव जाणे!

रात्र वाढत चालली की लंडनचे रस्ते एक वेगळेच रूप धारण करतात. त्यांचा मुखवटाच बदलतो. जो पाहावा तो झिंगलेला! रात्री ११ वाजल्यानंतर कोणा एखाद्या दूरच्या ठिकाणाहून रेल्वेने घरी यावे लागले तर मला असे दिसून येई की स्टेशनात तिकीटविक्री करणारा नशेत चूर, स्टेशनचा जो मनुष्य (पोर्टर) गाडीचा दरवाजा उघडायला येई तोही झिंगलेला. त्याला धड उभेही राहता येणे

कठीण. जे एकमेकांबरोबर एका डब्यात येऊन बसत ते स्त्री-पुरुष नशेतच असायचे. उतरून ट्रॅममध्ये बसलो पण तेथेही कोण कुणाच्या अंगावर रेलून पडेल याचा नेम नाही. ज्याच्याशी बोलावे त्याच्या तोंडाला दारूची घाण पाहून मनाला वाटे, एवढ्या मोठ्या या जातीत हा पिण्याचा जर दोष नसता तर यांनी आणखीही कितीतरी महत्त्वाची कामे केली असती !

चोहोकडेच इंग्रज जातीची ही मद्यासक्ती मला आढळे. कुठे रस्त्याच्या बाजूला पाहिले तो आमच्या देशातील धान्याचे डोंगरासारखे ढीगच्या ढीग दिसले. मुद्दाम उभा राहून हे असे ढीग असण्याचे कारण विचारले तेव्हा समजले की या धान्यापासून मद्य तयार करण्यात येते आणि गाळ फेकला जातो, त्याचे हे डोंगर. ते पाहून वाटले, आई ग ! अन्नाच्या अभावामुळे आमच्या देशातील हजारो गरीब लोक उपासांनी मरत आहेत आणि त्यांच्या तोंडचे अन्न काढून आणून हे लोक त्याचा असा दुर्व्यवहार करीत आहेत !

ज्या घरात मी राहात होतो त्या घरचा मुख्य पुरुष वृद्ध. तो, त्याची पत्नी आणि तीन मुली हा त्याचा परिवार. जेवणाच्या वेळी त्या स्त्रियांना मद्यपान करताना मी पाहिले नाही पण त्यांचा म्हातारा बाप प्रत्येक दिवशी सायंकाळी जेवणानंतर त्या जेवणाच्या जागीच बसून रात्री सुमारे बारा वाजेपर्यंत वाचन करीत असे. इकडे वाचन चालू असायचे आणि वारंवार मद्यपान करायचे हा त्याचा क्रमच. त्यासाठी त्याच्या हाताशी एक लहानसा धान्यापासून बनविलेल्या मद्याने भरलेला मद्यकुंभ असायचा. वाचन संपता संपता तो मद्यकुंभही जवळजवळ रिता व्हायचा. झोपायला जाताना मी कधी एखादे दिवशी त्याच्याशी बोलू लागलो तर मद्याच्या नशेमुळे त्याच्या आवाजातही बदल झालेला जाणवायचा.

ते काही असले तरी या परिवारात धार्मिकतेचा प्रभाव चांगलाच होता. रोज सकाळी ही सर्व कौटुंबिक मंडळी उपासना करीत. आणि रविवारी नियमितपणाने उपासनामंदिरात जात. त्या वृद्ध पुरुषाचा धर्माकडे विशेष ओढा असलेला मला जाणवे. तो रविवारी धर्मोपदेश ऐकण्यासाठी चांगल्या चांगल्या उपासना मंदिरात मला नेत असे. मी भारताला परत येताना मला त्याने एक पुस्तकही भेट म्हणून दिले होते. बोटीवर आल्यानंतर पाहिले तो ते एक दैनिक उपासनेचे पुस्तक होते. त्यात अनेक साधुसंतांच्या उक्ती दिलेल्या होत्या. पुस्तकाच्या प्रारंभीच त्या वृद्धाने स्वतः एक प्रार्थना लिहिली होती. तिचा सारांश असा– ‘ हे प्रभो, ज्याप्रमाणे एकदा दमास्कसला जाणाऱ्या पॉलसमोर स्वतः प्रगट झालास, त्याप्रमाणे आपल्या देशात पोचतो न पोचतो तोच या धर्मप्रेमी मनुष्यासमोर स्वतः प्रगट हो. याला तुझा प्रकाश दिसू दे ! ’ असल्या साधुसदृश मनुष्याला ते सुरापानाचे व्यसन !

एकदा जेवणाला बसलो असता त्या वृद्ध मनुष्याला मी म्हटले, ‘आपण बायबलातील प्रत्येक गोष्ट बिनचुक आहे असे मानता आणि त्यावर आपली श्रद्धा आहे ? ’

" होय. ते तर खरेच आहे. " त्याने उत्तर दिले.

" ठीक आहे, आदम नावाचा एक, मानवाचा आदिपितामह होता आणि त्याची अवस्था पूर्ण निष्पाप होती असाही आपला विश्वास आहे. ? "

" होय तसा विश्वास आहेच. "

असे त्याचे उत्तर मिळाल्यावर मी म्हटले, ' ठीक आहे. या निष्पाप पूर्णावस्थेत आदम मद्यपान करीत असे की नाही ? '

त्याने चटकन सांगितले, " नाही. त्यावेळी मद्याचा शोधच लागला नव्हता " मीही तितक्याच तत्परतेने विचारले, " तर मग असे आढळून येते, की मद्य हे मनुष्याच्या पतितावस्थेतील पेय असावे ? "

मी असे विचारताच तो वृद्ध पुरुष माझ्यावर रागावला आणि भलतेसलते काहीतरी बोलू लागला. मी, त्याची पत्नी आणि मुली सर्वच हसू लागलो.

## लंडनमध्ये मद्यपानविरोधी चळवळ

एकंदरीत सांगायचे म्हणजे कोणाही इंग्रजाशी थोडीबहुत ओळखदेख व बोलीभाषण होताच मी त्याला मद्यपानाविरुद्ध भडकावण्याचा प्रयत्न करीत असे. एकदा कित्येक प्रतिष्ठित गृहस्थ आणि स्त्रिया यांनी स्थापिलेल्या कामकरी वर्गाच्या सभेला मी उपस्थित राहिलो. त्या दिवशी चर्चेचा विषय, ' मद्यासक्ती ही अनैतिक आहे ' हा होता. मी मद्यपानाचा विरोधक असल्यामुळे त्यांनी मला या सभेचे निमंत्रण दिले होते. ' राष्ट्रीय मद्यासक्तीच्या अनिष्टते ' वर जेव्हा वक्ते बोलू लागले तेव्हा माझे अन्तःकरण विस्मय आणि घृणा या दोन भावनांनी भारून गेल्यासारखे झाले. शेवटी त्यांनी मला चार शब्द बोलण्याची विनंती केल्यावरून मी बोलू लागलो, ' तुम्ही तोंडाने फक्त ' सुरापान निवारण ' ' सुरापान-निवारण ' असे बोलत आहा. पण मी तर तुम्ही सुरासागरात बुडून गेल्याचे पाहात आहे. तुम्हाला रस्त्यातील मद्यविक्रेत्याचा गुत्ता हे सर्वश्रेष्ठ घर वाटते. जणू काय सर्वसाधारण माणसाची ती बैठकीचीच जागा. प्रतिष्ठित गृहस्थांना तेथे जायला लाजशरम वाटत नाही. परंतु आमच्या देशातील सभ्य लोक दारूच्या दुकानात कधीही जात नाहीत. फक्त हलक्या दर्जाचे लोकच तेथे जातात, ज्या देशाच्या पूर्वजांनी मद्यपानाची महा पातकात गणना केली आहे त्या देशातून मी आलो आहे.' बोलता बोलता मी मनूचे ' ब्रह्महत्या सुरापानं स्तेयं.' वगैरे वचने उद्धृत केली. इतकेच काय पण आमच्या पूर्वजांची एक म्हण सांगितली की, ' माजलेला हत्ती पिसाळलेल्या स्थितीत अंगावर चालून आला तर हत्तीच्या पायाखली चिरडून मरण पत्करावे पण मद्यगृहात मद्य घेऊ नये. ' ही मी दिलेली सगळी वचने ऐकून उपस्थित पुरुष आणि स्त्रिया आ वासूनच राहिल्या आणि एकमेकांच्या तोंडाकडे पाहू लागल्या. मी पुढे आणखी सांगितले, " आमच्या देशात अशी लक्षावधी कुटुंबे आहेत. उदाहरणच

द्यावयाचे तर माझे स्वतःचे कुटुंब की ज्यांनी आपल्या चौदा पिढ्यांत कोणत्याच प्रकारचे मद्य पाहिलेलेसुद्धा नाही. असा देश तुमच्या सरकारच्या ताब्यात आल्या-वर त्याला या ना त्या मार्गाने मद्यपानाची चटक लावली जात आहे आणि हजारो दारूची दुकाने उघडली जात आहेत !" हे वाक्य मी उच्चारताच चोहोकडून ' शेम् शेम् ' असा उच्चार होऊ लागला.

**दुष्ट लोकांच्या तावडीत**

एके दिवशी उत्तर लंडनमधील माझ्या खोलीतून मी कुमारी कॉलेटला भेटण्याकरिता जात होतो. रस्त्यात एक मनुष्य एक छापील पत्रक घेऊन माझ्या-कडे आला आणि म्हणाला, ' बोट समुद्रात बुडाली आहे. यात ती सगळी माहिती आहे. आपण घेणार ? ' मी सांगितले, " वर्तमानपत्रात यापूर्वीच मी ती सर्व माहिती वाचली आहे. " मग तो आपल्या दारिद्र्याची हकीगत मला सांगू लागला म्हणाला, " आम्ही दोघे नवराबायको अगदी मोठ्या संकटात आहो. कसे दिवस घालवावे ही आम्हाला पंचाईत पडली आहे. अनेक दिवस उपाशीपोटी गेले. आपण जर सहाय्य कराल तर फार उपकार होतील. " त्याची ती दुःखकारक परिस्थिती ऐकून मला वाईट वाटले आणि याला काहीतरी द्यावे असेही मनात आले. पण त्याच्या तोंडाला दारूची घाण येत होती. तेव्हा मी त्याला म्हटले, " तुला काही मदत करावी असे मला वाटते. करूही शकेन पण तुम्ही फार दारूबाज लोक. तुमच्या हाती पैसा कोण देईल ! दिला तर घरच्या बायकोच्या हाती न जाता दारूच्या दुकानात जाणार हे ठरलेले. यासाठी मनात देण्याची इच्छा असूनही देववत नाही. " यावर तो म्हणाला, " या रस्त्याच्या बाजूला जवळच असलेल्या गल्लीत मी राहतो. तेव्हा आपण माझ्या घरी माझ्या स्त्रीकडे चला. तिला विचार-ल्यास सगळी परिस्थिती कळेल. "

मी पूर्वीच वर्तमानपत्रात वाचले होते की, लंडनच्या या ईशान्येच्या भागात अनेक दुराचारी लोक राहतात. नेहमीच इकडे चोऱ्या, मारामाऱ्या, लूट, हत्या होत असतात. वेळोवेळी मार्गस्थाला फूस लावून हे लोक आपल्याकडे नेतात आणि त्याचे सर्वस्व काढून घेतात. नंतर त्याचे डोळे बांधून निरनिराळ्या गल्लीतून वेड्या-वाकड्या वळणांनी फिरवीत दुसऱ्याच एका रस्त्यात आणून सोडतात. दयेच्या स्वाभाविक अतिरेकामुळे त्यावेळी मला या वृत्तांताची आठवण झाली नाही. मी त्याच्या मागून चालले. मला तो एका गल्लीतून दुसऱ्या गल्लीत असा घेऊन गेला. शेवटी एका घरातील एका खोलीत मला घालून म्हणाला, " माझी बायको घरात नाही. तुम्ही येथे बसा. मी तिला बोलावून आणतो. " असे म्हणून तो बाहेर निघूनही गेला. मी संकटग्रस्त अशा जागी आलो आहे हे त्यावेळेपर्यंत माझ्या ध्यानातच आले नाही. त्याच्या बायकोची परिस्थिती ऐकून घ्यावी, तिचे सांत्वन करावे आणि काही पैसे तिच्या हाती द्यावे याच भावनेत मी मग्न.

मी तेथे बसून आहे, तोच काही वेळाने तीनचार बलिष्ठ लोक खोलीच्या दारासमोर येऊन आत डोकावून पाहात आहेत आणि आपसात काही सल्लामसलत करीत आहेत असे मला दिसून आले. आणि मग त्याचवेळी मी वर्तमानपत्रात वाचलेल्या त्या हकीगतीचे मला स्मरण झाले. लागलीच मी उठलो आणि बाहेर येऊन वेगाने रस्त्याकडे जायला निघालो. दारातच त्या लोकांनी मला अडविण्याचा प्रयत्न केला. ते माझ्या हाताला धरतात न धरतात तोच मी त्यांना झुकांडी देऊन धावतच रस्त्यावर आलो आणि पाहिले तो, रस्त्याच्या पलीकडून माझ्याकडे पाहात पाहात तो मला घेऊन आलेला मनुष्य धावत धावत माझ्याकडे येत असलेला दिसला. तो मला येता येता ओरडून सांगत होता, "उभे राहा. उभे राहा. माझी पत्नी येत आहे." मी म्हटले, "तुझ्या बायकोची वाट पाहात बसण्याला मला वेळ नाही. मी निघालो." तो माझी पाठ सोडीना. तेव्हा मी म्हटले, "तुला काही देतो असे सांगितले ना, तुला मी ते देतो. तू माझ्याबरोबर येऊ नकोस." आणि मग त्याच्या हाती काही पैसे देऊन कुमारी कॉलेटच्या घरी गेलो. तिच्याकडून बोलूनही फार घेतले. ती म्हणाली, "तू वर्तमानपत्रात वाचले आहेस, लोकांच्या तोंडूनही ऐकले आहेस की या बाजूला दुष्ट लोक राहातात. तरी तू सावध झाला नाहीस. मोठे आश्चर्य वाटते मला! शिवाय जिवाच्या भीतीने जर तू पळत सुटलास तर त्याला आणखी पैसे देण्याचे कारण काय? दयाधर्माला काय दुसरी जागा नव्हती?" मी काय बोलणार! खाली मान घालून तिचे ते वाक्ताडण मी मुकाट्याने सहन केले.

### इंग्रजांच्या दृष्टीने

ते काही असले तरी चांगल्या गोष्टीही मी पुष्कळ पाहिल्या. त्यातील काही आठवतात त्यांचा येथे उल्लेख करतो. एकदा कुठेतरी जाण्याच्या हेतूने म्हणून ट्रॅममध्ये बसलो. गाडी बहुतेक उतारूंनी भरलेली होती. बसलेल्यांत एकजण इतका प्यालेला होता की त्याच्याने धड बसवतही नव्हते. इतक्यात असे पाहिले की दोन सभ्य स्त्रिया गाडीत चढत आहेत. त्या देशात असा रिवाज आहे की, गाडीत बसण्याला जागा नसेल तर पुरुषांनी उठून स्त्रियांना बसण्याला जागा द्यावी. त्याप्रमाणे मी आणि दुसरा एक पुरुष उभे राहून त्यांना जागा देत आहो इतक्यात तो नशेने धुंद झालेला माणूस झोकांड्या जात असताही उठला आणि उभे राहण्याचा प्रयत्न करू लागला. गाडीत बसलेले लोक म्हणाले, "तू बसून राहा. ते उठत आहेत." पण त्याने ते ऐकले नाही. तो झिंगलेल्या आवाजात म्हणाला, 'नो! लेडीज.' म्हणजे 'तसे होणार नाही. सभ्य स्त्रिया आहेत त्या!' त्यावरून मला कळून आले की, जो बेहोष त्यालाही स्त्रियांना असा मान देण्याची जाणीव आहे.

स्त्रियांना मान देणे हे इंग्रजाच्या चारित्र्याचे एक मुख्य लक्षण आहे. त्या देशात असतानाच एकदा ऐकले की, एका सुटीच्या दिवशी क्रिस्टल पॅलेसमध्ये शंभरापेक्षा जास्ती मजूर कसल्याशा एका विषयावरून मोठ्या मारामारीला उद्युक्त झाले. होते. थोड्या वेळाने तेथे एक आजारी दिसणारी, किरकोळ देहयष्टी असलेली स्त्री त्यांच्यात मध्यस्थी करायला आली आणि ती होणारी मारामारी तिने थांबविली. ती लोकांत मधून मधून त्यांची परिस्थिती समजावून घेण्यासाठी आणि त्यांच्या उन्नतीचा प्रयत्न करण्यासाठी येत असे.

## इंग्रजांच्या वागणुकीतील सत्याची आवड आणि फसवणुकीबद्दल तिरस्कार

प्रथम स्थूलमानाने लोकांच्या चारित्र्याबद्दल सांगतो. त्यांच्यात विशेष म्हणजे सत्यपरायणता फार आढळते. ते असत्याचा तिरस्कार करतात आणि कुणाची फसवणूक करायलाही तयार होत नाहीत. अमुक एक काम करायचे असे त्यांनी एकदा ठरविले की ते चांगल्या प्रकारे करण्याचाच ते प्रयत्न करणार. ते दुसऱ्यांच्या सांगण्यावर सहज विश्वास ठेवतात. कुणी त्यांना फसविण्याच्या उद्देशाने सांगितले तरी त्यांच्या लक्षात येत नाही. पण नंतर याने आपली फसवणूक केली, असे लक्षात येताच ते त्याच्यावर खूपच रागावतात आणि त्याला चोपूनही काढतात.

सेनापती गॉर्डनचे चरित्र वाचताना एक घडलेली गोष्ट त्यात वाचल्याचे मला स्मरते, ती अशी : गॉर्डन फार दयाळू मनुष्य होता. एकदा एक फसव्या माणूस भिकाऱ्याचे सोंग घेऊन त्याच्याकडे आला आणि बनावट नकली गोष्ट सांगून त्याच्याकडे भिक्षा मागू लागला. त्याला पाहून आणि त्याचे दारिद्र्य-कथन ऐकून गॉर्डनला दया आली. त्याने त्याला भरपूर दान दिले. हेतू हा की तो त्याने वर्णन केलेल्या संकटातून लवकर मुक्त व्हावा. दोन दिवसांनी गॉर्डनने ऐकले की, तोच मनुष्य पाच सहा मैलांवर असलेल्या दुसऱ्या कोणत्याशा ठिकाणी आणखी एक अशाच प्रकारची कळवळा आणणारी गोष्ट सांगून याचना करीत आहे. हे ऐकून गॉर्डनला त्याचा इतका राग आला की तो हातात चाबूक घेऊन, पाच सहा मैल चालत त्याला मारायला गेला. तेथे गेल्यावर त्याला शोधून काढले आणि चांगले झोडपले. मात्र स्वतः त्याने त्याला दान म्हणून जे रुपये दिले होते ते परत घेण्याची त्याला आठवण राहिली नाही. या वागणुकीने गॉर्डनने ब्रिटिश जातीच्या चारित्र्याचे एक चांगले लक्षण व्यक्त करून दाखविले असे म्हटले पाहिजे.

## इंग्रजांची कर्तव्यबुद्धी

येथील सर्वसाधारण लोकांत सत्यप्रियता आणि कर्तव्यपरायणता ही

स्वाभाविक असलेली आढळते. त्याचे एकदोन दृष्टांत मला आठवतात ते सांगतो. एकदा मिस मॅनिंग हिने मला, नॅशनल इंडियन असोसिएशनच्या एका पार्टीने निमंत्रण दिले. मी जायचे ठरवून तयारी करीत आहे, इतक्यात माझी घरवाली मला म्हणाली, " तुमची पॅंट, पार्टीस जाण्याला योग्य अशी नाही. तुम्ही एक नवा कोट आणि नवी पॅंट शिवून घ्या. "

मी म्हटले, " आणखी सातच दिवसांनी पार्टी आहे. तेवढ्यात कोट पॅंट तयार होऊन मिळेल ? "

घरवाली म्हणाली, " थांबा, मी एका शिंप्याला बोलावून आणते. मला वाटते तो तेवढ्या मुदतीत करून देईल. "

तिने बोलाविल्याप्रमाणे योग्य वेळी एक शिंपी आला आणि तो माझे माप घेऊन गेला. जाताना त्याने, ठराविक वेळी कपडे आणून देण्याचे वचन दिले. दोन दिवसांनी त्याची पत्नी कोटपॅंटचे कापलेले कापड घेऊन आली आणि म्हणाली, " आपले काम करून देण्याचे मान्य करून गेल्यावर माझ्या नवऱ्याला स्कॉटलंडहून एक मोठ्या कामाची ऑर्डर आली. पुष्कळ दिवसांपासून या ऑर्डरची बोलणी चालली होती. अर्थात् हा सौदा पटल्यामुळे त्यांना गेलेच पाहिजे. आम्ही आपले कापड बेतून थोडी शिलाईही केली आहे. पण आता कोणा दुसऱ्या शिंप्याला बोलवून उरलेले काम करून घ्या. " असे बोलून ती निघाली. केलेल्या शिलाईचे व कापड बेतल्याचे ती पैसे घेऊ इच्छित नव्हती. मी मनात म्हटले, माझी गैरसोय होऊ नये म्हणून हिला केवढी काळजी ! आमच्या देशातील श्रमिक लोकांत ही दक्षता आणि कर्तव्यबुद्धी सहसा आढळत नाही.

दुसरी घटना घडली ती अशी : मी मायदेशी परत निघालो त्यावेळी घरवालीने एका मनुष्याला बोलावून आणले. तो माझी पुस्तके वगैरे सामान आणण्यासाठी पॅकिंग केस करून देणार होता. त्याला पॅकिंग बॉक्स, पत्र्याने कशा प्रकारे आच्छादित केली पाहिजे म्हणजे बोटीत त्या बॉक्समध्ये पाणी शिरू शकणार नाही ते समजावून सांगितले. माझ्या कल्पनेप्रमाणे बॉक्स कशी असावी हे त्या माणसाला समजावून द्यायला मला वेळ लागू लागला. मी हे सर्व त्याला समजावून देत असता, एक शब्दही न उच्चारता आ वासून तो माझे बोलणे ऐकून घेत होता. त्याचा तोंडावळा पाहूनच मी जाणले की, मी ज्या बारीकसारीक गोष्टी सांगत आहे त्या तो मनःपूर्वक आत्मसात करण्याचा प्रयत्न करीत आहे. जेव्हा त्याची पूर्णपणे समजूत पटली तेव्हा, ' तुम्ही सांगता तशी पॅकिंग केस मी तयार करून देईन. आणि उद्या बारा वाजता आणीन ' असे सांगून तो गेला. आम्ही जेवणानंतर पॅकिंगला आरंभ करावा असे ठरले. त्याप्रमाणे दुसऱ्या दिवशी माझे दुपारचे जेवण आटोपून घड्याळात ११ वाजून काही मिनिटे होतात न होतात तोच पॅकिंग बॉक्सचा आवाज मी ऐकला. उठून जाऊन पाहतो तो त्याने सुन्दर बॉक्स

करून आणली असल्याचे आम्हाला दिसले. कोणताही दोष त्यात राहिला नव्हता. यावरून इंग्रज कारागीर ज्या कार्याची जोखीम पतकरतो ते कार्य परिश्रमपूर्वक करण्याची तत्परता राखतो त्यातच तो तन्मय होतो. ते जितके चांगले होऊ शकेल तितके तो करतो, असे मला दिसून आले.

त्या ठिकाणच्या सामान्य लोकांची अशी सत्यपरायणता व सातत्य यामुळे या देशात अशी पुष्कळ कामे चालू आहेत, की जी आपल्या देशात दोन दिवसही चालणार नाहीत. याविषयी आणखी एका गोष्टीचा मी उल्लेख करतो.

## इंग्लंडची सर्क्युलेटिंग लायब्ररी

मी तेथे हे पाहिले की, सुशिक्षित देशहितैषी व्यक्तींच्या मनात, खालच्या वर्गाला साक्षर करून त्यांच्यात शिकण्याची गोडी व उत्साह निर्माण करण्याची हौस फार आणि त्यामुळेच या वर्गाच्या अन्तःकरणात ज्ञानसंपादनाची आवड दिवसेंदिवस वाढत आहे. आणि त्यांच्या उपयोगासाठी चोहोकडे असंख्य लहान-लहान पुस्तकालये स्थापन झाली आहेत. बहुतेक राजरस्त्यावर दहापाच घरांच्या अंतराने एखादे लहानसे पुस्तकालय असायचेच. खालच्या वर्गातील माणसे त्या ठिकाणी नाममात्र वर्गणी देऊन आठवड्याच्या आठवड्याला पुस्तके घेऊन जातात आणि घरी बसल्या बसल्या वाचून ती पुस्तके परत आणून देतात. यांपैकी बरीचशी पुस्तकालये दुकानाच्याही खोलीत ठेविली जातात. दुकानदार इतर जिनसांची देवघेव करीत असतानाच एका बाजूला ठेवलेल्या या पुस्तकालयातून आपल्या मिळकतीत भर घालीत असतो. यांखेरीज अल्प किंमतीत मिळणाऱ्या पुस्तकांची दुकानेही खूप आहेत.

अशाप्रकारच्या एका पुस्तकालय असलेल्या दुकानात जाऊन एके दिवशी मी जे पाहिले आणि ऐकले ते मनात राहिले आहे. दुसऱ्या एका कामासाठी म्हणून त्या दुकानात मी गेलो असता, एका बाजूला दोन कपाटांत काही पुस्तके ठेविलेली मला दिसली. मला वाटले, ही कमी किंमतीने विकली जाणारी पुस्तके असावीत. मी विचारले, "ही सर्व पुस्तके काय विक्रीसाठी ठेविली आहेत ?"

"नाही. ही सर्क्युलेटिंग लायब्ररी आहे" मला त्याने उत्तर दिले.

"ही सर्व पुस्तके कोण घेतात ! " मी प्रश्न केला.

"या भागातील खालच्या वर्गातील लोक." उत्तर मिळाले.

"मला घेता येईल का एखादे पुस्तक ?" मी विचारले.

"अवश्य. सर्वसाधारण लोकांसाठीच ही आहेत." त्याने सांगितले.

नंतर मी सहासात रुपये किंमतीचे एक पुस्तक घेतले आणि त्याच्या हातावर दोन आण्यांचे पैसे ठेवून माझे नाव पत्ता लिहिला आणि आलो. नंतर आठवड्याने ते पुस्तक परत देऊन आणि दोन आणे भरून दुसरे एक पुस्तक

घेऊन आलो. अशाप्रकारे तीनचार आठवडे झाल्यावर एके दिवशी जाऊन विचारले, " हा व्यवसाय तुम्ही किती दिवसांपासून चालविला आहे ? "

" गेली आठनऊ वर्षे. " उत्तर मिळाले.

" मधून मधून तुम्हाला तोटाही सहन करावा लागत असेल ? " मी विचारले.

" तो कसा ? " त्याने प्रश्न केला.

मी सांगितले, " लंडनसारख्या बड्या शहरी मनुष्य एका भागातून दुसऱ्या भागात राहायला गेला तर तपास लागणे कठीण. समजा, पुस्तक परत न करताच तो दुसरीकडे गेला तर पुस्तक कसे मिळणार ? "

माझा हा प्रश्न ऐकून तो आश्चर्यचकित होऊन म्हणाला, " तसे कसे होईल ? हे पुस्तक आमचे आहे. बिऱ्हाड बदलताना त्याने हे पुस्तक आम्हांला देऊनच गेले पाहिजे. "

" समजा. त्याने दिले नाही तर ? " मी मुद्दामच प्रश्न केला. त्याने हसून म्हटले, " अहो, तसे होणारच नाही. "

पुस्तक न देता कोणी जाईल अशी ते मुळी कल्पनाच करू शकत नाहीत.

**इंग्लंडात अन्यायाचा उघड विरोध**

पुष्कळसे खालच्या वर्गातील लोक कोणत्याही उपासनेच्या जागी जात नाहीत. हा अभाव दूर करण्यासाठी, मी तेथे जाण्यापूर्वी काही दिवसांपासून एका कामाला सुरवात झाली होती. वेगवेगळ्या खिस्तीय संप्रदायांचे प्रचारक व उपदेश देणारे यांनी रविवारी सकाळी आणि सायंकाळी, रस्त्याच्या वळणावळणावर आणि बागबगीचा इत्यादींच्या झाडाखाली लोक जमतात तेथे उपासना व उपदेश करण्याला आरंभ केला होता. मी अनेकदा या सर्व उपासनांच्या जागी उपस्थित राहात असे. खालच्या वर्गातील स्त्रीपुरुष बहुसंख्येने उभे राहून ती उपासना पाहात असत आणि उपदेश ऐकत असत हे मी पाहिले होते. दुसरीकडे कुठे कुठे असेही आढळे की धर्मप्रचारकांची ही पद्धत पाहून राजकारणातील पक्षीय लोक व ब्रॅडला दलातील नास्तिक लोक आपले म्हणणेही त्या लोकांना ऐकविण्यासाठी तेथे येत. मला तो मोठा कुतुहलाचा प्रकार वाटे. एका झाडाखाली एक खिस्तीय उपदेशक बायबलचे पुस्तक उंच धरून सांगत असे, " पाहा, हा ग्रंथ ईश्वरदत्त आहे. या ग्रंथातून तुम्हाला दुर्बलतेत सामर्थ्य, निराशेत आशा, शोकात सांत्वन, आणि संकटात आधार अवश्य मिळेल. " दुसरीकडे थोड्या अंतरावर त्याच वेळी ब्रॅड्लॅचा एक शिष्य मोठ्याने ओरडून सांगत असायचा, " बायबल हा मनुष्याने लिहिलेला ग्रंथ आहे, भ्रमप्रमादपूर्ण आहे. ईश्वर म्हणून कोणी कुठे आहे याला आधार काय ? तुम्ही बुद्धिजीवी प्राणी. विचार, चिंतन, मनन करून पाहून अनुभवून जे काम करायचे ते करा." मी ज्यावेळी इंग्लंडात होतो त्यावेळी राज्यकारभार टोरीपक्षाच्या

हाती होता. कोणी एक वक्ता, टोरी सरकारच्या कारभारावर टीका करीत आहे, ते सरकार अन्यायाने राज्य चालवीत आहे असे म्हणत आहे ! दुसऱ्या बाजूला पाहातो तो कोणी एक मळलेल्या फाटक्या पोषाखात अनवाणी असलेला सुतार की लोहार कोणीतरी, ज्याच्या हातांच्या बोटांना घट्टे पडले आहेत, चेहेरा लालबुंद झाला आहे असा, डाव्या हातावर उजव्या हाताची मूठ आपटून चवताळून म्हणत आहे. ' दि टोरीज आर रास्कल्स !' ( टोरी तेवढे बदमाश ). ज्याला जे अन्याय्य, असत्य वा अधार्मिक वाटते त्यावर त्याचा केवढा राग हा ! खालच्या वर्गातील लोकांच्या अनेक सभांना उपस्थित राहून पाहात असे, की त्यांना जे अन्याय्य वाटते त्याचा ते मनःपूर्वक आवेशाने विरोध करतील; तसेच त्यांना जे योग्य वाटते त्यात ते जिवाभावाने सामील होतील. सारांशाची गोष्ट अशी की या खालच्या वर्गातील लोकांचा हा आवेश व अन्यायाबद्दलची चीड म्हणजे यांच्या अन्तःकरणातील, धर्मावर गाढ श्रद्धा असल्याची खूण होय.

कोणा एखाद्या शिंप्याच्या दुकानात जाऊन जेव्हा त्याला मी कपड्यांची ऑर्डर देऊन येतो तेव्हा माझी निश्चित खात्री असते की, तो पोषाख मला ठरलेल्या वेळी मिळणारच. वचन न पाळणे, कामाला आरंभ करून, जोखीम पत्करून त्यात चुकारपणा करणे, सहज गोष्टीत फसवणे या सगळ्या गोष्टींचा त्या देशातील सर्व-साधारण लोकांना तिटकारा आहे. ते तसल्या गोष्टीकडे अत्यंत तिरस्काराने पाहातात.

## लोककल्याणाची आवड

यानंतर पाहिले, ज्याप्रमाणे एका बाजूला दारिद्र्य आहे, दुर्नीती आहे, विविध प्रकारचे सामाजिक पाप आहे त्याप्रमाणे दुसऱ्या एका बाजूला, हे सर्व नाहीसे करण्यासाठी शेकडो व्यक्तींचे हात पुढे झालेले आहेत. पाश्चात्य जगातील इतर खिस्ती देशात मी गेलो नाही त्यामुळे त्या सगळ्या देशांतील लोककल्याणेच्छू अशा स्त्रीपुरुषांनी काय काय केले आहे त्याची मला विशेष माहिती झाली नाही. पण इंग्लंडात मनुष्यमात्राच्या हितासाठी म्हणून केलेल्या अगर करण्यात येणाऱ्या ज्या गोष्टी मी पाहिल्या त्या चकित करणाऱ्या अशा, मला वाटल्या. मानवी-बुद्धीत लोकहित साधणाऱ्या इतक्या प्रकारच्या योजना सुचतात व कृतीत येतात हे परमाश्चर्यच म्हणायचे. त्या सर्वांचा नामनिर्देश किती म्हणून करावा ? असंख्य म्हटले तर तीही अतिशयोक्ती होणार नाही. लंडनमध्ये डॉ. बर्नार्डोची आणि ब्रिस्टल येथे भक्तसाधू जॉर्ज मूलर महाशयांची अनाथाश्रम वाटिका जेव्हा मी पाहिली तेव्हा विस्मित होऊन विचार करू लागलो, की ईश्वरभक्ती, लोककल्याणेच्छा आणि कार्यदक्षता यापैकी कोणत्या गुणाची अधिक प्रशंसा करावी ? त्यानंतर श्रमजीवी लोकांच्या इन्स्टिट्यूट, पीपल्स् पॅलेस, कामकऱ्यांचे

रविवार विद्यालय, पूअर हाऊस वा दरिद्री लोकांसाठी आश्रमवाटिका वगैरे जे जे माझ्या पाहण्यात आले ते ते पाहून मी नवलाईने अगदी भारावूनच गेलो. विशेष काय सांगू, इंग्लंडमध्ये असताना हे सर्व पाहणे हेच माझे एक मुख्य कर्तव्य होऊन बसले होते.

## शिशुरक्षिणी सभा

इंग्रज जातीने लोकहितकारी अशा ज्या ज्या कार्यांचा उपक्रम केला आहे त्यांपैकी काहींचा येथे उल्लेख करतो. मी ज्यावेळी तेथे होतो त्यावेळी अशा तऱ्हेची तीन प्रकारची कार्ये मी ऐकली. पहिले, मिस्टर बेंजामिन या नावाच्या एका पादरी गृहस्थाने एके दिवशी कोणा एका शहराच्या हमरस्त्यावरून जाता जाता एक मुलगा रस्त्यात उभा असलेला पाहिला. त्याच्या तोंडावर जखमांचे अनेक व्रण होते आणि ते सुजलेले होते. त्याने त्या मुलाला विचारले, तेव्हा तो म्हणाला, "माझ्या आईने आणि वडलांनी मला दारूच्या धुंदीत खूप मारले." तेव्हा मग मिस्टर बेंजामिन यांच्या मनात प्रश्न उत्पन्न झाला, 'तर मग आई-वडलांच्या हातूनही असहाय मुलांचे व मुलींचे रक्षण करणे अवश्य आहे!' आणि याच विचारात मग्न होऊन तो घरी गेला. त्याच्या मनावर परिणाम झालेला हा विषय त्याच्या मनातून जाईना. त्याने आपल्या मित्रमंडळींतही यासंबंधाने चर्चा केली. शेवटी या सर्वांचा परिणाम म्हणून शिशुरक्षिणीसभा नावाची एक संस्था स्थापन झाली. शेकडो लोक या सभेचे सदस्य झाले. आणि पाहाता पाहाता या कार्याला लोकोपयोगी विराट संस्थेचे स्वरूप आले. त्यानंतर या संस्थेच्या सभासदांनी या काही वर्षांत मोठेच कार्य करून दाखविले. इतकेच नव्हे तर अशा या असहाय मुलांच्या संरक्षणाचा पार्लमेंटकडून एक कायदाही पास करून घेतला. या कायद्याने मुलांशी निर्दयतेने वागणाऱ्या आईवडिलांना शिक्षाही होऊ शकते. इंग्लंडसारख्या नशाखोर देशात अशा कायद्याची अतिशय जरूरी आहे.

## कामकरी स्त्रियांची रिकाम्या वेळातील करमणूक

आणखी एका कार्याची आवश्यकता या कारणानेच निर्माण झाली होती. एके दिवशी एका सभ्य स्त्रीने लंडनच्या राजमार्गावरून जाता जाता पाहिले, दिवसा तिसऱ्या प्रहरानंतर सायंकाळ होण्यापूर्वी राजरस्त्याने वयात आलेल्या हजारो मुली म्हणजे १६ ते २५ वर्षे वयाच्या तरुण मुली भटकत आहेत. हे दृश्य या ठिकाणी नवीन होते असे नाही; पण त्या दिवशी हा भटकणारा घोळका पाहून त्या स्त्रीच्या मनात एका नवीन विचाराचा उगम झाला. ती मनात म्हणाली, 'या सगळ्या मुली शहराबाहेरून कामाच्या निमित्ताने येथे आल्या आहेत. नोकरीधंदा करून येथे राहातात. कुणी दुकानात, कुणी पोस्ट ऑफिसात, कोणी

हॉटेलात अशा नोकरी करतात. सायंकाळी कामावरून सुटल्यानंतर रस्त्यातून फिरतात. दहाजणी ' मेस ' करून राहातात. आईवडलांचे यांना सान्निध्य नाही. यांच्यावर देखरेख कोण करणार ? ' असे विचार करीत करीत ती सभ्य स्त्री आपल्या घरी आली. पुढे आपल्या नवऱ्याजवळ तिने हे सर्व सांगितले आणि परिचितांकडेही या बाबतीत विचारविनिमय करू लागली. हळूहळू या विचारामुळे तिला दुसरे काही सुचेना. शेवटी आपल्या बरोबरीच्या व सहविचारी अशा काही स्त्रिया जमवून तिने एक लहानशी संस्था स्थापन केली. लंडनमधील ज्या भागात अशा कर्मचारी स्त्रिया जास्त राहतात व फिरतात तो भाग प्रथम त्यांनी विचारात घेतला. आणि तेथेच एक मोठे घर भाड्याने घेतले. नंतर ते चांगले सजवले, बसण्यासाठी उत्तम खुर्च्या वगैरेंची व्यवस्था केली. एक पिआनोही आणला गेला. गायन-वादनाची योग्य ती सोय केली आणि मग आपल्या कित्येक मैत्रिणींची भेट घेऊन, आठवड्यातून कोणकोण कोणत्या कोणत्या दिवशी सायंकाळी या विश्रांतिगृहात येऊन गायन-वादन ऐकवितील व त्या मुलींशी सलोख्याने बोलणे-चालणे करतील ते निश्चित केले. पुढे एके दिवशी लहान लहान कागदांवर थोडक्या शब्दात एक जाहीर विनंती छापून ते कागद रस्त्यावर फिरणाऱ्या मुलींना वाटण्यात आले. त्यात लिहिले होते, ' तुम्ही जर × × नंबरच्या घरात तळमजल्यावर याल तर तुम्हांला उत्तम गीत-वाद्यांचा कार्यक्रम ऐकायला मिळेल. ' वगैरे. पहिल्या दिवशी एकदोन मुली आल्या; त्यांना गीतवाद्य ऐकायला मिळाले. बोलणेचालणेही झाले, परिचयविधीही उरकला. कुठे जाता, कुणाबरोबर फिरता, कसे दिवस घालविता हीही बातमी मिळविली. त्या दिवशी संतुष्ट होऊन त्या निघून गेल्या. दुसरे दिवशी सायंकाळी पुष्कळ मुली आल्या. पुढे पुढे त्या जागेत कित्येकींना बसायला जागा मिळेना, अशी अवस्था झाली. त्यामुळे लंडन-मध्ये एकामागून एक अशी त्या भागात सातआठ घरे भाड्याने घ्यावी लागली. शेकडो तरुणी प्रत्येक दिवशी सायंकाळी त्या सर्व ठिकाणी येऊन गायनवादन, व उपदेशही ऐकू लागल्या; पुढे त्या उद्योगी स्त्रियांच्या संस्थेचा कार्यविस्तार फार वाढू लागला. खरोखर किती आश्चर्यकारक ही परोपकारी वृत्ती.

## तुरुंगातून सुटणाऱ्यांना सहाय्य संस्था

आणखी अशाच एका कल्याणकारी कार्याची गोष्ट मी त्यावेळी ऐकली. या कार्याची योजना मला वाटते, पूर्वीपासूनच झालेली असावी. हे कार्य असे : ' जे प्रथमच कोणत्या एखाद्या अपराधासंबंधाने तुरुंगवासाची शिक्षा भोगून तुरुंगातून सुटतात त्यावेळी ते तुरुंगाबाहेर आल्यानंतर त्यांना पूर्वीप्रमाणे समाजात मिसळण्याची संधी मिळत नाही, त्यांना नोकरीवर ठेवायला अगर काम द्यायला लोक भितात, घरात ठेवून घ्यायला घाबरतात, समाजात त्यांच्याशी साहचर्य

करायला संकोच मानतात, तेव्हा मग त्यांची अवस्था काय होत असेल! आणि याच कारणाने अनेक मुक्तकैदी पुनः अपराध करायला प्रवृत्त होऊन तुरुंगात जातात. बंदीमुक्त मनुष्याला सन्मार्गाला लावण्यासाठी आणि समाजात त्याला प्रतिष्ठेची जागा मिळवून देण्यासाठी काय करता येईल? असे विचार काही प्रतिष्ठित लोकांत चर्चिले जाऊ लागले आणि या चर्चेतून त्या समाजकल्याणकर्त्या कळकळीच्या थोर लोकांनी 'तुरुंगातून सुटणाऱ्यांना सहाय्य करणारी संस्था' नावाची एक संस्था स्थापन केली. त्याचा परिणाम असा झाला की, इंग्लंडातील अनेक तुरुंग कैदी नसल्यामुळे रिकामे पडले आहेत.

तेथील मध्यमवर्गातील दयाळू स्त्रीपुरुषांच्या परोपकारी सदिच्छेच्या गोष्टीं-बद्दल मी जास्त काय सांगू? त्या ठिकाणी अनेक उच्च दर्जाच्या स्त्रियांनी हॉस्पिटल मध्ये रोग्यांना पुष्पगुच्छ पाठविण्यासाठी ठिकठिकाणी संस्था काढल्या आहेत. खालच्या वर्गातील दरिद्री लोकांच्या मुलांसाठी नाताळसारख्या मोठ्या सणासुदीत बाहुल्यांची देणगी पाठविणाऱ्याही मोठमोठ्या संस्था आहेत, मोठमोठ्या शहरी, खालच्या वर्गातील बालक-बालिकांना मधून मधून निसर्गाची शोभा दाखविण्या-साठी व शहराबाहेर विशुद्ध हवेत त्यांना फिरता यावे म्हणून संस्था आहेत. वास्तविक मनुष्याच्या लोककल्याणकारी प्रवृत्तीतून किती प्रकारची कार्ये होऊ शकतात! हे पाहून खरोखरीच विस्मयचकित व्हायला होते.

मी त्या देशात जाण्यापूर्वी काही दिवसांपासून तेथील सर्वसाधारण लोकांत ज्ञानप्रसाराचे प्रयत्न चालले होते. शिकलेले लोक अशिक्षित कामगारांत शिक्षण प्रसाराचा प्रयत्न करीत होतेच.

### श्रमिकांसाठी 'टॉयन्बी हॉल' आणि 'पीपल्स पॅलेस'

याला थोडी पूर्वीची बैठक आहे. मिस्टर अर्नोल्ड टॉयन्बी नावाच्या ऑक्सफर्ड विश्वविद्यालयातील एका तरुणाच्या मनात आले की, 'आपली परि-स्थिती जर उत्तम आहे, जीवननिर्वाहाची काळजी नाही, तर मग आपले आयुष्य आपण कोणत्या एखाद्या चांगल्या कामात का बरे घालवू नये? यापुढचे आयुष्य मी खालच्या वर्गातील लोकांत शिक्षणप्रसार करण्याकडे खर्च करीन.' असा संकल्प केल्यावर त्याने लंडन शहराच्या पूर्व भागात येऊन एक घर भाड्याने घेतले आणि तेथे तो राहू लागला. कारण याच भागात श्रमजीवी लोकांचा भरणा जास्त होता. टॉयनबीने प्रथम प्रथम या लोकांना आपल्या घरी बोलावून त्यांना काही वाचून दाखविणे व तोंडी उपासना वगैरे मार्गांनी आपल्या कार्याला सुरवात केली. आरंभ उत्तम झाला आणि हळू हळू त्याच्या उपक्रमांचे उत्तम फळ दिसू लागले. पुढे आणखी सुशिक्षित तरुणांनी त्याला सहकार्य दिले. ते रात्रीच्या शाळा काढून श्रमजीवी लोकांना रीतसर शिक्षण देऊ लागले. त्यांच्या या उपक्रमाला

लवकरच चांगले स्वरूप आले. ठिकठिकाणी अशा प्रकारच्या रात्रीच्या शाळा निघू लागल्या. त्यात कामगारांना पद्धतशीर शिक्षण मिळू लागले. वेगवेगळ्या ठिकाणी ' वर्किंग मेनस् इन्स्टिटयूट ' नावाच्या पाठशाळा निर्माण झाल्या. पुढे टॉयनबी मरण पावला. तेव्हा त्याच्या देशवासियांनी त्याच्याविषयी आदर व्यक्त करण्यासाठी लंडनच्या या पूर्वभागात, त्याच्या कार्यक्षेत्राच्या जवळच 'टॉयनबी हॉल' नावाचे विद्यालय उभारले. ते अजूनही खालच्या वर्गात शिक्षणदान करण्याचे कार्य करीत आहे. याशिवाय लंडनच्या या पूर्वभागातच ' दि पीपल्स पॅलेस ' म्हणजे ' प्रजाप्रासाद ' नावाची एक भव्य इमारत उभारली. तिचा हल्ली खालच्या वर्गातील लोकांचे विद्यालय म्हणून वापर होत आहे. मी ती भव्य इमारत पाहिली आहे. त्यात खालच्या वर्गातील लोकांसाठी, वाचनालय, पुस्तकालय, रंगमंच, भोजनागार, वगैरे सर्व काही सोयी केलेल्या आहेत. या प्रासादात उभे राहिले म्हणजे इंग्रजांच्या लोककल्याणकारी कार्याचे प्रात्यक्षिक स्पष्ट दिसते आणि सर्वांग रोमांचित होते.

## इंग्लंडात मजूरवर्गासाठी शिक्षणालय

मी एके दिवशी वर्किंग मेन्स इन्स्टिटयूटचे वाचनालय पाहायला गेलो. एक १७।१८ वर्षांचा कामगार तरुण मला नेण्याला होता. तो त्यावेळी एका सुवर्णकाराचा सहाय्यक म्हणून काम करीत असे. तो मला उत्तर लंडनमधील एका इन्स्टिटयूटमध्ये घेऊन गेला. तो एक फार मोठा वाडाच होता. आत जाऊन पाहिले तेव्हा त्यात वेगवेगळ्या विषयांच्या चर्चेसाठी व माहिती देण्यासाठी निरनिराळ्या खोल्या असलेल्या दिसल्या. कोणा एखाद्या खोलीवर ' केमिस्ट्री ' असे लिहिलेले आहे. त्या बाबतीत ऐकले की, त्या खोलीत आठवड्यातून काही दिवस दर सायंकाळीं रसायनशास्त्राची माहिती देण्यात येते. आत जाऊन पाहिले तो एक लहानशी लॅबोरेटरीही तयार असलेली दिसली. कोणा एखाद्या खोलीच्या दारावर ' फिजिक्स ' म्हणजे पदार्थविज्ञान असे लिहिले होते. खोलीत जाऊन पाहिले तो पदार्थविज्ञान शिकविण्याचे सगळे साहित्य तेथे होते. अशा प्रकारे निरनिराळ्या खोल्यांत निरनिराळी शास्त्रे शिकविण्याचे साहित्य मला आढळले. मुख्य संचालकाकडे माहिती घेतली तेव्हा समजले, त्याने त्यापूर्वी चौदा वर्षे-पर्यंत हेच काम केले होते. आणि येथे तो विनावेतन काम करीत आहे. प्रत्येक दिवशी तिसऱ्या प्रहरी आपल्या ऑफिसातून येऊन जेवल्यावर सायंकाळी या इन्स्टिटयूटमध्ये यायचे आणि अकरा वाजेपर्यंत काम करायचे. हे परिश्रम तो गेली चौदा वर्षे करीत आहे. केवढे देशहिताचे आणि लोककल्याणाचे काम आहे हे!

इन्स्टिटयूटच्या दोन मोठ्या खोल्यांत पुष्कळच पुस्तके असलेली एक लायब्ररी मी पाहिली. मजूर लोक या लायब्ररीतून पुस्तके नेऊन वाचतात असे

ऐकले. नंतर बाहेर येऊन अंगणात पाहिले तो तेथे विद्यार्थी-विद्यार्थिनींसाठी शारीरिक व्यायामाची आणि खेळण्याची सगळी उपकरणे तयार. विद्यार्थी आणि विद्यार्थिनींसाठी वेगवेगळी दोन क्रीडांगणे होती. व्याख्याने वगैरे ऐकून झाल्यावर या क्रीडांगणांवर थोडासा खेळही होतो.

मी असे ऐकले आहे की ही एवढी मोठी सगळ्या सोयींनी युक्त अशी इमारत देशहितैषी लोकांच्या स्वतःस्फूर्त देणग्यातून निर्माण झाली आहे. आणि या ठिकाणी जी सर्व व्याख्याने वगैरे दिली जातात, ती लंडन युनिव्हर्सिटीतील प्रोफेसर आणि निरनिराळे तज्ञ विद्वान यांच्याकडून आणि तीही विनावेतन.

**इंग्रज, सत्कार्यांना देणग्या देतात**

इंग्रजांची अशा प्रकारची सत्कार्याला देणग्या देण्याची प्रवृत्ती पाहून मला विशेष नवल वाटल्यावाचून राहिले नाही. एकदा ऐकले की अशा एका इन्स्टिटयूटसाठी एका प्रतिष्ठित गृहस्थाने १०।१२ लाख रुपये दिले; पण ते कुणी दिले हे कोणालाच समजले नाही. श्रीमंत, मध्यमवर्गीय, गरीब या सर्वांमध्येच या दानप्रवृत्तीचे नमुने माझ्या दृष्टीस पडत. ज्या घरात मी राहात असे त्या घरात अनेकदा अशा घटना घडल्या आहेत. मुली सायंकाळच्या जेवणानंतर बैठकीच्या खोलीत वाचीत बसल्या आहेत. काही कामेही करीत आहेत. अशावेळी एक मुलगी वर्तमानपत्र वाचता वाचता म्हणाली, " आई, पाहा पाहा तरी. एका नवीन कामाची तयारी चालली आहे. आम्हाला या कामासाठी काही मदत करता येणार नाही का ? " असे म्हणून त्या मुलीने वर्तमानपत्रात प्रसिद्ध झालेली ती कार्याच्या योजनेची हकीगत वाचून दाखविली. आईने म्हटले, " बरे पाहाते, देण्यासारखे असे आपल्याजवळ काय आहे ते ! " असे म्हणून तिने जमाखर्चाची चोपडी आणली व रोजमेळ पाहू लागली. आणि मग काही वेळाने म्हणाली, " आम्हांला पाच शिलिंग देता येतील. " आणि मग त्याच वेळी मनिऑर्डरने पाच शिलिंग त्या योजनेचे सेक्रेटरी यांच्या नावाने पाठविण्यात आले. हे सर्व पाहून मला वाटले, वेगवेगळ्या सवयीप्रमाणे हॅबिट ऑफ् पब्लिक चॅरिटीही म्हणजे लोककल्याणकारक प्रवृत्तीही, संगत आणि परिस्थिती यामुळे विकास पावते. ज्या देशातील लोकांत अशी ही प्रवृत्ती नसेल किंवा ती विकसित होत नसेल त्या देशातील लोकांना एखाद्या चांगल्या कामासाठी दारोदार भिक्षा मागत फिरावे लागते. मुठीत पैसे घेऊन लोक बसलेले आहेत, जो जोराने ती मूठ उघडून ते पैसे घेऊ शकेल त्यालाच मिळतील; दुसऱ्याला मिळणार नाहीत. आमच्या देशाची ही अशी अवस्था आहे.

* * *

.१८.

# इंग्लंडात नवीन जाणीव

## डॉक्टर बर्नार्डोंचा अनाथाश्रम

इंग्लंडातील धर्मश्रद्धाळू व्यक्तींनी परोपकारासाठी ज्या सगळ्या योजना कार्यवाहीत आणल्या होत्या त्याही पुष्कळशा मी पाहिल्या होत्या. त्यातील डॉ. बर्नार्डोने स्थापन केलेला मुलांचा अनाथाश्रम विशेष उल्लेखनीय. डॉ. बर्नार्डो हा एक डॉक्टरी व्यवसायातील माणूस होता. हा व्यवसाय करीत असतानाच अनाथ मुलांकडे त्याचे लक्ष वेधले गेले. त्यामुळे या मुलांसाठी आपण काहीतरी केले पाहिजे असे त्याला वाटू लागले. कित्येक आईबापांवेगळी अनाथ मुले जमवून लंडन शहरात त्याने एक आश्रयस्थान निर्माण केले. मी जाण्यापूर्वी कित्येक वर्षांपासून हे काम चालले होते. तसेच या आश्रयस्थानातून उत्तीर्ण झालेले पुष्कळसे तरुण त्यापूर्वी कॅनडा देशात कामकाजानिमित्त पाठविण्यात आले होते. मी जेव्हा तो आश्रम पाहायला गेलो तेव्हा तिथे जाऊन उभा राहाताच विस्मयचकित होऊन विचार करू लागलो. कशाची म्हणून जास्त प्रशंसा करावी ? इंग्रजांच्या कृतिशीलतेच्या अद्भुत शक्तीची की लोककल्याणाची ? कार्याची अशी सुव्यवस्था जन्मात कधी मी पाहिली नव्हती. आणि अशा प्रकारची परोपकार प्रवृत्तीहीं कधी दिसली नव्हती.

## जॉर्ज मूलरचा अनाथाश्रम

असाच आणखी एक आश्रम पाहून मी चकित झालो होतो. तो म्हणजे ब्रिस्टल शहरातील सुप्रसिद्ध जॉर्ज मूलरने स्थापन केलेला अनाथाश्रम होय. याचा आरंभही अद्भुत प्रकारानेच झाला. जॉर्ज मूलरने, एका पैशाचीही भिक्षा न मागता, वर्गणी गोळा न करता, केवळ ईश्वराच्या चरणी प्रार्थना करून स्वतः-

प्रवृत्त देणगीद्वारा आज ६३ वर्षे ह्या सगळ्या आश्रमपरिसरात एकाच वेळी हजारो पितृ-मातृहीन मुलां-मुलींना ठेवून त्यांचे कसे पालनपोषण चालविले आहे, त्याचा इतिहास अत्यंत नवलाईचा असून तो परमेश्वरावर श्रद्धा ठेवणाऱ्या प्रत्येकाने जाणून घेण्यासारखा आहे. मी जाऊन पाहिले तो पाच आश्रमालयांत मिळून सुमारे दोन हजार मुलगे-मुली यांचे संगोपन होत आहे. त्यांच्यासाठी पाच भव्य अशा इमारती उभारल्या आहेत. त्यांच्या खिडक्यांचीच संख्या अकराशे होईल. ईश्वराच्या चरणी प्रार्थना आणि स्वतःची सहजप्रवृत्ती यामुळे मिळालेल्या देणग्यांवर या सर्व इमारती बांधल्या गेल्या. या इमारतीत प्रवेश करताच प्रथम बालकगृहात गेलो. पाहतो तो दोन स्त्रिया २०।२५ मुलांना खेळ देऊन त्यांचा सांभाळ करीत आहेत असे दिसले. नंतर इतर खोल्यांतूनही पाहिले. तेथील सुव्यवस्था, संरक्षण आणि शिक्षणाची पद्धत पाहून मी थक्कच झालो.

## क्वेकरांची समाजसेवा

क्वेकर संप्रदायातील कित्येक व्यक्तींनी नियम केला होता की, प्रत्येक रविवारी सकाळी एका भवनात आपण सर्व मजूरवर्गाला एकत्र जमवून धर्मोपदेश द्यावयाचा. मलाही एकदा हा धर्मोपदेश ऐकण्यासाठी त्यांनी बोलाविले होते. त्याप्रमाणे तेथे जाऊन त्यांची ही कार्य करण्याची पद्धत पाहिली. ती पद्धत अशी : सुमारे शंभराहून जास्त मजूर एकत्र झालेले होते. प्रथम एका मोठ्या दालनात त्यांना नेऊन अर्धा तासपर्यंत उपासना करण्यात आली. त्यानंतर त्यांना दुसऱ्या एका तसल्याच दाल-नात नेण्यात आले. तेथे अर्धा तास दोन प्रकारचे काम चालू झाले. प्रथम बँकेच्या कामाला आरंभ झाला. मजूरवर्गाने आठवड्यात जो पैसा साठविला असेल तो जमा करण्याला सुरवात झाली. नंतर दुसऱ्या बाजूला अनेकजण लिहिण्याच्या वह्या उघडून बसले आणि त्यांवर ए बी सी डी लिहायला लागले. आणि जे घरून लिहून आणले होते ते शिक्षकांना दाखवू लागले. ३०।३५ वर्षे वयाचे वयस्कर पुरुषही ए, बी, सी, डी लिहून दाखवीत आहेत असे मी पाहिले. नंतर चार पाच खोल्यांतून धर्मोपदेशाचे क्लास सुरू झाले. एकेका क्लासात एकेक प्रतिष्ठित गृहस्थ शिक्षकाच्या उच्चासनावर बसले होते. मलाही त्यांपैकी एका खोलीत उच्चासनावर शिक्षकाजवळ बसविले. नंतर वर्गाचे काम सुरू झाले. ते असे : शिक्षक म्हणाले, "गेल्या रविवारी अमुक गृहस्थाला बायबलातील अमुक अमुक पृष्ठावरचा मजकूर वाचून यायला सांगितले होते. तो जर येथे उपस्थित असेल तर त्याने उठून उभे राहावे आणि त्या पृष्ठावरील उपदेश वाचून काय बोध मिळाला ते सांगावे" नंतर जमलेल्या मजूरवर्गातील एक इसम उभा राहिला आणि बायबलातील कोण-कोणत्या ठिकाणी काय काय बोध मिळाला ते सांगू लागला. वक्त्याची आध्या-त्मिक दृष्टी आणि भावग्रहण करण्याची बुद्धी पाहून मला आश्चर्य वाटले. शिक्षकांनी

मला काही बोलण्याची सूचना केली, पण मी काही बोललो नाही. इतर काहीजण थोडथोडे बोलले. शेवटी शिक्षकांनी उपदेशात्मक थोडे बोलून उपसंहार केला. अशा-प्रकारे एक तास होऊन गेला. यात जे मी पाहिले आणि ऐकले त्यामुळे माझ्यावर हा एक उपकारच झाला असे मला वाटले.

## इंग्लंडची मुक्तिफौज

मी इंग्लंडला असताना मुक्तिफौजेचे (सॅल्व्हेशन आर्मी) कामकाज विशेष आस्थेने पाहात असे. त्यांच्या सभा संमेलनाची बातमी समजताच तेथे उपस्थित राहण्याचा प्रयत्न करीत असे. एकदा 'अलेक्झांड्रा पॅलेस' नावाच्या काचमंदिरात त्यांनी एक जाहीर सभा बोलाविली होती. त्यावेळी सभासदांचा, विशेषतः जनरल बूथ यांच्या पुत्रकन्या-परिवाराचा जो विलक्षण उत्साह पाहिला होता त्याचे किती म्हणून वर्णन करावे? मी त्या प्रासादात पाऊल ठेवले मात्र तोच स्त्रियांमागून स्त्रिया माझ्याकडे येऊ लागल्या. 'आपण काय सॅल्व्हेशनिस्ट? आपण काय खिश्चन?' या त्यांच्या प्रश्नाला मी 'नाही' म्हणताच मग काय विचारता! असा काही आरडाओरडा आणि तर्कवितर्क सुरू झाला की मला काही बोलताच येईना. एका स्त्रीच्या हातून सुटावे तर दुसऱ्या स्त्रीने पकडलेच. मुक्तिफौजेच्या कार्यात स्त्रियांचाच उत्साह मला जास्त दिसून आला. असे ऐकले, की जनरल बूथची सून, ब्रॅम्वेल बूथची पत्नी प्रत्येक दिवशी सायंकाळनंतर लंडनमधील रस्त्यावर फिरते आणि वारांगनांशी तर्क-वितर्क करून त्यांना वाममार्गाकडे जाण्यापासून परावृत्त करण्याचा प्रयत्न करते.

एके दिवशी मी यांचे मुख्य कार्यालय पाहण्यासाठी म्हणून उत्सुकतेने जनरल बूथच्या राहात्या घरी गेलो. मला वाटते त्यावेळी मिसेस बूथ आजारी असावी. त्यामुळे जनरल बूथ येऊ शकले नाहीत. त्यांचे सुपुत्र ब्रॅम्वेल बूथ आले आणि मला आपले साधनगृह दाखवायला घेऊन गेले. मी ते पाहाताना ज्या ज्या बाजूला गेलो त्या त्या ठिकाणी पाहिले तो भिंतीवर लिहिलेले आहे, 'येशू तुम्हांला बोलावीत आहे.' 'येशूच्या पायी लक्ष ठेवा.' 'येशूच्या चरणी प्रार्थना करा. तो तुम्हांला सामर्थ्य देईल.' वगैरे वगैरे. सगळ्या भिंती येशूच्या गुणसंकीर्तनाने पुरेपूर चितारलेल्या. ईश्वराचे नाव कुठेही नाही. पाहून माझे मन काहीसे विषण्ण होऊन गेले. माझा तो मनोभाव चेहेऱ्यावर उमटलेला पाहून ब्रॅम्वेल बूथने विचारले, "आपण विषण्ण झालेले का दिसता!" मी त्याला उत्तर दिले, "केवळ येशू येशू असेच सर्वत्र दिसत आहे. ईश्वराचे नाव कुठेच नाही! त्यामुळे मला दुःख वाटले. आपण येशूरूप पडद्यामागे ईश्वराला पूर्णपणे झाकून टाकले आहे." ब्रॅम्वेल बूथ हसून म्हणाला, "येशूच आमचा ईश्वर हे आपण जाणत नाही वाटते? येशू हे ईश्वराचे दुसरे नाव आहे फक्त." मी विचार करू लागलो. 'अवतारवादाने

भक्तवत्सल भगवंताच्या स्वरूपाला किती दडपून टाकण्यात आले आहे ? ' आणि याच विचारात गुंग होऊन मी बिऱ्हाडी आलो.

## इंग्लंडची शिक्षणव्यवस्था : किंडरगार्डन स्कूल

इंग्लंडची शिक्षणपद्धती पाहण्यासाठी किंडरगार्डन स्कूल ', ' बोर्डस्कूल ', ' अपर मिडल्क्लास ' स्कूल वगैरेचे मी निरीक्षण केले. किंडरगार्डनची शिक्षणपद्धती पाहून मी आश्चर्यचकितच झालो. मुलांना स्वतःच्या हातांनी काम करून शिक्षण देण्याचे प्रकार इतके असू शकतात याची माहिती मला पूर्वी नव्हती. मुलांना खेळ-करमणुकीतून सहज समजतील अशा निरनिराळ्या महत्त्वाच्या विषयांची माहिती देण्यात येते. मुले विविध रंगांच्या कागदापासून वेगवेगळ्या वस्तू तयार करीत होती. तसेच ओली माती घेऊन लहानसान घरे बांधीत होती. शिक्षकिणींनी मला बरोबर नेऊन हे सगळे विभाग दाखविले. शेवटी एक शिक्षिकाच जेव्हा लहान मुलांसह टाळ्या वाजवीत नाचत-नाचत खोलीतल्या खोलीत फिरू लागली तेव्हा विस्मयाने आणि आनंदाने उत्फुल्ल होऊन मी पाहातच राहिलो. मुलांची ही शिक्षणपद्धती मला इतकी आवडली की, मी भारतात येतेवेळी किंडरगार्डनचा उद्योक्ता फ्रोबेल याचे जीवनचरित्र आणि त्याच्या त्या शिक्षणपद्धतीची काही पुस्तके विकत घेऊन मी ती इकडे आणली. इकडे आल्यावर मी ती ब्राह्मबालिका विद्यालयाला देणगीदाखल दिली.

## बोर्डस्कूल

बोर्डस्कूलची शिक्षणपद्धतीही मला फार विलक्षण वाटली. विशेषतः तोंडी हिशेबाप्रमाणे मनातल्या मनात बेरीज, वजाबाकी, गुणाकार भागाकार करून बोलता बोलता चटकन उत्तरे देण्यात मुलांनी जे विलक्षण प्रावीण्य दाखविले त्याचा मला कधीही विसर पडणार नाही. शिक्षकाने उभे राहून मुलांना म्हटले, " याच्यात इतके मिळवा, त्यातून इतके वजा करा, येईल त्याला इतक्याने गुणा, त्या गुणाकाराला एवढ्याने भागा. काय उत्तर आले सांगा. ( वगैरे वगैरे ) ज्याने उत्तर काढले असेल त्याने हात वर करावा. " इतके शिक्षकाने म्हणताच चटकन एका विद्यार्थ्याने हात वर केला आणि उत्तर सांगितले.

## ' अपर मिडल् क्लास ' स्कूल

या स्कूलमध्ये जाऊन पाहिले तो भूगोल व भूतत्त्व या विद्येत मुले पारंगत असलेली दिसली. सगळ्या पृथ्वीची बारीकसारीक सर्व माहिती जणू काय त्यांच्या नखाग्रावर त्यांना दिसत आहे. त्यानंतर तिथेच एक दुसरा प्रकार पाहिला, एकेका वर्गात २५।३० मुलांपेक्षा जास्त होणार नाहीत इतकीच मुले. पण एकाच वेळी दोन शिक्षक काम करीत आहेत !

## मुलींचे बोर्डिंग स्कूल

केवळ मुलांच्याच शाळा पाहून मी थांबलो नाही. मुलींचे एक बोर्डिंगस्कूलही मी पाहायला गेलो होतो. किती शिस्त, किती स्वच्छता व व्यवस्थितपणा ! वाचन, खेळ वगैरेत किती नियमबद्धता ! पाहून मी थक्क झालो. शेवटी व्यवस्थापिकाबाई मला मुलींच्या शयनगृहात घेऊन गेली. तो एक हॉस्पिटलमधील मोठ्या दालनाप्रमाणे लांबरुंद असा हॉलच होता. त्यात पुष्कळ मुलींच्या व्यवस्थित शय्या घातलेल्या आहेत. हॉलच्या एका बाजूला एक उंच लाकडी व्यासपीठ. एक शिक्षिका मुलींसह त्या दालनात शयन करायची. तिची शय्या त्या उंच व्यासपीठावर होती.

मी व्यवस्थापिकेला विचारले, " शिक्षिकेला या लांकडी व्यासपीठावर का झोपावे लागते ? " तिने उत्तर दिले, " तेथे पडल्या पडल्या तिला मुलींच्या हालचाली दिसू शकतात. "

## लंडनमधील ब्रिटिश म्युझियम लायब्ररी

लंडनमध्ये असताना मी पुष्कळ दिवस तेथील ब्रिटिश म्युझियम लायब्ररीत जाऊन वाचीत असे. असे ऐकले आहे की, त्या ठिकाणी पुस्तकांच्या इतक्या आल्मान्या आहेत की त्यांची एकीला एक लावून रांग केल्यास सहा मैल होईल. असे असले तरी कामाची व्यवस्था फारच उत्तम. वाचकाने एखादे नवे पुस्तक मागितले की अवघ्या पाच मिनिटांत ते हातात पडलेच. लायब्ररीचे वेड हे इंग्रजांचे एक विशिष्ट वेड आहे. प्रतिष्ठित गृहस्थांच्या घरात जाऊन पाहावे तर त्यांचे वाचनालय जमिनीपासून छपरापर्यंत पुस्तकांच्या आलमारीने परिपूर्ण असलेले दिसायचे. रस्ता, घाट, गल्लीकुच्ची सर्वत्र पुस्तकालये असायचीच. या पुस्तकालयांत अल्प खर्चात सर्व वर्गातील वाचकांना वाचण्याची चांगली सोय असते. एवढ्यावरूनच इंग्रजांची ज्ञान मिळविण्याची इच्छा केवढी प्रबल आहे हे दिसून येते.

## ऑक्सफोर्ड विश्वविद्यालय

उच्च दर्जाच्या शिक्षणालयात प्रसिद्ध अशी ऑक्सफोर्ड आणि केंब्रिज ही विश्वविद्यालये असल्यामुळे त्यातील सर्व कॉलेजे पाहण्यासाठी मी गेलो होतो. ऑक्सफार्ड येथे गेल्यावर माझ्या मनात आले, हाय ! केवळ एका दिवसासाठी ही सर्व विद्यालये पाहण्याला न येता सहा महिने अगर वर्षभर येथेच काल घालविला असता तर मी विशेष धन्य झालो असतो. येथील कॉलेजेस् पाहून मला आमच्या देशातील प्राचीन हिंदू शिक्षण पद्धतीची आठवण होऊ लागली. आमचा प्राचीन नियम असा होता की, विद्यार्थ्यांनी शिक्षाकालात ब्रह्मचर्य व्रताचे पालन करावे आणि त्याने गुरुकुलात वास्तव्य करावे. तिथे पाहिले तो विद्यार्थी तितके सर्व अविवाहित आणि ब्रह्मचर्य व्रत पाळणारे. तसेच कॉलेजाच्या वसतिगृहात आचार्य

मंडळीसह एकत्र मिळूनमिसळून राहणारे. या सगळ्या वसतिगृहांच्या वातावरणात जणू काय ज्ञान आणि ज्ञानालोचनाच भरून राहिली आहे असे वाटायचे. ऑक्सफोर्डची बॉडलियन लायब्ररी जेव्हा पाहायला गेलो तेव्हा तेथील अद्भुत प्रकार पाहून मी विस्मयसागरात बुडालो. लंडनमधील ब्रिटिश म्युझियमची लायब्ररी पाहून जसा मी विस्मित झालो होतो तसाच येथेही झालो.

## केंब्रिज

ऑक्सफोर्डहून आल्यावर केंब्रिजला गेलो. योगायोगाने तेथे त्या दिवशी वादळी हवा होती. त्यामुळे सर्व कॉलेजे मला फिरून पाहाता आली नाहीत. केवळ मिल्टन आणि डार्विन एवढीच कॉलेजे मला पाहाता आली. त्यांची ती स्मृतिचिन्हे पाहून माझ्या अंतःकरणात एक अपूर्व भावोद्गम झाल्यावाचून राहिला नाही.

## केंब्रिजमध्ये संस्कृत अध्यापक इ. बी. काऊयेल

केंब्रिज पाहात असतानाची आणखी एक घटना मला आठवते. ऋषितुल्य इ. बी. काऊयेल हे एके काळी, कलकत्ता येथे प्रेसिडेन्सी कॉलेजचे प्रोफेसर आणि संस्कृत कॉलेजचे प्रिन्सिपॉल होते. त्यांच्या साधुतुल्य आचारविचारांच्या सान्निध्यात आल्यामुळे प्रेसिडेन्सी कॉलेजच्या कित्येक विद्यार्थ्यांनी ख्रिस्ती धर्माची दीक्षा घेतली होती. ते त्यावेळी संस्कृतचे अध्यापक म्हणून तेथे राहात होते. शिकविण्यासाठी त्यांना कॉलेजात जावे लागत नसे. संस्कृत शिकणारे विद्यार्थी त्यांच्या राहात्या घरी येऊनच शिकून जात. अशा त्या विद्वान् माणसाने जेव्हा ऐकले की, ' भारतातील एक नेतृस्थानीय गृहस्थ केंब्रिज येथे असलेली कॉलेजे पाहण्यासाठी आले आहेत. ' तेव्हा तशा त्या तुफानी हवेतच मी ज्या माझ्या एका मित्राच्या घरी उतरलो होतो तेथे ते आले आणि मला भेटले. लहानपणी संस्कृत शिकण्यासाठी मी संस्कृत कॉलेजात जात असे, तेव्हा आमच्या संस्कृत कॉलेजचे प्रिन्सिपॉल म्हणून मी त्यांना पाहिले होते. आणि त्यांचे साधूप्रमाणे असलेले आचरण पाहून मुग्ध होऊन गेलो होतो. पूर्वी मी हे सांगितलेच आहे. ते मला येथे ( केंब्रिज येथे ) भेटले त्यावेळी ते साधुपुरुष केस पिकलेले आणि वृद्ध असे दिसले. त्यांची शुभ्र दाढी नाभिप्रदेशाच्या खालीपर्यंत येऊन पोचली होती. दोन्ही डोळ्यांत आणि चेहेऱ्यावर सखोल ज्ञानानुराग आणि साधुत्वाचे देदीप्यमान तेज झळकत होते; ते आलेले पाहून मला अत्यंत आश्चर्य वाटले. माझ्या लहानपणी मी त्यांना कसे पाहिले होते, आणि त्यांनी माझ्या जीवनात सत्यानुरागाचे बीज कसे अंकुरित केले होते, हे जेव्हा अत्यंत विनयाने मी त्यांना बोलून दाखविले, तसेच बंडाची दंगल थांबल्यावर नवीन वर्षाचे पारितोषिक देताना त्यांनी जो संस्कृत श्लोक रचून म्हटला होता तो जेव्हा मी म्हणून दाखविला तेव्हा विस्मयाने व आनंदाने ते उत्फुल्ल होऊन गेले. त्या

हर्षभरात मला दृढालिंगन देण्याचे तेवढेच त्यांनी बाकी ठेविले. त्यांनी रचलेला तो श्लोक असा होता—

विद्यालयः स्वालयमेत्य साम्प्रतम्
समृद्ध-कीर्तिर्भुवने भविष्यति ।
तथाहि सानौ मलयस्य नान्यतः
ध्रुवं समारोहति चन्दनद्रुमः ॥

भावार्थ—कॉलेज आपल्या घरी येऊन उन्नती संपादून जगात विख्यात होईल. तसे तर होणारच, कारण मलयपर्वताच्या पायथ्याशीच चंदनाचे वृक्ष वाढतात.

हा श्लोक त्यांना मी म्हणून दाखविल्यावर आमचे उभयतांचे जुने संबंध पुनः जागृत झाले. ते माझ्याजवळ बसून संस्कृत कॉलेज, जयनारायण तर्कपंचानन, प्रेमचांद तर्कबागीश इत्यादींच्या गोष्टी सांगू लागले. तसेच केंब्रिज येथे पाहण्यासारखे उपयुक्त काय काय आहे तेही त्यांनी मला सांगितले. वाईट वाटले ते इतकेच की वाईट हवेमुळे सर्व काही मला पाहाता आले नाही. पण पुष्कळ दिवसांनी साधुतुल्य काऊयेलशी संमीलित होता आले त्यामुळे ती अपूर्णता जाणवली. ती भेट माझ्या अंतःकरणात चिरस्मरणीय होऊन राहिली आहे.

## आचार्य जेम्स मार्टिनोंची भेट

दुसरे जे जे स्मरणीय गृहस्थ त्या ठिकाणी मी पाहिले होते, आणि ज्यांचा परिचय झाल्यामुळे मला धन्यता वाटली त्यांच्या संबंधाने थोडाबहुत उल्लेख करतो. पहिली उल्लेखनीय व्यक्ती युनिटेरियनचे नेते आणि गुरू आचार्य जेम्स मार्टिनो. हे स्वतःच्या धर्मज्ञान, चिंतनशीलता, आणि साधुत्व या गुणांनी जगात अमर झाले आहेत. यांच्याबद्दल मी जास्त असे काय सांगू ? यांच्याशी माझे फक्त एकच दिवस बोलणे झाले, पण तो एक दिवस माझ्या आयुष्यात चिरस्मरणीय होऊन राहिला आहे. मी लंडनमध्ये असताना डॉ. मार्टिनो सर्व कार्यांतून निवृत्त होऊन स्कॉटलंडमधील कोणत्याशा अज्ञात प्रदेशात राहात होते. इतक्यात ऑक्सफर्डमधून पदवी देण्यासाठी म्हणून त्यांना एक निमंत्रणपत्र गेले. ते ती पदवी घेऊन स्कॉटलंडकडे परत जात असता दोन दिवस लंडनमध्ये मुक्कामाला होते. मला ही बातमी समजताच मी त्यांना भेटलो. अर्धा एक तास त्यांच्या संगतीत असेन नसेन. पण त्या अर्ध्याच तासात त्यांनी धार्मिक जीवनासंबंधाने अनेक महत्त्वाची तत्त्वे बोलून दाखविली. त्यातील एक असे होते. " केवळ भ्रम आणि कुसंस्कारांचा विरोध तसेच विचारस्वातंत्र्य यावर धार्मिक समाजाची उभारणी करण्याच्या मार्गात हे एक संकट आहे की, धर्मभावसंपन्न भक्तिप्रधान व्यक्तींना त्या समाजात समाधानपूर्वक राहाता येणार नाही. पाहा, माझ्याच आप्तवर्गापैकी

कित्येक लोक, आम्ही स्वीकारलेल्या युनिटेरियन धर्मात समाधान न लाभल्यामुळे त्रित्ववादी खिस्तीधर्मात प्रविष्ट झाले आहेत. आणि असे लोकही पाहण्यात आले आहेत की, जे एकदम निरीश्वरवादीच बनून गेले आहेत." त्यांचे मुख्य सांगणे अजूनही माझ्या कानात प्रतिसाद देत आहे. ते असे म्हणाले, 'सम हाऊ मेन ट्र नॉट स्टे वुईथ अस' (कोणत्याही कारणाने असो पण आमच्या संप्रदायात आलेला माणूस जास्त दिवस टिकून राहू शकत नाही.) नंतर युनिटेरियन परिवारात मुलांच्या धार्मिक शिक्षणाकडे द्यावे तसे लक्ष दिले जात नाही याबद्दल त्यांनी खेद व्यक्त केला. तसेच भारतवर्षीय हिंदूंचा धर्मभाव आणि भक्तिप्रवणता याबद्दलही ते पुष्कळ बोलले. मी जेव्हा शेवटी जाण्यासाठी उठलो तेव्हा जिन्यापर्यंत माझ्याबरोबर येऊन मी जिन्याच्या पायऱ्या उतरत असता ते वरूनच म्हणाले, 'गिव्ह अस ए लिटल ऑफ युअर मिस्टिसीझम अँड टेक फ्रॉम अस ए लिटल ऑफ अवर प्रॅक्टिकल जीनियस.' याच वाक्याचा विचार करीत करीत मी आलो. दोन शब्दांत दोन जातींतील विशेष भावना किती सुंदर रीतीने त्यांनी व्यक्त केली आहे! पौर्वात्य भक्तिप्रवणता आणि पाश्चिमात्य कर्मशीलता जर एकमेकात मिळून जातील तर ते एक चादर्श धर्मजीवन घडेल यात संशय नाही.

## वेल्सची मिस् कॉब

दुसरी स्मरणीय व्यक्ती मिस् कॉब्. इंग्लंडला जाण्यापूर्वीच मी त्यांचे ग्रंथ वाचले होते. आणि त्यामुळे माझ्या मनात त्यांच्याबद्दल प्रगाढ आस्था निर्माण झाली होती. त्यांच्या निर्मळ भक्तीने आणि प्रगाढ धर्मभावाने माझे अन्तःकरण उचंबळून आले होते. मी ज्यावेळी लंडन येथे गेलो तेव्हा त्या वेल्स प्रदेशाच्या एका अज्ञात भागात राहात होत्या. त्यांची भेट कशी होईल या विचारात मी असताना मी एके दिवशी असे ऐकले, की त्या लंडनमध्ये आल्या असून एका मित्राच्या घरी राहात आहेत; लागलीच मी त्यांना भेटायला धावलो. जाऊन जे पाहिले आणि ऐकले ते मला केव्हाच विसरता येणे शक्य नाही. मनुष्याचा चेहरा इतका प्रफुल्ल, पवित्र आणि प्रसन्न असू शकतो हेच नवल! कुमारी कॉब् यांचे वदन जणू काय प्रेम आणि आनंद यांनी माखलेले. त्या मनःपूर्वक हसल्या आणि अत्यंत खुल्या दिलाने माझ्याशी बोलू लागल्या. त्यांच्या त्या निर्व्याज प्रेमळ बोलण्याने माझे मन भारावून गेले. ब्राह्मसमाज या देशात काय काय काम करीत आहे याबद्दल मला त्यांनी अनेक प्रश्न विचारले. तसेच वेल्स भागात आपले वास्तव्य कसे आहे, कोणत्या तऱ्हेने चालले आहे आणि निरुपद्रवी जनावरांचे रक्षण करण्यासाठी कायकाय उपाययोजना केली आहे तेही सांगितले. शेवटी त्यांच्या एका सभेत मला चार शब्द बोलण्याची त्यांनी विनंती केली आणि मीही त्यांच्या विनंतीप्रमाणे एके दिवशी त्यांच्या सभेत थोडेफार बोललोही.

### फ्रान्सिस न्यूमनच्या घरी काही दिवस

तिसरी आठवणीत राहिलेली व्यक्ती म्हणजे फ्रान्सिस न्यूमन ही होय. हे त्यावेळी सगळ्या कामकाजातून निवृत्त होऊन समुद्रकिनाऱ्यावर असलेल्या वेस्टर्न सुपर मेयर येथे राहात होते. मी त्यांना पाहण्यासाठी तेथे गेलो आणि दोन दिवस त्यांच्याकडे राहिलो. त्यावेळी त्यांचे वय ऐंशी वर्षांहून जास्त असावे. तो शीतप्रधान देश असल्यामुळे त्यांचे हातपाय परस्वाधीन झाले होते. त्यांची पत्नी त्यांना कपडे घालण्याला मदत करी आणि हाताला धरून जिन्यावरून खाली आणी. जे दोन दिवस मी त्यांच्या घरात होतो त्या दोन दिवसांत मी पाहिले की, सकाळी खाली येऊन त्यांचे पहिले काम म्हणजे परमेश्वराचे नामस्मरण करणे. त्या उपासनेत त्यांची पत्नी, सैंपाकीण, मोलकरीण वगैरे सर्वजण उपस्थित असत. ते पहिल्याने धर्मग्रंथातील काही भाग वाचीत. नंतर ते स्वतः रचलेल्या प्रार्थनापुस्तकातून एक प्रार्थना म्हणत. जेवणाच्या वेळी पाहिले तो जेवायला म्हणून ते टेबलाजवळ येताच सर्व मंडळी उठून उभी राहत. ते वृद्ध साधुपुरुष जेवणाला आरंभ करण्यापूर्वी ईश्वराला धन्यवाद देऊन जेवणाला बसत. दुसऱ्या दिवशी जेवायला बसल्यावर ते मला म्हणाले, ' तुम्ही ज्या ज्या ठिकाणी जाल, त्या त्या ठिकाणी जे एकेश्वरवादी असतील त्यांना सांगा की त्यांनी नास्तिकाप्रमाणे जगात वागू नये. आपापल्या घरी व परिवारात ईश्वराचे नाव आणि उपासना यांना कायमचे स्थान द्यावे ! ' मी त्यांच्या वाचनालयात जाऊन पाहिले, तो त्यांच्या ज्या ग्रंथाचे मला नावही माहीत नव्हते त्या सर्व ग्रंथांनी ते वाचनालय परिपूर्ण असलेले दिसले. त्यांना इतक्या भाषा येत होत्या व इतक्या विषयांवर त्यांनी ग्रंथ लिहिले आहेत हे माझ्यासारख्या अनुयायी भक्तमंडळींनाही माहीत नव्हते. दोन दिवस मला त्यांनी समुद्रतीरावर नेऊन खूपच बोधसुधा पाजली.

### रेव्हरेंड चार्ल्स व्हॉयसी कुटुंबात एक दिवस

आठवणीत राहण्याला योग्य अशी चौथी व्यक्ती थिइस्टिक चर्चचे आचार्य रेव्हरेंड चार्लस व्हॉयसी ही होय. मी लंडनमध्ये असताना मधून मधून यांच्या उपासना मंदिरात जात असे. ते ज्या तऱ्हेने वेळीअवेळी खिस्ती धर्माचे व येशूचे दोष वर्णन करीत ते मला आवडत नसत. पण उदार आध्यात्मिक सर्वव्यापी धर्माचे सत्यस्वरूप व्यक्त करण्याची त्यांची शैली पाहून माझे मन मुग्ध होऊन जात असे. त्यांच्याशी परिचय झाल्यावर त्यांनी मला आपल्या घरी जेवणाचे आमंत्रण दिले. त्यावेळी त्यांची पत्नी व मुलगे-मुली यांच्याशी माझा परिचय झाला. बोलणेचालणेही झाले. त्यात त्यांनी मला अगदी आपलेसे करून घेतले. त्यानंतर एके दिवशी व्हॉयसी साहेबांच्या विनंतीवरून त्यांच्या उपासनामंदिरात माझे एक प्रवचनही झाले. त्यात ब्राह्मसमाजाने कोणकोणत्या कार्यात मन घातले आहे व तो समाज काय करीत आहे त्याचे थोडे-

फार विवेचन केले. त्याप्रमाणेच या देशात ब्राह्मसमाजिष्टांची कशी सामाजिक अडवणूक होत आहे तेही ओघाने आले म्हणून सांगितले. ते वर्णन उपस्थित व्यक्तींना अतिशय आवडल्याचेही मला स्मरते. एक विशेष घटना माझ्या मनात राहिली ती अशी : उपासना मंडपातून उतरून बाजूच्या खोलीत आल्यावर हॉयसी-साहेब आणि त्यांची पत्नी यांचे-माझे बोलणे चालले आहे तोच मिस्टर हॉयसींची धाकटी मुलगी ( तिचे वय त्यावेळी २७।२८ वर्षांचे असावे ) तेथे आली आणि मला बोलू न देता हाताला धरून ओढीत ओढीत म्हणाली, " मिस्टर शास्त्री, ब्राह्म-समाज हा माझा समाज आहे आणि भारत हा माझा देश आहे. मी तुमच्याबरोबर तिकडे येणार. मला नेणार की नाही सांगा ना ? " मी एकदोनदा तिला म्हटले, " थांब. बोलू तरी देशील की नाही ? " पण तिला विलंब सहन होत नव्हता. ती पुनः मला ओढून धक्का देऊन म्हणाली, " मला तुम्ही आपल्याबरोबर नेणार की नाही ते सांगाना " तेव्हा मग मी तिच्या आईच्या तोंडाकडे पाहून हसून म्हटले, " आपली मुलगी माझ्याबरोबर निघाली बरं ! " तीही हंसूनच म्हणाली, " जाण्याचा अर्थ काय तेही हिला अजून कळत नाही. तरीपण वाईट काय, जा तिला घेऊन. " व्हॉयसी साहेबांची एक मुलगी, सिंधप्रांतातील कोणाएका ब्राह्म-तरुणाशी विवाहित होऊन भारतात आली आहे. ती हीच मुलगी की दुसरी ते मला माहीत नाही.

यानंतर मी भारतात आल्यावर व्हॉयसी साहेब आपली छापलेली प्रवचने दर आठवड्याला मला पाठवीत असत. नेहमी पत्रेही पाठवीत. आणि ब्राह्मसमा-जाच्या कार्यासाठी पैसेही पाठवीत. मरेपर्यंत त्यांनी हा आपलेपणा कायम ठेविला होता.

## पेलमेल गॅझेटचे संपादक विल्यम स्टेड यांच्या घरी

पाचवी स्मरणीय व्यक्ती विल्यम स्टेडसाहेब ही होय. हे त्यावेळी पेलमेल गॅझेटचे संपादक होते. कुमारी कॉलेट हिने पत्रद्वारे त्यांची माझी ओळख करून दिली होती. मी प्रथम पेलमेल गॅझेटच्या ऑफिसात जाऊन यांची भेट घेतली. आणि आसामातील कूलींची परिस्थिती व कूली कायद्याचे स्वरूप वर्णन करून या विषयाकडे इंग्लंडातील सर्वसाधारण लोकांचे लक्ष वेधेल असे लिहा अशी विनंती केली. या बाबतीत माझ्या तोंडून विशेष माहिती मिळावी म्हणून एके दिवशी मला त्यांनी आपल्याकडे जेवण्याचे आमंत्रण दिले. मी जाऊन पाहिले तो ते जेवणापूर्वी आपल्या लहान मुलांना घेऊन बाजूच्या खोलीत एकीकडे बसले होते आणि गप्पागोष्टी करता करता वागणुकीसंबंधाने निरनिराळे नियम उपदेशरूपाने सांगत होते. मी आलो आहे हे समजताच त्यांनी मला त्या खोलीत बोलवून घेतले. आणि मी तेथे जाऊन बसल्यावर मला म्हणाले, ' मी मोठ्या महत्त्वाच्या कामात

नेहेमी गढलेला मनुष्य. दिवसाचा बराचसा भाग त्याच गडबडीत मी असतो. मुलांत दिवसाचा काही वेळ घालवावयाचा असा निश्चय न केल्यास त्यांच्या शिक्षणाकडे आणि प्रगतीकडे माझे दुर्लक्ष होईल. यासाठी असा नियम केला आहे की जेवणापूर्वी एक तास त्यांच्यात कसेही करून बसायचेच. यावर मी म्हटले, ' हे फार उत्तम ' त्यानंतर माझ्या समक्षच ते त्या मुलांशी बोलू लागले. पाहिले तो, अगदी सहज सोप्या भाषेत इतक्या गहन आणि महत्त्वाच्या विषयांचे ज्ञान त्यांना ते देऊ लागले की, त्यामुळे मुलांचे भवितव्य अतिशय उज्ज्वल होऊ शकेल.

जेवणानंतर आसामातील कूलींची अवस्था मी सांगू लागलो. मी खुर्चीवर बसून सांगत होतो आणि स्टेडसाहेब खोलीच्या या टोकापासून त्या टोकापर्यंत येरझारा घालीत होते. मधून मधून ' त्यानंतर ' ' त्यानंतर ' असे म्हणत होते. यावरून थोडासा हास्यविनोद झाला. मी हसतच म्हटले, तुम्हीं मला झुऑलॉजिकल गार्डनमधील वाघाचीच आठवण करून देत आहा ! थोडे बसा ना ! ' स्टेड म्हणाले, ' आय् कॅनॉट मेक माय माईंड सिट्डाउन ' ( मी माझ्या मनाला बसवू शकत नाही ना ! ) मी पुनः म्हटले, " अर्धा तास बसा. तेवढेही होत नाही ? तर माझ्याबरोबर भारतात चला. म्हणजे आमच्या देशातील साधूलोक सकाळपासून सायंकाळपर्यंत ध्यानमग्न असलेले तुम्हांला मी दाखवून देईन. " यावर ते टाळी वाजवून हसतच म्हणाले, " ओः समजलो. समजलो. अजूनपर्यंत मी विचार करीत होतो, इतक्या कोट्यावधी लोकांना आम्ही जिंकले तरी कसे ? आता इतक्या दिवसांनी त्याचे कारण समजले. तुम्ही डोळे मिटून बसला आणि आम्ही मागून तुमच्यावर झडप घालून जिंकले ! " या त्यांच्या विनोदाने हास्याचे फवारेच उसळले.

आणखीं एका दिवसाची गोष्ट मला आठवते. त्या दिवशीही त्यांनी मला जेवायलाच बोलाविले होते. त्या दिवशी जेवणानंतर मी त्यांना व त्यांच्या पत्नीला, प्रेमतत्त्व व मानसिक प्रेरणा ( टेलिपॅथि ) या बाबतीत काही सांगितले. त्यापूर्वी लंडनमधील कोणत्याशा एका कुटुंबात असाच पाहुणा म्हणून गेलो असता तेथे घडलेल्या हकीगतीचे वर्णन केले होते. तो विषय असा : एके दिवशी जेवणानंतर त्या घरातील मुलींनी मला एक खेळ दाखविला. एक मुलगी मला शेजारीच असलेल्या एका खोलीत घेऊन गेली आणि हातरुमालाने तिने माझे दोन्ही डोळे बांधले. नंतर ती मला म्हणाली, " तुम्हांला मी बैठकीच्या खोलीत घेऊन जात आहे. तेथे मी तुम्हाला उभे करीन. स्वतःच्या मनात कोणतीच इच्छा ठेवू नका. गप्प उभे राहायचे. त्यानंतर चालावेसे वाटले तर चालू लागायचे. काही करावेसे वाटले तर तसे करा अडू नका. मी तुमच्या खांद्यावर हात ठेवून मागे उभी आहे. असे म्हणून तिने माझ्या डोळ्यांवर रुमाल बांधून मला बैठकीच्या खोलीत आणून उभे केले. मागे राहून माझ्या खांद्यावर हात ठेवला. प्रयत्नपूर्वक मी माझे मन निर्विचार केले. हळू हळू चालावेसे वाटले. डोळे बांधलेल्या स्थितीतच मी चालू लागलो.

हात पुढे करावासे वाटले. हात पुढे केला. एका खुर्चीवरून एक कापड उचलण्याची इच्छा झाली. त्याप्रमाणे ते उचलले. त्याच वेळी चोहोकडून टाळ्या वाजविल्याचा आवाज ऐकू आला. लागलीच डोळ्यांवरचा बांधलेला रुमाल मी काढला. तेव्हा ऐकले की, त्या खोलीत स्त्रीपुरुषांनी जसे मनात योजिले होते, तसेच सर्व घडून आले. डोळे बांधलेल्या त्या मनुष्याकडून ठराविक ठिकाणी ठेवलेले कापड उचलले जाईल. मी त्या खोलीत येताच तीच इच्छा त्यांच्या मनात जागृत होती. माझ्या मागे असलेल्या मुलीला हे सर्व माहीत होते आणि तिचीही तीच इच्छा होती. मला याबाबतीत काहीही माहीत नव्हते. पण त्यांच्या इच्छेप्रमाणे सर्व गोष्टी माझ्या हातून झाल्या याचे मला नवल वाटल्यावाचून राहिले नाही.

स्टेड आणि त्यांची पत्नी यांना जेव्हा मी ही हकीगत सांगितली तेव्हा स्टेडसाहेब हसून म्हणाले, ' असे कधी झाले आहे ? मला काही समजू द्यायचे नाही आणि माझ्याकडून काम करून घ्यायचे. छे. माझा नाही यावर विश्वास बसत. ' मी म्हटले, " या मी करून दाखवितो. " त्यानंतर बाजूच्या खोलीतून स्टेड साहेबांना डोळे बांधलेल्या स्थितीत बाहेर आणले. मी त्यांच्या खांद्यावर हात ठेवून मागे उभा राहिलो. पण त्यांच्याकडून जे काम करविण्याचे ठरविले होते त्यात मी यशस्वी होऊ शकलो नाही. मी त्यांना म्हटले, ' तुम्ही आपले मन निगेटिव्ह करू शकला नाही. माझ्या इच्छेचा तुम्ही प्रतिरोध केलात. ' नंतर त्यांच्या खोलीतील एका कोपऱ्यात असलेल्या टोपीत एक पैसा ठेवून मिसेस स्टेडचे डोळे बांधून तिला आणली. मी तिच्या पाठीवर हात ठेवून मागे उभा राहिलो. ती नंतर अगदी सरळ चालत खोलीच्या कोपऱ्यात गेली आणि तिने वाकून टोपीत हात घातला पण पैसा उचलला नाही. हे पाहून मात्र स्टेड काहीसे विस्मित झाले. त्यानंतर त्यांच्या एका मुलीला डोळे बांधलेल्या अवस्थेत आणण्यात आले. यावेळी असे ठरले, की तिने ठरलेली एक वस्तू घ्यावी आणि ती नेऊन आपल्या धाकट्या भावाच्या हातात द्यावी. नंतर त्याप्रमाणे ती येऊन उभी राहिली. मी मागे उभा राहून तिच्या खांद्यावर हात ठेविला. थोड्या वेळाने डोळे बांधलेल्या स्थितीत ती चालू लागली आणि ती ठरविलेली वस्तू उचलून धाकटा भाऊ उभा होता तिकडे निघाली. तितक्यात स्टेड साहेब आपली पत्नी व इतर मुले यांसह त्या तिच्या भावाजवळ जाऊन त्याच्याप्रमाणेच हात पसरून उभे राहिले. डोळे बांधलेली मुलगी तेथे गेली आणि सर्वांच्या हाताला स्पर्श करून ते सोडले आणि शेवटी आपल्या धाकट्या भावाच्या हातातच तिने ती वस्तू दिली. आता मात्र स्टेडसाहेब आश्चर्यचकित झाले आणि मला म्हणाले, " तर मग या प्रक्रियेत काही विशेष आहे खरे. एका मनाच्या शक्तीने जर दुसऱ्या एका मनाकडून व शरीराकडून अपेक्षित कार्य करविले जाते तर मग परलोकी असलेले आत्मे या जगातील माणसांकडून कामे करून घेणार नाहीत ? " मी उत्तर दिले, " हो अगदी बरोबर " नंतर मी भारतात

निघून आलो. काही दिवसांनंतर ऐकले की स्टेड साहेबांनी भूत-पिशाचासंबंधाने अनेक गोष्टी उघडपणे प्रसिद्ध केल्या आहेत. त्यांनी प्रसिद्ध केलेल्या वर्तमानपत्रातून आणि पुस्तकातून याबद्दलचे अनेक आधार मला मिळू लागले. पण ज्यावेळची ही हकीगत मी लिहीत आहे त्यावेळी त्यांच्याकडे असताना असा काहीच प्रत्यय मला आला नाही. यावरून असे अनुमान करता येईल की, इतर घटनांप्रमाणे याही बाबतीत त्यांना तशी प्रेरणा झाली असावी.

ज्या ज्या व्यक्तींचा विशेषरूपाने नामोल्लेख केला आहे त्याखेरीज आणखीही कित्येक नामवंत स्त्रीपुरुषांशी माझी प्रत्यक्ष भेट झाली होती. अध्यापक मोनियर विल्यम्स, अध्यापक जॉन एस्टलीन कार्पेंटर, रेव्हरंड स्टॉपफोर्ड ब्रुक, मिसेस फॉसेट, मिसेस जोसेफाईन बटलर अशी बरीच नावे सांगता येतील.

## मिसेस बटलरची स्त्रीस्वातंत्र्याची चळवळ

या सर्वांत मिसेस बटलरला पाहून माझ्या अन्तःकरणात नवशक्ती संचरल्या-सारखा मला अनुभव आला. ती त्यावेळी ज्या पद्धतीने कार्य करीत होती त्या पद्धतीमुळे महिलामंडळात एक आश्चर्यकारक उत्साह व सामर्थ्य संचारले होते. ज्यावेळी तिचेमाझे बोलणे झाले त्यावेळी ती आयरिश नेता पार्नेल याच्या पक्षात होती. पण पुढे लवकरच पार्नेलची चारित्र्यहीनता उघड झाल्यावरून तिच्या महिला मंडळाने त्याच्या विरुद्ध शस्त्र धारण केले. आणि स्त्रियांच्या शस्त्राघातासमोर पार्नेलला उभे राहणे अशक्य होऊन तो लवकरच खिस्तवासी झाला. इंग्लंडची स्त्रीशक्ती सामाजिक पावित्र्याचे कशातऱ्हेने रक्षण करीत असते ते या देशातील लोकांना माहीतच नाही. भारतातील प्राचीन सनातन्यांना असे वाटते की, स्त्रियांना सामाजिक स्वातंत्र्य दिल्यास समाजात पावित्र्यच राहणार नाही. अगदी याच्या उलट खरा प्रकार असा आहे की स्त्रियांचे शिक्षण आणि स्वातंत्र्य यांवरच समाजाचे सामर्थ्य आणि पावित्र्य टिकून राहते.

* * *

. १९.

# इंग्लंडचा स्त्रीसमाज

## इंग्लंडच्या स्त्रीजातीची प्रगती

इंग्लंडला गेल्यावर त्या देशाचे जे मुख्य स्वरूप माझ्या नजरेसमोर आले आणि जे पाहून मी विस्मयचकित झालो ते म्हणजे स्त्रियांची प्रगत आणि उन्नत अवस्था. दुर्गामोहन दास यांची माझी बहुतेक रोज भेट व्हायचीच. ते भेटले की मी त्यांना म्हणायचा, "दुर्गामोहनबाबू, हा तर स्त्रीराज्याचा देश आहे." त्यांच्या गुणवत्तेनेच या देशाला एवढा मोठेपणा आला." ते यावर म्हणत, "खरेच. नेपोलियन म्हणत असे, इंग्लंडच्या स्त्रियांसारख्या स्त्रिया द्या म्हणजे मी फ्रान्सला सामाजिक दृष्ट्या श्रेष्ठ बनवून दाखवितो." याचे प्रत्यंतर मला येथे आल्यावर झाले. इंग्लंडच्या श्रेष्ठतेला तेथील स्त्रियांची पार्श्वभूमीच कारण आहे. अशी इंग्लंडला गेल्यावर माझी पक्की खात्री झाली.

श्रीमंत स्त्रीवर्गात मिळून मिसळून वागण्याचा मला योग आला नाही आणि त्यामुळे त्यांचे स्वभावगत चारित्र्य मला जाणता आले नाही. मग त्याबद्दल काय सांगणार ! मध्यमवर्गाच्या स्त्रियांत मला मिळून मिसळून वागण्याचा योग येई; त्यामुळे त्यांच्याविषयी मला माहिती आहे. भारतातील लोक पडदानशीन पद्धतीत वाढलेले आणि सामाजिक बंधनात जखडलेले असल्यामुळे त्यांच्या हाडी-माशी अशा समजुती बद्धमूल झालेल्या आहेत की, स्त्रियांना स्वातंत्र्य दिल्यास व त्यांना मोकळेपणाने समाजात वावरू दिल्यास त्यांना आपले चारित्र्यिक पावित्र्य सांभाळता येणार नाही. ही किती चुकीची कल्पना आहे हे, जर ते इंग्लंडच्या मध्यमवर्गीय स्त्रियांत मिळून मिसळून वागतील तर त्यांना कळेल.

मी ज्यावेळी इंग्लंडला गेलो होतो त्यावेळी तेथे स्त्रियांत शिक्षणाचा विस्तार करण्यासाठी, त्यांना राजकीय अधिकार मिळावे म्हणून आणि स्त्रीवर्गाची सर्व

प्रकारे उन्नती व्हावी म्हणून प्रयत्न चालले होते. यामुळे तेथील स्त्रियांत एक नवी भावना व उन्नतीची विशेष आकांक्षा वाढीला लागलेली आढळली. सर्व प्रकारच्या सत्कार्यात, सर्व उन्नतिकारक चर्चेत, त्यासंबंधी विचारविनिमयात आणि सदुद्योगात त्या गुंतलेल्या आढळत. एखादी उद्योगधंद्याची सभा असू दे; एखादे धार्मिक समालोचन असू दे, किंवा प्रवचन असू दे तेथे पाहावे तर निम्मेपेक्षा जास्त स्त्रिया आहेतच. आणि त्यांची गर्दी बाजूला सारून मला पुढे जावे लागायचे. एखाद्या मित्राच्या घरी काही विचारविनिमयासाठी त्याच्या बोलवण्यावरून मी गेलो तर तेथे पाहावे तो निम्मेपेक्षा जास्त स्त्रिया आहेतच.

## खालच्या वर्गातील मध्यम श्रेणीच्या कुटुंबात स्त्रियांची वाचनाची सवय

एकदोन घटनांचा उल्लेख केला असता, तेथील स्त्रियांची काय स्थिती मी पाहिली हे सर्वांना कळून येईल. मी ज्यांच्या घरात राहात होतो त्या कुटुंबाचे वर्णन पूर्वी दिलेच आहे. ते कुटुंब म्हणजे खालच्या वर्गातील मध्यमश्रेणी म्हणायला हरकत नाही. त्या स्त्रिया दारांना व खिडक्यांना लावण्याचे पडदे शिवून त्यांच्या विक्रीवर आपला निर्वाह करीत. तरी पण आपल्या वृद्ध पित्याला दर सोमवारी घरातील स्त्रियांना वाचण्यासाठी म्हणून मुडी येथील सुप्रसिद्ध ग्रंथालयातून पुस्तकांचा एक गठ्ठा आणावा लागे. आठवड्यात घरातील तीन मुली आणि त्यांची आई ही सगळी पुस्तके वाचून काढीत. ती परत देऊन पुनः सोमवारी नवीन पुस्तके येत. कोणा एखाद्या दिवशी संध्याकाळच्या जेवणानंतर स्त्रियांच्या बसण्याच्या खोलीत जर डोकावून पाहावे तर, त्या चौघीही वाचण्यात गढलेल्या आहेत असे दिसायचे. हे वाचन रात्री ११।१२ पर्यंत चालायचे. घरमालकाची मोठी मुलगी जेवणाच्या वेळी माझ्या-जवळ जेवायला बसायची. मी, इंग्रज कवि शेली आणि वर्डस्वर्थ यांचा भक्त, हे जाणून ती मला शेलीच्या पुष्कळशा कविता तोंडपाठ म्हणून दाखवी आणि शेलीच्या प्रतिभासंपन्नतेची प्रशंसाही करी. मी एके दिवशी एडविन आर्नोल्डने लिहिलेले 'इंडि-यन आयडिअल्स' नावाचे कवितांचे पुस्तक विकत आणून त्या मुलीला देणगीदाखल दिले आणि म्हटले,'या कविता तू वाच. आमच्या देशातील प्राचीन कविता तुला कशा आवडल्या ते नंतर तुझ्या तोंडून ऐकेन.' या ग्रंथात रामायण महाभारतातील सावित्रीचरित्र वगैरे अनेक चांगले चांगले विषय संग्रहीत केलेले आहेत. हे पुस्तक मिळताच त्या मुलीने रात्री सुमारे एकदोन वाजेपर्यंत ते वाचले. त्यानंतर दुसरे दिवशी प्रातःकालीन उपाहाराला बसलो असता मला म्हणाली, 'ओमिस्टर शास्त्री, तुमच्या सावित्रीचे चरित्रचित्रण किती सुंदर आहे! किती सुंदर आहे म्हणून सांगू? किती दिवसांपूर्वी हे चित्र रेखाटले आहे?" मी हसून म्हणालो, "येशू जन्मण्यापूर्वी दोन-चारशे वर्षे अगोदर की नंतर असावे, बरोबर सांगता येत नाही." तेव्हा ती मुलगी म्हणाली, "ज्या राष्ट्राने इतक्या काळापूर्वी हे सौंदर्य निर्माण केले

आहे ते राष्ट्र काही सामान्य राष्ट्र नव्हे!"

इंग्लंडात असताना मी ब्राह्मसमाजाच्या इतिहासाचे एक पुस्तक लिहायला आरंभ केला होता. मी जेवढे लिहीत असे तेवढे कुमारी कॉलेटला वाचून ऐकवीत असे. ब्राह्मसमाजाच्या इतिहासाविषयी तिच्यासारख्या जाणकार व्यक्ती फारच थोड्या. तिला त्यात सुधारणा करण्यासारखे असे जे काही वाटे त्याची सुधारणा करण्यात येई. पुस्तक लिहून झाल्यावर त्या लिखाणाची कॉपी कोण करणार, हा प्रश्न उत्पन्न झाला. कुमारी कॉलेट म्हणाली, 'मी तुम्हाला एक मुलगी देते. ती तुमच्या लिखाणाची नक्कल करून देईल. तिला प्रत्येक शंभर शब्दांना एक पेनीप्रमाणे द्या. असे म्हणून त्या मुलीसंबंधाने तिने मला थोडीशी हकीगत सांगितली; हिच्या आईच्या मृत्यूनंतर हिच्या बापाची चालचालणूक बदलली. त्याचे दारू पिणे तर वाढलेच पण त्याचे वेगवेगळे चरित्रगत दोषही दिसू लागले. तेव्हा त्या बिचारीला ते घर सोडून दुसरीकडे राहणे भाग पडले. ती आता वेगळ्या ठिकाणी राहाते आणि स्वतः उद्योग करून निर्वाह करते. रोज दुपारच्या वेळी काही तास बापाकडेही राहाते. .घरातील टापटीप ठेवते, केरवारा करते, सामानसुमान लावते अशा प्रकारे बापाची सेवा करून तो चांगल्या वागणुकीने राहील अशा प्रयत्नात असते. रात्री मात्र ती तेथे राहू शकत नाही.

या तरुणीबद्दलची एक घटना मला आठवते ती अशी : एके दिवशी सायंकाळच्या वेळी झालेले लेखन घेऊन ती माझ्याकडे आली. त्यावेळी मी फिरायला जाण्याच्या तयारीत होतो. तिने आणलेले ते लिखाण मी घेतले आणि तिचे झालेले पैसे तिला देऊन म्हटले, 'थांब, मी बाहेर जात आहे. आपण दोघेही एकदमच बाहेर पडू' नंतर दोघेही बाहेर पडलो. रस्त्यात मी तिला म्हटले, 'चल, तुझ्या घरापर्यंत फिरत फिरत जाऊ.' असे म्हणून तिच्या घराकडे निघालो. तेथून तिचे घर दीड मैलावर होते. पण हे अंतर चालता चालता आम्ही विसरूनच गेलो. बोलता बोलता प्राचीन यहुदी जातीच्या इतिहासाच्या गोष्टी निघाल्या. मी ओल्ड टेस्टॅमेंट आणि थोड्या दिवसांपूर्वी प्रसिद्ध झालेले प्राचीन यहुदी जमातीच्या इतिहासाचे एक पुस्तक वाचून जे मला कळले होते ते तिला सांगू लागलो. सांगता सांगता पाहिले तो त्या मुलीला यासंबंधाने इतकी माहिती असलेली मला जाणवली की, मी पूर्वी स्वप्नातही त्याबद्दल विचार केला नव्हता. बोलण्यात आम्ही इतके गुंग झालो होतो आणि ती इतक्या गोष्टी सांगू लागली होती की, तिच्या घराच्या दारात केव्हा येऊन पोचलो ते कळले नाही. कसा वेळ गेला कुणाला माहीत! तिच्या घरातून आम्ही दोघेही पुनः माझ्या घराकडे यायला निघालो. शेवटी माझ्या घराजवळ आल्यावर मी घड्याळ पाहिले तो जेवणाची वेळ झालेली. तिलाही कामासाठी दुसरीकडे जायचे होते. अर्थात् मला सोडून ती निघून गेली. ती मुलगी निघून गेल्यावर मी विचार करू लागलो, शंभर शब्द लिहिल्यावर हिला एक पेनी

मिळणार, पण हिचे ज्ञान माझ्यापेक्षा इतके विपुल आहे की, हिच्याशी केलेल्या संभाषणामुळे व ऐकलेल्या माहितीमुळे माझ्यावर तिने फार उपकार केले असेच मला वाटले. या देशात ज्ञानसंपादनाची आकांक्षा किती प्रबल आहे! सर्वसाधारण प्रजाजनांत ज्ञानसंपादनाची प्रबळ आकांक्षा असणे हा स्त्रीपुरुषांच्या साहचर्यात पावित्र्यरक्षणाचा एक मुख्य उपाय आहे असेही मला वाटले. जे दोन तास आम्ही दोघेही बोलण्याचालण्यात गढून होतो त्यात मी पुरुष आहे आणि ती एक तरुण कुमारिका आहे हे मी विसरूनच गेलो होतो. कसा वेळ गेला ते समजलेच नाही.

## बंगाली तरुणाच्या चित्तचांचल्याची गोष्ट

इंग्रज समाजातील मध्यमवर्गाच्या स्त्रियांच्या स्वभावचारित्र्याबद्दल जास्त सांगण्याचे कारणच नाही. एका गोष्टीचा उल्लेख केल्याने त्याची काहीशी कल्पना येईल. मी तेथे असताना एका बंगाली तरुणाच्या तोंडून जी घटना ऐकली होती, तिचाच मी येथे उल्लेख करतो. हा तरुण कोणत्याशा खेड्यात राहात होता. त्या ठिकाणी खालच्या वर्गातील मध्यम स्थितीतील एका तरुण दांपत्याकडे त्याने आपले बिन्हाड केले होते. घराच्याबाहेर ते दांपत्य एक दुकान चालवीत असे. त्यावर त्यांचा निर्वाह अवलंबून. शिवाय घरातील एक खोली ती भाड्याने देत व त्या राहणाऱ्याच्या जेवणखाणाचीही सोय करीत. त्यामुळे त्यांच्या प्रपंचाची सोय होई. घरात नोकरचाकर कोणी नव्हता. ती तरुण घरवालीच सर्व घरकाम करी. तिचे वय २२|२३ वर्षांहून जास्त नसावे. आमच्या या बंगाली तरुणाचे वय २६|२७ असावे. त्या तरुणीच्या पतीचे वयही तेवढेच. बंगाली तरुण सद्वर्तनी असल्यामुळे त्या दांपत्याला आनंद वाटला. पण इकडे एक संकट उपस्थित झाले. घरवाली तरुण स्त्री पाहुण्याची योग्य सेवा, या दृष्टीने त्या तरुणाशी अत्यंत सद्भावाने वागे. बोलण्याचालण्यात आपलेपणा असे. वेळच्या वेळी स्वतः चहा आणून देई, कपडे फाटले असतील तर शिवून आणी. त्याचे कोणतेही काम करण्यात ती तत्परता दाखवीं, हे कर ते कर म्हणून सांगे. एकांतात तो असायचा. त्यावेळी ती त्याच्याकडे येऊन म्हणे, "कसे काय, बरे आहे ना! तुमचे तोंड आज उतरलेले का दिसते?" वास्तविक या प्रश्नात तिचा सरळ स्वभाव व अगत्यच व्यक्त होई. पण आमच्या बंगाली तरुणाचे मन अस्थिर होई. त्याला कसेसेच वाटे. पण मुलगा संयमी आणि सदाचरणी असल्यामुळे मनातल्या मनातच तो हा संग्राम सहन करी. त्या तरुणीला आपली ही मनस्थिती तो जाणवू देत नसे. अशा या अवघड स्थिती-तून बाहेर पडावे म्हणून या घरात यापुढे आपण राहणे योग्य होणार नाही, असे त्याने शेवटी ठरविले. कारण केव्हा आपल्याकडून काय घडेल आणि कोणता शब्द तोंडातून निघेल हे कोणी सांगावे? आणि त्यापासून

पुढे भलताच प्रकार घडायचा! शेवटी एके दिवशी सायंकाळच्या वेळी जेवण चालले असताना, काही कारण न दाखविता त्याने त्या तरुण दांप-त्याला आपला हा ठरविलेला बेत सांगितला; तो ऐकून त्या दोघांनाही फार वाईट वाटले. त्यांनी त्या स्थितीतच त्या तरुणाला राहण्याचा आग्रह चाल-विला. दोघांनीही दाखविलेल्या त्या आपुलकीमुळे त्याला कमजास्त काही बोलता येईना. मनाचा बिघडत चाललेला तोल व अंतरीचा वासना-विकार यांचा संग्राम तो कसा सांगणार! ती रात्र त्याने मोठ्या काळजीतच घालविली. चांगलीशी झोपही लागली नाही त्याला. दुसऱ्या दिवशी दुपारी कपाळ विशेष दुखू लागल्यामुळे अवेळीच कॉलेजातून तो घरी आला. त्यावेळी ती तरुण स्त्री एकटीच घरी होती. पती दुकानात गेला होता. तो येताच तिला म्हणाला, "हे पाहा, माझे मस्तक आज फारच दुखू लागले आहे. एक कप चहा देशील तर बरे होईल." ती म्हणाली, "त्यात काय! आणते करून." आणि मग चहा बनविण्यासाठी ती आत गेली. आणि लवकरच त्याच्या त्या एकांतातील खोलीत बिछान्याजवळ येऊन तिने त्याला चहा देऊन विचारले, "तुम्हाला काय होत आहे? डोके का दुखू लागले? चेहेराही कसासाच झालेला दिसतो. रात्री झोप लागली नाही वाटते? खात्रीने तुमच्या मनात कसले तरी दुःख होत असावे. काय होत आहे ते सांगा. आमच्याकडून त्या दुःखाचा परिहार करता आला तर आम्ही अवश्य करू."

यावेळी त्या तरुणीच्या चेहेऱ्याकडे पाहून त्याला आपले मन आवरता येणे कठीण झाले. मनाच्या त्या आवेगासरशी त्याने तिचा हात धरला आणि म्हटले, "तु बैस इथे. सांगतो मी." ती हात धरण्याची तऱ्हा आणि त्यावेळचा त्याच्या चेहेऱ्यावरचा भाव यावरून ती तरुण स्त्री काय समजायचे ते समजली. इतके दिवस जे त्याचे गुपित होते ते संधी सापडताच एकदम उफाळून आले. तरुणीने आपला हात सोडवून घेऊन विस्मयाने म्हटले, "हे काय मिस्टर! तुम्ही विवाहित आहा ना? आणि तुमची पत्नीही घरी आहे ना? भारतातील विवाहित पुरुष काय असे वागू शकतात?"

त्यानंतर त्या बंगाली तरुणाच्या तोंडून जे ऐकले ते असे : तो सांगत होता, "तिचे ते बोलणे ऐकून माझ्या छातीत एखाद्याने धारदार सुरा खुपसावा असेच मला वाटले. माझ्या मस्तकात तुफानी वाऱ्यासारखा कसला तरी आवाज होऊ लागला आणि मला चक्कर येत आहे असे वाटले. मी तिचा हात तर सोडलाच पण खाली मान घालून स्वस्थ बसून राहिलो. ती काही वेळ स्तब्ध उभी राहिली आणि चहाचा कप टेबलावर ठेवून निघून गेली. मी मग चहा कसचा घेतो. तसाच विग-लित होऊन बिछान्यावर पडून राहिलो. डोळे मिटले होते आणि विचारांनी मन भारावून गेले होते. बऱ्याच वेळाने मी उठलो आणि तिच्या नवऱ्याच्या नावाने

एक पत्र लिहिले. त्याचा सारांश असा– 'मी तुमचे घर सोडून जात होतो त्याचे कारण असे की, तुमच्या पत्नीला पाहून माझे मन लालसेने लोभावत होते. तिला बिचारीला मात्र यातले काहीच माहीत नव्हते. आज मला ती एकांतात असलेल्या माझ्या खोलीत मिळताच माझा तो मनोवेग अनावर होऊन मी तिचा अपमान केला आहे, ते सर्व तिला विचारले असता तुम्हाला कळून येईल. याबद्दलचा बदला माझ्याकडून तुम्ही काय घेऊ शकता, कळवा. जर तुम्ही मला लाथ मारून घालवून देत असाल, तर त्याचा मला खेद वाटणार नाही. जर आर्थिक शासन करीत असाल तर किती ते सांगा. आणि मी तुमचे किती देणे आहे त्याचे बिल द्या. उद्या सकाळीच मी तुमचे घर सोडून जाणार. मला क्षमा करण्याबद्दल तुम्ही आपल्या पत्नीला सांगा. दुसरे, आज सायंकाळी मी तुमच्याबरोबर जेवणार नाही. माझे जेवण माझ्या खोलीतील टेबलावर ठेवायला सांगा. बाहेरून फिरून आल्यावर रात्री मी जेवीन.'

'सायंकाळी मी हे पत्र त्याच्या पत्नीच्या हाती देऊन बाहेर फिरायला गेलो. नंतर रात्री येऊन पाहिले तो, माझ्या टेबलावर माझे जेवण आणून ठेविलेले दिसले. जेवणानंतर मी झोपी गेलो. सकाळी उठून सामानसुमान बांधीत आहे तोच घरवाली तरुण पत्नी चहा घेऊन हसत हसत आत येत असलेली मला दिसली. तिला पाहताच लाजेने मी खाली मान घातली. ती म्हणाली, 'तू माझ्या नवऱ्याला जे पत्र लिहिलेस ते मी वाचले आहे. तू फार चांगला माणूस आहेस. हे पाहा, अशा प्रकारचे प्रलोभन आपल्यापैकी अनेकांच्या मार्गात येत असते. ईश्वराचे नाव घेऊन त्याला दूर झटकून मोकळे झाले की संपले. तुझे तसेच होईल. हे प्रलोभन आता राहणार नाही. तुझी मी बहीण आहे असेच समज ना ! मला बहीण समजून माझ्याकडे पाहा पाहू ! मीच तुला ते सामर्थ्य देईन. आम्ही उभयतांनी या बाबतीत विचारविनिमय केला आहे. तुला आम्ही केव्हाच इथून जाऊ देणार नाही. तू आमचा मित्र आहेस. असा मित्र सहसा मिळत नसतो.' नंतर मी त्याच घरात राहिलो. आणि त्या वेळेपासून मी त्यांचा मित्रच झालो आहे."

खालच्या वर्गातील मध्यमवर्गीय स्त्रियांचे चारित्र्य जर असे तर उच्च दर्जाच्या मध्यमवर्गीय स्त्रियांचे चारित्र्य कसे असेल याचे सहजच अनुमान करता येण्यासारखे आहे.

## इंग्लंडातील स्त्री-स्वातंत्र्याचे स्वरूप

मध्यमवर्गीय स्त्रिया स्वतंत्रतेने सर्व ठिकाणी, सर्वसमालोचक सभात, सर्व कामात सामील होत असतात, असे पूर्वी मी सांगितले आहे; यावरून त्यांच्यात सामाजिक बंधन अगर सामाजिक शासन नाही असे कोणी समजू नये. इतकेच नव्हे तर इतकी कडक बंधने दुसरीकडे क्वचितच आढळतील. मी ज्यांच्या घरी

राहात असे त्या घराच्या बाहेरच्या दरवाजाची चावी जर बाहेर जाताना बरोबर न्यायला एखाद्या दिवशी विसरलो आणि येण्याला बरीच रात्र झाली तर दाराला धक्का देताच जिन्यावरून उतरतानाचा खटखट आवाज ऐकू येई. एक मुलगी येऊन चावीने दार उघडून देई. पण मी खट् करून दार उघडतो न उघडतो तोच ती अंतर्धान पावलेली असे. मी वर पाहिले तर जिन्याच्या वरच्या टोकाला नाईट गाऊन घातलेली स्त्रीमूर्ती पाठमोरी असलेली आढळे. मी सहासात महिने त्यांच्या घरात होतो पण मुली कोणत्या खोलीत झोपतात हे मला ठाऊक नव्हते. त्या देशातील स्त्रियांच्या शयनमंदिरात पुरुषाने प्रवेश करण्याइतके निंद्य काम दुसरे कोणतेही नाही. स्त्रीपुरुषांनी एकत्र बसणे उठणे, मिळूनमिसळून वागणे, रस्तोरस्ती एकत्र फिरणे हे निषिद्ध नाही. पण चालीरीती, मानसन्मान यांचे कायदे इतके कडक आहेत की, त्यात थोडीशी चूक होताच मित्रत्व राहात नाही. समजा, एका स्त्रीची दोन दिवसांपूर्वीच ओळख झाली. बोलीभाषण झाले, परिचय झाल अशा स्थितीत अकस्मात् एखाद्या पत्रात जर थोडीफार प्रेमाची भाषा लिहिली तर त्यांच्या घरात त्या पत्रलेखकाचे नाव निघताच " हे काही चांगले लक्षण नाही. कामाला सुरवात करण्याअगोदरच बिदागी मागणे ! " अशी भाषा चालते. समजा त्यावेळी तिच्याकडून उत्तर आले नाही, कदाचित् तिच्या वडील बहिणीने गंभीरतेने जे काही सांगावयाचे असेल ते सांगितले. तर मग समजावे, मित्रत्वापासून आपल्याला दहा हात दूर लोटण्याचाच त्यांचा हेतू आहे. यापुढे ते मित्र म्हणून आपला स्वीकार करणार नाहीत. असे सामाजिक कायदे—कानूचे पुष्कळ बंधन आहे. स्वातंत्र्याबरोबरच शिस्तही आहे असेच समजायचे.

## एक क्वेकर कुटुंब

इंग्लंडातील स्त्रियांच्या उन्नतीचे प्रमाणभूत असे एक निदर्शन मी पाहिले त्याची मला आठवण आहे. सॉमर्सेटशायरमध्ये स्ट्रीट नावाचा एक गाव आहे. त्या ठिकाणी इम्पी नावाचा क्वेकर सांप्रदायातील एक परिवार राहतो. त्या परिवारात पुरुष असा कोणी नाही. विधवा आई आणि अविवाहित दोन मुली अशी तीनच माणसे. या मुलींचा बाप शेतीला आवश्यक असे बी-बियाणे विकण्याचे काम करीत असे. त्या धंद्यात त्याने चांगलीच कमाई केली आणि पुष्कळ संपत्ती मागे ठेवून तो मरण पावला. त्याच्या मृत्यूनंतर त्याच्या वडील मुलीने ते बी-बियाणे विक्रीचे काम आपल्या हाती घेतले. शिवाय या व्यवसायाखेरीज आणखीही तदंगभूत अशा काही व्यवसायांची भर घालून बापाचा धंदा तिने चांगलाच भरभराटीला आणला. वेगवेगळ्या व्यवसायांतून तिने ज्या एका उपयुक्त आणि मोठ्या व्यवसायाला आरंभ केला, त्याची हकीगत मी आता सांगतो. त्या जिल्ह्यात सफरचंदांची फारच निपज होत असे. आणि त्या देशातील लोक त्या फळांचा उपयोग मद्य-

निर्मितीकडे करीत. त्यामुळे या फळांचा व्यापार तेथे चांगलाच चालत असे. मी ज्या परिवाराची गोष्ट सांगत आहे त्या परिवारातील सर्व मंडळी मद्यपानविरोधी. म्हणून त्या मायलेकींनी असा विचार केला, की या फळापासून जेली तयार करून जर त्याची विक्री केली तर मद्यनिर्माण करणारी हजारो सफरचंदे या उपयुक्त व आहारोपयोगी पदार्थाकडे खर्च होऊ लागल्यामुळे आपोआपच मद्याचा व्यवसाय मंदावेल. हा दूरदर्शी बेत आईला पसंत पडल्यामुळे तिने आपल्या भावाचा सल्ला घेऊन व दोघांचेही भांडवल एकत्र करून जेली तयार करण्याचे यंत्र बसविले. भाऊ म्हणजे मुलींचा मामा झाला स्लीपिंग पार्टनर. म्हणजे त्याने फक्त भांडवल गुंतविले. व्यवसायात लक्ष घातले नाही. त्याची बहीण म्हणजे मुलीची आई झाली मॅनेजिंग पार्टनर. अर्थात् कार्याध्यक्ष.

या कुटुंबातील धाकटी मुलगी पूर्वीपासूनच ब्राह्मसमाजाची आवड असलेली होती. आणि त्यामुळे आमची अनेकांची नावे तिने ऐकलेली होती. मी एकवेळ त्यांच्या गावी व त्यांच्या घरी ' आलेच पाहिजे ' या मजकुराची पत्रे ती मला वारंवार लंडन येथे पाठवू लागली.

' आम्ही तिघीजणी स्वतःचे जीवन कसे चालवितो ते एकदा इथे येऊन राहून पाहा. ' हा मजकूर तिच्या पत्रात मला वारंवार आढळू लागला.

एकदा ती धाकटी मुलगी कॅथेरिन लंडनमध्ये येऊन मला भेटली. आणि आपल्या गावी येण्याबद्दल मला तिने आग्रह चालविला. शेवटी त्यांच्या घरी काही दिवस राहून येताना प्रो. एफ्. डब्ल्यू. न्यूमनची भेट घेऊन मागे परतावे असे ठरवून मी कॅथेरिनच्या गावाला निघालो. तिच्या घराहून परत येताना प्रो. न्यूमनच्या घरी दोन दिवस मुक्काम केला होता. ही हकीगत पूर्वी आलीच आहे.

स्ट्रीट रेल्वेस्टेशनात उतरलो तो कॅथेरिन स्वतः गाडी घेऊन आलेली दिसली. दहा बारा मिनिटांत तिने माझे सामान गाडीत ठेवले आणि मला आपल्याजवळ बसवून घेऊन तिने गाडी हाकण्याला सुरवात केली. दुपारी घरी पोचल्यावर तिच्या आईला पाहिले. पण तिची वडील बहीण ऑफिसात गेली असल्यामुळे मला ती घरी दिसली नाही. माझा अल्पोपाहार झाल्यावर कॅथेरिन मला म्हणाली, ' चला आपण फिरून येऊ या. ' असे म्हणून ती मला एका निर्जन पहाडावरील जंगलात घेऊन गेली आणि म्हणाली, ' माझ्या धार्मिक जीवनाची माहिती सांगावी म्हणून मी तुम्हाला येथे घेऊन आले आहे. पण सकाळपासून झालेल्या पायचालीने मी अगदी दमून गेले आहे तेव्हा या हिरवळीवर पडून बोलते. तुम्ही त्याबद्दल मनाला काही वाटून घेऊ नका. ' असे म्हणून ती गवतावर आडवी झाली आणि आपल्या धार्मिक जीवनात कसकसे परिवर्तन घडले ते सांगू लागली. तिच्या सांगण्याचा

सारांश असा; ती शाळेत शिकत असताना एका सहाध्यायी मुलीच्या भावाची संगत तिला जडली आणि त्यामुळे ब्रॅडलॉच्या दलांतील नास्तिकांच्या पक्षात ती सामील झाली होती. तिची आई आणि वडील बहीण कट्टर ख्रिश्चन. आपल्या धाकट्या मुलीचा धार्मिक मनोभाव बदललेला आहे हे ध्यानात येताच आई आणि बहीण यांना दुःख वाटले. पण परमेश्वराने अगदी लवकरच या नास्तिकतेतून तिचा उद्धार केला. नंतर तिचे मन सर्वव्यापी किंवा सार्वभौमिक एकेश्वरवादाकडे वळले. याच वेळी योगायोगाने ब्राह्मसमाजाविषयी तिला कळल्यामुळे तिने त्या समाजाची माहिती मिळविण्याचा प्रयत्न केला. शेवटी तिने मनोमन संकल्प केला की, अविवाहित राहून ईश्वरभक्ती आणि मानवसेवा यातच आपल्या सर्व शारीरिक आणि मानसिक शक्तीचा व्यय करावयाचा ? त्यालाच समर्पण व्हायचे. आणि सध्याचे तिचे आयुष्य या संकल्पाप्रमाणे चालले होते.

मी दोन दिवस या परिवारात राहिलो आणि तेथे मला फार अपूर्वाई वाटली. सगळे काही अपूर्वच. त्या घरात सर्व स्त्रियाच. पुरुषाचा वासवारा नाही; हे मी पूर्वीच सांगितले आहे. चोवीस तासांत एकाही पुरुषाचे तोंड दिसत नाही. अशा या स्थितीत त्यांची दिनचर्या कशी होती पाहा : वडील मुलीची धर्मनिष्ठा फार दांडगी. ती सकाळीच निरनिराळे धार्मिक ग्रंथ आणि चांगल्या चांगल्या उपदेशपूर्ण ग्रंथातील उतारे असलेले पुस्तक वाचीत असे. नंतर स्वतः उपासना करी. उजाडताच वाचलेल्या मजकुरापैकी जो जो चांगला वाटला त्यावर खुणा करून ते पुस्तक आपली धाकटी बहीण कॅथेरीन हिच्या डोकीखाली असलेल्या उशीखाली ठेवून प्रातःकृत्ये आटोपल्यावर ऑफिसात जाण्याच्या तयारीला लागे. सात वाजता उपाहाराची घंटा वाजे. मी जाऊन पाहावे तो, आई, वडील व धाकटी अशा दोन्ही मुली, इतर चार दोन प्रतिष्ठित स्त्रिया आणि मोलकरणी उपासनेच्या जागी उपस्थित. ती उपासनाही नावीन्यपूर्ण अशीच. गाणे नाही, तोंडी प्रार्थना नाही. मोठ्या मुलीने कोणत्याशा धार्मिक ग्रंथातील काही भाग वाचून दाखविला. त्यानंतर सर्वांनी डोळे मिटलेल्या स्थितीत पंधरा मिनिटे ईश्वरध्यानात घालविली. नंतर सकाळचा उपाहार झाला. पाहातो तो सर्वजणीच शाकाहारी. टेबलावर मांसमच्छराचा वासही नाही !

ज्या एकदोन दुसऱ्या स्त्रिया पाहिल्या त्यांची हकीगत अशी : आई आणि वडील मुलगी दोघेही जेव्हा आपापल्या परीने धंदा-व्यवसायात यशस्वी होऊ लागली तेव्हा तिघा मायलेकरांनी एकत्र बसून एकमेकांच्या विचाराने असे ठरविले की, जगदीश्वर आपल्याला संपत्ती देत आहे तेव्हा त्या संपत्तीचा उपयोग आपण त्याच्या कामासाठी केला पाहिजे. आपल्या घराशेजारी जी बाग आहे त्यात हॉस्पिटल बांधून ते लोकोपयोगी होईल असे करावे. त्यात डॉक्टर, परिचारिका इत्यादि सर्व असतील. आपल्या मैत्रिणींपैकी कोणी आजारी पडल्यास त्यांनी रोगमुक्त

होण्यासाठी, स्वास्थ्यासाठी इच्छेनुसार तेथे येऊन राहावे. त्यांचा खर्च आपल्या परिवारातून व्हावा. मी ऐकले की अशाप्रकारच्या चारदोन स्त्रिया तेथे नेहमी असतातच.

याशिवाय त्यांनी असे ठरविले, आपण कॅथेरिनला एक गाडी व दोन घोडे द्यायचे. तिने गाडीत बसून स्ट्रीटगावच्या चारपाच मैलांच्या परिघात शेतकरी आणि मजूर यांच्या घरी जाऊन त्यांना मद्यपानापासून मुक्त करण्याचा प्रयत्न करावा आणि त्यांच्या मुलाबाळांचे शिक्षण इत्यादींची व्यवस्था करावी. कॅथरिन तेव्हापासून ते काम करू लागली. एके दिवशी सायंकाळी मला दाखविण्यासाठी म्हणून तिने एका गावी शेतकऱ्यांची सभा बोलाविली. जाऊन पाहिले तो ५०।६० शेतकरी लोक चहापानासाठी म्हणून पऱ्यांच्या बऱ्याच मोठ्या हॉलवजा खोलीत जमलेले दिसले. कॅथेरिनने त्यांच्यापैकी पुष्कळांशी माझा परिचय करून दिला. त्यांच्यापैकी कोणी कोणी आपल्या प्रयत्नांनी दारू सोडली, ते ती माझ्या कानात सांगू लागली.

एके दिवशी ती मला आपल्या गावच्या टाऊन हॉलमध्ये घेऊन गेली. गेल्यावर ऐकले की, प्रसिद्ध जॉन ब्राइटचा जावई याच गावचा असून बूट तयार करण्याचा कारखाना त्याचा आहे. हा टाऊन हॉलहि त्यानेच बांधला आणि तो शेतकरी आणि श्रमिक लोक यांना त्यांच्या उपयोगासाठी भेट म्हणून दिला आहे. त्या हॉलमध्ये मी वाचनालय, नाट्यमंच, ग्रंथालय, भोजनालय वगैरे सर्व सोयी असलेल्या पहिल्या. त्या हॉलमध्ये ब्राह्मसमाजाची मते आणि श्रद्धा यासंबंधाने व कार्यासंबंधाने मी थोडे बोललो. जॉन ब्राइटची मुलगी त्यावेळी तेथे उपस्थित होती. माझे व्याख्यान झाल्यानंतर ती उठून म्हणाली, " ब्राह्मसमाजाच्या मतांबद्दल व श्रद्धेबद्दल मला काही बोलायचे नाही. पण भारतातील स्त्रियांसाठी ब्राह्मसमाजाच्या लोकांनी जे काही केले आहे व करीत आहेत त्याबद्दल त्यांच्या मस्तकावर ईश्वराच्या आशीर्वादाचा पुष्पवर्षाव होवो, इतकेच मी सांगते. तिच्या या मनःपूर्वक उद्‌गारांचा मला केव्हाच विसर पडणार नाही. एवढेच नव्हे तर तिच्या चेहेऱ्याचा ठसाही माझ्या अन्तःकरणात कायम राहिला आहे. मी अशा पवित्र स्त्रीमूर्ती फारच थोड्या पाहिल्या असतील. असे सौजन्य, अशी लज्जाशीलता, आणि असे पावित्र्य ज्या स्त्रीत असते तिला एकदा पाहिल्यानेही आपल्या आयुष्यात एक परमलाभ झाल्यासारखे मला वाटते.

त्यानंतर तेथून परत येताना कॅथेरिन मला म्हणाली, " या सगळ्या शिक्षणविषयक कार्याला कोणते फळ आले आहे ते एका शेतकऱ्याच्या घरी नेऊन तुम्हाला दाखविते चला. " असे म्हणून ती मला एका शेतकऱ्याकडे घेऊन गेली. तो मनुष्य त्यावेळी घरात नव्हता. आत जाऊन पाहिले तो ती एक लॅबोरेटरी असावी

असेच मला वाटले. कितीतरी प्रकारची यंत्रे, अर्क, बाटल्या वगैरे उपकरणे व साहित्य तेथे होते. एका बाजूला पुस्तकांनी भरलेले एक मोठे कपाट होते. कॅथेरिन म्हणाली. "हा मनुष्य रसायनशास्त्र आणि वनस्पतीशास्त्र यांनी वेडावून गेला आहे!" ते पाहून मी चकितच झालो. नंतर मी स्ट्रीटगाव सोडून लंडनला परत आलो.

* * *

२०.

# इंग्रजजातीच्या चारित्र्यातील शक्तीचा उगम कोठे आहे ?

इंग्रजजात इतकी अल्पसंख्य असताही एवढ्या मोठ्या विस्तीर्ण साम्राज्यावर राजत्व कसे चालविते, हा मोठा विचार इंग्लडात येताच माझ्या मनात उत्पन्न झाला. या शक्तीचे मूळ खात्रीने त्यांच्या राष्ट्रीय चारित्र्यातच असले पाहिजे. ते मूळ तत्त्व कोणते, ते एकवार पाहणे अवश्य आहे.

## स्वातंत्र्यप्रेम असताही कायदा पाळण्याचे अगत्य

त्यांच्या राष्ट्रीय चारित्र्याचे जे गुण मला प्रशंसनीय वाटले ते हे :—पहिला, त्यांच्या राष्ट्रीय चारित्र्यात ज्याप्रमाणे एका बाजूला स्वातंत्र्य प्रवृत्ती व स्वावलंबन आहे त्याचप्रमाणे दुसऱ्या बाजूला सद्भक्ती व शिस्तबद्धता आहे. कायदे मानण्याचे बंधन आहे. या उभयगुणांचा समन्वय अत्यंत विस्मयकारक वाटतो. प्रत्येक दिवशी मी वर्तमानपत्रे वाची आणि या इंग्लंड देशाचा भारताशी एका बाबतीत वेगळेपणा असलेला मला जाणवे. भारतात असताना सर्वच बाबतींत मनुष्य सरकारवर विसंबून असलेला मला दिसून येई. दुर्भिक्ष आले, सरकार पाहील. महापुराने सर्व जलमय झाले, सरकार पाहील. खालच्या वर्गाला शिक्षण मिळत नाही, सरकार पाहील. मद्यपानासक्ती वाढत आहे, सरकार पाहील. वगैरे. इंग्लंडात पाहिले तर सरकारने कानावर हात ठेवलेले. येथे सरकारची वास्तपूस फारशी आढळत नाही. सगळी कामे प्रजाच करीत आहे. सरकार मात्र कोणा एखाद्या बाबतीत मदत देते इतकेच.

सर्वसाधारण लोक जाहीर सभेतून वगैरे गव्हर्नमेंटला कटुशब्दांनी वाक्ताडण करण्याला मागेपुढे पाहात नसत. पार्लमेंटच्या सभेत सभासदांच्या नाकासमोर गुद्दे उगारून मन मानेल ते बोलत. एका बाजूला ही अशी स्वतंत्र वृत्ती आणि स्वावलंबन तर दुसरीकडे कोणते एखादे कार्य संपादन करावयाचे मनात आले तर दहाजण मिळून ते करूनही जात. त्या कामातच असे दिसून येई की ज्या उच्चतम

कर्मचाऱ्यावर त्या कामाचा मुख्य भार सोपविलेला असेल त्या कर्मचाऱ्याची आज्ञा पालन करून इतर जण ते कार्य पूर्ण करीत आहेत. या राष्ट्रीय चारित्र्यपालनामुळे मोठमोठी कामे यंत्राप्रमाणे होऊन जात. इंग्रजलोक महान् स्वातंत्र्यप्रवृत्तीचे असूनहि कायद्याची बंधने, पोलिसांची बंधने, कोर्टदरबारच्या मर्यादा पूर्णतेने पाळीत. इतकेच काय पण सामाजिक धर्म आणि गृहस्थधर्म पाळण्यातही ते दक्षता दाखवीत. राष्ट्रीय चारित्र्यातील विरुद्ध गुणांचे हे अद्भुत मीलन त्यांच्यात दिसून येते.

## परंपरा पालनाबरोबरच प्रगतिशीलतेचाही समावेश

समन्वयाचे दुसरे उदाहरण असे : जुने राखून नव्याचा स्वीकार करण्याचा उत्साह. जुन्या आचारविचारांचे आस्थेने पालन करणारे असे राष्ट्र दुसरीकडे सहसा आढळत नाही. कोणाही एखाद्या प्रतिष्ठित गृहस्थाच्या घरात जा, तेथे वेगवेगळ्या दिसणाऱ्या वस्तूंबरोबर कुटुंबातील पूर्वजांची स्मृतिचिन्हेही आदराने व भक्तीने दाखविली जातील. कदाचित् घरचा मालक तुमच्या हाती बायबल देऊन म्हणेल, ' हा माझ्या अतिवृद्ध पणजोबांच्या वापरण्यात असलेला ग्रंथ ! ' गुणी लोकांवर व देशात होऊन गेलेल्या महान् व्यक्तींवर या देशातील सर्वच श्रेणीतील लोकांची श्रद्धा-भक्ती फार दांडगी.

विंडसर पॅलेस मी पाहायला गेलो तेव्हा मला दिसले, की ज्या डोलकाठीखाली नेल्सन प्राणांतिक जखमी झाला होता त्या डोलकाठीचा काही भाग अंगणात एका बाजूला पुरून ठेवलेला आहे. तसेच जनरल गॉर्डनच्या वापरात असलेले बायबल एका लाकडी पेटीत जपून ठेवण्यात आलेले होते. आपल्या लोकांवरची सद्भक्ती त्यांची इतकी प्रबल. तसेच, जुन्याबद्दलची आस्था इतकी दांडगी की राज्येश्वरी महाराणीलासुद्धा प्रजेपैकी एकाचे स्मृतिचिन्ह आपल्याजवळ सुरक्षित असावे असे वाटते.

इंग्लंडच्या कोणत्याही मोठ्या शहरात जा, सर्वच ठिकाणी राजमार्गावर त्या त्या भागातील मोठ्या नामवंत लोकांच्या पाषाणमूर्ती भरपूर दिसतात. वेस्टमिनिस्टर ॲबे नावाच्या प्रख्यात स्मशानात–समाधि क्षेत्रात– पाऊल ठेवताच देशात होऊन गेलेले मोठमोठे कवी, फार थोर पंडित, साधुतुल्य विख्यात पुरुष या सर्वांची तेथे सर्वत्र स्मृतिचिन्हे दिसतात. त्यांची प्रसिद्ध बोधवचने त्यांच्या स्मृतिस्तंभांवर कोरलेली आढळतात. ते तसे सर्व पाहून शरीर रोमांचित झाल्यावाचून राहात नाही.

एके दिवशी तेथील सेंटपॉल्स नावाच्या चर्चमध्ये पाऊल टाकले तोच, भारत विख्यात विल्यम जोन्ससाहेबांचा एक दगडी पुतळा ठेवलेला दिसला. त्याच्या जवळच एका ब्राह्मण शिक्षकाची मूर्ती आणि दुसऱ्या बाजूला एका मुसलमान मौलवीची मूर्ती होती. त्या देशातील इतरही वेगवेगळ्या ठिकाणी

मोठ्या लोकांच्या स्मृती आणखी एका तऱ्हेने सुरक्षित ठेवलेल्या दिसल्या. त्यांनी आपल्या आयुष्यातील पुष्कळसे दिवस ज्या ज्या घरात घालविले असतील ती ती घरे पूर्वावस्थेत ठेवलेली असायची आणि त्यात त्यांची भरपूर स्मृतिचिन्हे सुरक्षित व व्यवस्थित असलेली दिसायची. एकंदरीत हे सर्व पाहिले की असे वाटते, या देशातील राजा आणि प्रजा या सर्वांच्या अंतःकरणात सत्प्रवृत्त माणसांबद्दल अलोट भक्ती हा त्यांचा स्वभावगुणच असावा.

तसे म्हणावे तर दुसऱ्या बाजूला विज्ञानाचा विचार व चर्चा करण्याची सर्वांनाच अत्यंत आवड. मनःपूर्वक सर्व पाहायचे, ऐकायचे. धर्म, समाजनीती, राजकारण, वगैरे सर्वच विषयांत नवीन तत्त्वे काय आहेत व येऊ शकतात याचे समालोचन करण्याची निरनिराळ्या प्रकारची तयारी असायची. सद्‌भक्ती प्रबल असली तरी कोणीही तेथेच थांबून राहात नाही. जिज्ञासा, आकांक्षा आहेच. सभा, समित्या, वाचनालये वगैरे ज्ञानप्रवृत्तीची साधने सर्वत्रच विपुल आहेत.

## प्रबल आकांक्षा असूनही सहिष्णुता

राष्ट्रीय चारित्र्यातील परस्परविरोधी गुणांतही समन्वयाचे तत्त्व पाहिले. त्याचे मला नवल वाटले. त्याचे हे तिसरे उदाहरण असे : एका बाजूला ज्ञान आणि श्रद्धा यांच्यावर प्रगाढ निष्ठा आणि त्यामुळे प्रगतीविषयीच्या आकांक्षेत उत्कटता. तर दुसऱ्या बाजूला त्याच्यापासून मिळणाऱ्या लाभाच्या बाबतीत धैर्य-पूर्वक सहिष्णुता. उतावीळपणा नाही आणि निराशाही नाही. मद्यपान निषेधाच्या सभेत वा फिमेल सफरेज सभेत जाऊन तेथील वक्त्यांची भाषणे ऐकताच वाटायचे, देशाचा खरा उद्धार आणि कल्याण ते दर्शवीत असलेल्या मार्गाचे अवलंबन केल्याशिवाय होणारच नाही; असे त्यांना निश्चित वाटत असावे; पण वर्तमानपत्रे वाचली तर त्यांचे हे जोरदार म्हणणे पार्लमेंटमध्ये दाखल होऊन दहा–वीस नाही, तीस वर्षे झाली तरी ते अजून त्याच्या पूर्ततेची वाटच पाहात आहेत. म्हणजे प्रबल आकांक्षा असूनही त्यात अधिरेपणा नाही तर सहिष्णुताही आहे.

## कर्ममय जीवनाच्या धडपडीतही त्या गोंगाटापासून दूर राहण्याची सवय

चौथा प्रकार विरुद्ध गुणद्वयाचा समन्वय साधून मौन, एकान्तवास, आत्मचिंतन याचा लाभ घेता घेता जनपदात कार्यक्षमता व्यक्त करणे. या जीवनात मनुष्य स्वल्पभाषी राहून आपला निर्धारित कर्मयोग कसा साधू शकेल या संबंधाने मानवी बुद्धीतून जितक्या प्रकारचे उपाय निघू शकतील, तितके सर्व करायचे, हा इंग्रज जातीचा एक विशेष गुण आहे. एखाद्या प्रतिष्ठित गृहस्थाच्या घरात लहान मूल जर नसले तर त्या घरात राहणे आणि हिमालयावरील गिरिकंदरात राहणेही सारखेच. चाकर–मोलकरणी येत आहेत जात आहेत,

हुकूम ऐकत आहेत, आणि त्यांचे काटेकोर पालनही करीत आहेत. फेरीवाला सामानसुमान देऊन जात आहे; जलप्रवाह वाहावा तशी कामे होत आहेत; पण घरात हूं की चूं नाही. चाकर–मोलकरणी ज्या खोलीत राहातात, त्या खोलीत, प्रत्येक खोलीच्या नंबरवारीने नंबराच्या घंटा आहेत. तसेच त्या प्रत्येक खोलीचा संबंध अन्य खोल्यांशी जोडलेला आहे. मोलकरणीला बोलवायचे असेल तर खोलीत बसल्या बसल्या तुम्ही घंटेचे बटण दाबा की एका मिनिटात ती येऊन तयार. दारावर ती टिचकी मारील. तिला आत बोलवा की ती आत येईल. तुम्ही तिला आज्ञा करा की लागलीच त्या आज्ञेचे ती पालन करील. बोलायचे तर तुम्ही इतक्या हळू आवाजात बोलायचे की दुसऱ्या खोलीतील माणसाला तो आवाज ऐकू येता कामा नये. समजा, तुम्ही एखाद्या रस्त्याच्या बाजूला असलेल्या घरात आहा, स्वतःच्या खोलीत बसून लिहीत आहा. रस्त्यावरून ना आवाज येत आहे ना शब्द. केवळ मसमस असा बुटांचा आवाज आला तर. पण एकवार जर खोलीच्या खिडकीशी जाऊन उभे राहाल तर, जणू काय रस्त्यात टोप्यांची तुफान गर्दी आहे. पुष्कळ लोक जात आहेत असे दिसून येईल. दुकानात कापड विकत घ्यायला जा. दार उघडताच ठण असा घंटेचा आवाज होईल. आत जावे तोच एक मनुष्य हजर. हळूहळू सावकाश सावकाश तुम्हाला काय काय पाहीजे असेल ते त्याला सांगा. लागलीच ती वस्तू तो तुमच्या समोर आणून ठेवील. दरदामाची कटकट नाही; घासाघीस नाही. पाच मिनिटांत काम खलास. जशी निस्तब्ध तऱ्हेने काम करण्याची पद्धत तशीच वेळ वाचविण्याची तत्परता. आणि याच गुणांनी इंग्रज लोकांना काम करण्याला भरपूर वेळ मिळतो.

विशेष काय सांगू ! सहा महिने इंग्लंडात राहिल्यामुळे खालच्या आवाजात बोलण्याची मला इतकी सवय झाली होती की, भारतात आल्यावर वंगदेशातील आवाजाएवढ्या मोठ्या आवाजात बोलण्याला मला अनेक दिवस लागले. या वेळात जे माझ्याकडे कामानिमित्त भेटायला येत त्यातील पुष्कळसे मला विचारीत, " तुम्ही आजारी आहा का ? मग इतक्या खालच्या आवाजात का बोलता ? "

इंग्रज जातीचा हा एकांतवास आणि निस्तब्धता यांचा परिणाम चांगला होतो, हे मी पाहिले आहे. प्रत्येक प्रतिष्ठित इंग्रजाच्या घरात एक खोली असते. त्याला ते ड्रॉइंगरूम म्हणजे बैठकीची खोली म्हणतात. त्या खोलीत कोणी झोपत नाही. तेथे फक्त मित्रमंडळी किंवा पै पाहुणा आला तर बोलणीचालणी व गाठीभेटी होतात. घरातील लोक सायंकाळच्या जेवणानंतर तेथे गप्पागोष्टी करतात. भेटायला येणारेही तेथेच भेटतात-बोलतात. पण घरच्या मालकाची म्हणून जी एक खोली असते आणि तेथे जेव्हा तो घरमालक असतो तेव्हा तेथे कोणी जात नाही. त्या खोलीला स्टडी किंवा वाचनाची खोली म्हणतात. मालक त्या ठिकाणी बसून वाचन अगर चिंतन करतो. यामुळेच इंग्रजांना मोठमोठी कामे करता येतात. हेच त्यांच्या या

एकान्तवासाचे व आत्मचिंतनाचे फळ.

एका बाजूला या अशा एकांतवासात वाचन आणि चिंतन तर दुसरीकडे जनतेत दक्षतेने कार्य करणे आणि आवश्यकता असल्यास व्याख्याने देणे. इंग्रज लोक जनतेत कामकाज करताना किती पराकाष्ठेचे श्रम करतात ते पाहिले असता आश्चर्य वाटल्यावाचून राहात नाही. काम करताना ते लोक इतके लक्षपूर्वक काम करतात की, पाहिले असता वाटते यांना दुसरे काहीच काम नसावे.

## सुखोपभोगाची आवड असूनही धर्म आणि सत्यप्रीती

विरुद्ध गुणांच्या समन्वयाचा पाचवा प्रकार म्हणजे, समाजप्रेम आणि धार्मिक भावना. मी जेव्हा तेथे होतो, तेव्हा उत्सवाच्या किंवा रजेच्या दिवशी हजारो लोक लंडन शहरातून रेल्वेने बाहेर जात असलेले मी पाहिले आहेत. अशा तऱ्हेने जाण्याचा हेतू म्हणजे मोकळ्या माळावर किंवा रानात मौजमजा करण्यात दिवस घालवावा हाच. तिकडून परत येताना रेल्वे गाडीतून उतरून जर एखाद्या लहान पियानोवर नाचाचे गाणे वाजविले तर लागलीच स्त्री व पुरुष दलबद्ध होऊन व एकमेकांचे कटिवेष्टन करून रेल्वेच्या प्लॅटफॉर्मवर नाचायला लागलेच म्हणून समजावे. जणू काय त्यांचा आनंद हृदयात मावेनासा होतो. इटालियन बँड नावाचे एक वाद्य घेऊन कित्येक लोक दारोदार ते वाजवतात आणि पैसा कमावतात. हे वाद्य कोणत्या एकाद्या ठिकाणी वाजत असले आणि १७।१८ वर्षे वयाच्या दोन खालच्या वर्गाच्या मुली बाजारात काही तरी जिन्नस घेण्यासाठी जात असल्या तर त्या वाद्याचे सूर ऐकताच एकमेकांच्या कमरेला धरून रस्त्यातच त्या नाचू लागतात. इंग्रजांत सामाजिक सुखोपभोगाची प्रवृत्ती फार प्रबळ आहे; पण त्यांची मनोवृत्ती मात्र खालच्या दर्जाची नसते. केवळ मौज–मजा एवढ्यापुरताच मर्यादित न्यायान्यायाचा विचार जेव्हा येतो किंवा राजकारण वा सामाजिक नीतीच्या उत्कर्षाबद्दल जेव्हा कायद्याच्या कक्षेत एखादा ठराव मांडण्याची वेळ येते तेव्हा इंग्रज मनुष्य आपादमस्तक गंभीर बनून विचारात मग्न होतो. सत्याचा जय होणारच होणार, अधर्म हा निंद्य असून धर्म हाच श्रेयस्कर आहे, हे त्याच्या हाडीमाशी खिळलेले. मी ब्रॅडलॅदलाच्या नास्तिकवादी सभेलाही उपस्थित राहून पाहिले आहे. त्यांची बोलण्याची ढब व मत व्यक्त करण्याची एकता पाहून असे वाटले की त्यांच्या मताप्रमाणे त्यांच्या पंथात सामील झाले नाही, तर इंग्लंडचे रक्षण होणे कठीण. म्हणून त्यांच्या मताशी सर्वांनी सहमत झालेच पाहिजे, हे सर्व पाहिले म्हणजे मनोमन असे जाणवे की इंग्रजजात ही सत्यप्रेमी व धर्मप्रेमी जात आहे.

मी इंग्लंड सोडण्याच्या प्रारंभी एके दिवशी स्टेडसाहेबांनी मला विचारले. " तू इंग्लंडातून काय घेऊन जात आहेस ? "

" काय काय सामानसुमान घेऊन जातोस असे विचारता ? " मी विचारले. स्टेड म्हणाले. " छे. छे. ते कशाला मी विचारू ? काय पाहिलेस, काय शिकलास आणि त्यातील काय घेऊन जाणार ? "

" तुम्ही धर्मप्रवण आणि श्रद्धाळू लोक आहा. तुमचा हा स्वभावधर्मच. तुमच्यातील नास्तिकही आस्तिकच. कारण त्यांचाही असा विश्वास आहे की हे ब्रह्मांड धर्माच्या नियमांनी बद्ध आहे. येथे सत्याचा जय होणारच होणार. " मी थोडक्यात उत्तर दिले.

स्टेड साहेबांना ते मानवले आणि ते म्हणाले, " तू योग्य बोललास. आमची धर्मप्रवण जात आहे खरी. "

शेवटी सांगायचे म्हणजे ही धर्मप्रवणताच इंग्रजजातीच्या चारित्र्याची मूळ महाशक्ती आहे आणि तीच त्यांच्यात विराजमान आहे.

## मध्यमवर्गीय प्रतिष्ठित इंग्रजांची घरे

इंग्रजजातीच्या उन्नतीचे आणि मोठेपणाचे आणखी मूळ कारण माझ्या पाहण्यात आले. ते म्हणजे त्यांचा गृहस्थधर्म. मध्यमवर्गीय प्रतिष्ठित इंग्रजाचे घर ही एक पाहण्यासारखी वास्तू आहे. दहा दिवस त्यांच्या घरात राहिल्याने मनात अभूतपूर्व अशा शांतीचा, आनंदाचा आणि पावित्र्याचा अनुभव जाणवू लागतो. इंग्रजांच्या घरांचे सौंदर्य जाणवते त्याला अनेक कारणे आहेत. ज्या कारणांनी त्यांनी माझ्या मनाला चटका लावला, त्याच कारणांचा मी उल्लेख करतो.

## इंग्रजांच्या घरातील स्त्रीचा अधिकार

पहिले कारण त्यांच्या घरातील स्त्रीची सत्ता. मध्यमवर्गीय सभ्य इंग्रजाच्या घरातील गृहिणी म्हणजे खरोखरच गृहस्वामिनी, राणी. पुरुष मिळविणारा. तेव्हा विचार केला तर त्याचाच घरात खरा अधिकार, सत्ता आणि कर्तेपणा असला पाहिजे. पण इंग्रज जातीच्या सामाजिक नियमाप्रमाणे गृहिणीच राणी. पुरुष हा घरातील तिची प्रजा वा मुख्यमंत्री. पुरुषाला तो जे मिळवितो ते गृहिणीच्या हाती देऊन तिच्या कर्तृत्वाधीनतेत राहणेच आवडते. गृहव्यवस्थेविषयी निश्चिंत राहून वाचन-चिंतनादि द्वारा आत्मोन्नती साधनात तो मग्न राहू शकतो.

गृहिणीच्या सर्वमय कर्तृत्वाबरोबरच स्त्रीशिक्षण व स्त्रीस्वातंत्र्य वास्तव्य करीत असल्यामुळे त्याचा परिणाम उत्तमच होतो. स्त्री सर्व प्रकारच्या ज्ञानचर्चेत भाग घेते व सर्व प्रकारच्या शुभकार्यात व प्रयत्नात सहाय्यक बनते. मी एखादे व्याख्यान ऐकायला गेलो तर त्या सभेत अर्ध्याअधिक स्त्रियाच मला दिसत. अनेक वेळी कोणा एखाद्या विख्यात आचार्यांचे प्रवचन ऐकायला जावे तर स्त्रियांना ढकलूनच उपासना मंदिरात प्रवेश मिळवावा लागे. कोणा एखाद्या प्रतिष्ठित गृह-स्थाच्या घरी निमंत्रित होऊन जाण्याचा प्रसंग आला तर घरच्या स्त्रियांशी कोणत्या

एखाद्या ज्ञानाच्या बाबतीत वा सामाजिक उन्नतीच्या विषयावर बोलता बोलता वेळ कसा जाई हे कळतच नसे.

तरीपण प्रत्येक प्रतिष्ठित गृहस्थाच्या घरात स्त्रियांच्या स्वातंत्र्याबरोबरच अशा प्रकारचे सगळे सामाजिक शासन व नियमबद्ध वागणूक दिसून येई की, ते पाहिले म्हणजे मन मुग्ध होऊन जाई. आपल्या भारतातील लोक स्त्रियांच्या पडदानशीनपणाला सरावलेले; त्यांच्या मनात स्वाभाविकच असे येईल की, ज्या समाजात स्त्रियांना संपूर्ण सामाजिक स्वातंत्र्य दिले जाते, अथवा त्या स्वातंत्र्य भोगतात, त्या समाजातील स्त्रियांचा नैतिक दर्जा खालावलेला असणार! इतर देशांच्या बाबतीत काय असेल ते मला सांगता येत नाही; पण इंग्रज मध्यमवर्गीय प्रतिष्ठित गृहस्थांच्या स्त्रिया पावित्र्याचा आदर्श आहेत असे म्हटले तर ती अतिशयोक्ती होणार नाही. याच स्त्रिया इंग्रजजातीच्या गौरवाच्या आणि सामर्थ्याच्या मुळाशी आहेत.

## घरात शिस्तबद्धता

स्त्रीशिक्षण आणि त्यांचा समाजातील दर्जा हे सांगितल्यावर आता इंग्रज गृहस्थाच्या घरातील दुसरे मुख्य आकर्षण म्हणजे त्याची कौटुंबिक शिस्तबद्धता. जे काम ज्यावेळी करायचे ते काम त्यावेळी झालेच पाहिजे. उठण्याची घंटा, चहा पिण्याची घंटा, कौटुंबिक उपासनेची घंटा, फराळाची घंटा, दुपारच्या जेवणाची घंटा, तिसऱ्या प्रहरी चहापानाची घंटा, अशा प्रकारे घंटामागून घंटा वाजायच्या. ठरलेल्या वेळी आले पाहिजे. ठरलेल्या वेळी जेवले पाहिजे आणि ठरलेल्या वेळी उठले पाहिजे. अशा प्रकारची वेळेची शिस्त असल्यामुळे स्त्रियांना इतर कामे करायला भरपूर वेळ उरतो. कुटुंबातील मंडळींना इतर अनेक कामांकडे तो गुंतविता येतो. नंतर मागे जे निस्तब्धतेचे वर्णन केले तेही अशा या परिवारात असतेच. घरात जलप्रवाहाप्रमाणे सातत्याने आणि शिस्तीने काम चाललेले असते. पण घरात असणाऱ्याला ते कळतही नाही. ज्याला वाचायचे आहे तो एकांतातील आपल्या निस्तब्ध खोलीत एकाग्रपणे वाचीत आहे. जो चिंतन करीत बसला आहे. त्याचेही ते कार्य त्याच्या खोलीत शांततेने चालले आहे. जो कामात गुंतला आहे तोही खोलीच्या दुसऱ्या बाजूला अविश्रांत आणि कठोर श्रम करण्यात मग्न आहे. ज्याचे जे काम असेल तो ते काम करण्यात मग्न. दुसऱ्या कोणाचा त्याच्याशी संबंध नाही. उपद्रव नाही. उपसर्ग नाही. चिंतन आणि कार्य अव्याहत चालू! किती मनोरम दृश्य हे!

त्यानंतर आणखी एक गुण सांगायचा म्हणजे, ज्याला इंग्रजीत ऑर्डर म्हणतात, ( जिथली वस्तू तिथे असणे ) तो. दौतीच्या जागी दौत, पुस्तकांच्या जागी पुस्तके. जरुरीप्रमाणे ती ती वस्तू तेथे तेथे मिळायचीच. एखादी वस्तू पाहिजे

असेल तर दोन मिनिटांपेक्षा कमीच वेळात ती मिळेल. भारतात असे क्वचितच आढळायचे. मी तर कितीदा पाहिले आहे आणि अनुभवलेही आहे की घरमालक एके ठिकाणी दौत लेखणी ठेवून गेला असेल तर घरातील कोणता एखादा मुलगा त्या दोन्ही वस्तू कुठे नेऊन ठेवील त्याचा नेम नाही. घरमालकाला एखाद्या बिलावर सही करुन द्यायची असेल तर लेखणीची गरज. पण ती आहे कुठे जाग्यावर! तो मग ओरडतो. 'अरे, रामा, लेखणी कुणी नेली? पाहून आण बरे कुठे आहे ती!' लेखणी आणण्याला विलंब होत आहे आणि मालकाची मिजास बिघडत चालली आहे! जो बिलावर सही घ्यायला आला तो दारात उभा. त्याचा वेळ जात आहे. घरमालक संतापतो, अद्वातद्वा बडबडतो, सगळीच धांदल आणि गडबड! इंग्रजाच्या घरात असे घडले तर तो फार निंदेचा विषय ठरेल. आणि गृहिणीला तर बाहेर तोंडही दाखवायला नको!

## निर्मळ स्वच्छता

मध्यमवर्गीय प्रतिष्ठित घरातील गार्हस्थ्यजीवन आणि त्यातील सुव्यवस्था. यानंतर मुख्य कौटुंबिक गुण म्हणजे निर्मळ स्वच्छता. प्रत्येक दिवशी घरातील प्रत्येक भाग स्वच्छ केला जातो. केर तर कुठेच दिसणार नाही. इतकेच नव्हे तर प्रत्येक खुर्ची तिच्या पायासह, प्रत्येक कॉट सर्वांगासह, आणि प्रत्येक कपाट कानाकोपऱ्यांसह कापडाने स्वच्छ पुसलेले असते. पुष्कळ गृहस्थांच्या घरातील लहानमोठी चीजवस्तू पाहिल्यावर वाटते की, हे लोक थोड्याच दिवसांपूर्वी या घरी राहावयास आले असावेत.

## धर्माची छाया

सर्वांत विशेष म्हणजे मध्यमवर्गातील पुष्कळशा गृहस्थांच्या घरात धार्मिकतेची एक प्रकारची छाया दिसते. प्रत्येक दिवशी कौटुंबिक उपासना होत असते. रविवार हा दिवस चर्चमध्ये जाण्यात व धर्मग्रंथ वाचण्यात जातो. पुष्कळसा दानधर्म सत्कार्यात अयाचितरूपाने होतो. ही धर्मभावना आणि नैतिक मर्यादा त्यांच्या कौटुंबिक वातावरणातच असते. आणि दोन दिवस त्या वातावरणात राहणाऱ्याला याचा अनुभव येतो.

मी लंडनमध्ये व बाहेर ज्या ज्या ठिकाणी जाऊन राहात होतो, त्या त्या ठिकाणी कौटुंबिक जीवनाचे हे सगळे सौंदर्य पाहून मुग्ध होऊन जात असे.

* * *

. २१ .

# इंग्लंडहून स्वदेशात पुनरागमन

इंग्लंडला जाण्याचा माझा मुख्य उद्देश पाहून, ऐकून व त्यापासून काही शिकून परत यावे असा होता. लोकहितकारक अशी निरनिराळी कामे, इंग्रजांचा स्वभाव, त्यांचे चारित्र्य, नीतिरीती, वगैरे पाहाण्यात आणि निरनिराळ्या वर्गाच्या लोकांशी भेटण्या बोलण्यातच माझा पुष्कळसा वेळ गेला. याखेरीज लंडनमध्ये व लंडन बाहेर वेगवेगळ्या ठिकाणी ब्राह्मसमाजावर व्याख्यानेही दिली. तसेच युनिटेरियन वगैरेंनी व ब्राह्म ( थिइस्टिक ) आचार्य व्हॉयसी यांनी बोलविल्यावरून त्यांच्या उपासना मंदिरातहि कित्येकदा प्रवचने केली. याशिवाय मद्यपानाविरुद्ध व भारतातील शिक्षण, धर्म, समाजव्यवस्था या विषयांवर निरनिराळ्या सभासमितीत पुष्कळ भाषणे केली.

## ब्रिस्टल येथे राजा राममोहन राय स्मृतिसभा

१८८८ सालच्या २७ सप्टेंबर रोजी महात्मा राजा राममोहनराय यांच्या मृत्युदिनी ब्रिस्टल येथे त्यांच्या स्मृत्यर्थ झालेल्या सभेसाठी त्या शहरी मी गेलो होतो. त्यापूर्वी मी व माझे मित्र दुर्गामोहन दास अशा दोघांच्या खटपटीने आर्नोसव्हेल नावाच्या समाधीक्षेत्रांत द्वारकानाथ ठाकूर यांनीं बांधलेल्या राजांच्या समाधी मंदिराचा जीर्णोद्धार करण्याची व्यवस्था आम्ही केली होती. ती कशीकाय झाली आहे हेही पाहाण्याची इच्छा होती. आम्ही त्या दिवशी सगळी दुपारची वेळ राजांच्या समाधी मंदिरातच घालविली आणि सायंकाळी हॉलमध्ये राजांसंबंधी जाहीर व्याख्यान दिले.

राजांची स्मृती अजूनही ब्रिस्टल नागरिकांना असेल हे मला माहीत नव्हते. मी दुपारच्या वेळी समाधीमंदिरात बसलो होतो, त्यावेळी पाहिले तो कित्येक व्यक्तींनी येऊन समाधिमंदिरासमोर भक्तिभावाने उभे राहून समाधीवर लिहिलेली

वाक्ये वाचण्याला आरंभ केला. नंतर सायंकाळी माझे व्याख्यान संपल्यावर पाहिले तो एका वृद्ध स्त्रीला काही लोक धरून सभेतून माझ्याकडे आणीत आहेत. ती येताना पाहून मी सन्मानपूर्वक काही पावले पुढे गेलो. तिने आपले हात पुढे करून माझे हात धरले आणि ती सांगू लागली, " या हातांनी मी राममोहन रायचे हात धरले होते. या आज तुमचे हात धरते. " असे म्हणून तिने मोठ्या उत्साहाच्या भरात माझे हात घट्ट धरले. त्यानंतर तिच्या तोंडून; कुठे, कशारीतीने राम-मोहन रायना आपण पाहिले होते ते ऐकले.

## इंग्रज स्त्रीकडून राजा राममोहनरायच्या आठवणीचे रक्षण

नंतर आणखी एक घटना घडली, तीहि चिरस्मरणीय अशीच आहे. मृत्यु-काली राजा राममोहरायना ज्या डॉक्टरांची ट्रीटमेंट चालू होती त्यांची मुलगी यावेळीही हयात होती. तिने आपल्या पूर्ववयात स्वतः आपल्या बापाबरोबर अने-कदा राममोहनरायना पाहिले होते. त्यांच्याशी ती मिळून मिसळून वागली होती आणि त्यांचा पाहुणचारही केला होता. पुढे राय वारले आणि तिचा बापही वारला. त्यानंतर स्वतःच्या वडीलांकडून मिळालेला राय यांचा मृण्मय अर्धपुतळा व त्यांची काश्मिरी शालीच्या कापडापासून बनविलेली पगडी आणि इतर वस्तू स्मृति-चिन्हे म्हणून तिने अगत्याने राखून ठेविली होती. आता, वृद्धपणामुळे आपणाला केव्हा मरण येईल सांगता येत नाही म्हणून ती स्मृतिचिन्हे माझ्या हाती सोपवि-ण्याच्या हेतूने मला बोलविले आणि ती तिने माझ्या हाती दिली. मी तिला धन्य-वाद देऊन ती स्वीकारली आणि येताना इकडे आणली. सांगायला वाईट वाटते की, मी वेगवेगळ्या ठिकाणी बिऱ्हाड बदलत असल्यामुळे त्या स्मृतिचिन्हांपैकी काही किरकोळ वस्तू कुठे हरवल्या कळलेच नाही. शेवटी त्यांचा तो मातीचा अर्धपुतळा आणि काश्मिरी शालीपासून बनविलेली पगडी या दोन वस्तू वंगीय साहित्य परिषदेच्या हाती मी सोपविल्या. त्यांच्याकडे त्या सुरक्षित राहिल्या आहेत. राजा राममोहन राय हे वंगसाहित्याच्या जन्मदात्यांपैकी एक होते. अर्थात् त्यांची स्मृतिचिन्हे वंगीय साहित्य परिषद मंदिरात ठेवणेच अत्यंत उपयुक्त व योग्य होते. म्हणून लंडन येथून भेट म्हणून मला मिळालेल्या वस्तु मी परिषदेकडे सोपविल्या.

## ब्राह्मसमाजाचा इतिहास लिहिण्याची सूचना—

मी फक्त सहाच महिने इंग्लंडमध्ये होतो. जे जे पाहिले होते त्याखेरीज पाहाण्यासारखे पुष्कळच होते. ठिकाणे होती आणि विषयही होते. पण माझ्यावर एक महत्त्वाचे काम सोपविले गेले असल्यामुळे अखेरचे काही महिने त्या परिदर्श-नात अडथळा आला. तो महत्त्वाचा विषय असाः—

ट्रूबनर नावाच्या प्रिंटिंग कंपनीच्या मॅनेजरने एके दिवशी कुमारी कॉलेट जवळ एका सद्गृहस्थाने लिहिलेल्या ब्राह्मसमाजाच्या इतिहासाचे हस्तलिखित

पाठवून दिले आणि कळविले की आपण कृपा करून हे वाचा, चुका वगैरे असल्यास दुरूस्त करून द्या म्हणजे हे आम्हाला छापता येईल.' तिने ते वाचून पाहिले तो त्या अनेक ठिकाणी चुकीची विधाने असल्याचे तिला आढळले. तेव्हा हे छापणे योग्य नाही असे तिला वाटले. नंतर तिने त्या मॅनेजरला ते लिखाण परत करताना लिहिले की, 'ब्राह्मसमाजाचा एक नेता सध्या या ठिकाणी आलेला आहे. तुम्हाला जर ब्राह्मसमाजाचा इतिहास छापायचाच असेल तर त्याच्याकडून मी तो लिहून घेईन.' नंतर ती मला ब्राह्मसमाजाचा इतिहास लिहिण्याचा आग्रह करू लागली. तेव्हा तिच्या विनंतीप्रमाणे तिच्याकडे असलेल्या टिपणांवरून मी तो इतिहास लिहायला बसलो. शेवटचे दोन महिने मी या कामात गुंतून पडलो होतो.

मी मे महिन्यात लंडनमध्ये आलो होतो. नोव्हेंबर महिन्यात परत भारतात आलो. येताना मला दुर्गामोहनबाबूंची सोबत मिळाली नाही. ते आजारी पडल्या-मुळे माझ्यापूर्वीच पार्वतीबाबूच्या बरोबर भारतात निघून गेले होते. मी ब्राह्म-समाजाचा इतिहास लिहिण्यात गुंतल्यामुळे त्यांच्याबरोबर मला येता आले नाही.

**पुनरागमन**

जो ब्राह्मसमाजाचा इतिहास लिहिण्यासाठी मला दुर्गामोहनबाबूंची संगत सोडावी लागली तो इतिहास लिहिण्याचे काम लवकरच मला बंद करावे लागले. लिहीत असतानाच मला समजले की ट्रुबनर प्रिंटिंग कंपनीने हा इतिहास छापण्याचा मानस रद्द केला आहे. त्यांनी काय ऐकले, काय विचार केला, ते आम्हाला कळू शकले नाही. फक्त कुमारी कॉलेटला त्यांनी कळविले की, 'कंपनीने ते पुस्तक छापण्याचे रद्द केले आहे.' तिच्याच सांगण्यावरून मी इतिहासाचा लिहिलेला भाग इंडिया लायब्ररीचा ग्रंथपाल असलेल्या एका जर्मन पंडिताला दाखविला होता आणि त्यानेहि तो भाग वाचून समाधान व्यक्त केल्याचे मला आठवते. आपण होऊनच त्यातील काही भाग मी रेव्हरंड स्टॉपफोर्ड ब्रुक महा-शयांना वाचून दाखविला होता. तेहि ऐकून फार खूष झाले होते. ट्रुबनर कंपनीने हा इतिहास छापण्याचे रद्द केल्याचे ऐकून त्यांना राग आला. ते मला म्हणाले 'तू थांब. मी मॅकमिलन कंपनीकडून हे पुस्तक छापवितो; पण मी राहायचे कसे? माझे काही मित्र मला इंग्लंडला राहाण्याचा खर्च देत होते. त्यांच्यावर तो भार घालावा हे मला लज्जास्पद वाटू लागले. काही वर्तमानपत्रांत लेख लिहून थोडेफार द्रव्य मिळवीत होतो. पण तेवढ्यानेहि तेथील सर्व खर्च चालविणे मला अवघड होऊ लागले. शेवटी मी मनात विचार केला, जे लिहायचे शिल्लक आहे ते देशात गेल्यावरच पुरे करावे हे चांगले म्हणून मी भारताकडे परत यावयास निघालो.

**बोटीत पादरीसाहेबांबरोबर तर्कवितर्क—**

परत येताना सागरीमार्गात घडलेली ही घटना आहे. आठवणीप्रमाणे तीहि

सांगतो ' टाल मूडिक मिसलेनिस ' लाइफ अँड टिचिंग्स ऑफ कॉन्फ्यूशिअस ' वगैरे कित्येक पुस्तके मी विकत घेऊन, येताना बरोबर आणली होती. बोटीवर त्यांचे वाचन चालले होते. आणि पुष्कळसा वेळ धार्मिक चिंतनात घालवीत होतो. माझ्या बरोबर एक इंग्रज खिश्चन मिशनरी सहप्रवासी होता. तो प्रथम प्रथम माझ्याबरोबर बोलत नसे. पण जेव्हा त्याने पाहिले की, मी केव्हा टालमूड तर केव्हा कॉन्फ्यूशियस वाचीत असतो, केव्हा बायबल वाचीत असतो तेव्हा मी कोण हे जाणून घेण्याचे त्याला कुतूहल वाटू लागले. एके दिवशी त्याने मला विचारले; " तुमचा धर्म कोणता ? "

" मी एकाच सत्यस्वरूप ईश्वराचा उपासक आहे." मी उत्तर दिले.

यावर त्याने पुन: प्रश्न केला, ' तुम्हाला केव्हा टालमूड वाचताना पाहातो तर तुम्ही केव्हा कन्फ्यूशियस वाचीत असलेले दिसता. मग हे सर्व कशाला वाचता ? "

" वाचल्याने ज्ञानोपदेश मिळतो म्हणून. धर्मतत्त्वासंबंधाने या ग्रंथात काही उच्च विचार आढळतात म्हणून.' मी सांगितले.

" तुम्ही बायबलहि वाचीत असलेले मी पाहातो. तुम्हाला बायबलबद्दल काय वाटते ? ' त्याने प्रश्न केला.

' यातहि काही चांगले विचार आहेत, बायबल वाचूनहि मला आनंद मिळतो. '

माझे हे उत्तर ऐकून मिशनरी म्हणाला, " तुम्ही सगळ्या ग्रंथांबरोबर बायबल ग्रंथही एकाच जागी ठेवता हे योग्य नाही. बायबल हा एकच बिनचूक असा ईश्वरदत्त ग्रंथ आहे. यात जे सगळे उपदेश आहेत ते दुसऱ्या कोणत्याहि ग्रंथात नाहीत. "

मी विचारले, " ठीक आहे. तर मग आपण दुसऱ्या कोणत्याच ग्रंथात नाही असा बायबलातील एखादा उपदेश सांगा पाहू ! "

मिशनरी म्हणाला, " डू अन् टू अदर्स अॅज यू वुड दॅट् दे शुड डू अन् टु यू. "

सुदैवाने याच उपदेशवाक्याप्रमाणे असलेली दोन उपदेश वाक्ये मी काही दिवसांपूर्वी टाल्मूड आणि कॉन्फ्यूशिअस या दोन्ही ग्रंथांत वाचली होती. लागलीच मी ते दोन्ही ग्रंथ आणले आणि त्यातील ती वाक्ये वाचून त्याला ऐकविली. आणि नंतर म्हटले, " हे पाहा, कॉन्फ्यूशियसचा अनुवादक डॉ. लेग हा आपल्यातीलच एक मिशनरी. त्याच्याच उक्तीच्या आधारे, काँग्फ्यूच ( कॉन्फ्युशिअस ) हा येशूच्या जन्मापूर्वी ५५० वर्षे जन्मला होता. एक शिष्य काँग्फ्यूचला विचारीत आहे, " गुरुदेव, सगळ्या उपदेशाचे सार काय ? " त्याचे उत्तर

देण्यासाठी कॉंग्फ्यूच सांगतो, " सगळ्या उपदेशांत श्रेष्ठ असा हाच उपदेश आहे. तो असा– तुमच्याशी दुसऱ्याची जशी वागणूक नसावी असे तुम्हाला वाटते, तसे तुम्ही दुसऱ्याशी वागू नका. " थोड्याशा फरकाने ही दोन्ही वाक्ये सारखीच आहेत. मग सांगा, तुमच्या म्हणण्याप्रमाणे बायबलात अलौकिकता अशी कुठे आहे ? आपले मत काय ? सत्याचा प्रवर्तक कोण ? ईश्वर हाच तर सत्याचा प्रवर्तक आहे ! आणि यावरून असे सिद्ध होते की, त्याने देश आणि जात यात भेद-भाव न करता आध्यात्मिक सर्व सत्य अभिव्यक्त केले आहे ! "

माझ्या स्मरणशक्तीप्रमाणे सांगायचे तर तो मिशनरी यावर गप्पच बसला. त्याने मौन स्वीकारले. पण दुसरा एक प्रतिष्ठित मिशनरी म्हणाला, " त्याचे असे आहे. दुष्ट सैतान अनेक वेळी धर्माचा मुखवटा लावून मनुष्याला आडमार्गाला नेत असतो. अनेक उच्च तत्त्वे मनुष्याला दाखवून त्याला मार्गच्युत करतो. म्हणजे सैतानही सत्याची अभिव्यक्ती करतोच. त्या आपत्तीतून वाचविण्यासाठीच, रक्षण करण्यासाठीच येशूचा अभ्युदय ! '

हे त्याचे विवेचन ऐकून मी म्हटले, " मी आपल्याकडे माझा पराभव स्वीकारतो. " कारण मी विचार केला, यांच्याशी तर्कवितर्क करणे व्यर्थ आहे.

याचवेळी भारतातून लंडनला येत असता एक घटना घडली ती योग्य त्या ठिकाणी लिहिण्याचे राहून गेल्यामुळे आता लिहितो. इंग्लंडला जाताना सिलोनातून कित्येक ख्रिश्चन मिशनरी आमच्या बोटीवर चढले आणि सहप्रवासी बनले. या मिशनरी कथेबरोबर तीहि आठवली. हे सहप्रवासी मिशनरी, मार्गात दर रविवारी उतारूंना जमवून बोटीच्या एका भागात चर्च बनवीत. मी त्यांच्या उपासनेला जात असे. दोनतीनदा अशा तऱ्हेने गेल्यावर एके दिवशी एका मिशनऱ्याने मला विचारले. " आमची ही उपासना तुम्हाला कशी काय वाटली. "

मी उत्तर दिले, " वा फार उत्तम. फक्त एकच प्रश्न वारंवार मनात येतो. ' मिशनरीने विचारले, " तो कोणता ? "

" आपण उपदेश करताना प्रत्येक वेळी सांगता की, मनुष्य हा पापात जन्मतो, मनुष्याचा स्वभावच पापप्रवण, सभ्यपणाची जितकी जितकी उंची वाढत आहे तितका तितका मनुष्य जास्त जास्त पापबद्ध होत आहे. आणि हेहि सांगता की शेवटी मनुष्य ईश्वराच्या पायांशी येणारच. हे कसे काय ? जर मनुष्य दिवसें-दिवस पापात जास्त जास्त बुडू लागला तर त्याची पूर्ण उन्नती कशी होणार ? त्याला पूर्ण सुख कसे मिळणार ? " असा त्याला मी स्पष्टच प्रश्न केला.

यावर मिशनरी म्हणाला, " ते माहीत नाही वाटते तुम्हाला ? प्रभू येशू जेव्हा पुनः येईल तेव्हा तो सैतानाला पकडून एका अंधाऱ्या गुंफेत बंद करून टाकील. मग मनुष्याला लोभमोहात गुंतविणारा कोणीहि राहाणार नाही. अर्थात् मनुष्य सहजच निष्पाप होईल. "

हे उत्तर ऐकूनही मी आ वासून स्तब्धच्च राहिलो. पुढे लंडन येथे असताना एके दिवशी सुप्रसिद्ध रेव्हरंड स्टॉपफोर्ड ब्रुक यांजकडे गेलो असताना बोटीत झालेला आमचा हा संवाद सांगितला. तेव्हा ते हसून म्हणाले होते. " तुमच्या पुराणाप्रमाणेच हेही एकप्रकारचे पुराणच आहे. "

## सिलोनात जॉर्ज मुलर याचे दर्शन

या जलयात्राकालीन आणखी एका गोष्टीची आठवण होते. आम्ही जेव्हा सिलोनची राजधानी कोलंबो शहरात आलो तेव्हा ऐकले की ब्रिस्टल येथे अनाथाश्रमाची प्रतिष्ठापना करणारे जॉर्ज मूलर भारतात फिरून आपल्या देशी, लंडनला जाताना वाटेत कोलंबो शहरातील एका हॉटेलात उतरले आहेत. बातमी ऐकताच मी त्यांना भेटण्यासाठी त्या हॉटेलात गेलो. त्यांनीही कृपाळू होऊन मला भेट दिली. मी त्यांच्याशी त्यावेळी काही मिनिटेच बोलण्यात घालविली. पण ती काही मिनिटेच चिरस्मरणीय होऊन राहिली आहेत. मी त्यांना सांगितले, " आपण लिहिलेला, ' दि लॉर्डस डिलिंग्स वुइथ जॉर्ज मूलर ' हा ग्रंथ यापूर्वी वाचला आहे आणि त्यामुळे मला फार लाभही झाला आहे. " माझे हे सांगणे ऐकून त्यांना आनंद झाला. मी विचारले, " आपण सगळ्याच बाबतीत ईश्वराची प्रार्थना करता वाटते ! " त्यांनी उत्तर दिले, " माझी एखादी चावी हरवली तरीही ती मिळावी म्हणून मी ईश्वरचरणी प्रार्थना करतो. माझ्या आयुष्यातील कोणत्याही वेळी अगर प्रसंगी मुक्तिदात्या परमेश्वराची प्रार्थना करण्यास मी विसरत नाही. मी त्याला नित्यशरण आहे. "

मी आणखी एका साधूपुरुषाची, चावी हरवल्याबद्दल प्रार्थना केल्याची गोष्ट ऐकली आहे. ते साधुपुरुष म्हणजे ढाक्याचे सुप्रसिद्ध कृष्णगोविंद गुप्त महाशयांचे वडील स्वर्गवासी कालीनारायण गुप्त होत. या साधुपुरुषाच्या कुटुंब परिवारातून ऐकले आहे की, कोणतेही कार्य करताना अगर करण्यापूर्वी ' ॐ ब्रह्म ॐ ब्रह्म ' असे म्हटल्यावाचून त्यांनी ते केलेच नाही. प्रत्येक वेळी ते त्याची कृपायाचना करीत. मुलांनी असेही पाहिले आहे की वडीलांची चावी हरवली आहे आणि ते ती शोधीत आहेत पण तोंडाने ' ॐ ब्रह्म ॐ ब्रह्म ' असे ईश्वरस्मरण चाललेच आहे. भक्तांचे वागणेच वेगळे ! प्रार्थनेच्या बाबतीत आवश्यकता, योग्यायोग्य याचा विचारच नाही. सर्व बाबतींत सर्वावस्थेत प्रार्थना हा त्यांचा स्वभावधर्मच होऊन बसतो. साधुपुरुष जॉर्ज मुलरच्या तोंडावर भक्तीचे व शरण्यतेचे ते नैसर्गिक भक्तिलक्षण मी अगदी स्पष्टपणे पाहिले आहे. अशा माणसाला आयुष्यात एकवार पाहिले तरी तो परमलाभच म्हणायचा.

* * *

.२२.

# पुनः दक्षिण भारतात

## कलकत्त्यात इंग्रज आणि फिरंगी एकेश्वरवादींसाठी उपासना उपक्रम

मी अशा तऱ्हेने अनुभव घेत घेत भारतात येऊन पोचलो. आल्यानंतर काही दिवसांनी इंग्लंडच्या मि. व्हायसी यांच्या चर्चचे सभासद मि. ब्लेकर नावाचे एक प्रतिष्ठित इंग्रज गृहस्थ ( जे केलनर कंपनीत कसलीशी नोकरी करीत ) यांनी मला भेटण्यासाठी पत्र लिहिले. त्यांच्या भेटीत असे ठरले की, कलकत्त्यात इंग्रज व फिरंगी एकेश्वरवाद्यांसाठी एका उपासक मंडळाची स्थापना करण्यात येईल. त्यातील उपासनेची भाषा इंग्रजी असेल. आणि उपासनेची सर्व जबाबदारी माझ्यावर असेल. या सगळ्या शर्तीप्रमाणे मि. ब्लेकर यांनी वर्गणी जमवून लालदिघी जवळ ' डलहौसी इन्स्टीटयूट ' रविवार सकाळसाठी भाड्याने घेतली. अशा रीतीने उपासनेची व्यवस्था झाली. मी आचार्याचे काम करू लागलो. उपासना चालविताना मी; मि. व्हॉयसी यांनी प्रकाशित केलेले आणि त्यांच्या लंडनमधील उपासना मंदिरात उपासनेसाठी उपयोगात आणले जाणारे पुस्तक घेऊन त्यातून आराधना, प्रार्थना वगैरे आणि एक उपदेशपर प्रवचन लिहून आणून तेही वाचीत असे. यावेळी होणाऱ्या उपदेशपर प्रवचनांचा बराच भाग इंडियन मेसेंजर पत्रात प्रसिद्ध झाला आहे. मि. ब्लेकरचे हे उपासक मंडळ हळूहळू डलहौसी इन्स्टीटयूट सोडून निरनिराळ्या ठिकाणी प्रतिष्ठित लोकांच्या घरी जमत असे. असा हा क्रम कित्येक वर्षे नियमितपणे चालला होता. शेवटी मिस्टर ब्लेकर कार्यानुरोधाने दुसरीकडे गेल्यामुळे तो प्रचार बंद पडला. उपासकमंडळ चालविल्यावर मला असे दिसून आले की, मुख्यतः ज्यांच्यासाठी हे मंडळ स्थापन केले होते ते बरेचसे येतच नसत. इंग्रज किंवा फिरंगी फारच थोडे येत. विलायतेहून आलेले देशी लोकच मुख्यतः येत. यामुळे शेवटी ते मंडळही राहिले नाही.

## इंदूर येथे प्रचारासाठी गेलो

इंग्लंडहून आल्यावर मी पुनः धर्मप्रचार कार्याला वाहून घेतले. वेगवेगळ्या कार्यांपैकी इंदूरचे पहिले प्रचारकार्य आठवते. माझे मित्र नवीनचंद्र राय त्यावेळी सेवानिवृत्त होऊन खांडवा येथे राहात होते. त्यांना रतलाम येथे नोकरीही मिळाली. मी १८८९ साली नोव्हेंबर महिन्यात श्री. लछमनप्रसाद यांना बरोबर घेऊन खांडव्याहून रतलामवरून इंदूरला गेलो. तेथे पुष्कळसे उत्साही ब्राह्म होते, इंदूरला मी राजाचा पाहुणा म्हणून राजाच्या अतिथीगृहात राहू लागलो. माझ्या पाहुणचारासाठी नोकर-चाकर व जाण्यायेण्यासाठी गाडीही मिळाली.

हळूहळू मी माझ्या कार्याला सुरवात केली. इंदूरला ब्रिटिश सरकारचा राजप्रतिनिधी ( रेसिडेंट ) राहात असे. तो ज्या भागात राहात असे तो भाग रेसिडेन्सी या नावाने ओळखला जाई. या भागात अनेक प्रतिष्ठित गृहस्थही बंगले बांधून राहात. माझ्या ब्राह्ममित्रांनी मला रेसिडेन्सी विभागात एक व्याख्यान देण्याची विनंती केली. त्यांच्या विनंतीला मी मान देऊन व्याख्यान देण्याचे ठरविले. पुढे माझ्या व्याख्यानासाठी तेथील मंडळींनी रेसिडेन्सी भागातील एक सभागृह निश्चित करून जाहीर विनंतीपत्र काढले. या छापील विनंतीपत्राची एक प्रत रेडिडेन्टसाहेबाच्या हाती पडली. त्यावेळी तेथे रेसिडेंट कोण होता हे मला चांगलेसे आठवत नाही पण तो बहुतेक सर लेपेल ग्रिफिन असावा. ती जाहिरात मिळताच त्याने विचारले, " हा शिवनाथ शास्त्री कोण ? " त्याला उत्तर मिळाले " एक बंगाली ब्राह्मधर्म प्रचारक. " तेव्हा तो रागावून म्हणाला, " बंगाली लोक येथे कशाला येतात ? हे व्याख्यान येथे होता कामा नये ! " नाइलाजाने त्या दिवशीचे माझे व्याख्यान रेसिडेन्सी विभागात न होता, ताबडतोब राजाच्या अधिकारात असलेल्या एका शाळागृहात झाले.

## होळकरांचे मतपरिवर्तन

त्यानंतर मी आणि माझे मित्र लछमनप्रसाद असे दोघेही २८ नोव्हेंबर रोजी होळकर महाराजांना भेटायला गेलो. भेटीचा दिवस व वेळ त्यापूर्वी ठरविला होता. तसेच काळा पोषाख करून गेलेले त्यांना आवडत नसल्यामुळे आम्ही पांढरा कोट घालून गेलो होतो, हेही मला चांगले आठवते. भेटीत ते आमच्याशी फारच चांगले वागले. आमच्या साधारण ब्राह्मसमाजाच्या ऋणफेडीसाठी त्यांनी ४०,००० ( चाळीस हजार ) रु. आणि माझ्या व लछमनप्रसादांच्या प्रवास-खर्चासाठी थोडेबहुत रुपये अशी रक्कम देणगी म्हणून दिली. नंतर त्यांनी ब्राह्म-समाजाचा उल्लेख करून म्हटले, " जब मैने सुना आप लोगोंके बीचमें झगडा हुवा तब मेरा दिल टूट गया. " ( जेव्हा आपल्यात वादविवाद झाल्याचे मी

ऐकले तेव्हा मी फार निराश झालो. ) महाराजांचे हे कळकळीचे उद्गार अजूनही माझ्या कानात प्रतिध्वनित होत आहेत.

पण सांगण्यासारखे आश्चर्य हे की मी जेव्हा पुनः एकदोन वर्षांनी इंदूरला गेलो तेव्हा ऐकले की, ब्राह्मसमाजाबद्दल महाराजांचे मन बदलले आहे. आपल्या राज्यात ब्राह्मसमाजिष्ठांची कोणतीही सभा, समिती होता कामा नये, असे त्यांनी फर्मान काढले आहे. राजाचा राग पाहून आर्यसमाज वगैरे अनेक समाजांनी सभा घेणे बंद केले असेही मी ऐकले. फक्त ब्राह्मलोक त्यांच्या रागाची पर्वा न करता जेव्हा उपासना मंदिरात नेहेमीप्रमाणे जमून उपासना करू लागले तेव्हा महाराजांनी ब्राह्मसमाजाच्या सभासदांना राजवाड्यावर बोलावून सांगितले की 'मी तुमचे मंदिर पाडून टाकीन " एकेवेळी त्यांनीच हे मंदिर बाधण्यासाठी हजारो रुपये दिले होते ! आणि आता तेच मंदिर पाडून टाकण्याची तयारी ! महाराजांची ही ताकीद ऐकून मला वाटले, देशी राजांच्या राज्यात राहाणे म्हणजे मोठे संकटच म्हणायचे !

त्यावेळी आणखी एक घटना घडली. त्यावरून महाराजांचा ब्राह्मसमाजावरचा राग जास्तच भडकलेला दिसला. तो दसऱ्याचा दिवस होता. या दसऱ्याच्या दिवशी इंदूरचे महाराज हत्तीवर बसून आपल्या लवाजम्यासह व सरदारकरदारांसह मिरवणुकीने बाहेर पडतात. फार वर्षांपासून ही प्रथा चालत आलेली आहे. या दसऱ्याच्या यात्रेच्या दिवशी मी व माझे मित्र सदाशिव पांडुरंग केळकर असे ही मिरवणूक पाहायला गेलो. राजरस्त्यावर फारच गर्दी असल्यामुळे आम्ही राजरस्ता सोडून मोकळ्या माळावर उभे राहून पाहू लागलो. तिथे विशेष गर्दी नव्हती. त्याच्या दुसऱ्या दिवशी राजकुमारांचे शिक्षक आम्हाला म्हणाले, " महाराजांनी मला असे विचारले, " मी × × × माळावर केळकराजवळ शिवनाथशास्त्र्यांना पाहिलेसे वाटते. ते तेथे आले आहेत काय ? " शिक्षक म्हणाले, " होय महाराज, सध्या येथे ब्राह्मसमाजाचा उत्सव चालू आहे त्यासाठी ते आले आहेत. " यावर 'या असल्या सर्व माणसांनी माझ्या राज्यात यावे हे मला पसंत नाही ' असे महाराज म्हणाले. ते " शिक्षक पुढे सांगू लागले, ' ते एकदोन दिवसात जातील ' असे मी महाराजांना उत्तर दिले.

पुढे ब्रिटिश सरकारने या महाराजांना पदच्युत करून बंदिशाळेत ठेविले व त्यांच्या पुत्राला राज्यपदावर बसविले.

## कलकत्त्यात ब्राह्मबालिका विद्यालयाची स्थापना

इंग्लंडहून परत आल्यावर मी जी काही कामे आरंभिली होती त्यात ब्राह्मबालिका विद्यालयाची स्थापना हे एक होते. पूर्वीच सांगितले आहे की मी इंग्लंडमध्ये असताना किंडरगार्डन स्कूल पाहिले होते आणि शिक्षणविषयक काही

ग्रंथही विकत आणले होते. ते वाचून शिक्षणासंबंधाने कित्येक नवीन विचार माझ्या मनात उद्भवले. ब्राह्मबालिका विद्यालयाची स्थापना हे त्याचेच फळ.

## मुलांना मी अशा तऱ्हेने शिकवीत होतो

अशा प्रकारचे विचार अनेक दिवसांपासूनच माझ्या मनात येत होते. मी जेव्हा बी. ए. चे शिक्षण घेत होतो तेव्हा एका विशेष घटनेने शिक्षणासंबंधी नवे विचार माझ्या मनात येऊ लागले. ती घटना अशी : एकदा उन्हाळ्याच्या सुटीत मी घरी गेलो असता बाबांनी मला आपल्या बदली शिक्षक नेमून स्वतः काही दिवस विश्रांती घेतली होती. मी एके दिवशी दुसऱ्या इयत्तेला शिकवीत असता सर्वात खालच्या वर्गावर असलेले पंडित महाशय, एका चार की पाच वर्षांच्या मुलाला घेऊन दुसऱ्या इयत्तेच्या वर्गात माझ्याकडे आले. आणि म्हणाले, "महाशय हा मुलगा वाच म्हणताच रडायला लागतो. काय करू ?" आणि पाहिले तो खरेच. त्याच्या दोन्ही डोळ्यातून वाहाणारे अश्रू पोटावरून वाहात होते, असे मला दिसले. मला मोठे नवल वाटले. मी म्हटले, "वाच म्हटले की रडतो होय ? ठीक आहे. याला माझ्याकडे सोपवा. मी पाहातो." ते त्या मुलाला माझ्याकडे ठेवून निघून गेले.

मी त्या मुलाला म्हटले, "तू माझा हात धरून माझ्याबरोबर थोडे चालून दाखविशील ?" नंतर माझा हात धरून तो तेथल्या तेथेच थोडावेळ चालला. मला जेव्हा वाटले की फिरता फिरता याच्या मनातील भीती पार नाहीशी झाली आहे, तेव्हा मी त्याला उचलून बाकावर बसविले. नंतर माझ्या बोटाने त्याचे पोट दाबू लागलो. तो हसू लागला. मी विचारले, "सांग बरे, तू, भात कशाबरोबर खाल्लास ?' तेव्हा तो भात, (वरण) डाळ निरनिराळ्या भाज्या, उल्लेख करू लागला. पण माशाचे काही नाव घेईना. मला वाटले, याने मासे खाल्ले असण्याची पुष्कळशी शक्यता आहे पण नाव घ्यायचे तेवढे विसरला असावा. तेव्हा मी म्हटले, "तू आणखी एक पदार्थ खाल्ला आहेस. मला का बरे नाही सांगत ? तू मासे खाल्ले आहेस." तेव्हा त्याला फार नवल वाटले. त्याला वाटले असावे, पोटाच्या बाहेरून बोटाने, दाबून यांना मी मासे खाल्ले हे कसे कळले ? तो हसून म्हणाला, "तुम्ही कसे ओळखलेत ?" मी सांगितले, "आँ ? म्हणजे ? अरे बाळा बोटाने पोट दाबून कोणी मासे खाल्लेले असले तर ते मला ओळखता येते. हे तुला माहीत नाही वाटते ?"

अशा प्रकारे त्याची भीती पार नाहीशी झालेली आहे असे जेव्हा मी पाहिले, तेव्हा त्याचे पुस्तक उघडून त्याच्या समोर धरले आणि, "हे पहा, तू वाईट मुलगा आहेस आणि मी चांगला मुलगा आहे." त्याने विचारले, "का ? मी वाईट मुलगा का ?" मीं उत्तर दिले "मला वाचता येते. तुला वाचता येत

नाही ? हे पहा मी कसे वाचतो ते. " असे म्हणून क ख ग घ असे वाचीत चाललो. तो मला वाचू देईना. म्हणाला, " मलाही वाचता येते " मी सांगितले, " वाच बघू ? " लागलीच तो क ख ग घ असे जोराजोराने वाचू लागला.

शेवटी मी त्याला सर्वात खालच्या ( त्याच्या ) वर्गात घेऊन गेलो. आणि त्याच्या पंडित महाशयांना म्हटले, " पहा, तुम्ही सांगत होता, हा वाच म्हटले की रडतो; पण माझ्याकडे तर त्याने चांगलेच वाचले. " निरखून पाहिले तो पंडित महाशयांच्या बाजूला छड्यांचा जुडगा. कोणता एखादा मुलगा वाचीत नाही म्हणाला अथवा ऐकेनासा झाला तर त्याच्या पाठीवर वा त्याला जमिनीवर आडवा पाडून त्याच्या पोटावर या छड्या बसायच्या. मी म्हटले, " या छड्या पाहिल्या तर याचा बापही रडू लागेल मग याची काय कथा ! हा तर रडेलच. तेव्हा प्रथम या छड्या आपण फेकून दिल्या पाहिजेत. " ते म्हणाले, " मग लिहिणे वाचणे होणार नाही. "

मी सांगितले, " ठीक आहे. पहा तर मी आता तुमच्यासमोरच वाचून घेतो. " असे म्हणून शाळेच्या नोकराला म्हटले, " एक मोठे जाजम पसर पाहू. मी एक खेळ दाखविणार आहे. " लागलीच क्लासमधील सगळी मुले माझ्या सभोवार जमली आणि म्हणाली " पाहू या. काय खेळ आहे तो. "

मी म्हटले, "थांबा ना. पहा आता मी फार मजेदार खेळ दाखविणार आहे" नंतर जाजम पसरताच त्या जाजमावर मुलांना घेऊन बसलो. प्रथम त्या सर्वांच्या कबुलीने एक नियम केला की, खेळात जो दांडगाई अगर गडबड गोंधळ करील त्याला या खेळातून बाहेर घालवून देण्यात येईल. शेवटी खेळाला आरंभ झाला. मी मुलांच्या नकळत पाटीवर घोड्याचे एक चित्र काढले. त्याची जीभ बाहेर आलेली होती. शेवटी त्याच्या जिभेवर ' क, ' शेपटीच्या टोकाला ' ख, ' पायाच्या खुरावर ' ग ' अशा प्रकारे वर्णमालेची अक्षरे लिहिली. शेवटी तो घोडा जेव्हा सर्वांच्या समोर बाहेर काढून दाखविला, तेव्हा सर्वांनाच हसू आवरेनासे झाले. ज्यांना थोडाफार अक्षर परिचय झाला होता, ते ओरडू लागले. 'घोड्याच्या जिभेवर क, शेपटीवर ख ' वगैरे, आणि ज्यांना अक्षर ओळख झाली नव्हती, ते पुढे वाकून विचारू लागले, कुठे आहे जिभेवर क पाहू. " वगैरे. पाहाता पाहाता त्यांना वर्णपरिचय होऊ लागला. त्याच्या दुसऱ्या दिवशी जो मी स्कूलमध्ये येतो तोच खालच्या वर्गातील सर्व मुले मला धरून सांगू लागली, ' पंडित मोशाय, तुम्ही आमच्या क्लासात या. आमच्याशी खेळ करा.'

ही घटना माझ्या अन्तकरणात कायमची राहून गेली आहे. नंतर हरिनाभी येथे आणि भवानीपूर येथे जेव्हा हेडमास्तर म्हणून काम करू लागलो तेव्हा खालच्या वर्गावरील शिक्षकांना, मुलांना खेळवीत हसवीत, त्यांना आत्मविस्मरण

होईल अशा पद्धतीने शिकवावे असे मी सांगितले होते. इंग्लंडात जाऊन किंडर-गार्डन स्कूल पाहिले आणि माझ्या त्या पूर्वीच्या सगळ्या भावना उचंबळून आल्या.

### ब्राह्मबालिका विद्यालयाची प्रथम कल्पना

ब्राह्मपरिसरातील लहान मुलामुलींना नेहमी समाजाच्या मोकळ्या माळावर खेळताना पाहून मनात विचार करू लागलो. ' यांना येथून स्कूल वगैरे विद्यालयात न पाठविता यांच्यासाठी एक लहान विद्यालय स्थापन करावे. हे विद्यालय फक्त तीन तास भरवायचे आणि किंडरगार्डन पद्धतीने यांना शिक्षण द्यावयाचे. ' हा विचार मनात आल्यावर प्रथम कित्येक लहान मुले जमवून शिकविण्याला आरंभ केला. या विद्यालयात मुलीच जास्त जमल्या. त्यांच्याबरोबर लहान मुलगेही असत. या विद्यालयाचे ' ब्राह्मबालिका विद्यालय ' असे नाव ठेविले. बोर्डावर चित्रे काढून त्यांच्या सहाय्याने या अल्पवयी मुलांना कसे शिकवावे ते मी प्रथम शिशू-वर्गाला शिकवून दाखवू लागलो. त्यावेळचे कोणी कोणी शिक्षक त्या वेळेपासून शिशुशिक्षणाची ही नवी पद्धत पाहून ती उपयोगात आणू लागले आणि पुढे किंडरगार्टन शिक्षक बनले.

हळूहळू या विद्यालयाला मोठे स्वरूप आले. हे शिशु विद्यालय विश्व-विद्यालयाला जोडावे अशी माझी इच्छा नव्हती. यात नव्या पद्धतीने शिक्षण चालावे असा माझा मनोदय होता आणि त्याप्रमाणे मी तयारीही चालविली होती. पण समाजाच्या सभासदांनी ते विश्वविद्यालयाला जोडले. आणि श्रद्धास्पद गुरुचरण महलानवीश यांनी स्थापन केलेल्या बालिका बोर्डिंगशी याचा संबंध जोडून त्याला एक प्रसिद्ध बालिकाबोर्डिंग स्कूल करून सोडले. नंतर मी त्याच्याशी जडलेला माझा प्रत्यक्ष संबंध सोडून दिला.

### साधुप्रवण नवीनचंद्र राय यांचा मृत्यू

१८९० सालच्या ऑगस्ट महिन्यात एक शोचनीय घटना घडली. माझे श्रद्धास्पद मित्र नवीनचंद्र राय हे, कलकत्त्यात एक राहाते घर बांधावे म्हणून माझ्या बिऱ्हाडी येऊन राहू लागले. या घरबांधकामाची देखरेख करण्यात व सामान-सुमान जुळविण्यात त्यांना फारच श्रम पडले. शिवाय नेहेमी त्यांना बंगालच्या वायव्येकडील भागात राहण्याची सवय होती. त्यांचे जेवणाखाण्याचे नियम वेगळे होते. माझ्या घरातील बायकामंडळींना ते माहीत नव्हते. त्यांनी विचारले असता नवीनबाबूही संकोची स्वभावामुळे सांगत नसत. खेरीज मनाला उद्वेग वाटण्या-सारख्या आणखीही त्यांच्या काही गोष्टी असाव्यात. ते काही असो पण या सगळ्या गैरसोयींमुळे माझ्या बिऱ्हाडी ते रक्तातिसाराने आजारी पडले. लागलीच खांड-व्याहून कुटुंबीय मंडळींना आणण्यात आले आणि त्यांच्या इच्छेनुरूप त्यांना नवीन बांधलेल्या घरात नेऊन तेथे उपचाराला सुरवात केली. या रुग्णशय्येवर असताना

त्या साधुपुरुषाची जी मनस्थिती मी पाहिली होती तिचा मला केव्हाच विसर पडला नाही. तो ठसा मनावर कायमचा उमटून राहिला आहे.

जेव्हा त्यांना कळून आले की, यातून काही आपला यावेळी निभाव लागणार नाही; तेव्हा प्रथम प्रथम असे माझ्या पाहण्यात आले की त्यांची पत्नी त्यांच्याजवळ जाऊन बसली की त्यांचे अन्तःकरण भावावेगाने उचंबळून येई आणि डोळ्यांतून अश्रू वाहू लागत. कदाचित आपल्या मागे आपल्या पत्नीची कोण काळजी घेईल असे त्यांना वाटत असावे. पण पुढे दोन तीन दिवसांनी त्यांच्या मनाचा हा भाव ओसरला. चेहरा प्रसन्न दिसू लागला आणि मनही शांत झाले. त्यानंतर त्यांची पत्नी त्यांच्याजवळ बसून रडू लागली तर माझ्याकडे बोट दाखवीत आणि संसाराच्या गोष्टी माझ्याजवळ बोलू नको असे तिला सांगत. अशाच स्थितीत एके दिवशी एक ब्राह्मतरुण येऊन त्यांना म्हणाला, ' आपणाला एक गाणे ऐकवावे असे मला वाटते. सांगा कोणते गीत म्हणू!' नवीनचंद्रांनी सांगितले, 'ऐ जे देखाजाय आनंद धाम.' ते गीत असे–

ऐ जे देखाजाय आनन्द धाम अपूर्व शोभन,
भवजलधिर पारे ज्योतिर्मय !
शोकतापितजन सबेचल, सकल दुख हवे मोचन,
शान्ति पाइबे हृदयमाझे, प्रेम जागिवे अन्तरे ।
कत योगीन्द्रऋषिमुनिगण ना जानि कि ध्याने मगन,
स्तिमित लोचने कि अमृत-रस पाने भुलिल चराचर !
कि सुधामय गान गाइले सुरगण, विमल विभुगुण वन्दना,
कोटिचन्द्रतारा उलसित, नृत्य करिछे अविराम !

भावार्थ—भवजलधीच्या (संसारसागराच्या) पलीकडे, ज्योतिर्मय, अपूर्व शोभामय, असे ते आनंदधाम दिसत आहे. शोकसंतप्त झालेल्या सगळ्या लोकांनो चला. (तुमचे) सगळे दुःख नाहीसे होईल. (तुम्ही दुःखमुक्त व्हाल.) हृदयात शांतीचा लाभ होईल. अंतःकरणात प्रेमभक्ती जागृत होईल. स्थिर दृष्टीने कितीतरी योगी, ऋषी मुनी कसल्या ध्यानात गुंग होऊन कोणत्या अमृतरस-पानात या चराचराला विसरून गेले आहेत न कळे ! देवगण किती अमृतमधुर गीत गात आहेत ! पवित्र ईश्वरीगुणाचे हे वंदनगीतच (असावे !) (हे गाणे ऐकता ऐकता) कोट्यवधी चंद्र-तारका उल्लसित होऊन एकसारखे नृत्यच करीत (सुटल्या) आहेत !

हे गीत जेव्हा सुरू झाले तेव्हा नवीनबाबूंच्या डोळ्यातून घळघळ अश्रू वाहू लागले. मुखमंडळ एका अपूर्व ज्योतीने प्रभामय दिसू लागले. मला वाटले, मी काय पाहात आहे हे !

नवीनबाबूंत असे काही होते की, जे पाहून देशी-परदेशी सगळेच त्यांच्याकडे श्रद्धापूर्ण अन्तःकरणाने पाहात. श्रद्धाळू बनत. हे सगळे वर्णन जेव्हा वर्तमानपत्रात प्रसिद्ध झाले, तेव्हा खांडव्याच्या डेप्युटी कमिशनर साहेबांनी 'नवीनचंद्रांनी स्वनेत्रांनी स्वर्गधाम पाहिले होते यावर मी विश्वास ठेवतो !' असे उद्‌गार काढल्याचे मी ऐकले. असो.

यानंतर जे दोन दिवस ते जिवंत होते ते दोन दिवस, स्वतःच्या पत्नीचे सांत्वन करण्याचे प्रयास घेण्यात त्यांनी घालविले होते. मरणाच्या काही वेळ आधी ते पत्नीला म्हणाले, 'मोहबतसे मिलकर हमेशा यहाँ रहना !' (तू प्रेमाने मिळून मिसळून नेहेमी येथेच यांच्याजवळ राहा.) हाच त्यांनी आपल्या पत्नीला केलेला अखेरचा उपदेश. त्यांनी जेव्हा अखेरचा श्वास सोडला तेव्हा आम्ही सर्व ईश्वरनामसंकीर्तन करू लागलो. त्यांनी आपले दोन्ही हात जोडून वक्ष्यस्थलावर ठेवले आणि ईश्वराला धन्यवाद देता देता अखेरचा निरोप घेतला. सर्व परिवाराची देखभाल करण्याचा भार अखेरीस ते माझ्यावर सोपवून गेले.

**पुनः मद्रासमध्ये**

नवीनचंद्र स्वर्गवासी झाल्यावर मी एकदा धर्मप्रचारासाठी म्हणून मद्रास प्रेसिडेन्सीत गेलो. ४ ऑक्टोबर १८९० रोजी मद्रासला पोचलो. तेथून १४ ऑक्टोबरला कोइमतूर आणि मग २१ ऑक्टोबरला पश्चिम समुद्र किनाऱ्यावर असलेल्या कालिकतला गेलो. कालिकत येथे गेल्यावर जी आख्यायिका ऐकली ती फारच नवलाईची. तेथे लोकप्रवाद असा आहे की, मलबार किनाऱ्यावर स्वतः परशुरामाने ब्राह्मणांचे राज्य स्थापन केले होते. तेथे नंबुद्री ब्राह्मणांचे विलक्षण प्रभुत्व. तेथे दुसऱ्या एका वर्गाचे लोक आहेत. त्यांना नायर म्हणतात. नायर हे प्रथम क्षत्रियच होते असे म्हणतात आणि ते ब्राह्मणांबरोबर हा देश जिंकण्यासाठी आले होते. त्यांच्या शौर्याच्या अनेक कथा ऐकल्या.

**कालीकतचे नंबुद्री ब्राह्मण आणि नायर यांच्या विलक्षण सामाजिक रूढी**

तेथे कितीतरी अतिशय आश्चर्यकारक चालिरीती मला दिसल्या. प्रथम असे पाहिले, तेथील ब्राह्मण वर्ग अगर गुरुजन यांना पाहताच नायर किंवा शूद्र स्त्रियांनी आपले वक्षस्थल अनावृत्त केले पाहिजे. ब्राह्मण अगर गुरुजन यांना सन्मानदर्शक अशी ही रूढी आहे असे मला समजले. या विचित्र रूढीसंबंधाने एक गोष्ट ऐकली. एकदा टिपू सुलतानाने म्हणे, उपहास करण्याच्या हेतूने एका नायर पुरुषाला विचारले, "नायर, तरुणीचे वक्षस्थल उघडे का ? अशाने लोकांकडून विनयभंग होईल." यावर नायर पुरुषाने उत्तर दिले, "नायर स्त्रीचे वक्षस्थल अनावृत्त तशीच नायर पुरुषाची तरवारही अनावृत्त." नायर लोकांच्या वीरत्वाची ख्याती आहेच.

दुसरी सामाजिक रूढी जी पाहिली, ती एका घटनेनेच व्यक्त करतो. एके दिवशी एका ब्राह्मण मित्रासह मी फिरायला म्हणून बाहेर पडलो होतो. आम्ही दोघे रस्त्याने जात असता पाहिले तो, आमच्या समोरून एक खालच्या वर्गाचा मनुष्य येता येता दहा बारा हात अंतरावर बाजूस उभा राहिला आणि काही शब्द बोलला. मी माझ्या मित्राला तो का थांबला असे विचारता त्याने सांगितले, "तो मला ब्राह्मण म्हणून ओळखतो. त्यासाठी उभा राहून सावधगिरीची सूचना देत आहे. आपला वारा तुम्हाला लागेल. सावलीही पडेल. तेव्हा सांभाळून जा. ही इकडील आमची समाजरीत आहे. खालच्या जातीच्या लोकांनी रस्त्यात ब्राह्मणाला पाहताच असे करावे लागते." मी अशा प्रकारची सामाजिक रूढी आर्यावर्तात कुठेच पाहिली नव्हती. त्यामुळे हा प्रकार पाहून दाक्षिणात्यांत जातिभेदाची चाल किती दूरवर गेली आहे हे कळून चुकले.

त्यानंतर जे ऐकले ते तर याहूनही आश्चर्यकारक. ते असे : नायर आणि शूद्र यांच्या मुलींची लग्ने होत नाहीत. लग्नाचे वय झाले की एका स्वजातीय मुलाशी नाममात्र लग्न लागते. एक भोजन समारंभही होतो. पण ज्याला विवाह म्हणतात तसा तो नव्हे. कारण विवाहाच्या दुसऱ्याच दिवशी त्या वधूचा त्या वराशी कसलाच संबंध राहात नाही. मुलगी आपल्या आईकडेच राहते. वयात आल्यावर तिचे आप्तइष्ट एका ब्राह्मण तरुणाला बोलवून आणून त्याच्याशी तिचा परिचय करून देतात. आणि तो ब्राह्मणतरूण त्या मुलीचा खरा पती बनतो. पुढे तिला वाटल्यास ती नवरा बदलूही शकते. असा नाममात्र व काममात्र तो पती झाला तरी मुलांची त्या पित्यावर कोणतीही जबाबदारी असत नाही. ती जोखीम त्या मुलांच्या मामावर राहते. आणि ती मुले मामाच्या संपत्तीची अधिकारी होतात.

एका बाजूला ही अशी प्रथा तर दुसऱ्या बाजूला नंबुद्री ब्राह्मणात या बाबतीत एक वेगळीच प्रथा रूढ आहे. त्यांच्यात पहिला मुलगा वंशरक्षणासाठी विवाह करतो. दुसरे मुलगे विवाह न करता नायर व शूद्र जातीच्या स्त्रियांशी आणि जरूरीप्रमाणे एकाधिक स्त्रियांशी सहवास करतात. त्यांना तसे करण्याची मुभा असते. याचा परिणाम असा झाला आहे की, अनेक ब्राह्मण मुलींना पतीच्या अभावामुळे कायमचे कौमार्यव्रत स्वीकारावे लागते. नायर स्त्रियांशी नंबुद्री ब्राह्मणाचा सहवास होण्याच्या या पद्धतीचा किंवा स्वाभाविक रूढीचा असा परिणाम झाला आहे की, ते गैर आहे असे कुणालाच वाटत नाही. एके दिवशी एक नायर जातीचा सभ्य गृहस्थ बोलता बोलता स्वतःच्या देहाकडे बोट दाखवून म्हणाला, "माझ्या देहात ब्राह्मणांचे रक्त आहे!"

### कोकोनाडा येथे भयंकर आजारी

कालीकतहून पुनः कोइमतूरला गेलो. आणि त्यानंतर त्रिचनापल्ली व बंगलोर

येथे जाऊन ३० ऑक्टोबरला पुनः मद्रासला आलो. तेथे काही दिवस राहिल्यावर वेझवाडा, मछलीपट्टण आणि राजमहेंद्रीमार्गे १८ नोंव्हेंबरला कोकोनाडा येथे आलो. माझी ही येथे येण्याची दुसरी वेळ. येथे आल्यावर २० नोव्हेंबर रोजी मी अतिशय आजारी पडलो. नंतर तो आजार म्हणजे टायफॉईड ठरल्याचे ऐकले. तापाबरोबर रक्ताचे जुलाब आणि डोक्यात भयंकर वेदना सुरू झाल्या. तेथील मित्रमंडळींनी माझ्यासाठी एक भाड्याची खोली घेऊन तेथे माझी राहण्याची सोय केली होती. दुसऱ्या ठिकाणाहून माझे दोन्ही वेळचे जेवण त्या खोलीवर येत असे; पण आजार जेव्हा जास्त वाढला तेव्हा सर्वांनाच काळजी वाटू लागली. यावेळी कोकोनाडा येथील शाळेत एक बंगाली ख्रिश्चन, हेडमास्तरच्या हुद्यावर होते आणि आपल्या कुटुंबीय मंडळींसह शाळागृहातच एका बाजूला राहात असत. त्यांनी कृपाळू होऊन मला आपल्याकडे नेले आणि तेथे माझ्यावरील औषधोपचारांना सुरवात केली.

माझ्या शुश्रूषेची जोखीम ब्राह्मसमाजप्रेमी काही तरुणांनी आपल्याकडे घेतली होती. पण त्यांचा त्यावेळी हिंदुसमाजाशीही संबंध होता. अर्थात त्या समाजाच्या भीतीने माझे खाणेपिणे, धुणे सवरणे या गोष्टी मनमोकळेपणाने त्यांना करता येईनात. त्यासाठी मेथर जातीची एक बाई ठेवण्यात आली होती. ती लंगडी व अशक्त होती. त्यामुळे मला संडासात वगैरे नेताना पाडील की काय अशी भीती वाटे. एके दिवशी तिच्या रुक्ष हातात मी पकडलेला असताना माझा इकडे तिकडे तोल जाऊ लागला तेव्हा मी बोललो ' आय सी माय करियर इज गोइंग टू एण्ड इन् दि आर्मस् ए स्वीपर वूमन !' ('एका मेथराणीच्या हातात हे माझे जीवन संपणार असे दिसते !) मी असे उद्‌गार काढले मात्र तोच एका ब्राह्मण तरुणाने आपल्या अंगावरचे उपरणे काढून व जानवे कंबरेला गुंडाळून म्हटले, " लोक माझे काय करणार असतील ते करूदेत; पण मी आपणाला असे लांच्छित होऊ देणार नाही. असे म्हणून तो धावतच आला आणि त्याने मेथराणीला दूर करून मला आपल्या छातीशी घट्ट धरले. आणि नंतर मुलापेक्षाही जास्त आस्थेने तो माझी सेवाशुश्रूषा करू लागला. त्याची ती आपुलकीची प्रेमळ वागणूक मला कधीच विसरता येणार नाही.

### आश्चर्यकारक स्वप्न

या आजारातील तीन गोष्टी मुख्यतः माझ्या विशेष लक्षात राहिल्या. माझ्या शरीरातील मज्जागत दुर्बलता इतकी अधिक वाढली होती की, पडल्या पडल्या माझ्या मनात असे येई, की कोणीतरी माझ्या सगळ्या अंगातून शिशाचे किंवा पोलादाचे धारदार पाते फिरवीत आहे ! दुसरी गोष्ट विशेष आश्चर्याची. मी निदारुण डोकेदुखीमुळे अर्धनिद्रित, अर्धजागृत अवस्थेत बहुतेक अचेतन

झालो आहे. इतक्यात घंटेच्या आवाजासारखा कसलातरी आवाज माझ्या कानावर आला. मला वाटले हा घंटेचा आवाज हळूहळू माझ्याजवळ येत आहे. तिकडे माझे लक्ष वेधताच अनेक लोकांचे वृंदगायन चालले असल्याचे मला ऐकू आले. मद्रास प्रेसिडेंसित असताना मी नेहमीच इंग्रजीतून बोलत असे. म्हणून मी इंग्रजीतून बोलू लागलो, " व्हेअर इज दॅट नॉइज फ्रॉम ? " लागलीच मी एका स्त्रीचा आवाज ऐकला. ( मला वाटले तीच घंटा वाजवीत होती. ) ती म्हणाली, " दॅटस् दि ॲन्थेम ऑफ् दि इंमॉर्टलस ! " म्हणजे हा देवगणांचा वंदनाध्वनी.

मी विचारले, " इन् व्हॉट लँग्वेज इज इट् ? " अर्थात् कोणत्या भाषेत हे संगीत गाइले जात आहे ? "

स्त्रीचा आवाज, " हॅव दी इंमॉर्टलस एनि लँग्वेज ? दोज आर थॉट्स. अर्थात् देवांची काय भाषा असते ? ते केवळ विचार असतात ! '

मी म्हटले, " बट आय नोटीस ए ट्यून ? " अर्थात् माझे कोणत्यातरी एका सुराकडे लक्ष वेधले आहे.

स्त्रीचा आवाज, " दॅटस दि ट्यून ऑफ दि युनिव्हर्स-हार्मनी " म्हणजे हा या ब्रह्मांडातील आवाज. याचेच नाव महायोग !

हे तिचे भाषण ऐकून मी मनातल्या मनात विचार करू लागलो. सुरगणाचा विचार एक होऊन तो महायोगाच्या सुरात वाजत आहे. त्यानंतर मी प्रश्न केला पण उत्तर मात्र स्त्रीच्या आवाजात मिळाले नाही. तेव्हा मी व्याकूळतेने विचार करू लागलो, तोच आचार्य केशवचंद्रसेन महाशय हसत हसत येत आहेत असे दिसले ! अशा प्रकारची मृत व्यक्तींची स्वप्ने मला सहसा कधी पडत नाहीत. का कोणास ठाऊक पण माझ्या अगदी जवळच्या नातेवाइकाची पण स्वप्ने मला पडत. पण यावेळी मात्र आचार्य केशवचंद्रांना मी पाहिले. ते हसून म्हणाले, " पहा. पृथ्वीवर असताना किती चुका केल्या जातात. पण एकमेकांना ओळखता येत नाही. ते काही असो. तू ये. तुला राममोहन रायकडे घेऊन जातो. " मी उठू लागलो तोच माझी झोपमोड झाली, मी सावध झालो. सांगायचे आश्चर्य म्हणजे, त्यानंतर दोनतीन दिवस जाग्रत स्थितीतही तो महान् गदारोळ आणि सुरगणांची गाथा मला ऐकू येत असे.

## एक अलौकिक घटना

तिसरी घटनाही आश्चर्यकारक हे मी नंतर ऐकले. मी कोकोनाडा येथे बिछान्यावर पडून या कुशीवरून त्या कुशीवर आणि त्या कुशीवरून या कुशीवर असा तळमळत होतो तेव्हा ' आई ग, आई ग ' असे शब्द माझ्या तोंडून निघत. त्यावेळी माझ्या आईने गावातल्या आमच्या घरी माझ्या वडिलांना " तुम्ही कलकत्त्याला जा त्याची खुशाली आणा. माझे मन का कोणाला ठाऊक अगदी बेचैन

होत आहे. " असे आग्रहाने विनवून त्यांना अस्वस्थ करून सोडले. तिच्या वड-बडीला कंटाळून रागानेच बाबा कलकत्त्याला आले असावेत. येऊन त्यांनी गुरुचरण महलानवीशकडे चौकशी केली तेव्हा त्यांना मी फार आजारी असल्याचे कळले.

ते काही असो. मी फार आजारी आहे असे समजताच कलकत्त्यातील मित्रमंडळींनी, डॉ. बिपिनबिहारी सरकार, ( माझे सध्याचे जावई ) साधारण ब्राह्मसमाजाचे त्यावेळचे उपाध्यक्ष शशिभूषण बसू. माझी दुसरी पत्नी बिराज-मोहिनी आणि माझी वडील मुलगी हेमलता या चार जणांना कोकोनाडा येथे रवाना केले. आणि त्यांच्या अगत्याच्या व आपुलकीच्या सेवाशुश्रूषेने मी लवकरच त्या आजारातून उठलो. २० डिसेंबरला माझा ताप ओसरला. आणि २६ डिसेंबर रोजी मी त्या चौघांबरोबर कलकत्त्याला येण्यासाठी निघालो.

*

* *

.२३.

# आयुष्याची अखेर

## साधनाश्रम

१८९२ च्या फेब्रवारी महिन्यात मी साधनाश्रमाची स्थापना केली. १८९१ साली मी शहराच्या बाहेर बालिगंज येथे बिऱ्हाड केले होते. शहर सोडण्याचे कारण असे, काही दिवसांपासून माझ्या मनाची अवस्था उदासीनतेकडे वळू लागली होती. माझ्या स्वतःच्या चालू असलेल्या कामकाजाकडे आणि समाजाच्या कार्याकडे लक्ष लागेना. एक प्रकारची विरक्तता येऊ लागली. कशातही मन गुंतेना. रमेना. कंटाळा येत चालला. साध्यासुध्या गोष्टींत मित्रांशी आणि आप्त· इष्टांशी माझे पटेना. जुळेना. वैताग येऊ लागला. शेवटी मनात आले शहरापासून थोडेसे दूर राहणेच चांगले. म्हणून बालिगंजमध्ये एका मित्राच्या घरात भाड्याने राहू लागलो. येथे आल्यावर बहुतेक रोज पहाटे उठून एखाद्या निर्जन बागेत जात असे आणि तेथे चिंतन-मननात काळ घालवीत असे. अशा प्रकारे चिंतन करता करता मनाला वाटू लागले, की जे ब्राह्मधर्मप्रचार, ब्राह्मधर्मसाधना, ब्राह्म-समाज आणि जनताजनार्दनाची सेवा करण्यासाठी आत्मसमर्पण करणारे असतील, जे श्रद्धा, वैराग्य आणि सेवेच्या भावनेने प्रेरित होऊन कार्य करणारे असतील अशा साधकांची एक मजबूत संघटना बनविणे अत्यावश्यक आहे. त्याशिवाय ब्राह्मसमाज शक्तिसंपन्न होणार नाही. श्रद्धाळू आणि वैराग्यशील माणसे असणे हेच धर्मसमाजाचे सामर्थ्य. अशा प्रकारची माणसे तयार न झाली तर धार्मिक समाजाची शक्ती वाढणार नाही. ही मनाची समजूत इतकी पक्की होऊन बसली की, तिने रात्रंदिवस माझ्या मनाचा ताबाच घेतला. दुसरे काही सुचेचना. शेवटी १८९२ सालच्या माघोत्सवाचे वेळी अशा प्रकारची साधक मंडळी तयार केली आणि त्याच बाबतीत मी प्रार्थना करू लागलो. शेवटी अन्तःकरणात तशी प्रेरणा

आली. याच वर्षी माझ्या जन्मदिवसापूर्वी ( ३ १ जानेवारीपूर्वी ) मी तो संकल्प कृतीत आणण्याच्या प्रयत्नाला लागलो. प्रस्तावित आश्रमाचा उद्देश व व्यापकता ज्यात लिहिली आहे असे एक पत्रक तयार केले आणि मित्रवर्य आनंदमोहन बसू यांना दाखविले. त्यांनी मनःपूर्वक त्याचा पुरस्कार केला, त्यामुळे माझा उत्साह दुणावला.

त्यानंतर ३ १ जानेवारी हा माझा जन्मदिवस साजरा झाला. १ फेब्रुवारी १८९२ रोजी ४५ नं. बेनियाटोला लेन येथील सिटीस्कूलच्या इमारतीत एक खोली मागून घेऊन कित्येक मित्रांना निमंत्रित केले. आणि त्या खोलीत उपासनापूर्वक आश्रम स्थापन केला.

त्या दिवशी जे उपस्थित होते, त्यात मैमनसिंहचे श्रीयुत गुरुदास चक्रवर्ती हे एक होते. माझे ते पत्रक वाचून त्यांचे मन उचंबळून आले आणि या कार्याला स्वतःला वाहून घेण्यासाठी ते उतावीळ झाले. ते त्यावेळी मैमनसिंहस्कूलचे शिक्षक होते. रजा घेऊन कलकत्त्याला आले होते. अर्थात त्यावेळी मी त्यांना निरोप दिला हे सांगावयास नकोच. पण ते आपल्या कामावर गेल्यानंतर वारंवार आश्रमासंबंधाने पत्रे लिहू लागले. त्यांना थोडे कर्ज होते. शेवटी ते कर्ज फेडण्यासाठी त्यांना रुपये देऊन आश्रमासाठी बोलविले.

जगदीश्वर आश्चर्यकारक उपायांनी व मार्गांनी आश्रमासाठी द्रव्य देऊ लागला. एका मुलाच्या हाती भिक्षेची झोळी पाठवीत असे. त्यात स्वतः होऊन लोक जे घालीत त्यातून सगळा खर्च चालत असे. गुरुदास सर्वस्वाचा त्याग करून आले. त्यानंतर काशीचंद्र घोषाल नावाचे विक्रमपूर येथील एक ब्राह्म आपले चपलांचे दुकान बंद करून आले. हळूहळू आणखीही अनेक आले. त्यातील काही परतही गेले. आश्रम प्रथम निरनिराळ्या घरी फिरता असे. शेवटी समाज वाडीतील समाजाने बांधलेल्या प्रचारक भवनात तो कायम करण्यात आला. आणि आतापर्यंत तो तेथेच आहे.

आश्रमाचा इतिहास नावाचे एक हस्तलिखित पुस्तक आहे. त्यात या आश्रमाच्या अनेक घटनांचे विवरण पाहिले असता मिळेल. म्हणून या ठिकाणी जास्त लिहीत नाही. केवळ काही विशेष घटनांचा उल्लेख करतो. आश्रम जेव्हा स्थापन झाला तेव्हा माझ्या हाती एक पैसाही नव्हता. इतकेच काय पण बसण्या-लिहिण्यासाठी एक खुर्ची व डेस्क घ्यावे तर तेवढ्या पैशांचाही अभाव होता. असे असताही आश्रमाच्या स्थापनेदिवशी केलेल्या उपासनेला जे सर्व मित्र आले होते त्यांच्याकडेही काही मागितले नाही. मनाची अशी धारणाही होती की हे कार्य जर परमेश्वराला आवडत असेल अगर पसंत असेल तर मदत आपोआप चालून येईल. स्वतः होऊन देण्यात येणाऱ्या दानावर चालेल. आणि आश्चर्य

असे की, दोन दिवस होतात न होतात तोच इंग्लंडहून प्रोफेसर फ्रान्सिस न्यूमनने पाठविलेली पंधरा रुपयांची मनिऑर्डर आली. त्याने लिहिले होते, ' तुम्हाला ब्राह्मसमाजाच्या ज्या कार्याकडे याचा व्यय करावासा वाटेल तिकडे करा. ' या रुपयांतून डेस्क, खुर्ची आणि इतर आवश्यक वस्तू ज्या पाहिजे होत्या त्या विकत घेण्यात आल्या. या भावनेने भारून गेल्यामुळे ज्या मुलांच्या हाती घरोघर पेटी पाठविली होती, त्याला सांगितले होते, ' कोणाकडेही विशेष तऱ्हेने काही मागावयाचे नाही. केवळ पेटी घेऊन घरोघर जाऊन उभे राहायचे. आपण होऊन जे कोणी काही देतील ते घ्यावयाचे. अशा तऱ्हेने चोहोकडून मदत मिळाली होती.

आश्रमाशी निगडित अशा आणखी एका चिरस्मरणीय घटनेचा येथे उल्लेख करतो. १८९२ च्या १ फेब्रुवारीला आश्रमाची स्थापना झाली. १८९३ सालच्या माघोत्सवात, माघ महिन्याच्या १२ तारखेला सकाळीच साधनाश्रमाचा उत्सव व्हायचा आणि माझ्यासह सात जणांना विधिपूर्वक आश्रमीय म्हणून नियुक्त करावयाचे असे ठरले. या नियुक्तीसाठी आम्ही महर्षी देवेन्द्रनाथ ठाकूर यांना निमंत्रण दिले. त्यांनीही कृपाळू होऊन येण्याचे मान्य केले. मी नित्याची उपासना थोडक्यात आटोपून वेदीवरून खाली उतरलो. संगीत प्रार्थना चालू होतीच. यानंतर महर्षी आले. आणि त्यांच्यासाठी नवीन केलेल्या वेदीवर ते स्थानापन्न झाले. एक पद म्हणून झाल्यावर मुख्य समारंभाला सुरवात झाल्याचे सूचित करून मी साधकमंडळ व साधकाश्रम यांचे उद्देशपत्रक वाचून दाखविले. त्यानंतर आम्ही सातजणांनी एकेक याप्रमाणे आमचे व्रतपत्र वाचले आणि महर्षींनी आम्हा प्रत्येकाच्या मस्तकावर हात ठेवून आपली आशीर्वादवाणी उच्चारली. नंतर महर्षी गेल्यावर उपासनेचा उरलेला भाग पुरा केला. त्या दिवशीच्या माझ्या प्रवचनाचा विषय ' जीवनात सत्यावाचून शक्ती संचरत नाही ' हा होता. हे प्रवचन झाल्यानंतर सर्वांच्याच अन्तःकरणात असा अपूर्व भाव निर्माण झाला की, जमलेल्या मंडळीजवळ दान करण्याला योग्य असे जे काही होते ते, सगळ्यांनी आश्रमासाठी देणगी म्हणून देण्याला सुरवात केली. इतकेच काय पण शेवटी चोहोकडून माझ्या मस्तकावर, पुरुषांच्या अंगावरच्या शाली, मौल्यवान रेशमी वस्त्रे व स्त्रियांच्या हातातील, गळ्यातील सुवर्णालंकार वगैरे वस्तुंचा वर्षावच होऊ लागला. नंतर हे सर्व विकून शेकडो रुपये आश्रमाकडे जमा करण्यात आले.

अशा प्रकारे स्वतः होऊन दिलेल्या दानधर्माने साधनाश्रम कायमचा चालला आहे. साधनाश्रमाचे हे इतिवृत्त पाहून, मित्रमंडळींना, ईश्वराला धन्यवाद देण्याला एक चांगलेच कारण होईल. त्या जगन्नियंत्याने आश्रमाचा द्रव्याभाव सतत पूर्ण केला इतकेच नव्हे तर यामुळे अनेकांची मने या धर्मानुष्ठानाकडे ओढली जाऊन पुष्कळांनी ब्राह्मधर्मप्रचार आणि ब्राह्मसमाजाची सेवा या महान् कार्याला

स्वतःला वाहून घेतले. त्यांतील चौघांना आतापर्यंत एकामागून एक याप्रमाणे साधारण ब्राह्मसमाजाने आपले प्रचारक म्हणून निवडले आहे.

आणखी एक स्मरणीय घटना अशी :— एकदा मी आश्रमाची सर्व व्यवस्था आश्रमीयांपैकी एकाकडे सोपवून धर्मप्रचारार्थ लाहोरला गेलो होतो. तेथे गेल्यावर कळले की आश्रमाची परिस्थिती पैशाच्या अभावामुळे फार अडचणीची झाली आहे. दिवसाला दोनतीन आण्यांत बाजार करावा लागतो. ज्या रविवारी सकाळी ही बातमी मला समजली त्याच दिवशी तेथील एका ब्राह्ममित्राच्या घरी मला भोजनाचे आमंत्रण होते. भोजनाला जाताना बरोबर असलेल्या एका ब्राह्ममित्राला म्हटले, " आज जेवायला जायला मला उत्साह वाटत नाही. कलकत्त्याच्या साधनाश्रमात जे आहेत त्यांच्याकडे बाजार करायला पैसा नाही आणि मी इकडे मेजवान्या झोडीत फिरत आहे ! हे मला बरे वाटत नाही. पण काय करू येतो म्हणून कबूल केले आहे; न जाऊनही चालण्यासारखे नाही. " असे म्हणून कसाबसा मी भोजनाच्या जागी जाऊन जेवून आलो. सायंकाळी लाहोरच्या ब्राह्ममंदिरात उपासना मलाच करावी लागली. उपासना संपवून मी वेदीवरून खाली उतरतो तोच एकजण माझ्याकडे येऊन म्हणाला, " एक पंजाबी बड्या घरची स्त्री तुमची भेट घ्यावी म्हणून मंदिराच्या मागच्या बाजूला असलेल्या खोलीत वाट पाहात आहे. " मी जाऊन पाहिले, तो ती एका बड्या गृहस्थाची सून होती. तिच्या नवऱ्याला थोड्याच दिवसांपूर्वीपासून ब्राह्मसमाजाचे विशेष आकर्षण वाटू लागले होते. तिने मला पाहताच स्वतःच्या बैठकीवरून उठून आणि गलवस्त्र होऊन ( साडीचा पदर गळ्यात घेऊन ) माझ्या पायांवर मस्तक ठेविले आणि पायांवर शंभर रुपयांची नोट ठेवून म्हटले, ' आपण स्थापन केलेल्या आश्रमासाठी हे दान आहे. ' दुसऱ्याच दिवशी ते रुपये मी कलकत्त्याला कार्याध्यक्षांकडे पाठवून दिले.

## ब्राह्मबालक बोर्डिंग

याच दिवसात आणखी एका कामाला मी हात घातला; पण त्यात यशस्वी झालो नाही. त्यावेळी आश्रमाच्या स्थापनेच्या गडबडीत होतो. अशाच वेळी सीतानाथ नंदी नावाच्या एक ब्राह्मतरुणाने, ब्राह्मबालकांसाठी एका बोर्डिंग स्कूलच्या स्थापनेच्या आवश्यकतेचा माझ्याकडे उल्लेख केला. मी त्याला म्हटले, " तुम्ही कामाला आरंभ करा. मी तुमच्या पाठीमागे आहे. " यावर तो म्हणाला, " आपण कार्याध्यक्ष म्हणून नाव देत असाल तर आम्ही या कार्याला आरंभ करतो. " मी त्याचे म्हणणे मान्य केले आणि कार्याची जोखीमही पत्करली. सीतानाथच्या देखरेखीखाली बोर्डिंगची स्थापना झाली. हळूहळू पुष्कळशी मुलेही जमली. पण सांगायला खेद वाटतो की, त्यानंतर थोड्याच दिवसांत सीतानाथ नंदी मरण पावला. तो वारल्यानंतर मी त्या बोर्डिंगची जबाबदारी, साधनाश्रमाचे परिचारक

गुरुदास चक्रवर्ती यांच्याकडे सोपविली. याच दिवसांत सतीशचंद्र चक्रवर्ती नावाचा एक पूर्वबंगीय तरुण आश्रमाला येऊन मिळाला. आणि तो मुलांच्या बोर्डिंगच्या बाबतीत गुरुदासबाबूंचे सहकार्य करू लागला. त्यांच्या व्यवस्थेखाली ते बोर्डिंग काही दिवस चालले. नंतर गुरुदासबाबू वगैरे मंडळी कलकत्ता सोडून आरा येथे गेली आणि तेथून त्यांनी बांकीपूर गाठले. तेथे त्यांनी साधनाश्रमाची शाखा सुरू केली. त्यावेळी मग बोर्डिंगची जबाबदारी श्रद्धास्पद गुरुचरण महलानवीश यांच्याकडे सोपविण्यात आली. मुलांनी बोर्डिंगला द्यावयाचे ठराविक पैसे न दिल्यामुळे गुरुदासबाबू वगैरे मंडळींना बाजारचे सुमारे पाचशे रुपये देणे झाले होते, ते मला द्यावे लागले. महलानवीशांच्या हातून ते बोर्डिंग जरी चालले नाही तरी त्यांनी आणखी एक तसेच बोर्डिंग ब्राह्मबालकांसाठी काढले आणि शाळाही सुरू केली. ती दोन्ही आतापर्यंत चालू आहेत.

## उपासक मंडळाचे जबाबदार असे कायमचे आचार्य

माझे याच वेळचे आणखी एक महत्त्वाचे काम म्हणजे, कलकत्ता साधारण ब्राह्मसमाजाच्या उपासक मंडळाची उन्नती होण्याचा उपाय. सध्या उपासक मंडळाचे कार्य थांबले होते असे नाही, चाललेच होते. कार्याध्यक्षाने साप्ताहिक उपासनेसाठी कोणा एखाद्याला विनंती करायची आणि त्याने उपासना चालवायची. आम्ही आतापर्यंत अशाच तऱ्हेने साप्ताहिक उपासना करीत आलो होतो; पण अशा उपासनेने व्हावे तसे समाधान होईना. नंतर १८९४ साली डॉ. प्रसन्नकुमार राय हे उपासना मंडळाचे अध्यक्ष झाले. त्यांना असे वाटू लागले की, खिस्ती पद्धतीप्रमाणे पॅस्टोरल सिस्टिम चालू केल्यावाचून खरी आध्यात्मिक उन्नती होणार नाही. माझ्याजवळ ही उणीव त्यांनी बोलून दाखविताच मी अन्तःकरणपूर्वक त्याला अनुमोदन दिले आणि उपासकमंडळाचा पहिला अधिकृत स्थायी आचार्य म्हणून त्या जागेचा मी स्वीकार केला. आचार्य आणि उपासकमंडळ यांना उपयुक्त असा पुस्तकसंग्रह असावा म्हणून 'ब्राह्मसमाज लायब्ररी' नावाची एक लायब्ररीही काढण्यात आली. मी माझे ऑफिस त्या लायब्ररीतच ठेवून आचार्यांचे काम करू लागलो. प्रत्येक साप्ताहिक उपासनेत द्यावयाचा उपदेश मी लिहून आणून तो वाचीत असे. नंतर तोच उपदेश छोट्या आकारात छापला जाई. या सर्व मुद्रित प्रवचनांचा 'धर्मजीवन' नावाच्या एका पुस्तकात संग्रह करण्यात आला. हा ग्रंथ म्हणजे माझ्या आध्यात्मिक जीवनाचा आणि आध्यात्मिक चिंतनाचा परिपाक होय असे म्हटले तरी चालेल.

काही दिवसांनी शारीरिक अस्वास्थ्यामुळे मला अधिकृत आचार्याची जागा सोडून स्वास्थ्यासाठी निरनिराळ्या ठिकाणी जावे लागले. त्यामुळे उपासकमंडळाचे कार्य पुनः पूर्वस्थितीवर आले, असे मोठ्या खेदाने म्हणावे लागते.

यानंतर या काळात मी कोणत्याही नव्या कामाला हात घातला नाही. काही वर्षेपर्यंत साधनाश्रमाचे काम आणि उपासक मंडळीत आचार्यांचे काम ही दोनच माझी मुख्य कामे होऊन बसली. १८९८ साली प्रकृतिस्वास्थ्यासाठी चंदननगरातील गंगेच्या काठी असलेल्या एका घरात मी जाऊन राहू लागलो, तेथून दर रविवारी कलकत्त्याला येऊन मंदिरात आचार्यांचे काम करीत असे. तसेच समाजाच्या इतर कामातही भाग घेत असे. १८९९ सालच्या अखेरीला पुनः कलकत्त्याला येऊन राहू लागलो.

## ' रामतनु लाहिडी आणि तत्कालीन वंगसमाज ' हे पुस्तक

या काळातील इतर उल्लेखनीय घटनांमध्ये ही एक उल्लेखनीय घटना घडली. या काळात आमच्या मंदिरात झालेल्या प्रवचनांच्या ' धर्मजीवन ' नावाच्या संग्रहाखेरीज, ' युगान्तर ' आणि ' नयनतारा ' या दोन कादंबऱ्या आणि ' माघोत्सवातील प्रवचने व व्याख्याने वगैरेंच्या छोट्या छोट्या पुस्तिका अशी माझी साहित्यनिर्मिती झाली. ही सर्व पुस्तके प्रकाशितही झाली. याखेरीज ' रामतनु लाहिडी आणि तत्कालीन वंगसमाज ' नावाचा एक ग्रंथ आणि माझ्या सगळ्या प्रबंधांचा संग्रह करून ' प्रबंधावली ' अशी माझी दोन पुस्तके छापली गेली.

## मुला-मुलींचे विवाह

याच कालात १८९३ साली माझी ज्येष्ठ कन्या हेमलता हिचा विवाह झाला. मी कोकोनाडा येथे आजारी असताना ब्राह्ममित्र मंडळींनी ज्या बिपिनबिहारी सरकार डॉक्टरना माझ्या औषधोपचारांसाठी पाठविले होते, त्यांचा, माझी वडील मुलगी हेमलता हिच्याशी कोकोनाडा येथेच परिचय झाला. त्या परिचयाचे पर्यवसान पुढे दांपत्यप्रेमात झाले आणि शेवटी त्यांनी तिच्याशी विवाह करण्याची इच्छा व्यक्त केली. मी अनुमती देताच ती दोघे विवाहित झाली.

याच संधीला माझी सर्वात धाकटी मुलगी सुहासिनीही विवाहित झाली. साधनाश्रमाशी संबंध असलेल्या कुंजलाल घोष नावाच्या तरुणाशी तिचा विवाह १८९९ साली झाल्यानंतर १९०६ सालपर्यंत ती जिवंत होती. त्याच सालच्या १५ नोव्हेंबर रोजी ती मरण पावली.

१९०१ च्या उन्हाळ्यात माझा मुलगा प्रियनाथ याचा विवाह, कटकचे सुप्रसिद्ध ब्राह्ममित्र मधुसूदन राव यांची द्वितीय कन्या अवन्ती देवी हिच्याशी झाला. पुढे यांना मुलगाही झाला.

याच साली ( १९०१ ) ३ जून रोजी माझी प्रथम पत्नी प्रसन्नमयी ही स्वर्गवासी झाली. त्यापूर्वी पुष्कळ वर्षे ती फार मोठ्या बहुमूत्र रोगाने पराकाष्ठेचे क्लेश भोगीत होती. १८८८ साली तिने, परलोकवासी बंधू राजकुमार विद्यारत्न

यांच्या मातृहीन अशा सर्वांत धाकट्या एक वर्षाच्या मुलीला—रमेला आपली मुलगी मानून सांभाळायला आणले. तिला आणल्यावर थोड्याच दिवसांत त्या मुलीला भयंकर असा रक्ती आमांशाचा विकार जडला, त्यामुळे प्रसन्नमयीला रात्रीच्या रात्री जागरणात काढाव्या लागल्या. शिवाय तिच्या काळजीने ती व्याकूळ झाली. याच वेळी बहुमूत्र रोगाने तिला पछाडले. त्या रोगाचा उपशम व्हावा व तिला स्वास्थ्य लाभावे म्हणून अनेक ठिकाणी तिचे स्थलांतर केले; पण काही केल्या तो रोग हटेना. शेवटी १९०१ सालच्या जून महिन्यात बोटाला कसलेसे क्षत होऊन ती गतप्राण झाली.

## मलाही त्याच रोगाने पछाडले

प्रसन्नमयी गेल्यावर त्याच वर्षी माझी साधारण ब्राह्मसमाजाच्या अध्यक्ष-पदावर निवड झाली. त्यामुळे मला पुष्कळच परिश्रम करावे लागले. ते तसे परिश्रम आणि मानसिक चिंता यांचा परिणाम माझ्या प्रकृतीवर होऊन प्रसन्न-मयीच्या मृत्यूनंतर थोड्याच दिवसांत मलाही बहुमूत्राचा आजार जडल्याचे दिसून आले. त्या वेळेपासून बसल्या बसल्याही उद्विग्नतेमुळे काम करणे मला अशक्य होऊ लागले. वर्षातून काही महिने स्वास्थ्यासाठी म्हणून मला सिमला, दार्जिलिंग, कटक, पुरी वगैरे ठिकाणी राहावे लागत आहे.

## सगळ्या भारताचा प्रवास

या असल्या आजारी स्थितीतच समाजाचे शक्त्यनुसार कार्य करणे अवश्य असल्यामुळे शहरात न राहिल्याने साधनाश्रमाच्या कार्यांची हानी होणार हे जाणूनही सगळ्या भारताचा प्रवास करण्याची, या रोगी अवस्थेतही एकवार मला इच्छा झाली. आणि त्या इच्छेला अनुसरून १९०४ साली फेब्रुवारी महि-न्यात पत्नी विराजमोहिनी आणि आश्रमाशी संबंधित असलेले श्रीमान् हेमेन्द्रनाथ दत्त यांना घेऊन भारतभ्रमणासाठी बाहेर पडलो. बाहेर पडताना संकल्प केला की प्रवासाच्या मदतीसाठी आवश्यक म्हणून विशेष प्रकारे ( खास अशी ) कुणा-कडेही मदतीची याचना करावयाची नाही. निघण्यापूर्वी मंदिरात ब्राह्मधर्माच्या प्रचाराविषयी एक व्याख्यान देईन. त्या व्याख्यानाचे वेळी एके जागी भिक्षेची झोळी ठेवण्यात येईल. त्यात स्वयंप्रेरणेने मित्रमंडळीपैकी जो जे टाकील तेच प्रवासाचे पाथेय, असे मी मानीन. त्याप्रमाणे व्याख्यानाच्या दिवशी एक झोळी टांगण्यात आली. त्यात ज्यांनी जे दिले ते घेऊन आम्ही बाहेर पडलो. मार्गात एकदाच भिक्षा न मागण्याचा नियम मोडावा लागला. आम्ही अलाहाबादेहून एका ब्राह्ममित्राला आमच्यासाठी भिक्षा मागण्याची अनुमती दिली होती. पण त्या ठिकाणी भिक्षेचा काही उपयोग झाला नाही. त्यामुळे पुढे भिक्षा मागणे एकदम बंद केले. कोणालाही आमची गरज जाणवू देत नव्हतो. जे आपण होऊन

काही देतील त्याचाच आम्ही स्वीकार करीत होतो. असा आमचा प्रवासखर्च चालला होता. मी अलाहाबादेहून लखनौ आणि लखनौहून कानपूरला गेलो. त्यानंतर आग्रा, दिल्ली, लाहोर, रावळपिंडी, इंदूर, मुंबई, मंगलोर, कालिकत, कोईमतूर, बंगलोर, त्रिचनापल्ली, मद्रास, मुंबई, नागपूरवरून कलकत्त्याला परतलो. कोणाकडेही काही याचना न करता स्वतः होऊन दिलेल्या दानावर आमचा हा सर्व प्रवास उत्तम तऱ्हेने झाला.

त्यानंतर इतक्या लांबचा प्रवास मी केला नाही. गेल्या वर्षी म्हणजे १९०७ साली मार्च महिन्यात आंध्र कॉन्फरन्सचा अध्यक्ष म्हणून कॉन्फरन्सच्या कामासाठी कोकोनाडा येथे गेलो होतो. तेथून कलकत्त्याला परतल्यावर प्रकृती अगदीच खालावली. मग त्याच स्थितीत हवापालट करण्यासाठी दार्जिलिंग येथे गेलो.

## १९०७ सालचा मोठा आजार

दार्जिलिंग येथे असताना पितृदेवमहाशय फार आजारी असल्याचे समजले. यामुळे ताबडतोब मला गावी जावे लागले. त्यांना बरे वाटल्यावर गावाहून कलकत्त्याला परतलो. कलकत्त्याला आल्यावर १७ जून रोजी मी फार आजारी झालो. या आजारात कित्येकदा 'मी आता वाचत नाही' असेही मला वाटले. असो. ईश्वरकृपेने ४।५ महिने त्या आजारात घालविल्यावर मी रोगमुक्त झालो. पण त्याची अखेरची निशाणी अजूनही कायम आहे. आजही ( ५ जून १९०८ ) संपूर्णतः निरोगी आणि सशक्त झालो नाही. येत्या १५ जूनपासून कमाला सुरवात करावी अशा विचारात मी आहे.

रुग्णशय्येवर असताना आध्यात्मिक चिंतनात पुष्कळसा वेळ घालविता आला. जसजशी शक्ती येऊ लागली तसतशा नवीन भावभावना मनात उद्‌भवू लागल्या. शिल्लक असलेली जी काही वर्षे मला जगात घालविता येतील ती नव्या भावभावनेत व्यतीत करावी असे मनात येत आहे. ईश्वराने हा माझा शुभसंकल्प तडीस नेण्याला सहाय्य व्हावे हीच इच्छा.

[ येथे या आत्मचरित्राची २३ प्रकरणे ३५६ पृष्ठात पूर्ण झाली असून ते संपले आहे. पुढे तीन परिशिष्टे आहेत. —अनुवादक. ]

* * *

•१•

# परिशिष्ट–१

[ ज्या सगळ्या साधू-साध्वींच्या संसर्गात येऊन मी माझ्या आयुष्यात धन्य झालो, ज्यांचे कार्य पाहून मी मुग्ध झालो त्यांची थोडक्यात माहिती.– शास्त्रीजी. ]

## पितृदेव हरानंद भट्टाचार्य

माझे पूजनीय पितृदेव हरानंद भट्टाचार्य हे ईश्वरचंद्र विद्यासागर महाशयांचे अत्यंत आवडते होते. इतकेच नव्हे तर विद्यासागर महाशयांच्या चरित्रगत स्वभावातील अनेक गुणही त्यांच्यात होते. केवळ गुणच का ? त्यांच्या स्वभावातील काही दोषही माझ्या वडिलात होते. तेच प्रखर व्यक्तिमत्त्व, त्यांची ती तेजस्विता, अन्यायाबद्दलचा तिटकारा, तीच स्वाभिमानाची जाणीव, परदु:खाचा कळवळा, हे सर्व गुण माझ्या वडिलात होते. स्वमतप्रियता, तसेच आत्मपरीक्षा व आत्मसंशोधनाबद्दल प्रयत्नशील नसणे आणि परिणामाकडे नजर देण्याचा अभाव हेही होते. पण मनुष्यमात्रांत हे सगळे गुणदोष नसतात असे कुठे आहे ? माझ्या वडिलांचे जे दोष असतील ते असू देत पण हे निश्चित आहे की, लहानपणापासून ते तेजस्वी, अधर्मविद्वेषी आणि सत्यानुरागी होते आणि अशा या दृढप्रतिज्ञ मनुष्याच्या शासनाधीन मी नसतो तर माझ्या चारित्र्याची घडण झाली नसती.

मी माझ्या दीर्घजीवनाच्या परीक्षेत हे पाहिले की, कोणा गृहस्थाच्या घराच्या अंगणाला चोहोकडून जर भिंत असेल आणि ती भिंत जर उंच असेल तर घरातील मुले-मुली शेजाऱ्याच्या अंगणातील घाण केरकचरा ज्याप्रमाणे पाहू शकत नाहीत, सुखाने राहतात–त्याचप्रमाणे आई-वडलांची वागणूक जर उच्च दर्जाची असेल, त्यांच्यामध्ये जर मुलांना पापाविषयी स्पष्ट व मनःपूर्वक तिरस्कार व सद्वर्तनाविषयी स्पष्ट व मनःपूर्वक ( अकृत्रिम ) आदर दिसत असेल तर त्यामुळे ते मातापित्यांचे चारित्र्य उंच भिंतीप्रमाणे त्यांना घेरून टाकते. त्यांना जगातील

वाईट गोष्टी सहजासहजी दिसत नाहीत. ती सन्मार्गानेच जातात आणि सन्मार्गात राहूनच ती वाढतात.

अकृत्रिम ( म्हणजे स्पष्ट व मनःपूर्वक ) असा शब्द मी यासाठी वापरला आहे की, अनेक घरी असे अनेक मातापिता पाहतो की, जसे इंग्रज लेखक डिकन्सने वर्णन केलेल्या ' गुरुमहाशयां ' प्रमाणे, स्वतः मांसाचा तुकडा तोंडात घालून त्याचे चर्वण करीत करीत लहान मुलांना उपदेश करतात : ' हे पाहा मुलांनो, लोभाचा संयम करणे, लोभ आवरणे ही सद्वर्तनाची पहिली पायरी आहे. ' सांगायचे म्हणजे, या वडीलधाऱ्या माणसांना, ' मुलांना तोंडी उपदेश करणे ' हे आपले कर्तव्य आहे असे वाटते. तोंडाने मोठमोठ्या चांगुलपणाच्या गोष्टी सांगायच्या, अधर्माबद्दल तिरस्कार व्यक्त करायचा, साधुत्वाबद्दल, सदाचाराबद्दल आदर दाखवावा असे फक्त वक्तृत्वाच्या अभिनिवेशात सांगायचे, ' बरे सत्य बोला यथातथ्य चाला ' फक्त म्हणायचे. वागणुकीत ते येवो न येवो. मला अशा एका बोलक्या पंडिताची गोष्ट ठाऊक आहे. तो मुलांना मोठा मोठा उपदेश करी. बोलताना, सांगताना, शिकविताना तो चांगलेपणाबद्दल सांगे. इतकेच नव्हे तर मुलांना घेऊन तो नामस्मरणही करी. पण एके दिवशी कोणा एका सद्गृहस्थाच्या बागेत काम करणाऱ्या माळ्याने मालकाच्या नकळत, चांगल्या चांगल्या झाडांची रोपे काढून विकायला आणली. या उपदेशक गृहस्थाने ती स्वस्ताईत मिळतात म्हणून विकत घेण्याचे ठरविले आणि घेऊ लागला. त्याच वेळी तेथे आलेल्या एका गृहस्थाने त्या विकत घेणाऱ्या उपदेशक गृहस्थाला आठवण करून देण्याच्या हेतूने म्हटले, " महाशय, तुम्हांला माहीत आहे ना, ही चोरून आणलेली रोपे आहेत. नाही तर इतक्या स्वस्ताईने ही कशी मिळणार ! " यावर तो गृहस्थ, म्हणतो, " मला पाहण्याचे काय कारण ? माझ्या दारात रोपे विकायला आणली आहेत, स्वस्तात मिळत आहेत, मी घेत आहे. मी काही त्याला नसता लोभ दाखवून बोलविलेले नाही. " असे म्हणून ती रोपे त्याने घेतली. त्यावेळी त्याचे मुलगे तेथे उपस्थित होते, असेही मी ऐकले आहे. नंतर कितीतरी वेळा मनात आले की या गृहस्थाच्या मुलांपैकी पुष्कळशी मुले पुढे अट्टल बदमाष निघाली तर त्यात आश्चर्य वाटण्याचे कारण नाही. वर्तणुकीत नसलेल्या तोंडी उपदेशाचा काही उपयोग होत नाही आणि पुढे झालेही तसेच.

माझे वडील स्वतःच्या वागणुकीने शिकविणारे होते. त्यांनी आम्हाला कधी तोंडी उपदेश केला नाही. ' हे पाहा, या ठिकाणी असे वागले पाहिजे. ' असे ते बोलले नसले तरी त्यांची जीवननीती आम्ही पाहिली आहे. ते मला लहानपणी खूप मार देत असत. फार काय, केव्हा केव्हा त्यांच्या माराने मी बेशुद्धही होत असे. पण ही शिक्षा, त्यांची आज्ञा मानली नाही म्हणून रागाच्या भरात करत नसत, तर माझ्या वागणुकीत खोटेपणा किंवा अन्याय पाहिल्यामुळे. आता त्यांच्या

अधर्मविद्वेषाची काही उदाहरणे देतो.

एकदा उन्हाळ्याच्या दिवसांत आमच्या गावातच शेजारी राहणाऱ्या एका प्रतिष्ठित गृहस्थाच्या तलावात मासे मरून ते वर येऊ लागले. दुसऱ्या दिवशी सकाळी आमची मोलकरीण भांडी घासण्यासाठी त्या तलावावर गेली असता तिकडून येताना तिने एक मोठा मासा आणला आणि आईला म्हणाली, 'आई, XXX च्या तलावात रात्री पुष्कळ मासे मरून वर आले आहेत आणि वाडीतील बरेच लोक ते नेत आहेत म्हणून मीही एक आणला.' आईला वाटले, वाडीतील सर्व लोक जर घेऊन जात आहेत तेव्हा तलावाचा मालक सर्वांना ते वाटीत असेल! म्हणून आईने काही न बोलता तो मासा घेतला.

नंतर बाजारात जाताना बाबांनी आईजवळ पैसे मागितले. आईने धान्य-भाजीपाला वगैरे आणण्यासाठी पैसे दिले. मासे आणण्यासाठी पैसे दिले नाहीत. तेव्हा बाबांनी विचारले, "हे काय, मासे आणण्यासाठी कुठे पैसे दिलेस? आज मासे आणायचे नाहीत?"

आईने उत्तर दिले, "आज मासे आणायला नकोत. मासा आहे. XXX च्या तलावात रात्री पुष्कळ मासे मरून वर आले होते. लोक घेऊन जात होते. एक आमच्या मोलकरणीनेही आणला."

बाबांनी हे ऐकताच ते एकदम भडकले. त्यांच्या ज्वालामुखीतून आगीच्या ठिणग्या उडू लागल्या. कापून ठेविलेल्या माशांसह ती टोपली पाहायला आणविली. मोलकरणीला शिव्यागाळी देऊ लागले. फक्त मारायचे तेवढे बाकी ठेविले. लागलीच कापून ठेवलेल्या माशाची ती टोपली त्यांनी त्या प्रतिष्ठित गृहस्थाकडे पाठविली आणि मासे आणण्यासाठी ते बाजारात गेले. आम्ही हे सर्व पाहात होतो. याउपर मुलांना, "मुलांनो, चोरी करणे हे मोठे पाप आहे." असे गेंगाण्या आवाजात (नाकीसुरांत) सांगण्याची आवश्यकता कुठे उरली?

अशीच आणखी एक घटना माझ्या मनात चांगली ठसली असल्यामुळे ती अजून ध्यानात आहे. बाबा त्यावेळी कलकत्त्याला बंगाली प्राथमिक शाळेत मास्तर होते. ते मला घेऊन उन्हाळ्याच्या सुटीत घरी आले होते. त्यावर्षी देशात दुष्काळ पडल्यामुळे गरीब लोक अन्नाला मोताद होऊन हालात दिवस काढीत होते. त्यांच्या मदतीसाठी गव्हर्नमेंटने एक रिलीफकमिटी काढली होती. बाबांवर या कमिटीतील सभासदांची इतकी श्रद्धा होती की ते ज्याला मदतीसाठी योग्य ठरवीत त्यालाच कमिटी-कडून मदत दिली जाई. याचे कारणही होते. कोणालाही सर्टिफिकिट द्यायचे झाल्यास-ते त्याच्या गावीच नव्हे तर त्याच्या चुलीपर्यंत जाऊन सर्व पाहात आणि तो योग्य आहे असे वाटले तरच सर्टिफिकिट देत. आम्ही बापलेक गावाहून कलकत्त्याला जाताना बाबांनी एके दिवशी ऐकले की, आमच्या गावापासून तीनचार मैलांवरील एका गावी कोणी शेतकरी मनुष्य सहकुटुंब उपाशी आहे. हे ऐकताच लागलीच त्यांनी

स्वतःच्या कोठीतील दोन पायली तांदूळ धोतरात बांधून घेतले आणि चालत जाऊन ते त्याच्या घरी पोचविले. आणि त्याला सांगून आले की, " परवा बाजारचा दिवस आहे, तेव्हा तू माझ्याकडे ये; मी तुला स्वतः रिलीफकमिटीतील सभासदांकडे घेऊन जाईन आणि तुला मदत मिळण्याची व्यवस्था करीन." दुसऱ्याच दिवशी आम्हाला कलकत्त्याला जायचे होते. आणि त्या बाजारच्या दिवशीच त्यांना शाळेत शिकविण्यासाठी हजर व्हायचे होते आणि हजर न झाल्यास सुटीतील दोन महिन्यांचा पगार मिळणार नव्हता, ( तसा त्यावेळी नियम होता. ) हे त्यावेळी त्यांच्या ध्यानातही आले नाही.

दुसऱ्या दिवशी ठरल्याप्रमाणे शालती नौका भाड्याने करून आम्ही बापलेक कलकत्त्याला निघालो. आमचा गाव सोडून आमची नौका तीनचार मैल आलीही, मी शालतीत आरामशीर बसून सभोवारचा माळ, घाट, झाडझाडोरा पाहात आहे. बाबा बाहेरच्या फलाटावर बसून तंबाकू ओढीत आहेत. तितक्यात त्यांना कसलीशी आठवण झाली आणि नावेच्या नाळीवर जोराचा आघात करीत ते नावाड्याला म्हणाले, " अरे बाबा, फार मोठी चूक झाली. थांबव शालती. आता मागे गेले पाहिजे. " नावाड्याने विचारले, " हे काय मोशाय ! इतके लांब आल्यावर परत जाणार ? "

बाबांनी उत्तर दिले, " होय रे होय. परत गेलेच पाहिजे. एक फार मोठी चूक झाली आहे. तुम्ही काळजी करू नका. तुम्हाला जे भाडे द्यायचे कबूल केले आहे ते मी देईन. तुमचा काय अपराध ? मी तुमची नाव भाड्याने ठरविली नसती तर तुम्हाला दुसरे भाडे मिळाले असते. "

मी म्हटले, " बाबा, तुम्हांला तर उद्या शाळेत हजर झालेच पाहिजे. तसे न केले तर दोन महिन्यांचा पगार कापला जाईल ना ! "

यावर बाबांनी उत्तर दिले, " तसे करून कसे चालेल ? महेश कावरा बिचारा सहकुटुंब उपाशी मरेल ना ! मी बाजारादिवशी त्याला ये म्हणून सांगितले आहे. त्याच्याबरोबर मला रिलीफकमिटीकडे गेले पाहिजे व त्याच्या कुटुंबाला मदत मिळण्याची व्यवस्था केली पाहिजे. त्या बिचाऱ्याला मी वचन देऊन आलो आहे. विसरून गेलो होतो. पण आता आठवले. ते मोडून मला जाता येणार नाही. " आम्ही परत घरी आलो. बाबांना शालतीचे पुरे भाडे द्यावे लागले. शाळेचे वेतन कापण्याचा प्रश्न पुढचा.

सुदैव असे की या खेपेस बाबांचा दोन महिन्यांचा पगार कापला गेला नाही. बाबांना कलकत्त्याला यायला एक दिवस उशीर झाला होता त्याबद्दलची सविस्तर हकीगत त्यांनी अधिकारीवर्गाला लिहून कळविली. त्यामुळे अधिकाऱ्यांनी त्यांचा पगार कापला नाही. स्पेशल केस म्हणून त्यांनी बाबांना त्या नियमाची माफी दिली.

तिसरी घटना चांगली ठळक रूपाने माझ्या आठवणीत राहिली, ती अशी– बाबा त्यावेळी आमच्या गावातील हार्डिंज मॉडेल बंगाली स्कूलचे हेडमास्तर होते. एकदा सरकारने शाळागृहाची दुरुस्ती करण्यासाठी काही रुपये पाठविले. शाळागृहाची दुरुस्ती झाल्यावर काही लाकूडसामान, वासे, लाकडांचे तुकडे वगैरे शिल्लक राहिले, त्याचे पुढे काय करायचे म्हणजे दुसऱ्या एखाद्या गावच्या शाळेच्या दुरुस्तीसाठी पाठवावयाचे की लिलाव करून आलेली रक्कम सरकारी तिजोरीत भरावयाची हे समजावे म्हणून बाबांनी संबंधित वरिष्ठ अधिकाऱ्यांना पत्र पाठविले. पत्राचे उत्तर काही येईना. एक दोन महिने त्यांनी वाट पाहिली. शेवटी बाबांनी ते लाकूडसामान, वासे वगैरे शाळागृहाजवळील तलावात बुडवून ठेवण्यास सांगितले. तशी व्यवस्था करण्यात आली.

काही दिवसांनंतर मी जेव्हा उन्हाळ्याच्या सुटीत घरी आलो, तेव्हा एके दिवशी सायंकाळी बाबा बाहेर ओट्यावर बसून तंबाकू ओढीत होते अशावेळी गावातील एक प्रतिष्ठित गृहस्थ भेटायला आले. येताच त्यांनी ' पंडित मोशाय, नमस्कार ' असे म्हटले.

" या बापू, कल्याण असो. या ओट्यावर बसा. तंबाकू ओढा. " बाबा म्हणाले.

" राहू दे. आता ओट्यावर बसत नाही. थोडे विचारायचे आहे, तेव्हा येथे खाली उभा राहूनच विचारतो. शाळेच्या तलावात जे शिल्लक लाकूड-सामान तुम्ही पाण्यात बुडवून ठेविले आहे त्याचे पुढे काय करणार ? " आलेल्या गृहस्थांनी विचारले.

त्यावर बाबांनी उत्तर दिले, " त्याचे पुढे काय करायचे हे मला माहीत नाही. तो सरकारी माल आहे. त्यांना मी पत्राने कळविले आहे. कदाचित् दुसऱ्या एखाद्या शाळेच्या दुरुस्तीसाठी ते पाठविण्यात येईल, नाही तर लिलावाने विक्री करावी लागेल. "

" ते सामान मला देऊन टाका ना ! मी आपली काही तजवीज करीन." आलेले गृहस्थ म्हणाले.

बाबांना त्या गृहस्थांच्या या बोलण्याचा अर्थ प्रथम चांगलासा कळला नाही. त्यांना वाटले याला हे वासे व तुकडे पाहिजे असतील तेव्हा तो विकत मागत आहे. म्हणून ते त्याला म्हणाले, " तुम्हाला माझे सांगणे ऐकू आले नाही का ? तो सरकारी माल आहे. तेव्हा त्यांचा जसा हुकूम येईल तसे केले पाहिजे. त्यांच्या हुकमावाचून तो मला कसा विकता येईल ? "

" मी आपले म्हणणे ऐकले आहे. मी एक घर बांधायला सुरुवात केली आहे. लहानमोठे वासे मला पाहिजे आहेत. मी आपणाला दहाबारा रुपये देईन. मला तेवढे ते लाकूडसामान द्या ना. " आलेल्या गृहस्थांनी स्पष्ट खुलासा केला.

आता मात्र त्या गृहस्थांच्या सांगण्यामागचा हेतू बाबांच्या लक्षात आला. हा मनुष्य मला लाच देऊन सामान हस्तगत करू पाहात आहे, हे त्यांना कळून चुकले. लागलीच बाबा ओट्यावरून उडी मारून खाली आले आणि त्यांनी त्याचा हात धरला. नंतर ते त्याला रागाने म्हणाले, " तू इतका नीच आहेस की मला दहा बारा रुपये लाच देऊन हे सामान फुकटात घेऊ इच्छितोस ? आणि मलाही आपल्यासारखाच नीच समजतोस ? परक्याची वस्तू मी तुला लाच घेऊन देईन ? चल तुला ठाण्यावर नेऊन पोलिसांच्या हवाली करतो. तू नक्कीच त्या सामानातील काही सामान चोरले आहेस. "

आणि मग दोघांत ओढाताण सुरू झाली. मी मध्ये पडून ती हाताहाती सोडविली. नंतर मी बाबांना म्हटले, " बासे तर मोजलेले आहेत. उद्या शाळेत गेल्यावर ते पाण्यातून काढून मोजून पाहाता येतील. त्यात कमी भरले तर याच्या नावाने ठाण्यावर तक्रार नोंदविता येईल. आता याला सोडून द्या." अशा तऱ्हेने बाबांना पुष्कळसे समजाविल्यावर त्यांनी त्याला सोडून दिले.

आणखी काही घटना लिहून ठेवण्यासारख्या व ध्यानात ठेवण्यासारख्या घडल्या. बऱ्याच वर्षांपूर्वी बाबा एकदा स्वतःच्या पगाराचे बिल घेऊन इन्स्पेक्टरच्या सहीसाठी व पैसे आणण्यासाठी कलकत्त्याला येत होते. अशा वेळी गावचा एक सर्कल शाळेतील शिक्षक बाबांच्या हाती एक १५ रुपयांचे बिल देऊन म्हणाला, " पंडित मोशाय, कृपा करून हे माझेही पगाराचे बिल घेऊन जा आणि इन्स्पेक्टरची सही घेऊन पैसे आणा. " बाबांनी त्याचे ते बिल घेतले.

इकडे कलकत्त्याला आल्यावर इन्स्पेक्टरच्या ऑफिसात जायला काही दिवस लागले. इतक्यात गावाकडून बातमी आली की, तो सर्कल शिक्षक कॉलऱ्याने मरण पावला आहे. पुढे बाबा जेव्हा उड्रोसाहेबाच्या ऑफिसात गेले, तेव्हा उड्रोसाहेब बाबांना म्हणाले की, " मला त्या शिक्षकाच्या पत्नीचे पत्र आले असून त्यात तिने आपल्या नवऱ्याचे पैसे हस्तांतरित होऊ नयेत अशी विनंती केली आहे. " बाबा समजले की, या बाईचे आपल्या दिरांशी पटले नसावे त्यामुळे तिने अशी विनंती केली असावी त्यामुळे बाबांनी ते पैसे घेण्यास नकार दर्शविला. पण उड्रोसाहेब बाबांकडे अतिशय श्रद्धेच्या नजरेने पाहात असल्यामुळे ते म्हणाले, " पंडित, मी तुम्हाला ओळखतो. तुम्ही हे त्यांच्या पगाराचे पैसे घेऊन जा. आणि तुम्ही स्वतः हे रुपये त्या विधवेच्या हाती द्या. " इतके झाल्यावर नाइलाजाने बाबांनी ते १५ रुपये घेतले आणि ते गावी गेले. पण घरी गेल्यावर त्यांना समजले की, ती विधवा आपल्या माहेरी निघून गेली आहे. म्हणून बाबांनी ते रुपये आपल्या पेटीत एका बाजूला ठेवून दिले. ती माहेराहून आल्यावर स्वतः तिला द्यावे असा त्यांचा हेतू.

पुढे दोन महिने गेले, सहा महिने झाले पण ती विधवा काही आली नाही.

बाबाही ती गोष्ट विसरून गेले. आणि घरच्या खर्चात ते वेगळे ठेवलेले रुपयेही खर्चून गेले.

१५।१६ वर्षांनी बाबांना त्या गोष्टीची आठवण झाली. काही दिवस ती मनोव्यथा सहन केल्यावर शेवटी दुसरा कोणी ते रुपये घेऊन जाण्याला न मिळाल्यामुळे बाबा स्वतः दहाबारा मैल चालत जाऊन त्या विधवेला ते १५ रु. देऊन परत आले.

गरिबीच्या राहणीत जगणाऱ्या मनुष्याला पुष्कळ वेळी मित्रांकडून कर्ज काढावे लागते. बाबांना उत्तर आयुष्यात अनेकदा स्वतः पूर्वी कधी काळी कोणा स्नेह्यासोबत्यांकडून काढलेल्या कर्जाची अगर उसनवारीची आठवण होई. त्या कर्जफेडीसाठी ते उतावीळ होऊन जात. आणि कलकत्त्याला माझ्याकडे येत. एकदा ते असेच कलकत्त्यातील ब्राह्मसमाजाच्या लायब्ररीतील माझ्या ऑफिसात येऊन काही दिवस राहिले होते. त्या दिवसांत एके सायंकाळी मी बाहेरून फिरून आल्यावर पाहतो तो बाबा म्लान चेहऱ्याने माझ्या कॉटवर झोपलेले मला दिसले. मी त्यांना विचारले, " बाबा, आपण आज फार खिन्न दिसता! का बरे, काय वाटते ? "

ते म्हणाले, " अरे, हे पाहा. मनाला खेद वाटण्यासारखे एक कारणच घडले आहे. मला असे वाटते कुणाचा एक पैसाही देणे ठेवून मला मरण येऊ नये. वाटत होते, मी आता कुणाचेही कसले देणे ठेवलेले नाही. पण त्या दिवशी असाच विचार करीत बसलो असता एकदम एक आठवण झाली. मी जेव्हा कॉलेजात शिकत होतो तेव्हा श्रीश विद्यारत्न हा माझ्या बरोबरच शिकत होता. कित्येकदा मला पैशाची गरज लागली तर तो मला उसनवार पैसे देत असे. तसे दोनतीनदा मी त्याच्याकडून घेतले होते व ते एकंदर ४० रुपये होतील. कॉलेज-मधून बाहेर पडल्यावर नोकरी लागताच मी तुझे हे देणे देईन असेही मी त्याला बोललो होतो. नंतर मी कुठे गेलो, तो कुठे गेला. तो विधवाविवाहाच्या गोंधळात अडकला. पुढे आम्ही दोघेही त्या देण्याची बाबच विसरून गेलो. इतक्या वर्षांनी मला त्याची आठवण झाली. पण आता करायचे कसे! "

हे आमचे बोलणे बहुधा १८९७ की १८९८ सालचे असावे. विद्यारत्न महाशय ( ज्यांनी प्रथम विधवाविवाह केला. ) त्याच्या अनेक वर्षांपूर्वी वारले होते. मी बाबांना म्हटले, " त्यासाठी आपण असे मनाला लावून घेऊ नका. विद्यारत्न महाशयांचा कोण वारस आहे त्याचा मी तपास करतो. " नंतर त्याचा शोधतपास सुरू केला. आनंदाची गोष्ट म्हणजे त्यांच्या पहिल्या पत्नीचा मुलगा जिवंत होता. त्याच्याकडे जाऊन मी त्याला सांगितले. " माझ्या वडिलांनी शिकत असता तुमच्या वडिलांकडून चाळीस रुपये कर्जाऊ घेतले होते. इतक्या वर्षांनी त्या देण्याची त्यांना आठवण होऊन ते तळमळत आहेत. तेव्हा हे चाळीस रुपये तुम्ही

द्या आणि एक पोचपावती द्या. मी घरी त्यांच्याकडे ही पोचपावती पाठविली की त्यांचे समाधान होईल.'' ते म्हणाले, "६५ वर्षांपूर्वीचे कर्ज अशा रीतीने घर-पोच परत केल्याची हकीगत मी कधी कुठे ऐकली नाही." नंतर मी त्यांना ४० रुपये दिले आणि त्यांनी मला पोचपावती दिली. ती मी बाबांना गावी पाठवून दिली तेव्हा त्यांची तळमळ शान्त झाली.

आणखी एकदा असेच ते शहरात आले असता मला म्हणाले, "आणखी एक घटना मला आठवली. सुमारे २५ की ३० वर्षांपूर्वी आमच्या गावातील मुलांनी एक पब्लिक लायब्ररी सुरू केली होती. मी शहरात यायला निघालो असता त्या मुलांनी माझ्या हाती पुस्तकांची एक यादी देऊन म्हटले, 'पंडित मोशाय, कोणत्या एखाद्या चांगल्या परिचित दुकानातून ही एवढी पुस्तके आणून द्या. नंतर पैसे देऊ.' मीही माझ्या एका सहाध्यायी मित्राकडून दहा रुपयांची ती पुस्तके घेतली आणि मुलांना आणून दिली. त्यानंतर महिन्यांमागून महिने गेले. वर्षे गेली पण त्या पुस्तकांचे पैसे मला देता आले नाहीत. पुढे ती गोष्ट मी विसरूनही गेलो. पण आता त्याची मला आठवण झाली!" लागलीच मी त्यांच्या त्या सहाध्यायी मित्राच्या कुटुंबातील कोणी जिवंत आहे की नाही याच्या तपासाला लागलो. सुदैवाने कलकत्त्यातील वटतला भागात त्या पुस्तक-विक्रेत्याचा मुलगा मला भेटला. त्यानेही तोच पुस्तकविक्रीचा व्यवसाय चालविला होता. बाबांना कळविताच त्यांनी दहा रुपये पाठविले आणि मी ते त्याला देऊन त्याची पावती घेऊन बाबांकडे पाठवून दिली, तेव्हा त्यांना समाधान वाटले.

आणखी एक देण्याची गोष्ट आठवली. वीस पंचवीस वर्षांपूर्वी बाबांनी भवानीपूर येथील एका कापडदुकानातून पाच रुपयांचे कापड उधार घेतले होते. त्यानंतर ते दुकान बंद झाले. मग त्या दुकानदाराचे देणे कसे द्यायचे? आम्ही तपास करून पाहिला पण त्या दुकानदाराचा ठावठिकाणा काही आम्हाला मिळाला नाही. आता करायचे काय? बाबांच्या मनाला काही स्वस्थता वाटेना. शेवटी पाच रुपयांचे कापड विकत घेऊन ते त्यांच्याकडे पाठविले. ते त्यांनी गावातील गोरगरिबांना दान केले.

माझ्या वडिलांचा स्वभाव किती तेजस्वी होता आणि त्यांची माणुसकी किती जाग्रत होती त्याची दोन उदाहरणे मला आठवतात. असे ऐकले आहे की, माझ्या मातृदेवीच्या लग्नाच्या दिवशी आमच्या गावातील जमलेल्या वरपक्षीय लोकांशी चांगडीपोता व त्याच्या जवळ असलेल्या गावातील वधूपक्षीय मंडळी यांचे भांडण झाले. हे भांडण कशासाठी झाले हे मला सांगता येत नाही. अनुमान असे की, वरपक्षातील वात्सगोत्रीय भट्टाचार्य वांशिक ब्राह्मण, आपल्या मान-मर्यादेच्या अभिमानाने स्वतःला वरिष्ठ दर्जाचे मानीत असत. आपला मानमरातब

वधूपक्षीय मंडळीनी योग्य तऱ्हेने ठेवला नाही असे त्यांना वाटले. त्यांचा तो राग विवाहानंतर उघडकीस आला. विवाहानंतर माझ्या आईच्या वडिलांनी जेव्हा आमंत्रित मंडळींना भोजनासाठी गच्चीवर बसविले तेव्हा वरपक्षीयमंडळी एकत्र बसली. पानात वाढलेल्या भोज्य पदार्थांची नासधूस करून या अपमानाचा वचपा काढू असे त्या मंडळींनी ठरविले. या योजनेप्रमाणे त्यांनी मुठीमुठींनी पुऱ्या, कचोऱ्या, संदेश वगैरे पक्वान्ने घराच्या मागे असलेल्या पडीक जागेत गच्चीवरून फेकण्याला सुरुवात केली. त्याचा परिणाम असा झाला की इतर जातीच्या लोकांना वाढण्यासाठी म्हणून पुऱ्या, संदेश वगैरेंची जी तयारी केली होती ती व्यर्थ गेली व त्या लोकांना चिवडा दही लाह्या वगैरे पदार्थ देऊन संतुष्ट करावे लागले. आईच्या वडिलांना या नासधुशीचा फार राग आला. आणि वऱ्हाडीमंडळीची रवानगी ज्या मानसन्मानाने करण्याचे त्यांनी ठरविले होते ते रद्द केले. अर्थात् आमचे ज्ञातिबंधूही एक प्रकारच्या धुश्शातच वरात घेऊन गावी आले.

याचे पर्यवसान असे झाले की माझी बालवयाची आई जेव्हा प्रथमच सासरी आली तेव्हा तिला तेथे बंदिस्त करण्यात आले. माहेरी पाठवावयाची नाही, असे सर्वांनी ठरविले. दोन वर्षे गेली, तीन वर्षे गेली, माहेरची मंडळी बोलवायला येऊन परत जाऊ लागली. आईला काही माहेरी पाठविण्याचे त्यांनी नाव काढले नाही. माझी मोठी आत्या व तिचा नवरा यांचाच घरात वरचष्मा होता. आपण ज्ञातिबंधूच्या मताविरुद्ध कसे वागावे म्हणून तेही स्वस्थ राहिले. त्यावेळी माझे वडील कलकत्त्याला सासुरवाडीला राहून शाळेत जात होते. त्यावेळी त्यांचे विद्यार्जन चालले होते. आपल्या ज्ञातिबंधूंनी आपल्या अल्पवयी बालिका पत्नीचा चालविलेला हा कोंडमारा त्यांनी आपल्या सासुरवाडीच्या लोकांकडून ऐकला. एका निरपराध बालिकेशी अशा प्रकारचे वागणे त्यांना अन्यायाचे वाटू लागले. पण वडील बहीण व तिचा नवरा यांना कसे बोलावे याची त्यांना पंचाईत पडली, संकोच वाटू लागला. असेही काही दिवस गेले. शेवटी बाबांना ही परिस्थिती असह्य झाली. आणि काय होईल ते होवो पण आपल्या अल्पवयी पत्नीला सासरच्या बंदिवासातून मुक्त करून माहेरी आणावयाचे असे त्यांनी ठरविले. आणि कॉलेजला सुटी पडल्याची संधी साधून ते घरी आले. आल्याबरोबर त्यांनी एक डोली ठरविली आणि स्वतः आपल्या पत्नीला माहेरी पोचविण्याचे निश्चित केले. हा त्यांचा बेत ऐकून गावात मोठी खळबळ उडाली. ज्ञातिबंधू खवळून उठले, बहीण आणि मेहुणा शरमेने मेल्यासारखे झाले. कारण एका १५–१६ वर्षांच्या मुलाने असे कृत्य करण्यास प्रवृत्त होणे ही गोष्ट फारच शरमेची आहे असे त्यांना वाटू लागले. पण बाबांनी कुणाच्याच कसल्या हरकतीकडे व बोलण्याकडे लक्ष दिले नाही. आईला डोलीत बसवून तिच्याबरोबर आपण गावाबाहेर पडले आणि ज्ञातिबंधूंच्या घरांसमोरून जाताना मोठ्या आवाजात सांगू लागले, " कोण

आहे ते बाहेर या. हे पाहा. मी माझ्या पत्नीला माहेरी पोचविण्यास स्वतः जात आहे. ”

आणखी अशीच बाबांचा तेजस्वीपणा व माणुसकी दर्शविणारी एक गोष्ट घडली. कॉलेजात बाबा शिकत असताना विद्यासागर महाशयांचे ते आवडते शिष्य होते हे पूर्वी सांगितलेच आहे. मदनमोहन तर्कालंकार यांच्याशीही ते आदराने व आपुलकीने वागत असत. या दोघा सदाचरणी व प्रगतिशील पुरुषांशी ते मिळून मिसळून वागत असल्यामुळे स्त्रीशिक्षणाची आवश्यकता त्यांनाही पटली होती. आणि त्याप्रमाणे ते उन्हाळ्याच्या सुटीत घरी येताच आईला लिहायला-वाचायला शिकवू लागले. आई घरकाम आटोपून रात्री दहा वाजता झोपायला आल्यावर तिला ते शिकवायला आरंभ करीत. आईही मोठ्या हौसेने शिकत असे. कॉलेज सुरू होताच आईला वाचण्याची पुस्तके देऊन कलकत्त्याला येत. तीही कुणाच्या मदतीशिवाय जितके शक्य होई तितके वाची. केव्हा केव्हा आळीतील मुलांकडून कठीण शब्दांचा अर्थ विचारून घेई. आईच्या वाचनीय पुस्तकात कृत्तिवासी रामायण हा मुख्य ग्रंथ होता. मी तिला बहुतेक रोज रामायण वाचताना पाही असे मला आठवते. ती सुटीच्या दिवसात माझ्याकडून ते वाचून घेई आणि आपण ऐकत बसे. आईच्या लिहिण्यावाचण्यासंबंधी मी सांगत आहे याचे विशेष कारण असे की, त्यामुळे बाबांना छळ सोसावा लागे. आत्यां तर शिव्यागाळीही देई. शेजारपाजारच्या मुली उठता बसता आईची थट्टा करीत. ज्ञातिबंधूंनी तर बाबांना ‘ साहेब ’ म्हणण्याचाच परिपाठ ठेविला होता. याचे एक कारणही होते. ते एकदा काळा बूट घालून व चिनी छत्री डोकीवर घेऊन गावात आले होते. त्यावेळी ब्राह्मण पंडिताचा मुलगा पायात साध्या चपला न घालता व गोलपानाची (ताड, नारळ याप्रमाणे असलेल्या एका लहान झाडाची पाने) छत्री न वापरता तो बूट घालतो आणि चिनी छत्री वापरतो. हे गावातील लोकांना विशेषतः आप्तइष्ट ज्ञातिबंधूंना सहन होत नसे. पण अशा तऱ्हेने छळणूक होत असतानाही बाबांनी आईच्या शिक्षणात खंड पडू दिला नाही. भाऊबंदांची व ज्ञातिबंधूंची हरकत ते याबाबतीत मुळीच जुमानीत नसत. स्वतंत्रतेने व निश्चयपूर्वक ते आपले काम करण्यात गढून जात.

स्त्रीशिक्षणाच्या बाबतीत हा दृढ निश्चय व ही तेजस्विता गावातील कन्या-विद्यालयाच्या स्थापनेच्या वेळी कशी व्यक्त झाली होती व स्त्रीशिक्षणाचे पुरस्कर्ते म्हणून ते कसे पुढे आले होते, ही सर्व हकीगत मागे आलीच आहे.

आता त्यांच्या प्रखर आणि उत्कट आत्मसन्मानाच्या जाणिवेबद्दल थोडे सांगतो. मी त्यांचा राग सहन करूनही ब्राह्मसमाजात प्रवेश केल्यामुळे त्यांनी मनोमन अशी प्रतिज्ञा केली होती की, मी मिळविलेल्या पैशाचा आपण केव्हाही स्वीकार करावयाचा नाही, त्यामुळे मला त्यांना सहाय्य करायचे झाले तर ते

किती गुप्तपणाने करावे लागे हे माझे मलाच माहीत. एकदा माझ्या मधल्या बहिणीचे बाबांनी लग्न आरंभिले. तेव्हा त्यांना कळू न देता आईकडे मी काही रकम दिल्यामुळे व ते त्यांना पुढे कळल्यामुळे त्यांनी त्या रागाच्या भरात घराला कशी आग लाविली होती ते पूर्वी सांगितलेच आहे. माझ्या बहिष्काराच्या बाबतीतील हा त्यांचा कडकपणा चांगला १७।१८ वर्षे कायम होता. पुढे ते माझ्यावर काहीसे प्रसन्न झाले आणि संसारात मी केलेली मदत घेऊ लागले. ज्यावेळी माझे सहाय्य न घेण्याच्या बाबतीत ते दृढप्रतिज्ञ होते त्यावेळी मी एकदा भयंकर आजारी पडलो असता त्यांनी आईच्या अंगावरचे दागिने गहाण ठेवून पैसे काढले आणि आईला घेऊन ते कलकत्त्याला माझ्या शुश्रुषेसाठी आले तीही हकीगत मी पूर्वी सांगितलीच आहे. ज्याच्या उपार्जनाचा एक पैसाही आपण घ्यायचा नाही अशी प्रतिज्ञा केली होती, तोच मी आजारी पडताच त्यांना न जुमानणाऱ्या माझ्याकरिता अपत्यवात्सल्याने ते सर्वस्व द्यायला तयार झाले. असा मनाचा मोठेपणा कुठे पाहायला मिळेल ?

मला आजारीपणात ते पाहायला आले त्यावेळीच आणखी एक घटना घडलेली आठवते. त्यावरूनही त्यांचा स्वाभिमान किती जाज्वल्य होता हे स्पष्ट दिसून आले. त्यांनी माझ्या शुश्रूषेसाठी एक स्वतंत्र घर भाड्याने घेतले आणि तेथे आईला व मला ठेवून ते गावी गेले. पण गावात काही लोक त्यांचा द्वेष करणारे होतेच. ते गावच्या जमीनदारबाबूंकडे जाऊन त्यांना म्हणाले, "ऐकलेत मोशाय ? हाराण पंडित ( हरानंदाचा अपभ्रंश ) त्या आपल्या जातिबहिष्कृत मुलाच्या घरी आपल्या पत्नीला ठेवून आले बरे का." जमीनदारबाबू–मुख्य बाबू– पूर्वीपासूनच कन्याविद्यालयासंबंधापासून बाबांबद्दल असंतुष्टच होते. त्यामुळे ही वार्ता ऐकताच ते फुत्कारून म्हणाले, "अस्सं ! इकडे तोंडच्या बोलण्यात तर खूप जोर दाखवितात ! आता मात्र पंडिताला सोडायचे नाही." अशा प्रकारे बाबांना वाळीत टाकण्याचे कारस्थान सुरू झाले. बाबांच्या बाबतीत मत्सरी, असंतुष्ट व पूर्वग्रहदूषित असे जे होते ते सर्व यावेळी जमीनदारांच्या या पक्षात सामील झाले. आणि या निमित्ताने पाहाता पाहाता गावात वेगळे दोन पक्ष तयार झाले. बाबांनी प्रथम या बाबतीत काही काही मंडळींना खरी खरी हकीगत सांगितली होती पण आपल्याविरुद्ध असलेला पक्ष संघटित होत आहे असे जेव्हा त्यांनी ऐकले तेव्हा त्यांनी तोंड बंद केले. आणि इतकेच म्हणाले, "अच्छा. ज्याला जे काय करायचे असेल ते करूदे."

हळूहळू खरी गोष्ट गावात सर्वांना कळली. गावातील काही लोकांनी कलकत्त्याला येऊन सर्व पाहिले आणि गावात जाऊन सांगितले की शिवनाथाकडे आई राहिली नसून शिवनाथाला आईकडे आणून ठेविले आहे. शिवनाथची बायकामुले स्वतःच्याच घरी आहेत. हे ऐकताच जमीनदारबाबू मोठ्या संकटात

पडले. हरानंद पंडितांना वाळीत टाकायचे असे बोलून दाखविल्यावर आता ते शब्द मागे कसे घ्यायचे हा त्यांना मोठा पेच पडला. शेवटी ते सांगू लागले, "पंडितांनी एकवार समक्ष येऊन सांगावे की, मी माझ्या पत्नीला स्वतंत्र बिऱ्हाड करून ठेविली आहे. म्हणजे मग आमचे म्हणणे आम्ही मागे घेतो." बाबांना हे समजताच ते म्हणाले, "शर्मा त्या जातीचा मुलगाच नव्हे! जरी ही गोष्ट खरी असली तरी ज्यांनी मला भीती दाखविली होती, त्यांच्याकडे जाऊन ही गोष्ट सांगायलाही मी तयार नाही. त्यांना जे करायचे असेल ते करूद्या." दोन महिने गेले. चार महिने गेले. तरी बाबा काही जमीनदारबाबूंकडे गेले नाहीत. जमीनदार-बाबूंनी निरनिराळ्या लोकांकडून बाबांना बोलावणे पाठविले. पण बाबा काही गेले नाहीत. अखेरीस जमीनदारबाबूंनी आपला मान आपण तरी राखावा म्हणून एक वेगळेच कौशल्य लढविले.

बाबा आपल्या थोरल्या मामेभावाला— गोवर्धन शिरोमणी महाशयांना— अतिशय भक्तिश्रद्धेच्या नजरेने पाहात. ते जमीनदारबाबूंचेही गुरू होते. शेवटी— बाबांच्या बहिष्कारप्रकरणात जमीनदारबाबू निरुपायाने त्यांना शरण गेले. ते मग एके दिवशी जमीनदारबाबूंच्या कचेरीत आले आणि त्यांनी बाबांना बोलावणे पाठविले. नोकराने येऊन बाबांना सांगितले, "काण्वायन घरचे थोरले मालक बाबूंच्या कचेरीत आले असून त्यांनी आपणाला बोलाविले आहे." गावात जमीनदारांखेरीज कुणाला बाबू म्हटले जात नसे. तेव्हा बाबांनी विचारले, "बाबूंच्या कचेरीत ते मला कशाला बोलवीत आहेत?" नोकराला त्या बाबतीत काहीच माहीत नसल्यामुळे बाबांच्या त्या प्रश्नावर त्याने काहीच उत्तर दिले नाही. बाबांना तिकडे जाण्याची फारशी इच्छा नव्हती. पण करतात काय? दादा बोलावतात तेव्हा न जाऊन कसे चालेल! शेवटी अनिच्छेने का होईना पण ते तिकडे गेले. त्यावेळी बाबूलोकांचे काहीतरी कारस्थान असावे असे त्यांच्या मनातही आले नाही. तेथे गेल्यावर त्यांना असे दिसून आले की, मोठे बाबू व त्यांचे गुरुमहाशय (आपले मामेभाऊ) बसलेले आहेत. गुरुमहाशयांना पाहताच बाबांचा चेहरा गंभीर झाला. त्यांनी गुरुमहाशयांना विचारले, "मला आपण कशाला बोलविले?" गुरुमहाशयांना कळून चुकले की लक्षण काही ठीक दिसत नाही. नंतर त्यांनी मोठ्या बाबूंना उद्देशून म्हटले, "बाबू, मी जे शब्द उच्चारतो, ते हाराण पंडितांचे आहेत असे समजा. आता मी काय सांगतो ते ऐका, आमच्या घरची गृहिणी कलकत्त्याला गेली आहे खरी पण ती मुलाच्या बिऱ्हाडी गेली नसून तिच्याच बिऱ्हाडी तिचा मुलगा आलेला आहे."

हे बोलणे आटोपताच माझे बाबा तेथून जलद पावले टाकीत बाहेर पडले आणि आपल्या मामेभावाने आपला अपमान केला असे समजून त्यांनी तीन वर्षे-पर्यंत त्याचे तोंडही पाहिले नाही.

विद्यासागर महाशयांप्रमाणेच बाबांनाही मी दुराग्रही म्हटले आहे, त्याचीही काही उदाहरणे येथे देतो.

दुराग्रहाचे पहिले उदाहरण माझ्या द्वितीय विवाहासंबंधाचे. पूर्वीच सांगितले आहे की, काही कारणाने माझी पहिली पत्नी प्रसन्नमयी व तिच्या माहेरचा परिवार यांच्यावर रागावून बाबांनी अशी प्रतिज्ञा केली होती की, प्रसन्नमयीचा त्याग करून माझा दुसरा विवाह करायचाच. या प्रतिज्ञेपासून त्यांना च्युत करण्याची अनेकांनी खटपट केली. आईचा तर माझ्या द्वितीय विवाहाला विरोध होताच. मी त्यावेळी १७|१८ वर्षांचा असेन. पण मीही माझे विरुद्ध मत व्यक्त केले होते. माझ्या आईच्या आईचे प्रसन्नमयीवर फार प्रेम आणि वात्सल्य. तिनेही बाबांना ' असे करू नका ' असे आग्रहाने सांगितले. गावातील ज्ञातिबंधूंनी व आप्तइष्टांनीही पुष्कळच अडथळे आणले पण बाबांनी कुणाचाही कसलाच विरोध न जुमानता, ऐकूनही न घेता माझा दुसरा विवाह केला तेव्हा ते स्वस्थ बसले.

आणखीही अशीच एक स्मरणीय घटना घडली. मी ब्राह्मसमाजात सामील होताच ते म्हणाले, " माझ्या वडिलार्जित संपत्तीपैकी एक फुटकी कवडीही मी याला देणार नाही. " याच हेकेखोरपणात त्यांनी एकदा आपले मृत्युपत्र केले. त्यात त्यांनी माझ्या धाकट्या व सर्वांत मोठ्या बहिणीला घराची मालकी देण्याची व त्यात त्यांनी वास्तव्य करावे अशी व्यवस्था केली होती. ते मृत्युपत्र गुप्तपणाने बाहेर काढून माझ्या आईने फाडून टाकले.

त्यानंतर पुष्कळ वर्षे निघून गेली. मी स्वतःच्या.खर्चाने आईवडिलांना डोके टेकण्यासाठी चांगले घर असावे म्हणून पूर्वीच्या गवती छपराच्या घराच्या जागी दगडांविटांचे पक्के घर बांधले. आईने परलोकी जाण्यापूर्वी काही वर्षे त्यात घालविली होती. ती परलोकवासी झाल्यावर बाबांनी स्वतःच्या त्या–मुलाला वडिलार्जित घर न देण्याच्या–प्रतिज्ञेप्रमाणे पुनः एक मृत्युपत्र केले आणि त्यात माझ्या धाकट्या बहिणीला वडिलार्जित घर दिले आणि मला वडलार्जित सगळ्या संपत्तीला वर्जित केले. थोडीशी चार बिघे अग्रहार जमीन होती तिचे तीन भाग माझ्या तीन बहिणींना दिले. आणि त्यांनी विनंती केल्यावरून उरलेला एक भाग माझा मुलगा प्रियनाथ याला दिला. त्यांच्या दोन ग्रंथांपैकी एक प्रियनाथला व दुसरा माझी द्वितीय पत्नी विराजमोहिनी हिला दिला. मी बांधलेले पक्के घर त्यांनी माझ्या धाकट्या बहिणीला दिले. त्यांच्या या व्यवस्थेला मीही संमती दिली. कारण वडिलांच्या वृद्धावस्थेत तिनेच त्यांची जिवापाड सेवाशुश्रूषा केली होती. मी पूर्वी त्यांना सांगितले होते, " मृत्युपत्र लिहिणे, ते रजिस्टर करणे वगैरेची आवश्यकता काय ? आपली काय इच्छा असेल ती सांगा. मी त्याप्रमाणे व्यवस्था करीन. " शेवटी विचार केला, दुराग्रही मनुष्याला त्याची इच्छा पूर्ण झाल्याखेरीज समाधान वाटत नाही, मन शांत होत नाही. म्हणून मृत्युपत्र करायला व शेवटी ते रजिस्टर

करायलाही मी प्रोत्साहन दिले. यामुळे त्यांच्या मनाला शांती वाटली यातच मला समाधान.

' विशेष काय सांगू, रोज रोज त्यांच्या दुराग्रही वृत्तीचा पदोपदी पुरावा मिळे. एकदा ते आणि माझी धाकटी बहीण कुसुम ही दोघेही माझ्या बालिगंजातील बिऱ्हाडी येऊन राहिली होती. कोणत्याशा कारणाने बाबांना एकदा घरी जाणे अवश्य झाले. त्या दिवशी सकाळीच ते मला म्हणाले, " मी सायंकाळच्या तीनच्या गाडीने घरी जाणार " मी म्हटले, " तीनच्या गाडीने का जाता बाबा ? घरी पोचायला रात्र होईल. अंधारामुळे रस्त्यात अडखळून पडाल. सायंकाळी तीनच्या गाडीने जाण्याची इतकी काय जरूर ? कुसुम सकाळीच सैंपाक करील. आपण जेवा आणि सकाळी ११ च्या गाडीने जा. काळोख पडण्यापूर्वी घरी जाऊन पोचाल. " त्यांनी मस्तक फिरल्यासारखे करून म्हटले, " नाही तेच सांगतोस. मला इतक्या घाईने निघता येणार नाही. " तेव्हा मग यांच्याशी तर्कवितर्क करण्यात अर्थ नाही असे जाणून आम्ही दोघांनी ( मी आणि कुसुम ) आपसात विचार करून ठरविले की, कसेही करून बाबांना सकाळच्या ११ च्या गाडीने पाठवावे हे उत्तम. लागलीच कुसुमने स्नान वगैरे करून सैंपाकाला आरंभ केला. बाबांना जाण्यासाठी म्हणून जी काही बांधाबांध करावयाची होती त्या कामाला मी सुरुवात केली. आठ वाजता बाबांसाठी कुसुमने गच्चीवर आंघोळीचे पाणी दिले, आणि तसे बाबांना सांगितले. बाबा काही न बोलता आंघोळ करायला गेले. आंघोळीनंतर त्यांचे पूजा आन्हिक वगैरे आटोपेपर्यंत नऊ वाजून गेले. दरम्यान सैंपाक तयार होताच. कुसुम त्यांना ' जेवायला चला. ' म्हणाली. यावेळीही बाबा काही न बोलता जेवायला येऊन बसले. साडेनऊ वाजता त्यांचे जेवण आटोपले. तेव्हा घड्याळ दाखवून मी त्यांना म्हटले, " आपण तासभर झोप घ्या. नंतर मी गाडीतून आपणाला स्टेशनावर पोचवून रेल्वेत बसवून देईन. " ते म्हणाले, " छे ! ते जमायचे नाही. मी तीनच्याच गाडीने जाणार. " असे म्हणून बिछान्यावर ते आडवे झाले आणि गाढ झोपी गेले. कुसुम आणि मी दोघेही किती हसलो ते सांगून सोय नाही. एकदा त्यांच्या तोंडून ' तीनच्या गाडीने ' हा शब्द बाहेर पडला ना ! मग पोरासोरांच्या सांगण्याने तो फिरवावा हे त्यांना कसे सहन व्हायचे !

या ठिकाणी हेही सांगणे आवश्यक आहे की, या त्यांच्या हट्टी व आग्रही स्वभावामुळे घरसंसारात माझ्या आईला किती त्रास सहन करावा लागला असेल त्याचे वर्णन करणेच कठीण! बाबांनी ऐकले नाही तर आई जेव्हा त्यांच्याशी भांडू लागे तेव्हा ते म्हणत, " मी काही तसा ' घंटेचा गरुड ' नाही. तसे असते तर ' जी सरकार, म्हणून तुझ्या आवाजासरशी तुझ्यापुढे हात जोडून उभा राहिलो असतो. " खरे सांगायचे म्हणजे, मागाहून कोणीतरी आपल्याला ' घंटेचा गरुड '

( जी हुजूर ) असे मानील या भीतीने ते नेहेमीच अगदी स्वतःच्या मताविषयी आग्रही असत.

यानंतर माझ्या पूजनीय वडिलांचा आणखी एक गुण सांगायचा म्हणजे त्यांची सहृदयता हा होय. अशा प्रकारच्या दयाळू अन्तःकरणाची माणसे फारच थोडी आढळतात. पूर्वी त्यांच्या दयाळूपणाची काही उदाहरणे मी सांगितलीच आहेत. आणखी काहींचा येथे उल्लेख करतो. एकदा माझ्या आईने शेजारच्या गावी राहणाऱ्या एका शेतकऱ्याला सोळा रुपये अशा शर्तीवर कर्जाऊ दिले होते की, त्याने दर बाजारच्या दिवशी व्याजापोटी थोडी भाजी आणून द्यावी. नंतर पैसे मिळताच ते परत करावे. पुढे दोन वर्षे गेली, चार वर्षे गेली तो शेतकरी दर बाजारच्या दिवशी आईला भाजी देऊन जात असे. या अवधीत आईला पैशांची अत्यंत जरूरी उत्पन्न झाली. तिने त्या शेतकऱ्याकडे पैसाफेडीचा तगादा लावला. पण त्यावेळी त्याच्या हाती पैसे मुळीच नव्हते. त्याने आईकडून मुदत मागून घेतली तिने मुदत दिली. पण त्यानंतर बाजारच्या दिवशी आमच्या घरावरून जाण्याचेच त्याने बंद केले. तो काही आईला कुठे भेटेना. त्याच वेळी इकडे दुष्काळ पडल्यामुळे गोरगरिबांची उपासमार होऊ लागली. अशा या संकटकाळात तो शेतकरी एके दिवशी आईला कुठे तरी रस्त्यांत दिसला, तेव्हा कर्जफेड न केल्याबद्दल ती त्याला फार बोलली. बाबांनी हे ऐकताच ते घरी येऊन आईला म्हणाले, ‘ तूं हरचंद्र न्यायरत्नांची मुलगी ना ? तुझ्या अंगावर हिंदूची चामडी आहे ना ? तू काय म्हणून अशा भयंकर दुष्काळात त्या गरिबाला कर्जासंबंधाने इतके बोललीस ? पैशांचा तगादा करण्याची ही वेळ होय ? ’ नंतर सायंकाळी त्यांनी आपल्या कोठीतून सुमारे दोन शेर तांदूळ एका फडक्यात बांधून घेतले आणि तीन चार मैल चालत जाऊन त्या शेतकऱ्याला नेऊन दिले. कर्जाचे पैसे वसूल करणे तर राहिलेच, उलट त्याच्या उपासमारीचा त्यांना कळवळा आला.

आणखी एक अशीच उल्लेखनीय घटना आहे. एकदा आमच्या वाडीतील एका गरीब मनुष्याचे घर-परसू वगैरे अग्नीच्या भक्ष्यस्थानी पडले. त्याचे घर बांधून देण्याइतकी बाबांची परिस्थिती नव्हती. तेव्हा त्यांनी त्याला बरोबर घेऊन गावातील बड्या बड्या लोकांकडे मदतीसाठी फिरण्याला आरंभ केला. त्यात कोणाकडून वासे तर कोणाकडून दोरी, कोणाकडून पैसा तर कोणाकडून लहानमोठी रक्कम अशी मदत मिळवून त्याचे घर उभारता येईल अशी व्यवस्था केली. अखेरीस ते त्याला घेऊन कलकत्त्याला माझ्याकडे आले आणि “ याला काही रुपये जमवून दे ” असे मला म्हणाले. मीही काही रक्कम जमवून दिली. त्यांची ही सहृदयता केवळ मनुष्यांच्या बाबतीतच असे असे नाही तर इतर प्राण्यांच्या बाबतीतही त्याचा हा कनवाळूपणा दिसून येई. आणि तो पाहून मी अगदी मुग्ध होऊन जात असे.

त्यांनी एकदा एका कुत्र्याच्या पिल्लाला कोल्ह्याच्या तोंडातून बचावून आणले आणि त्याच्या पाठीला झालेली जखम दही लावून लावून कशी बरी केली होती, त्याला वात्सल्याने कसे वाढविले होते आणि त्याचे 'शेयाल खाकी' हे लाडके नाव त्यांनी कसे ठेविले होते हे पूर्वी सांगितलेच आहे. कोणता ना कोणता एखादा कुत्रा नेहेमी घरी असेच. त्याला मूठभर अन्न घातल्यावाचून त्यांना जेवलेसे वाटत नसे. कित्येक दिवस तर "कुत्र्याला भाताबरोबर मासळी का घालीत नाहीस?" असा आपल्या मुलींबरोबर व भाचा-भाचीबरोबर त्यांचा झगडा चालायचा.

आमचे एक मांजर होते. आईने त्याचे नाव ठेवले होते 'दुलची,' कारण त्याच्या अंगावर दुलईप्रमाणे सुंदर पट्टे पट्टे होते. ते दुलची मांजर बाबांचे मोठे आवडते व लाडके होते. ते मासळीखेरीज काही खात नसे. आणि बिछान्यावाचून दुसरीकडे निजत नसे. पुढे आई जेव्हा वारली तेव्हा रूढीप्रमाणे काही ठराविक मुदतीपर्यंत आमच्या घरी मासे आणले जात नसत. या मासे न आणण्यासंबंधाने मुलांबद्दल बाबांना काही विशेष वाटले नाही, पण मांजराचे कसे होणार याची त्यांना काळजी लागली आणि ते अस्वस्थ झाले. माझी बहीण कुसुम हिला ते सांगू लागले, "अग कुशे, दुलचीसाठी तरी मला मासे आणू दे." यावर कुसूम म्हणाली "पुरे झाले तुमचे. मांजरासाठी मासे विकत आणायचे! भलतेच काहीतरी!" बाबांनी सांगितले, "त्याला काय श्राद्ध वगैरे करायला बसायचे आहे? त्याचे मासे खाणे बंद का?" "नाही. हे काही दिवस घरात मासे आणायला मुळीच देणार नाही." कुसुमने उत्तर दिले. यावर बाबा तिला म्हणाले, "ठीक आहे. तर मोठ्या आत्याच्या घरून दुलचीला मासे खायला घालून आण."

या एवढ्याशा बाबतीत बापलेकीचे खूप झगडा-भांडण व्हायचे.

इतक्यात त्यातूनच आणखी एक नवी घटना निर्माण झाली. काही दिवसांनंतर दुलचीला तीनचार पिले झाली. बाबांची मोठी धांदल उडाली. ते म्हणाले, "अग कुशे, दुलची अगदी खंगली बघ. तिच्या पिल्लांना दूध कसे मिळणार! हे बघ आणखी अर्धा शेर दुधाची, रतिबात वाढ कर. दुलची आणि तिच्या पिल्लांना होईल. तसेच तुमच्या आईने जो पक्षी पाळला होता त्यालाही होईल."

कुसुमने उत्तर दिले, "मांजराच्या पिलांसाठी रतिबात वाढ करायची हे मी तर कुठे कधी ऐकले नाही." यावर बाबा कळवळून म्हणाले, "अहाहा! अग ती लहान मुलांसारखी आहे!"

एके दिवशी बाबांच्या या 'लेकरां'पैकी एक मध्यरात्रीच्या सुमारास आर्त स्वर काढू लागले. तो अकस्मात् आलेला आर्तध्वनी ऐकताच बाबांची झोप उडाली आणि ते घाबरून म्हणाले, "अग कुशे, मांजराचे पिल्लू का रडते ग? मला वाटते त्याला थंडी लागत असावी." "तुम्ही स्वस्थ झोपा पाहू. जवळ

त्याची आई न दिसल्यामुळे ते तिला हाका मारीत आहे. आत्ता त्याची आई आली की ते गप्प राहील. '' कुसुमने उत्तर दिले.

पण बाबांना तिचे हे सांगणे रुचले नाही. ते तसेच उठले आणि त्या मांजराच्या पोराला आपल्या पांघरुणात घेतले तेव्हा त्यांना समाधान वाटले. पण त्या पोराचे ओरडणे काही थांबेना. तेव्हा बाबा म्हणाले, " अरेरे, बिचारे पोर ! लहानच ते. मला वाटते त्याच्या पोटात दुखत असावे. "

यावर कुसुम रागाने म्हणाली, " होय. त्याच्या पोटातच दुखत असावे. तुम्ही जा आणि वैद्याला बोलावून आणा पाहू. "

या पोटदुखीवर आणखी एक गोष्ट आठवली. माझे बाबा सामान्य बोली भाषणातही अनेकदा शुद्ध-संस्कृत शब्दांचा उपयोग करीत. आणि या बाबतीत आमच्या घरात वेळोवेळी फार मोठा हास्यकल्लोळ उठे. त्याचे एक उदाहरण सांगतो. एके दिवशी ते दुपारच्या जेवणानंतर बिछान्यावर लवंडले होते. नुकतीच झोप येत होती. इतक्यात वाडीतील कित्येक मुलगे-मुली, माझ्या भाचीबरोबर खेळण्यासाठी म्हणून आमच्याकडे आली. अर्थात त्यांच्या बोलाचालीने गलबला होऊ लागलाच. बाबांना नुकतीच झोप लागत असल्यामुळे, ते त्या गलबल्याने जागे झाले आणि रागावून म्हणाले, " छे निद्राकर्षण होत आहे. यावेळी कोण आरडाओरड करीत आहे ? " आई आली आणि तिने त्या मुलांना दूर घालविताना सांगितले, " जा, जा इथून. दुसरीकडे जाऊन खेळा जा. यावेळी कर्षण होत आहे. दिसत नाही ? " दोघांच्या बोलण्याने माझ्या बहिणींत हास्यकल्लोळ उसळला.

मनुष्येतर प्राण्यांवरील बाबांच्या प्रेमाचे आणखी एक उदाहरण सांगतो. कित्येक गिधाडे कालीनाथबाबूंच्या नारळांच्या बागेत नारळाच्या झाडांवर बसून नेहमी स्वतःचे घरटे बांधण्यासाठी पानांची चिरफाड करीत असत. बाबांना कुणाकडून तरी अशी चुकीची बातमी समजली की, कालीनाथबाबूंनी गिधाडांना भीती दाखविण्यासाठी अथवा मारण्यासाठी बंदूक आणून ठेविली आहे. हे ऐकताच बाबांना राग आला आणि ते म्हणाले, " हे स्वतःला ब्राह्म समजतात ! गिधाडे ती ! तुमच्या आमच्या बागेतील पाने त्यांनी नेली तर काय झाले ? त्यांची घरटी बांधायची असली तर त्यांची काय स्वतःची झाडे आहेत ? " यानंतर काही दिवसांनी मी घरी गेलो तेव्हा बाबांनीच ही हकीगत मला सांगितली होती.

अशा या पितृदेवांच्या घरात मी जन्मल्यामुळे व वाढल्यामुळे त्यांच्या आचार-विचारांचा माझ्यावर परिणाम झाला. मी माझ्या आत्मजीवनाचे परीक्षण केल्यावर मला हे स्पष्ट दिसून आले की, ही तेजस्विता, ही सत्यप्रियता, ही दृढनिश्चयी वृत्ती आणि अशी ही सहृदयता मला लहानपणापासून पाहता आली नसती तर मला नैतिक मूल्यांचे केव्हाच आकलन करता आले नसते आणि

किंमतही कळली नसती. तरीपण हेही मला जाणवते की त्यांची तेजस्विता, माणुसकी, स्वाभिमान व दृढनिश्चयी वृत्ती हे गुण पूर्णपणे माझ्यात उतरले नाहीत. हे गुण जर मोठ्या प्रमाणात माझ्यात उतरले असते तर चांगले झाले असते.

## माता गोलोकमणि देवी

मी लहानपणापासून माझ्या वडिलांत ज्याप्रमाणे माणुसकी आणि निश्चयी-वृत्ती पाहात आलो, त्याप्रमाणेच आईच्या वागणुकीत आध्यात्मिकता आणि धर्मनिष्ठा यांचा आदर्श पाहिला आहे. माझ्या आईचे वडील धार्मिक गृहस्थाचा आदर्श नमुना होते. तसेच माझे मामाही स्वतःच्या गावात कर्तव्यपरायण, दृढनिश्चयी आणि देशप्रेमी म्हणून प्रख्यात होते. तिचे वडील सत्यवादी, मनाचे निश्चयी आणि परोपकारी पुरुष होते. त्यामुळे माझी आई, धर्मपरायणतेत व नैतिक आचार-विचाराच्या प्रभावात जन्मली आणि त्याच प्रभावात मोठी झाली होती. ती स्वतः तेजस्विनी आणि मनस्विनी स्त्री होती. ती श्रीमंत नसली तरी तिचे मन उदार होते. अन्तःकरण मृदू असले तरी निर्भयता होती. साधुसंतांची भक्ती तिच्यात पूर्णतेने वास करीत होती, पण अंधश्रद्धा नव्हती. तिला स्वधर्माबद्दल पराकाष्ठेचे प्रेम असले तरी परधर्माचा तिने कधीही द्वेष केला नाही.

तिला आत्ममर्यादेची वा आत्मसन्मानाची विलक्षण चाड होती. माझ्या वडिलांची प्राप्ती दरमहा ३०।३५ रुपयांपेक्षा जास्त नसली तरी माझी आई अशी काही सुगृहिणी होती की, त्यातच तिने मुलांचे शिक्षण, तीन मुलींची लग्ने आणि धार्मिक हिंदू गृहस्थाघरील कुलाचार, कुलधर्म, व्रतवैकल्ये सर्व काही उत्तम रीतीने पार पाडले. आपल्या अभावग्रस्त संसाराबद्दल दुसऱ्या कुणाकडे तिने अवाक्षर उच्चारले नाही. इतकेच नव्हे तर माहेरीही कुणाला जाणवू दिले नाही. कुणाकडे दोन रुपये उसने मागतानाही मी तिला पाहिले नाही. ती माझ्या वडिलांना संपूर्णतः ऋणमुक्त ठेवूनच गेली.

धर्मपरायणता ही तर तिच्या हाडा-मासात खिळून गेलेली होती. बालपणातच लग्न होऊन जेव्हा ती आमच्या घरात आली तेव्हा येताच तिला ऐंशी-वर्षांहून जास्त वयाचे असलेले माझे पणजोबा रामजय न्यायालंकार महाशय यांच्या सेवाशुश्रूषेचा भार वाहावा लागला. या साधुतुल्य पुरुषाच्या संसर्गाने व उपदेशाने आईची धर्मश्रद्धा अनेक पटींनी वाढली. तिने त्यांच्याचकडून मंत्रदीक्षा घेतली आणि देवाप्रमाणे ती त्यांची मनःपूर्वक सेवा करू लागली. माझे हे पणजोबा परलोकवासी झाल्यावर पन्नास वर्षांहून अधिक काल माझी आई जिवंत होती. या दीर्घकालात क्षणभरही आईला त्यांचा विसर पडला नाही. ती आपल्या आयुष्याच्या अखेरीपर्यंत, माझ्या पणजोबांच्या जपाच्या माळेने रोज जप करीत असे.

लहानपणी मी एका जबरदस्त आजारातून बरा झाल्यावर तिने हातावर व डोक्यावर जो धूप जाळला होता व हृदयाच्या रक्ताने इष्ट देवतेचे स्तोत्र लिहिले होते, त्याची हकीगत मी पूर्वी सांगितलीच आहे.

तारुण्यात आल्यावर मी जेव्हा ब्राह्मसमाजात दाखल झालो तेव्हा आईला वाटले की आपल्या पूर्वजन्मीच्या कोणत्या तरी पापामुळे मुलाला ही दुर्बुद्धी सुचली असावी. तरीपण तिने माझ्याशी कठोरतेची वागणूक केव्हाच केली नाही. मात्र पूर्वजन्मीच्या कल्पित पापनिवृत्तीसाठी तिने जपतपात व व्रतवैकल्यात पुष्कळच वाढ केली. ज्योतिषी ब्राह्मण पाहिला की त्याला माझी जन्मपत्रिका दाखविण्याचा तिला नादच लागला. ती जन्मपत्रिका पाहून ज्योतिषी ब्राह्मण जे व्रतवैकल्य वा धार्मिक कृत्य सांगे ते ती निष्ठेने करी. अशा या कृत्यात तिने बराच पैसा खर्च केला. तिचे आरोग्यही बिघडले. औषधोपचारासाठी अनेकदा तिला कलकत्त्यालाही आणावे लागले. शेवटी एक ज्योतिषी ब्राह्मण माझी पत्रिका पाहून म्हणाला की, " याच्या पत्रिकेवरून पाहता, देवाब्राह्मणाकडे हा केव्हाच लक्ष देणार नाही. तशी बुद्धीच याला होणार नाही. " इतके झाल्यावर मग आईने माझ्यासाठी व्रत-वैकल्ये करण्याचे सोडून दिले. त्या कष्टातून ती सुटली.

आई-वडिलांतही या माझ्या बाबतीत कितीतरी फरक. मला मारण्यासाठी वडिलांनी गुंडांची योजना करून काही वर्षांत २०।२२ रु. खर्च केले. तर आईने माझ्यासाठी देहकष्ट आणि व्रतवैकल्ये करण्यात जवळजवळ तितकेच पैसे खर्च केले.

गेल्या वर्षी ( १९०७ सालच्या जून महिन्यात ) जबरदस्त आजाराने जेव्हा मी मृत्युशय्येवर पडलो तेव्हा आई काही दिवस माझ्याकडे राहायला आली होती. तेव्हा रोज सकाळी स्वतः पूजा जप करून ते मंतरलेले तीर्थ ती मला पाजीत असे. पणजोबांची जपाची माळ माझ्या वक्षस्थळावर ठेवी आणि स्वतःची पायधूळ माझ्या मस्तकाला लावी. माझे मित्र माझ्या बाबतीत निराश झाले पण आईने काही माझ्या जगण्याची आशा सोडली नाही. तिच्या मनाची ती दृढता पाहून सर्वजण थक्क झाले. आपल्या प्रार्थनेने आणि आशीर्वादाने मी पूर्णपणे त्या कठीण आजारातून बरा होईन अशी तिची श्रद्धा होती.

ही स्वाभाविक धर्मनिष्ठा हे तिच्या स्वभावातील मुख्य लक्षण होते. तिने गया, काशी, वृन्दावन, जगन्नाथपुरी वगैरे सर्व मुख्य मुख्य क्षेत्रे पाहिली होती. यात्रा केल्या होत्या, पण पुण्यक्षेत्रे पाहण्याची तिची आकांक्षा काही तृप्त झाली नव्हती. तिच्या धर्मनिष्ठेला जणू काही सीमाच नव्हती.

माझ्या लहानपणापासूनच आई आपल्या अन्तःकरणातील उदात्त भाव माझ्या मनात ठसविण्याचा प्रयत्न करीत असे. प्रथम मला अक्षरओळख होताच

आणि मी वाचू लागताच तिने असा एक नियमच केला होता की, ज्या दिवशी माझ्या शाळेला सुटी असे त्या दिवशी दुपारी ती जेवणानंतर बिछान्यावर विश्रांतीसाठी पडली की, मी कृत्तिवासी रामायण वाचून तिला ऐकवायचे. त्या ग्रंथातील जो भाग तिला जास्त आवडत असे तो भाग दिवसानुदिवस अनेकदा ती मला वाचायला लावी. केव्हा केव्हा आम्ही मायलेक दोघेही तो भाग तोंडपाठ म्हणत असू. तेव्हापासून बराच काळपर्यंत रामायणातील पुष्कळसा भाग मला तोंडपाठ म्हणता येत होता. अजूनही त्यातील काही काही दृश्ये मला डोळ्यांसमोर दिसतात. अशाप्रकारे ब्राह्मधर्मानुयायी होण्यापूर्वी रामायणाचा धर्म तो माझा धर्म आणि रामायणातील नीती ती माझी नीती बनून गेली होती. त्यावेळी रामायणातील आदर्शापेक्षा उच्चतर आदर्श आहे असे कुणी म्हटल्यास ते मला सहन होत नसे.

दुसरे, ईश्वर आणि परलोक अगर परकाल या बाबतीत अविश्वास किंवा अश्रद्धा उत्पन्न करणारा असा माझ्याशी कोणी तर्कवितर्क करीत आहे असे जर कधी तिच्या कानावर आले. तर ती एकाद्या वाघिणीप्रमाणे धावून येई आणि रागारागाने तो तर्कवितर्क थांबविण्याचा प्रयत्न करी. फार काय, माझ्या वडिलांनी जरी या वादविवादात थोडीफार अनुकूलता दर्शविली तरी तीही तिला सहन होत नसे. त्यांना ती म्हणे, “ माझ्या मुलाचे असे डोके बिघडवू नका. ” आणि यासाठीच आजपर्यंत एखादे दिवशीसुद्धा माझ्या मनात ईश्वर आणि परकाल या संबंधाने अश्रद्धा निर्माण झाली नाही. ईश्वरी सत्तेवरचा माझा विश्वास उडाला आहे, असा दिवस नव्हे तर क्षणही मी अनुभवला नाही.

आणखी एक दृढ भावना आईच्या अन्तःकरणात असलेली मी पाहिली. कपटी वागणूक असणाऱ्या माणसाचा ती मनापासून तिटकारा करी. जे लोक तोंडाने मोठमोठ्या गोष्टी बोलत आणि वागताना नीचपणाने वागत तसेच मनात अश्रद्धाळू असून बाहेरून श्रद्धाळू असल्याचे दाखवीत, मनातून दुराचारी असताना बाहेरून सदाचाराचा आव आणीत, अशा ढोंगी माणसांचे नाव घेतलेलेही आईला सहन होत नसे. इतकेच काय पण कोणी त्यांची प्रशंसा केली तर आपल्या अंगावर त्याने गरम पाण्याचा शिडकावा केला आहे असेच तिला वाटे. एकतर ती तिथून उठून जात असे नाहीतर ती प्रशंसा बंद करवीत असे. आणि सांगे, “ त्याचे नाव घेऊ नको, नकोच घेऊ. आग लागो त्याच्या ढोंगी धार्मिकतेला. आग लागो त्याच्या भगव्या वस्त्राला आणि त्याच्या भस्मचर्चित तोंडाला. ”

एकदा तिला एखादे कृत्य हे आपले कर्तव्यकर्म आहे असे वाटले तर ते ती दृढभावनेने तडीला नेई. इतरांच्या रागालोभाची पर्वा करीत नसे. मी हे प्रत्यक्ष पाहिले आहे, त्याचे उदाहरण सांगतो. एकदा महान् दुष्काळ पडला आणि अन्नावाचून तडफडणारे अनेक लोक आमच्या गावी आले. त्यांपैकी उपासमारीने अखेरच्या अवस्थेला पोचलेला असा एक अगदी खालच्या जातीचा मनुष्य मरणप्राय

अवस्थेत आमच्या वाडीत येऊन ठेपला. ब्राह्मणाच्या मुलीबाळी त्याच्या सभोवार जमल्या. माझी आईही त्यात होती.

पण ती पहात न राहाता त्याच्याजवळ जाऊन बसली आणि त्याला " तुला किती दिवस खायला मिळाले नाही ? " असे विचारले. पण त्याला काही बोलवेनाच. केवळ आ वासून तो स्वतःची भूक जाणवू लागला.

मग आईने त्याला, " थांब. तुझ्या तोंडात मी भात आणून घालते. " असे म्हणून ती त्या घोळक्यातून बाहेर पडली. वाडीतल्या जमलेल्या मुलीबाळी म्हणाल्या, " अगबाई, ते ग कसे होणार ? तो कोणत्या जातीचा आहे कुणाला माहीत. कुणा खालच्या जातीच्या माणसाला बोलवून त्याला स्वतःच्या हाताने खायला घालणे... " वगैरे वगैरे. पण आईने त्यांच्या बोलण्याकडे लक्षच दिले नाही. भात आणून तो चांगल्याप्रकारे कालवून ती त्याला भरवू लागली. तोही खाऊ लागला. नंतर तिने पाणी दिले. तो पाणी प्याला., पण हाय ! दुसऱ्याच क्षणी त्याचा प्राणवायू देहाला सोडून गेला ! माझी आई रडू लागली. त्यानंतर आई मला म्हणाली, " तो पूर्वजन्मीचा कोणतरी माझा आप्त असावा ! "

कुठेही पुराण सांगितले जात आहे अगर धार्मिक प्रवचन होत आहे असे ऐकले की आई मग आजारी स्थितीत असली तरी आणि अगदी वार्धक्यामुळे चालता येणे अशक्य असले तरी तिला घरात पडून राहवत नसे. आमच्या घरापासून ते ठिकाण दूर असेना का ती आपली काठी टेकीत टेकीत तेथपर्यंत जायचीच.

एकदा कलकत्त्याला येऊन ती बालिगंज येथील माझ्या बिऱ्हाडी राहिली होती. तितक्यात तिचे कसलेसे व्रत आले. हे व्रत करणाऱ्या स्त्रीने त्या व्रताची कथा ऐकलीच पाहिजे. असा त्या व्रताचा नियम होता. मी पूजा सांगणारा ब्राह्मण आणला पण त्याला बिचाऱ्याला ती कथा सांगता येत नव्हती. मी पुनः कथा सांगणारा ब्राह्मण शोधायला बाहेर पडलो. पण ब्राह्मण मिळाला नाही. घरी येऊन पाहतो तो आई घराच्या एका बाजूला एका आसनावर बसून स्वगत म्हटल्यासारखी अस्पष्टपणे भराभर ती संपूर्ण कथा स्वतःच म्हणत होती. माझ्या मुली तिच्या सभोवार बसून हसत होत्या व म्हणत होत्या, " अग बाई, हे कसले कथाश्रवण ? " ती हाताच्या इषाऱ्याने गप्प बसायला मुलींना सांगत होती. शेवटी उठून हसत हसत म्हणाली, " कथा ऐकली पाहिजे, एवढेच धर्मशास्त्रात सांगितले आहे. दुसऱ्याच्या तोंडून ऐकावी किंवा स्वतःच्या तोंडून ऐकावी, याविषयी काही नियम नाही. ती कथा माझ्या कानात गेली म्हणजे झाले ! माझीच कथा माझ्या कानात गेली त्यात काय बिघडले ! " हे ऐकून एक नात चटकन म्हणाली, " आजी, धन्य तुझी बुद्धी बाई ! " त्यावर आईने म्हटले, " समजले ना ? कथा न ऐकली तर व्रत करून व्यर्थ होते. म्हणून नियम पाळला झाले. "

मला वाटते, बाबांना लोकांच्या तोंडून "वाहवा पंडित मोशाय" असे ऐकायला फार आवडायचे. निदान माझ्या मातृदेवतेला तरी तसे वाटत असावे. कारण कोणतेही धार्मिक कार्य अथवा कुलाचार करावयाचा झाल्यास धर्म जितकी अपेक्षा करतो, शास्त्रात जसे सांगितले आहे तसे विधिपूर्वक केले म्हणजे झाले असे मानून ते संतुष्ट होत नसत. सगळे लोक 'धन्य धन्य' 'वाहवा' 'वाहवा' म्हणतील असे ते अवडंबरयुक्त झाले पाहिजे असे त्यांना वाटे. सर्वच वेळी अगर स्थळी केवळ प्रशंसाप्रियतेमुळे हे होई असे नाही तर काही ठिकाणी त्यांची सहृदयताच याच्या मुळाशी असायची. लोकांना द्यावे, त्यांना भोजनाने संतुष्ट करावे असे त्यांना मनापासून वाटे. परंतु मला वाटते त्यांच्या स्वभावात थोडीशी प्रशंसाप्रियता कदाचित् असावी. ते काही असले तरी आईला हे आवडत नसे आणि सहनही होत नसे. त्यामुळे तिला या प्रशंसाप्रियतेचा भास झाला की बाबांच्या त्या धार्मिक कृत्याकडे ती तितक्या आपुलकीने अगर आस्थेने पाहात नसे. म्हणत असे, "तुम्ही हे धर्मकार्य म्हणून थोडेच करिता! पंडित फार चांगले आहेत असे ऐकण्यासाठी करता!" आईने असे म्हटले की मग दोघांचा कलह सुरू होई. मी हे भांडण अनेकदा पाहिले आहे. धर्मकृत्यांमध्ये धार्मिक भावनेखेरीज अन्य कोणत्याही प्रकारच्या हेतूचा भासदेखील तिला सहन होत नसे.

जे काही असत्, जे काही अपवित्र त्यांचा माझ्या आईला इतका तिटकारा असे की, लहानपणी मी आणि माझ्या बहिणी वाडीतील मुलांमुलीत मिसळून कितीतरी वाईटसाईट गोष्टी पाहात होतो, ऐकत होतो, पण त्यांपैकी कशाचाही घरात उल्लेख करण्याचा आम्हाला धीर होत नसे. मी वाडीत एकदा वाईट शिवी उच्चारलेली ऐकली आणि ती घरात आल्यावर उच्चारली त्यावेळी मला जी शिक्षा भोगावी लागली तिचा उल्लेख पूर्वी आलाच आहे. आई वात्सल्याच्या बाबतीत फुलाप्रमाणे कोमल होती पण शिक्षा करताना लोखंडाइतकी कठीण आणि कठोर होत असे.

म्हणून प्रांजलपणाने कबूल करतो की, ईश्वर आणि परकाल तसेच सत्य आणि स्वतःच्या कर्तव्याच्या बाबतीत आस्था ठेवण्याविषयी मी जे काही शिकलो ते पुष्कळसे आईची वागणूक पाहूनच. तिने केवळ पान्हा पाजूनच माझे लालन-पालन केले असे नव्हे तर तिने स्वतःच्या चारित्र्यानेही माझे चरित्र घडविले होते.

## वडील मामा द्वारकानाथ विद्याभूषण

१८५६ साली मी जेव्हा माझ्या वडलाबरोबर कलकत्याला शिकायला आलो आणि चाँपातला भागात आईच्या वडलांकडे राहू लागलो, तेव्हा माझे आजोबा तेथे नव्हते. ते आजारी पडून गावी गेले होते. त्या वेळेपासून बिऱ्हाडा-तील इतर लोकांची वागणूक आणि माझे वडील मामा, द्वारकानाथ विद्याभूषण

महाशय यांची चालचालणूक यात मला वेगळेपणा दिसून आला. मामा तंबाकू सुद्धा ओढीत नसत. नेहेमी ते गंभीर असत, घरात चाललेल्या मौजमजेत ते कधी भाग घेत नसत आणि नेहमी वाचनात मग्न असत. मला वाटते त्यावेळी ते 'ग्रीस व रोमचा इतिहास' लिहीत असावेत.

घरात ज्याप्रमाणे त्यांना वाचनात मग्न असलेले मी पाहात असे, तसेच संस्कृत कॉलेजात मी शिकायला गेल्यावर तेथील लायब्ररीच्या एका कोपऱ्यात ते वाचनात निमग्न असलेले मला दिसत असत. ते इतके गंभीर दिसत की, कोणीही त्यांच्याजवळ जायला भीत असे. आणि खरे सांगायचे तर ते इतके गंभीर स्वभावाचे मनुष्य होते, की मामा खोलीत आहेत असे पाहताच बहिणी जिना उतरताना पायातील पैंजण गुडघ्यापर्यंत वर घेऊन आवाज होऊ न देता एकेक पायरी उतरत, असे मी आईच्या तोंडून ऐकले आहे. मोठ्या मामांना कमी बोलण्याची इतकी सवय होती की, माझ्यावर त्यांचे सर्वात जास्त प्रेम असताही माझे लाड करण्यासाठी अगर मला प्रेमाने जवळ घेण्यासाठी ते एकही शब्द उच्चारीत नसत. ते वाचायला बसले आहेत अगर शतपावली घालीत आहेत असे दिसल्यास त्या बाजूला आम्ही फिरकतही नसू.

मी जेव्हा १२।१३ वर्षांचा होतो, तेव्हा माझी मोठी मामी १७।१८ वर्षांची असावी. (ही मोठ्या मामांची तिसरी पत्नी). त्यावेळी माझ्या मावशांत एका गोष्टीबद्दल हसण्याची फार खसखस पिके. ती गोष्ट ही :—

मामांना वाचण्याचा नाद इतका दांडगा होता की, रात्री ११ वाजता घरकाम आटोपून मोठी मामी जेव्हा झोपायला जाई तेव्हा मामा आपले वाचनात गढलेले. ते इतके की मामीकडे ते पाहातही नसत. मामी अगदी गळेपडूपणाने त्यांच्याशी बोलण्याचा प्रयत्न करू लागली तर डाव्या हाताच्या इशाऱ्याने तिला ते थांबवीत. मामी मग रुसून बिछान्यावर दणकन आदळून घेई. त्या रात्री मग मामांशी ती एक शब्दही बोलत नसे. खरोखरच मी अनेकदा ११ वाजता झोपायला जाताना पाहिले आहे की, मामा आपले वाचनात गुंग. पुन्हा पहाटे चार वाजता उठून पाहावे तर मामांचे वाचन चाललेलेच. मग हे झोपतात तरी केव्हा असे वाटून मी आश्चर्यचकित व्हायचा.

१८५८ सालापासून 'सोमप्रकाश' पत्र प्रसिद्ध होऊ लागले. तेव्हापासून यांचा हा एकांतवास आणि वाचनाभ्यास जास्तच वाढला. जेव्हा ते आपला छापखाना व सोमप्रकाश साप्ताहिक आपल्या गावी चाँगडीपोता येथे घेऊन गेले तेव्हा ते मातलारेल्वेचे डेलि-पॅसेंजर बनले. तेव्हाही पाहिले तो गाडी यायला वेळ आहे, निरनिराळे लोक निरनिराळ्या गोष्टी बोलत आहेत, पण हे आपले स्टेशनात गर्दी-गोंगाटात एकीकडे बसून मनःपूर्वक कॉलेजात शिकवावयाची पुस्तके तन्मयतेने

वाचीत असायचे. त्यांच्याबरोबर गाडीत बसल्यावर अनेकदा पाहिले आहे. निरनिराळे लोक निरनिराळ्या प्रासंगिक गप्पा मारीत असले तरी हे फारसे त्यांत लक्ष घालीत नसत. तोंडाने फक्त हां हूं म्हणत तेवढेच. पुष्कळसा वेळ डोळे झाकून डोलत असलेलेच दिसत. नाही तर कॉलेजचे पुस्तक वाचण्यात मग्न आहेतच. केवळ अधर्म आणि अन्याय या बाबतीत कुठे वादविवाद चाललेला त्यांनी ऐकला व त्यावर त्यांचे म्हणणे विचारण्यात आले तरच त्यांचे ते गांभीर्य एकदम नाहीसे होऊन चेहेऱ्यात बदल होत असे. अन्यायाचा तर ते तीव्र विरोध करीत. विशेष सांगायचे म्हणजे ते बोलू लागले की गाडीच्या ज्या डब्यात ते असत त्या डब्यातील वातावरण ते असेतोपर्यंत जणू काय उच्च भावनांनी भारावल्यासारखे होई.

कर्तव्यकर्मात त्यांचा इतका गाढ अभिनिवेश आणि चित्ताची अशी काही अद्‌भुत एकाग्रता मला दिसून येई की, ते जेव्हा घरात असत तेव्हा सोमप्रकाश लेखनाखेरीज त्यांचे जगात दुसरे कोणतेच कार्य राहिलेले नाही असे मला वाटे. नंतर ते कॉलेजात जाऊन जेव्हा शिकविण्याला बसत तेव्हा त्यात ते इतके मग्न होत की जगात शिकविण्याखेरीज त्यांना कोणतेच दुसरे कार्य नाही असे पाहणाऱ्याला वाटे. आरब्ध कार्यात पूर्ण एकाग्रता हे त्यांचे वैशिष्ट्य होते. खरोखरी एकदा कर्तव्य म्हणून कोणतेही कार्य हाती घेतले की त्यात ते इतके मग्न होत की त्यामुळे होणाऱ्या नुकसानीला ते नुकसान म्हणायलाही तयार नसत; इतकेच नव्हे तर ते कार्य पूर्ण केल्यावाचून ते राहात नसत. या बाबतीत एकदोन उदाहरणे येथे देतो.

एकदा ते सकाळी प्रातःकृत्य आटपून येत असता, गोप जातीची एक विधवा तरुणी रडत रडत त्या रस्त्याने चालली होती. मोठ्या मामांनी तिला रडण्याचे कारण विचारले तेव्हा ती म्हणाली, " गावातील एका धनिक गृहस्थाने दासी म्हणून मला घरात ठेविले. त्या स्थितीत असताना मला प्रलोभन दाखवून वाईट मार्गाला लावले आणि नंतर मी गरोदर झाल्याचे पाहून मला घालवून दिले आहे. माझा आता निरुपाय आहे. " ते ऐकून मामांचा क्रोधाग्नी भडकला. त्यांनी प्रथम त्या श्रीमंत मनुष्याकडे एकजण पाठवून त्या दुर्दैवी स्त्रीच्या पालनपोषणासाठी योग्य ते द्रव्य त्याच्याकडून मिळविण्याचा प्रयत्न केला. त्यात यश न आल्यामुळे त्यांनी त्या बाईच्या नावाने सरकारात पोटगीची फिर्याद लाविली आणि स्वतःच्या खर्चाने तो खटला चालविण्याची तयारी केली. इतका प्रसंग आला तेव्हा त्या श्रीमंत गृहस्थाने त्या बाईला आमरण दरमहा चार रुपये पोटगी देण्याचे मान्य केले असावे असे मला वाटते. नंतर मामांनी तिने ते मूल गर्भावस्थेत मारून टाकू नये म्हणून बंदोबस्त केला आणि मायलेकरांच्या रक्षणाची व्यवस्था केली.

आणखी एक उदाहरण असे— गावी कायमचे राहू लागल्यावर त्यांना वाटले की गावात एखादे चांगले इंग्रजी स्कूल असणे आवश्यक आहे. त्यापूर्वी

जमीनदारबाबूंनी स्थापन केलेले एक स्कूल होते. मामांनी प्रथम त्या जमीनदारबाबूंशी संपर्क साधून ते स्कूल चांगल्या स्थितीत ठेवण्याचा प्रयत्न केला. पण दोन-तीन वर्षांतच त्यांना अनुभव आला की, तसा प्रयत्न करणे व्यर्थ आहे. तेव्हा मग स्वतःवरच स्कूलची वाढ करण्याची संपूर्ण जोखीम घेऊन त्या कार्याकडेच त्यांनी देहमन अर्पण केले. त्यांच्यासारख्या एका गरीब ब्राह्मण पंडिताने हे स्कूल स्वतःच्या जोखमीवर चालविणे म्हणजे दुःसाहसच होते. पण ही गोष्ट एकदाही त्यांच्या मनात आली नाही. स्कूलचा सगळा खर्च त्यांच्याच अंगावर पडला. हा भार त्यांनी अखेरपर्यंत—देहांतापर्यंत सहन केला. महिन्याच्या पहिल्या तारखेला संस्कृत कॉलिजचे वेतन मिळताच त्याच दिवशी घरी येताना प्रथम ते त्या स्कूलमध्ये जाऊन जमाखर्च पाहात आणि आवश्यक ती रक्कम स्वतःच्या वेतनातून देऊन शिक्षकांचा पगार वगैरे भागवीत आणि नंतर घरी येत.

माझ्या मोठ्या मामांचे औदार्य आणि थोरपण यांचे थोडेफार विवरण पूर्वी दिलेले आहे. त्याची पुनरावृत्ती आता करीत नाही. थोडक्यात एवढेच सांगतो की, माझ्या आई-वडिलांच्या चरित्रानंतर माझ्या मामांचे उदात्त आचरण, माझे चरित्र घडविण्याला मुख्यतः कारण झाले आहे. त्यांची ज्ञाननिष्ठा; त्यांची कर्तव्यपरायणता, त्यांची देशभक्ती आणि त्यांची निष्कपटवृत्ती कायमची माझ्या मनावर ठसून राहिली आहे. रामतनु लाहिडी आणि तत्कालीन बंगसमाज या माझ्या ग्रंथात यांचे जीवनचरित्र आले आहे.

## पंडित ईश्वरचंद्र विद्यासागर

माझ्या मामांनंतर ज्यांच्या संपर्कात येऊन मी विशेषरूपाने उपकृत झालो ते म्हणजे पंडितवर ईश्वरचंद्र विद्यासागर. मी १८५६ त नऊ वर्षांचा असताना कलकत्त्यात आलो. येताच संस्कृत कॉलेजात भरती झालो. त्यावेळी विद्यासागर महाशय या कॉलेजचे अध्यक्ष होते. इतकेच केवळ नव्हे तर मित्र म्हणून माझ्या मोठ्या मामांना भेटण्याला ते मधून मधून आमच्या बिऱ्हाडी येत. मी पूर्वी सांगितलेच आहे की, मला पाहताच ते हाताच्या दोन बोटांच्या चिमटीत माझ्या पोटाची चामडी धरून ओढीत. आणि या भीतीने ते येत आहेत असे पाहताच मी तिथून गायब होत असे. पण ते माझ्यावर फार प्रेम करीत. येताच प्रथम माझा तपास करीत आणि माझे कुशल विचारीत. माझ्या बाबांवरही त्यांचे फार प्रेम होते आणि माझ्या मामांशी संस्कृत व्याकरणाची चर्चा करताना एखादा अंतिम निर्णय घ्यायचा झाल्यास ते बाबांना बोलवून मीमांसा करून घेत. व्याकरणातील व्युत्पत्तीसंबंधी त्यांची बाबांवर प्रगाढ निष्ठा होती.

कॉलेजात आम्ही त्यांना भीतियुक्त नजरेने पाहात असू आणि दूरदूर राहात असू. मुलांनी दांडगाई अगर वात्रटपणा केल्यास ते त्यांना आपल्या खोलीत घेऊन

जात आणि कोपऱ्यात उभे करून ठेवीत. तसेच पाने कापलेल्या पुस्तकाच्या पुठ्याने त्याच्या पोटावर चापट्या देत. माझ्या काही व्रात्यपणामुळे मलाही त्यांनी अशी शिक्षा केल्याचे आठवते.

आम्ही कॉलेजातील सगळी लहानमोठी मुले विद्यासागर महाशयांना एक भाग्यवान पुरुष म्हणून ओळखीत असू. मला चांगले आठवते, त्यांनी जेव्हा डायरेक्टरांशी भांडण करून कॉलेज सोडले तेव्हा गव्हर्मेंटवर आम्ही फार चिडलो होतो. आम्हाला वाटले जणू काय ते आमचा प्राणच बरोबर घेऊन गेले!

त्यानंतर जसजसे माझे वय वाढू लागले तसतसा त्यांच्याशी माझा संबंध जास्तच येऊ लागला. मी ब्राह्मसमाजात गेल्यामुळे बाबांना दुःख झाले आणि त्यामुळे त्यांनाही दुःख झाले. बाबा त्यांना म्हणाले होते, "मनुष्य जसा यमाला मुलगा देतो तसा मी माझ्या मुलाला केशवाला (केशवचंद्र सेन) दिला!" बाबांचे हे शब्द ऐकताच विद्यासागर रडू लागले. पण रस्त्यात अगर घाटावर त्यांची माझी भेट झाली तर लागलीच ते मला पहिला हा प्रश्न करीत, "काय रे, तुझे कसे काय चालले आहे?" मी घरावेगळा झाल्यामुळे मी दुःखाकष्टात दिवस काढीत असेन असे वाटून त्यांना दुःख होई. मी सरकारची नोकरी जेव्हा सोडली तेव्हा एकाने त्यांना जाऊन सांगितले, "मोशाय, त्या पाजी माणसाने अशी सुखाची नोकरी सोडून दिली!" यावर ते हसून म्हणाले, "या पाजी माणसाकडे हे कशाला सांगतोस? त्याने तर माझ्या मनासारखे काम केले आहे!"

कोणी त्यांच्याकडे जाऊन मला शिव्यागाळी देऊ लागला तर, मी ब्राह्मसमाजात गेल्याबद्दल ते दुःख करीत; पण म्हणत, "काही म्हणा त्याला हृदयाशी धरले तर माझ्या मनाला होणाऱ्या वेदना नाहीशा होतात."

मी निरनिराळ्या ठिकाणी निरनिराळ्या स्थितीत त्यांच्याशी मिळून मिसळून वागलो असून त्यांचे स्वाभाविक गुण पाहण्याची व अजमावण्याची चांगलीच संधी मला लाभली. अशा प्रकारचे दयाळू, सदाचारी, तेजस्वी आणि उग्र उत्कट व्यक्तिमत्त्वसंपन्न पुरुष मी माझ्या आयुष्यात फारच थोडे पाहिले असतील. मी संपादिलेल्या 'प्रबंधावली' नावाच्या ग्रंथात 'विद्यासागर' या प्रबंधात त्यांच्या अनेक गुणांचा उल्लेख केला आहे.

### प्रथम पत्नी प्रसन्नमयी देवी

सुमारे १८५० साली कलकत्त्यापासून पाच कोसांवर आग्नेयेला असलेल्या राजपूर नावाच्या गावीं एका गरीब ब्राह्मणाच्या घरी प्रसन्नमयीचा जन्म झाला. मी जेव्हा तीन वर्षांचा होतो आणि ती एक महिन्याची होती तेव्हा दाक्षिणात्य कुलीन वैदिक ब्राह्मणांच्या कुलाचाराप्रमाणे तिच्याशी माझ्या विवाहाचा वाङ्निश्चय झाला आणि तिच्या ८ वे की ९ वे वर्षी, आणि माझ्या ११ वे किंवा

१२ वे वर्षी आमचा दोघांचा विवाह झाला. माझे पूजनीय पणजोबा रामजय न्यायालंकार महाशय यांनी हे विवाहकार्य संपन्न केले.

बालिका प्रसन्नमयी वधू म्हणून आमच्या घरात आल्यावर जितक्या सन्मानाने व आदराने तिचा गृहप्रवेश व्हावा तितक्या आदराने तो झाला नाही. ज्ञानवत्ता व सामाजिक उच्चता या दृष्टीने हीन म्हणून माझ्या श्वशुर कुलातील मंडळीबद्दल माझ्या आई-वडिलांचा विशेषतः माझ्या वडिलांचा तुच्छता व अवहेलनाभाव कायमच राहिला. प्रसन्नमयी ही त्या घराण्यातील मुलगी. त्यामुळे तिच्या बाबतीतही काही अंशी तीच वृत्ती दिसून आली.

तिच्या सर्व गृहकृत्यांत आणि वागणुकीत माझ्या आईवडिलांना तिच्या अडाणी व अशिक्षित घराण्याची ओळख पटे. तिच्या वयसुलभ लहानसान कृत्यातही तिच्या आढळणाऱ्या चुकांना मोठ्या अपराधाचे स्वरूप देण्यात येई. हिंदू गृहस्थाच्या घरात लहान अल्पवयी वधूला सासरी सासू व वडीलधारी माणसे यांच्याशी वागताना किती भयभीतपणाने वागावे लागते हे सर्वांना माहीत आहेच. फारच थोड्या मुली सासरच्या या कठीण परीक्षेत पास होत असत. अर्थात लहानग्या प्रसन्नमयीला सासरी आल्यावर अज्ञतेमुळे या सर्व मानमर्यादा पाळणे अशक्य होई. त्यामुळे लवकरच तिला सासरी सर्वांच्या रोषास पात्र व्हावे लागले.

मी यावेळी या सगळ्या गोष्टी लिहीत आहे. पण त्यावेळी मी काहीच बोललो नाही. मीही त्यावेळी लहान मुलगाच होतो. सर्व तऱ्हेने वडीलधाऱ्या माणसांच्या व आप्तपरिवाराच्या आधीन होतो. शिवाय माझा बराचसा काल शिक्षणासाठी म्हणून कलकत्त्यात जात असे. उन्हाळ्याच्या आणि पूजेच्या ( आश्विन नवरात्र ) सुटीत घरी येत असे तेव्हा त्या बालवयी पत्नीची आणि माझी भेट व्हायची. तरी पण त्यावेळी मी दुसऱ्याच्या नजरेनेच तिचे गुणदोष पाही आणि अनेकदा वडीलधाऱ्या मंडळींनी केलेल्या तिच्या तिरस्काराचे प्रमाण वाढवून प्रसन्नमयीचे जीवन मी विषमय करून टाकी. पुढे हे सगळे जेव्हा आठवे तेव्हा माझे अन्तःकरण क्षुब्ध होई. असो.

माझे बालपण संपण्यापूर्वीच तिच्या सासर–माहेरच्या मंडळीत धुमसणारा विद्वेष वाढीला लागला. प्रसन्नमयीला माझ्या घरातून निर्वासित करण्यात आले आणि मी आईवडिलांचा एकुलता एक मुलगा असल्यामुळे त्यांनी माझे दुसरे लग्न केले. ते न बोलता मला सहन करावे लागले.

या दुसऱ्या लग्नानंतर माझ्या अंतःकरणात पश्चात्तापाचा उदय झाला. त्यामुळे मी हळूहळू ब्राह्मसमाजाकडे ओढला जाऊ लागलो. ब्राह्मधर्म मला आवडू लागल्यावर मला कळून आले की, प्रसन्नमयीला विनाकारण शासन करण्यात आले आहे. माहेराहून तिला सासरी आणण्याची मला तळमळ लागली. आणि मग ती पुनः सासरी येऊन राहिली.

इकडे मी पावलापावलाने ब्राह्मसमाजाच्या दिशेने पुढे जाऊ लागलो. नंतर अनेक कसोट्या पार पडून मला ब्राह्मसमाज आपलासा करावा लागला. ती सगळी हकीगत येथे सांगण्याचे कारण नाही. इतकेच सांगितले म्हणजे पुरेसे आहे की, त्या सगळ्या कठीण परीक्षेत प्रसन्नमयीने माझा चांगलाच पाठपुरावा केला. ती गुप्तपणे मला प्रोत्साहन देऊन सबळ करू लागली.

शेवटी मला आप्तस्वजनांतून वेगळा होण्याचा तो दिवस उगवला. १८६९ साली मी उघडरीतीने ब्राह्मधर्माची दीक्षा घेऊन ब्राह्मसमाजात दाखल झालो. त्यावेळी प्रसन्नमयीला तिच्या मैत्रिणी, नातेवाईक या सगळ्यांनीच माझ्याकडे न जाण्याबद्दल आग्रहाने सांगितले. पण कोणाच्याही सांगण्याकडे तिने लक्ष दिले नाही. माझी अल्पवयी मुलगी हेमलता हिला घेऊन ती माझ्याकडे आली.

मी त्यावेळी विद्यार्थीदशेतच होतो. जी काही थोडीबहुत छात्रवृत्ती मिळे त्यातच मला माझा संसार चालवावा लागे. घरातून घालवून दिल्यामुळे किती पराकाष्ठेच्या गरिबीत मला राहावे लागले याची सर्वांना कल्पना करता येईल. पण प्रसन्नमयी मात्र अत्यंत आनंदाने आणि संतोषाने त्या दारिद्र्यात दिवस काढीत होती.

जेव्हा कॉलेजच्या शेवटच्या परीक्षेत पास झाल्यावर गुप्तपणाने मी प्रसन्नमयीला सांगितले की, धर्मप्रचारात आयुष्य घालवावे अशी माझी तीव्र इच्छा आहे तेव्हा तिने मला विरोध न करता म्हटले, 'तुम्हाला ज्यात आनंद व सुख वाटेल ते खुशाल करा.' मीही ईश्वराच्या प्रेरणेप्रमाणे चालायचे असे ठरवून हळू हळू धर्मप्रसाराच्या मार्गाला लागलो. प्रसन्नमयीने जर मला विरोध केला असता तर या मार्गाकडे सुखाने आणि सहजतेने मला वळता आले नसते. तिने मला केवळ अडविले नाही इतकेच नव्हे तर सर्वप्रकारची गरिबी आणि संकटे सहन करण्यासाठी तिने कंबर कसली.

हे असे चालले असतानाच एक दोन अनाथ आणि घरादारावेगळ्या झालेल्या मुलींचाहि सांभाळ करण्याची तिच्यावर जबाबदारी पडली. हळू हळू अशा मुलींची संख्या वाढू लागली. मी आणलेल्या मुलींना सांभाळून तिची हौस भागेना म्हणूनच की काय तीही स्वतः आणखी मुलींना आणून आश्रय देत असे. अशा तऱ्हेने निरनिराळ्या वेळी प्रसंगानुरोधाने आलेल्या अशा वीस बावीस मुलांमुलींना माझ्या घराचा आधार मिळाला. प्रसन्नमयी स्वतःच्या मुलांप्रमाणे त्यांचे पालनपोषण करीत असे. त्याबाबतीत ती कोणताच भेदभाव करीत नसे. त्यांचे हट्ट आणि व्रात्यपणाही सहन करीत असे. सैंपाक करून त्यांना जेवायला घालणे, आजारात शुश्रूषा करणे वगैरे सर्व प्रकारांनी ती त्या मुलामुलींना कोणत्याही प्रकारे आईची उणीव भासू देत नसे. फार काय सगळ्या गृहस्थांच्या घरासभोवार तसा तटच

असतो, परवानगीशिवाय कुणालाही आत येता येत नाही, शिवाय स्वतःच्या मंडळी-खेरीज इतरांना परका मानण्याची पद्धत; पण प्रसन्नमयीचा वात्सल्यगुण इतका प्रबल होता की, आमच्या घराच्या सभोवार तसा तटच नव्हता. ज्याला येऊन आपुलकीने राहायचे असेल त्याने खुशाल राहावे. कोणी आश्रय मागायला आला तर तो विमुख होऊन परत जात नसे. ही अतिशयोक्ती म्हणून मी सांगत नाही, तर सत्यस्थिती सांगत आहे.

आता तिच्या काही गुणांचे वर्णन करतो. तिचा मुख्य गुण म्हणजे परक्याला आपलेसे करायचे. या बाबतीत तिच्या तोडीची स्त्री तर नाहीच पण कोणी पुरुषही मला आढळलेला नाही. ज्या सगळ्या मुलींना एकेकाळी आमच्या घरात आश्रय मिळाला होता, त्या पुढे कुठेही राहोत, कुठेही जावोत पण आमचे घर त्यांना पितृगृहाप्रमाणे वाटत असे. हजारो कामांत असली तरी प्रसन्नमयी त्यांचा कुशल समाचार घेण्यास विसरत नसे. इतकेच काय पण त्यांना वेळप्रसंगी आर्थिक सहाय्यही करीत असे. आणि त्यांच्या बऱ्यावाईट प्रसंगी दक्षतेने त्यांच्याकडे लक्ष देत असे. शेवटी ती मृत्युशय्येवर असताही त्यांपैकी अनेकांची नावे घेऊन त्यांच्या भेटीची इच्छा ती व्यक्त करी. खरोखरच परक्याला अशा रीतीने आपलेसें करणारी स्त्री पाहण्यात येत नाही.

तिचा दुसरा गुण म्हणजे गृहकार्यदक्षता. ज्यांनी तिला पाहिले आहे त्या सगळ्यांना ठाऊक आहे की हिला आळस म्हणजे काय ते माहीतच नाही. अंगात शक्ती होती तोपर्यंत तिने सैंपाकीण ठेवू दिली नाही. स्वतःच्या हातांनी सैंपाक करून मुलांना खाऊ घालणे तिला फार आवडत असे. माझ्या मुलांनी तिला कधी झोपलेली पाहिली असेल की नाही याचा संशयच आहे, असे म्हटले तर ती अति-शयोक्ती आहे असे मला मुळीच वाटत नाही. कारण मुले झोपल्यावर ती झोपायला जाई आणि ती उठण्यापूर्वी उठून अर्धेअधिक घरकाम उरकून टाकी. साधनाश्रमात आल्यावर सकाळीच आठ वाजण्यापूर्वी सैंपाक वगैरे तयार करून ठेवून ठरलेल्या वेळी उपासनेला हजर असे.

तिसरा गुण कामकाजाची सुव्यवस्था. सगळ्या गोष्टी वेळच्या वेळी व्हाव्या असा तिचा कटाक्ष असे. सैंपाकघरात व सामानाच्या कोठीत नेहेमी एक घड्याळ ठेवलेले असे. घड्याळाच्या वेळेप्रमाणे सर्व कामे होत. माझी मित्रमंडळी, तिचे कोणत्या वेळी कोणते काम चाललेले असेल हे सहज सांगत असत.

चौथा गुण आनंदी वृत्ती. ती इतके परिश्रम करी, इतक्या गरिबीत दिवस काढी, संसाराचा एवढा गाडा चालवी पण तिच्या चेहेऱ्याकडे पाहिल्यास ती कधी दुःखीकष्टी दिसत नसे. नेहेमी प्रसन्न आणि प्रफुल्ल असे. केव्हा केव्हा गाणे गुण-गुणत असायची अगर गाण्याचा एखादा चरण म्हणत काम करायची. गाऊन-हसून हावभाव करून परिवारातील सर्वांना नेहेमी आनंदित ठेवायची. मित्र नेहमी

म्हणायचे या आनंदी कुटुंबातील मंडळींना दुःख कशाला म्हणतात हे माहीतच नाही.

तिच्या स्वाभाविक आनंदी वृत्तीची दोन उदाहरणे येथे देतो :– एकदा आम्हाला अत्यंत विपन्नावस्था प्राप्त झाली. त्याच वेळी प्रसन्नमयीचा आरसा फुटला. नवा आरसा विकत आणण्यासारखी त्यावेळी आमची परिस्थिती नव्हती. पैसा नव्हता. तेव्हा तिने पाण्याने भरलेल्या मोठ्या मडक्यात तोंड पाहून केस विंचरण्याला सुरवात केली. मला यातले काहीच तिने जाणवू दिले नाही. अशा स्थितीत एके दिवशी माझे मित्र दुर्गामोहन दास महाशयांची पत्नी ब्रह्ममयी सायंकाळी तिला भेटायला आली. पाहाते तो प्रसन्नमयी पाण्याने भरलेल्या मोठ्या मडक्याजवळ उभी. तिने विचारले, " हे काय हेमाच्या आई ! पाण्याने भरलेल्या मडक्याजवळ उभी का ? "

प्रसन्नमयीने हसून उत्तर दिले, " आरसा फुटला म्हणून पाण्यात तोंड बघून केस विंचरण्याला सुरवात केली. "

" अग बाई, मी तर असे कधी ऐकले नाही ! " ब्रह्ममयी म्हणाली.

त्यावर प्रसन्नमयी खळाळून हसत म्हणाली, " पाहिलेत, मी कसा एक नवीन शोध लावला ते. " नंतर दोघीही हसू लागल्या. तितक्यात मी तेथे आलो, त्यामुळे ही सगळी हकीगत मला समजली.

याबरोबरच मला हेही सांगणे अवश्य आहे की, माझ्या मित्राची पत्नी हसली खरी पण हा प्रकार तिच्या मनाला लागल्यावाचून राहिला नाही. तिला धक्काच बसला. तिने त्याच वेळी बाजारात जाऊन एक मोठा आरसा विकत आणून माझ्या पत्नीला देणगी म्हणून दिला.

आणखी एक घटना अशीच घडली. अशा या विपन्नावस्थेतच आम्हाला एकदा मोलकरीण ठेवणे शक्य झाले नाही. एके दिवशी प्रसन्नमयी एक मळके वस्त्र नेसून अंगण झाडीत होती. इतक्यात कुठच्याशा दुसऱ्या वाडीतील स्त्री आमच्या वाडीत फिरायला म्हणून आली. तिने प्रसन्नमयीला विचारले, " काय ग, तुला या घरात महिना पगार काय मिळतो ? " प्रसन्नमयीने उत्तर दिले, " अग हे काही मला मासिक वेतन देत नाहीत. पोटावारीच मी येथे काम करते." त्या स्त्रीला आश्चर्य वाटून ती विचार करीत आहे तोच माझ्या मुलांपैकी कुणी तरी ' आई ' अशी हाक मारून व धावत येऊन प्रसन्नमयीला मिठी मारली. तेव्हा मग ती विचारणारी स्त्री म्हणाली, " अगबाई, तू या घरची घरकारीण वाटते ! " त्यावेळी प्रसन्नमयी झाडू तेथेच टाकून मोठ्याने हसत हसत घरात गेली.

पाचवा गुण, मनाचे पावित्र्य. पवित्र अन्तःकरणाच्या बाबतीत प्रसन्नमयी ही स्त्रीवर्गात अग्रगण्य होती. अपवित्र कार्याच्या बाबतीत तिच्याइतकी घोर वितृष्णा

कुणाला वाटत नसावी. वाईटसाईट गोष्टी बोलणे, विशोभित वर्तन करणे अगर थट्टामस्करी करणे तिला सहन होत नसे. इतकेच नव्हे तर अपवित्र विचारही तिच्या मनात कधी येत नसत. इतकेच काय पण एखादे वाईट, तिटकारा येण्यासारखे स्वप्नही जरी तिला पडले तर हा आपल्या वागणुकीतील हीनपणा असावा असे वाटून तिचे मन क्षुब्ध होत असे. मी कितीही समजावले तरी तिची ती क्षुब्धता दूर करता येणे मला शक्य होत नसे.

सहावा गुण मनाचा सरळपणा. अकल्याणाची भावना तिच्या अन्तःकरणात कधीही निर्माण झाली नाही. जगातील कुटिलतेविषयी ती अनभिज्ञ होती. तिच्या मनाचा साधेपणा इतका पराकाष्ठेला गेला होता की वयाच्या पन्नास वर्षांपेक्षाही जास्त काळ तिने प्रपंच केला. पण तिच्या अन्तःकरणात लांछनाची रेषाही उमटली नाही.

तिचा सातवा गुण सांगायचा म्हणजे तिच्या शिक्षणासंबंधीचा. तिचे शिक्षण असे काहीच झाले नव्हते. पण ब्राह्मसमाजात येऊन तिने माझ्या कित्येक मित्रांच्या बाबतीत आपल्या अंतःकरणात अशा प्रकारची श्रद्धा स्थापन केली होती की त्यापासून तिला कोणीही विचलित करू शकत नसे. धर्मासंबंधाने तिचे मन इतके कुसंस्कारविहीन आणि सामाजिक विषयात इतके प्रगत होते की, ते पाहून अनेकांना आश्चर्य वाटे. अनेक सुशिक्षित व्यक्तींतही ते तसे दिसत नाही. उदाहरण म्हणून एका विषयाचा येथे उल्लेख करतो. आम्ही ब्राह्मसमाजात सामील झाल्यावरही माझे आईवडील नेहेमीच अशी इच्छा व्यक्त करीत की, माझ्या मुलांचे ब्राह्मण मुलांमुलींशीच विवाह व्हावे. प्रसन्नमयी म्हणे, 'ते कसे सांगता येईल ? मुलगेमुली यांचे जेथे प्रेमाचे संबंध जुळतील तेथेच त्यांनी विवाह करावे. ब्राह्म झालो खरे, मग आता जातीपातीचा प्रश्न उरलाच कुठे ? ' पुढे मुलांच्या विवाहाचे वेळीही तिने तसेच केले.

उपासनेवर तिची प्रगाढ श्रद्धा होती. आजाराने ती अत्यंत अशक्त झाल्यावरही प्रत्येक दिवशी ईश्वरोपासना करण्याला ती चुकत नसे. इतकेच काय पण ज्या आजाराने तिचा प्राण गेला त्यांतही जोपर्यंत तिला शक्ती होती तोपर्यंत अतिशय कष्टाने का होईना ती उठून बसे आणि गायन व उपासना करण्याचा प्रयत्न करी. त्यावेळी बहुतेक रोज साधनाश्रमातील उपासनेच्या वेळी ती मला म्हणत असे, "मला नेऊन आश्रमाच्या पडवीत निजवा." मी शिलचर येथे असताना 'प्रसन्नमयीचा आजार विकोपाला गेला आहे' अशी मला तार आली. तार मिळताच मी कलकत्त्याला आलो आणि येताच तिला हाक मारून म्हणालो, "पाहा, मी आलो आहे." तेव्हा ती म्हणाली, "माझ्या मस्तकाजवळ बसून उपासना करा." मृत्यूपूर्वी ती मुलींना म्हणाली होती, "माझे प्रेत घाटावर नेण्यापूर्वी एकदा आश्रमाच्या उपासनामंदिरातील पडवीत ठेवा." त्याप्रमाणे तिचा मृत देह आश्रमाच्या पडवीत ठेवून प्रार्थना करण्यात आली होती.

तिच्या साध्याभोळ्या पवित्र हृदयात परस्परविरोधी भावनांचा आश्चर्यकारक समावेश झालेला असल्याचे मला दिसून आले. दुराचरणाचा तिला इतका तिटकारा होता की अशी ज्वलज्जहाल घृणा सहसा कुठे आढळत नाही. इतके सांगितले म्हणजे पुरे आहे की, स्वतःच्या कोणा एका निकटच्या आप्ताकडून काही निंद्य प्रकार झाल्याचे ऐकून ती इतकी क्रुद्ध झाली होती की, तो भेटायला आला तेव्हा तिने त्याची भेट घेतली नाही. आणि पुनः त्याने आपल्या दारात पाऊल ठेवू नये अशी त्याला ताकीदही दिली.

ब्राह्ममंडळीपैकी कोणी कर्जफेड करीत नाहीत, फसवणूक करतात, खोटी कारणे सांगतात वा आणखी एखाद्या करू नये त्या पापात गुंतले आहेत असे तिने ऐकले तर घृणेने ती अत्यंत अस्वस्थ होई आणि म्हणे, " ब्राह्मसमाजात काय माणसे नाहीत? या दुश्चरित्र माणसांचे कान पकडून त्यांना हाकलून का देत नाही? " आणि इतके असूनही जर तिची खात्री झाली की, कोणी एकादी स्त्री केवळ दुबळेपणामुळे पापात पडली आहे अथवा तिला फुसलावून कोणी तरी आडवाटेला नेले आहे, आणि त्याबद्दल तिला पश्चात्ताप होत आहे तर तिला ती आपल्या बहिणीप्रमाणे मानून मिठी मारी. वेळोवेळी तिला ती पुष्कळ मदत करी. तिच्या श्रद्धेला व प्रीतीला ती केव्हाच वंचित होत नसे. विशेष सांगायचे म्हणजे पश्चात्ताप झालेल्या व्यक्तींबद्दलचा तिचा असा सद्भाव पाहून केव्हा केव्हा आम्ही थक्क होऊन जात असू.

समाजाच्या कामकाजाच्या बाबतीत ब्राह्म मित्रमंडळीशी वेळोवेळी माझा मतभेद होत असे. साधारणतः मी बाहेरच्या गोष्टी घरात नेत नसे. पण प्रसन्नमयीने कोणाच्या तरी तोंडून ऐकले की, मला कोणी तरी कठोर शब्द बोलला आहे तर त्या बोलणाऱ्यावर ती मुळीच रागावत नसे. उलट मला म्हणे, " समाज जसा तुमचा आहे तसाच त्यांचाही आहे. दहा गोष्टी बोलल्या तर दहा गोष्टी ऐकूनही घ्याव्या लागतात. " फार काय सांगावे, नवविधानच्या मित्रांशी मी किती विरोध केला आहे आणि त्या बाबतीत मला त्यांचे कडवे बोल किती ऐकून घ्यावे लागले आहेत, ते सर्वांनाच ठाऊक आहे. प्रसन्नमयीला जर या सर्व कडव्या बोलांचे गाऱ्हाणे कुणी सांगितले तर ती नुसती हसत असे. मला लागतील असे शब्द बोललेल्या या नवविधान मित्रांसहित ती एकेकाळी एकत्र राहिली होती. त्यांना ती आपली माणसे मानीत असे आणि वडील भ्रात्याप्रमाणे त्यांच्यावर श्रद्धाही ठेवीत असे. त्यांचे कोणाचे नाव ऐकताच त्याबद्दल ती खूप श्रद्धा व्यक्त करी. भेट झाली तर तिला आनंद वाटे. असे ऐकले आहे की श्रद्धेय बंधू गोविंदराय आणि कान्तिचंद्र मित्र महाशय असे दोघेही तिला रुग्णशय्येवर भेटून बाहेर जाताना काही जणांजवळ बोलले होते, " ही तर आमच्या आप्तांपैकी आहे! " खरे सांगायचे म्हणजे प्रसन्नमयी कुठेही राहिली तरी आपुलकी आणि श्रद्धा यामुळे तिचा कोणालाच

केव्हाही विसर पडत नसे. तरीपण नवविधानाची नवी मते व कामकाज यांची तिला चांगली माहिती नव्हती. आणि त्या बाबतीत तिला समजण्यासारखेही काही नव्हते.

मला विरोध करणाऱ्यांच्या बाबतीत एका बाजूला तिची उदारतेची वागणूक ही अशी; तर दुसऱ्या बाजूला पाहायचे झाल्यास अगदी वेगळी. जर कधी तिच्या कानावर आले की कोणी एखादा मनुष्य माझी व्यक्तिगत निंदा करत आहे किंवा लोकदृष्टीने मला हीन ठरविण्याचा प्रयत्न करत आहे तर त्याचे नावही घेतलेले तिला सहन होत नसे. ती म्हणे, " त्या भित्र्या अपरोक्ष-निंदकाचे नाव माझ्यासमोर उच्चारूही नका. " आणि मग असे बोलून ती रागाच्या भरात तिथून निघून जाई.

या सगळ्या गुणांनी प्रसन्नमयींने सर्वांची आपुलकी आणि श्रद्धा संपादन केली होती. तिच्या मृत्यूने माझी मुलेच केवळ आईवेगळी झाली असे नाही तर तिच्यासाठी अनेकांनी अश्रू ढाळले.

मी अनेक वर्षांपूर्वी ईश्वरचरणी असे निवेदन केले होते :

" आमि बड दुःखी ताते दुःख नाइ,
परे सुखी करे सुखी हते चाई ।
निजे तो काँदिव, किन्तु मुछाईब—
अपरेर आँखि—एइ भिक्षा चाइ
सत्य ! धन मान, चाहे ना हे प्राण
यदि काजे असि, तबे बेचे जाइ ।
बहु कष्टे पूर्ण आमार अंन्तर
एइ आशिर्वाद कर, हे ईश्वर—
खाटिते बाँचीव; खाटिया मरीब,
एइ बड आशा; पूर्ण कर ताइ । "

अर्थ– मी फार दुःखी आहे, त्याचें ( मला ) दुःख वाटत नाही. दुसऱ्याला सुखी करून मी सुखी होऊ इच्छितो. स्वतः मी रडेन पण दुसऱ्यांचे अश्रू पुशीन, एवढीच भिक्षा मागतो. हा प्राण ( मी स्वतः ) धन मानाची इच्छा करीत नाही हे सत्य, जर मी ( तुझ्या ) कोणत्याही कामाला योग्य ठरलो तरच मी जगलो असे होईल. हे माझे अन्तःकरण अनेक दुःखाकष्टांनी भरलेले आहे. हे ईश्वरा, श्रम करण्यासाठी मी जगेन आणि श्रम करीतच मरेन; एवढाच मला आशीर्वाद दे. ही माझी मोठी इच्छा आहे म्हणून तू ती पूर्ण कर.

त्यावेळी मी जे चित्र आदर्श म्हणून समोर ठेविले होते ते प्रसन्नमयीने आपल्या जीवनात परिपूर्ण करून दाखविले आणि ती गेली. संसारातील नाना-प्रकारच्या दुःखात आणि अशांततेत दुसऱ्याला सुखी करून ती सुखी झाली आहे. स्वतः रडून तिने दुसऱ्याचे अश्रू पुसले आहेत. निरलसपणे, श्रमसातत्याने आणि कर्तव्यपरायण होऊन आपले जीवन संपविले आहे. खरोखरच ती श्रम करण्या-साठी जगली आणि श्रम करीतच ती मरण पावली

* * *

.२.

# परिशिष्ट

## चरित्रगत विदेशी व्यक्तींचा परिचय

**१ आर्थर हेल्पस : ( सर )**

जन्म १८१३-विख्यात प्रबंधकार आणि इतिहासकार. लिहिलेले ग्रंथ : ' थॉटस इन् दि क्लाइस्टर अँड दि क्राउड ' ( १८३५ ) फ्रेंडस इन् कौन्सिल ( १८४७–५९ ) टॉक्स् अबाउट ॲनिमल्स् अँड देअर मास्टर्स ' ( १८७३ ) ' कॉकरर्स ऑफ् दि न्यू वर्ल्ड अँड देअर बाँडस्मेन ' ( १८४८–५२ ) वगैरे. विविध सामाजिक प्रश्न आणि गुलामगिरी यावर यांनी विख्यात प्रबंधावली लिहिली.

**२ आर्नोल्ड टायन्बी :**

जन्म १८५२. विख्यात समाजसुधारक. बॅलियल कॉलेजात असताना यांनी विद्यार्थीदशेतच मजूरवर्गाच्या आर्थिक आणि नैतिक उन्नतीसाठी चळवळ आरंभिली. मृत्यूनंतर दोन वर्षांनी १८८५ साली त्याची स्मृती राहावी म्हणून व्हाइट चॅपेलमध्ये ' टॉयन्बी हॉल ' बांधण्यात आला.

**३ इ. बी. काऊएल :**

जन्म १८२६. १८५६ साली कलकत्त्यात प्रेसिडेन्सी कॉलेजात इतिहासाचे प्राध्यापक आणि थोड्याच दिवसांनी संस्कृत कॉलेजचे अध्यक्ष म्हणून नेमणूक. १८६७ साली केंब्रिज विश्वविद्यालयात यांनी संस्कृत अध्यापकाची जागा स्वीकारली.

**४ वुइल्यम स्टेड :**

जन्म ५ जुलै १८४९. १८८३ पासून १८८९ सालापर्यंत ' पेलमेल '

पत्रिकेचे संपादक होते. 'मेडन ट्रिब्यूट' निबंध लिहिल्याबद्दल यांना तीन महिन्यांचा बंदिवास भोगावा लागला होता. 'रिव्ह्यू ऑफ् रिव्ह्यूज' पत्र यांनी सुरू केले. यांनी शांती, अध्यात्मवाद आणि रशियाशी मैत्रीचे संबंध जोडण्यासाठी पुष्कळच खटपट केली. बोअर युद्धाच्या वेळी बोअर लोकांशी यांचे सहानुभूतीचे संबंध होते. १५ एप्रिल १९१२ साली 'टिटॅनिक बोट' बुडाली. त्यात हे बुडून मृत्यू पावले.

**५ एड्विन आर्नोल्ड :** ( सर )

जन्म १० जून १८३९. कवी आणि शिक्षणतज्ज्ञ. १८५२ साली 'वेल्शाजर्स फीस्ट' नावाचे काव्य लिहून यांनी न्यूडिगेट बक्षिस मिळविले. पुण्याच्या सरकारी संस्कृत कॉलेजचे हे अध्यक्ष होते. १८६९ साली इंग्लंडात परत जाऊन 'डेलि टेलिग्राफ' पत्राच्या संपादक मंडळात हे सामील झाले. यांचे काव्य-ग्रंथ : 'पोएम्स' ( १८५३ ), 'दि इंडियन साँग ऑफ् साँगस' ( १८७५ ) 'दि लाइट ऑफ एशिया' ( १८७९ ) 'इंडियन पोएट्री' ( १८८३ ) 'दि साँग सेलेस्टियल ( १८८५ ) वगैरे.

**६ कार्पेन्टर** ( जोसेफ ॲस्टेलिन कार्पेंटर ) :

जन्म १८४४. प्रख्यात समाजसेविका मेरी कार्पेंटर हिच्या भावाचा मुलगा. धर्मतत्त्वज्ञ. १९०६ ते १९१५ पर्यंत मँचेस्टर कॉलेजचे अध्यापक आणि नंतर अध्यक्ष.

**७ चार्लस व्हॉयसी :** ( रेव्हरेंड )

जन्म १८२८. व्हाईट चॅपेलचे क्युरेटर होते. धर्मविषयक व्याख्यानामुळे १८८३ साली यांना तुरुंगवास भोगावा लागला. नंतर यांनी लंडनमध्ये अद्वैतवादी थिइस्टिक चर्च स्थापन केले. मृत्यू १९१२.

**८ जॉर्ज मुल्लर :**

जन्म १८०५. विख्यात 'नॉन् कन्फर्मिस्ट' धर्मोपदेशक. १८३५ साली ब्रिस्टलच्या एश्लिडाउन येथे यांनी एक अनाथाश्रम स्थापन केला. मृत्यू १८९८.

**९ जॉन हेन्री न्यूमन** ( कार्डिनल ) :

जन्म २१ फेब्रुवारी १८०१. इटलीत प्रवास करीत असता त्यांनी 'लीड काइंडली लाइट' नावाच्या प्रख्यात कवितेची रचना केली. ट्रॅक्टेरियन चळ-वळीचे हे एक मुख्य नेते होते. या चळवळीनिमित्त लिहिलेल्या धार्मिक पुस्तका-मुळे यांनी फार मोठी कीर्ती मिळविली. काही दिवसांनी ही चळवळ समाप्त

झाली आणि १८४५ साली यांनी स्वतःच पोपचे अनुयायी बनून रोमन कॅथॉलिक धर्माचा स्वीकार केला. १८७९ साली कार्डिनल म्हणून यांची नेमणूक झाली. मृत्यू १८९०.

**१० वुइल्यम जोन्स : ( सर )**

विख्यात प्राच्यभाषा पंडित. जन्म १७४६. १७८३ साली बंगालच्या सुप्रीम कोर्टाचे जज्ज म्हणून यांची नेमणूक झाली. १७८७ साली यांनीच प्रथम, संस्कृत भाषेशी लॅटिन आणि ग्रीक भाषेचे साम्य असल्याचे दाखवून देऊन विद्वान् मंडळींचे लक्ष वेधले. कलकत्त्याच्या रॉयल सोसायटीची स्थापना यांनी केली व पहिले अध्यक्ष झाले. यांनी लिहिलेले ग्रंथ : शाकुन्तल आणि हितोपदेश यांचे संपूर्ण इंग्रजीत अनुवाद व वेद आणि मनुस्मृती यांचा काही भाग अनुवादित केला. २७ एप्रिल १७९४ साली कलकत्यातच हे मरण पावले.

**११ जेम्स मार्टिनो :**

हॅरिएट मार्टिनो या लेखिकेचे हे बंधू. जन्म १८०५ नॉर्विच येथे. हे डब्लिन आणि लिव्हरपूलच्या युनिटेरियन संप्रदायाचे धर्मोपदेशक होते. मँचेस्टर न्यूकॉलेजचे अध्यापक व नंतर अध्यक्ष झाले. विख्यात तत्त्वजिज्ञासू लेखक म्हणून हे प्रसिद्ध. यांचे ग्रंथ : ' दि रॅशनल ऑफ् रिलिजस हिस्ट्री ' ( १८३६ ) ' हिम्स फॉर दि खिश्चन चर्च अँड होम, ( १८४० ) ' टाइप्स ऑफ् एथिकल थिअरी ' ( १८८५ ) ' ए स्टडी ऑफ् स्पिनोजा ' ( १८८२ ) वगैरे.

**१२ डॉ. बर्नार्डो :**

जन्म १८४५. आयर्लंड. अनाथ मुलांसाठी १८६६ साली ' बर्नार्डो होम्स 'ची यांनी स्थापना केली.

**१३ डॉक्टर लेगी :**

जन्म १८१५. मलाका येथे अँग्लो-चायनीज् कॉलेजचे अध्यक्ष होते. १८७६ साली ऑक्सफर्ड येथे चिनी भाषेचे अध्यापक म्हणून यांची नेमणूक झाली. यांनी मूळ, अनुवाद आणि टीकेसह ' चायनीज क्लासिकल ' ( १८६१–८६ ) नावाचा विख्यात ग्रंथ संपादिला.

**१४ डेव्हिड हेयर**

जन्म ( १७७५ ) स्कॉटलंड येथे. घड्याळांचा व्यवसायी म्हणून भारतात आले. पण बंगालमध्ये इंग्रजी शिक्षणाच्या प्रचाराला मदत केल्यामुळे यांची ख्याती झाली. स्मरणीय ठरले. राजा राममोहन राय आणि कित्येक प्रतिष्ठित इंग्रज यांच्यासह

यांनी हिंदू कॉलेजची स्थापना आणि शालेय क्रमिक पुस्तकांसाठी 'स्कूलबुक सोसायटी' स्थापन केली. यांच्या प्रोत्साहनाने कलकत्त्यात निरनिराळ्या ठिकाणी आणखीही काही इंग्रजी आणि बंगाली विद्यालये प्रतिष्ठित झाली. प्रख्यात 'हेयर स्कूल' हे याच हितेच्छू इंग्रज गृहस्थाची स्मृती म्हणून आज विद्यमान आहे. मृत्यू १८४२.

**१५ थिओडोर पार्कर :**

जन्म १८१०. अमेरिकेतील प्रख्यात धर्मप्रचारक. युनिटेरियन मताचे अनुयायी असूनही ते युक्तिवादी म्हणजे योग्यायोग्य पाहणारे होते. अमेरिकेतील गुलामगिरीची प्रथा बंद करण्यासाठी ज्या ज्या चळवळी झाल्या त्यांच्या मुख्य नेत्यांपैकी हे एक होते. यांची ग्रंथरचना : 'ए डिस्कोर्स ऑफ मॅटर्स पर्टेनिंग टु रिलिजन' ( १८४१ ), 'सर्मनूस् ऑफ् दि टाइम्स' वगैरे. आत्यंतिक परिश्रमामुळे आरोग्य बिघडून १८८८ साली या विद्वान् गृहस्थाला मृत्यू आला.

**१६ फ्रान्सिस न्यूमन :**

कार्डिनल न्यूमनचे बंधू. जन्म १८०५. मँचेस्टर न्यू कॉलेज आणि नंतर लंडन युनिव्हर्सिटी कॉलेज यात अध्यापक. कार्डिनल न्यूमनच्या विरुद्ध धर्ममताला यांचा पाठिंबा असे. इतिहासात ज्या सगळ्या भिन्न भिन्न धर्ममतांचा उल्लेख आहे त्या सर्वांचे मुख्य वैशिष्ट्य ज्यात असेल अशा समन्वयात्मक धार्मिक मताचे प्रयोजन आहे असा यांचा विश्वास होता. १८५३ साली त्यांचा 'फेजिस् ऑफ् फेथ' हा विख्यात ग्रंथ प्रसिद्ध झाला.

**१७ बूथ :**

जन्म १८२९. सॅल्व्हेशन आर्मीचे संस्थापक आणि त्या संस्थेचे पहिले जनरल. त्यांचा मुलगा वुईल्यम ब्रॅमवेल बूथ १९१२ ते १९२८ पर्यंत सॅल्व्हेशन आर्मीचा जनरल होता.

**१८ ब्रॅडलॉ :**

जन्म २८ सप्टेंबर १८३३ रोजी. समाजवाद विरोधक समाजसुधारक. पार्लमेंटमध्ये सभासद म्हणून निवडून आल्यावर शपथ घेण्याला नाकबूल झाल्यामुळे दोनदा त्याची निवड व्यर्थ गेली. शेवटी तिसऱ्या वेळी निवडून आल्यावर त्याने शपथ घेण्याचे मान्य केले. ॲनि बेझंटबरोबर सहकार्य करून 'दि फ्रूटस् ऑफ फिलासॉफी' नावाची पुस्तिका प्रकाशित केल्यामुळे यांना सहा महिन्यांची कारावासाची शिक्षा आणि २०० पौंड दंड झाला. 'जगातील वाढत्या जननसंख्येचे

नियंत्रण ' या विषयावरही यांच्या हातून पुस्तिका लिहिली गेली होती. हे ३० जानेवारी १८९१ रोजी मृत्यू पावले.

**१९ मोनियर वुइल्यम्स् (सर) :**

यांचा जन्म १२ नोव्हेंबर १८१९ त मुंबई येथे झाला. हायलीवेरी आणि नंतर ऑक्सफोर्ड येथे हे संस्कृतचे अध्यापक होते. मुख्यतः यांच्याच प्रयत्नांनी ' इंडियन इन्स्टिटयूट ' ची स्थापना झाली. संस्कृत भाषेचे व्याकरण आणि कोश यांनीच लिहिला. यांनी केलेले ग्रंथ : ' रूडिमेंटस् ऑफ् हिंदुस्थानी ' (१८५८) ' इंडियन एपिक् पोएट्री ' (१८६३) ' इंडियन विजडम ' (१८७५) ' हिंदुइझम् ' (१८७७) ' मॉडर्न इंडिया ' (१८७८) ' रिलिजस थॉटस् अँड लाइफ् इन इंडिया ' (१८८३) ' बुद्धिझम् ' (१८९०) ' शाकुंतल आणि काही संस्कृत काव्ये ' यांचे संपादन.

**२० मॅडम ब्लॅव्हॅटस्की :**

रशियात १८३१ साली जन्म. आधुनिक थिऑसॉफी अर्थात् ब्रह्मविद्या मतवाद प्रवर्तक.

**२१ मिसेस कॉसिट :**

सर थिओडर मार्टिन यांची पत्नी. ११ ऑक्टोबर १८२७ रोजी जन्म. शेक्सपियरच्या नाटकात नायिकांच्या भूमिका करून हिने अभिनय नैपुण्याबद्दल खूप ख्याती मिळविली होती. १८५१ साली विवाह झाल्यावर रंगभूमीशी असलेला हिचा संबंध सुटला. १८८५ साली ' ऑन् सम् ऑफ् शेक्सपीयर्स फिमेल कॅरेक्टर्स ' नावाचा ग्रंथ हिने लिहिला. ३१ ऑक्टोबर १८९८ रोजी ही मरण पावली.

**२२ मिस् कॉब (फ्रान्सिस पॉवर कॉब) :**

१८२२ साली डब्लिनजवळील न्यूब्रिज गावी हिचा जन्म झाला. आई आणि नंतर वडील अशी एकामागून एक मरण पावल्यामुळे हिच्या अन्तःकरणात गाढ धर्मजिज्ञासेचा उदय झाला. ही स्त्रीस्वातंत्र्य चळवळीतील मुख्य नेत्यांपैकी एक होती. ग्रंथरचना :– ' फ्रेंडलेस गर्लस् ' (१८६१) ' क्रिमिनल्स् ', ' इडियटस् ' ' विमेन अँड मायनर्स ' (१८६९) ' डार्विनिझम इन् मॉरल्स् ' (१८७२) ' धि होपस् ऑफ् दि ह्यूमन रेस् हियर आफट्र अँड हियर ' (१८७४) वगैरे.

**२३ मिसेस बटलर :**

हॅरो विद्यालयातील मुख्य शिक्षक जॉर्ज बटलर यांची पत्नी. जन्म १८२८. स्त्रीस्वातंत्र्याच्या चळवळीतील नेत्री आणि समाजसुधारक म्हणून प्रसिद्ध.

२४ स्टॉपफोर्ड ब्रुक ( रेव्हरंड ) :

जन्म १८३२. हे डब्लिन ट्रिनिटी कॉलेजचे प्रसिद्ध विद्यार्थी होते. धर्मोपदेशक या नात्याने यांनी दिलेली व्याख्याने विचार व भाषा यांच्या ऐश्वर्याने युक्त अशी असत. ग्रंथरचना : 'थिऑलॉजी इन् दि इंग्लिश पोएटस्' ( १८७४ ) 'प्रायमर ऑफ् इंग्लिश लिटरेचर' ( १८७६ ) 'मिल्टन' ( १८७९ ) 'टेनिसन' ( १८९४ ) 'सरमनस्' ( १८६८ ते ९४ ) पोएट्री ऑफ् ब्रॉउनिंग ( १९०२ ) इत्यादि. मृत्यू १९१६.

* * *

# वर्णानुक्रमिक नामसूची


अघोरकामिनी १६१, २२२
अघोरनाथ गुप्त ८६, १९८
अन्नदाचरण खास्तगीर १०८, १४९, १६४
अन्नदायिनी सरकार २२७
'अन्यपूर्वा' ७
अभयाचरण चक्रवर्ती (मामा) १८
अभयाचरण चक्रवर्ती (श्वशुर) ८३
अभयाचरणदास १२६
अमृतलाल बसू २५४
अमृतबझार पत्रिका १७७
अमृतसर २२७, २३०
अयोध्यानाथ पाकडाशी ६९, १३५
ऑल्काट (कर्नल) २३२, २३३
ॲक्रॉईड १६४
अलेक्झांड्रा (पॅलेस) ३०१,
अवन्तीदेवी ३५४
अलिपूर जेल ७१
अबला-बांधव पत्रिका २८, १३६, १३७, १४०
अपर मिडल क्लास ३०२
अलाहाबाद २२१, २२३, २२४
ऑक्सफर्ड ३०३, ३९५
अहमदाबाद २३०, २३४
आल्बर्ट हॉल १९५
आग्रा २२१, २२४
आंध्र कॉन्फरन्स ३५६
अडवानी (नवलराय शौकिराम) २२८
आनंदचंद्र मित्र १८९, १९९
आनंदचंद्रराय २३९, २४०
आनंदमयी (मोठी आत्या) ६
आनंदमोहन बसू १०७, १२३, १७७, १९१–९२, १९५, २०६, २०७, २३८, ३५०
आनंदवादी दल १३०
आमदपूर ६७, ४५
आर्नोल्ड (एडविन) ३१३, ३९१, ३९२
आर्यसमाज २४१
आश्रमाचा इतिहास ३५०
इंडियन आयडिअल्स ३१३
आसाम २७२
इंडियन असोसिएशन १९१, १४०, १४१
'इंडियन मेसेंजर' पत्रिका २६४, ३३७
इंडियन रॅडिकल लीग १०३
इंडिया लायब्ररी ३३३
इंदुप्रकाश पत्रिका २३०
इंदूर ३३८, ३३९
इंद्रनाथ बंद्योपाध्याय १७८
इंपी (कॅथेरिन) ३१८, ३१९
इंग्लंड ३१७, ३२७, ३३९, ३४२, ३५१
ईशानचंद्रराय ९४, ९५, ९७, ९८,
ईश्वरचंद्र गुप्त ५१, ८०

ईश्वरचंद्र घोषाल १३५
ईश्वरचंद्र विद्यासागर १७, ४५, ५९, १७७
उड्रोसाहेब ७६, ७७, ७८, ७९, १७३
उन्मादिनी २१, ३३, ४४, ५२, ५३, १२४
उपासक मंडळी १८७
उपेंद्रनाथ दास ९४, १०३
उपेंद्रनाथ बसू २११
उमानाथ गुप्त १९८, २३४
उमेशचंद्र दत्त २५, ६९, ७१, ८४, १६३, १७३, १७८
उमेशचंद्र मुखोपाध्याय ८०, ८५, १०३, १३७
एक्रॉइड ( कुमारी ) १६४
' एज्युकेशन गॅझेट ' पत्रिका ७९, ८०
एस. एन्. डॉट्‌ ७९
कटक ३५५
कन्फ्यूशियस ३३४
कमलकुटीर १८८
कमलाम्मा २५३, २५४
कराची २२८
कलाईघाट १२२
कलकत्ता ३३७, ३३९, ३४७, ३४८
कलकत्ता कॉलेज ८५, ३९
कलकत्ता ट्रेनिंग ॲकॅडेमी १६६
कॉंग्फ्यूच, कॉन्फ्यूशस, ३३५
कांकुडगाछी १५२
कॉब ( मिस ) ३०६, ३९५
कानपूर ३५६
कॉलेट ( मिस् ) २८२, २८७, ३१४, ३३२, ३३३
कानाईबाबू ( ट्रेनिंग इन्स्टिटयूटचे हेडमास्तर ) २१७
कांतिचंद्र मित्र १४३, १४८, ३८८
कामिनी सेन २६४
कार्पेंटर ( अध्यापक जॉन ॲस्टेलीन ) ३११, ३९२
कालिकत ३४४–४५
कालीनाथदत्त ६९, ७०, ७१, १२७, १७८
कालीनाथ बसू १९८
कालीनारायण गुप्त ३३६
कालीप्रसन्न चक्रवर्ती १२८
काशी १०३
काशीचंद्र घोषाल ३५०
काशीश्वर मित्र १३४
किंडरगार्डन ३०२, ३३९, ३४२
कुचबिहार विवाह १८८, १९५, २०९
कुंजलाल घोष ३५४
कुडोराम चौधुरी ६५
कुंटे २३०
कुलसंबंध ६, ९३, ६०
कुली कायदा ( मजुरांचा कायदा ) २७२
कुसुम ( धाकटी बहीण ) ३७०, ३७२
कृष्णचरण ( न्हावी ) ५९
कृष्णदास पाल २४६
कृष्णबिहारी सेन १२३, २१७
केदारनाथ राय १६४, १७७, १९९
केंब्रीज ३०३, ३०४
केळकर ( सदाशिव पांडुरंग ) ३३९
केलनार कंपनी १७३–७५, १७६, १८८–८९, १९५–९६–९७, २३४, २३५, ३३७, ३४७

केशवचंद्र सेन ६८, ८५, १०६, १०८, १२०, १३१, १३८, १३९, १४०, १४१, १४८-४९, १५१, १६१, १६४, १६५, १६६, १६८, १७३, १७५, १७६, १८८, १८९, १९५–९६–९७, २३४–३५, २६८–६९
केशवचंद्रसेनची पत्नी १४४
कैलासचंद्र चक्रवर्ती ४०, १५९
केशवदल १३३
कोइमतुर २५१, २५२, ३४४, ३४५
कोकोनाडा २४७, २४८, २४९, २५०, ३४५–४६, ३४७–४८
कोन्नगर १७६
कोलंबो ३३६
कौएल ४९, ३०४, ३०५, ३९१
कौमुदीपत्रिका २०५
कॅथेरिन इंपी ३१९
क्रिस्टल पॅलेस २८९
क्षेत्रनाथ शेठ १३५
खांडवा ३३८, ३४२
खार्सियांग २४०, २६९, २७०
खोदाई (नोकर) १८३, १८५–८६
ख्रिश्चन तरुणी १८१
गंगाधर हाती ५०
गंगार बादा १
गणेशचंद्र घोष २०९, २१०
गणेश सुंदरी १२८, १२९, १३०
गॉर्डन (सेनापती) २८९
गाजीपूर २३५
गुडिव्ह चक्रवर्ती ४८
गुरुचरण महलानवीश १०५, २११, २१४, २३८, २४३, २६३, ३४२, ३४८
गुरुदास चक्रवर्ती ३५०
गोपालस्वामी अय्यर २५३,
गोयालपाडा २७२
गोलकमणीदेवी (माता) ९, १४, १५, १६, १७, १८, १९, २०, २१, ३४, ४३
गोवर्धन शिरोमणी ३६८
गोविंदचंद्र घोष २०३
गौर गोविंदराय १४१, १९६, ३८८
गोहत्ती २७२
संघटित दल (घननिविष्ट दल) १८८
चंद्रनगर ३५४
चंदावरकर (नारायण गणेश) २३०, २३१
चंद्रकेतु दत्त २
चांगडीपोता (गाव) ८, १४, ४०, ५२, ६३, ९६, १५७
चालस (डॉक्टर) १४१
चांदमोहन मैत्र ५१
चिंतादासी २२, २३, ४४
चैतन्यचरितामृत २
चौदावा कायदा (चौद्दआईन) १८०
जगच्चंद्र बंद्योपाध्याय ८८
जॉन ब्राईटची कन्या व जावई ३२१
जयनगर १
जयनारायण तर्कपंचानन ३०५
जॉर्ज मूलर २९३, २९९, ३३७
जालासी (गाव) ७२
जेम्स मार्टिनो ३०५,
जोन्स (सर वुइल्यम) ३९३
टॉयनबी (आर्नोल्ड) २९६, ३९१
टॉयनबी हॉल २९६, ३९१
टी. के. घोष अॅकॅडेमी बांकीपूर २२३
टिपू सुलतान ३४४

टी. माधवराव ( सर ) २३०
टुंडला २२४
टॉलमूड ३३४
टूबनर कंपनी ३३२, ३३३
ठाकुरदासी २७६
डिकन्स ३५८
डिब्रूगड २७२
डुमराओ २२२
डेव्हिड हेयर ७, ४५, ३९३
डॅल ( सी. एच. ए. ) १४१, २३९
डलहौसी इन्स्टिटयूट ३३७
'तत्त्वकौमुदी' पत्रिका २०५, २११, २२१, २७९
'तत्त्वबोधिनी' पत्रिका २४, ६९
तरंगिणी ( द्वितीय कन्या ) १२८, १४७, २७८
तीन नंबरचा कायदा १४१
तिनकडी घोष २२३
'तुली' १२८
तेजपूर २७२
तेलंग ( के. टी. ) २३०
त्रिचनापल्ली ३४५
त्रैलोक्यनाथ सान्याल १३१
थाकमणी १७९, १८१
थिओडोर पार्कर ११९
थिऑसॉफिकल सोसायटी २३२
दक्षिणेश्वर १६८-६९
दयानंद सरस्वती २२६, २४१
दयाळसिंग ( सरदार ) २२६, २२७
दाक्षिणात्य वैदिक ब्राह्मण २, ३, ९२
दार्जिलिंग २३९, २४०, २६९, २७०, २७१
दुर्गामोहनदास १३७, १४९, १६४, १६९, १७०-७२, १९०, १९२, १९४, १९६-९७, २३८, २७९, ३१२, ३३१, ३८६
दुलची ( मांजर ) ३७२
देपूर ८३
देवी प्रसन्नराय चौधुरी १९५, १९७
देवेंद्रनाथ ठाकूर ६८, ११९, १४९, १५१, १६१, १७६, १७८-७९, ३५१
द्वारकानाथ गंगोपाध्याय २८, १३७, १४९, १६४, १६६, १९५, १९७, २०५, २३५, २७२
द्वारकानाथ ठाकूर ३३१
द्वारकानाथ बागची २१०
द्वारकानाथ विद्याभूषण ७, १०, ४५, ६०, ११९, १२३, १५५, १७३, १९२
द्विजेंद्रनाथ ठाकूर १३५, २१२, २१३
'धर्मजीवन' ३५३
'धर्मतत्त्व' पत्रिका १२२, १४३
धुबडी २७२
नवगाव २७२
नगेंद्रनाथ चट्टोपाध्याय १४८, १४९, १५२, १५३, १५५, १६६, १७३, १७८
नंदलाल राय १२८
'नयनतारा' ३५४
नवद्वीपचंद्र दास २६९
नवविधान २५४, २५५, २६८, ३८८-३८९
नवीन ठाकूर ६६, ६७, ६८
नवीनचंद्र चक्रवर्ती ५४
नवीनचंद्र राय २२१, २२४, ३३८, ३४२

नवीनचंद्र सेन ( कवि ) ८०
नवीनचंद्र सेन ( केशवचंद्र सेनचे वडील भाऊ ) १२१
नागपूर ३५६
नम्बुद्री ब्राह्मण ३४४–४५
नायर ३४४
नारायण गणेश चंदावरकर २३०
नारायण परमानंद २३०
न्यूमन ( जॉन हेनरी ) १६८, ३१९, ३५१, ३९२
न्यूमन ( फ्रान्सिस ) ३०७, ३९४
' निर्वासिताचा विलाप ' ( काव्य ) ८१
नीति विद्यालय २६३
नीलकमल देव १२८
नीलमणी मित्र २४३
नेपालचंद्र मल्लिक १३६
नेपोलियन १६६, ३१२
नेल्सन ३२४
नॅशनल इन्डियन असोसिएशन २२३, २९०
' पंचप्रदीप ' १७८
परमानंद ( नारायण ) २३०
परशुराम ३४४
पार्कर ( थिओडोर ) ३९४
पार्नेल ३११
पार्वतीचरण राय २७१, २७९
पिगॉट ( मिस् ) १४५
पिता, ' हरानंदभट्टाचार्य ' पहा. ६
पितामह–आजोबा–रामकुमार भट्टाचार्य ५
पितामही–आजी–लक्ष्मीदेवी ३
पिसामशाय–आतेचा नवरा– ६
पिसीमाता– ( आत्या आनंदमयी ) ६
' पीपल्स पॅलेस ' २९३, २९६
पुणे २३१
पुण्यदाप्रसाद सरकार २६५
पुरी ३५५
' पुष्पांजली ' ( ग्रंथ ) १८७
' पुष्पमाला ' ( ग्रंथ ) १८७
प्यारीचरण सरकार ७९, ८०, ८१
प्यारी मोहन चौधुरी १०६
प्रकाशचंद्र राय १६१, २२२, २२३
प्रतापचंद्र मजुमदार १५१
पणजोबा– प्रपितामह– 'रामजय न्याया-लंकार' पहा
प्रबंधावली ३५४, ३८२
' प्रभाकर ' पत्रिका ७
प्रमदाचरण सेन १५१, २६३
प्रसन्नकुमार राय ३५३
प्रसन्नकुमार सर्वाधिकारी १३५, १४२
प्रसन्नकुमार सेन १५१
प्रसन्नमयीदेवी ( प्रथमपत्नी ) ५४, ५५, ७५, ८२, ९२, ९८, ११३, १२८, १२९, १५६, १५७, १६१, १६२, १७०–७१, १८४, १८६, १८७, २१०, २११, २२०, २२१, ३८५, ३८६, ३८७-३९०
प्राणकुमार दास १३६
प्रियनाथ भट्टाचार्य १३६, १४७
प्रियनाथ राय चौधुरी ५३, ६९
प्रियनाथ बसू २४०
प्रेमचांद तर्कवागीश ३०५
' प्रौढ महिला विद्यालय ' २०९
फणिंद्र यति २४२, २४३
फॉसेट ( मिसेस ) ३११, ३९५
बंगचंद्रराय २३४
बर्णाडो ( डॉक्टर ) २९३, २९९

बडलियन लायब्ररी ( आक्सफर्ड ) ३०४
बंगलोर २५३, २५४, ३४५
बटलर ( मिसेस ) ३११, ३९५
बडवेल्लन ( गाव ) २६५
बडोदे २३०
बर्णार्डो ३९३
बायबल. १३१, ३३४
बाघ आंचडा ( गाव ) २०९
बारासत ८३
बारीपूर ७१
बर्ड कंपनी २४०
बालिगंज १६४, ३४९
बांकीपूर २११, २२१, २२३, २३५
बी. एल. गुप्त ( मिसेस ) १५१
'बिरादर हिंदू' पत्रिका २२६
बिपिनचंद्र पाल १८९
बिपिनबिहारी सरकार १, ३४८
बुच्चिया पंतलू २४५, २५४
बूथ ( जनरल व मिसेस ) ३०१
बूथ ( ब्रॉमवेल ) ३०१, ३९४
बेजवाडा ३४६
बेथून कॉलेज १६४
बेलघेरिया १५२
बेंजामिन २९४
बेहाला ( गाव ) १५७, १५८
बोर्डस्कूल ३०२
ब्रजनाथ दत्त २४, २५, ६९
ब्रजेंद्रकुमार बसू २२३
ब्रह्मपुत्र नद २७३
ब्रह्ममयी ( दुर्गा मोहनदास यांची पत्नी ) १७०-१७२, ३८६
ब्राडला २९२, ३२७, ३९५
'ब्राह्म पब्लिक ओपिनियन' पत्रिका १९४, २०५, २०६, २५९, २६४
ब्राह्म प्रतिनिधि सभा १७५
ब्राह्ममिशन प्रेस २६४
ब्राह्मबालक बोर्डिंग २३८, ३५२
ब्राह्मबालिका विद्यालय ७०, ३३९, ३४०, ३४२
'ब्राह्मसमाज कमिटी' १९४, १९५, १९८, ३३३, ३३८, ३३९, ३४९, ३५१, ३८७, ३८८
ब्राह्मसमाज लायब्ररी ३५३
ब्राह्मसमाजाचा इतिहास ३३२, ३३३
ब्राह्मधर्म साधना ३४९
ब्राह्मसाधनाश्रम ३५१
ब्रिटिश इंडियन असोसिएशन १७७
ब्रिटिश म्युझियम लायब्ररी ३०३
ब्रिस्टल २९३, २९९, ३३१, ३३६
ब्रुक ( रेव्हरंड स्टॉप फोर्ड ) ३३३, ३३६
ब्लॅव्हॉटस्की २३२, २३३, ३९५
ब्लेकर ( मिस्टर ) ३३७
भगवती देवी ( विद्यासागर यांची आई ) १११
भगवानचंद्र बसू २४३, २६३
भगि दिदी १५९
'भट्टीबाबू' ६६, ६७
भवानीपूर ६४, ६९, ८१, ८३, ८५, ८६, ८८, ९३, १००, १०२, १०४, १६३, १६७, १७४
भवानीपूर आदि ब्राह्मसमाज १६४, १६८
भवानीपूर ( स्वतःच्या घरात ) ब्राह्मसमाज ७१, ७९, १६४, १६५, १७३, १८०, २६१, ३४१
भवानीपूर साउथ सबर्बन स्कूल १७३, २३८, २४३
भांडारकर ( रामकृष्ण गोपाळ ) २३०

भारत आश्रम १३८, १४२, १६४, १६९, २६८, १७३, २०५, २६८
भारतचंद्र ( राय गुणाकर ) ५१
भारतवर्षीय ब्राह्मसमाज १९६, २०३, २०४
भारतसभा १७५, १७७, २०९
भीमराव २४९, २५०
भुवनमोहनदास १९४, २६१, २६४
भोलानाथ पाल २१७
भोलानाथ साराभाई २३०
मगराहाट ७२
मजिलपूर १, २, ३, १४, ७०
' मजिलपूर पत्रिका ' २४
मजिलपूर बालिका विद्यालय ६९
मजिलपूर हार्डिंज मॉडेल ( बंगाली ) स्कूल १७
मजिलपूरचे इंग्रजी स्कूल २४
मुजफरपूर २१०
मतिहारी २१०, २११
मदनमोहन तर्कालंकार १७, २४
' मद्य की विष ' १४०
मधुसूदन राव ३५४
मणिलाल मल्लिक १३६
मोनियर वुइल्यम्स ( अध्यापक ) ३११, ३९५
मनमोहन घोष १७७
मनोमोहिनी (गणेशसुंदरी) १०३,१३० २३२, २४५, २५१, २५४ २५७
मद्रास ३४४
मयदा गांव १
मछलीपट्टण ३४६
मलबार किनारा ३४४
महादेव गोविंद रानडे २३०, २३१, २३२
महालक्ष्मी ९७, ९८, ९९, १००, १०१, १०२, १११, ११३, ११४
महीमचंद्र बंद्योपाध्याय ८८, ८९, ९०
महेंद्रलाल सरकार ( डॉक्टर ) १०२, १०३
महेशचंद्र चौधुरी ६४, ६५, ६६, ६७, ८१, ८२, १०१
' मद्रास मेल ' पत्रिका २५०
मायकेल मधुसूदन दत्त ८२
' माघोत्सवी उपदेश ' २३९
मंगलोर ३५६
माधवराव ( सर टी. ) २३०
मार्टिनो ( जेम्स ) ३९३
मार्सेलिस २८१
म्युटिनी ( शिपायांचे बंड ) ४८
' मिरर ' पत्रिका १२२, १६६, १६८, १७६, १९२, १९९, २३३, २३५
' मुकुल ' पत्रिका २६४
मुक्तिफौज ( साल्व्हेशन आर्मी )२३५
मुंगेर १८१, १८७, २१०, २११
मुंबई २३०
मुदलियार ( रंगनाथन् ) २५१
मुलतान २२७, २२८
मूलर ( जॉर्ज ) २९३, २९९, ३९२
' मेजबऊ ' २२३
मॅकमिलन कंपनी ३३३
मॅनिंग ( मिस ) २९०
यदुमणी घोष २५८, २५९
यदुनाथ चक्रवर्ती १२२
याजपूर ३

यादवचंद्र चक्रवर्ती १८९
'युगान्तर' ३५४
योगेंद्रनाथ बंद्योपाध्याय (जावई) ८५, २७८
योगेंद्रनाथ बंद्योपाध्याय (विद्याभूषण) ९०, ९४, ९५
रघुनाथराव (दिवाणबहादूर) २४६
रंगनाथम् मुदलियार २५१
रंगाचार्लू (दिवाण) २५३
रजनिनाथ राय १२८, १४९, १६४
रतलाम ३३८
रवा (कुत्रा) ५५, ५६
रमानाथ घोष ६९
रमा (रामकुमार विद्यारत्न यांची मुलगी) ३५५
रावळपिंडी ३५६
राव (सर टी. माधव) २३०
राजकृष्ण बंद्योपाध्याय ४९
राजकृष्ण मुखोपाध्याय १५२
राजनारायण बसू १४१, १८३, २१२, २१३
राजपूर ५४, १५७, १५८
राजमहेंद्री २४४, २४७, २५०, २५१, ३४६
राजलक्ष्मी सेन १५१
रानडे (महादेव गोविंद) २३०, २३१, २३२
राणी रासमणी ७४
राधाकान्त देव (राजा सर) ७८
राधाकांत बंद्योपाध्याय १३०
राधागोविंद मैत्र ५१
राधाराणी लाहिडी ११४, १२७, १३५
राधिकाप्रसन्न मुखोपाध्याय (स्कूल इनस्पेक्टर) १६३, १७३
राधिकाप्रसन्न मुखोपाध्याय (इंजिनीयर) २४४
रामकुमार भट्टाचार्य (आजोबा वडिलांचे वडील) ५
रामकुमार विद्यारत्न १७८, १९ २०९, २६९
रामकृष्ण गोपाळ भांडारकर २३०
रामकृष्ण परमहंस १६८–६९
रामकृष्णिया २४७, २४८, २५०
रामगती चक्रवर्ती ४८
रामजय न्यायालंकार (पणजोबा) ३, ६, १८५
रामतनु लाहिडी १२७.
'रामतनु लाहिडी आणि तत्कालिन वंग समाज' ३५४
राममोहन राय (राजा) १०७, २०६, २५७, ३३१, ३३२, ३४७, ३९३
रामयादव चक्रवर्ती ५६
रुटलेज (जेम्स) १४१
रेजिमेंटल ब्राह्मसमाज बंगलोर २५३
लखनौ २११
लक्ष्मीदेवी (वडलांची आई) ३
लक्ष्मीमणी १६१, १६२, १६३, १६७, १७८, १८०
लछमनप्रसाद ३३८
लंगडी चुलत बहीण २७
लंडन २८२, २८६, २८७ ३३५
लॉरेन्स (लॉर्ड) १२१, १३१
लालसिंग २२६, २२८, २३०
लावण्यप्रभा बसू २६३
लाहोर १०३, २२४, २२६, ३५२

लीलावती अग्निहोत्री २२६
लेग ( डॉक्टर ) ३३४
लेहना सिंग २२७
लोकनाथ मैत्र १०८
वर्किंग मेन्स इन्स्टिट्यूट २९७
वागळे ( बी. एम्. ) २३०
विजयकृष्ण गोस्वामी ८६, १२१, १२२, २०९
विनोदिनी (हरनाथ बसूंची पत्नी) १६५
विराजमोहिनी देवी (द्वितीय पत्नी) ८३, ९१, ९९, १०३, १४६, १५६, १६३, १७३, १८५, २२०, २२१, २७६, ३४८
विल्यम् ( अध्यापक मोनियर ) ३९५
वीरेशलिंगम् पंतलु २४७, २५०
वुइंडसर कॅसल ३२४
वुइलियम स्टेड ३०८, ३१०, ३११
वेणीसंहार नाटक ११४, ११५, ११६
वेस्टमिनिस्टर ॲबे ३२४
वैदिक ब्राह्मण २, ९२
वंगमहिलाविद्यालय १६४
वंगीय साहित्य परिषत् ३३२
व्हॉन साहेब १३०
व्हॉयसी ( रेव्हरंड चार्लस ) ३०७, ३०८, ३३१, ३३७
शरच्चंद्र राय १८९
शशिभूषण बसू ( प्रचारक ) २६९
शशिभूषण बसू ( सह–संपादक ) ३४८
शितिकंठ मल्लिक १७०
शिवकृष्ण दत्त २४, २५, ६९
शिवनाथ दत्त ६९
शिवचंद्रदेव २१५, २४४
शिवनारायण अग्निहोत्री २२६, २३९
शिवसागर २७२
शिलाँग २७२
शिलिगुडी २७१, २३९
शुकना २३९
शुकरमुल्ला ७०, ७१
शेयालखाकी ( कुत्री ) ३४, ३५, ३६
शोभाबाजार ११५
श्यामबाजार ब्राह्मसमाज १३४
श्यामाचरण गुप्त २४, २५
श्रीकृष्ण उद्गाता २, ३
श्रीनाथ दत्त १२८
श्रीनाथ दास १०३, १०८, १०९
श्रीशचंद्र चौधुरी ६६
श्रीशचंद्र विद्यारत्न ३६३
श्रीराजाराम मोहनराय रॅगेडस्कूल २५७
स्टॉपफोर्ड ब्रुक ३११
स्ट्रीट ( गाव ) ३१८, ३१९
सक्कर २२८
‘ सखा ’ पत्रिका २६३
सटवी ( ‘ जातहरिणी ’ ) २१
सतीशचंद्र चक्रवर्ती ३५३
मासिक ‘ समदर्शी ’ पत्रिका १६७
‘ समालोचक ’ पत्रिका १९४, १९६
सर क्लिफ साहेब १७४
सरला महलानवीश २६३
सरोजिनी ( कन्या ) १६७, १८७
संस्कृत कॉलेज १४, ४०, ८८, १०३, १०४, ११४, ३०५, ३९१
साउथ सबर्बन स्कूल ( भवानीपूर ) ७९, १६३
‘ साधनकानन ’ १७६
‘ साधनाश्रम ’ २३८, ३८५, ३८७, ३४९, ३५१
साधनाश्रमाचा इतिहास ३५०

साधारणचंद्र २०३
साधारण ब्राह्मसमाज १९३, १९९, २०१, २०३, २०४, २०८, २१०, २११, २१९, २२०, २३७, २३८, २४३, २५५
'साप्ताहिक समाचार' पत्रिका १६५
शारदानंद हालदार १२८
'सारस पक्ष्याची वाणी' १९६
साराभाई (भोलानाथ) २३१
सिटीस्कूल २१५, २१६, २१९, २६३, ३५०
सिन्दुरियापटी पारिवारिक समाज (कौटुंबिक समाज) १३६
सिन्दुरियापटी ब्राह्मसमाज १३६, १६४
सिमला ३५५
सीतानाथ नन्दी ३५२
सुंदरी मोहनदास १८९
सुरत २३१
सुरेंद्रनाथ बंद्योपाध्याय १७७
'सुलभ समाचार' पत्रिका १४०
सुहासिनी (कन्या) १५७
'सोमप्रकाश' पत्रिका ७, ५९, ६०, ७८, ७९, ८१, ११५, १२३, १३३, १५५, १५६, १५७, १५८, १६३, १७४, २२४
सोसायटी ऑफ थिस्टिक फ्रेंडस १४०
सौदामिनी खास्तगीर १५१
स्टेड (बुइल्यम) ३०८, ३१०, ३११, ३२७-२८, ३९१
सॅल्वेशन आर्मी ३०१
हरगोपाळ सरकार १२७
हरचंद्र न्यायरत्न (आईचे वडील) ७, ४६
हरनाथ बसू ६९, ७१, १६५
हरलाल राय १३२
हरानंद भट्टाचार्य (वडील) ३, ५
हरिदास दत्त २४
हरिनाभी १५६, १५७, १५८, १६१, १६२, १६३, १६४, १६५, १७३, १८३, ३४१
हरिनाभी धर्मादाय दवाखाना १५८
हरिनाभी ब्राह्मसमाज १३८, १६१
हरिनाभी म्युनिसिपालिटी १५८
हरेकृष्ण बाबाजी ४६, ४७, ४८
'हायचर्च' १६७, १६८
'हा काय ब्राह्मविवाह!' १९९
हार्डिंज मॉडेल स्कूल (मजिलपूर) १७, ५९
'हिंदू पेट्रिएट' पत्रिका २४६
हिंदू महिला विद्यालय १६४
'हिमाद्रिकुसुम' २७२
हेमचंद्र विद्यारत्न ९४, ११९, १२०
हेमचंद्र कुमार घोष १३१
हेमलता (ज्येष्ठ कन्या) ९२, ९३, १२८, १४७, १६५, २११, २६४, ३४८
हेमेंद्रनाथ दत्त १८४
हेयर (डेव्हिड) ७
हेयर स्कूल १७३, १८१, १९३, २१८, २६३, ३९४
हेल्पस् (सर आर्थर) ११३, ३९१
हैदराबाद (सिंधप्रदेश) २२८
होळकर ३३८
ज्ञानदा (रामकुमार विद्यारत्न यांची पत्नी) २१०

* * *